# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:–५/४/२०१७

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ५/४/२०१७ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा बुधवार दिनांक ५/४/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत **डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी, ठाणे** हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ४० | श्री. रवी किशनचंद जग्यासी |
| २ | श्रीमती पुजा सचिन भोईर | ४१ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी |
| ३ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ४२ | श्रीमती कविता लाल पंजाबी |
| ४ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ४३ | श्री. जीवन चंद्रभान इदनानी |
| ५ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४४ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| ६ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ४५ | श्री. गजानन प्रल्हाद शेळगे |
| ७ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ४६ | श्रीमती ज्योती प्रकाश (पिंटो) बठिजा |
| ८ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४७ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी |
| ९ | श्रीमती आशा नाना बिराडे | ४८ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| १० | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४९ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ११ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ५० | श्रीमती ज्योती शामराव माने |
| १२ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ५१ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १३ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ५२ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| १४ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ५३ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| १५ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ५४ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १६ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा | ५५ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १७ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ५६ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १८ | श्रीमती मिना कुमार आयलानी | ५७ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १९ | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ५८ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| २० | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ५९ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| २१ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ६० | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| २२ | श्रीमती सरोजिनी मुरलीधर टेकचंदानी | ६१ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| २३ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ६२ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| २४ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ६३ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| २५ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ६४ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| २६ | श्रीमती शुभांगीनी निकम | ६५ | श्रीमती पुजाकौर श्यामसिंग लबाना |
| २७ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ६६ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| २८ | श्री. भगवान शंकर भालेराव | ६७ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २९ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ६८ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| ३० | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ६९ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| ३१ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ७० | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| ३२ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ७१ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| ३३ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ७२ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| ३४ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ७३ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| ३५ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ७४ | श्रीमती मिनाक्षी रवी पाटील |
| ३६ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ७५ | श्री. विजय चाहु पाटील |

| | | | |
|---|---|---|---|
| ३७ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ७६ | कु. कविता सुरेश गायकवाड |
| ३८ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ७७ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| ३९ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ७८ | श्री. विकास परशुराम पाटील |

तर

**श्री. सतरामदास जेसवानी हे सदस्य सभेस अनुपस्थित होते.**

**खालील अधिकारी सभेस हजर होते.**

१. डॉ. सुधाकर शिंदे, आयुक्त
२. श्री. बुराडे, जिल्हा प्रशासन अधिकारी
३. श्रीमती विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त तथा उप–आयुक्त
४. श्री. जमीर लेंगरेकर, उप–आयुक्त, मुख्यालय
५. श्रीमती प्राजक्ता मि. कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
६. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
७. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
८. डॉ. राजा रिजवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
९. श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि
१०.श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
११.श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त
१२.श्री. बाजीराव जाधव, प्र. सहा. आयुक्त
१३.श्रीमती अलका पवार, प्र. सहा. आयुक्त
१४.श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१५.श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
१६.श्री. विनोद केणी, प्र. भांडार विभाग प्रमुख
१७.श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
१८.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

**तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.**

१. श्रीमती मनिषा अनिल महाजन
२. श्रीमती नर्गीस एम. खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

सर्व प्रथम वंदे मातरम् म्हणून **दुपारी २.२५ वाजता** सभेची सुरूवात करण्यात आली.

महापालिका सचिव:– विषय क्र. १......

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी :– आयुक्त साहेब, एक मिनिट मला एक शंका आहे ती विचारत आहे फक्त आजचे निवडणूकीचे जे कामकाज आहे ते कुठल्या आदेशाने आहे.

महापालिका सचिव :–महापौर व उपमहापौर या पदासाठी निवडणूक नियमातील नियम ५ अन्वये महापौरांची नेमणूक करण्यासाठी बोलविलेल्या आजच्या या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी मा. डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी, ठाणे हे उपस्थित आहेत.

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :–** उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २०१७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्याची खुला (महिला) महापौर पदासाठी निवड करणे .

---

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u> ऐकुन घ्या, जिल्हाधिकारी साहेब, आयुक्त साहेब, ऐकुन घ्या. आमचे म्हणणे ऐकुन घ्या.

<u>डॉ. महेंद्र कल्याणकर (पीठासीन अधिकारी):–</u> आपण आधी बसा. मी पीठासीन अधिकारी आहे, मी आदेश देईल ना तुम्हांला. आपण बसा. आता सचिवांनी विषय सुरु केले आहे त्याप्रमाणेच जावे लागेल आपल्याला. आपल्याला बोलायचे आहे तर सांगा ना, मी परवानगी देतो ना तुम्हांला. आपण कृपया बसा त्यांनी सभा सुरु केली आहे.

<u>महापालिका सचिव:–</u>विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १** :– उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २०१७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्याची खुला (महिला) महापौर पदासाठी निवड करणे.

---

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>आजचे कामकाज आहे ते करायला तुम्हांला काही हरकत नाही, परंतु आमचे म्हणणे ऐकुन घ्या.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>सन्माननिय जिल्हाधिकारी साहेब, आपण उशिरा आला आहात.

<u>डॉ. महेंद्र कल्याणकर (पीठासीन अधिकारी):–</u>आपण परवानगी घेवुन बोला, माझी परवानगी घ्या.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :–</u>आम्ही परवानगी मागत आहोत. परवानगी आपण देत नाहीत. कोकण आयुक्तांच्या विषयावर बोलायचे आहे, आम्हांला परवानगी हवी.

<u>डॉ. महेंद्र कल्याणकर (पीठासीन अधिकारी):–</u>आपण परवानगी न घेता परस्पर बोलायचे नाही.

<u>महापालिका सचिव :–</u>महापौर व उपमहापौर या पदासाठी निवडणूक नियमातील नियम ५ अन्वये महापौरांची नेमणूक करण्यासाठी बोलविलेल्या आजच्या या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी मा. डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी, ठाणे हे उपस्थित आहेत.

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १** :– उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २०१७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्याची खुला (महिला) महापौर पदासाठी निवड करणे .

---

माझ्याकडे प्राप्त झालेले नामनिर्देशनपत्र मी मा. पीठासीन अधिकारी यांच्याकडे सुपुर्द करीत आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>आता बोलु शकतो काय? परवानगी दयाल काय आता?

<u>डॉ. महेंद्र कल्याणकर (पीठासीन अधिकारी):–</u>तुम्ही सर्व जे बोलत आहात ते एण्टीसिपेशनमध्ये बोलत आहेत. मला विषय तरी घेवु दया, सचिवांनी विषय घेतल्यानंतर मला बोलु दया मग तुम्ही विषय मांडा ना. एवढी गर्दी करायची काय गरज होती. सर्व सन्माननिय सदस्य मला विभागीय आयुक्त महोदयांनी आपल्याकडे त्यांचे प्रतिनिधी म्हणुन, पीठासीन अधिकारी म्हणुन आज येथे पाठविलेले आहे, त्यामध्ये सचिवांनी पहिला विषय येथे पुकारलेला आहे. त्यामध्ये आपल्याला महापौर व उप–महापौर पदासाठी निवडणूक घ्यायची आहे. सर्वप्रथम महापौर निवडणूक घेण्यासाठी आपल्याला तजविज करायची आहे, त्यानंतर आपण उप–महापौर पदाची निवडणूक घेणार आहोत. सचिवांनी आता सर्व संमतीनुसार निवडणूकीचा कार्यक्रम स्विकारलेला आहे, ते निवेदन प्राप्त देखील झालेले आहे. त्याची आपण टप्प्यानुसार निवडणूकीची प्रक्रिया पुर्ण करत आहोत. तत्पुर्वी मला येथे येण्यास रहदारीमुळे विलंब झाला त्याबद्दल मी सर्वांची दिलगीरी व्यक्त करतो. तसेच सचिवांनी कार्यक्रम सुरु करण्यापुर्वी काही सदस्यांना येथे बोलण्याची परवानगी पाहिजे होती ती अनुमती केवळ

विषयानुरुप असावी अशी माझी आपणा सर्व सदस्यांना विनंती आहे. दुसरे म्हणजे अशा कोणत्याही पध्दतीची पीठासीन अधिका—यास अधिकार आहेत की त्याने परवानगी दयावी की न दयावी. परंतु पारदर्शकता असावी, त्यांचे काय म्हणणे आहे हे सभागृहाला आणि विशेषत: पीठासीन अधिका—याला कळावे. म्हणुन मी केवळ कोणत्याही गटामधील जर आपण सन्माननिय ३ सदस्याने हात वर केला त्यापैकी एखादया सदस्याने तिघांच्यावतीने मत मांडावे. तेही अत्यंत त्रोटक स्वरुपात मांडावे, कुणालाही कोणत्याही सभागृहाला सभागृहात उपस्थित सदस्याला देखील त्यांचे नाव न घेता त्यांचे आभार व्यक्त न करता केवळ मुद्दा मांडावा, पहिला विषय आताच मांडला आहे तो असा आहे, आपण कोणता विषय घेतला पुर्वी? महापौर पदाचा घेतलेला आहे, तर महापौर पदासाठी किती फॉर्म आलेले आहेत ते माझ्याकडे दया. आणखीन एक लक्षात ठेवायचे की पीठासीन अधिका—याला कार्यक्रमासाठी पाठविले जाते, त्याच्यामुळे कायदयास अनुसरुन जर मी येथे विषय मांडला तर आपल्याला मला ऐकुन घ्यायची गरज नाही. येथे मी नमुद करतो. परंतु आपले काय म्हणणे आहे असे मला मा. विभागीय आयुक्त महोदय यांच्यासमोर मांडता यावे त्यामुळे तिघांच्यावतीने कुणीतरी एकानेच मत मांडावे. त्रोटक स्वरुपात मांडावे ते मी लिहुन घेईल. आता त्या आधी मी येथे जे मांडले व सचिवांनी जो आधी विषय मांडला होता मा. महापौरांचा, त्यामध्ये त्यांनी श्रीमती मिना कुमार आयलानी यांचा एक अर्ज दिलेला आहे आणि दुसरा श्रीमती ज्योती शामराव माने यांचा देखील माझ्याकडे अर्ज आलेला आहे. तर यांचा मुद्दा ऐकुन घेतांना हे पाचही नामनिर्देशन सदस्य हे एकाचे दोन आणि एकाचे तीन असे अर्ज आलेले आहे. याची मी छाननी देखील करत आहे. आपण आपले म्हणणे कुणीही एकाच पध्दतीने त्रोटक स्वरुपात मांडावे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :</u>—धन्यवाद साहेब, आपण सुरुवातीलाच सांगितले की, कोकण विभागीय आयुक्त यांनी आपली नियुक्तीचे आदेश दिलेले आहेत. याठिकाणी श्री.राजेंद्र चौधरी व श्री. भगवान भालेराव हेच सांगत होते की मा. कोकण विभागीय आयुक्तांनी आपणांस आदेश दिले की निवडणूक घेण्यासाठी त्याची नियमावली काय आहे. आणि त्यांच्याबाबतीतच मनात शंका आहे की, त्यांनी जो आदेश दिला या उल्हासनगर महानगरपालिकेसाठी तो मी वाचुन दाखवित आहे. दिनांक ३१/३/२०१७ रोजी पक्षाची आघाडी किंवा गट किंवा पक्षीय बलाबल याची माहिती आमचे शहर प्रमुख श्री. राजेंद्र चौधरी यांनी विचारली त्याची माहिती देत आहे, त्यामध्ये त्यांनी ७ गट स्पष्टपणे दिलेले आहेत. राष्ट्रवादी कॉंगेस पाटी, भारतीय जनता पार्टी, शिवसेना, इंडियन नॅशनल कॉंग्रेस पार्टी, भारीप बहुजन संघ, आरपीआय (आठवले), पीपल्स रिपब्लीकन पार्टी अशा ७ गटांना त्यांनी मान्यता दिलेली आहे. दुस—याच दिवशी दोन दिवसानंतर काय झाले माहित नाही परंतु बदल येथे आम्हांला समजत आहे, आताच येथे श्री. राजेंद्र चौधरी हे विचारत होते की जो कार्यालयीन आदेश त्यांनी दिलेला आहे की शेवटचे मी सांगतो की संबंधीत सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया आघाडी हा गट नोंदणी करीता विहित मुदतीत अर्ज केला आहे, नियम ३ अन्वये अपेक्षित कागदपत्र सादर करायचे असून सादर केलेल्या कागदपत्रांपैकी खालील नमुद केलेले कागदपत्र सादर केलेले आहे. त्या आधारे कोणताही गट स्थापन करायचा असेल किंवा आघाडी स्थापन करायची असेल तर निवडणूक झाल्यानंतर ३० दिवसाच्या आत मध्ये सर्व कागदपत्राची पुर्तता केल्यानंतरच गट स्थापन होतो परंतु ३१/३/२०१७, २३ फेब्रुवारी ते ३१/३/२०१७ जवळपास सव्वा महिना म्हणजे ३५ ते ४० दिवस झाले होते, कोकण विभागीय आयुक्त यांच्याकडे सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया या पक्षाने घटना किंवा कागदपत्राची पुर्तता न केल्यामुळे एक आदेश दिलेला होता. संबंधीत महानगरपालिका पक्षाचे नियम व विनियम मग ते असे नियम किंवा विनियम म्हणुन घटना म्हणुन इतर कोणत्याही नावाने ओळखण्यात यावे अशी प्रत देणे आवश्यक होती. जेव्हा अशा पक्षाचा नियम व विनियम यांचा कोणताही स्वतंत्र संच असेल त्याबाबतीत असे नियम किंवा विनियम म्हणुन किंवा घटना म्हणुन कोणत्याही घटना पक्षाचा एक प्रत देणे, १ व २ प्रमाणे माहिती देणेनुसार बंधनकारक आहे तथापी महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरणाच्या सदस्यांची अनर्हता १९८७ चे नियम ३ (अ) अन्वये आवश्यक असलेल्या अटींची पुर्तता विहित केलेल्या ३० दिवसाच्या मुदतीत केलेली नाही. तसेच याबाबत शिवसेना शहर प्रमुख श्री. राजेंद्र चौधरी यांनी दिनांक २७/३/२०१७ रोजी लेखी तक्रार सुध्दा केली आहे. ती सर्व वस्तुस्थिती व कागदपत्रांचे अवलोकन करता मी विभागीय आयुक्त, कोकण विभाग, श्री. जीवन इदनानी, प्रेसीडंट, सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया, आघाडी यांनी उल्हासनगर सादर केलेल्या पत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया, आघाडी उल्हासनगर महानगरपालिकेच्या १२ नगरसेवकांचा गट म्हणुन नमुना ४ मध्ये नोंद घेता येणार नाही. असे आदेशीत करीत आहे, असा आदेश दिला. त्यानुसार त्यांनी कोणता कोणता गट आहे त्याची नावे दिली, ज्या कोकण विभागीय आयुक्त यांनी आपली नेमणुक पीठासीन अधिकारी म्हणुन केलेली आहे, तसा कोकण विभागीय आयुक्तांचा आदेश आहे आणि त्या आदेशानुसार ही कार्यवाही चालली आहे का? आपण कोणत्या आदेशानुसार कारवाई करत आहात? आपण जो आदेश प्राप्त केला तो हा आहे हे सर्व चुकीचे आहे त्यासाठी श्री. भगवान भालेराव उच्च न्यायालयात गेलेले आहे. शिवसेना पक्षही गेलेल आहे की कोकण विभागीय आयुक्त यांनी दिलेला निर्णय, अगोदर वेगळा निर्णय नंतर कोकण विभागीय आयुक्त निर्णय बदलतात हे समजतय. कोणत्या निर्णयाच्या आधारे आपण पीठासीन अधिकारी म्हणुन काम करत आहात. ही

बाब न्याय प्रविष्ट आहे, जर आदेश चुकला तर न्यायालयात वेगळे प्रतिसाद होणार आहे, त्यानुसार एक वेगळे चित्र असणार आहे. ही चुकीची प्रथा आहे चुकीचे प्रिसायडींग आपण करु नये. अशा प्रकारे कामकाज चालविणारे विभागीय आयुक्त यांचा आम्ही निषेध करतो. आमच्या पक्षातर्फे आम्ही निषेध करतो.

डॉ. महेंद्र कल्याणकर (पीठासीन अधिकारी):—सन्माननिय श्री. धनंजय बोडारे यांचे म्हणणे मी ऐकले आहे. यामध्ये विभागीय आयुक्त यांना घटनेने अधिकार दिला असल्यामुळे त्यांनी जो ३ एप्रिलचा आदेश दिलेला आहे, तो आपल्याला बंधनकारक आहे. हे सांगत असतांनाच सन्माननिय उच्च न्यायालयात याचिका दाखल आहे याची देखील आपण बाब मांडली आहे, सन्माननिय याचिका उच्च न्यायालयात दाखल असेल तर त्याचा अवमान न होता आपण त्याप्रमाणे कारवाई नक्कीच करु. आजपावेतो आणि आजपर्यंत आपल्याला कोणताही निर्णय प्राप्त नाही. आणि जरी कोणताही निर्णय प्राप्त झाला तर तो आपल्याला बंधनकारक आहे, त्यामुळे आता आपण काय निवडणूक घेतो आणि काय करतो हे सर्व त्याच्या अधीन असते त्यामुळे उच्च न्यायालयाचा आदेश अवमानकारक ठरेल अशी आपल्याला कोणतीही कारवाई करायची नाही. आणि त्या उद्देशाने ३ एप्रिलला विभागीय आयुक्त यांनी दिलेला आदेश हा आजमितीस तरी बरोबर असल्याचे गृहित धरुन मी पीठासीन अधिकारी म्हणुन आपले म्हणणे खारीज करतो. आणि निवडणूकीची प्रक्रिया चालु ठेवतो आपण कुणीही बोलु नये ही मी आपणांस विनंती करतो, पीठासीन अधिकारी म्हणुन. आणि आता यांनी जे दोन अर्ज दिले त्यांचे अर्ज पाहिले असता महापौर पदाच्या निवडणूकीसंदर्भात नियम ६ (२) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये मी सर्व नामनिर्देशनाची छाननी केली आहे. दोन नामनिर्देशनपत्रात सुचक म्हणुन श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी यांनी स्वाक्षरी केल्यामुळे अ.क्र. २ व ३ पैकी नियम ६ (२) नुसार अ.क्र. ३ चे नामनिर्देशनपत्र अवैध ठरविण्यांत येत आहे. तर अनुक्रमांक १ व २ चे नामनिर्देशनपत्र वैध घोषित करण्यात येत आहे.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—हे चुकीचे आहे.

सदस्य श्री. प्रमोद टाले :—३ एप्रिलची कॉपी तर दया आम्हांला.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—३ एप्रिलची कॉपी दया आम्हांला.

यावेळी सदस्यांच्या एकत्रित आवाजामुळे कोण नेमके काय म्हणत होते ते समजुन येत नव्हते.

डॉ. महेंद्र कल्याणकर (पीठासीन अधिकारी):—महापौर पदासाठी मी आता निवडणूक प्रक्रिया चालु करत आहे आणि पुनश्च विनंती करत आहे की माझ्या परवानगी शिवाय बोलु नये. पीठासीन अधिका—यांनी आपल्याला परवानगी दिली नाही बोलायची.

**यावेळी शिवसेना, राष्ट्रवादी कॉंगेस, आरपीआय, भारीप, कॉंग्रेस, या सदस्यांनी निषेध व्यक्त करुन सभात्याग केला तर त्यात काही सदस्यांनी कोकण विभागीय आयुक्त हाय हाय असे म्हणुन सभागृहातुन बाहेर गेले.**

डॉ. महेंद्र कल्याणकर (पीठासीन अधिकारी):—**महापौर** पदासाठी महापालिका सचिव यांचेकडे **दिनांक** ३०/०३/२०१७ रोजी ठरवून दिलेल्या वेळेमध्ये ५ नामनिर्देशन अर्ज प्राप्त झाले असून त्यांची नावे अनुक्रमाने पुढीलप्रमाणे आहेत:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती मीना कुमार आयलानी | श्री. दीपक लक्ष्मणदास सीरवानी | श्री. अशोक (सोनू) बच्चुमल छापरु |
| २. | श्रीमती मीना कुमार आयलानी | श्री. जमनादास खूबचंद पुरस्वानी | श्रीमती मीना सोनेजी चंद्रगुप्त |
| ३. | श्रीमती मीना कुमार आयलानी | श्री. जमनादास खूबचंद पुरस्वानी | श्री. रविन्द्र दशरथ बागुल |
| ४. | श्रीमती ज्योती शामराव माने | श्री. धनंजय बाबूराव बोडारे | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ५. | श्रीमती ज्योती शामराव माने | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

महापौर पदाच्या निवडणूकीसंबंधातील महापौर व उपमहापौर पदासाठी निवडणूका नियम ६ (२) अन्वये, मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये, मी सर्व नामनिर्देशनाची छाननी केली आहे. महापौर पदासाठी दोन नामनिर्देशनपत्रात सुचक म्हणुन श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी यांनी स्वाक्षरी केल्यामुळे अ.क्र. २ व ३ पैकी नियम ६ (२) नुसार अ.क्र. ३ चे नामनिर्देशनपत्र अवैध ठरविण्यांत येत आहे. तर अनुक्रमांक १ व २ चे नामनिर्देशनपत्र वैध घोषित करण्यात येत आहे.

छाननीमध्ये वैध ठरलेल्या उमेदवारांची मराठी वर्णानुक्रमाने (आडनावानुसार) नावे पुढीलप्रमाणे आहेत:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्रीमती आयलानी मीना कुमार |
| २. | श्रीमती माने ज्योती शामराव |

यावेळेस दुपारचे २ वाजुन ४१ मिनिटे झाली आहेत.

वरील २ उमेदवारांपैकी ज्या उमेदवाराला आपली उमेदवारी मागे घ्यावयाची आहे त्यासाठी १५ मिनिटांचा वेळ देण्यात येत आहे. ज्यांना आपली उमेदवारी मागे घ्यावयाची आहे त्यांना उमेदवारी मागे घेण्याचा विहित नमुन्यामध्ये अर्ज देवून आपली उमेदवारी मागे घेता येईल.


आता दूपारचे २ वाजुन ५६ मिनिटे झाली आहेत. उमेदवारी मागे घेण्यासाठी देण्यात आलेली १५ मिनिटांची वेळ संपली आहे असे मी जाहिर करतो. ज्या उमेदवारांनी उमेदवारी मागे घेतली आहे त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

दिलेल्या वेळेमध्ये वरील **कोणत्याही** उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली नाही.

आता, महापौर पदाच्या एका जागेसाठी खालील **दोन** उमेदवार शिल्लक राहिले असून

सर्वप्रथम महापौर पदाचे अनु. क्र. १ चे उमेदवार **श्रीमती आयलानी मिना कुमार** यांचे नाव पुकारण्यांत येत आहे. **श्रीमती आयलानी मिना कुमार** यांना मतदान करु इच्छिणा—या सदस्यांनी आपले हात वर करावेत:—

**मतदान केलेल्या सदस्यांच्या नावांची नोंद पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.**

**श्रीमती आयलानी मिना कुमार यांच्या बाजुने ४४ मते** 

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| १ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे |
| २ | श्रीमती पुजा सचिन भोईर |
| ३ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील |
| ४ | श्री. हरेश परमानंद जग्यासी |
| ५ | श्रीमती मिनाकौर अचिजतसिंग लबाना |
| ६ | श्रीमती पंचम उमेश कालानी |
| ७ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ८ | श्रीमती आशा नाना बिराडे |
| ९ | श्री. रविंद्र दशरथ बागुल |
| १० | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु |
| ११ | श्रीमती मिना कुमार आयलानी |
| १२ | श्रीमती गीता लालचंद साधनानी |

| | |
|---|---|
| १३ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी |
| १४ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर |
| १५ | श्रीमती सरोजिनी टेकचंदानी |
| १६ | श्रीमती जया प्रकाश माखिजा |
| १७ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी |
| १८ | श्रीमती शुभांगीनी निकम |
| १९ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग |
| २० | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ |
| २१ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील |
| २२ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग |
| २३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया |
| २४ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) |
| २५ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी |
| २६ | श्री. रवी किशनचंद जग्यासी |
| २७ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २८ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २९ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| ३० | श्रीमती मिनाक्षी रवी पाटील |
| ३१ | श्री. विजय चाहु पाटील |
| ३२ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| ३३ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता |
| ३४ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी |
| ३५ | श्रीमती कविता लाल पंजाबी |
| ३६ | श्री. जीवन चंद्रभान इदनानी |
| ३७ | श्री. गजानन प्रल्हाद शेळगे |
| ३८ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ३९ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी |
| ४० | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| ४१ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| ४२ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| ४३ | श्री शंकर गोविंदराम लुंड |
| ४४ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |

त्यानंतर महापौर पदाचे अनु. क्र. २ चे उमेदवार **श्रीमती माने ज्योती शामराव** यांचे नाव पुकारण्यांत येत आहे. **श्रीमती माने ज्योती शामराव** यांना मतदान करु इच्छिणा—या सदस्यांनी आपले हात वर करावेत:—
**मतदान केलेल्या सदस्यांच्या नावांची नोंद पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.**

श्रीमती माने ज्योती शामराव यांच्या बाजुने ०० मते 

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| निरंक | |

मी पुढीलप्रमाणे निकालाची घोषणा करतो.

<u>निकाल घोषणा</u>

उल्हासनगर महानगरपालिका महापौर पदाच्या निवडणूकीमधील प्रत्येक उमेदवाराला मिळालेल्या मतांचा तपशिल त्यांच्या नावासमोर नमुद करण्यांत आला असून तो पुढीलप्रमाणे आहे:—

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | मतदानाची संख्या |
|---|---|---|
| १. | श्रीमती आयलानी मीना कुमार | ४४ |
| २. | श्रीमती माने ज्योती शामराव | ०० |
| एकुण मतदान संख्या — | | ४४ |
| तटस्थ सदस्यांची संख्या — | | — |

महापौर व उप–महापौर पदासाठी निवडणूका घेणे नियमांतील नियम ७ (७) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये **महापौर** पदाचे उमेदवार ***श्रीमती आयलानी मिना कुमार*** यांना *एकूण ४४ पैकी ४४ इतकी* म्हणजेच सर्वाधीक मते मिळाल्यामुळे त्यांची ***महापौर*** म्हणून रीतसर नेमणुक झाली आहे असे मी जाहिर करतो.

दिनांक :–५/४/२०१७

(डॉ. महेंद्र कल्याणकर)
जिल्हाधिकारी
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

स्थान :– उल्हासनगर महानगरपालिका
सभागृह

विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र.२** :–उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन–२०१७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी एका सदस्याची उप–महापौर पदासाठी निवड करणे.

---

**डॉ. महेंद्र कल्याणकर (पीठासीन अधिकारी):– उप–महापौर** पदासाठी महापालिका सचिव यांचेकडे **दिनांक** ३०/०३/२०१७ रोजी ठरवून दिलेल्या वेळेमध्ये ५ उमेदवारी अर्ज प्राप्त झाले असून त्यांची नावे अनुक्रमाने पुढीलप्रमाणे आहेत:–

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | श्री. जीवन चंद्रभान ईदनानी | श्री. दीपक लक्ष्मणदास सिरवानी | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी |
| २ | श्री. जीवन चंद्रभान ईदनानी | श्री.जमनादास खूबचंद पुरस्वानी | श्री. महेश पहिलाजराय सुखरामानी |
| ३ | श्री. जीवन चंद्रभान ईदनानी | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा | श्रीमती कविता लाल पंजाबी |
| ४ | श्री. भगवान शंकर भालेराव | श्री. भारत रामचंद्र राजवानी | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ५ | श्री. भगवान शंकर भालेराव | श्री. सुमित सागर सोनकांबळे | श्रीमती मिताली राजेश चांन्पुर |

उप–महापौर पदाच्या निवडणूकीसंबंधातील महापौर व उपमहापौर पदासाठी निवडणूका नियम ६ (२) अन्वये, मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये, मी सर्व नामनिर्देशनाची छाननी केली आहे. प्राप्त सर्व नामनिर्देशनपत्रे वैध असल्याचे मी घोषित करीत आहे.

छाननीमध्ये वैध ठरलेल्या उमेदवारांची मराठी वर्णानुक्रमाने (आडनावानुसार) नावे पुढीलप्रमाणे आहेत:–

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. ईदनानी जीवन चंद्रभान |
| २. | श्री. भालेराव भगवान शंकर |

यावेळेस दुपारचे ३ वाजुन १२ मिनिटे झाली आहेत.

वरील २ उमेदवारांपैकी ज्या उमेदवाराला आपली उमेदवारी मागे घ्यावयाची आहे त्यासाठी १५ मिनिटांचा वेळ देण्यात येत आहे. ज्यांना आपली उमेदवारी मागे घ्यावयाची आहे त्यांना विहित नमुन्यामध्ये उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज देवून आपली उमेदवारी मागे घेता येईल.

आता दुपारचे ३ वाजुन २७ मिनिटे झाली आहेत. उमेदवारी मागे घेण्यासाठी देण्यात आलेली वेळ संपली आहे असे मी जाहिर करतो.

दिलेल्या वेळेमध्ये वरील **कोणत्याही** उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली नाही.

आता, उप–महापौर पदाच्या एका जागेसाठी खालील **दोन** उमेदवार रिंगणात शिल्लक राहिलेले आहेत आणि ज्यांनी आपली उमेदवारी मागे घेतलेली नाही त्यांची नावे मराठी वर्णानुक्रमाने आडनावानुसार पुढीलप्रमाणे आहेत :–

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. ईदनानी जीवन चंद्रभान |
| २. | श्री. भालेराव भगवान शंकर |

आता, वर्णानुक्रमाने उप–महापौर पदाचे अनु. क्र. १ आणि २ च्या उमेदवारांची नांवे जाहिर करण्यात आली आहेत. प्रत्येक उमेदवाराच्या बाजूने ज्यांना आपले मत द्यावयाचे आहे त्यांनी आपला हात वर करायचा आहे. उमेदवार निहाय तयार केलेल्या यादीमध्ये उमेदवाराला मतदान करणा–या सदस्यांच्या नावांची नोंद घेण्यात येईल.

सर्वप्रथम उप–महापौर पदाचे अनु. क्र. १ चे उमेदवार श्री. ईदनानी जीवन चंद्रभान यांचे नाव पुकारण्यांत येत आहे. श्री. ईदनानी जीवन चंद्रभान यांना मतदान करु इच्छिणा–या सदस्यांनी आपले हात वर करावेत:–

**मतदान केलेल्या सदस्यांच्या नावांची नोंद पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.**

श्री. ईदनानी जीवन चंद्रभान **यांच्या बाजुने** ४४ **मते**

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| १ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे |
| २ | श्रीमती पुजा सचिन भोईर |
| ३ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील |

| | |
|---|---|
| ४ | श्री. हरेश परमानंद जग्यासी |
| ५ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना |
| ६ | श्रीमती पंचम उमेश कालानी |
| ७ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ८ | श्रीमती आशा नाना बिराडे |
| ९ | श्री. रविंद्र दशरथ बागुल |
| १० | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु |
| ११ | श्रीमती मिना कुमार आयलानी |
| १२ | श्रीमती गीता लालचंद साधनानी |
| १३ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी |
| १४ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर |
| १५ | श्रीमती सरोजिनी टेकचंदानी |
| १६ | श्रीमती जया प्रकाश माखिजा |
| १७ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी |
| १८ | श्रीमती शुभांगीनी निकम |
| १९ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग |
| २० | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ |
| २१ | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील |
| २२ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग |
| २३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया |
| २४ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) |
| २५ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी |
| २६ | श्री. रवी किशनचंद जग्यासी |
| २७ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २८ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २९ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| ३० | श्रीमती मिनाक्षी रवी पाटील |
| ३१ | श्री. विजय चाहु पाटील |
| ३२ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| ३३ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता |
| ३४ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी |
| ३५ | श्रीमती कविता लाल पंजाबी |
| ३६ | श्री. जीवन चंद्रभान इदनानी |
| ३७ | श्री. गजानन प्रल्हाद शेळगे |
| ३८ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ३९ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी |
| ४० | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| ४१ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| ४२ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| ४३ | श्री शंकर गोविंदराम लुंड |
| ४४ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |

त्यानंतर उप–महापौर पदाचे अनु. क्र. २ चे उमेदवार श्री. भालेराव भगवान शंकर यांचे नाव पुकारण्यांत येत आहे. श्री. भालेराव भगवान शंकर यांना मतदान करु इच्छिणा–या सदस्यांनी आपले हात वर करावेत:–

**मतदान केलेल्या सदस्यांच्या नावांची नोंद पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.**

श्री. भालेराव भगवान शंकर यांच्या बाजुने ०० मते

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| निरंक | |

<u>पीठासीन अधिकारी ( डॉ. महेंद्र कल्याणकर):—</u> आता मतदान प्रक्रिया समाप्त झाली आहे म्हणुन यापुढे मी निकालाची घोषणा करतो.

<u>निकाल घोषणा</u>

उल्हासनगर महानगरपालिका उपमहापौर पदाच्या निवडणूकीमधील प्रत्येक उमेदवाराला मिळालेल्या मतांचा तपशिल त्यांच्या नावासमोर नमुद करण्यांत आला असून तो पुढीलप्रमाणे आहे:—

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | मतदानाची संख्या |
|---|---|---|
| १. | श्री. ईदनानी जीवन चंद्रभान | ४४ |
| २. | श्री. भालेराव भगवान शंकर | ०० |
| **एकुण मतदान संख्या** — | | ४४ |
| **तटस्थ सदस्यांची संख्या** — | | — |

महापौर व उप—महापौर पदासाठी निवडणूका घेणे नियमांतील नियम ७ (७) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये **उपमहापौर** पदाचे उमेदवार श्री. ईदनानी जीवन चंद्रभान यांना *एकूण ४४ पैकी ४४ इतकी* म्हणजेच सर्वाधीक मते मिळाल्यामुळे त्यांची **उप—महापौर** म्हणून रीतसर नेमणुक झाली आहे असे मी जाहिर करतो.

दिनांक :—५/४/२०१७

स्थान :— उल्हासनगर महानगरपालिका
सभागृह

(डॉ. महेंद्र कल्याणकर)
जिल्हाधिकारी
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :–</u> मा. पीठासीन अधिकारी यांच्या आदेशान्वये नवनिर्वाचीत महापौर व उप–महापौर यांना व्यासपीठावर आमंत्रित करण्यात येत आहे.

यावेळी मा. जिल्हाधिकारी व मा. आयुक्त यांनी मा. महापौर व उप–महापौर यांना पुष्पगुच्छ देवुन स्वागत केले व मा. जिल्हाधिकारी हे सर्वांचे आभार मानुन सभागृहातुन बाहेर गेले. त्यानंतर नवनिर्वाचित महापौर व उप महापौर आपापल्या स्थानावर आसनस्थ झाले.

<u>महापालिका सचिव:–</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवित आहेत.

---

**विषय क्र. ३ :–** उल्हासनगर महानगरपालिकेवर ५ नामनिर्देशित सदस्यांच्या नियुक्त्या करणे.

---

यावेळी सदस्य श्री. भगवान भालेराव, श्री. रमेश चव्हाण, श्री. भारत राजवानी, श्री. सुमित सोनकांबळे, श्री. प्रमोद टाले, सदस्या श्रीमती अंजली साळवे, श्रीमती कविता बागुल यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:–</u> नामनिर्देशित सदस्यांची जी नावे आली आहेत ती खालील प्रमाणे आहेत. १. श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी, २. श्री. मनोज दिलीपकुमार सयानी, शिवसेनेकडून ३. श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत, ४. श्री. अरूण लक्ष्मण आशान, सेक्युलर अलायन्स ऑफ इंडियातर्फे ५. श्रीमती आशा जीवन इदनानी,

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव–</u> राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पत्र दिले आहे ते पण वाचण्यात यावे. कारण की, ही सगळी प्रक्रिया मा. उच्च न्यायाल्यात चालू आहे. ते मिनिट्समध्ये घेण्यात यावे.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:–</u> त्याचा अंश नाही.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u>त्याचा अंश बनण्याचा प्रश्नच येत नाही उच्च न्यायालयामध्ये त्याची प्रक्रिया चालू आहे आणि मा. उच्च न्यायाल्यात चालू आहे आणि चालू असल्या कारणाने आम्ही करत आहोत. तेव्हा आपण इथे नमुद करून घ्या.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:–** जे पाच आहे ते आम्ही केले आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:–** ठिक आहे, कोर्टाकडून आल्यानंतर पक्षातर्फे कमल भटीजाचे नाव जाहिर केले जाईल.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:–** जर अंश नसेल तर मान्यता कशी देण्यात येईल.

**सदस्य, श्री. राजेश वधरिया :–** मा. महापौर मॅडम याच्यामध्ये आम्ही जी कारणे दिली आहेत, त्याची सुध्दा नोंद करण्यात यावी.

**महापालिका सचिव:–** यात फक्त नावे आहेत.

**उप महापौर, श्री.जीवन इदनानी**:– पहीले जे स्विकृत सदस्य आहेत, त्यांना आत बोलविण्यात यावे.

**महापालिक सचिव:–** नाही पहीले प्रक्रिया पुर्ण होऊ दया. जो पर्यंत राजपत्रात नावे प्रसिध्द होत नाहीत तो पर्यंत स्विकृत सदस्य सभेमध्ये बसू शकणार नाहीत.जो पर्यंत सभा चालू आहे.तो पर्यत त्यांना प्रवेश नाही. संपल्या नंतर.

मी पुन्हा एकदा इथे नावे वाचवून दाखवत आहे. श्री. रमेश चव्हाण, गटनेता, यांनी श्री. सुरेंद्र सावंत आणि श्री. अरूण आशान, सेक्युलर अलायन्स ऑफ इंडियातर्फे, श्रीमती आशा जीवन इदनानी यांचे नाव आले आहे आणि भाजपा गटनेता तर्फे श्री. मनोज सयानी व श्री. प्रदिप रामचंदानी यांचे नाव आले आहे.

सदस्य, श्री. भारत राजवानी :– राष्ट्रवादीतर्फे?

महापालिका सचिव:– राष्ट्रवादी गटनेता यांनी पत्र दिले आहे त्यांनी श्री. कमल भटीजा यांचे नाव सुचविले आहे.

सदस्य श्री. भगवान भालेराव:–ठिक आहे, आम्हांला तेच पाहिजे.

सदस्य, श्री. राजेश वधरिया :– मा. महापौर मॅडम याच्यामध्ये आम्ही जी कारणे दिली आहेत, त्याची सुध्दा नोंद करण्यात यावी.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :– सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

☑ विषय :— उल्हासनगर महानगरपालिकेवर ५ नामनिर्देशित सदस्यांच्या नियुक्त्या करणे.

प्रस्तावना

सन—२०१७ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर एकूण ७८ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आले आहेत. दिनांक २३/२/२०१७ निवडणूक निकालानंतर व दिनांक २८/२/२०१७ रोजी अधिसुचनाद्वारे निवडून आलेल्या सदस्याचे नाव जाहिर केल्यावर आणि महाराष्ट्र महानगरपालिका कलम ३१ अ च्या तरतुदी अन्वये प्रमाणशीर प्रतिनिधित्व देण्या प्रयोजनार्थ मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकणभवन येथे फ्रट किंवा आघाडीची नोंदणी झाल्यावर पक्षनिहाय संख्याबळ पुढीलप्रमाणे आहे.

| पक्षाचे नाव | पक्षनिहाय मुळ संख्या | संख्याबळामध्ये वाढ किंवा कपातीचे प्रमाण | तयार केलेल्या पक्ष/आघाडी/फ्रंटचे नाव | आघाडी किंवा फ्रंट झाल्यावर प्रमाणशीर प्रतिनिधित्वासाठी संख्याबळ |
|---|---|---|---|---|
| भाजपा | ३२ | — | — | ३२ |
| शिवसेना | २५ | — | — | २५ |
| सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया (साई पक्ष) | ११ | + १ | — | १२ |
| राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी | ४ | — | — | ४ |
| आर.पी.आय(ए) | २ | — | — | २ |
| पीपल रिपब्लीकन पार्टी | १ | — | — | १ |
| भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस | १ | — | — | १ |
| भारीप बहुजन महासंघ | १ | — | — | १ |
| राष्ट्रीय समाज पार्टी | १ | — १ | — | ० |
| **एकूण** | ७८ | | | ७८ |

महापालिकेच्या ५ नामर्देशित सदस्यांची नियुक्ती ही मान्यता प्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे तौलनिक पक्षबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता व अशा प्रत्येक पक्षाशी किंवा गटाशी विचार विनिमय करुन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे. संख्याबळ खालील प्रमाणे आहे

| भाजपा | शिवसेना | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया गट | राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी | आरपीआय (ए) | पीपल रिपब्लीकन पार्टी | भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस | भारीप बहुजन महासंघ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३२ | २५ | १२ | ४ | २ | १ | १ | १ |

| | |
|---|---|
| **78** | |
| **05** | = **15-60** |

एका पालिका सदस्याचे नामनिर्देशनासाठी मतांचे प्रमाण— १५.६० असणे आवश्यक आहे.

याअनुषंगाने प्रत्येक गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन खालील प्रमाणे असेल.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | भाजपा | ३२ / —— X ०५ / ७८ | = २.०५१ | (५) | आर.पी.आय(ए) | ०२ / —— X ०५ / ७८ | = ०.१२ |
| (२) | शिवसेना | २५ / —— X ०५ / ७८ | = १.६० | (६) | पीपल रिपब्लीकन पार्टी | ०१ / —— X ०५ / ७८ | = ०.०६ |
| (३) | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया (साई पक्ष) | १२ / —— X ०५ / ७८ | = ०.७६ | (७) | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ०१ / —— X ०५ / ७८ | = ०.०६ |
| (४) | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | ४ / —— X ०५ / ७८ | = ०.२५ | (८) | भारीप बहुजन महासंघ | ०१ / —— X ०५ / ७८ | = ०.०६ |

वरील गटाच्या संख्येच्या तौलनिक संख्याबळातून पूर्णांकाच्या आधारे प्रथम पक्षनिहाय खालील नेमणूका करण्यात येतील.

| भाजपा | शिवसेना | एकूण |
|---|---|---|
| २ | १ | ०३ |

यानंतर रिक्त राहणा—या दोन जागांवर नामनिर्देशन करतांना ज्या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे. त्या गटाचे पालिका सदस्याचे नामनिर्देशन करता येईल. आणि खालील गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ पुढील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| (१) भा.ज.पा. | २.०५ | (२) शिवसेना | १.६० |
| (३) सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया गट | ०.७६ | (४) रा.का.पा. | ०.२५ |
| (५) भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ०.०६ | (६) आरपीआय (ए) | ०.१२ |
| (७) पीपल रिपब्लीकन पार्टी | ०.०६ | (८) भारीप बहुजन महासंघ | ०.०६ |

वरील परिस्थिती पहाता शिवसेना, आणि सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया गट आतापर्यंत या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे त्यामुळे दोन रिक्त जागांवर या पक्षांच्या प्रत्येकी एक—एक सदस्याची नेमणूक करता येईल म्हणून प्रत्येक गटाच्या सदस्याचे प्रमाणाशिर प्रतिनिधीत्वाद्वारे खालील प्रमाणे नामनिर्देशन करण्यास प्रस्तावित.

| भाजपा | शिवसेना | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया गट | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | आरपीआय (ए) | पीपल रिपब्लीकन पार्टी | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | भारीप बहुजन महासंघ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | ०२ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०५ |

दिनांक २४/३/२०१७ रोजी उक्त बाबींसाठी महासभा सुचना काढण्यात आली आहे. त्यानुसार दिनांक ३१/३/२०१७ रोजी उमेदवारांकडून महापालिका सचिवांकडे प्राप्त होणाऱ्या सर्व अर्जांची छाननी खालीलप्रमाणे करण्यांत आली.

## नामनिर्देशन सदस्यांच्या अर्जांची छाननी अंतीची यादी

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | अर्हता | संस्थेचे नाव व पत्ता | पद व कालावधी | पुरावा म्हणुन सादर केलेली कागदपत्रे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. कन्हैयालाल घनश्यामदास नाथानी डॉ. नाथानी डिसपेंसरी, भारत | बी.ए.एम.एस. | —— | १६/९/१९८६ | महाराष्ट्र कॉन्सिल इंडियन मेडीसीन सर्टीफिकेट ऑफ रजिस्ट्रेशन | ४ (क) प्रमाणे अर्ज प्राप्त असून ते पात्रतेच्या निकषात बसत आहेत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | चौक,<br>उल्हासनगर–१<br><br>**भारतीय जनता पक्ष** | | | | २) युनिर्व्हसीटी मुंबईकडुन प्राप्त बी.. एम.एस. प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, प्रतिज्ञापत्र व शौचालयाचा दाखला | |
| २ | श्री. प्रकाश पंजुमल कुकरेजा<br><br>प्लॉट नं. ६०५, ६०६, नवजीवन टॉवर, ओ.टी सेक्शन, जसलोक शाळेसमोर, उल्हासनगर–३<br><br>**पक्षाचे नाव निश्चित नाही** | बी.कॉम., एल.एल. बी. | बार कॉसिल ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवा हायकोर्ट मुंबई | १९९१ ते २००५ पर्यंत उल्हासनगर महानगरपालिकेत विधी अधिकारी म्हणुन कार्यरत तसेच १ जानेवारी २००४ व २००५ मध्ये उप–आयुक्त, जकात म्हणुन कार्यरत, १८/१०/१९९६ पासुन नगरपालिका सचिव | बार काऊन्सीलचे प्रमाणपत्र, एल.एल.बी. चे गुणपत्रक, व प्रमाणपत्रक, बार काऊन्सीलचे ओळखपत्र, उप–आयुक्त व सहा. आयुक्त पदाचे कार्यालयीन सचिव पदाचे आदेश, शाळा सोडल्याचा दाखला प्रतिज्ञापत्र व शौचालयाचा दाखला | ४ (ड) प्रमाणे व (च) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे. ४ (ड) प्रमाणे ते पात्रतेच्या निकषात बसत आहेत.<br>परंतु ४ (च) प्रमाणे पात्र नाहीत. |
| ३ | श्री. तिरुपतीरेड्डी मोहनरेड्डी केक्षीरेड्डी<br>घर नं. ०९, साईबाबा कॉलनी, बालकंजीबारी, उल्हासनगर–३<br><br>**शिवसेना** | एस.एस. सी. | तेलगु कला समिती उल्हासनगर के/ऑफ रेड्डी कंपाउंड, साईबाबा मंदिरामागे, शांतीनगर, उल्हासनगर–३ | अध्यक्ष २० वर्षापासून | सहा.निबंधक याचे संस्था नोंदणी अधिनियम १८६० अंतर्गत प्रमाणपत्र, तेलगु कला समिती सचिवांचे पत्र, नोंदणी प्रमाणपत्र, संस्थेचा अहवाल, तेलगु कला समितीचे बॅलेंसशिट, मतदार यादी, प्रतिज्ञापत्र व शौचालयाचा दाखला | ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त असून ते पात्रतेच्या निकषात बसत आहेत. |
| ४ | श्री. जयकुमार दत्तात्रय केणी<br>अमृत वेल, साईबाबा मंदिरामागे, शांतीनगर, उल्हासनगर–३<br><br>**शिवसेना** | बी.ए. (हिंदीस्तर मुंबई हिंदी विदयापीठ) | श्री. गजानन महाराज मंदिर, शांतीनगर, उल्हासनगर–३ | सन १९९५ मंदिर स्थापनेपासुन आजतागायत मंदिराचे पदसिध्द अध्यक्ष म्हणुन पत्र | संस्थेचा दाखला, सहा. धर्मादाय आयुक्त यांचेकडील संस्थेचे नोंदणीचे प्रमाणपत्र (१९५० अंतर्गत), संस्थाचे लेखा परिक्षण अहवाल, शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड पॅनकार्ड, प्रतिज्ञापत्र व शौचालयाचा दाखला | ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त असून ते पात्रतेच्या निकषात बसत आहेत. |
| ५ | ॲड. विनोद शिवाजी जावळे<br>४०१, वसंत विहार, शांतीनगर, कल्याण–अंबरनाथ रोड, उल्हासनगर–३<br><br>**शिवसेना** | बी.ए., एल.एल. बी. | कल्याण जिल्हा न्यायालय वकिल सस्था, कल्याण न्यायालय इमारत, तळमजला, कल्याण पश्चिम, जि. ठाणे | वकिल मार्च २०१२ पासुन | संस्थेचे पत्र, बार काऊन्सीलचे प्रमाणपत्र, एल.एल.बी. बी.ए. गुणपत्रिका, विद्यापीठ सर्टीफिकेट, मतदार यादी, प्रतिज्ञापत्र व शौचालयाचा दाखला | ४ (ड) प्रमाणे अर्ज प्राप्त असून ते पात्रतेच्या निकषात बसत आहेत. |
| ६ | श्री. गणेश रमेश पाटील<br>दुर्गादेवी पाडा, अंबरनाथ गाव रोड, | एच.एस. सी. | नेहरु नगर मित्र मंडळ, नेहरु नगर, ओटी सेक्शन, बॅ.नं. | २०१० पासून उपाध्यक्ष पद | प्रतिज्ञापत्र व शौचालयाचा दाखला, नेहरु नगर मित्र मंडळ यांचे पत्र | ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे.<br>परंतु संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र जोडलेले |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | उल्हासनगर–५<br><br>**भारतीय जनता पार्टी** | | १९६७ जवळ, उल्हासनगर–५ | | | नाही.<br>कागदपत्र अपुर्ण आहे. त्यामुळे ते पात्रतेच्या निकषात बसत नाहीत . |
| ७ | श्री. प्रदीप रामचंदानी जी–१, पुजा अपार्टमेंट, उल्हासनगर महापालिके मागे, उल्हासनगर–३<br><br>**भारतीय जनता पार्टी** | बी. कॉम. | रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर (पु) | अध्यक्ष संचालक दिनांक १/१२/१९९२ ते २५ वर्षे व सभापती १९९५–९६ पासुन २००२–२००३ | रोटरी क्लब संस्थाचे पत्र, सार्वजनिक ट्रस्टच्या नोंदणीसाठीच्या अर्जाचा नमुना, परिशिष्ट–२ डिड ऑफ ट्रस्ट मध्ये त्याची नोंद आहे, संस्थेच्या ठरावाची प्रत, बी. कॉमचे प्रमाणपत्र, ३ वर्षाचा लेखा अहवाल, प्रतिज्ञापत्र व शौचालयाचा दाखला | ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त असून ते पात्रतेच्या निकषात बसत आहेत. |
| ८ | श्रीमती आशा जीवन इदनानी ६०१, सिमरन पार्क, उल्हासनगर–३<br><br>**साई पक्ष** | एस.एस.सी. | बाबु बलदेवसिंग मेमोरियल एज्युकेशन ट्रस्ट, पारस अपार्टमेंट, ए–विंग, १०२, शिवकॉलनी, शांतीनगर, २) कोणार्क फाउंडेशन, पहिला मजला, कोणार्क प्लाझा, सपना गार्डन जवळ, उल्हासनगर | मुख्य कार्यकारी २०११ पासून<br><br>सचिव १/४/२०११ पासुन | दोन्ही संस्थेचे पत्र, सहा. धर्मादाय आयुक्त यांचेकडील (अधिनियम १९५०) नोंदणी प्रमाणपत्र, सहा. धर्मादाय आयुक्त यांचेकडील (अधिनियम १९५०) नोंदणी प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, लेखा परिक्षणाचा अहवाल ३ वर्षाचा, प्रतिज्ञापत्र व शौचालयाचा दाखला | ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त असून ते पात्रतेच्या निकषात बसत आहेत. |
| ९ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत मेराघर अपार्टमेंट, प्लॅट नं. २०४, मराठा सेक्शन–३२, उल्हासनगर–४<br><br>**शिवसेना** | एस.एस.सी. | ज्ञानदा वाचनालय उल्हासनगर–४ | अध्यक्ष, ९ वर्षे | सहा.धर्मादाय आयुक्त यांचेकडील (१९५० अंतर्गत) नोंदणी प्रमाणपत्र, ठराव, शाळा सोडल्याचा दाखला, मतदार यादीतील नाव, नोडयुज सर्टीफिकेट, प्रतिज्ञापत्र व शौचालयाचा दाखला | ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त असून ते पात्रतेच्या निकषात बसत आहेत. |
| १० | डॉ. विजय रुपसिंग पाटील बी–२, ओम गायत्री कॉ–ऑप सोसायटी, शिवगंगा नगर, अंबरनाथ (पुर्व)<br><br>**शिवसेना** | डी.एच.एम.एस. (मुंबई) | | वैद्यक व्यवसायी म्हणुन प्रमाणपत्र मिळाल्याचा दाखला दिनांक २०/२/१९८७ पासुन | महाराष्ट्र काउंसिल ऑफ होमिओपॅथी मुंबई प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र व शौचालयाचा दाखला, मतदार राजपत्र दाखला, इनकम टॅक्स सर्टीफिकेट, महाराष्ट्र शासन राजपत्र | ४ (क) प्रमाणे अर्ज प्राप्त असून ते पात्रतेच्या निकषात बसत आहेत. |
| ११ | श्रीमती वर्षा दिनेश अहुजा प्लॉट नं. ३६२, नितेश निवास, ओ.टी. सेक्शन, | बी.ए. | सिध्दी विनायक शिक्षण संस्था, उल्हासनगर–३ | अध्यक्ष म्हणुन सिध्दीविनयक संस्थाचे पत्र | संस्थेचे सहा. निबंधक नोंदणीचे प्रमाणपत्र १८६० अंतर्गत, मुंबई विद्यापिठाचे पदवी प्रमाणपत्र, नो डयुज, | ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे. परंतु सिध्दीविनयक संस्थाचे पत्रात कालावधी दिसून येत नाही. व ५ वर्षाचा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | उल्हासनगर–३<br><br>**शिवसेना** | | | | इनकम टॅक्स वेरीफिकेशन फॉर्म | अनुभव दिसून येत नाही.त्यामुळे ते पात्रतेच्या निकषात बसत नाहीत. |
| १२ | श्री. राजकुमार प्रतापराव चैनानी अे–७७, रुम नं. ४६०, अनमोल पॅलेस जवळ, उल्हासनगर–१<br><br>**शिवसेना** | १० वी नापास | अजिंठा बुध्दविहार ट्रस्ट, गौतमबुध्द नगर, बालकनजी बारी शाळेसमोर, उल्हासनगर–३ | सन २०११ पासून मुख्य कार्यकारी अधिकारी | शाळेचा दहावी नापास असल्याचा दाखला, मतदार यादीतील नोंद, सहा. धर्मादाय आयुक्त यांचेकडील नोंदणी (१९५० अंतर्गत) प्रमाणपत्र, ऑडिट रिपोर्ट, प्रतिज्ञापत्र व शौचालयाचा दाखला | ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे. परंतु ते उल्हासनगर महानगरपालिकेचे ठेकेदार असल्याने ते पात्रतेच्या निकषात बसत नाहीत. |
| १३ | श्री. सयानी मनोज दिलीप ३०४, रोझ बिल्डींग, कोणार्क रेसिडेन्सी, शहाड फाटक, उल्हासनगर–१<br><br>**भारतीय जनता पार्टी** | ११ वी | बहुजन विकास शिक्षण प्रसारक मंडळ, नालंदा शाळेच्या पाठीमागे, दहा चाळ, उल्हासनगर | उपाध्यक्ष १५ मे २००६ पासुन आजतागायत | संस्थेचे प्रमाणपत्र, संस्थेचे सहा. निबंधक नोंदणी (१८६० अंतर्गत) प्रमाणपत्र, सहा. निबंधक नोंदणी (१९५० अंतर्गत) प्रमाणपत्र, संस्थेचा ठराव, संमतीपत्रक, सत्य प्रतिज्ञापत्र, शाळेचा दाखला प्रतिज्ञापत्र व शौचालयाचा दाखला | ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त असून ते पात्रतेच्या निकषात बसत आहेत. |
| १४ | श्रीमती नीतू हिरालाल वलेचा भारत ज्वेलर्सच्या वरती, शॉप नं. १९६, मेन रोड, सिरु चौक जवळ, उल्हासनगर–२<br><br>**शिवसेना** | ५ वी | सोनारा नवजवान मंडळ पंचायत, उल्हासनगर, सोनारा हॉल मागे, भाजी मार्केट, उल्हासनगर–१ | सदस्य म्हणुन पत्र. | संस्थेचे पत्र, विहित प्रमाणपत्र व शौचालयाचा दाखला | ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे. अशासकिय संघटनेचा पदाधिकारी दिसून येत नाही. नोंदणी प्रमाणपत्र नाही. त्यामुळे ते पात्रतेच्या निकषात बसत नाहीत. |
| १५ | श्री. इंदर खुबचंद गोपलानी ३०२, साईबाबा टॉवर, मच्छी मार्केट, भारत चौक, उल्हासनगर–१<br><br>**शिवसेना** | ८ वी | माता रुक्मणी देवी सामाजिक संस्था, माता रुक्मणी पॅलेस, बॅरेक नं. २५५, रुम नं.१, माता रुक्मणी देवी मार्ग, झुलेलाल मंदिरामागे, उल्हासनगर | संस्थेचे पदाधिकारी म्हणुन पत्र परंतु कोणत्या पदावर आहेत असे उपलब्ध नाही. सदस्य, मार्च २००५ पासून रोटरी क्लब मिड टाऊन रोटरी पार्क, गोल मैदान, उल्हासनगर, | दोन्ही संस्थेचे पत्र, प्रतिज्ञापत्र, शौचालयाचा दाखला, नो डयुज सर्टीफिकेट, मॅरेज सर्टीफिकेट, जन्म दाखला, रेशनकार्ड झेरॉक्स, मतदार यादी | ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे. परंतु पदाधिकारी दिसून येत नाही. त्यामुळे ते पात्रतेच्या निकषात बसत नाहीत. |
| १६ | श्री. अनिल इंदरलाल तलरेजा २०१, प्रीती अपार्टमेंट, गोल मैदान, उल्हासनगर–१<br><br>**शिवसेना** | १२ वी | सिध्दी एज्युकेशन ५०३, अनमोल रतन अपार्अमेंट, नियर सेवा निकेतन हॉस्पीटल, उल्हासनगर–३ | संस्थेचे पत्र विश्वस्त म्हणुन | धर्मादाय आयुक्त यांचेकडील १९५० अंतर्गत संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, नो डयुज सर्टीफिकेट, पॅन कार्ड, आधारकार्ड, प्रतिज्ञापत्र व शौचालयाचा दाखला | ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे. संघटनेचा ट्रस्टी असून पत्र जोडले त्या पदाचा उल्लेख नाही. त्यामुळे ते पात्रतेच्या निकषात बसत नाहीत. |
| १७ | श्री. कमल सुंदरदास भटिजा | एस.एस.सी. | श्री. सुप्रभा सार्वजनिक वाचनालय, परमार सदन, | सचिव २०११ पासुन | सहा. धर्मादाय आयुक्तांकडील नोंदणीचे प्रमाणपत्र, सहा. धर्मादाय | ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त असून ते पात्रतेच्या निकषात बसत आहेत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ७३६/०३ समोर, हॉस्पीटल एरिया, उल्हासनगर—३ | | आयुक्तांकडील संमतीपत्र, संस्थेचे प्रमाणपत्र, हरकत नसल्याचे पत्रक, मतदार यादी, शाळेचा दाखला, रेशनकार्डची झेरॉक्स, प्रतिज्ञापत्र व शौचालयाचा दाखला | |
| १८ | श्री. जितु रमेश चैनानी पार्वती पॅलेस, शॉप नं. ९२३ समोर, चोपडा कोर्ट, उल्हासनगर—३ **शिवसेना** | १० वी पास | —— | —— | लिव्हींग सर्टीफिकेट, विहित प्रतिज्ञापत्र, शौचालय दाखला, बँक स्टेटमेंट, शाळेचा दाखला | ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त आहे. परंतु कागदपत्र अपुर्ण आहेत. त्यामुळे ते पात्रतेच्या निकषात बसत नाहीत. |
| १९ | श्री. अरुण लक्ष्मण आशान लिला, १२८६/१०,११,१२, ओटी सेक्शन, उल्हासनगर—४ **शिवसेना** | १० वी पास | कै. अनिल आशान मेमोरियल ट्रस्ट, बॅरेक नं. १२८६/१०, पुज्य पंचायत हॉल समोर, ओटी सेक्शन, उल्हासनगर—४ | सन २००७ पासुन आजतागायत | सहा.धर्मादाय आयुक्त यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र (१९५०), संस्थेचे प्रमाणपपत्र, ट्रस्टचा ठराव, शाळेचा दाखला, गुणपत्रिका, मतदार यादीचा क्रमांक, प्रतिज्ञापत्र, व शौचालयाचा दाखला, जातीचा दाखला | ४ (छ) प्रमाणे अर्ज प्राप्त असून ते पात्रतेच्या निकषात बसत आहेत. |

नियम ४ (छ) मधील अर्हतेसाठी अर्जदाराने किंवा संस्थेने प्रस्तुत केलेल्या सर्व कागदपत्रांची चौकशी केल्याशिवाय प्रथम दर्शनी बरोबर आहे. त्यात जर कोणत्याही प्रकारची फसवणुक किंवा दोष असल्याचे आढळुन आल्यास त्यासाठी संबंधीत संस्था व उमेदवार जबाबदार राहील असे उमेदवारांकडुन व्यक्तीगत प्रतिज्ञापत्र घेण्यात आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्यां) नियम २०१७ मधील नियम ४ मधील क ते छ मधील अर्हता असणाऱ्या प्रत्येकी एक व्यक्तीचे पालिका सदस्य म्हणुन नामनिर्देशन सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. परंतु प्राप्त झालेल्या अर्जानुसार फक्त वैद्यकीय व्यवसाय व विधी व्यवसायाशी संबंधीत अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यानुसार प्राप्त झालेल्या अर्जावरील नियम ४ (क) मधील अर्हतेसाठी अनुक्रमांक १ वरील डॉ. कन्हैयालाल नाथानी व अनुक्रमांक १० वरील डॉ. विजय पाटील हे दोन अर्ज प्राप्त झाले असून ते नियम ४ (क) पात्र आहेत. डॉ. कन्हैयालाल नाथानी हे वरिष्ठ असल्याने त्यांची शिफारस करण्यात येत आहे.

तसेच नियम ४ (ड) अर्हतेसाठी अनुक्रमांक २ वरील श्री. प्रकाश पंजुमल कुकरेजा व अनुक्रमांक ५ वरील ॲड. विनोद शिवाजी जावळे दोन अर्ज प्राप्त झाले आहेत, त्यातील अनुक्रमांक २ मधील उमेदवार श्री. प्रकाश पंजुमल कुकरेजा हे नियम ४ (ड) प्रमाणे पात्र आहेत. परंतु नियम ४ (च) प्रमाणे पात्र नाहीत. या दोन्हीपैकी श्री. प्रकाश पंजुमल कुकरेजा यांच्या कामाचा अनुभव जास्त असल्याने त्यांची शिफारस करण्यात येत आहे.

आणि राहिलेले १५ अर्ज नियम ४ (छ) मधील अर्हतेसाठी प्राप्त झाले आहेत. त्यामध्ये अनुक्रमांक ६, ११, १२, १४, १५, १६, १८ यांची पडताळणी केली असता पात्रता दिसून आली नाही.

राहीलेले अनुक्रमांक ३,४,७,८,९,१३,१७,१९ हे नियम ४ (छ) प्रमाणे पात्रतेच्या निकषानुसार पात्रतेच्या निकषात बसत आहेत.

त्यामुळे अर्ज ४ (छ) मघील अर्हतेमध्ये अनुभवाच्या आधारे शिफारस करण्यात येत आहे.

तरी अनुक्रमांक १,२,३,४,७ यांची शिफारस करण्यात येत आहे.

परंतु शिफारस केलेल्या व्यक्तींची शिफारस महापालिकेने अमान्य करण्याचे ठरविल्यास त्याबाबतची कारणे महानगरपालिकेला नोंद करावी लागतील.

तरी महासभेपुढे कायदयानुसार मान्यतेसाठी प्रस्तावित.

**विशेष महासभा ठराव क्र :** १ दिनांक ५/४/२०१७

सुचकाचे नाव : श्री जमनादास पुरस्वानी

: श्री. रमेश चव्हाण

अनुमोदकाचे नाव : श्री. जीवन इदनानी
: श्री. दिपक सिरवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत प्रत्येक उमेद्‌वारासमोर आयुक्तांनी केलेल्या शिफारसींपैकी अनुक्रमांक ७ तसेच खालील नमूद कारणे लक्षात घेवून पक्षीय बलाबलानुसार इतर ४ नामनिर्देशन सदस्यांच्या नावास मान्यता देत आहे.

<u>कारण</u>

महाराष्ट् महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ नुसार एखादया व्यक्तीकडे पालिका प्रशासनाचा विशेष ज्ञान अथवा अनुभव असेल ती व्यक्ती नामनिर्देशित पालिका सदस्यांच्या पदासाठी उमेद्‌वार म्हणून नामनिर्देशित केली जाण्यास पात्र असेल जर ती व्यक्ती.

क) राज्यात मान्यताप्राप्त व नोंदणीकृत वैदयक व्यवसायी म्हणून किमान ५ वर्षे काम केलेली असेल किंवा

ख) निवृत्त प्राध्यापक, व्याख्याता, मुख्याध्यापक यांचा समावेश असेल, किंवा

ग) सनदी लेखापाल किंवा परिव्यय लेखापाल म्हणून कमीत कमी ५ वर्षाचा अनुभव धारण केलेली असेल किंवा

घ) कमीत कमी ५ वर्षाचा व्यावसायिक अनुभव असलेली मान्यताप्राप्त विदयापिठाची अभियांत्रिकी पदवीधारक असेल किंवा

ड) राज्यात कमीत कमी ५ वर्षाकरिता अभिवक्ता किंवा मान्यताप्राप्त विदयापीठाची कायदयामधील पदवीधारक व राज्यात विधी क्षेत्रात काम करण्याचा कमीत कमी ५ वर्षाचा अनुभव असलेली असेल किंवा

च) नगरपरिषदेचा मुख्य अधिकारी किंवा महानगरपालिकेचा सहायक आयुक्त किंवा उप आयुक्त म्हणून काम करण्याचा किमान ५ वर्षाचा अनुभव असलेली किंवा किमान २ वर्षाचा अनुभव असलेली महानगरपालिकेतून आयुक्त म्हणून सेवानिवृत्त झालेली असेल किंवा

छ) महानगरपालिका किंवा नगरपरिषद क्षेत्रात कार्यरत असणा—या आणि समाजकल्याण कार्यामध्ये गुंतलेल्या मुंबई सार्वजनिक विश्वस्थ संस्था अधिनियम १९५० खाली नोंदणीकृत समाजाधिष्ठीत अशासकीय संघटनेचा पदाधिकारी म्हणून किमान ५ वर्षाचा अनुभव असलेली असेल.

उपरोक्त नियम ४ मधील (क) ते (छ) मधील अर्हता असणा—या प्रत्येकी एका व्यक्तीची पालिका सदस्य म्हणून नामनिर्देशन सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करण्यात यावा असे नियम ५ (२) मध्ये नमूद आहे.

तसेच नियम ५ नुसार अपूर्णांकातील संख्याबळ उतरत्या क्रमाने विचारात घेवून नावांचे नामनिर्देशन करतांना जर दोन किंवा अधिक मान्यताप्राप्त किंवा नोंदणीकत पक्ष किंवा गट किवा आधाडीची किंवा फ्रन्टची अपूर्णांकातील संख्या सारखीच असल्यास , आयुक्त अशा मान्यताप्राप्त किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फंन्टमधून नामनिर्देशित सदस्यांची शिफारस करण्यासाठी निवड अशा सर्व सबंधित पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रन्टच्या उपस्थितीत चिठ्ठया टाकून करील.

वरील प्रमाणे गट किंवा आघाडी किंवा फ्रन्टची अपूर्णांकातील संख्या सारखी असल्यास चिठ्ठया टाकून नामनिर्देशित सदस्यांची शिफारस करण्याची तरतूद आहे परंतु नियम ४ (क) ते ४ (छ) या वर्गात उमेद्‌वारांच्या समान अर्हता असल्यास चिठ्ठया टाकून निवड केली असल्याचे दिसत नाही.

५ पदावर नामनिर्देशनासाठी १९ अर्ज प्राप्त झाले असल्याचे दिसते. त्यापैकी एकूण ७ अर्जदार पात्रतेच्या निकषात बसत नाहीत. उर्वरित १२ सदस्यांपैकी ५ सदस्यांच्या नावांची शिफारस करतांना मा. आयुक्त यांनी अनुभवाचा कालावधी पाहून शिफारस केली असल्याचे दिसते परंतु नियमात याबाबत स्पष्ट उल्लेख दिसून येत नाही.

वरील प्रमाणे नियम ४ (ड) अर्हतेसाठी वकील श्री. प्रकाश पंजुमल कुकरेजा व ॲड. विनोद शिवाजी जावळे असे एकूण २ अर्ज प्राप्त झाले असल्याचे दिसते. ॲड. विनोद शिवाजी जावळे यांना वकील म्हणून मार्च २०१२ पासून अनुभव असल्याचे नमूद केले आहे परंतु श्री. प्रकाश पंजुमल कुकरेजा यांच्या वकील म्हणून अनुभवापोटी काहीही नमूद केल्याचे दिसत नाही. श्री. प्रकाश पंजुमल कुकरेजा यांचे नावाची शिफारस करतांना त्यांना महापालिकेत विविध पदांवर कार्य केल्याचा अनुभव गृहीत धरला असल्याचे दिसते. याचाच

अर्थ असा की, नियम ४ (ड) अंतर्गत सदस्याची निवड करतांना नियम ४ (च) चा अनुभव गृहीत धरण्यात आलेला आहे असे दिसते परंतु नियम ४ (च) याच वर्गात त्यांना अपात्र ठरविण्यात आलेले आहे.

अशाच प्रकारे नियम ४ (छ) या वर्गात सदस्यांची निवड करतांना सदस्यांचा कार्यकालावधीचा विचार केलेला आहे परंतु संस्थेच्या कार्ये व कर्तव्यास महत्व देण्यात आलेचे दिसून येत नाही. उदा. श्री. जयकूमार दत्तात्रय केणी यांना गजानन महाराज मंदिर , शांतीनगर या संस्थेत अध्यक्ष पदाचा अनुभव आहे. त्याचबरोबर या वर्गात श्री. सयानी मनोज दिलीप यांना बहुजन विकास शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेत उपाध्यक्ष म्हणून २००६ पासून आजतागायत अनुभव आहे. धार्मिक बाबींचा समावेश महापालिकेच्या कार्य व कर्तव्यात नाही परंतु शिक्षण हे महापालिकेचे बांधील कार्ये व कर्तव्ये आहे.

ज्या संस्था महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात विहित कार्ये व कर्तव्ये पार पाडण्यास महापालिकेस हातभार लावीत आहेत असा संस्थेच्या सदस्यांना नामनिर्देशन करणे योग्य वाटते.

१) श्री. मनोज दिलिप सयानी बहुजन शिक्षण प्रसार मंडळाचे उपाध्यक्ष आहेत. त्यांना शिक्षण क्षेत्रातील माहिती असून त्यांनी संस्थेमार्फत शैक्षणिक क्षेत्रात विविध उपक्रम राबविलेले आहेत तसेच श्री. सयानी मनोज दिलिप हे वर्ष २०१२ ते २०१७ पर्यंत नगरसेवक होते. तसेच ते वर्ष २००७ ते २०१२ या कालावधीत शिक्षण मंडळ, उल्हासनगर महानगरपालिका सदस्य होते. त्यांना महापालिकेच्या कार्ये व कर्तव्ये यासबंधी अनुभव असून लोक प्रतिनिधी पदाचाही अनुभव आहे.

२) श्री. प्रदीप रामचंदानी यांना मा. आयुक्तांची शिफारस आहे तसेच वर्ष २०१२ ते २०१७ पर्यंत नगरसेवक होते. व नगरसेवक असतांना त्यांना महापालिकेच्या कार्ये व कर्तव्ये यासबंधी अनुभव असून लोक प्रतिनिधी पदाचाही अनुभव आहे.

३) श्री. सुरेंद्र बालकृष्ण सावंत यांना सिंध मराठा संस्थेचा तसेच उल्हास विदयालय शाळेवर पदाधिकारी म्हणून कार्यरत आहे त्यांना शिक्षण क्षेत्रातली माहिती आहे तसेच पक्षाचे निष्टावंत कार्यकर्ते म्हणून गेल्या अनेक वर्षापासून कार्यरत आहे. तसेच श्री. सुरेंद्र बालकृष्ण सावंत यांना वर्ष १९८६ ते १९९१ पर्यंत नगरसेवक होते व त्यांना महापालिकेच्या कार्ये व कर्तव्ये यासबंधी अनुभव असून लोक प्रतिनिधी पदाचा देखील अनुभव आहे.

४) श्रीमती आशा जीवन इदनानी या बलदेव सिंह मेमोरिअल एज्युकेशनल ट्रस्ट मध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी या प्रमुख पदावर वर्ष २०११ पासून कार्यरत असून या संस्थेमार्फत शहरातील गरीब व गरजु विदयार्थ्यांना शैक्षणिक सहाय देण्यात येत आहे. तसेच कोनार्क फाउंडेशन यामध्ये सचिव या पदाचा अनुभव असून या संस्था शहरातील गरीब व गरजु यांचेसाठी विविध प्रकारचे सामाजिक उपक्रम राबवित आहेत. याशिवाय श्रीमती आशा जीवन इदनानी या वर्ष १९९५–९६ मध्ये नगरसेवक असतांना त्याच कालावधीत नगररचना विभागाच्या उल्हासनगर महानगरपालिकेत सभापती होत्या तसेच वर्ष २०१२ ते २०१४ या कालावधीत त्या महापौर असतांना त्यांनाही महापालिकेच्या कार्य व कर्तव्यांचा व लोक प्रतिनिधी पदाचा सुद्धा अनुभव आहे.

५) श्री. अरुण लक्ष्मण आशान : कै. अनिल लक्ष्मण आशान ममोरीयल ट्रस्ट चे संचालक/अध्यक्ष या संस्थेच्या माध्यमातून विविध समाजोपयोगी धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे, रक्तदान शिबिर, मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करुन गरीब गरजु रुग्णान वैदयकीय सेवा देणे, शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांना आर्दश शिक्षक पुरस्कार देणे व गौरव करणे , गरजु रुग्णांना मोफत रुग्णवाहिका पुरविणे, दरवर्षी शालेय विदयार्थ्यांना वहया पुस्तके वाटप करणे, अनाथ विदयार्थ्यांना उपयुक्त वस्तुचे वाटप करणे असे विविध समाजपयोगी कार्य करीत असून त्यांचे मोठे योगदान आहे.

तरी वरील संस्थेनी महापालिका क्षेत्रात समाजोपयोगी कामे केल्याने महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित संदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ मधील नियम ४ छ प्रमाणे पाचही सदस्य पात्र असून तसेच पक्षातर्फे त्यांची शिफारस करण्यात आल्याने खालील ५ नामनिर्देशित सदस्य म्हणून मान्यता देत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. प्रदीप अर्जुन रामचंदानी | भारतीय जनता पार्टी |
| २) | श्रीम. आशा जीवन इदनानी | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया |
| ३) | श्री. सुरेंद्र बालकृष्ण सावंत | शिवसेना |
| ४) | श्री. सयानी मनोज दिलिप | भारतीय जनता पार्टी |
| ५) | श्री. अरुन लक्ष्मन आशान. | शिवसेना |

सुचकाची सही /–

अनुमोदकाची सही /–

सर्वानुमते

महापौर/पीठासन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ४:–** उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २०१७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी स्थायी समितीच्या १६ सदस्यांची नेमणूक करणे.

---

महापौर तथा पिठासिन अधिकारी:– पाच स्विकृत सदस्यांची नावे घोषित करित आहे.
१) श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी, २) श्री. मनोज दिलीपकुमार सयानी, ३) शिवसेने तर्फे सुरेंद बाळकृष्ण सावंत, ४) श्री. अरूण लक्ष्मण आशान, ५) सेक्युलर अलायन्स ऑफ इंडियातर्फे ५. श्रीमती आशा जीवन इदनानी

सदस्य, श्री. राजेश वधरिया:– चार नंबर विषय परत वाचून दाखवा. सचिव मॅडम, कृपया करुन चार नंबरचा विषय परत वाचून दाखवा.

सदस्य, श्री. भगवान भालेराव:– हे पाच सदस्य जे आहेत ते स्विकृत सदस्य आहेत की स्थायी समिती सदस्य. विषय चालू झाल्यानंतर विषय पत्रिका चार चालू झाल्यानंतर सदस्य वाचुन दाखवत आहात.

महापालिका सचिव :– विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ४ :–** उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २०१७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी स्थायी समितीच्या १६ सदस्यांची नेमणूक करणे .

---

उप महापौर, श्री. जीवन इदनानी:– पहीले आपणन नामनिर्देशित सदस्यांचे नावे जाहिर करा.

महापालिका सचिव:– जाहीर केले आहेत, त्यांचे नाव

उप महापौर, श्री. जीवन इदनानी:– तर त्या सदस्यांना आत बोलविण्यात यावे.

महापालिका सचिव:– नाही परवानगी देता येत नाही, जो पर्यंत राजपत्रात त्यांची नावे प्रसिध्द होत नाहीत तो पर्यंत सभागृहात प्रवेश करू शकत नाहीत, स्वागतासाठी सभा पूर्ण झाल्यानंतर बोलवा.

सदस्य, श्री. भागवान भालेराव:– मॅडम आपण जो विषय क्र.४ चालू केला आहे, विषय क्र.३ पुर्ण करा.

सदस्य, श्री. राजेश वानखेडे:– मॅडम महापौरांचे जो अधिकार आहे ते तुम्ही वापरा कुठल्याही सदस्यांचा ऐकू नका.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:– पाच स्विकृत सदस्यांची नावे घोषित करीत आहे.
१) श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी, २) श्री. मनोज दिलीपकुमार सयानी, ३) शिवसेने तर्फे सुरेंद बाळकृष्ण सावंत, ४) श्री. अरूण लक्ष्मण आशान, ५) सेक्युलर अलायन्स ऑफ इंडियातर्फे ५. श्रीमती आशा जीवन इदनानी

<u>सदस्य, श्री. राजेश वधरिया:—</u> चार नंबर विषय परत वाचून दाखवा. सचिव मॅडम , कृपया करून चार नंबरचा विषय परत वाचून दाखवा.

<u>सदस्य, श्री. भागवान भालेराव:—</u> हे पाच सदस्य जे आहेत ते स्विकृत सदस्य आहेत की स्थायी समिती सदस्य, विषय चालू झाल्या नंतर विषय पत्रिका चार चालू झाल्यानंतर सदस्य वाचून दाखवत अहात.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र.** ४:— उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २०१७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी स्थायी समितीच्या १६ सदस्यांची नेमणूक करणे.

---

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> येथे पक्षनिहाय जी नावे देण्यात आली आहेत ती नावे मी वाचुन दाखविते. भारतीय जनता पक्षाच्यावतीने १) श्री. राजेश नानिकराम वदारिया, २) श्री. जमनादास पुरस्वानी, ३) कु. डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर ४) श्रीमती लक्ष्मी सिंग ५) श्रीमती पंचम कालानी, ६) श्रीमती जया प्रकाश माखिजा ७) श्रीमती चंद्रावतीदेवी सिंग

साई पक्षाच्यावतीने — १) श्रीम. कंचन अमर लुंड, २) श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी, ३) श्रीम. कविता लाल पंजाबी

राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीच्या वतीने — १) श्री. भारत रामचंद्र राजवानी

शिवसेनाच्यावतीने — १) श्री. कलवंतसिंग सहोता, २) श्रीमती पुष्पा नाना बागुल, ३) श्री. राजेंद्र शांताराम चौधरी, ४) श्री. सुनिल मुकुंद सुर्वे, ५) श्री. धनंजय बाबूराव बोडारे

ठिक आहे? सर्व समंतीने मान्य? ठिक आहे?

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> या संबंधित महापौराना आम्ही पत्र दिले आहे, ते पत्र वाचून घ्या. आम्ही पत्र दिलेले आहे ते आमचे पत्र तेवढे वाचून घ्या. आम्हांला सन्माननिय सचिव मॅडमनी जे पत्र दिले होते ते सूचनेवर त्या सूचने प्रमाणे मी माझे पत्र दिलेले आहे. त्याप्रमाणे वाचून बघावे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> स्थायी समितीसाठी १६ सदस्याची निवड करायची आहे, मा. सचिव मॅडमने जे संख्याबळ दिलेले आहे. त्यानुसार त्याच्यावर सर्वात पहिले आपण ज्या १६ सदस्यांची नावे घोषित केलेली आहेत. त्यानुसार १६ सदस्य स्थायी समितीचे सदस्य झाले आहेत. दुसरे कोणाची नावे घेण्याची आवश्यकता नाही. हा ठराव इतिवृत्ताची वाट न पाहता पारीत करा.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>आम्ही जे दिलेले आहे ते पिठासिन अधिका—यांना वाचायचे आहे.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> आम्ही जे पत्र दिलेले आहे ते पिठासिन अधिका—यांना वाचून दाखवायचे आहे. सचिव महोदया सूचने बरोबर हे पत्र दिलेले आहे तुम्ही सांगा आम्हांला.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> तुम्ही दोन मिनिटे माझे ऐका, ज्यांनी लेटरपॅडवर दुसरे पत्र दिलेले आहेत, पक्षीय बलाबल नाही, त्यांचे अंश बनणार नाही, त्यामुळे मान्यता मिळू शकत नाही.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> सन्माननिय आयुक्त साहेब, आपण या संदर्भात सविस्तर सांगाव. दिनांक २४/३/२०१७ रोजी आम्हाला जे अजंठा दिलेला आहे, त्या एजंडा प्रमाणे आम्ही आमचे पत्र व्यवहार केलेला आहे. दिनांक ३१/३/२०१७ चा कोकण विभागीय आयुक्तांचा जो आदेश आहे त्याप्रमाणे आम्ही स्थायी समिती सदस्याची नावे दिलेली आहेत त्याचे वाचन व्हावे दुसरे काही नाही आणि सदरचे प्रकरण न्यायालयात आहे.

<u>आयुक्त, डॉ. सुधाकर शिंदे:—</u> या प्रकरणाबाबत स्थायी समिती सदस्य निवडण्याचे सर्व अधिकार पिठासीन अधिकारी यांचे आहेत आणि ते योग्य तो निर्णय घेतील.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> सनसदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

☑ **विषय:**—उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन २०१७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत निवडून आलेल्या सदस्यांपैकी स्थायी समितीच्या १६ सदस्यांची नेमणूक करणे .

<u>प्रस्तावना</u>

सन—२०१७ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर एकूण ७८ नवनिर्वाचित पालिका सदस्य निवडून आले आहेत. दिनांक २३/२/२०१७ निवडणूक निकालानंतर व दिनांक २८/२/२०१७ रोजी अधिसुचनाद्वारे निवडून आलेल्या सदस्याचे नाव जाहिर केल्यावर आणि महाराष्ट्र महानगरपालिका कलम ३१ अ च्या तरतुदी अन्वये प्रमाणशीर प्रतिनिधित्व देण्या प्रयोजनार्थ मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकणभवन येथे फ्रट किंवा आघाडीची नोंदणी झाल्यावर पक्षनिहाय संख्याबळ पुढीलप्रमाणे आहे.

| पक्षाचे नाव | पक्षनिहाय मुळ संख्या | संख्याबळामध्ये वाढ किंवा कपातीचे प्रमाण | तयार केलेल्या पक्ष/आघाडी/फ्रंटचे नाव | आघाडी किंवा फ्रंट झाल्यावर प्रमाणशीर प्रतिनिधित्वासाठी संख्याबळ |
|---|---|---|---|---|
| भाजपा | ३२ | — | — | ३२ |
| शिवसेना | २५ | — | — | २५ |
| सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया (साई पक्ष) | ११ | + १ | — | १२ |
| राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | ४ | — | — | ४ |
| आर.पी.आय(ए) | २ | — | — | २ |
| पीपल रिपब्लीकन पार्टी | १ | — | — | १ |
| भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | १ | — | — | १ |
| भारीप बहुजन महासंघ | १ | — | — | १ |
| राष्ट्रीय समाज पार्टी | १ | — १ | — | ० |
| **एकूण** | ७८ | | | ७८ |

महापालिकेच्या स्थायी समितीवर १६ सदस्यांची नियुक्ती ही मान्यता प्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे तौलनिक पक्षबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता व अशा प्रत्येक पक्षाशी किंवा गटाशी विचार विनिमय करुन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे. प्रत्येक गटाचे संख्याबळ खालील प्रमाणे आहे.

| भाजपा | शिवसेना | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया गट | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | आरपीआय (ए) | पीपल रिपब्लीकन पार्टी | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | भारीप बहुजन महासंघ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३२ | २५ | १२ | ४ | २ | १ | १ | १ |

**78 / 16 = 4-87**

स्थायी समितीच्या एका सदस्याचे निवडणूकीसाठी मतांचे प्रमाण— ४.८७ असणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने प्रत्येक गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन खालील प्रमाणे असेल.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | भाजपा | ३२<br>—— X १६<br>७८ | = ६.५६ | (५) | आर.पी.आय(ए) | ०२<br>—— X १६<br>७८ | = ०.४१ |
| (२) | शिवसेना | २५<br>—— X १६<br>७८ | =५.१२८ | (६) | पीपल रिपब्लीकन पार्टी | ०१<br>—— X १६<br>७८ | = ०.२० |
| (३) | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया (साई पक्ष) | १२<br>—— X १६<br>७८ | = २.४६ | (७) | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ०१<br>—— X १६<br>७८ | = ०.२० |
| (४) | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | ४<br>—— X १६<br>७८ | = ०.८२ | (८) | भारीप बहुजन महासंघ | ०१<br>—— X १६<br>७८ | = ०.२० |

वरील गटाच्या संख्येच्या तौलनिक संख्याबळातून पूर्णांकाच्या आधारे प्रथम पक्षनिहाय खालील नेमणूका करण्यात येतील.

| भाजपा | शिवसेना | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया गट | एकूण |
|---|---|---|---|
| ०६ | ०५ | ०२ | १३ |

यानंतर रिक्त राहणा—या तीन जागांवर नामनिर्देशन करतांना ज्या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे. त्या गटाचे पालिका सदस्याचे नामनिर्देशन करता येईल. आणि खालील गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ पुढील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| (१) भा.ज.पा. | .५६ | (२) शिवसेना | .१२ |
| (३) सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया गट | .४६ | (४) रा.का.पा. | ०.८२ |
| (५) भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | ०.२० | (६) आरपीआय (ए) | ०.४१ |
| (७) पीपल रिपब्लीकन पार्टी | ०.२० | (८) भारीप बहुजन महासंघ | ०.२० |

वरील परिस्थिती पहाता राष्ट्रवादी कॉंग्रेस, भाजपा, व सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया गट या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे व त्यामुळे **तीन रिक्त** जागांवर या पक्षांच्या प्रत्येकी एक—एक सदस्याची नेमणूक करता येईल म्हणून प्रत्येक गटाचे स्थायी समितीत प्रमाणाशिर प्रतिनिधीत्व खालील प्रमाणे करण्यास प्रस्तावित.

| भाजपा | शिवसेना | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया गट | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | आरपीआय (ए) | पीपल रिपब्लीकन पार्टी | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | भारीप बहुजन महासंघ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७ | ०५ | ०३ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | १६ |

<u>विशेष महासभा ठराव क्र.:— २</u> <u>दिनांक :— ०५/०४/२०१७</u>

सुचकाचे नाव:—श्री. रमेश चव्हाण

अनुमोदकाचे नाव:—श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार खालील सोळा सदस्यांचे स्थायी समितीवर नामनिर्देशन करीत आहे.

१. श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी
२. श्री. राजेश नानिकराम वदारिया
३. श्रीमती जया प्रकाश माखिजा
४. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग
५. श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर
६. श्रीमती पंचम उमेश कालानी
७. श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग
८. श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा
९. श्रीमती पुष्पा नाना बागुल

१०.श्री. राजेंद्र शांतराम चौधरी
११.श्री. सुनिल मुकुंद सुर्वे
१२.श्री. धनंजय बोडारे
१३.श्रीमती कांचन अमर लुंड
१४.श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी
१५.श्रीमती कविता लाल पंजाबी
१६.श्री. भारत रामचंद्र राजवानी

इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता सदरहू ठरावांतर्गतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात येईल व तो अंतिम असेल.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>सर्वानुमते मंजुर</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
विशेष महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:-</u> मला येथे पत्र प्राप्त झाले आहे की, श्री. जमनादास पुरस्वानी यांचे नाव सभागृह नेता म्हणून घोषित करत आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वधरिया:-</u> मा. महापौरजी, ज्या ५ व्यक्तींची नामनिर्देशित सदस्य म्हणुन निवड करण्यात आली आहे त्यांना सभागृहात बोलाविण्यात यावे.

<u>सदस्य श्री. विजय पाटील:-</u> मा. महापौर महोदया सर्वात प्रथम ५ नामनिर्देशित सदस्यांचे स्वागत करायचे आहे मग सभा संपवावी.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी:-</u> सर्वात प्रथम जनगनमन सुरु करु या नंतर स्वागत करावे.

<u>महापालिका सचिव :-</u> कृपया राष्ट्रगितासाठी उभे रहावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर दुपारी ३.४७ वाजता महापौर श्रीमती यांनी सभा सपल्याचे जाहीर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः– १८/५/२०१७

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १८/५/२०१७ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

३

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १८/५/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी –– महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी –– उप–महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. अर्चना गोकुळ करणकाळे | २७ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ४ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | २८ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ५ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | २९ | श्रीम. संगिता नितीन सपकाळे |
| ६ | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंग भुल्लर | ३० | श्रीम. शीतल चंद्रकांत कदम |
| ७ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ३१ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| ८ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ३२ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| ९ | श्रीम. सुरेखा हनुमंत आव्हाड | ३३ | श्रीम. दिप्ती नविन दुधानी |
| १० | श्री. कलवंतसिंग गुरूदेव सोहटा | ३४ | श्रीम. ज्योती रमेश चैनानी |
| ११ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ३५ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| १२ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ३६ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| १३ | श्रीम. रेखा अशोक ठाकुर | ३७ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे |
| १४ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ३८ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| १५ | श्री. भगवान शंकर भालेराव | ३९ | श्रीम. कविता सुधिर बागुल |
| १६ | श्रीम. डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ४० | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| १७ | श्रीम. दिपा नारायण पंजाबी | ४१ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| १८ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ४२ | श्रीम. मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| १९ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ४३ | श्रीम. कविता सुरेश गायकवाड |
| २० | श्रीम. इंदिरा जमुनादास उदासी | ४४ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| २१ | श्री. जीवन चंद्रभान इदनानी | ४५ | श्री. विकास परशुराम पाटील |
| २२ | श्री. गजानन प्रल्हाद शेळगे | ४६ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २३ | श्रीम. ज्योती प्रकाश बठिजा | ४७ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| २४ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) | ४८ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| २५ | श्री. सुमित सागर सोनकांबळे | ४९ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| २६ | श्रीम. ज्योती श्यामराव माने | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीम. पुजा सचिन भोईर, २. श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील, ३. श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड, ४. श्रीम. मिनाकौर अजितसिंग लबाना, ५. श्रीम. पंचम उमेश कालानी, ६. श्रीम. आशा नाना बिराडे, ७. श्री. रविंद्र दशरथ बागुल, ८. श्रीम. अंजना अंकुश म्हस्के, ९. श्रीम. गीता लालचंद साधनानी, १०. श्रीम. सरोजिनी टेकचंदानी, ११. श्रीम. जया प्रकाश माखिजा, १२. श्रीम. अपेक्षा भगवान भालेराव १३. श्रीम. शुभांगीनी निकम १४. श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग, १५. श्रीम. छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुह, १६. श्रीम. ज्योती प्रशांत पाटील १७. श्रीम. चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, १८. श्री. राजेश नानिकराम वदारिया, १९. श्रीम. पुष्पा नाना बागुल, २०. श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी, २१. श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल, २२. श्री. राजेंद्र शांताराम चौधरी, २३. श्रीम. कविता लाल पंजाबी, २४. श्रीम. सविता प्रविण तोरणे (रगडे), २५. श्रीम. ज्योत्स्ना सुरेश जाधव, २६. श्री. चंद्रशेखर केशव यादव, २७. श्रीम. मिताली राजेश चान्पूर, २८. श्रीम. लिलाबाई लक्ष्मण आशान,

२९. श्रीम. सुनिता बाबुराव बगाडे, ३०. श्रीम. पुजाकौर श्यामसिंग लबाना, ३१. श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी, ३२. श्रीम. मिनाक्षी रवी पाटील, ३३. श्री. विजय चाहू पाटील, ३४. श्रीम. आशा जीवन इदनानी

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
२. डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
३. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
४. श्री. महेश सितलानी, उप अभियंता
५. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी
६. श्री. बालाजी लोंढे, प्र. सहा.आयुक्त
७. श्री. युवराज डी. भदाणे, जनसंपर्क अधिकारी
८. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
९. श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
१०. श्रीम. अलका पवार, प्र. सहाय्यक आयुक्त
११. श्री. अजित गवारी, प्र. सहाय्यक आयुक्त
१२. श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
१३. श्री. भगवान कुमावत, प्र. सहाय्यक आयुक्त

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्री. अशोक रामरख्यानी
३. श्री. बाळू भांगरे

दुपारी ३.०० वाजता वंदेमातरम म्हणून सभेची सुरूवात करण्यात आली.

सदस्य, श्री. किशोर वनवारी:— मा. महापौरजी, महासभा चालू करण्याच्या पहीले माझी एक विनंती आहे. आमचे एक माजी नगरसेवक डॉ. सुभाष सोनी आज त्यांचे मुंत्यू झाला आहे, त्यासाठी सभागृहामध्ये त्यांना श्रध्दांजली देण्यात यावी.

सदस्य, श्री. किशोर वनवारी:— मा. महापौरजी पर्यावरण केंद्रीय मंत्री, मा. अनिल माधव दवे, त्यांचे ६० वर्षाच्या कालावधीत मुंत्यू झाला आहे. मी सर्व सभागृहाला आणि सभागृहामध्ये जेवढे अधिकारी/कर्मचारी आहेत. त्यांना निवेदन करतो की, त्यांना सुध्दा दोन मिनटासाठी श्रध्दांजली देवून फुल अर्पण करावे.

सदस्य, श्री. रमेश चव्हाण:— मा. महापौर, आयुक्त साहेब, मराठी आणि हिंदी चित्रसृष्टीमध्ये आपले नाव गाजवलेले रिमा लागू यांचेही आज निधन झालेले आहे. त्यांनाही दोन मिनीट श्रध्दांजली वाहण्यात यावी.

अतिरिक्त आयुक्त तथा महापालिका सचिव, डॉ. विजया कंठे :— या सर्वांसाठी सर्व उपस्थितांनी स्तब्धता पाळून त्यांना श्रध्दांजली अर्पण करू या.

---

सुचकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. रमेश चव्हाण

## शोक प्रस्ताव

उल्हासनगर महानगरपालिकेचे माजी नगरसेवक डॉ. सुभाष सोनी यांचे दिनांक १८/५/२०१७ रोजी निधन झाले आहे.

तसेच मा. पर्यावरण केंद्रीय मंत्री, श्री. अनिल माधव दवे यांचे सुध्दा काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे. आणि मराठी आणि हिंदी चित्रसृष्टीमध्ये आपले नाव गाजवलेल्या अभिनेत्री श्रीमती रिमा लागू यांचेही दिनांक १८/५/२०१७ रोजी निधन झालेले आहे.

त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. १२ अ दिनांक:— १८/५/२०१७

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार डॉ. सुभाष सोनी, श्री. अनिल माधव दवे व श्रीमती रिमा लागू यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— मा. महापौर, उप महापौर, आजचा एजेंडा काढतांना चुक झालेली आहे. प्रस्तावाची सुचना जी सातवी, आठवी आहे, ती पहीली आणि दुसरी पाहीजे होती. ती फक्त दुरूस्त करून घ्यावी. सातवी आणि आठवी ही प्रस्तावाची सुचना अगोदरच देण्यात आली होती. मागच्या महासभेत घेतली न गेल्यामुळे ती या महासभेत घेण्यात यावे असे महापौरांनी आदेश दिले आहेत, त्या प्रमाणे ती घेतली आहे. परंतु तिचा नंबर तो शेवटी ठेवला आहे, तो प्रथम घेण्यात यावा, एवढीच विनंती आहे.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— आपला विषय तर घेतला आहे.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— नाही तो अगोदर घ्यायला पाहीजे होता. कारण की तो पहीले होता, त्याला शेवटी ठेवला आहे. ती चुक झाली आहे, ती सुधारावयाची आहे.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— चुक झाली नाही आणि त्यासाठी कुठला नियम पण नाही.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:— सुर्वे साहेब, असे जर आपण करायला लागलो तर जो सर्वात जास्त मतांनी निवडून आले आहेत, त्यांना पुढे बसायला पाहीजे आणि जो कमी मतांनी निवडून आले आहे, त्यांनी मागे बसायला पाहीजे. असा जर नियम बनवला तर जो दोन वर्षे निवडून आले आहेत ते मागेच बसतील.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— हा त्यांनी शेवटी बसायला पाहीजे, म्हणूनच तर तुम्ही निवडून आले नाहीत.

सदस्या, श्रीम. कविता बागुल:— मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब, गेल्या महासभेमध्ये तुम्ही पाण्याच्या प्रश्नावर चर्चा केली होती. आपण सांगितले होते की, भरमसाठ पाणी वाया जाते. लिकेज बंद करण्याबाबत आपण सांगितले होते, त्या संदर्भात काय झाले परत तुम्ही सुचवलेच नाही.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— मा. महापौर मॅडम, सर्वात प्रथम लक्षवेधीचा समावेश करा, त्यानंतर सभागृहामध्ये इतर विषयावर चर्चा करा. लक्षवेधी कोणती आहे.

सदस्या, श्रीम. कविता बागुल:— सर मला फक्त एवढेच सांगायचे आहे की, त्या टीम बद्दल काय झाले. प्रभाग क्रमांक १८ मध्ये भरपूर पाणी वाया जाते. तुम्ही त्या टिम बद्दल सांगितले नाही आणि ते कुठपर्यंत आले आहे. फक्त टीम बदल बोलायचे आहे की, कुठपर्यंत आपली टीम तयार झालेली आहे.

अतिरिक्त आयुक्त तथा महापालिका सचिव, डॉ. विजया कंठे :— कृपया लक्ष दयावे. मा. महापौर यांनी दोन लक्षवेधी स्विकृत केल्या आहेत.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मॅडम सर्व प्रथम तीन्ही लक्षवेधी सभागृहा समोर वाचून दाखवा, नंतर ज्या महापौर महोदयांनी दोन लक्षवधी स्विकारल्या आहेत त्या वाचून दाखवा, प्रथम तिन्ही लक्षवेधी सभागृहाच्या समोर ठेवा.

<u>अतिरिक्त आयुक्त तथा महापालिका सचिव, डॉ. विजया कंठे :—</u> आजच्या महासभेमध्ये तीन लक्षवेधी सुचना प्राप्त झाल्या आहेत. पहीली लक्षवेधी होती, श्री. किशोर वनवारी यांची होती. उल्हासनगर शहरातील बोट क्लब व उद्याने दुरूस्त करणे बाबतची लक्षवेधी सुचना. दुसरी लक्षवेधी सुचना आहे, श्री. राजेश वदारिया यांची उल्हासनगर १ ते ५ मधील रस्त्यात पडलेले खड्डे हे ७ जुन पुर्वी भरण्यासाठी लक्षवेधी होती आणि तिसरी लक्षवेधी सुचना आहे, श्रीम. अर्चना करनकाळे, यांनी विषय दिलेला आहे तो उल्हासनगर महानगरपालिकेत १ वर्षापासून नगररचनाकार नसल्याने नागरीकांना होणा—या त्रासा बाबतची लक्षवेधी, मा. महापौर यांनी श्रीम. अर्चना करनकाळे यांची जी आहे ती, उल्हासनगर महानगरपालिकेत १ वर्षापासून नगररचनाकार नसल्यामुळे नागरीकांना होणा—या त्रासा बाबत आणि दुसरी लक्षवेधी सुचना उल्हासनगर १ ते ५ मधील रस्त्यात पडलेले खड्डे हे ७ जुन पुर्वी भरणे बाबत ही सन्माननिय नगरसेवक राजेश वदारिया यांची दोन स्विकृत केलेल्या आहेत.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> मा. महापौर मॅडम, उप महापौर, आयुक्त साहेब, मी सभागृहाला निवेदन करतो की, केंद्रीय पर्यावरण मंत्री यांचे निधन झाले आहे. यासाठी ही सभा तीन, चार दिवसासाठी स्थगित करण्यात यावी. केंद्रीय पर्यावरण मंत्री हे कमी वयात त्यांचे निधन झाले आहे आणि ते भारतीय जनता पार्टीसाठी पुर्वी पासून काम करीत आले आहेत. त्यासाठी आजची सभा स्थगित करण्यात यावी आणि नंतर तारीख कधी ठेवणार ते कळविले जाईल.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> सन्माननिय महापौर मॅडम, उप महापौर, आयुक्त साहेब व सचिव मॅडम आता तुम्ही ज्या दोन लक्षवेधी वाचल्या सभागृहामध्ये ते संबंधित सदस्य हजर आहेत का? त्या लक्षवेधीच्या संदर्भातले आहेत का ते पहीले बघा. त्या महापौरांनी स्विकृत केल्यात आणि ते सदस्य इथे हजर नाहीत. तुम्ही त्या स्विकृत कशा काय केल्यात? राजेश वदारिया सभागृहामध्ये हजर नाहीत आणि त्यांची लक्षवेधी स्विकृत करीत आहेत. हे नियमाच्या बाहेर चालले आहे. हा नियम नेहमी कायम राहायला पाहीजे.

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u> मा. महापौर मॅडम, सुचक किंवा अनुमोदक दोन्ही हजर आहेत. शेरी लुंड दोन्ही मध्ये अनुमोदक आहेत आणि ते उपलब्ध आहेत.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> ठिक आहे, सन्माननिय मॅडम यांचा जो पाण्याचा विषय आहे.

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u> महापौर मॅडम बरेचसे नगरसेवक शहराच्या बाहेर आहेत आणि काही लग्नामध्ये व्यस्त आहेत. केंद्रीय पर्यावरण मंत्री अनिल माधव दवे यांचे निधन झाले आहे, त्यामुळे ही सभा अनिश्चित कालावधीसाठी स्थगित केली जावी.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> सदरची महासभा स्थगित करण्यात येत आहे.

<u>अतिरिक्त आयुक्त तथा महापालिका सचिव, डॉ. विजया कंठे :—</u> कृपया लक्ष दयावे. मा. महापौर यांनी दोन लक्षवेधी स्किृत केल्या आहेत. लक्षवेधी सुचना प्राप्त झाल्या असून त्या पुढील प्रमाणे आहेत.

लक्षवेधी सुचना क्र. १ जीचे सुचक आहेत व अनुमोदक आहेत

विषय :— उल्हासनगर १ ते ५ मधील रस्त्यात पडलेले खड्डे दिनांक ७ जून २०१७ पुर्वी भरणेबाबतची लक्षवेधी सूचना

.

लक्षवेधी सुचना क्र. २ जीचे सुचक आहेत

विषय :— उल्हासनगर महानगरपालिकेत एक वर्षापासून नगररचनाकार नसल्यामुळे नागरीकांना होणा—या त्रासाबाबतची लक्षवेधी सूचना.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>सदरच्या दोन लक्षवेधी सुचना स्विकृत करण्यात येत आहेत. व सदरची सभा स्थगित करण्यांत येत आहे.

---

सूचकाचे नांव :—श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव :— श्री. रमेश चव्हाण

<u>स्थगित प्रस्ताव</u>

दिनांक १८/०५/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता सुरु केलेली सभा काही कारणास्तव स्थगित करण्यास प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. १२ ब</u> <u>दिनांक : १८/०५/२०१७</u>

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता दिनांक १८/०५/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेल्या सभेचे कामकाज अनिश्चित कालावधीपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>अतिरिक्त आयुक्त तथा महापालिका सचिव, डॉ. विजया कंठे :—</u>कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ३.३७ वाजता महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(डॉ. विजया कंठे)
अतिरिक्त आयुक्त तथा महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:– १८/७/२०१७

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १८/७/२०१७ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

३

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १८/५/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा स्थगित केल्याने दिनांक १८/७/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित करण्यांत आली. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी –– महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी –– उप–महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. अर्चना गोकुळ करणकाळे | ४० | श्रीम. ज्योती प्रकाश बठिजा |
| ४ | श्रीम. पुजा सचिन भोईर | ४१ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ५ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ४२ | श्रीम. ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४३ | श्रीम. ज्योती शामराव माने |
| ७ | श्रीम. मिनाकौर अजितसिंग लबाना | ४४ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ८ | श्रीम. पंचम उमेश कालानी | ४५ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ९ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४६ | श्रीम. मिताली राजेश चान्पूर |
| १० | श्रीम. आशा नाना बिराडे | ४७ | श्रीम. लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ११ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४८ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १२ | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४९ | श्रीम. संगिता नितीन सपकाळे |
| १३ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ५० | श्रीम. शीतल चंद्रकांत कदम |
| १४ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ५१ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| १५ | श्रीम. सुरेखा हनुमंत आव्हाड | ५२ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १६ | श्रीम. अंजना अंकुश म्हस्के | ५३ | श्रीम. दिप्ती नविन दुधानी |
| १७ | श्री. कलवंतसिंग गुरूदेव सहोता | ५४ | श्रीम. ज्योती रमेश चैनानी |
| १८ | श्रीम. गीता लालचंद साधनानी | ५५ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| १९ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ५६ | श्रीम. सुनिता बाबुराव बगाडे |
| २० | श्रीम. रेखा अशोक ठाकुर | ५७ | श्रीम. पुजाकौर श्यामसिंग लबाना |
| २१ | श्रीम. जया प्रकाश माखिजा | ५८ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २२ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५९ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २३ | श्रीम. शुभांगीनी निकम | ६० | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २४ | श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ६१ | श्रीम. कविता सुधिर बागुल |
| २५ | श्री. भगवान शंकर भालेराव | ६२ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २६ | श्रीम. छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ६३ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २७ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ६४ | श्रीम. मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २८ | श्रीम. डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ६५ | श्रीम. मिनाक्षी रवी पाटील |
| २९ | श्रीम. दिपा नारायण पंजाबी | ६६ | श्री. विजय चाहू पाटील |
| ३० | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ६७ | श्रीम. कविता सुरेश गायकवाड |
| ३१ | श्रीम. पुष्पा नाना बागुल | ६८ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| ३२ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी | ६९ | श्री. विकास परशुराम पाटील |
| ३३ | श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल | ७० | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३४ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ७१ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३५ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ७२ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३६ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी | ७३ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| ३७ | श्रीम. कविता लाल पंजाबी | ७४ | श्रीम. आशा जीवन इदनानी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३८ | श्रीम. सविता प्रविण तोरणे (रगडे) | ७५ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| ३९ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील, २. श्री. अशोक बच्चुमल छाप्रु, ३. श्रीम. सरोजिनी टेकचंदानी, ४. श्रीम. अपेक्षा भगवान भालेराव, ५. श्रीम. ज्योती प्रशांत पाटील, ६. श्रीम. चंद्रावती अयोध्याप्रसाद सिंग, ७. श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी, ८. श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. डॉ, विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय
४. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
५. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
६. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
७. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी
८. श्री. श्री. महेश शितलानी, उप अभियंता
९. श्री. संजय पवार, कनिष्ठ अभियंता
१०. श्री. बालाजी लोंढे, सहा. आयुक्त
११. श्री. विनोद खामितकर, कनिष्ठ अभियंता
१२. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता
१३. श्री. हनुमंत खरात, कनिष्ठ अभियंता
१४. श्री. संजय पवार, कनिष्ठ अभियंता
१५. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
१६. श्रीम. अलका पवार, प्र. सहा. आयुक्त
१७. श्री. नंदू समतांनी, प्र.सहा. आयुक्त
१८. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक
१९. श्रीम. श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
२०. श्रीम. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
२१. श्री. राजा बुलानी, प्र. विद्यी विभाग प्रमुख
२२. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२३. श्री. अच्युत सासे, प्र. मुख्य लिपिक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळू भांगरे

दुपारी २.३० वाजता वंदेमातरम म्हणून सभेची सुरूवात करण्यात आली.

**यावेळी श्रीमती विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त हया आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ झाल्या.**

<u>महापालिका सचिव:—</u> दिनांक १८/५/२०१७ रोजीची स्थगित सभा आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मा. महापौर महोदया, मा. आयुक्त महोदय, काही दिवसापुर्वी काशमीर भागामध्ये आमचे भारतीय दर्शनासाठी द्वारकानाथ येथे जात होते. तेव्हा त्यांच्यावर हल्ला झाला आणि त्या दहशतवादी हल्यामध्ये काही लोकांचे मुंत्यु झाले त्यांना सभागृहामध्ये श्रध्दांजली वाहण्यात यावी.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** मा. महापौर मॅडम, शासनाच्या, महानगरपालिकेच्या हलगर्जीपणामुळे वडोल गावामध्ये दोन माणसांचे मुंत्यु झाले त्यांना पण श्रध्दांजली अर्पित करण्यात यावी.

**महापालिका सचिव:—** कृपया दोन मिनिटे मौन पाळुन श्रध्दांजली अर्पित करावी.

---

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

**शोक प्रस्ताव**

काही दिवसापुर्वी काश्मीर भागामध्ये काही भारतीय दर्शनासाठी द्वारकानाथ येथे जात असतांना त्यांच्यावर हल्ला झाला आणि त्या दहशतवादी हल्यामध्ये काही लोकांचे मुंत्यु झाले आहे.

तसेच महानगरपालिकेच्या हलगर्जीपणामुळे वडोल गावामध्ये दोन माणसांचे मुंत्यु झाले

त्यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. १२ क** **दिनांक:— १८/७/२०१७**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार काश्मिर भागामध्ये काही भारतीय व महापालिका हद्‌दीतील दोन माणसे यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—** सन्माननिय महापौर मॅडम आमचे शिवसेनेचे निवडून आलेले नगरसेवक, श्री. शेखर यादव त्यांचा आज वाढदिवस आहे. त्यामुळे त्यांना भारतीय जनतापार्टीतर्फे हार्दिक शुभेच्छा।

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** मा. महापौर मॅडम, शेखर यादवच्या वाढदिवसा निमित्त संपुर्ण शहरात दारू बंदी होणार आहे.

**सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानी:—** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, आज आमच्या उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये आमचे पनवेल महानगरपालिकेचे नवनिर्वाचित महापौर, उप महापौर, सभागृह नेता आणि काही वेगवेगळया पक्षाचे नगरसेवक इथे उपस्थित आहेत. मी उल्हासनगर महानगरपालिकेच्यातर्फे या सभागृहाच्या गॅलरीमध्ये बसलेल्या सर्व सदस्यांचा हार्दिक हार्दिक अभिनंदन करतो, मी त्यांचे स्वागत करीत आहे की, ते येथे उपस्थित राहीले आहेत.

या वेळी उप महापौर, श्री. जीवन चंद्रभान इदनानी यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १ प्रश्नोत्तरे आहेत, प्रलंबित प्रश्न क्र. २ अजून आला नाही.

यावेळी सदस्या श्रीमती मिनाकौर लबाना यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

प्रश्नोत्तरे.........

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र. ५ हा श्री. सुनिल सुर्वे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. ५:—</u> १) उल्हासनगर महानगरपालिकेने कॅम्प नं. ४ व कॅम्प नं.५ करीता कोणत्या जाहिरात ठेकेदाराची नियुक्ती केली आहे.
अ) उल्हासनगर महानगरपालिकेने जाहिरातीचा ठेका कोणत्या वर्षी दिला होता व कुठल्या वर्षा पर्यंत.
ब) सदरच्या ठेकेदाराने दर महिना किती रक्कम भरावयाची होती. आजच्या तारखे पर्यंत. त्याला भरावयाची रक्कम नियमित भरली आहे का? किंवा कसे त्याची सविस्तर माहिती देण्यात यावी.
क) सदर ठेकेदार करारनाम्यानुसार ठरलेली रक्कम भरत आहे किंवा नाही. याची संपुर्ण लेखी माहिती येणा—या महासभेत देण्यात यावी.
ड) तसेच दर महिन्याचा सविस्तर अहवाल आजपर्यंतचा व कर भरला नसल्यास त्याच्यावर केलेल्या कारवाईची सविस्तर माहिती मिळावी.

<u>उत्तर :—</u> १) उल्हासनगर महानगरपालिकेने कॅम्प नं.४ व ५ करिता मे. किंग्स इंटरप्रायजेस, उल्हासनगर यांना जाहिरातीचा ठेका देण्यात आलेला आहे.
**अ)** उल्हासनगर महानगरपालिकेने जाहिरातीचा ठेका निविदा प्रक्रिया करून मा. स्थायी समिती ठराव क्र. २२, दिनांक १८/०५/२००७ च्या अधिन राहून सन २००७ ते २०१० या कालावधीसाठी देण्यात आलेला होता. त्यानंतर मा. स्थायी समिती ठराव क्र. १३६, दिनांक ३१/०३/२०१० अन्वये जाहिरात फलक लावणेच्या दरामध्ये १०: टक्के वाढ करून जाहिरात प्रसिध्द् करण्याचा ठेका ३ वर्षाच्या कालावधी करिता मुदतवाढीने देण्यात आलेला होता. तसेच मा. स्थायी समिती ठराव क्र. ९८, दिनांक ०३/०३/२०१४ अन्वये जाहिरात शुल्क आकारणीत १०: टक्के वाढ करून १ वर्षाच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली होती. तथापी सदर कालावधी माहे ऑक्टोबर २०१४ मध्ये संपुष्टात आल्याने मा. स्थायी समिती ठराव क्र. ९६, दिनांक २०/०३/२०१५ रोजीच्या ठरावात नमुद केल्याप्रमाणे मे. किंग्स एंटरप्रायजेस यांच्या जाहिरात फलक लावणेच्या दरामध्ये १०: टक्के वाढ न करता, निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यत संबंधित ठेकेदाराकडून काम करून घेण्याच्या मुदतवाढीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे. तद्नंतर या विभागाकडून जाहिरात कंपनीने वेळोवेळी आवश्यक रक्कमेचा भरणा केला आहे किंवा नाही याची पडताळणी केली असता कंपनीने वेळोवळी आश्यक रक्कमेचा भरणा न केल्याचे आढळून आल्याने कंपनीने थकीत रक्कमेचा भरणा करणेबाबत जानेवारी २०१७ पासून संबंधित ठेकेदार यांनी मुदतवाढी नुसार जाहिरात फलक प्रसिध्दी करणेचे काम करण्यास तयार नसल्याचे व सदरहू काम बंद करीत असल्याचे कळविले आहे. व खुलासा करणेबाबत पत्र देण्यात आले आहे. त्यामुळे

**ब)** मे. किंग्स इंटरप्रायजेस, यांना सन २०१० ते २०११ या वर्षात यांना दर महिना रू. २७,०३८/— एवढी रक्कम भरणा करावयाची होती. तद्नंतर पुढील २ वर्षाकरिता म्हणजेच सन २०११ ते २०१२ व सन २०१२ ते २०१३ प्रति वर्ष सदर रक्कमेमध्ये १०: टक्के वाढ करून रक्कम भरणा करावयाची होती. सदर ठेकेदार यांनी करारनाम्यानुसार ठरलेली रक्कम भरणा न केल्याने मालमत्ता विभागाकडून त्यांना थकीत रक्कम भरणा करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. (सोबत भरणा केलेल्या रक्कमेचा तपशिल जोडलेला आहे.)
मे. किंग्स इंटरप्रायजेस, यांना सन २०१४ ते २०१५ या वर्षात यांना दर महिना रू. ३९,५८२/— एवढी रक्कम भरणा करावयाची होती. तद्नंतर मा. स्थायी समिती ठराव क्र. ९६, दिनांक २०/०३/२०१५ रोजीच्या ठरावात नमुद केल्याप्रमाणे मे.किंग्स एंटरप्रायजेस यांच्या जाहिरात फलक लावणेच्या दरामध्ये १०: टक्के वाढ न करता, निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यत संबंधित ठेकेदाराकडून काम करून घेण्याच्या मुदतवाढीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली असल्याने रू. ३९,५८२/— एवढी रक्कम भरणा करावयाची होती. (सोबत भरणा केलेल्या रक्कमेचा तपशिल जोडलेला आहे.)
**क)** सदर ठेकेदार यांनी करारनाम्यानुसार ठरलेली रक्कम भरणा न केल्याने मालमत्ता विभागाकडून त्यांना थकीत रक्कम भरणा करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.
ड) वरीलप्रमाणे (सोबत भरणा केलेल्या रक्कमेचा तपशिल जोडलेला आहे.)

या वेळी सदस्य, श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— मा. महापौर मॅडम, उप महापौर, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, प्रश्न एकदम महापालिकेच्या आर्थिक हितासंबंधी आहे. आपणच काढलेल्या नोटीस आणि जे उत्तर दिलेले आहे. त्याचे उत्तरच दिलेले नाही. पहीली गोष्ट त्याचे उत्तरच दिलेले नाही. ५ आणि ६ क्र. चा एकच प्रश्न आहे. कॅम्प नं. ४, ५ चा आणि १, २, ३ चा त्याचे लेखी उत्तर दिलेले नाही. पहीली गोष्ट.....

या वेळी सदस्य, श्री. भारत राजवानी, सदस्या, श्रीम. पंचम कालानी यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत:— सर प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे महासभेला.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— नाही आता कॉपी माझ्या समोर आहे. एक सर्वसाधारण गोष्ट लक्षात घ्या. उल्हासनगर महानगरपालिकेच्या आर्थिक बाबी संबधी हे पत्र आहे. मी मगाशी पण तुम्हांला उल्लेख केला आज आम्ही रस्त्यावरून जातांना जे काही दिशादर्शक जाहिरातीचे फलक आहेत. बाकीच्या गोष्टी आहे आजचा विषय मी तुम्हांला तुमचेच पत्र आणि तुमच्याच नोटीसची कॉपी मी तुम्हांला देतो. त्याच्यावर खुलासा झाला तर बरे होईल. परंतु तुम्ही आज बघा १०० टक्के एका बाजूला पुर्ण दिशादर्शक, जिथे दिशादर्शक पाहीजे, जसे आमच्या श्रीराम चौकात म्हणा, दिशादर्शक फलक आपण का लावतो. शहरात कुठलाही नागरीक आला तर त्याला कुठल्या बाजूला जायचे आहे हे कळावे. पण तसे न करता जे मुख्य रस्त्यावर तुम्ही सुरूवातीला दिशादर्शक फलक लावलेले होते. ते दिशादर्शक हटवून आता तिथे पुर्ण पणे जाहिरात चालू आहे, कुठला मोहन ग्रुप कुठला काही वेगळा ग्रुप हा काय प्रकार आहे, मला याचा खुलासा करा की दिशादर्शक हा लोकांसाठी मार्गदर्शक बनणार आहे का उगाच काही तरी डोके दु:खी झालेला आहे. महापालिकेचे सगळे आपण सदस्य यांनी हा ठराव याच्याकरिता पास केला होता की, कमीत कमी लोकांना कळावे, लोकांना कुठला रस्ता कुठे जातो, जसे विठ्ठलवाडीला आपण जातो, विठ्ठलवाडीला जात असतांना श्रीराम चौका जवळ हा मुख्य रस्ता आहे. त्याचा उल्लेख तिथे नाही. ही पुर्ण बाजू १०० टक्के बाजू त्यांनी ५० टक्के असा काही ठराव आहे. आमच्या माहीती प्रमाणे सांगा बरोबर आहे ना

प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत:— ४५ ते ५५ टक्के आहे.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— आपली बाजू ५५ ची आहे बरोबर आहे. पण तशीच तिथे नाही, तुम्ही कोणत्याही फलकावर जावून पाहू शकतात आणि प्रश्न येऊन दिनांक २६/४/२०१७ रोजीचा प्रश्न आहे. म्हणजे २७ तारखेला गेला असेल, २८ तारखेला गेला असेल किंवा १ तारखेला गेला असेल संबधित विभागामध्ये तर त्यांनी दिशादर्शका विषय काय माहीती काढली. दिशादर्शक कसे आहेत आणि कसे नाहीत काही मार्गदर्शक तत्व त्याच्यामध्ये होती.

प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत:— सर आपण आता जो प्रश्न विचारलेला आहे, तो दिशादर्शक विषयी नाही तर सार्वजनिक ठिकाणच्या जाहिरातीच्या संदर्भातील आहे.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— होय सार्वजनिक ठिकाणचा, बघा विषय एकच आहे. तुम्ही आता असे म्हणाल दिशादर्शक आणि त्याला ॲडव्हरटाईजमेटंचा विषय आहे हा बरोबर आहे. मग ॲडव्हरटाईज जिथे दिशादर्शक आहेत तिथे पण त्यांनी ॲडव्हरटाईज लावल्या त्यावर तुम्ही कारवाई काय केली.

प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत:— सर त्यांनी एका बाजुला महापालिकेची जाहिरात करायची आणि एका बाजूला त्याच्या स्वत:च्या जाहिराती करायच्या पण काही वेळेस काय होते, त्या ठिकाणच्या दोन्ही बाजूला आपली जाहिरात लागलेली असेल तर त्याच्या विरूध्द बाजूस पुर्ण त्याने जाहिरात केलेली आहे.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— ५५ आणि ४५ टक्के असे तुम्ही म्हणतात ना,

प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत:— ५५ आणि ४५ टक्के आहे.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— ५५ आणि ४५ बरोबर आहे, मग जे दोन फलक आहेत ते तसेच फलक आहेत. मग एकावर त्याला देतात आणि एका वर आपण घेतो, तर ४५ टक्के बसतो किंवा ५५ टक्के बसतो. ५५ टक्केचा अर्थ सांगा.

उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकर:— त्याच्या खालची जी पट्टी आहे, त्याच्यावर आपले स्लोगन आहेत दोन्ही बाजूचे ते ५ टक्के असतात.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— मग दिशादर्शकाचा अर्थ काय राहिला. कारण की तुम्ही ॲडव्हरटाईज त्याला ५० टक्के देतात. तिच बाजू जर देत असाल तर ती बाजू दिशादर्शक नाही. बरोबर आहे, पण असे नाही मी तुम्हांला समोरच एक उदाहरण सांगतो. दुसरी गोष्ट त्याच्यामध्ये महत्वाचे आहे, ज्या तुम्ही नोटीशी दिल्या आहेत. सन २०१६ ला २४/१०/१६ ला त्यात तुम्ही वसुली जी सांगितलेली आहे की, त्याला पैसे भरायचे होते आणि त्याने भरलेच नाहीत. आता बघा ही तुमची २४/१०/२०१६ ची नोटीस आहे. प्रथम वर्षी त्याने १/१/२०१५ ते ३१/१२/२०१५ ला रू.३८,१६०००/— भरायचे आहेत आणि इथे जुलै, २०१५ ला रू.१९,०८०००/— भरलेली आहे. सरासरी ५० टक्के झाले आहे. तुम्हाला समजेल का जे आता तुम्ही ही नोटीस.....

प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत:— सर १९००००/— जे तुम्ही म्हणता आहेत न्युओ साईन आणि ग्लोसाईनचे आहेत.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— न्युओ साईनचे आहेत. या नाटीसी तुम्ही दिल्या आहेत त्या?

प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत:— त्या त्यांना भरणा करण्यासाठी दिल्या होत्या, सर तुमचा जो प्रश्न आहे, तो मेसर्स लक्ष्मी आणि मेसर्स किंग्स ॲडव्हरटाईजमेंट त्यांना आपण सार्वजनिक ठिकाणचे लोकेशन जाहिराती साठी दिले होते. ते त्याचे प्रश्न आहेत.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— आता पर्यंत एकुण हे जे दिलेले आहेत ते बरोबर आहेत.

प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत:— सर बरोबर आहे तरी पण आम्ही त्याचे मध्ये तपासणी करण्याचे आमचे काम चालू आहे. त्यासाठी आम्ही लेखा विभागातील, उप लेखा परिक्षक, श्री. विनायक फासे आणि अशोक जाधव यांची ऑर्डर काढलेली आहे. त्यांना सांगितलेले आहे, आपण याचे ऑडिट करा, परंतु काय झाले आहे सर आपण त्यांना टेंडर दिले तेव्हा एकुण स्केअर मिटर दिला होता. १, २, ३ कॅम्पसाठी १२०० चौरस मिटर आणि कॅम्प ४, ५ साठी ४०० चौरस मिटर आणि त्या पैकी याच्यामध्ये लिहीले होते की मिनिमम चौरस मिटरचे कंम्पलसरी तुम्हांला पैसे भरणे आवश्यक आहे. पण त्यावेळेस काय झाले की २००९ मध्ये आपला एम.एम.आर.डी.ए.चा उल्हास स्टेशन जवळ स्काय वॉक तयार होत होता. त्या ठिकाणी त्यांच्या ९ होर्डीग्स होत्या. एकुण ४०० चौरस मिटरच्या त्या होर्डिग्स आपण तात्काळ काढून घेण्यात याव्यात म्हणून टॅक्स विभागामार्फत त्यांना आपण आपल्या कंपनीला पत्र दिले होते. त्यानंतर त्यानी जेवढया होर्डिग्स लावल्या आहेत तेवढे पैसे भरले आहेत. परंतु आपल्याकडून तपासणी केली असता तेव्हा लक्षात घेतले की, ॲग्रीमेंटमध्ये १२०० चौरस मिटर मिनिमम कंम्पलसरी लिहीले आहे. म्हणजे आपल्याला १२०० चौरस मिटर प्रमाणे पैसे घेणे अपेक्षित आहे. पण त्याच्यामध्ये आपण त्यांना म्हणटले आहे की या होर्डीग्स काढा त्याच्या बद्दल आपण त्यांना इतर कुठेही अल्टरनेट साईड दिल्या नव्हत्या.

या वेळी सदस्या, श्रीम. आशा जीवन इदनानी व सदस्य, श्री. सागर सोनकांबळे यांनी सभागृहात प्रवेश केला.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— ज्या होर्डीग्स काढल्या त्या वेरीफाय केल्या का?

प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत:— सर त्यावेळेस वेरीफाय केलेल्या नव्हत्या. खरे तर सन २००९ पासून सर्व काढलेल्या आहेत.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> मग आता जो प्रश्न आहे, त्या प्रश्नाच्या अनुषंगाने जेवढे आपण विचारले आहेत बोर्डस वैगेरे त्याची माहीती किती दिवसात मिळेल.

<u>प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत:—</u> सर १५ दिवसात मिळेल.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> पुढच्या महासभेच्या अगोदर, म्हणजे उदयाच्या नाही त्याच्या पुढच्या.

<u>प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत:—</u> सर नक्की मिळेल.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> देहेरकर साहेब, हे उत्तर दिलेले आहे, हे प्रशासनाला मान्य आहे ना. पण सही कोणाचीच नाही फक्त उप आयुक्त मालमत्ता लिहीले आहे. सन २००७ साली ठेका झालेला आहे. प्रशासन किती कार्यक्षम आहे हे याच्या वरून दिसते. तीन वर्षासाठी दिला सन २०१० नंतर मुदतवाढ आणि सन २०१५ पासून आता पर्यत ठेका दिलेला नाही. परंतु तो ठेकेदार भरणा करतो किंवा नाही हे सुध्दा मालमत्ता विभागाला माहीत नाही. हे सन २०१५ पासून भरणा करीत नाहीत आणि सन २०१७ मध्ये यांचा प्रश्न आला आहे. तुम्ही मालमत्ता किंवा लेखा विभागाला विचारणा केली त्यांनी भरण केला आहे किंवा नाही. मा. महापौर महोदया हे प्रशासन आहे का? इथे मालमत्ता विभाग आणि लेखा विभागा यांचे कोऑर्डीनेशन नाही आणि शहरातल्या होर्डीग्स आणि जाहीरातीचा ठेका पण गेल्या तीन वर्षात आपण काढू शकत नाही. उत्तर वाचलं का तुम्ही सन २००७ ला पहीला ठेका तीन वर्षासाठी दिला सन २०१० पर्यंत त्याच्या नंतर १० टक्के मुदतवाढ सन २०१५ पर्यंत चाललेले आहे. हे असे चालणार आहे का? पण अडचण काय आहे? तुम्हांला निविदा काढायला अडचण काय आहे.

<u>प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत:—</u> सर निविदा प्रक्रिया आपण सुरू केलेली आहे. पण त्याला प्रतिसाद मिळत नाही. पहील्यांदा आपण केले तेव्हा पण प्रतिसाद मिळालेला नाही. त्याच्या नंतर....

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> परंतु कारणे काय आहेत. ती शोधा ना हे असे चालणार आहे का? हा सगळा सावळा गोंधळ झाला. प्रतिसाद का मिळत नाही? आपण चुकीच्या निविदा काढतोय का? इतर शहरामध्ये याला प्रचंड प्रतिसाद मिळतो आपल्या शहरामध्ये प्रतिसाद का मिळत नाही. कसे शक्य आहे, काही तरी गडबड वाटते. प्रतिसाद मिळत नाही का? प्रतिसाद मिळवला जात नाही. मुद्दामहून काही जास्त अटी टाकल्या आहेत का? जेणेकरून लोक येत नाहीत. बिना टेंडरचे असे कुठलाही एकही विभाग आहे का? गेल्या पाच वर्षात, गेल्या दहा वर्षात याच्या निविदाच निघालेल्या नाहीत. एवढे आयुक्त आहेत, उप आयुकत आहेत टेक्नीकल आपली टीम आहे. प्रशासन सांभाळणारे, हाताळणारे याच्यावर काही उत्तर नाही का? चर्चा होत नाही का तुमची?

<u>प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत:—</u> निविदाना मुदतवाढ दिलेली आहे, परंतु प्रतिसाद मिळालेला नाही. आयुक्त साहेबानी सांगितले की, अशा ऐजन्सी, ॲडव्हरटाईज असतील त्यांना बोलावू आपल्या ज्या अटी आहेत त्याच्यामध्ये काही बदल करता येईल का?

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> तुम्ही ठेकेदाराला भरणा करण्यासाठी नोटीस दिलेली आहे आणि उत्तरात तुम्ही लिहीले आहे की, त्यांनी अजून भरणा केलेला नाही. मग कसे ठेके चालू आहेत. गणपती उत्सव मंडाळाला आणि नवरात्र उत्सव मंडाळाला त्या ठेकेदाराची होर्डीग्स लावण्यासाठी परवानगी का घ्यावी लागते? त्याने पैसे भरलेले नाहीत मग ठेका रद्द झालेला आहे. आज सुध्दा संपुर्ण निवडणूक कार्यकाळात उमेदवारांना त्या ठेकेदाराची परवानगी घ्यावी लागली. जर तो भरणा करीत नाही, त्याची निविदा मान्य नाही. त्याला मुदत वाढ नाही, मग कुठल्या आधारे त्याची परमिशन तुम्ही ग्राहय धरली. कोण उत्तर कोण देणार?

<u>प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत:—</u> सर आपण निवडणूक काळामध्ये जे परमिशन दिले आहेत ना त्याच्यासाठी आपण तात्पुरत्या मेसर्स पवन ॲडव्हरटाईजला आपल्या होर्डीग्स दिल्या होत्या. परमिशन देण्यासाठी फक्त त्या कालावधी पुरत्याच होत्या.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> मग आताची परिस्थिती काय आहे. निविदा चालू आहेत की बंद आहेत.

<u>प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत:—</u> नाही बंद आहेत.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> कधी पासून?

<u>प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत:—</u> जानेवारी २०१७ पासून बंद आहेत.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> त्याच्या नंतर तुम्ही निविदा मागविल्या आहेत का?

<u>प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत:—</u> आता निविदा प्रक्रिया सुरू आहेत, परंतु प्रतिसाद मिळत नाही. तिनदा मुदतवाढ दिलेली आहे.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> सन २०१७ नंतर निविदा तुम्ही मागविल्या आहेत का?

<u>प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत:—</u> हो सर, सन २०१५ पासून.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> किती तारखेची होती.

<u>प्र. मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत:—</u> सर आता १५/६/२०१७ ला निविदेची शेवटची तारीख होती. भरण्यासाठी त्यासाठी तिसरी मुदतवाढ दिली होती. त्याच्या नंतर आपण पुन्हा फाईल सादर केली आहे की, निविदा समितीने याच्यावर योग्य ते अभिप्राय देण्यात यावेत.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> या विषयावर कोऑर्डीशन कमिटीमध्ये असे जर प्रतिसाद प्रत्येक टेंडरला/निविदेला चालणार असेल तर हे शहर चालणार नाही. सन २००७ पासून सन २०१७ पर्यंत उल्हासनगरच्या जाहिरातीसाठी आपल्याला निविदा काढता येत नाहीत, ही शरमेची गोष्ट आहे, लाजिरवाणी गोष्ट आहे. मोठमोठे प्रकल्प आपण काय राबवणार आहेत? १० वर्षामध्ये एकच ठेकेदार त्याला मुदतवाढ दिलेली आहे, त्यानी मान्य केले आहे, त्याने इथे लिहून दिलेले आहे की मला परवडत नाही. परवडत नाही का करायचे नाही. नसेल करायचे तर दुस—याला दया. त्याची अडचण काय आहे ते पहा.

<u>उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकर:—</u> सर या संदर्भात आपल्या ज्या अटी आहेत, त्या अटी शर्ती आहेत त्या आणि साधारणपणे पार्श्वभूमी आणि कागदपत्र बघितलेलेच नाही. या सगळयांचा विचार करून मालमत्ता विभागाने त्यांना तिस—यांदा मुदतवाढ दिलेली आहे.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> सन २०१७ पासून संबंधित ठेकेदार यांनी मुदतवाढीनुसार जाहिरात फलक प्रसिध्दीसाठी करण्याचे काम करण्यास तयार नसल्याचे सदर दुकान बंद करीत असल्याचे कळविले आहे. एवढी हतबल आणि हताश महानगरपालिका.

<u>उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकर:—</u> सर या संदर्भात आपण ज्या निविदा प्रसिध्द केलेल्या आहेत, त्यांना आता प्रतिसाद मिळत नसल्यामुळे तिस—यांदा मुदतवाढ दिली आहे.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> मला काय सांगायचे आहे, प्रतिसाद मिळत नाही तर त्याची कारणे काय आहेत? कारणे शोधली पाहीजेत तीन—चार वर्षापासून तुमचे एकच उत्तर आहे, परंतु का मिळत नाही. हा विषय लवकर मार्गी लावा, पुढच्या महासभेच्या अगोदर.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, मालमत्ता विभागा विषयी एक प्रश्न आहे. मालमत्ता विभाग आहे, जो नेहमीच अशा चुका करत आलेला आहे. एक चुक ॲडव्हरटाईजमेंट या विषयी झालेली आहे आणि दुसरी चुक म्हणजे पार्किंगसाठी आपण जी जागा देतो, पार्किंगच्या संदर्भात त्याच्यासाठी देण्यात आलेली मुदत समाप्त झाली असतांनाही निविदा निघत नाही आणि निविदा काढल्या नसल्यामुळे तिथे पार्किंग फुकटमध्ये चालत आहेत. यामध्ये महानगरपालिकेचा तोटा होत आहे. याची जबाबदारी कोणाची असेल. जर हा विभाग असे काम करीत असेल तर हे चुकीचे आहे. त्यांच्यावर कारवाई केली पाहीजे. सदरची पार्किंग आहे, तीन वर्षापुवी दिलेली होती, त्याची मुदत संपली आहे. निविदा काढायचे काम कोणाचे आहे, नगरसेवकांचे आहे का? महापालिका अधिका—यानी अजून पर्यंत ती काढली गेली का नाही? निविदा का मागविली नाही? या सर्व बाबीचे लक्ष कोणी देयायचे महापालिकेचा महसुल बुडत आहे, त्याला जबाबदार कोण? या सगळया बाबतीकडे आपण गार्भियाने बघितले पाहीजे.

सदस्य, श्री. भारत राजवानी:— सचिव मॅडम २ नंबरचा प्रश्नाचे उत्तर अजून आलेले नाही.

महापालिका सचिव:— सर संबंधित विभागाकडूनच आलेला नाही.

सदस्य, श्री. भारत राजवानी:— किती दिवस येणार नाही, एक वर्ष, दोन वर्ष...

महापालिका सचिव:— सर संबंधित विभागाने त्याचे उत्तर आम्हांला दिले नाही, सामान्य प्रशासन विभाग आणि आरोग्य विभागास दिलेले आहे. सर आपण त्यांच्याकडून त्याचे उत्तर घ्या.

उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकर:— या संदर्भात मला नविनच चार्ज दिलेला आहे. अंडगळ संदर्भातील तो आपला प्रश्न आहे. त्या संदर्भात त्याची मी छाननी करीत आहेत आणि येत्या पंधरा दिवसात तुम्हांला परिपुर्ण माहीती देण्यात येईल.

सदस्य, श्री. भारत राजवानी:— पुढच्या महासभेमध्ये एकदम क्लिअर होऊन येईल का?

उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकर:— जरूर येईल.

सदस्य, श्री. भारत राजवानी:— ठिक आहे.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र. ६ हा श्री. सुनिल सुर्वे यांचा आहे.

? प्रश्न क्र. ६ :— १) उल्हासनगर महानगरपालिकेने कॅम्प नं. १ कॅम्प नं.२ व कॅम्प नं. ३ करीता कोणत्या जाहिरात ठेकेदाराची नियुक्ती केली आहे.
अ) उल्हासनगर महानगरपालिकेने जाहिरातीचा ठेका कोणत्या वर्षी दिला होता व कुठल्या वर्षा पर्यंत.
ब) सदरच्या ठेकेदाराने दर महिना किती रक्कम भरावयाची होती. आजच्या तारखे पर्यंत. त्याला भरावयाची रक्कम नियमित भरली आहे का? किंवा कसे त्याची सविस्तर माहिती देण्यात यावी.
क) सदर ठेकेदार करारनाम्यानुसार ठरलेली रक्कम भरत आहे किंवा नाही. याची संपुर्ण लेखी माहिती येणा—या महासभेत देण्यात यावी.
ड) तसेच दर महिन्याचा सविस्तर अहवाल आजपर्यंतचा व कर भरला नसल्यास त्याच्यावर केलेल्या कारवाईची सविस्तर माहिती मिळावी.

उत्तर :— १) उल्हासनगर महानगरपालिकेने कॅम्प नं. १ ते ३ करीता मे. लक्ष्मी अॅडव्हरटायजिंग, उल्हासनगर यांना जाहीरातीचा ठेका देण्यात आलेला आहे.
अ) उल्हासनगर महानगरपालिकेने जाहीरातीचा ठेका निविदा प्रक्रिया करून मा. स्थायी समिती ठराव क्र.२२, दिनांक १८/५/२००७ च्या अधिन राहून सन २००७ ते २०१० या कालावधीसाठी देण्यात आलेला होता. त्यानंतर मा. स्थायी समिती ठराव क्र. १३६, दिनांक ३१/३/२०१० अन्वये जाहीरात फलक लावणेच्या दरामध्ये १० टक्के वाढ करून जाहीरात प्रसिध्द करण्याचा ठेका ३ वर्षाच्या कालावधी करीता मुदतवाढीने देण्यात आलेला होता. तसेच मा. स्थायी समिती ठराव क्र. ९८ दिनांक ०३/३/२०१४ अन्वये जाहीरात शुल्क आकारणीत १० टक्के वाढ करून १ वर्षाच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली होती. तथापी सदर कालावधी माहे ऑक्टोंबर २०१४ मध्ये संपुष्टात आल्याने मा. स्थायी समिती ठराव क्र. ९६ दिनांक २०/३/२०१५ रोजीच्या ठरावात नमुद केल्या प्रमाणे मे. लक्ष्मी अॅडव्हरटायजिंग, उल्हासनगर यांच्या जाहीरात फलक लावणेच्या दरामध्ये १० टक्के वाढ न करता निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत संबंधित ठेकेदाराकडून काम करून घेण्याच्या मुदतवाढीच्या प्रस्तावास मान्यता देत आलेली आहे. तद्नंतर या विभागाकडून जाहीरात कंपनीने वेळोवेळी आवश्यक रक्कमेचा भरणा केला आहे. किंवा नाही याची पडताळणी केली असता कंपनीने वेळोवेळी आवश्यक रक्कमेचा भरणा न केल्याचे आढळून आल्याने कंपनीस थकीत रक्कमेचा भरणा करणेबाबत व खुलासा करणेबाबत पत्र देण्यात आले आहे. त्यामुळे जानेवारी, २०१७ पासून संबंधित ठेकेदार यांनी मुदतवाढी नुसार जाहीरात फलक प्रसिध्दी करणेचे काम करण्यास तयार नसल्याने व सदरहू काम बंद करीत असल्याचे कळविले आहे.

**ब)** सन २०१० ते २०११ या वर्षात मे. लक्ष्मी ॲडव्हरटायजिंग यांना दर महीना रू. १,१७,७००/— एवढी रक्कम भरणा करावयाची होती. तद्नंतर पुढील २ वर्षाकरीता म्हणजेच सन २०११ ते २०१२ व सन २०१२ ते २०१३ प्रति वर्ष सदर रक्कमेमध्ये १० टक्के वाढ करून रक्कम भरणा करावयाची होती. **(सोबत भरणा केलेल्या रक्कमेवा तपशिल जोडलेला आहे.)** परंतु सदर ठेकेदार यांनी करारनाम्यानुसार ठरलेली रक्कम नियमित पण भरणा न केल्याने मालमत्ता विभागाकडून त्यांना थकित रक्कम भरणा करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

मे. लक्ष्मी ॲडव्हरटायजिंग, यांना सन २०१४ ते २०१५ या वर्षात यांना दर महीना रू.१,७२,२०५/— एवढी रक्कम भरणा करावयाची होती. तद्नंतर मा. स्थायी समिती ठराव क्र.९६, दिनांक २०/०३/२०१५ ठरावात नमुद केल्याप्रमाणे मे. किंग्स एंटरप्रायजेस यांच्या जाहीरात फलक लावणेच्या दरामध्ये १० टक्के वाढ न करता, निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत संबंधित ठेकेदाराकडून काम करून घेण्याच्या मुदतवाढीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली असल्याने रू.१,७२,२०५/— एवढी रक्कम भरणा करावयाची होती. **(सोबत भरणा केलेल्या रक्कमेचा तपशिल जोडलेला आहे.)** परंतु सदर ठेकेदार ठेकेदार यांनी करारनाम्यांनुसार ठरलेली रक्कम भरणा न केल्याने मालमत्ता विभागाकडून त्यांना थकीत रक्कम भरणा करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

**क)** सदर ठेकेदार यांनी करारनाम्यानुसार ठरलेली रक्कम भरणा न केल्याने मालमत्ता विभागाकडून त्यांना थकीत रक्कम भरणा करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

ड) वरील प्रमाणे **(सोबत भरणा केलेल्या रक्कमेचा तपशिल जोडलेला आहे.)**

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>ठिक आहे.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र. ७ हा सुनिल सुर्वे यांचा आहे.

?

<u>प्रश्न क्र ७</u> १) मागील सन १६—१७ आर्थिक वर्षात कोणकोणत्या विभागाच्या विषयासह कामाना मंजुरी देण्यात आल्या त्याची सविस्तर माहीती मिळणे तसेच किती निविदा काढण्यात आल्या.

अ) किती निविदांना स्वीकृती मिळाली ती कामे कोणती.

ब) स्वीकृती मिळाल्यानंतर किती कामे सुरू करण्यात आली, त्यापैकी किती कामे पुर्ण झाली.

क) कामांना मंजुरी मिळाल्यानंतर किती कामे प्रलंबित आहेत. याची सविस्तर माहीती मिळणे इतर कामा विषयी प्रश्नाचे उत्तर मिळणेबाबत.

<u>उत्तर :—</u> १) अग्निशमन विभागामार्फत सन १६—१७ या आर्थिक वर्षात एकही निविदा काढलेली नाही सदरची माहिती निरंक आहे.

अ) अग्निशमन विभागामार्फत सन १६—१७ या आर्थिक वर्षात एकही निविदा काढलेली नाही सदरची माहिती निरंक आहे.

ब) अग्निशमन विभागामार्फत सन १६—१७ या आर्थिक वर्षात एकही निविदा काढलेली नाही सदरची माहिती निरंक आहे.

क) अग्निशमन विभागामार्फत सन १६—१७ या आर्थिक वर्षात एकही निविदा काढलेली नाही सदरची माहिती निरंक आहे.

१) सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत खालिल पाच कामाची निविदा काढण्यात आली आहे व चार कामाची मंजुरी घेण्यात आली आहे.

अ) १)डासनाशक/अळीनाशक/जंतुनाशक/किटकनाशक औषधांचा पुरवठा करण्याबाबत. मा. स्थायी समिती ठराव क्र. ५३

२) आवश्यक सफाई व स्वच्छतेसाठी सफाई साहित्ये—साधने पुरवठा करण्याबाबत. मा. स्थायी समिती ठराव क्र. ८६

३) शहरात डेंग्यू, हिवताप व चिकन गुनिया आदी रोगांचा प्रतिबंद करण्यासाठी फॉगींग मशिन व स्प्रे पंप खरेदी करण्याबाबत. मा. स्थायी समिती ठराव क्र. १०८

४) पोक्लेन व जेसिबी मशिनद्वारे मोठया/छोटया नाल्याची सफाई करणे व तसेच मनुष्यबळाद्वारे शहरातील लहान नाले/गटारे/कल्व्हर्ट सफाई करणे व निघालेला कचरा/गाळ याची डंपरद्वारे वाहतूक डंपिंग ग्राऊंडवर करणेबाबतच्या वार्षिक कामाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती ठराव क्र. १२१

५) शहरातील मोकाट डुकरे पकडणे व त्यांना शहराबाहेरील निर्जन ठिकाणी सोडणे बाबत (निविदा मागवण्यात आली होती परंतु सदर निविदेस कोणताही प्रतिसाद प्राप्त झालेला नाही.)

ब) स्विकृती मिळाल्यानंतर उक्त तीन ही कामे पुर्ण करून घेण्यात आली आहे. व नाले सफाईचे काम तीन टप्प्यात वर्षभर सुरू राहिल. तीन टप्याण वर्षेभर सुरू राहिल.

क) निरंक१) सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत खालिल पाच कामाची निविदा काढण्यात आली आहे व चार कामाची मंजुरी घेण्यात आली आहे.

अ) १)डासनाशक/अळीनाशक/जंतुनाशक/किटकनाशक औषधांचा पुरवठा करण्याबाबत. मा. स्थायी समिती ठराव क्र. ५३

२) आवश्यक सफाई व स्वच्छतेसाठी सफाई साहित्ये–साधने पुरवठा करण्याबाबत. मा. स्थायी समिती ठराव क्र. ८६

३) शहरात डेंग्यू, हिवताप व चिकन गुनिया आदी रोगांचा प्रतिबंद करण्यासाठी फॉगींग मशिन व स्प्रे पंप खरेदी
करण्याबाबत. मा. स्थायी समिती ठराव क्र. १०८

४) पोक्लेन व जेसिबी मशिनद्वारे मोठया/छोटया नाल्याची सफाई करणे व तसेच मनुष्यबळाद्वारे शहरातील लहान नाले/गटारे/कल्व्हर्ट सफाई करणे व निघालेला कचरा/गाळ याची डंपरद्वारे वाहतूक डंपिंग ग्राऊंडवर करणेबाबतच्या वार्षिक कामाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती ठराव क्र. १२१

५) शहरातील मोकाट डुकरे पकडणे व त्यांना शहराबाहेरील निर्जन ठिकाणी सोडणे बाबत (निविदा मागवण्यात आली होती परंतु सदर निविदेस कोणताही प्रतिसाद प्राप्त झालेला नाही.)

सदरील प्रश्नांबाबत स्थानिक संस्था कर विभागाची माहिती निरंक समजण्यात यावी.

अ) वर्ष २०१६–१७ मध्ये मालमत्ता कर विभागामार्फत १ निविदा मालमत्ता कराची बिले छपाई व फोल्डकरिता मागविण्यात आली होती. त्यास मंजुरी घेण्यात आली होती.

ब) स्वीकृती मिळाल्यानंतर सदर निविदेचे काम सुरू करण्यात आले होते व पुर्ण झाले आहे.

क) निरंक

सार्वजनिक बांधकाम विभागातील सर्व उप अभियंता व लिपीक यांची पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीचे कामी नियुक्ती झालेली आहे. सदर विभागामध्ये कोणीही अधिकारी व कर्मचारी उपलब्ध नाही. त्यामुळे आपणांस या महासभेमध्ये प्रश्नाचे उत्तर न देता पुढील येणा–या महासभेमध्ये देण्यात येईल.

सविनय आपणास कळविण्यात येते की, वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत

१) भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करण्याची निविदा काढण्यात आली होती. सदर निविदेचा करारनामा माहे, फेब्रवारी २०१६ मध्ये करण्यात आला असून सदर काम सुरू आहे.

२) औषधे खरेदी करण्याची निविदा काढण्यात आली होती. सदरची निविदा प्रक्रिया अपुर्ण आहे

विचारण्यात आलेला प्रश्न हा हया विभागाशी संबधित नाही.

मागील सन २०१६–१७ आर्थिक वर्षात कामांना मंजुरी देण्यात आल्या.

१) उल्हासनगर महानगरपालिकेत कार्यालयीन कामकाजासाठी कार, व्हॅन, सुमो वाहन वाहनचालकांसह भाडेतत्वावर पुरविणेबाबत.

२) महापालिका वाहनांवर ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणेबाबत.

३) सिव्हरेज संक्शन व जेटींग मशिन या वाहनांवर वाहनचालक, वाहन मदतनीस व देखभाल व किरकोळ दुरूस्ती करणेबाबत.

४) सिव्हरेज लाई क्लिनिंग मशिन संक्शन (जेटींग व संक्शन) वाहन खरेदी करणेबाबत.

५) उल्हासनगर महानगरपालिकेची निकामी झालेली वाहनांची विक्रीची किमंत निर्धारित करणेबाबत.

६) उल्हासनगर महानगरपालिका करीता ६०० लिटर क्षमतेची दोन जेटींग मशिन वाहने खरेदी करणेबाबत.

७) वाहतुक विभागास टोईंग व्हॅन पुरविणे बाबत.

८) उल्हासनगर शहरात बस सेवा सुरू करणेबाबत.

एकूण ८ निविदा मागविण्यात आल्या होत्या.

**ई निविदा प्रक्रिया व्दारे मागविण्यात आलेल्या एकूण ६ निविदांना स्विकृती मिळाली.**

१) उल्हासनगर महानगरपालिकेत कार्यालयीन कामकाजासाठी कार, व्हॅन, सुमो वाहन वाहनचालकांसह भाडेतत्वावर पुरविणेबाबत.

२) महापालिका वाहनांवर ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणेबाबत.

३) सिव्हरेज संक्शन व जेटींग मशिन या वाहनांवर वाहनचालक, वाहन मदतनीस व देखभाल व किरकोळ दुरूस्ती करणेबाबत.

४) सिव्हरेज लाई क्लिनिंग मशिन संक्शन (जेटींग व संक्शन) वाहन खरेदी करणेबाबत.

५) उल्हासनगर महानगरपालिकेची निकामी झालेली वाहनांची विक्रीची किमंत निर्धारित करणेबाबत.

६) उल्हासनगर महानगरपालिका करीता ६०० लिटर क्षमतेची दोन जेटींग मशिन वाहने खरेदी करणेबाबत.

**एकूण ४ कामे सुरू आहेत.**

१) उल्हासनगर महानगरपालिकेत कार्यालयीन कामकाजासाठी कार, व्हॅन, सुमो वाहन वाहनचालकांसह भाडेतत्वावर पुरविणेबाबत.

२) महापालिका वाहनांवर ठेका पध्दतीने वाहनचालक पुरवठा करणेबाबत.

३) सिव्हरेज संक्शन व जेटींग मशिन या वाहनांवर वाहनचालक, वाहन मदतनीस व देखभाल व किरकोळ दुरूस्ती करणेबाबत.

४) उल्हासनगर महानगरपालिका करीता ६०० लिटर क्षमतेची दोन जेटींग मशिन वाहने खरेदी करणेबाबत. (सदर वाहने खरेदी करणेकरीता न्युनत्तम निविदाकारास कार्यादेश देण्यात आला आहे.परंतु कंपनीकडे BS4 वाहन उपलब्ध नसल्यामुळे BS4 वाहन उपलब्ध होईपर्यंत कार्यादेशास मुदतवाढ देण्यात आली आहे.)

**एकूण २ कामे पूर्ण झाली.**

१) सिव्हरेज लाईन क्लिनिंग मशिन संक्शन (जेटींग व संक्शन) वाहन खरेदी करणेबाबत.

२) उल्हासनगर महानगरपालिकेची निकामी झालेली वाहनांची विक्रीची किमंत निर्धारित करणेबाबत.

१) उल्हासनगर महानगरपालिका करीता ६०० लिटर क्षमतेची दोन जेटींग मशिन वाहने खरेदी करणेबाबत. (सदर वाहने खरेदी करणेकरीता न्युनत्तम निविदाक ारास कार्यादेश देण्यात आला आहे.परंतु कंपनीकडे ठ४ वाहन उपलब्ध नसल्यामुळे ठ४ वाहन उपलब्ध होईपर्यंत कार्यादेशास मुदतवाढ देण्यात आली आहे.) सदर काम प्रलंबित आहे.

२) उल्हासनगर शहरात बस सेवा सुरू करणेबाबत.

३) वाहतुक विभागास टोईंग व्हॅन पुरविणे बाबत. निविदा मागविण्यात आल्या होत्या परंतु तीन वेळेस मुदतवाढ देऊन देखिल ऐकही निविदाकारांने भाग घेतला नाही.सदर निविदांना योग्य प्रतिसाद न मिळाल्यामुळे सदर कामे प्रलंबित आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u> एकदम साधा प्रश्न होता, त्याचे उत्तर कुठलेच ठोस मिळालेले नाही. मागील सन २०१६—१७ या आर्थिक वर्षात कामांना मंजुरी देण्यात आल्या. त्याची सविस्तर माहीती मिळणेबाबत. सविस्तर माहीती दिली नाही फक्त वाहन विभागाची माहीती माझ्या समोर दिसते. सार्वजनिक बांधकाम विभागाची नाही, विद्युत विभागाची नाही, पाणी पुरवठयाची नाही, भांडार विभागाची नाही. एकदम साधा प्रश्न आहे, याचे उत्तर कोण देणार आहे. मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, आयुक्त साहेब स्वतः इथे हजर आहेत. आपण या ज्या निविदा प्रक्रिया झाल्या आहेत, मी वाचून दाखवतो मागील सन २०१६—१७ या आर्थिक वर्षात कोणकोणत्या विभागाच्या विषयांच्या कामांना मंजुरी देण्यात आलेली आहे, त्या बाबतची सविस्तर माहीती किती निविदाना स्विकृती मिळाली ती कामे कोणती, स्विकृती मिळाल्या नंतर किती कामे झाली. किती कामांना मंजुरी मिळाल्या नंतर किती प्रलंबित आहेत. त्याची सविस्तर माहीती मिळणे. पहीले सार्वजनिक बांधकाम, पाणी पुरवठा विभाग या विभागाने सांगावे. वाहन विभाग, आपण मला कमीत कमी जेवढे टेंडर झालेले आहेत.

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवारः—</u> सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये जेवढे ई—टेडरिंग झाले आहेत. त्यामध्ये ४२८ निविदा सन २०१६—२०१७ मध्ये काढण्यात आले होते, त्यामध्ये जे टेंडर प्रोसेसमध्ये आहेत त्यांचा नंबर २८३ आहेत. जे टेंडरवर सही झालेले आहेत त्यांची संख्या ३० आहे. ज्यांना वर्क ऑर्डर देण्यात आली आहे, त्यांची संख्या ५० आहे. वर्किग इन प्रोग्रेस ३ आहेत वर्क कंम्पलिटेड ५५ आहेत. सर्व मिळून ४२८ टेंडर आहेत. त्याच्या नंतर मॅन्युअल टेंडर आहेत, मॅन्युअल टेंडरमध्ये टोटल काम ४३६ आहेत. त्यामध्ये वर्क ऑर्डर ११३ कामांना देण्यात आली आहे. ११३ कामांमध्ये ७३ कामे पुर्ण झाली आहेत आणि टेंडर प्रासेसमध्ये ३२३ कामे आहेत.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः—</u> जैसवार साहेब, आपण मला सांगितले आहे की, ई—टेंडरमध्ये ज्या वर्क ऑर्डर झालेल्या आहेत, २०१६ मध्ये ४३८ आहेत, त्या पैकी वर्क ऑर्डर किती दिलेले आहेत?

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवारः—</u> वर्क ऑर्डर ५० दिलेल्या आहेत.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> वर्क ऑर्डर ५० दिलेल्या आहेत. म्हणजे आपले ४३८ मधून फक्त ५० वर्क ऑर्डर दिलेल्या आहेत. बाकी ३८७ लोकांना का वर्क ऑर्डर दिले गेल्या नाहीत? याचे कारण सांगा.

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:—</u> या मध्ये काही टेंडर प्रोसेस मध्ये आहेत, काही टेंडर जे झालेले आहेत, त्यांना मा. आयुक्तांचे आदेश आहेत की, माझे आदेशा शिवाय कुठलीही वर्क ऑर्डर देवू नये.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> म्हणजे जे मागे टेंडर तुमच्याकडे आले होते, टेंडर करायला त्याच्यावर आयुक्तांची सही होती का नाही. जे प्रकरण तुमच्याकडे पास होऊन आले होते. त्याचे तुम्ही टेंडर काढले होते, त्याच्यावर तत्कालीन आयुक्तांची सही होती का नाही? भाऊ मी तुम्हांला विचारतो की, आपल्याकडे ४३८ प्रकरण पास होऊन आले होते, आयुक्त साहेबांची सही झाल्या नंतरच आपण टेंडर काढले असतील ना.

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:—</u> होय आयुक्त साहेबांची सही होऊन आले होते.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> आयुक्त साहेबांची सही झाल्या नंतर आपण त्यांना कसे थांबवू शकता?

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:—</u> मा. आयुक्त साहेबांचे आदेशाचे आहेत.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> आदेश काय आहेत ते सांगा.

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:—</u> लिखीत आदेश आहेत.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> आपली कार्यक्षमता आहे की एक वर्षात ४३८ टेंडर काढू शकतात आणि फक्त ५० लोकांना कामाचे आदेश देतात. बाकी ३८७ लोकांना आदेश का दिले नाही? जी लिखीत दिले आहे तर कारण काय आहे, ते आम्हांला सांगा.

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:—</u> त्याचे कारण असे आहे की, उल्हासनगर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती. त्यामुळे देण्यात आले नाही.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> आर्थिक परिस्थिती व्यवस्थित नव्हती तर, ही बाब आपल्याला टेंडर काढल्या नंतर समजले का त्याच्या अगोदर आपल्याला समजले नाही का? आर्थिक परिस्थिती बघणे आपले काम नाही.

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:—</u> आयुक्त साहेबांनी मला मनाई केली की, वर्क ऑर्डर दयायची नाही. त्यामुळे मी दिल्या नाहीत.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> आयुक्त साहेबांनी मनाई केली मी मान्य करतो, परंतु आयुक्त साहेब काय म्हणाले त्या आदेशाची प्रत आम्हांला दाखवा.

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:—</u> मी त्याची प्रत आपल्याला देतो.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> त्या आदेशामध्ये काय लिहीले आहे, ते सांगा.

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:—</u> त्या आदेशाची प्रत मागवावी लागेल.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> आपल्याला आठवत नाही का काय लिहीले आहे. त्या आदेशामध्ये काय लिहीले आहे.

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:—</u> पुढील आदेश आल्या शिवाय कुठलेही वर्क ऑर्डर देवू नये.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> एवढेच लिहीले आहे आणि आपण एक वर्षापासून कुठल्याही वर्क ऑर्डर देत नाहीत.

<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u> त्या आदेशा नंतर आपण एक पण वर्क ऑर्डर दिली नाही का? दिले आहेत, माझ्याकडे रिपोर्ट आहे.

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:—</u> दिल्या आहेत.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> मग आपण त्या आदेशाचे उल्लंघन कसे केले?

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:—</u> मी आदेशाचे उल्लंघन केले नाही, मी पहीलेच सांगितले की, आयुक्तांच्या परवानगी शिवाय देता येत नाही. जी महत्वाची कामे होती, त्या महत्वाच्या कामांसाठी आयुक्तांच्या परवानगीने वर्क ऑर्डर देण्यात आल्या आहेत.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> आपल्या म्हणण्यानुसार महत्वाची कामे कोणती आहेत? हे आपण कसे ठरवू शकतात की, कोणती कामे महत्वाची आहेत आणि कोणती महत्वाची नाही.

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:—</u> जसे एखादा नाला तुटलेला असेल, एखादे धोकादायक काम आहे, किंवा काही ठिकाणी इमारत पडली होती तेथे खाली झोपडीचा रिटनिंग वॉल बनवायचे होते, एखादा एमरजन्सी नाला बनवायचा होता किंवा गणपती विसर्जन करण्यासाठी जो घाट होता, तो महत्वाचा असल्यामुळे तो बनवायचा होता, अशा प्रकारच्या कामांना आम्ही वर्क ऑर्डर दिल्या आहेत.

<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u> ती कामे ५ (२) (२) मध्ये देण्यात आलेली आहेत. परंतु ज्या वर्क ऑर्डर पेडींग आहेत त्यांना आपण परवानगी दिली आहे.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> म्हणजे आपल्या म्हणण्यानुसार आपण ५० वर्क ऑर्डर दिल्या आहेत. मग ५० ठिकाणी घरे पडली आहेत, ५० ठिकाणी अपघात झाला आहे, कुठे घरे पडली होती यांची आपल्याकडे यादी आहे का?

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:—</u> मी फक्त उदाहरण दिले आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> वडोल गावचा पुल बनवणे अतिशय महत्वाचे आहे, ते काम पण आपण करत नाही. तिथे एक मोठी शाळा आहे, ती आपल्यासाठी महत्वाची नाही का? ठेकेदाराकडून पैसे घेतले पाहीजेत.

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:—</u> महोदय, वडोल गावचे जे काम आहे, ते ठेकेदार रामचंदानी साहेबांचे आहे. त्यामध्ये काही टेक्नीकल गोष्टी होत्या.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> कोणत्या टेक्नीकल गोष्टी आहेत ते सांगा.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> आपण ज्याचे नाव घेत आहेत, तर सभागृहामध्ये खुलासा करा. मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, हा विषय एक तर क्लिअर कट आहे, एखादा टेंडर झालेला आहे. जेव्हा आयुक्तांनी मान्यता दिल्या नंतर टेंडर प्रोसेस झाली आहे. मॅन्युअल आणि बाकीच्याना टेंडर न देण्याची आणि प्रक्रिया थांबवण्याची काय गरज होती. त्यांनी जेव्हा सहया केल्या तेव्हा डोळे झाकले होते का? जेव्हा मंजूरी दिली तेव्हा डिपार्टमेंटचे आणि आयुक्तांचे पण डोळे झाकले होते का? सहया करतांना आर्थिक परिस्थिती कळाली नाही का? आर्थिक परिस्थिती तेव्हा सहया करतांना खराब दिसली नाही का? आता हात कापतात तर कशामुळे कापतात. साहेब ही हसण्याची गोष्ट नाही, लक्षात घ्या. उल्हासनगर शहरात सगळयांची कामे आहेत. एकटया सुनिल सुर्वे किंवा मनोज लासीची कामे नाहीत ती? या शहराच्या गरजेच्या हिशोबाने नगरसेवकांनी आपल्याला दिलेला आहे. मा. महापौरजी, आपण यामध्ये आदेश दया, जेवढे पण टेंडर झाले आहेत, मॅन्युअल असो किंवा ई–टेंडरींग असो पंधरा दिवसाच्या आत जनरल बॉडीच्या पहीले, कोणत्याही हालतमध्ये वर्क ऑर्डर व्हायला पाहीजे. आपण सर्वसंमतीने आदेश दया. कारण आता याच्या वरती चर्चा करून काहीच फायदा नाही. त्यांना यामध्ये काहीच समजत येत नाही. ५० च्या वर्क ऑर्डर दिल्या आहेत, फक्त ५० वर्क ऑर्डरच महत्वाच्या होत्या. जर त्यांच्या मनात आले, सुर्वे चांगले आहेत, तर मग सुर्वेची कामे करून दया. बोडारे साहेबांचे करू नका, जमुनादास साहेबांचे करू नका? महापौरांचे करा याचा अर्थ असाच आहे ना?

या वेळी सदस्य, श्री. अजित गुप्ता यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. विजय पाटील:—</u> मा. महापौर मॅडम, चौकशी लावा. ही सात कामे झालीच कशी बाकीची ५० झाली आणि बाकीची का राहीली याची चौकशी लावा आणि ती कामे कुठली आहेत. त्या कामांची यादी दया. प्रशासन जे पाहीजे ते आपल्या मनमानीवर करतो. मग बाकीचे नगरसेवक एवढे निवडून कशासाठी इथे आलेत. लोकांची कामे करण्यासाठी आलेत की कशासाठी आलेत इथे.

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—</u> आपण शहर अभियंता आहेत की कुठल्या एका पॅनलचे शहर अभियंता आहेत ते पण आम्हांला सांगा.

या वेळी सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी सभागृहाच्या बाहेर गेले.

<u>सदस्य, श्री. विजय पाटील:—</u> हा कसला प्रशासनाचा गोंधळ चालला आहे. महापौर मॅडम आपण याची चौकशी लावा.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> महापौर मॅडम याच्यावर एकच.....

<u>सदस्य, श्री. विजय पाटील:—</u> महापौर मॅडम साधे खड्डे बुजवायला सांगितले होते, ती कामे झाली नाहीत तर मग ५० कामे झालीच कशी? चौकशी लावा. काय परिस्थितीमध्ये कामे केली आणि केली असतील तर कुठली कामे आहेत त्यांची यादी दया. सर्व नगरसेवकांना त्याची यादी दया.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> महापौरांच्या आदेशाची अवेहलना केली म्हणून....

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—</u> महापौर मॅडम उद्याच्या महासभेमध्ये यांना यादी देण्यासाठी सांगा.

<u>सदस्य, श्री. विजय पाटील:—</u> म्हणजे असे झाले की, आंधळा दळतो आणि कुत्रा पिठ खातो अशी परिस्थिती झाली.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> सनमाननिय सदस्य, आपण कृपया करून बसून घ्या. जैसवारजी पक्षपात न करता सगळयांचे टेंडर वेळेवर निघाले पाहीजेत. हा माझा तुम्हांला आदेश आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> मॅडम टेंडर झालेले आहेत. मॅन्युअल टेंडर झालेले आहेत, त्यांचे फक्त वर्क ऑर्डर देण्याचे बाकी आहे.

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u> नाही नाही, आता महापौर मॅडमनी आदेश दिलेले आहेत, मॅडम मान्य करणार का?

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> करायलाच पाहीजे ना?

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u> पिठासिन अधिकारी, आयुक्त मॅडम, कंठे मॅडम आहेत त्यांनी आदेश काढायला पाहीजेत. ते मान्य करणार का? उद्या निंबाळकर साहेब बोलणार आम्हांला मान्य नाही.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> आयुक्तांनी आदेश मान्य नाही केला तर हा महासभेचा अपमान आहे.

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u> महापौर, आयुक्तांना आदेश करतील आणि आयुक्तांनी आदेश काढायला पाहीजेत ते टेंडर झाले पाहीजे. उद्या टेंडर काढण्यासाठी वर्क ऑर्डर झाल्या पाहीजेत.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> आपण असे रूलिंग दयावे जे झालेले टेंडर आहेत, त्यांचे तात्काळ वर्क ऑर्डर दया. महापौर मॅडम जे झालेले टेंडर आहेत, त्यांचे तात्काळ वर्क ऑर्डर दया, असे आयुक्तांना आदेश दया.

सदस्य, श्री. अरूण आशान:— जे राहीलेत ते त्यांचे काय करणार.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:— जे राहीलेले आहेत, त्यांच्यासाठीच बोलतो आहे.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— सन्माननिय सदस्य आपण कृपया करून एक एक बोला.

सदस्य, श्री. धनंजय बोडारे:— एक तर जी प्रशासनाकडून उत्तरे येतात ती चुकीचे येतात. भारत गंगोत्रीचे हेच म्हणने आहे की, उत्तरे मिळत नाहीत, मिळाले तर बरोबर मिळत नाहीत. याच्यामध्ये सुनिल सुर्वे यांनी विषय पाठवला आहे की, कोणत्या विभागाने कोणती निविदा काढल्या आहेत आणि त्या निविदांवर काय कामे झाले आहेत. सहाय्यक आयुक्तांचे उत्तर येते निरंक कशाला उत्तरे पाठवतात. या अगोदर पण मी सांगितले होते की, प्रश्न आल्या नंतर आयुक्तांनी सगळया विभागांना या ठिकाणी बोलवून हा संबंधित प्रश्न कोणाशी निगडीत आहे. सहाय्यक आयुक्तांचा प्रश्नच नव्हता, कारण ते निविदा काढत नाहीत. त्यांचेकडे पत्रव्यवहार कशाला करायचे अजित गवारींचे पत्र येते निरंक, अलका पवार, सहाय्यक आयुक्त पत्र येते निरंक पहीला प्रश्न जे सदस्य विचारतात, एप्रिलमध्ये विचारलेले प्रश्नांची उत्तरे आता जुलै मध्ये येतात. म्हणजे ही बॉडी कार्यान्वयीत झाल्या नंतर, त्यावेळचे विचारलेले प्रश्नाचे उत्तर तीन महीन्या नंतर येतात. त्यात प्रशासनाला माहीत नाही की, नक्की उत्तर काय देयाचे. ठिक आहे सार्वजनिक बांधकाम विभागाने उत्तर दिले आहे, मालमत्ता विभागाने एकच उत्तर दिले की, बिले छापण्यासाठी एकच निविदा काढण्यात आली आहे. बाकीच्या पाणी पुरवठा विभागाने निविदा काढल्या नाहीत का? तीन महीन्या नंतर निविदा काढल्याच नाहीत का? सगळया नगरसेवकांचे एकच आहे की, असे लेखी निरवतात. एक आयुक्त येतात, त्यांचा निर्णय वेगळा, ते आयुक्त गेल्या नंतर दुसरे आयुक्त आल्या नंतर त्यांचा निर्णय वेगळा, पुन्हा पुर्वीचे आयुक्त आले त्यांचे निर्णय वेगळे आणि तरी आम्ही मान्य करायचे की, तुमचे प्रशासन व्यवस्थित चालले आहे म्हणून आणि ते तुम्ही ठरवायचे असे प्रशासनाने ठरवायचे निविदा कुठली दयायची, कुठली वर्क ऑर्डर दयायची हे काय आहे. एक आयुक्त बसतात सर्वच्या सर्व शिक्षक बदली, सर्व सफाई कर्मचारी बदली हे काय आहे. ही मनमानी चाललेली आहे. आयुक्त असतील, शहर अभियंता असतील, उप आयुक्त असतील त्यांच्या मनाला वाटेल तसे १० वर्षापासून मालमत्ता विभागाकडून निविदा निघत नाही तरी प्रशासन चालले आहे आणि हे प्रशासनाने ठरवायचे की, वर्क ऑर्डर कुठली दयायची, शेवटी जबाबदारी कोणाची आहे आयुक्तांची आहे, ते आयुक्तांनी पाहीले नाही का? उप आयुक्तांनी पाहीले नाही का? प्रश्नांची उत्तरे आम्ही कशी देतो, असेच प्रश्न पाहीजे ते तुम्ही कोण ठरवणारे आहेत. आम्ही ठरवणार आहे ते, महापौर महोदया जेवढे वर्क ऑर्डर दयायचे टेंडर बाकी आहेत, तेवढे मागच्या बजेट मधल्या निविदा काढल्या आहेत, सन २०१६— २०१७ च्या, सन २०१५—२०१६ च्या सुध्दा बाकी आहेत. त्यामुळे शहराची खस्ता झालेली आहे. तुम्ही चार वर्षा नंतर आता पुढच्या बजेटमध्ये मी सांगेल. परवाच्या मी प्रशासनाला विचारले ३७० तुम्ही मागच्या वर्षी तुम्ही दाखवतात आणि आमची कामे थांबवली आणि या वर्षी तुमचे उत्पन्न ५७२ कोटी झाले कसे काय? ते मी विचारणारच आहे. जर एवढा तुमच्याकडे प्राटेक्शन होता तर मग मागची आमची कामे थांबवली का? ती सर्वच्या सर्व कामे ज्या काही निविदा निघाल्या असतील त्या वर्क ऑर्डर देण्यासाठी बाकी असतील त्या सर्वच्या सर्व देण्यासाठी आदेश दयावे तसे प्रशासनाने करावे. एकच आहे नुसते आदेश काय काढता त्याची अंमलबजावणी सुध्दा झाली पाहीजे. पैसा कुठून आणायचा काय करायचे ते प्रशासनाचे काम आहे. त्यांनी सांगितलेली कामे ५० देवू शकतात मग बाकीच्या नगरसेवकांना महत्वच नाही का?

या वेळी सदस्या, श्रीम. मिनाकौर लबाना यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:— आयुक्त महोदया आपल्याला महापौर जे आदेश देतील त्याची ताबोडतोब अंमलबजावणी झाली पाहीजे. हे संपूर्ण सभागृह एक स्वरात बोलत आहे, कुठलाही विरोध नाही. म्हणून जे काही महापौर आदेश देतील त्याची येत्या पंधरा दिवसात अंमलबजावणी झाली पाहीजे, हे लक्षात ठेवा.

सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:— महापौर मॅडम, मी आज सर्व नगरसेवकांना धन्यवाद देतो की, सगळया नगरसेवकांना आज कोणी तरी हिम्मत केली आहे. आमच्या शहराच्या महापौर आहेत, शहराची सुधारणा करणे आपले आणि सर्वांचे कर्तव्य आहे. त्याच्यासाठीच नागरीकांनी आपल्याला निवडून पाठविले आहे. जे आपल्याला देवाकडून किंवा नागरीकांकडून पद मिळाले आहे. त्या पदाचे योग्य उपयोग करा जे अधिकार आपल्या जवळ आहेत. जरा बोलू दया, नगरसेवक बोलतात तुम्ही महासभेमध्ये झोप काढतात का? नगरसेवकांचे जे अधिकार आहेत ते त्यांना वापरू दया. फक्त आदेश निघेल, सगळयांना नियम आहेत. जर कामांना मान्यता मिळाली असेल तर ते किती दिवसात झाले पाहीजे, किती दिवसात काम व्हायला पाहीजे.

सहा—सहा महीने निविदा उघडल्या जात नाहीत हे काय आहे. जे दोषी अधिकारी आहेत, त्यांच्यावर कारवाई करा. जेव्हा आपल्या मनात येणार हे काम करायचे नाही. बोलतात की साहेबांनी आदेश दिला आहे, कामे करायची नाहीत, हे घराचे राज्य आहे का? लोकांनी अगोदरच एक वर्षाची घर पट्टी भरलेली आहे. अगोदर घर पट्टी भरून सुध्दा त्यांचे काम होणार नाही. मुल्य भरु शकत नाही, रोडवर चालायला भेटत नाही, स्कुटर चालू शकत नाही. महापौरांच्या आदेशाचे पालन करा. नगरसेवकांना त्यांचे अधिकार आहेत ते त्यांना दया, लोकांचे जे अधिकार आहेत, ते अधिकार दया. जे लोक, अधिकारी वर्ग जे नियमाप्रमाणे काम करत नाहीत त्यांना घरी बसवा. कृपया महापौर मॅडम, उप महापौर साहेब, आपण जूने अहात, पहिल्यांदा ण निवडून आलेले नाहीत. आपल्या पदाचा वापर करा आणि लोकांना न्याय दया. जर न्याय मिळाला नाही तर नगरसेवकांना खाली बसायला लावील. आपल्याला लोकांना न्याय दयायचे आहे, सोय दयायची आहे, प्रत्येक सोयी सुविधा मिळाल्या पाहीजेत. जर आपण देत नसाल तरी मी जाऊन खाली बसतो.

**यावेळी सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी हे व्यासपीठासमोरील मोकळया जागेत खाली जमिनीवर बसले.**

<u>आयुक्त स्थानी प्राधिकृत अधिकारी, अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:—</u> मा. महापौर महोदया, सन्माननिय सभागृह आताच आपण सर्व सभागृहाने मा. महापौराच्या आदेशानुसार जे रूलिंग पास केलेले आहे, त्याची प्रशासनाच्या वतीने काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची मी जबाबदारी देते.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> काय रूलिंग पास केले आहे, आम्हांला ऐकु दया की खरे. महापौरांनी रूलिंग दिले आहे का? सन्माननिय महापौर, आयुक्त मॅडम महापौरांनी रूलिंग दिले आहे का?

यावेळी सदस्या श्रीमती ज्योती चैनानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> प्रश्नोत्तरे मध्ये महापौर कधी रूलिंग देतात का? मा. महापौरजी हा जो विषय आहे, सभागृहामध्ये उपस्थित केला आहे. मी सन्माननिय आयुक्त महोदया यांना निवेदन करतो की या विषयावर आपण सभागृहाला खुलासा करण्यात यावा. हा काही ठराव नाही की, महापौर याच्यावर आदेश करतील. आपणच याच्यावर खुलासा करा की, याबाबतीत प्रशासनाला काय करायचे आहे? ही जी इस्टीमेंट थांबली आहे, ती का होत नाही? त्या विषया बदल आपण सभागृहाला अवगत करा. का थांबवली आहे, त्याचे कारण काय आहे? का होत नाही.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> रुलिंग तुम्ही केलीच पाहीजे, तुम्ही एक दिवसाचे आयुक्त होत्या, तेव्हा तुम्ही दहा निर्णय घेतले होते. तसेच इथे तुम्ही पिठासिन अधिकारी, आयुक्त अहात, तुम्ही निर्णय घ्या. जी कामे ई—टेंडर झाले आहेत, त्यांना पंधरा दिवसामध्ये वर्क ऑर्डर देण्यात यावे.

<u>आयुक्त स्थानी प्राधिकृत अधिकारी, अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:—</u> सन्माननिय महपौर महोदया, सन्माननिय सभागृह आपण आता जो विषय चर्चेला घेतला आहे, तो सन २०१५—२०१६, आणि २०१६—२०१७ या आर्थिक वर्षामधील कामांच्या ज्या निविदा झालेल्या आहेत, ज्यांचे टेंडर झालेले आहेत आणि त्यांचे कार्य आदेश दिलेले नाहीत. प्रशासनाच्या वतीने त्याला जी स्थगिती दिली होती, त्याबद्दल सर्व सभागृहाने स्पष्टीकरण मांगितले आहे. सभागृहात मी नम्रपणे विनंती करते की, आपण सांगितल्यानुसार आता वाहन विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग या दोनच विभागांची माहीती सभागृहा समोर आलेली आहे. उद्या आपली दुसरी सभा होणार आहे. त्यानुसार एकंदरीत नुसती आकडेवारी सादर न करता, प्रशासनाने असे निर्णय का घेतले आणि आपली ही आर्थिक परिस्थिती मी संपुर्ण पटलावर ठेवू शकेल. त्यासाठी मी उद्याच्या सभेत २४ तासांची वेळ मागवून घेते.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> ठराव झाला आहे पण मी बोलतो ते सजुन घ्या, तुम्ही जी मान्यता दिलेली आहे. ज्याला तुम्ही सहया केल्या आहेत, होकार दिला आहे, जे टेंडर झाले आहेत. फक्त त्या टेंडरच्या वर्क ऑर्डर दयायच्या आहेत आणि कामे ती सुरू होतील. ज्या वार्डातील प्रत्येक पॅनलमधल्या नगरसेवकांची कामे आहेत. भले जुने असतील किंवा नवे असतील या नव्याच्या निवडून आलेले जे नगरसेवक आहेत त्यांच्या विभागामध्ये कामे होतील. त्या अनुषंगाने आपण डिटेल मागण्या पेक्षा सर्व साधरण किरकोळ आदेश दयायचे आहेत. ते आदेश पारित केले तर मला वाटते की, आपण सभागृहाचे मान ठेवला जाईल. उद्या महासभेची वाट बघण्यापेक्षा जर केले तर उद्या कमित कमी डिटेल आणून मग वर्क ऑर्डर तरी देतील.

<u>आयुक्त स्थानी प्राधिकृत अधिकारी, अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठेः—</u> मा. महापौर महोदया, आणि सर्व सन्माननिय सदस्य, मी आपणास आताच विधीत केले आहे की, माझ्याकडे आता फक्त सार्वजनिक बांधकाम विभागाचीच जी यादी आहे ती उपलब्ध आहे. इतर विभागांच्या यादया उपलब्ध नव्हत्या आणि म्हणून मी सभागृहात तसे सांगितले आहे आणि जरी प्रशासनाने मी असो किंवा निंबाळकर साहेब असोत त्यांनी हा निर्णय का घेतला, तो पटलावर मांडण्यासाठी मी कालावधी मागून घेतलेला आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u> सचिवांकडून तो प्रश्न कुठे जातो.

<u>महापालिका सचिवः—</u> सचिवाकडून बरोबर संबंधित विभागाकडून जातो. आताच तुम्ही थोडया वेळापुर्वी म्हणालात की सहाय्यक आयुक्तांकडे तो प्रश्न कसा गेला. तो आम्ही दिला नाही मा. अतिरिक्त आयुक्त यांनी तो सर्व विभागांना पाठवला आहे. आम्ही फक्त संबंधित विभागाला पाठवतो, तो ज्या विभागाशी सबंधित आहे.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u> तुम्ही म्हणजे फक्त सचिव म्हणून बोलत नाहीत तर महापालिकेचा अधिकार आहे. मला तेच सांगायचे आहे की, प्रशासनाचे ताळमेळ पाहीजे. तो प्रश्न कुठे गेला पाहीजे.

<u>महापालिका सचिवः—</u> साहेब आमच्याकडून तो बरोबर संबंधित विभागाला जातो.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u> नगरसेवकाचे काम नाही की, तो प्रश्न या विभागाला गेला पाहीजे ते प्रशासनाचे काम आहे. मला काय सांगायचे आहे की, एप्रिलमध्ये प्रश्न विचारलेला आहे. प्रशासनाचे प्रमुख म्हणून तुम्ही एकदाही मिटींग घेतली नाही का? पाणी पुरवठा विभागाचे उत्तरे नाहीत, विद्युत विभागाचे उत्तरे नाहीत, ड्रेनेजची उत्तरे नाहीत बरेच विभाग आहेत, या पुढे तरी असे होऊन देवू नका? आयुक्तांनी एकदा तरी महासभेच्या पहीले मिटींग घ्यावी दोन दिवस अगोदर घ्या, त्या प्रश्नांची पुर्तता झाली पाहीजे. उत्तरे समाधानकारक मिळाल्यानंतर ही चर्चा होणार नाही. चर्चा होते प्रश्नात्तरे आणि लक्षवेधीवर कारण की तुमच्याकडून उत्तरे व्यवस्थित मिळत नाही. उत्तरे समाधनकारक मिळाली तर चर्चा होणार नाही.

या वेळी सदस्य, श्री. भगवान भालेराव सभागृहामधून बाहेर गेले.

<u>महापालिका सचिवः—</u> प्रश्नोत्तरेचा तास संपला आहे. लक्षवेधीची सुचना मागील महासभेमध्ये स्विकारली गेली होती. दोन लक्षवेधी सुचना स्विकारल्या गेल्या होत्या. एक आहे, श्री. राजेश वदारिया सुचक आहेत.

<u>विषयः—</u> उल्हासनगरमध्ये १ ते ५ रस्त्यात पडलेले खड्डे दिनांक ७ जुन, २०१७ पुर्वी भरणेबाबत लक्षवेधी सुचना. ती स्विकारली गेली आहे. आणि दुसरी लक्षवेधी आहे उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये १ वर्षापासून नगररचनाकार नसल्यामुळे नागरीकांना होणा—या त्रासाबातची सुचना, सुचकाचे नाव आहे, श्री. शंकर लुंड आणि अनुमोदकाचे नाव आहे, श्रीम. अर्चना करणकाळे. तर पहीली लक्षवेधी आहे, श्री. राजेश वदारिया यांची.

लक्षवेधी सुचना क्र. १ जीचे सुचक आहेत, श्री. राजेश वदारिया व अनुमोदक आहेत, श्री. हरेश जग्यासी लक्षवेधी सुचना या प्रकारची आहे.

---

## <u>लक्षवेधी सूचना क्रमांक १</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया
अनुमोदकाचे नावः— श्री. हरेश जग्यासी

विषयः— उल्हासनगर १ ते ५ मधील रस्त्यांमधील खड्डे पाटोल्सने भरणेबाबतची लक्षवेधी सूचना

उल्हासनगर कॅम्प नं. १ ते ५ मधील रस्त्यांमध्ये पावसाळा सुरू असल्यामुळे जागो—जागी मोठयाप्रमाणात खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे वाहनास व नागरीकांना फार त्रास सहन करावा लागत आहे. खड्डयामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आता सद्या गणपती उत्सव सुरू होणाार आहे. तसेच त्यानंतर चालिया साहीब उत्सव साजरा होणार असल्याने, या उत्सवाच्यावेळी उल्हासनगर शहरातील भाविक नागरीकांची दर्शनासाठी मोठया प्रमाणात गर्दी असते. या खड्डयामुळे नागरीकांची अतोनात हाल होत असतात. त्यामुळे नागरीकांच्या भावना दुखवल्या जातात. याकरिता सदर उत्सवाच्या अगोदर खड्डे पाटोल्सने भरणे आवश्यक आहे.

तरी उल्हासनगर शहरातील रस्त्यांमधील खड्डे पाटोल्सने भरणे करिता येत्या विशेष महासभेत चर्चा होवून निर्णय होणेस विनंती आहे.

---

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u> मा. महापौरजी, आज मला खुप दु:खाने सांगायला लागत आहे की, उल्हासनगरच्या कोणत्याही मुख्य रस्त्यांवर कुठे पण जा, उल्हानगर १ ते ५ नंबर पर्यंत कोणत्याही रस्त्याने चालत जा आपल्याला कोणताही रस्ता खड्डेमुक्त असा मिळणार नाही. हे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्य आहे की, प्रत्येक वर्षी पाऊस पडत असतो आणि प्रत्येक वर्षी रस्त्यांमध्ये खड्डे होतातच. तर याची कोणतीही पुर्व तयारी केली जात नाही. कधी पावसाळया पुर्वी एस्टीमेंट बनवून टेंडर काढला जात नाही आणि पावसाळयात जेव्हा खड्डे पडतात, तेव्हा नगरसेवक महासभेमध्ये हा मुद्दा उचलतात त्यावेळी शहर अभियंता उत्तर देतात की, आम्ही आता टेंडर काढत आहे, आम्ही आता एस्टीमेंट बनवत आहे. पाऊस प्रत्येक वर्षी येतोच असतो आणि प्रत्येक वर्षी खड्डे पडतच असतात. त्यावेळी दुसरा रस्ता न दाखवता हाच मुद्दा स्थायी समिती सभागृहामध्ये घेऊन येणार की, ५ (२) (२) मध्ये या चार कंपनीला ऑर्डर दया. ही नेहमीचीच पध्दत चालली आहे ५ (२) (२) मध्ये जाण्याची. आपले काम आहे एप्रिल महीन्यात निविदा काढणे आणि मे महिन्यात निविदा प्रक्रिया पुर्ण करून रस्त्यांमध्ये जिथे जिथे खड्डे पडले आहेत ते भरून काढणे. आता पुढे येणा—या चालिया साहेब उत्सव आणि गणपती उत्सव बघता हे जे खड्डे आहेत ते लवकरात लवकर भरण्यात यावेत.

 या वेळी सदस्य, श्री. राजेश वदारिया हे सभागृहातून बाहेर गेले.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त महोदया, राजेश वदारिया यांनी जी लक्षवधी प्रस्तुत केलेली आहे. याच्या पहीले पण याच सभागृहामध्ये काही मिनिट पहीले प्रश्नोत्तरवर जी चर्चा झाली ती सार्वजनिक बांधकाम विभागावर जास्त चर्चा झाली, एस्टीमेंट थांबलेले आहे, त्यामुळे लोकांची कामे होत नाहीत. सन १९९६ मध्ये जेव्हा ही महापालिका झाली आणि आम्ही या सभागृहामध्ये प्रथमच नगरसेवक म्हणून निवडून आलो. त्यावेळेस नगरपालिकेमध्ये सर्वात चांगला विभाग म्हणून सार्वजनिक बांधकाम विभाग म्हणून मानला जात होता. तिथे योग्य पध्दतीने काम चालत होते, इंजिनियर होते, सर्व अधिकारी होते. परंतु आज महानगरपालिकेत सर्वात काहीही कामे न करणारा विभाग घोषित करावे लागेल, तर सार्वजनिक बांधकाम विभागाला घोषित करावे लागेल.

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—</u> शेम, शेम, शेम.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> आम्हांला दु:खाने सांगावेसे वाटते की, शहर अभियंता असेल किंवा इंजिनियर असतील जेव्हा एस्टिमेंट बनवतात आणि स्वत: सही करतात, मा. आयुक्त साहेबांची मंजुरी मिळते, टेंडर पण काढले जाते, हे सर्व झाल्यानंतर सुध्दा आम्हां नगरसेवकांना वर्क ऑर्डर मिळत नाही. दोन—दोन वर्षाचे बजेट, नगरसेवक निधी, महापौर निधी, उप महापौर निधी, स्थायी समिती निधी अशा प्रकारे पडून आहेत. हा जो विषय घेतला आहे, नेहमीच मार्च व एप्रिलच्या पहीले पाटोलचे कामे झाली पाहीजेत आणि त्यांचे टेंडर निघाले पाहीजेत, जुनच्या पहीले ती कामे पुर्ण व्हायला पाहीजेत. परंतु काही वर्षापासून मी बघत आलो आहे की, मागच्या काही वर्षापासून या विषयावर परत परत महासभेमध्ये सांगितल्या नंतरही एखादया एजेन्सीमार्फत सार्वजनिक बांधकाम विभाग गणपतीच्या उत्सवाच्या १० दिवस पहीले असे टेंडर बनवतात आणि त्याला ५ (२) (२) मध्ये करण्यासाठी आम्हांला करायला लावतात. कारण आता श्रावण महीना सुरू होत आहे, आणि चालिया साहेब उत्सव सुरू होत आहे. लोक अंबरनाथ तीर्थस्थळ आहे, चालिया साहेब तीर्थस्थळ आहे, तीथे जातील आणि आता आपला गणपती उत्सव सुरू होणार आहे. गणपती मुर्तीची स्थापना करतील आणि खड्डयातून देवाच्या मुर्तीला घेऊन जावे लागेल. परंतु काही वेळेस बोलण्या नंतरही आमचे शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी या विषयाकडे लक्ष देत नाहीत. मला असे वाटते की, एखादी कंपनी त्यांच्या बरोबर असून त्यांचे संगनमत आहे. याच्यासाठी ५ (२) (२) मध्ये डायरेक्ट ऑर्डर मिळायला पाहीजे आणि टेंडर बनवायला लागणार नाही, आमचे मा. मंख्यमंत्रीजी छोटया छोटया कामांसाठी सर्व

महानगरपालिकांना ई – निविदा करण्यासाठी सांगितले आहे. तरी सुध्दा आपल्याला लाखोची, करोडोची कामे ५ (२) (२) मध्ये दयायला लागतात. ही जबाबदारी आमचे शहर अभियंता यांना व्यवस्थित सांभाळता येत नाही. त्यामुळे त्यांना इथे ठेवणे योग्य वाटत नाही. आम्ही शहरासाठी या महासभेमध्ये निवडून आलो आहे. आमचे अधिकारी प्रमोशन घेऊन इथे येतात आणि इथे आल्यावर आपली मनमानी करतात. या लोकांवर सुध्दा कारवाई करणे अतिआवाश्यक आहे. मी राजेश वदारिया यांना धन्यवाद देतो की, त्यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून हा विषय आणला आहे. आता पावसाळयाचे दिवस आहेत, त्यामुळे आपण डांबरीकरणाचे काम करू शकत नाहीत. परंतु त्याची एस्टिमेंट लवकरात लवकर बनायला पाहीजे आणि ई– टेंडरींग सुध्दा व्हायला पाहीजे. गणपती उत्सवाच्या पहीले आपण परत ५ (२) (२) चे कारण न सांगता, ई – टेंडरींगद्वारे आमचे जी कामे आहेत, डांबरीकरण करून सर्व खड्डे भरण्यात यावेत आणि लोकांना सुविधा देण्यात यावी, धन्यवाद.

सदस्य, श्री. विजय पाटीलः– महापौर मॅडम, गणपती उत्सवा पर्यंत आपण सात दिवस थांबलो तर दोन–चार जण वरती खाली होऊन जातील. एवढे मोठ मोठे खड्डे आहेत की, महापौर मॅडम मी सांगतो की, आपण उद्या सकाळी माझ्या वार्डामध्ये येऊन बघा आणि किती वेळेत हे करायला पाहीजे. तिथे आपण एक दिवस पण थांबणार नाही. आश्रम मध्ये जाण्यासाठी म्हता–या माणसांना व्यवस्थित रस्ता नाही, बिचारे गरीब लोक, म्हातारी माणसे त्यांना जाण्यासाठी माझ्या वार्डामध्य रस्ता नाही. आपण बोलणार सात दिवस थांबा तर इथे दोन चार लोक वरती निघून जातील. जर अपघात झाला तर त्याला जबाबदार कोण राहील. प्रशासन किंवा कोण राहील याला जबाबदार.

या वेळी सदस्य, श्री. राजेश वदारिया यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

सदस्य, श्री. भारत राजवानीः– मा. महापौर मॅडम आता काही दिवसामध्ये चालिया उत्सव सुरू होत आहे. तर आपण त्यांना आदेश दया की, दोन दिवसात काम चालू होणार असेल, तेच काम उद्या चालू करा.

सदस्या, श्रीम. शुभागिनी बहेनवालः– राजेशजीनी लक्षवेधीद्वारा रस्त्याबाबत जो मुद्दा प्रस्तुत केला तो एकदम बरोबर आहे. परंतु जेव्हा आपण रोड बनवतो, त्याचे टेंडर दिले जाते आणि लगेच खराब होतात. अशा ठेकेदारांना आपण काळया यादीत टाकत का नाही? जर रस्ते खराब बनवत असेल तर आपण संबंधित ठेकेदाराला काळया यादीत टाकले पाहीजे आणि दुस–यांदा निविदा काढल्या नंतर परत त्यालाच टेंडर का देतात? मला वाटते की, आणि सर्व नगरसेवकांना सुध्दा असेच वाटते की, अशा ठेकेदाराला पुन्हा टेंडर का देण्यात येतो, त्यामुळे अशा ठेकेदाराला रद्द करण्यात यावे आणि त्याला टेंडर देण्यात येऊ नये.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः– मा. महापौर मॅडम, उप महापौर, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, मी फक्त शहर अभियंता यांना विचारतो की, शहरामध्ये जे चार, पाच मुख्य रस्ते आहेत, त्यांची दुर्दशा बघा. डॉलफिन रोड पासून शांतीनगर पर्यत जो रस्ता जातो, आपण जर तेथून गेलात तर आपल्याला समजेल की किती मोठ मोठे खड्डे पडलेले आहेत. त्यांचा आपण लहान मुलांसाठी छोटे छोटे तरणतलाव बनवू शकतो. पावसाळयाचे दिवस आहेत, त्यामुळे आपण रोड बनवू शकत नाही. परंतु मुलांसाठी तरणतलाव बनवा, कमीत कमी गरीब मुलांना मोफत पोहण्यासाठी मिळेल. मी शहर अभियंता यांना धन्यवाद देतो की, खर्च न करता आपल्या शहराला तरणतलाव बनवून दिले आहेत, धन्यवाद मोहदय आपले मी आभारी आहे. दुसरा रोड आहे, काजल पेट्रोलपंपा पासून हिराघाट पर्यंत. या रस्त्याची पण दैनिय अवस्था झाली आहे. माझी बहीण बेहनवाल यांच जो वार्ड आहे, तिथे पण मोठ मोठे रस्ते आहेत. ते खड्डे बघितल्या नंतर असे वाटते तिथे आपण मच्छि पालन करू शकतो. ते काम जर आपण केले तर कमीत कमी श्रावण महिन्या नंतर लोकांना ताजे मासे खाण्यासाठी मिळतील.

सदस्या, श्रीम. शुभागिनी बहेनवालः– प्रदिपजी आपण बरोबर सांगितले आहे, त्या बदल धन्यवाद. मासे पकडण्यासाठी तुम्ही सुध्दा आले पाहीजेत आणि सर्व नगरसेवकांनी पण यायला पाहीजे. काय करणार प्रशासन एकतच नाही किती पण पत्र दया नाही तर काहीही करा. कामे करणे त्यांना आवडत नाही.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः– तिसरा जो रोड आहे, छत्रपती शाहू जो उडान पुल आहे, जो चार नंबर आणि तीन नंबरला जोडला जातो. त्या रस्त्याची पण हालत खराब आहे आणि अशा प्रकारे छोटे छोटे रस्ते जे पाच नंबरमध्ये मच्छि मार्केट आहे, मी आज पेपरमध्ये वाचले होते की, आपण चार लाखाचे प्रत्येक प्रभागमध्ये एक

एक लाखांचे टेंडर काढण्यात आले आहे. संपुर्ण शहराचे खड्डे भरण्यासाठी, मी सांगतो की, माझी ही गोष्ट खरी आहे जे आपण एक एक लाखाचे टेंडर याच्यासाठी काढले आहेत की बाकी रस्त्यांचे तरणतलाव आणि मच्छि पकडण्यासाठी तिथे स्पॉट बनवणार आहेत. त्यासाठीच तर एक एक लाखाचे टेंडर काढले आहेत. एक लाख रूपयांमध्ये काय होते. आपण मला याचे उत्तर दया की, एक लाखामध्ये संपुर्ण शहराचे खड्डे कसे भरणार आहेत. मला जरा त्याची कॉन्टीटी सांगा आणि खड्डयांचे आकार सांगा, आपल्याकडे काही सुचना असतील. किती खड्डे संपुर्ण शहराचे भरणार आहेत, याचे मला उत्तर दया.

या वेळी सदस्य, श्री. भगवान भालेराव यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> मा. महापौरजी, आयुक्त साहेब, उल्हासनगर महानगरपालिकेच्या काही रस्त्यांची नावे घेतली आणि त्यांना सांगितला हा रस्ता खराब आहे, तो रस्ता खराब आहे. इथे बसलेले सर्व नगरसेवक आपल्याला सांगतील की, सगळेच रस्ते उल्हासनगर शहराचे खराब आहेत. कल्याण — अंबरनाथ रस्ता बघा दोन वर्षा पुर्वीच रस्त्याचे रूंदीकरण केले. त्या रस्त्याची परिस्थिती काय आहे. आपण जाऊन बघा या महापालिकेचे आयुक्त असतील, अधिकारी असतील, शहर अभियंता असतील त्यांना या शहरामध्ये काम करण्याची आवड आहे, असे वाटत नाही. जे कोणी येतात आणि फुकटचा पगार घेतो आणि निघून जातो. सकाळी येतो, दुपारचा डब्बा खातो आणि संध्याकाळी निघून जातो. असे जर अधिकारी असतील तर या शहराचा काहीच विकास होणार नाही. आपल्या सर्वांना माहीत आहे की, उल्हासनगर महानगरपालिकेला शासनाकडून निधी आला. एक रस्ता आपण बघितला महानगरपालिका ते शहाड या रस्त्याचे चार वर्षा पासून काम चालू आहे. रस्त्याचे काम पुर्ण होत नाही. परंतु रस्त्याचे काम चालू असतांना त्या शहर अभियंत्याची किंवा त्या अधिका—यांची जबाबदारी नाही का? बाजूला जी वाहने जाणार आहेत, तो रस्ता तरी बरोबर असला पाहीजे. आता तिथे वाहने जात नाहीत, वाहने पलटी होतात. मोठयाय गाडया, रिक्षा पलटी होतात. ते काम कोणी करायचे नगरसेवकांनी करायचे का महापौरांनी करायचे, ही कामे जर अधिकारी करणार नसतील एखादया बाजूला रस्त्याचे काम चालू आहे तर दुस—या बाजूला येण्या—जाण्यासाठी रस्ता चांगला असला पाहीजे. ही आपली प्रशासनाची भुमिका असली पाहीजे. परंतु रस्त्याचे काम चालू आहे आणि त्या रस्त्याच्या दुस—या बाजूला वाहने नीट जाऊ शकत नाही. आपले आयुक्त साहेब रोज महानगरपालिका टू सेन्च्युरी हाऊस या पर्यत जाऊन येतात. मला या गोष्टीचे नवल वाटते की, त्यांना पण तो रस्ता दिसत नाही का? तिथून आपण जाऊन बघा आपली गाडी जाते का? मोठया गाडया तर अजिबात जाऊ शकत नाही. जर या शहराची अशी परिस्थिती असेल तर त्याला महापौर म्हणून आणि भारतीय जनता पार्टी सत्ताधारी म्हणून आपण जबाबदार अहात, आपण जबाबदारी स्विकारा आणि या रस्त्याची कामे लवकरात लवकर करा. आपल्याला करता येत नसतील तर आम्ही आमच्या पध्दतीने करायला प्रशासनाला भाग पाडू, एवढे या प्रसंगी मी आपल्याला सांगतो आणि सुचना करतो धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:—</u> मा. महापौरजी, शहर अभियंता नेक्स्ट कमिशनर असतात, काही वर्षा पुर्वी इरीगेशन डिपार्टपमेंटवाले आयुक्त साहेबावर केस करण्यासाठी आले होते, तेव्हा आयुक्त साहेब हजर नव्हते तेव्हा त्यांनी विचाले की नेक्स्ट कमिशनर कोण आहे. बोलेले की शहर अभियंता, त्यांच्यावर केस करायला गेले होते. तर आपण नेक्स्ट कमिशनर आहेत, शहर अभियंता म्हणजे नेक्स्ट कमिशनर त्यांचा पगार आयुक्तांच्या पगारा एवढा असतो. तर मग आपण आपली जबाबदारी झटकुन टाकू शकत नाही. मला ऑर्डर नाही, हे नाही आपण पहीले नगरसेवकांना खराब केले आहे. सर्व नगरसेवकांनी पत्र दिले आहेत, त्याच्या नंतर इस्टीमेंट पास केले. त्यांना वाटले की कामे होतील ४५० टेंडर निघाले, आणि स्थायी समिती सभेमध्ये पास सुध्दा झाले. वर्क ऑर्डर घेण्यासाठी केदाराने अनामत रक्कम पण भरली, आणि त्याच्या नंतर वर्क ऑर्डर थांबवली गेली. जसे ही लक्षवेधी आणली होती तशीच रस्ते पण खराब झाले आहेत. जे आमचे नगरसेवक विजय पाटीलने सांगितले आहे. रस्त्यांचे खड्डे भरलेले नाहीत आणि जे सिमेंटचे रस्ते बनवलेले आहेत, ते जागो जागी खोदलेले आहेत. ते परत भरण्यासाठी कोणी तयार नाहीत. तर हे महानगरपालिकेचे काय धोरण आहे. मी सांगतो की सन्माननिय सदस्य जेवढे पण बसलेले आहेत, सर्वांना माहीत आहे की, १० करोड रूपये महानगरपालिकेकडून प्रत्येक वर्षी रस्त्याचे खड्डे भरण्यासाठी खर्च होतात. त्याच्या नंतर तो खड्डा भरला जातो आणि काही दिवसानंतर परत खड्डा होतो. त्यापेक्षा प्रत्येक वर्षी दोन, तीन करून शहरातील रस्ते सिमेंटने . जर प्रत्येक वर्षी बनवले जावेत. त्यामुळे ४०,५० वर्षे रोड खराब होणार नाही. परंतु आपल्या इथे प्रत्येक वर्षी रस्ते खराब होतात. कारण की यामध्ये ऑईल टाकले जाते, डांबर टाकले जात नाही. त्यामुळे रस्ता बनवल्या नंतर काही दिवसात परत खड्डे पडतात. याची जबाबदारी कोणीही सांभळत नाही, तरी कृपया करून पहील्या नगरसेवकांना दोन दोन वर्षे ऑर्डर दिले नाहीत. त्यामुळे काही नगरसेवक निवडणूक हारले. त्यासाठी या पाच वर्षामध्ये कामे झाली पाहीजेत आणि चौधरी साहेबांनी सांगितले की, ही जबाबदारी शहर

अभियंता, आयुक्त साहेब आणि भारतीय जनता पार्टीने घ्यायला पाहीजे. ती जबाबदारी आम्ही घेणार नाही, कारण की आम्ही दोन महीने झाले सत्तामध्ये आले आहोत. चौधरी साहेब, आबा मी कोणत्याही पक्षाला दोष देत नाही, ही सर्व सभागृहाची जबाबदारी आहे. जर शहराचा विकास होणार नाही तर आम्ही दुसरी कामे यांची कोणतीही पास करणार नाही. आजच असा संकल्प करा आणि जो बजेट आहे, त्यामध्ये रोडचे काम येईल आणि प्रत्येक नगरसेवकाला ५० लाख किंवा १ करोड फंड प्रत्येक वर्षाला मिळायला पाहीजे. कारण की डांबरच्या रस्त्यापासून मुक्ताता मिळेल, धन्यवाद.

यावेळी सदस्या श्रीमती रेखा ठाकुर यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानीः—** मा. महापौरजी, मी पहील्यांदा माफी मांगतो, नगरसवेक या नात्याने आम्ही मा. महासभेमध्ये बसलो आहे. नागरीकांना जो काही त्रास होतो, काही समस्या असतील त्या महासभेमध्ये मांडणे आमचे कर्तव्य समजतो आणि जेव्हा या समस्या सुटत नाहीत, तेव्हा आम्हांला सभागृहामध्ये उभे रहावे लागते. कारण लोकांच्या समस्या आपल्या समोर ठेवणे आवश्यक आहे. महापौरांचे आदेश, उप महापौरांचे आदेश काम करू शकतात. सन २०१५ मध्ये मनोहर हिरे साहेब आले होते. त्यांनी एक रोड बनवण्यासाठी आदेश काढला होता. मराठीमध्ये लिहीलेला आदेश सर्व अधिका—यांना वाचले आणि त्या आदेशावर सही केली. आता पर्यंत तो रोड तयार झाला नाही. अधिकारी वर्गाने ज्यांनी पण सही केली असेल, मी हा विषय महासभेमध्ये दहा वेळा बोललो आहे. महापौर साहेबा, आपल्याला लोकांची कामे करायची नसतील तर आम्ही तोंडाला पट्टी बांधून यायचे आणि गप्प बसावे का? दहा वेळा बोलल्या आज आदेश काढला आहे, त्यावर सर्व अधिका—यांची सही आहे. सन २०१५ या वर्षाचे काम का झाले नाही, पहीले याचा निर्णय व्हायला पाहीजे. पुढे सुध्दा भविष्यात अधिकारी वर्ग आपल्या कर्तव्याचे पालन करतील, एक शहर अभियंता बनले होते, त्यांचे नाव होते श्री. मुकेश आयलानी, काही काळासाठी त्यांना शहर अभियंता बनवले होते. त्यांनी असे आदेश काढले होते की, मुकादम किती वाजता येतात. त्यांची लेट मस्टरवर नोंद करा, किती वाजता आले होते आणि इंजिनियर किती वाजता येतात, एक वेळा येतात, दोन वेळा येतात, पंधरा दिवसातून बसतात आणि लिखापढी करतात. उप अभियंता कधी आले, शहर अभियंता कधी आले, त्यावेळी सर्व अधिकारी/कर्मचारी गांगरून गेले होते. आताचे जे शहर अभियंता आहेत त्यांना माझी विनंती आहे की, जर शहराला सुधारायचे असेल आणि चांगले काम करायचे असेल तर कृपया करून आपल्या कर्तव्याचे पालन करा. महापौर साहेबा, अशा अधिका—यांना कृपया आदेश दया की, अजून हे काम का झाले नाही. नगरसेवकांनी परत परत का बोलावे, तेथील नागरीकांनी आवाज का करावा, आपल्यांना सुध्दा माझ्या वार्डाचे लोक भेटले होते. आपण रिझेन्सी हॉलमध्ये व्यापा—यांची जेव्हा एक मिटींग घेतली होती, तेव्हा आमच्या वार्डमधले लोक आपल्याला भेटले होते. त्यांनी आपल्याला एक पत्र पण दिले होते आणि आदेशची एक प्रत सुध्दा पत्रा बरोबर जोडली होती. तरी कृपया करून आपण आपल्या अधिकाराचा वापर करून या अधिका—यांला निलंबित तर करा, धन्यवाद.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब, काही महीने आमचे आमदार, डॉ. बालाजी किणीकर यांनी माझ्या वार्डसाठी फंड दिला होता. टेंडर नंबर ६७४ आहे. शहर अभियंता साहेब, मी तुमच्या बरोबर बोलत आहे. आयुक्त साहेब, शहर अभियंता यांना माझा एक प्रश्न आहे. ६७४ टेंडरसाठी आम्हांला जो आमदार साहेब फंड देतात, शहर अभियंता साहेब इकडे तिकडे फिरू नका. ६७४ जो टेंडर नंबर आहे, महापौर मॅडम आपण लक्ष दया, त्या टेंडरसाठी महापलिका पैसे भरत नाही, आमदार आपला फंड देतात. आपल्या प्रभागामध्ये काम करण्यासाठी, आमच्या प्रभागमध्ये ६७४ साठी जो फंड बालाजी किणीकर यांनी दिला आहे. तो टेंडर एक वर्षापासून तसाच ठेवला आहे, त्याचे कारण काय? तो आमदार निधी आपण थांबवू शकता का?

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजीः—** अभियंताजी कृपया करून उत्तर दया.

**सदस्य, श्री. शंकर लुंडः—** त्याला वर्क ऑर्डर का दिली नाही, तो टेंडर थांबवणे आयुक्त साहेबांना अधिकार आहे का? आमदार निधीला थांबविण आपल्याला अधिकार आहे का? सांगा. आमदार निधीचा एक वर्षापासून ऑर्डर का दिली नाही? ते सांगा. आपल्या अधिकारात नाही तर आपण थांबवून का ठेवला आहे.

**शहर अभियंता, श्री. राम जैसवारः—** आपण नंबर सांगा साहेब, तो टेंडर कोणता आहे.

सदस्य, श्री. शंकर लुंडः— ६७४ टेंडर नंबर आहे. बालाजी किणीकर साहेबांनी आम्हांला काम करण्यासाठी दिला आहे.

शहर अभियंता, श्री. राम जैसवारः— ठिक आहे, डिटेल मागवून सांगतो.

सदस्य, श्री. शंकर लुंडः— ठिक आहे नाही, एक वर्षासाठी का थांबविले आहे.

या वेळी उप महापौर, श्री. जीवन इदनानी सभागृहातून बाहेर गेले.

सदस्या, श्रीम. मिना सोनेजीः— असे तुम्ही थांबवू शकता का?

सदस्य, श्री. विजय पाटीलः— ठिक आहे म्हणजे उत्तर दया ना, ठिक आहे म्हणजे तुमचे काम झाले का?

शहर अभियंता, श्री. राम जैसवारः— सर फाईल मागवून घेतो.

या वेळी सदस्या, श्रीम. ज्योती चैनानी या सभागृहातून बाहेर गेल्या.

सदस्य, श्री. विजय पाटीलः— एक वर्षे का थांबवला आहे, प्रश्न विचारला तर तुम्ही म्हणतात ठिक आहे.

सदस्या, श्रीम. मिना सोनेजीः— ठिक आहे, म्हणजे काय?

सदस्य, श्री. विजय पाटीलः— ठिक आहे म्हणजे आपण हॉटेलमध्ये चहा पिण्यासाठी बसले आहेत का? ठिक आहे म्हणजे काय, आयुक्त साहेब, महापौर मॅडम, असे उत्तर तुम्ही देऊ शकतात का? इजिनियर असे उत्तर देतात ठिक आहे, ठिक आहे म्हणजे काय?

आयुक्त स्थानी प्राधिकृत अधिकारी, अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठेः— मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्य, आपण नंबर सांगितल्या नंतर संचिका मागवत आहेत ते, संचिका बघून तुम्हांला ते सांगतील.

सदस्य, श्री. शंकर लुंडः— माझा प्रश्न असा आहे, मॅडम, जर आमदार निधी देत आहेत, तर तो आपण एक वर्षासाठी थांबवू शकतात का?

आयुक्त स्थानी प्राधिकृत अधिकारी, अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठेः— नाही.

सदस्य, श्री. शंकर लुंडः— आयुक्त साहेबांनी असे लिहून दिले आहे का आमदार बालाजी किणीकर यांनी दिलेला फंड थांबवा. तर मग का थांबवला आहे, एक वर्षे झाला आहे.

शहर अभियंता, श्री. राम जैसवारः— महोदय, आम्ही थांबवू शकत नाही, मी फाईल मागविली आहे.

सदस्य, श्री. शंकर लुंडः— थांबवला का आहे, आताच्या आता फाईल मागवा.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः— शहर अभियंता साहेब, आपल्याला माहीत असेल की, जे खड्डयांचे टेंडर असतात, आपण जर शेजारची महानगरपालिका बघितली त्यांच्याकडे असे असते, कल्याण महानगरपालिकेचे पावसाळयापुर्वी, पावसाळया दरम्यान आणि पावसाळया नंतर खड्डे बुजवण्यासाठी टेंडर निघतो. आपण तसा टेंडर पावसाळयापुर्वी का काढला आहे. म्हणजे कसे असते, पावसाळयापुर्वी जेवढे शहरामध्ये रस्त्यांचे खड्डे असतात. ते आपण भरून टाकतो. त्याच्या नंतर पावसाच्या दरम्यान पण भरतो आणि पावसाच्या नंतरही भरतो. पण तुम्ही मला एक सांगा, आपण ते खड्डे बुजवण्याचे काम पावसाळयापुर्वी का काढले नाही, याचे उत्तर दया.

शहर अभियंता, श्री. राम जैसवारः— सन्माननिय सदस्य, आपण पावसाळयापुर्वी जे आपण खड्डे भरतो, डांबराने भरतो, खडीने भरतो, या बाबतीत आपण सर्व सदस्यांनी, म्हणजे पावसाळयापुर्वी, पावसाळया नंतर

आपण डांबराने भरतो, खडीने भरतो या बाबतीत आपण प्रश्न विचारला आहे. या बाबतीत मी सादर करतो की, रस्त्यांच्या खड्डयांचे काम आपण या पुर्वी भरायला पाहीजे, पण आपल्याकडून झाले नाही. आमचे सर्व अभियंता पनवेल महानगरपालिकेच्या निवडणूकीसाठी गेले होते आणि आमच्याकडे फक्त चारच अभियंता आहेत. काही सन्माननिय सदस्यांनी सांगितले की, ज्या वेळी महानगरपालिका झाली तेव्हा खुप चांगले कामे होत होती. त्यावेळी माझ्या माहीती प्रमाणे १७ ते १८ अभियंता या विभागात कार्यरत होते. आजची सद्याची परिस्थिती अशी आहे की, आपल्याकडे फक्त चारच इंजिनियर आहेत. त्या चार इंजिनियरकडून आम्ही काम करून घेतो. माझी ही विनंती आहे की, आम्हांला इंजिनियर मागवून दयावेत. दुसरी गोष्ट तुम्ही सांगितले की खड्डयांचे टेंडर झाले नाहीत, त्या बाबतीत आमचे सर्व इंजिनियर निवडणूकीसाठी गेले होते. आल्या नंतर त्यांनी आता प्राकलन तयार केलेले आहेत. सर्व रस्त्यांचे अंदाजपत्रक तयार आहेत. ती मंजूरी एक दोन दिवसात मिळेल आणि आम्ही टेंडर प्रक्रिया करणार आहेत. सन्माननिय सदस्यांनी अजून एक विचारले होते की, आम्ही ५ (२) (२) मध्ये टेंडर करतो. मी आल्यापासून रस्त्यांचे कुठलेही टेंडर ५ (२) (२) मध्ये केले नाहीत. आम्ही फक्त गणपती विसर्जणाचे काम होते ते इमरजेन्सी आयडीया कंपनीकडे करायचे होते. ते दहा दिवसामध्ये गणपतीच्या पिरीअडमध्ये करायचे होते आणि आपले बरेचशे सन्माननिय सदस्य येऊन आम्हांला सांगितले की हे काम करायचे आहे, म्हणून केले. आम्ही आमच्यायाने ५ (२) (२) मध्ये करत नाहीत. या पुढे मी सांगतो की, ५ (२) (२) मध्ये आम्ही कधीही करायचे आग्रह करत नाही. या पुढेही मी तुम्हांला ग्वाही देतो ५ (२) (२) मध्ये आपण जो पर्यंत कोणी सांगणार नाही आणि महासभेची मंजुरी ५ (२) (२) मध्ये होणार नाही, तो पर्यंत कुठलेही काम करणार नाही. आपण असे म्हणतो की जे सरकारचे धोरण आहे, आम्ही प्रत्येकी काम ई–निविदानेच करतो सध्या आम्ही असे ठरवले आहे की, ई–टेंडरींगनेच करणार कधी कुठली इमरजन्सी आली तर आपण मंजुरी दिल्या नंतरच करणार. दुसरी गोष्ट आपण डॉलफिन रस्त्याच्या बाबतीत आहे, डॉलफिन रस्त्याच्या बाबतीत जो सन्माननिय सदस्य आहेत, ते आमच्या संबंधित शहर अभियंताकडे आले होते. उप आयुक्त होते त्यांना टेंडर बनवायला वेळ लागणार होता, त्यामुळे आम्ही इमरजेन्सीमध्ये एक ३ लाखाचे टेंडर केले आहे. त्याची टेंडर प्रक्रिया चालू आहे. टेंडर झाल्या नंतर हे पण काम लवकरच सुरू होईल. तो डॉलफिन रस्ता आम्ही खडी भरून बनवणार आहे, आपल्याला माहीत असेल. दुसरी गोष्ट आपण सांगितले आहे की, आम्ही एक एक लाखाचे टेंडर काढले आहेत. आमच्या विभागाला माहीत होते की, हे जे टेंडर आम्ही बनवणार आहेत हे ४ कोटी, ४५० कोटीचे होणार आहे. त्यामध्ये आम्ही खडीने रस्ता बनवणार आहे आणि पावसाळया नंतर डांबरीकरणाचे काम करणार आहे. ते टेंडर मोठे आहे, त्यामुळे आम्ही ५ (२) (२) मध्ये बनवणार नाही, त्याचे एक दोन दिवसात टेंडर काढणार आहेत. ५ (२) (२) मध्ये आम्ही देणार नाही, हे आपण सगळयांना सांगायचे आहे. दुसरी गोष्ट आहे की जे अजून रस्ते आहेत, आमचे उल्हासनगर महानगरपालिकेचे मा. महापौर मॅडमच्या आदेशानुसार आणि बरेच सन्माननिय सदस्य यांनी १८ कामांची यादी बनवून पाठवली होती. त्या सर्व १८ कामांचे आम्ही अंदाजपत्रक तयार करून एम.एम.आर.डी.ए. कडे पाठवले आहे आणि ते लवकरात लवकर मंजुरी होऊन ती कामे सुध्दा सुरू होणार आहेत. त्या पैकी आमच्या उल्हासनगरमध्ये २३.७५ करोडची कामे मंजुर झालेली आहेत. आपल्याला सगळयांना माहीत आहेत. त्यामध्ये आम्ही २० करोडच्या कामांसाठी वर्क ऑर्डर देण्यात आली आहे. त्यामध्ये शहराचे चार मुख्य रस्ते आहेत. आपणाला सगळयांना माहीत असेल आणि ३.७५ चे जे एक एक लाखाचे ७५ चे जे आहेत, ते पण चार कामे आहेत. असे आम्ही ४० कामांचे आम्ही नियोजन केले आहे, असे नाही की, आम्ही नियोजन केले नाही. तर या गोष्टीला थोडा वेळ लागेल आणि हे होईल आणि मी पण या कामांसाठी कटीबध्द आहे. आम्ही चांगल्या प्रकारे काम करू. परंतु माझी विनंती आहे की, आम्हांला कर्मचारी वर्ग पाहीजे. चार कर्मचा–यांकडून काम कसे करणार. आम्हांला कर्मचारी दया. आम्ही सकाळी १०.०० वाजता येतो आणि संध्याकाळी ८.०० वाजे पर्यंत काम करत असतो आणि आपलेच काम करत असतो, धन्यवाद.

या वेळी सदस्या, श्रीम. ज्योती चैनानी यांनी सभागृहामध्ये पुन्हा प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–</u> शहर अभियंता साहेब एक मिनिट आपण आपण आता गणपती घाटसाठी जे सांगितले आहे, तो आपण मागच्या वर्षी आय. डी. आय. कंपनी जवळ बनवला होता. आता पण गणपती उत्सव येत आहे, मी आपणाला पत्र दिले आहे. त्या गणपती घाटाची लवकारात लवकर तयारी करा. तो घाट परत चालू व्हायला पाहीजे. उल्हासनगरचे जे सार्वजनिक गणेश उत्सव आहेत, त्यांच्या विसर्जनासाठी चांगली सुविधा महानगरपालिकडून व्हायला पाहीजे. त्यासाठी आपण काय केले आहे, ते सांगा.

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:–</u> सन्माननिय सदस्य, मी आपल्याना सांगतो की, कालच डी.सी.पी. साहेब आले होते, आयुक्त साहेबांची त्यांच्याशी चर्चा झाली, उद्या सकाळी आम्ही गणेश घाट बघणार आहेत आणि

या विषयावर आम्ही १२.०० वाजता पत्रकार परिषद घेऊन, आयुक्त साहेब आणि डी.सी.पी. साहेब या विषयी खुलासा करतील.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, आमच्या शहर अभियंता यांनी खुप फिरून फिरून सांगितले आहे की, जसे पाटोल्सवर लक्षवेधी चालली आहे. त्यांनी शहराच्या सर्व रस्त्यांची चर्चा केली. पण त्यांना हे पण माहीती पाहीजे. एम.एम. आर.डी.ए. चे जे एस्टिमेंट त्यांनी बनवले आहेत, त्यासाठी आम्ही किती तरी वेळा त्यांना बोलावून, आयुक्तांना सांगून त्यांना हे काम करायला लावले आणि त्यांनी आपली जबाबदारी झटकुन टाकण्यासाठी सांगितले की आमचे इंजिनियर पनवेल महानगरपालिकेमध्ये निवडणुकीसाठी गेले होते. ती निवडणूक होऊन दिड महीना झाला आहे. मी आपल्यांना निवेदन करतो की, पावसाळयापुर्वी जर खड्डे भरण्याचे काम झाले नाही तर चालू पावसामध्ये जसे प्रत्येक वर्षी होते. कमीत कमी खड्डे भरण्यासाठी खडी आणि ग्रिट टाकण्याचे काम आमच्या चारही प्रभाग समितीचे प्रभाग अधिकारी करतात. त्याच प्रमाणे खडी आणि ग्रिट खड्डे भरण्यात यावेत आणि आपण आदेश दया की, हे काम उद्या पासून त्वरीत चालू करण्यात यावे आणि गणपती उत्सवाच्या आधी, डांबरीकरणाचे जे काम आहे....

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> शहर अभियंता साहेब तुम्हांला माहीत आहे का? आता खड्डे किंवा कशासाठी काम चालू आहे. पावसाळयात आपण खड्डे भरायचे असतात, पण आता खड्डे घ्यायचे काम चालू आहे. एम.जी.पी. च्या माध्यमातून काय काम चालू आहे. माझ्या प्रभागामध्ये संतोषनगर, माधवनगर आणि ब—याच ठिकाणी पाणी पुरवठा विभगाने सांगितले आहे की, सॉइल टेस्टींग चालू आहे. नक्की आहे ते बघा, नेताजी पासून चालू आहे. कोण घेते ते खड्डे विचारा पाणी पुरवठावाल्यांना

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:—</u> माहीत नाही.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> तुम्हांला माहीत नाही असे का? सेलवन साहेब आहेत का? पाणी पुरवठयाचे कोण आहेत. कमीत कमी खड्डे भरता येत नाहीत तर पावसाळयामध्ये खड्डे करू नका? याची कोण माहीती देईल. माहीती घ्या, चालू असेल तर बंद करा.

<u>आयुक्त स्थानी प्राधिकृत अधिकारी, अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:—</u> उद्या याची माहीती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मा. महापौर, आपण आदेश करा की, सर्व प्रभाग समितीमध्ये प्रभाग अधिकारी यांच्यातर्फे खडी आणि ग्रिट टाकून तात्पुरते जे मोठ मोठे खड्डे आहेत ते भरण्याचे काम सुरू करायला पाहीजे. कच्ची आणि माती टाकून जे नेहमी करतात आणि गणपती उत्सवाच्या पहीले आणि चालिया उत्सवाच्या वेळी जो पावसाळा कमी झाल्या नंतर जो डांबरीकरणाचे काम करत आसतो, ते चारही प्रभाग समितीमध्ये इस्टीमेट बनवून टेंडर बनविण्यात यावे आणि उद्यापासूनच खडी आणि ग्रिट या पासून खड्डे बनवण्याचे चालू व्हायला पाहीजे असे आपण आदेश दया.

<u>महापौर तथा पीठासिन अधिकारी:—</u> उद्या पासून माझे तुम्हांला असे आदेश आहेत की, गणपती उत्सव येण्याच्या पहीले जे पण खड्डे असतील, ते भरण्यासाठी आपण त्वरीत कामाला लागा. गणपतीच्या नंतर मला कोणतीही तक्रार यायला नको की, कोणतेही काम झाले नाही.

<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u> मा. महापौरजी, चालिया साहेब उत्सव पण येत आहे, त्यासाठी आपण जरा विनंती करा की, चालिया मंदिर पासून विनस, नेजाजी, अंबरनाथ या ठिकाणी भरपूर खड्डे आहेत. ते खड्डे भरायला पाहीजे आणि परवापासूनच चालिया साहेब, उत्सव चालू होत आहे. तरी आपणाला विनंती आहे की, हे पण आदेश दया.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> मा. महापौरजी, मला हे सांगा की, उद्या ही जी कामे चालू होतील ती ५ (२) (२) मध्ये चालू होतील की ई—टेंडरींगद्वारे चालू होतील. टेंडर झाले आहेत का? मी तुम्हांला एक उदाहरण देतो, शुक्रवारच्या दिवशी खुप पाऊस झाल्यामुळे मद्रासीपाडा आमचे पॅनल क्रमांक १४ मध्ये, मद्रासीपाडा येथील शौचालय पडले. अर्धा पडला आहे आणि अर्धा तसाच आहे. तर तो शौचालय आपण कधी चालू करणार, आणि कसे चालू करणार ५ (२) (२) मध्ये देणार की टेंडरची प्रक्रिया चालू करणार आहेत.

काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत आहेत ते समजून आले नाही.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— सन्माननिय सदस्य, नियमानुसार बोला, प्लीज.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— हे काम आपण कसे कराल ते मला सांगा, उत्तर तर दया.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— मी कामाचे आदेश दिले आहेत.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— आपण आदेश दिले आहेत, आपले आदेश बरोबर आहे. परंतु ते ५ (२) (२) मध्ये करायला मनाई करतील तर कसे चालू करणार आहत. विभागातर्फे चालू करणार आहेत का हे मी विचारतो.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— विभागातर्फे मटेरीयल मागवून नेहमी आपण जसे करतो, तसे ऑर्डर काढून आपण करा.

शहर अभियंता, श्री. राम जैसवार:— खड्डा बनवू टेंडर तयार आहे, उद्यापासून काम चालू होईल. परंतु ५ (२) (२) मध्ये आम्ही आता देणार नाही.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— मा. महापौर, मा. आयुक्त महोदया, आमच्या इथे पनवेल महानगरपालिकेचे महापौर, उप महापौर, आणि सदस्य आलेले आहेत. त्यांचा आपण सत्कार करा, कारण की त्यांना लवकर जायचे आहे. तर मी आपल्यांना विनंती करतो की, सभागृहामध्ये महापौर, उप महापौर, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता आले आहेत. त्यांचा इथे सत्कार करा आणि सभेचे कामकाज परत सुरू करा.

महापालिका सचिव:— मा. महापौरांनी आदेश दिले आहे की, पनवेल महानगरपालिकेचे मा. महापौर, उप महापौर, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता यांनी कृपया सभागृहामध्ये यावे.

सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:— मा. महापौर मॅडम, या बरोबरच आपल्याना विनंती आहे की, काल ज्या प्रकारे आपण परमिशन दिली आहे. एक्सक्युज फायरचे जे न्यु प्रोसेस आले आहे. त्याचे चलचित्र (डेमो) दाखवायचे आहे. त्याच्यासाठी पण आपण वेळ दया.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:— मॅडम पनवेल महानगरपालिकेचे आलेले सर्व सन्माननिय सदस्यांना बोलवावे.

महापालिका सचिव:— मा. महापौरांनी आदेश दिले आहेत, कृपया करून पनवेलच्या महानगरपालिकेच्या सर्व सदस्यांनी सभागृहात यावे. ज्या पदाधिका—यांना स्वागत करायचे आहे, त्यांनी मंचावर यावे.

सदस्य, श्री. विजय पाटील:— पनवेल महानगरपालिकेच्या सर्व नगरसेवकांना विनंती आहे की, त्यांनी सभागृहामध्ये यावे.

महापालिका सचिव:— कृपया पनवेल महानगरपालिकेच्या मा. नगरसेवकांनी सभागृहामध्ये यायचे आहे आणि कोणला सत्कारासाठी यायचे आहे, त्या पदाधिका—यांनी मंचावर यावे.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— स्थायी समिती सभापती, श्रीम. कांचनजी, इदनानीजी, जयाजी, रेखाजी मंचावर या. हा सगळयांचा सत्कार आहे, आपल्या उल्हासनगरची शान असेल.

महापालिका सचिव:— मा. महापौरांच्या आदेशान्वये, पत्रकारांना सभागृहामध्ये फोटो काढण्यासाठी जर यायचे असेल तर येऊ शकतात.

यावेळी पनवेल महानगरपालिकेतुन आलेले मा. महापौर, उप—महापौर, पदाधिकारी व सदस्य यांचा सत्कार करण्यात आला.

सदस्य, श्री. मनोज सयानी:— मा. महापौरजी, पनवेल नगरपरिषद होती ती आज महानगरपालिका झाली आहे. तिथले महापौर, उप महापौर, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता आणि जेवढे पण सदस्य आहेत, आज उल्हासनगरच्या सभागृहामध्ये ते इथे चालणारे कामकाज बघायला आले आहेत. माझी विनंती आहे की, उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये जेवढे सदस्य आहेत. त्यांच्यासाठी ज्या मोठया महानगरपालिका आहेत, जसे

की, मुंबई महानगरपालिका असेल किंवा नागपूर यांचे कामकाज बघण्यासाठी एक प्रकारे अशा प्रकारची एक सहल काढण्यात यावी. तेथील आयुक्त आणि महापौरांशी चर्चा करू. तसेच आपल्या सभागृहातील सदस्यांना पण ते जुने असतील या नविन त्यांना माहीती होईल की मुंबई महापालिकामध्ये एक नंबरची महापालिका आहे, नागपुर आहे. तिथे जाऊन त्यांचे कामकाज कसे चालते, तिथली पध्दत कशी आहे. ती आपण बघू शकतो अशा प्रकारे एक सुचना आहे. ती जर आपल्याला मंजुर असेल तर मुंबई महानगरपालिका, नागपूर महानगरपालिकेचा दौरा सर्व सदस्यांना करायचा आहे.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** महापौरजी, पनवेल महानगरपालिकेचे महापौर, उप महापौर, नगरसेवक आपल्या महानगरपालिकेचे कामकाज बघायचे जे काम केले आहे. त्यामुळे आपल्या महानगरपालिकेची प्रतिमा उंचावली आहे. परंतु इथे दु:खाने सांगावे लागते की, आपल्या महानगरपालिकेचा जो सभागृह आहे. त्याची अवस्था बघीतली तर खुप खराब आहे. मी आपल्यांना सांगतो की भिवंडी महानगरपालिका ही आपल्या नंतर महानगरपालिका बनली आहे. त्यांचा महासभागृह आपण जाऊन बघा तो किती मोठा आणि सुंदर आहे आणि आपले सभागृहा बघा आपले सभागृह व्यवस्थित नसल्यामुळे आपले नाव थोडे फार खराब होत आहे. त्यासाठी हे सभागृह व्यवस्थित कसे बनेल यासाठी प्रयत्न करा, धन्यवाद.

**<u>महापालिका सचिव:—</u>** लक्षवेधी सुचना क्र. २ जीचे सुचक आहेत श्री. शंकर लुंड व अनुमोदक आहेत श्रीम. अर्चना करणकाळे लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे.

---

## <u>लक्षवेधी सूचना क्रमांक २.</u>

सुचकाचे नाव :— श्री. शंकर (शेरी) लुंड

अनुमोदकाचे नाव:— श्रीम. अर्चना करनकाळे

**विषय:—** उल्हासनगर महानगरपालिकेत एक वर्षापासून नगररचनाकार नसल्यामुळे नागरीकांना होणा—या त्रासाबाबत.

उल्हासनगर महानगरपालिकेत सुमारे एक वर्षापासून नगररचनाकार उपलब्ध नाही. त्यामुळे उल्हासनगर शहरात ब—यांच नागरीकांनी एक वर्षापासून बांधकामांसाठी टाकलेले प्लॉन मंजुर होत नाही.

सदर बांधकामांचे प्लॉन मंजूरीसाठी टाकलेले असून देखील मंजरीस टाकलेल्या प्लॉन प्रमाणे पहाणी करण्यास नगररचनाकार उपलब्ध नसल्याने सर्व संबंधीत कामे प्रलंबित असल्याने दिसून येते. त्यामुळे उल्हासनगर शहरात अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट झालेला आहे.

तसेच नविन विकास आराखडा मंजूर झालेला आहे. याची संपुर्ण उल्हासनगरमध्ये चर्चा आहे. त्याबाबत देखील नगररचनाकार नसल्याने नगररचना विभागाकडून कोणतीही माहीती मिळत नाही.

तसेच पनवेल महापालिकेची निवडणूक असल्याकारणाने आपल्या महापालिकेचे अधिकारी/कर्मचारी पनवेलच्या निवडणूकीच्या कामात व्यस्त असल्यामुळे ब—याच विभागात अधिकारी/कर्मचारी हजर नसल्यामुळे उल्हासनगर शहरातील नागरीकांच्या असलेल्या समस्यांचे निवारण होत नसल्याने नागरीकांमध्ये नाराजी आहे.

त्याकरीता उल्हानगर महानगरपालिकेत पुर्ण वेळ नगररचना विभागात नगररचनाकार उपलब्ध होणेकरीता येत्या महासभेत चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती आहे.

---

**<u>सदस्या, श्रीम. अर्चना करनकाळे:—</u>** मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, सन्माननिय सभागृह, मी माझी लक्षवेधी वाचून दाखवत आहे. उल्हानगर महानगरपालिकेत एक वर्षापासून नगररचनाकार नसल्यामुळे नागरीकांना होणा—या त्रासाबाबत. उल्हासनगर महानगरपालिकेत सुमारे एक वर्षापासून नगररचनाकार उपलब्ध नाही. त्यामुळे उल्हासनगर शहरात ब—यांच नागरीकांनी एक वर्षापासून बांधकामांसाठी टाकलेले प्लॉन मंजुर होत नाही. सदर बांधकामांचे प्लॉन मंजूरीसाठी टाकलेले असून देखील मंजरीस टाकलेल्या प्लॉन प्रमाणे पहाणी करण्यास नगररचनाकार उपलब्ध नसल्याने सर्व संबंधीत कामे प्रलंबित असल्याने दिसून येते. त्यामुळे उल्हासनगर शहरात अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट झालेला आहे. तसेच नविन विकास आराखडा मंजूर झालेला आहे. याची संपुर्ण उल्हासनगरमध्ये चर्चा आहे. त्याबाबत देखील नगररचनाकार नसल्याने नगररचना विभागाकडून कोणतीही माहीती मिळत नाही. मा. महापौर, मी तुम्हांला सांगू इच्छिते की, उल्हानगर शहरामध्ये विकास आराखडा मंजूर झालेला आहे, असे सर्व संपुर्ण शहरात माहीती आहे व चर्चा आहे. एक डि.पी. प्लॉनचे पण वातावरण आहे की, उल्हासनगर शहराचा विकास आराखडा पास झालेलो आहे किंवा कोणती वस्ती किंवा कोणता रस्ता या विकास आराखडयामध्ये गेलेला आहे व तोड काम होणार आहे. याबाबतीत लोकांना याची माहीती नाही. तरी विषय असा आहे की, विकास आराखडा मंजुर केलेला आहे. मागच्या वेळेस हेरींग घेण्यात आल्या होत्या, नगरसेवकांकडून तक्रारी/हरकती घेण्यात आल्या होत्या. परंतु त्याचा निवारण केलेले नाही. त्या निवारणा बाबत

आम्हांला नगरसेवकांना सुध्दा माहीती दिलेली नाही. या विकास आराखडयामध्ये काय बदल झालेला आहे किंवा काय नाही? तर मग आम्ही लोकांपर्यत काय माहीती दयायची? मा. महापौर मॅडम व आयुक्त साहेब तुम्हांला एकच विनंती आहे की, विकास आराखडा तुम्ही पास केला असेल तर नगरसेवकांना त्याची माहीती दयावी. जेणेकरून रहदारी किंवा वस्ती असेल त्याच्यामध्ये कोणालाही नुकसान होता कामा नये. माझी सगळयांना एकच विनंती आहे की, विकास आराखडा काय आहे. तो सांगण्यात यावा व त्याची माहीती देण्यात यावी.

<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:—</u> मा. महापौरजी, आयुक्त साहेब, संपुर्ण शहरामध्ये डी. पी. प्लॉन बाबत वेगवेगळया चर्चा चालू आहेत. याबाबती मी हा मुद्दा उठवला होता, परंतु वेळेच्या अभावी मला बोलता आले नाही. संपुर्ण शहरामध्ये चर्चा आहे की, डी.पी. प्लॉन पास झाला आहे. इथे नगररचनाकार नसल्यामुळे सनदच्या जागेवर पण लोक बोलत आहेत की, आम्हांला असेच बनवून दया. कारण इथे नगररचनाकारच नाही. आपला डि.पी. प्लॉन पास झाला आहे किंवा नाही, या बाबत माहीती दया. संपुर्ण शहरामध्ये हीच चर्चा आहे की, कोणी बोलत आहे की, माझे ६० फुट रस्त्यामध्ये जात आहे, कोणी बोलत आहे की, माझे १० फुट जात आहे. तरी लवकरात लवकर महापालिकेला डि. पी. प्लॉन बाबत जेवढी पण माहीती आहे, ती सभागृहा समोर आणि पत्रकारां समोर, नागरीकां समोर लवकरात लवकर, सांगण्यात यावी.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> मा. महापौरजी, आयुक्त साहेब, उल्हासनगर महानगरपालिका, नगररचनाकार विभागाची लक्षवेधी सुचना सत्ताधारी पक्षाकडून आलेली आहे. अगोदरची जी लक्षवेधी होती, त्या लक्षवेधीवर सार्वजनिक बांधकाम विभागाची जी परिस्थिती होती. तिथे अधिकारी नाहीत, अधिकारी आहेत तर ते काम करत नाहीत. त्याच्या पेक्षाही वाईट परिस्थिती नगररचनाकार विभागाची आहे. नगररचना विभागाच्या बाबतीत बोलायचे झाले तर नगररचना विभाग, नगररचकार येतात आम्ही ब—याच वर्षापासून बघतोय जसे की, टी.पी. शिंदे असतील, नंतर गुरगुळे असतील आणि आता करपे असतील, करपेच्या बाबतीमध्ये पण जर या नगररचना विभागाला जे कोणी अधिकारी मिळाले आहेत. त्यांनी नगररचना विभाग बदनाम केलेले आहे आणि नगररचना विभाग बदनाम झाल्यामुळे ही महानगरपालिका बदनाम झालेली आहे आणि या महानगरपालिकेमुळे या शहराचे नाव बदनाम झालेले आहे. जे जे नगररचनाकार येतात ते कामाची सुरूवात करतांना एकदम चुकीच्या पध्दतीने करतात आणि मग त्या चुका करत गेल्या नंतर त्यांच्या लक्षात येते की चुका झाल्या आहेत आणि त्या चुका झाल्या नंतर या महानगरपालिकेची, नगररचना विभागाची बदनामी होते. ती बदनामी होत असते आणि त्या बदनामीमुळे हे शहर बदनाम झालेले आहे. आपल्यांना सर्वांना माहीत आहे, सभागृहाला माहीती आहे. मागच्या वेळेला करपे साहेब असतांना त्यांनी जवळ जवळ ५० दिवसांमध्ये ३८ प्लॉन पास केले होते. दिनांक ०१/०७/२०१६ ते २२/०८/२०१६ या दरम्यान ५० दिवसांमध्ये ३८ प्लॉन पास केले होते. त्या ३८ प्लॉनमध्ये या सभागृहामध्ये चर्चा झाली आहे. या सभागृहाने निर्णय घेतला की, जे काही प्लॉन पास केलेले आहेत, ते चकीच्या पध्दतीने पास केलेले आहेत. आरक्षण जागेवर पास केलेले आहेत, महापालिकेच्या जागवेवर केलेले आहेत. त्या बांधकामांना स्थगिती दया. त्या बांधकामांना स्थगिती दिल्या नंतर आदेश झाला, महापौरांनी आदेश दिले, बांधकामांना स्थगिती दिली. नंतर ते बांधकाम सुरू झाले, ते कोणाच्या आदेशाने झाले, का झाले? कसे झाले? ते आता पर्यत या सभागृहाला कळाले नाही. पण मला सांगायचे तात्पर्य असे आहे की, जे नगररचनाकार, करपे साहेब आहेत ते करपे साहेब गायब झाले आहेत. ते गायब होण्याचे कारण म्हणजे हे ३८ प्लॉन आहेत असे मला वाटते. आपण ही यादी जर बघीतली तर या यादीमध्ये एका वास्तुविशारदच्या नावाने जवळ जवळ १९ प्लॉन पास झालेले आहेत. १९ प्लॉन एका वास्तुविशारदच्या नावाने पास होतात, त्यामध्ये काही तरी सावळा गोंधळ झालेला आहे. काही तरी काळा बाजार झालेला आहे, अशी शंका नक्कीच येते. तर अपण या ३८ प्लॉनमध्ये ज्या मुळे हे नगररचनाकार गायब झालेले आहेत. त्याची चौकशी सर्व पोलिस विभागाने केली आहे. मला तर अजब वाटते की, आपल्या महाराष्ट्राचे किंवा मुंबई पोलिसांचे त्यांचे जगामध्ये दुस—या नंबरचे पोलिस विभाग आहे, असे आपण बोलतो. परंतु एक सरकारी अधिकारी, क्लासवन अधिकारी जो गायब होतो. तो कुठे गेला, कसा गेला, का गेला? त्याचे शेवटी काय झाले? हे अजून पर्यंत कोणाला माहीत नाही. त्यासाठी हा खरा प्रश्न राज्य सरकारचा आहे, विधानभवनाचा आहे, विधानसभेचा आहे. परंतु ही लक्षवेधी आली म्हणून आपल्याला हा विषय येथे मांडावा लागतो. त्या करपेंचा नक्की झाले काय? कुठे गेले ते, ते तिथे हजर झालेत का काय? जिवंत आहेत का, त्यांचे झाले काय? टाले साहेबांना माहीत आहे का? तुम्हां सगळयांना माहीती आहे का? मला तर माहीत नाही. तर अशा अधिका—यांमुळे हे उल्हासनगर शहर बदनाम झालेले आहे, उल्हासनगर महानगरपालिका बदनाम झालेली आहे. हे जे भ्रष्ट पध्दतीने प्लॉन पास केले आहेत. त्याच्यामुळे त्यांना गायब होण्याची परत पाळी आलेली आहे, त्यांच्यावर असा माझा आरोप आहे आणि ते कुठे गेले, काय झाले त्यांचा सोक्षमोक्ष न लावता, राज्य सरकारने त्याची बदलीही केली आहे आणि बदली केल्या नंतर त्यांच्या जागेवर जे अधिकारी दिले आहेत, ते कामांवर येण्यास तयार नाहीत, अशी परिस्थिती उल्हासनगरची झालेली आहे. या उल्हासनगरमध्ये शासकिय भुखंड हडप

होत आहेत आणि आपण फक्त चर्चा करतो की, आमच्याकडे विकासासाठी भुखंड नाही. आमचे भुखंड हडप केले आहेत. पण चर्चा करण्या पलिकडे आपण काही करत नाहीत. ज्यांनी भुखंड हडप केलेत त्यांच्यावर कारवाई करत नाहीत. अशा लोकांवर आयुक्त साहेबांनी कारवाई केली पाहीजे. अशी माझी मागणी आहे, आयुक्त साहेब पण बघ्याची भुमिका घेतात आणि कुठल्याही अधिका—यांवर कारवाई होत नाही आणि त्यामुळे हा भ्रष्टाचार आणि शहराचे नाव बदनाम होत आहे. यासाठी इथून पुढे जर असे काम कोणी करत असेल तर त्या अधिका—यावर कारवाई केली पाहीजे आणि जे कोणी भुखंड हडप करत असतील तर त्यांच्यावर पोलिसामार्फत गुन्हा दाखल केला पाहीजे. आपल्या महानगरपालिकेच्या माध्यमातून ही सगळी प्रक्रिया झाली पाहीजे, अशी विनंती मी सभागृहाच्या माध्यमातून आपल्याला करतो.

सदस्य, श्री. रमेश चव्हाणः— मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त, नगररचना विभागाचे कोणी आहेत का सांगायला? ३८ प्लॉनवर कसला स्टे आहे, ३८ प्लॉनचे काय झाले. कोण उत्तर देणार आहे. पुण्याहून जो स्टे आला आहे तो काय आहे?

कनिष्ठ अभियंता, श्री. कुमार जग्यासीः— उल्हासनगरच्या विकास योजनां बरोबर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६० चे कलम ३१ अन्वये अधिसुचना प्रत मिळणे बाबत मा. उप आयुक्त नगररचना यांनी दिनांक २८/०६/२०१७ रोजी मा. उप सचिव नवि/३२/उमपा न.र.वि./मुंईब मंत्रालय—३२ यांना पत्र लिहीले आहे. याची जी प्रत आहे, ती लवकरात लवकर उल्हानगर महानगरपालिका मध्ये पाठवा.

सदस्य, श्री. रमेश चव्हाणः— कोणती प्रत.

कनिष्ठ अभियंता, श्री. कुमार जग्यासीः— शासनाने जे सेक्शन ३१.....

सदस्य, श्री. रमेश चव्हाणः— नाही नाही त्याच्यावर त्यांनी पुण्याला जाऊन स्टे आणला आहे का?

कनिष्ठ अभियंता, श्री. कुमार जग्यासीः— कुठलाही स्टे नाही.

सदस्य, श्री. रमेश चव्हाणः— त्याच्यामध्ये ३८ प्लॉन आहेत.

कनिष्ठ अभियंता, श्री. कुमार जग्यासीः— नाही ३८ चे मी सांगत नाही साहेब, मी योजना बद्दल सांगत आहे. उल्हासनगर महानगरपालिकेची प्रारूप विकास योजना शासनाने ३१/१/ अन्वये मंजूर केलेली आहे. त्याबद्दल सांगत आहे.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः— आता कोणता विषय चालला आहे. आम्ही काय विचारले आहे.

सदस्य, श्री. रमेश चव्हाणः— आम्ही ३८ प्लॉन पास झाले आहेत, त्याबाबत विचारले आहे.

आयुक्त, डॉ. विजया कंठेः— मा. महापौर, सर्व सन्माननिय सदस्य आपण दोन प्रश्न विचारलेले आहे, पहीला प्रश्न विचारलेला गेला होता तो चौधरी साहेबांकडून की, आराखडया बाबत विचारला होता. त्याच्या बद्दलचा हा अर्धा भाग आहे.

सदस्य, श्री. रमेश चव्हाणः— आराखडा कोणी विचारला आहे.

आयुक्त स्थानी प्राधिकृत अधिकारी, अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठेः— आराखडा मॅडमने विचारला होता, चौधरी साहेबांनी नाही. करनकाळे मॅडमने आराखडया बाबत प्रश्न विचारला होता. त्याचे हे उत्तर आहे आणि आपण जे ३८ प्लॉन बाबत विचारले होते, त्याचे उत्तर देण्यासाठी संबंधित जे आहेत ते येत आहेत.

सदस्य, श्री. रमेश चव्हाणः— ठिक आहे, त्याचे उत्तर दया. आम्हांला ३८ प्लॉनचे उत्तर हवे आहेत.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः— जग्यासी साहेब, विकास आराखडा आणि ३८ प्लॉन बाबतचे दोन्ही उत्तरे बरोबरच दया.

सदस्य, श्री. शंकर लुंडः— आयुक्त साहेब, चौधरी साहेब, ३८ प्लॉन बाबत जी कोर्टाची ऑर्डर आहे. त्यामध्ये असे आहे की, मुंबई महानगरपालिका अधिनियमानुसार आपण त्याचे हिअरींग चालवून त्याचा निकाल लावावा. आता पर्यंत फक्त ८ लोकांचे हिअरिंग चालू होते, ३८ बिल्डींगचे काम चालू आहे. कोर्टाच्या आदेशाचे अवमान केलेले आहे.

<u>उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकर:—</u> मा. महापौर, सन्माननिय सर्व सदस्या या ठिकाणी मी थोडी दिलगिरी व्यक्त करतो. मी नविनच आता आलेलो आहे. माझ्याकडे नगररचना विभाग नाही आहे, सहाय्यक संचालक नाही. काल एक विषय आला होता. तेव्हा मला माहीती झाले की पास झालेला आहे. माझी सर्वाना एक विनंती आहे, त्या संदर्भात मला वेळ दयावा. जरी नगररचनाकार नसला तरी मी या संदर्भात माहीती घेत आहे. आज मी त्या विभागात गेलो तर मला कोणतीच माहीती नाही.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> आपण त्या विभागाचे उप आयुक्त आहेत ना. सगळे अनधिकृत बांधकामे महापालिकेची परवानगी नसतील व महापालिकेची परवानगी असेल तर त्यांच्यावर महापालिकेने, महापौरांनी स्टे दिला असेल ही सर्व कामे बंद करायला लावली पाहीजे. जी काही बोगस लोकांच्या नावाने कामे चालू आहेत ती पहीले बंद करायला लावा. आम्ही पत्र देवूनही तुम्ही लोक त्याच्यावर कारवाई करत नाही. जी माहीती घ्यायची ती नंतर घ्या, पहीले तुम्ही ती कामे बंद करायला लावा.

<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण:—</u> तिथे लोकांना काय होणार, भुखंड काय होणार बिल्डर विकणार आणि निघून जाणार. उल्हासनगरचे नागरीक तिथे ते घेतील ते बसतील. त्याच्यामुळे तुम्ही त्याच्यावर आताच कारवाई करा. कामे चालू आहेत.

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u> मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, उप आयुक्त साहेब जसे आपण सांगितले की नगररचना विभागामध्ये नगररचनाकार नाही, सहाय्यक संचालक नाहीत, प्रारूप विकास आराखडयामध्ये काही हरकती वैगरे आलेल्या आहेत, त्यांचे निवारण कोणी केले आहे, आणि कोण करणार आहे, त्याचे उत्तर कोण देणार आहे.

<u>उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकर:—</u> मी तेच सांगत आहे की, मी आताच आलेलो आहे. तेव्हापासून मला नगररचनाकार मिळालेला नाही किंवा सहाय्यक संचालक मिळालेला नाही.

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u> मग आराखडा कसा होईल, लोकांनी हरकती विचारल्या आहेत ना.

<u>उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकर:—</u> ही टेक्नीकल बाब आहे, त्यामुळे आयुक्त साहेबांनी दोन वेळा पत्र पाठविले आहे.

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u> ठिक आहे, डि.पी.प्लॅान विषयवी सांगा.

<u>उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकर:—</u> मी पहीलेच सांगितले आहे की, मला या विषयी काहीच माहीती नाही.

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u> मग “अंधेरी नगरी चौपट राजा” अशी परिस्थिती झाली आहे.

<u>उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकर:—</u> जी परिस्थिती आहे, ती मी सांगितलेली आहे.

<u>सदस्य, श्री. अरूण अशान:—</u> महापौर मॅडम, आयुक्त साहेब, जर तो पर्यंत डी.पी. प्लॅानमध्ये कोणी बदलाव केला गेला, कुठल्या आदेशान्वये केला गेला. तर त्याच्यावर कोणाचा अंकुश असणार आहे. डी.पी. प्लॅानमध्ये परस्पर बदल होत आहेत. डी.पी. प्लॅानमध्ये बदलाव करून उद्या माझा जो प्रश्न आहे, त्याच्यामध्ये मी तुम्हांला कळवून दाखवील की, त्याच्यामध्ये काय काय बदलाव केले गेले आहेत, त्या बदलावासाठी कोणाला जबाबदार धरणार. जर महानगरपालिकेमध्ये नगररचनाकारच नाही, मग असे बदलाव होतात तर ते कोणाला कळतील. जर कार्यालयीन हरकती आल्या आहेत जसे की आमच्या सदस्यांनी सांगितले आहे, तर मग त्याचे उत्तर आम्हांला कोण देणार आहे. हा खुप मोठा प्रश्न आहे, या डी.पी. प्लॅानमध्ये खुप मोठे असे बदल केले गेले आहेत.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> या शहराचा विकास अराखडा मंजूर करून, त्याचेमध्ये जे काही बदल करायचे होते, ते सभागृहाच्या सर्वसमंतीने शासनाकडे पाठविण्यात आलेले आहे. परंतु अशी माहीती मिळते की त्यामध्ये अजूनही शासनाने काही मंजूरी दिलेली आहे असे कळते आणि त्या नंतर त्याच्यामध्ये बदल करण्याचे काम इथले अधिकारी करीत आहेत. असा आरोप अरूण अशान यांचा आहे. तर माझे पण तेच मत आहे, जर तुम्ही नविन असले तरी तुमच्याकडे वर्षानोवर्षे काम करणारे जे जुनियर इंजिनियर आहेत, ते काय करता महानगरपालिकेचा फुकटचा पगार घेताता का? त्यांना विचारा आपण काय करतात? कोणी विचारले आहे का त्या विभागामध्ये जावून कोण कुठे आहे. तर कोण सांगतो आम्ही, कोकण भवनला गेलो आहे, कोण सांगतो

आम्ही कोर्टामध्ये गेलो आहे, कोण सांगतो मंत्रालयात गेलो आहे. तर अशी परिस्थिती त्या विभागाची आहे. तर त्या जुनियर इंजिनियरला विचारा की, तुम्ही काम काय करतात? साहेब आपण त्यांच्याकडून माहीती घ्या.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:–</u> विषय तो नाही, एक आता सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी यांनी उपस्थित केला की, ३८ बांधकाम परवानग्या बेकायदेशिर झाल्या अशी महासभेमध्ये चर्चा झाली आणि त्यांना स्थगिती दिली आहे. तर त्याचे काय झाले. त्याची चौकशी करा जर स्टे दिला होता तर तो उठला कसा? मग एवढे डेव्हलपर्स/ बिल्डर आपले ऐकत नाही का? प्रशासनाला मानत नाही का? प्रशासनाचा काहीच वचक नाही. मुळ मुदद् करनकाळे मॅडमनी आणलेला आहे की, उल्हासनगरमध्ये नगररचनाकार नाही. त्यामुळे उल्हासनगरचा विकास होत नाही आणि त्यामुळे लोकांना त्याचा फटका बसतो. मी आता एक प्रशासनाला सांगतो की, शिवसेना पक्षाच्या वतीने मी सर्व बिल्डरांना, उल्हासनगर वासियांना सांगतो की, जे कायदेशिर कामे करणार असतील ती त्यांनी बिनधास्त करावी. अजिबात कामे थांवणार नाही, त्याची जबाबदारी आपली असेल, प्रशासनाची असेल आणि शासनाची असेल, शासनाला सांगा उल्हासनगरचा बिल्डर आता थांबणार नाही. जे कायदेशिर करणार असतील त्यांना कशाला थांबवणार आहे. एम.आर.टी.पी. सेक्शन ४४ अंतर्गत जर कोणी विकासक असेल, बिल्डर असेल तो त्याचा प्लॉन सबमिट करतो. एम.आर.टी.पी. सेक्शनच्या ४५ दिवसात तुम्ही त्याला मंजूरी देतात आणि जर तुम्ही सात दिवसाच्या आत मंजुरी दिली नाही तर तो प्लॉन मंजुर झाला असे समजण्यात येईल. आम्ही  शिवसेनेच्या वतीने सर्व बिल्डरांना सांगणार आहे की, बिनधास्त करा. प्रभाग अधिकारी तिथे निरीक्षण करतील आणि शहराचे विकास का थांबवतात, शासनाला काळजी नाही, तुम्हांला काळजी नाही. आयुक्तांचे काम काय, मग काय फक्त अगोदर पगार घ्यायचा त्यासाठीच आहे. नगररचनाकार येणार मग ते शिंदे असतील, सोनावणे असतील, करपे असतील, पाटील असतील येतील आणि इथे कायदेशिर कामे असतील ते करणार नाही. बेकायदेशिर कामे करतील त्यामुळे डिपार्टमेंट बदनाम होणार. त्याचा फटका शहराला का? पाच लोक,  १० लोक त्याचा गैर फायदा घेतात. परंतु उल्हानगरमधील ९५ टक्के लोक प्रामाणिक आहेत. त्यांना त्याचा फटका बसतो. या पुढे शासनाला, राज्य शासनाला महापौर महोदया शिवसेना सांगणार आहे की, जे कायदेशिर, अधिकृत कामे करणार असतील, त्यांच्या पाठीशी उभे राहणार आहे, त्यांची कामे बिलकुल थांबवता येणार नाहीत. प्रभाग अधिका—यांना सांगून ठेवा, बिलकुल जे बेकायदेशिर असतील त्यांना दंड करा. त्यांच्यावर एम.आर.टी.पी. अंतर्गत गुन्हे दाखल करा. दिलेला प्लॉन सबमिट केला तर ते साठ दिवसामध्ये काम कारतील. ते सबमिट केलेले कामे कायदेशिर अनाधिकृत नाहीत, भुखंड व्यवस्थित आहेत की, नाहीत त्याची पाहणी करण्याचे काम बाकीच्या विभागाचे आहे. ते आहेत तुमच्याकडे, नगररचनाकार आहेत का? शेवटी मंजूरी नगररचनाकार देणार आहेत. ती मालकी कोणाची आहे, प्रॉपर्टी कार्ड आहे की नाही असेल तर ते बरोबर आहे का? हे तुम्ही बघू शकतात. ते बघितल्या नंतर मंजूरी मिळाली नाही तर या पुढे एकही प्लॉन किंवा एकही विकासक थांबणार नाही ते अधिकृत कामे करतात त्यांना अजिबात थांबवता कामा नये आणि तुमची लोक अशी कायदेशिर कामे करत असतील तर लोक वेगळया पध्दतीने उतरतील. मी या ठिकाणी सांगतो शासनाची जबाबदारी या ठिकाणी अधिकृत पाठवायचे आहे, परंतु शासन पाठवत नाही. एका बाजूला नगररचनाकार देत नाहीत आणि जो डेव्हलेपमेंट प्लॉन चालू आहे, महापालिकेने सभागृहाने सर्व उल्हासनगरच्या नागरीकांशी चर्चा केली, या ठिकाणी प्लॉन मंजूर केला आणि तो पाठवल्या नंतर राज्य शासन, राज्य शासन म्हणजे कोणी तरी अधिकारी इथून काही ठरावीक लोक धनदांडगे जात असतील तिथे काही पोहचवत असतील आणि त्यानुसार आरक्षण बदलतात, झोपडपट्टयांवर आरक्षण रिकामे प्लाटवर खाली करतात हे काय परत चालले आहे. एक कंपनी प्लॉन बनवते तेव्हाही असेच झाले होते, अहमदाबादला लोक पाहचले तिथे आरक्षण उठले ती सगळी दुरूस्ती आम्ही महासभेमध्ये केली. वनवारी साहेब आणि आम्ही सगळयानी कमीत कमी चार महीन्यात चालवा. मी परत परत सांगतो की, राज्य शासन आमच्या बंधन ठेवतो की, ३० दिवसाचे आतमध्ये हरकती घ्या, ६० दिवसाच्या आतमध्ये प्रसिध्द करा. नाही तर आम्ही नाही तर आम्ही प्रसिध्द झाले असे समजून आता आम्ही पाठविले आहे, राज्य शासनाला किती दिवसापासून चालू आहे. मुख्यमंत्र्यांना मी वारंवार विचारले आहे, पत्रकार परिषदेच्या माध्यामातून विचारले काय करतात. महापौर मॅडम एक कडक पत्र लिहा इथून पुढे उल्हासनगर महानगरपालिकेची अधिकृत कामे करणारे, किंवा कायदेशिर कामे विकासक हे थांबणार नाहीत. ती कामे चालवतील ही संपुर्ण जबाबदारी राज्य शासनाची असेल. आम्ही का थांबायचे चुकीचे असतील तर ती तोडा एकही विट चुकीची ठेऊन देवू नका अशा प्रभाग अधिका—यांना सुचना दया. पण कायदेशिर, प्लॉन नुसार काम करत असतील तुमचाच नगररचनाकार असेल म्हणून वर्षे ना वर्ष लोकांनी थांबायचे का? एकही थांबणार नाही, आम्ही संपुर्ण शिवसेना त्यांच्या पाठीशी आहे, मला वाटते संपुर्ण सभागृहाने जे अप्रमाणिक असतील, बेकायदेशिर असतील त्यांच्यावर गुन्हे दाखल करा. प्रमाणिक लोकांच्या पाठिशी उभे राहणे तुमचे आमचे सर्वांचे काम आहे. आम्ही सर्व त्यांच्या पाठिशी आहेत. प्रशासन जर जाणूनबुजून त्रास देत असेल, तर प्रशासनाला आम्हांला धडा शिकवावे लागेल. काय करायचे तुम्ही आयुक्त म्हणून तुमच्या कडक शब्दात, आणि महापौर महोदया आपण सुध्दा राज्य शासनाला कळवा, नगररचनाकार

नाही म्हणून उल्हासनगरचा प्लॅन थांबणार नाही. मागच्या आयुक्तांनी सबस्टेशन बसवायचे होते, ती जागा कॅन्सल होते, अगोदर मंजूर होते हे काय? म्हणजे “ज्याच्या हातामध्ये काठी त्याची म्हैस” ज्याच्या हातामध्ये पैसे आहेत, तो वाटेल ते आरक्षण बदलणार हे काय आहे आणि त्याला प्रशासन पाठिशी घालते असे आमचे ठाम मत आहे. तो महापालिकेचा प्लॉट आहे, प्रशासनाची संपुर्ण जबाबदारी आहे, प्रशासनाने तो हस्तगत केला पाहीजे. एक कब्रस्तानचा विषय वर्षानुवर्षे गाजतोय, तिथेही अचानक बदल होतो, महापालिकेच्या कर्मचा—यांना/ अधिका—यांना कोणी विश्वासात घेतले नाही का? तो विषय नंतर डी.पी. प्लॅनच्या वेळेस येईल. मग नंतर आम्हांला समजले काल आयुक्तांनी सांगिले की आले आहे. डी.पी.आले आहे, आपली काही तरी महापालिकेची कडक भुमिका असली पाहीजे. राज्य शासनाचे वर्चस्व असला पाहीजे. जर महापालिका चुकीचे करत असेल, राज्य शासन चुकीचे करत असेल तिथे महापालिकेने कठोर भुमिका, ताठर भुमिका, सक्षम भुमिका घेतली पाहीजे. त्या सचिवालयमध्ये किंवा मंत्रालयामध्ये एसी चेंबरमध्ये बसलेले उल्हासनगरच्या प्लॉट नंबर ४४ कुठे आहे, हे त्यांना समजणार आहे का? इथून मार्गदर्शन झाला पाहीजे आणि इथून मार्गदर्शन होत नसेल तर त्या अधिका—यांना अजिबात पाठवू नका. तुम्हांला कसा प्लॅन करायचा तसा आम्ही मंजूरी त्याला, राज्य शासनाचा निषेध करू. तो चुकीचा प्लॅन पाठवला आमच्या उल्हानगर महानगरपालिकेच्या नागरीकांवर अन्याय करणारा असेल तर निष्ठुरपणे. या पुढे ज्यांचे पण प्लॅन ज्यांनी सबमिट केले असतील अंडर सेक्शन ४४ ही महापालिकेची जबाबदारी आहे. त्याला मंजूरी देणे. जर होत नसेल तर ६० दिवासाच्या आतमध्ये तो डिम मंजुर आहे. बरोबर आहे, त्या नंतर जर त्याने कंम्पलेट सर्टीफिकेट टाकले तर ६० दिवसात तुम्हांला दयायचे आहे. बरोबर आहे ना कायदा कशासाठी आहे. कायदा फक्त नागरीकांसाठी आहे, कंम्पलेट लोक टाकतात, तुमच्याकडे नगररचनाकार नाही. त्याच्या मनात आला, म्हणजे राज्याच्या मनात आले, त्याच्या मनात आले म्हणून तो कंम्पिलीटेट सर्टीफिकेटसाठी घाई करतो. याच्यात काय होते, जे सर्वसामान्य आणि प्रामाणिक आहेत ते भरडले जातात. जे गुन्हेगार आहेत त्यांचे उखळ इथे पांढरे होते. ते बरोबर पैसे पोहचवतात आणि त्यांचे काम करून घेतात. धनदांडग्यांची कामे होतात, महानगरपालिका गरीबांसाठी आहे. सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी हे काम तुमचे आणि आमचे आहे. त्यासाठी तुम्हांला पगार मिळतात आणि आम्हांला इथे बसवलेले आहे. ते विसरून चालणार नाही, म्हणून असे अधिकृत जे कामे करतील त्यांच्या पाठीशी आम्ही सर्व आहेत, शिवसेना तर आहेच. संपुर्ण सभागृहाला याची खात्री देतो आणि महापौर महोदया अशा प्रकारची भुमिका सर्व सभागृहाची आहे. कारण ही शासनाची जबाबदारी होती की, या ठिकाणी अधिकारी पाठवावेत. असे पत्र, असे वाटले तर ठराव पुढच्या वेळेस आणा. असे चालणार नाही, वर्षे ना वर्ष नाही, हुगे पाटील आले, महीनाभर काम केले, त्यांच्या मनात आले गेले सुटीवर, मी उदाहरण देतो. सोनावणे आले, फिरायला आल्या सारखे येतात, केबिनमध्ये बसतात, काय करतात ते कळत नाही परत जातात. त्यांना पाहीजे असतील तीच कामे होतात आणि सर्वसामान्यांची कामे असतील ती करणार कोण? जेव्हा कामे करायची असतात, तेव्हा रजेवर जाणार आणि त्यांच्या मनात येतील ती कामे करणार. हे प्रशासन आहे का तुमचे? प्रशासनाच्या वतीने नगररचनाकार बंद आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे सांगितले सन २०१५—२०१६ मध्ये कामे झाली नाहीत, सन २०१६—२०१७ मध्ये कामे झाली नाहीत. आता सन २०१८ चे काहीही भरवसा नाही. पाणी पुरवठा विभागाची बोंब चालली आहे. मग प्रशासन काय काम करत आहे. म्हणून प्रशासनाने एकत्र बसावे, महापौर महोदया, यांची आयुक्तां बरोबर बैठक लावा. आयुक्तांनी फक्त सोमवार ठेवलेला आहे. इतर दिवशी तरी कामें व्यवस्थित होऊ दया. आम्ही सांगितले आहे, सोमवारी आम्ही येणार नाही, शहराची कामे होऊ दया. कमीत कमी तक्रारी लोकांच्या असल्या पाहीजेत, कशाला नगरसेवक येतील. तुमचे या सभागृहामध्ये आम्ही अभिनंदन करू. आलेले नगररचनाकार इथे व्यवस्थित काम करतील अशी अपेक्षा ठेवतो. परंतु या पुढे एकही अधिकृत कामे थांबणार नाही, याची सर्व जबाबदारी आपली आहे.

या वेळी सदस्या, श्रीम. पुजा भोईर, या सभागृहातून बाहेर गेल्या.

या वेळी उप महापौर, श्री. जीवन इदनानी यांनी सभागृहामध्ये पुन्हा प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानी:—</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त मोहदया, सभागृहातील सर्व सदस्यांचे जे मत आहे, की नगररचनाकार शहरात असायला पाहीजे आणि इथे एक वर्षापासून नगररचनाकार नाही. मा. महापौर, मी आपल्याला निवेदन करतो की, मा. आयुक्त महोदया यांना नगरविकास सचिव यांचेकडे सभागृहाच्या इच्छेनुसार ठरावाच्या माध्यमातून तिथे पाठवा आणि इथे कायमस्वरूपी नगररचनाकार पाहीजे आणि ते काम करतील. जसे की, बोडारे साहेबांनी सांगितले की, तसा नियमच आहे. ज्यांनी आपले प्लॅन सबमिट केला आहे आणि जर ६० दिवसात प्लॅन पास होत नसेल तर तो नियमानुसार आपले कार्य सुरू करू शकतो. म्हणून नगररचनाकार शहरामध्ये असायला पाहीजे आणि इथे आपण उचित निर्णय देवून आपल्या आयुक्त महोदया यांना नगरविकास सचिवकडे पाठवा आणि लवकरात लवकर नगररचनाकार शहरामध्ये यायला पाहीजे.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** मा. महापौर साहेबा, ज्यांनी पण नगररचनाकार यांची ही लक्षवेधी आणली आहे, मी त्यांना धन्यवाद देतो की, हा पुर्ण शहराचा प्रश्न आहे. अंबरनाथमध्ये किती तरी इमारती बनल्या आहेत आणि कल्याणमध्ये पण काही इमारती बनत आहेत. आपल्या उल्हासनगरमधून लोक जाऊन तिथे स्थायीक होत आहेत. एका व्यक्तिने एक वर्षापासून दोन खोल्यांसाठी, त्या खोल्या सरळ आहेत. सिटी सर्व्हेसाठी कागदपत्र दिले आहेत. नगररचनाकार नसल्यामुळे हे काम थांबले आहे. या बाबत आमचे बोडारे साहेबांनी सांगितले आहे की, जर ६० दिवसात महानगरपालिका मान्यता देत नसेल तर असा नियम आहे की, ते आपले काम चालू करू शकतात. तरी कृपया करून याचे उत्तर देण्यात यावे. मी जे बोलत आहे ते चांगले आहे, ते सत्य आहे की, नाही जर सत्य असेल तर येथील लोकांना त्यांचा हक्क दया. जीवन इदनानी साहेब, आपण उप महापौर आहेत, पहीले आपण इथे बसून नियम सांगत होते. स्टेजवर बसून महापौर, उप महापौर आपआपली लढाई लढत होते. तरी कृपया आपण उप महापौर आहेत, महापौर आणि आपण राहीलेल्या सर्व सुविधा देण्यात याव्यात. या महासभेमध्ये बसलेले बोडारे साहेब, मनोज लासी साहेब, भुल्लर महाराज आहेत, राजेंद्र चौधरी साहेब आहेत आणि असे किती तरी नगरसवेक आहेत की, ते सर्व माहीती ठेवतात. एवढे नगरसेवक माहीती ठेवतात आणि आपण उप महापौर, आपण एवढया वर्षापासून नगरसेवक आहेत तर आपण न्याय देणार नाही तर कोण देणार. वेळेनुसार न्याय दया, आज मा. मोदी साहेबांचे राज्य आहे. मोदी साहेबांनी खुप सुचना दिलेल्या आहेत, आपण रोज टी. व्ही. वर ऐकत असतो. जो पंतप्रधानांच्या निर्णयानुसार काम करत नाही त्याला काढून टाकतात. जो पण पंतप्रधानाच्या निर्देशानुसार काम करत नाही, त्यांना त्या पदावरून हटवले जाते, आपण किती वेळा असे बघितले आहे. तरी कृपया आज भारतीय जनता पार्टीचे राज्य आहे, साई पार्टीचे राज्य आहे तरी कृपया करून लोकांना न्याय दया. मी मानतो की मला लोकांना बाजूला बसवले आहे. माझ्यामध्ये क्षमता नव्हती का? मी स्वत:साठी बोलत आहे. मी लोकांची कामे करू शकलो नाही, त्यामुळे लोकांनी आमच्या पार्टीला बाजूला बसवले. तरी कृपया अशी परिस्थिती न आणता लोक लाचारीमुळे वेगळा विचार करतील. कृपया मोदींची घोषणा आहे की, वेळेवर काम दया, वेळेवर लोकांना न्याय दया. हे कागदपत्र मी आपल्या जवळ शिपायाच्या हातात पाठवत आहे. यामध्ये एक वर्षापासून प्लॅन पास करण्यासाठी त्यांनी मांगणी केली होती. ६० दिवस झाले आहेत, कृपया जर असा नियम असेल, तर कृपया मला असे एक पत्र दया किंवा महासभमध्ये माहीती दया की, मी उद्या पासूनच काम चालू करेल, धन्यवाद.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** मला काही जास्त बोलायचे नाही. महापौर मॅडम, मी दादा सतरामदास जेसवानी यांना धन्यवाद देतो की, कमीत कमी राष्ट्रवादी, कॉग्रेस पक्षाचा व्यक्ति मोदींची प्रशंसा करत आहेत. तर बाकीच्या राजकीय पक्षानी पण हे गुण घेतले पाहीजेत.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** शरद पवार साहेब पण मोदींची प्रशंसा करत आहेत. वेळेनुसार जो पण खरे काम आहे, मोदींची प्रशंसा उध्दव ठाकरे साहेब पण करतात. जे चांगले देशभक्त आहेत त्यांनी सर्वांनी सहभाग दिला पाहीजे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** आयुक्त महोदया, या लक्षवेधीचा आपण खुलासा करा.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** मा. महापौरजी, बोडारे साहेब, मागच्या वेळी विरोधी पक्ष समजदार आणि सक्षम होते. आपल्या मुद्दयांचा विचार करत होते आणि शहराच्या विकासाला पाठिंबा देत होते. आजच्या घडीला विरोधी पक्षांची समस्या समजून घेत नाही. जी रूलींग पार्टी आहे, ती रूलींग मानतच नाहीत.

**आयुक्त स्थानी प्राधिकृत अधिकारी, अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:—** मा. महापौर मॅडम, सर्व सन्माननिय सभागृह, सन्माननिय नगरसेविका, करनकाळे मॅडम यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी बाबत, सर्व विषय आज नगररचना विभागाशी संबंधित होता. आपण यात दोन भाग केलेले होते की, एक जो होता तो विकास आराखडयाचा होता. विकास आराखडयाच्या बाबत सभागृहाला श्री. कुमार जग्यासी यांनी वाचून दाखवून तुम्हांला सद्यस्थिती सांगितली. शासनाकडून अद्याप पर्यंत आपल्याला प्रारूप विकास आराखडा जो असतो तो प्राप्त झालेला नाही आणि अपण नगररचनाकार आणि सहाय्यक नगररचनाकार यांच्या विषयी जे चर्चेमधून सर्व मुद्दे उपस्थित केले होते, त्या बाबतही अस्थापना विभागाकडून श्री. संतोष देहेरकर, मुख्यालय यांनी सभागृहाला उत्तर दिलेले आहे. परिस्थिती अशी आहे की, आपल्याकडे जरी जाधव साहेबांची त्यानंतर होगे पाटीलांकडे अतिरिक्त कार्यभार दिला होते. जाधव होते तेही इथे हजर झाले नाहीत. श्री. करपे, सहाय्यक नगररचनाकार आपले जे होते ते आता एक वर्ष होईल, त्यांचे जे प्रकरण आहे ते पोलिस विभागाकडे असल्यामुळे सभागृहाला मी त्या बाबतीत कोणतीच माहीती देऊ शकत नाही. त्याची चौकशी चालू आहे.

तसेच जे काही प्लॉन आहेत, त्याबाबत जी चौकशी आहे ती नगररचना विभागाकडून अद्याप पर्यंत आता पर्यत त्याची काहीही कारवाई झालेली नाही किंवा काहीही या कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—</u> ६० दिवसाचा जो नियम आहे किंवा नाही त्याची माहीती दयावी.

<u>आयुक्त स्थानी प्राधिकृत अधिकारी, अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:—</u> ती तरतुद एम.आर.टी.पी. ॲक्ट मध्येच आहे, सर्व सभागृहाला याची पुर्व कल्पना आहे.

<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—</u> सचिव साहेबा बरोबर आहे का?

<u>उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—</u> आपण सांगितले की, ६० दिवसाची वेळ, तर मी आपनाला एक सुचना देतो की, काही सदस्यांना पण माहीत नाही की, महाराष्ट्र शासनाने नियमामध्ये सुधारणा केली आहे, ६० दिवस कमी करून आता ३० दिवस ठेवले आहे.

<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—</u> किती ३० दिवस ठेवले आहे, धन्यवाद, तुम्हांला सुध्दा धन्यवाद.

<u>उप महापौर, श्री. जीवन इदनानी:—</u> ज्यांना आठ दिवसात पत्र दिल्या नंतर प्लॉन सर्टीफिकेट मिळत नसेल, तर तो प्लॉन सर्टीफिकेट मान्य असे समजण्यात यावे आणि जर कंम्पिलीटेड सर्टीफिकेट पाहीजे असेल तर ते पण आठ दिवसामध्ये मिळत नसेल तर, ते सुध्दा कंम्पिलीटेड सर्टीफिकेट बिंग टू बी ईशु मानण्यात यावे. जर त्याने कायदयानुसार काम केले असेल तर? हि आपल्यासाठी सुचना होती.

<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—</u> धन्यवाद, आपण इथे माहीती दिली. मी जे पत्र पाठवले आहे, त्याची छाननी करून त्याचे हक्क त्याला देण्यात यावे, धन्यवाद. मोदींजीसाठी धन्यवाद, एक वेळा नाही तर करोडो वेळा. जर आपल्या देशाला प्रधानमंत्री पुढे नेत आहेत आणि सर्व सुविधा देत आहेत तर, धन्यवाद.

<u>महापालिका सचिव:—</u> लक्षवेधी संपली आहे.
विषय क्र.२ वाचुन दाखवितात

---

⇨ <u>विषय क्र. २ :—</u> विशेष चार समित्यांची रचना करणे बाबत. महापालिका सदस्या, श्रीम. मिना सोंडे व
श्री. रवि जग्याशी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—</u> मा. महापौर मॅडम, चौधरी साहेब तुम्ही बोला नंतर मी बोलते. मालमत्ता देखभाल व दुरूस्ती समिती, मंडळ नियंत्रण समिती, पर्यावरण उपाययोजना व नियंत्रण समिती व प्राथमिक शिक्षण समिती या चार नविन समित्या गठित होणे खुपच आवश्यक आहे. पहीली गोष्ट म्हणजे शिक्षण मंडळावर नियंत्रण ठेवण्यासाठी शिक्षण समिती बनवणे आवश्यक आहे. पर्यावरण उपाययोजनावर उल्हानगरमध्ये पर्यावरण समितीचा विभाग नाही आणि मालमत्ता देखभाल व दुरूस्ती ज्या प्रकारे एम.एम.आर.डी.ए. चे शौचालय, गार्डन्स, आणि अशा किती तरी मालमत्ता महानगरपालिके मध्ये असतील त्यांच्यावर सुध्दा लक्ष जात नाही आणि वारंवार नगरसेवक येऊन लक्ष केंद्रीत करतात. जर या समित्यांचे गठन झाले तर शहराचे विकास पण होईल, अशी मी सुचना देते, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण:—</u> मा. आयुक्त साहेब, पहीलेच कॅबिन ज्या आहेत त्या कमी आहेत आणि कॅबिनमुळे भांडणे सुरू आहेत आणि आता या चार कमिटया बनवून त्यांना कॅबिन कुठून देणार तुम्ही. त्याच्यामध्ये सगळे आले तुमचा लिपीक, शिपाई वाढला, सगळा खर्च वाढला. तुम्ही चार लोकांना खुश करण्यासाठी हे करतात का?

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—</u> हा प्रस्ताव फक्त कॅबिन मिळवण्यासाठी नाही. पण...

<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण:—</u> नाही नाही आमचा याला विरोध आहे.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** मा. महापौरजी, आयुकत साहेब हा जो चार समितींचा प्रस्ताव आमच्या सदस्या श्रीम. मिना सोंडे यानी आणला आहे, आणि यामध्ये कोणकोणत्या समित्या असतील त्या त्यांनी वाचून दाखविल्या आहेत. सांगितले आहे की, या समित्यांमुळे शहराचा विकास होईल. पहीलेच नऊ समित्या असून त्यांच्यापासून शहराचा कुठला विकास होत आहे आणि कुठले चांगले काम होत आहे. ते पहीले सांगा आणि नंतर आपण या समित्या स्थापन करू. दुसरी गोष्ट म्हणजे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खराब आहे. तुमचे आमचे सर्वांचे काम थांबले आहेत, आयुकत साहेब करत नाहीत. ९ समित्या पहीले बनवल्या आहेत, एक परिवहन समिती आहे. १० समित्या आहेत, त्यांना बसण्यासाठी जागा नाही, परिवहन बंद आहे. परिवहनची जागा ठेकेदाराने हडप केली आहे. नविन परिवहन चालू करण्यासाठी आपण प्रयत्न करीत नाहीत. परत या चार समित्या आणतील आणि विकास होईल. ठिक आहे, ९, १०, समित्या स्थापन झाल्या नंतर शहराचा किती विकास झाला ते मला सांगा, नंतर या समित्यांनाही मंजुरी देवू. त्याच बरोबर आर्थिकस्थिती खराब आहे, जर आपण परत या समित्या बनवल्या तर अजून आपली आर्थिक परिस्थिती खराब होईल. जर अजून आर्थिक परिस्थिती खराब झाली तर आपल्या वार्डाची जी कामे आहेत ती होणार नाहीत. पहील्याच समित्यामध्ये जे सभापती झाले आहेत, गटनेता झाले आहेत, इथे सदस्य फक्त ७८ असतील परंतु गटनेता भरपुर आहेत. त्यांनाच बसण्यासाठी जागा नाही आणि त्या गटनेत्यांना मान्यता पण मिळाली आहे. मग अशा परिस्थितीत त्यांनाच बसण्यासाठी जागा नाही आणि त्यांचेच भांडणे चालू आहेत. आयुक्त साहेब त्यांना कॅबिन देत नाहीत. त्याच्या हिशोबाने चालले आहे, कायदयाच्या हिशोबाने चालले आहे आणि आता या चार समित्यांसाठी आयुक्त कोणत्या कायदयानुसार चालणार आहेत, हे पण आम्ही बघणार आहेत. ही संपुर्ण जबाबदारी आयुक्त साहेबांची आहे. या समित्या बनवायच्या किंवा नाही हे आयुक्त साहेबांनी ठरवले पाहीजे. जर आपली आर्थिक परिस्थिती चांगली असेल तर आम्हांला काहीच त्रास नाही. जर त्या समित्या स्थापन झाल्या नंतर जर खरोखरच विकास होणार असेल तर आमचे काहीच हरकत नाही. पहीलेच विकास होत नाही, आमच्या वार्डाचे कामे होत नाहीत, त्याच्यासाठी आम्ही इथे ओरड आहेत, त्याच्या नंतर या चार समित्या आणून आपण महानगरपालिकेवर आर्थिक बोजा टाकत आहेत आणि आपला वेळ वाया जाणार आहे. या समित्या आणल्या नाहीत तर खुप चांगले होईल.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—** मा. महापौर मॅडम, यांना कॅबिन दिल्या नाही तरी चालेल परंतु या समित्यांमुळे नियंत्रण चांगले राहील. ज्या समित्या स्थापन होणार आहेत, कारण की आमच्याकडे पर्यावरण नियंत्रण विभाग नाही, शिक्षण समिती नाही, मी स्वतः सांगते की, या चार समित्यांमध्ये मी सभापती बनणार नाही. मॅडम, म्हणून या चारही समित्या होणे खुपच आवश्यक आहेत.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** १३ चौरस किलो मिटरचे शहर, जेवढया पण महानगरपालिका आहेत, संपुर्ण भारतामध्ये, महाराष्ट्रामध्ये जेवढया पण महानगरपालिका असतील, त्यांच्या पैकी सर्वात छोटे शहर उल्हासनगर असेल. येथील लोकसंख्या पण कमी आहे आणि कोणत्याही महानगरपालिकेमध्ये ६ किंवा ७ समित्या आहेत. परंतु उल्हानगर महानगरपालिकेत परिवहन समिती मिळून एकुण १० समित्या आहेत आणि या चार समित्या जास्त बोलत आहेत. वेळ बदलत आहे, परंतु आम्ही कोणत्या दिशेन जात आहेत. कोणाच्या तरी फायदयासाठी आपण या चार समित्या बनवत आहेत, आपण शहराचा विचार करत नाहीत. ९ लोकांना सामिल केले, १० लोकांना सामिल केले आता परत चार लोकांना सामिल करायचे आहे आणि सभापती काय करणार आहे, एक समिती मालमत्तावर नियंत्रण ठेवणार आहे. त्याच्यासाठी सभापती, मग महसुल समिती काय करत आहे, भांडार विभागाला सभापती देयायचा आहे तर, मग सर्व डिपार्टमेंट बंद करून टाका? आयुक्त मॅडम, या ठरावाच्या अंतर्गत आपण केलेले आहे की, रचना करणे वैगैरे हे काम करीत नाहीत, सभागृहाचे काम हे सचिवांचे काम आहे, सभागृह बघणे. म्हणजे तुम्ही त्याला पात्र नाही, असे त्यावरून सिध्द होते. शहर अभियंता, भाजी मार्केट, उद्यान, मग सार्वजनिक बांधकाम विभाग काय करते ते बंद करा आणि या समित्या स्थापन करा. मला वाटते की या समित्या असतांना, समित्यांच्या अंतर्गत सर्व कामे करून घेऊ आणि प्रशासनाला टाळे लावू. एवढया जर समित्या जर येत असतील म्हणजे मालमत्ता देखभाल, दुरूस्ती हे काम कोणाचे आहे, प्रशासनाचे आहे, ते तुम्ही करू शकत नाही असे क्लिअर कट शासनाचे म्हणणे आहे, सत्ताधा—यांचे म्हणणे आहे. ते आम्हांला करू दया. भांडार नियंत्रण समिती, याच्या पेक्षा कुठले छोटे असेल तर सांगा. भांडार नियंत्रण करण्यासाठी समिती, मग त्यासाठी सभापती, ते ९ सदस्य आता भांडार विभाग किती आहे. त्याचे बजेट किती आहे, त्याच्यावर काय, भांडार विभागाने केलेली खरेदी विक्री वाटप, पर्यावरण उपाययोजना या प्रशासनाला, महापौर महोदया, एक पावर्टी ॲल्युऐशन सेल स्थापन करण्यासाठी आम्ही मागील चार वर्षापासून बोलत अहोत. आम्ही चंदीगडला गेला, त्रिवेंद्रमला गेलो, होतो. तिथे सगळे आमचे सदस्य होते वेगवेगळया ठिकाणी पावर्टी ॲल्युऐशन सेलसाठी काय काय उपाययोजना करायला पाहीजेत. ते करत असतांना जसे केरळमध्ये कुटुंब स्त्री, चंदीगडमध्ये पावर्टी म्हणजे दारीद्रय रेषेमधील त्यांची क्षमता

वाढवण्यासाठी किंवा पावर्टी एल्युएशनसाठी दारीद्रय निर्मलन म्हणजे ते सेल अजून या महासभेने किंवा महापालिकेने स्थापन केले नाही. ज्याची गरज आहे ते करत नाहीत आणि कारण नसतांना फक्त एडजेस्टमेंटसाठी एका बाजुला आयुक्तांनी सन २०१५–२०१६ च्या वर्क ऑर्डर दिलेल्या नाहीत, शहराची कामे केलेली नाहीत. सांगतात बजेट नाही, कॅबिन नाहीत म्हणून ते भांडतात, आयुक्तांनी त्या कॅबिन थांबवल्या, महापौर, उप महापौर, सभागृह नेता यांचे कॅबिन थांबवले आहेत. बाकीच्या लोकांना कुठे दयायच्या अजून सभापती तसेच बसतात. कुठे बसायचे ते माहीत नाही. मग या सभापतीच्या माध्यमातून काम करा. परंतु एक आहे, या एवढया समित्या, ९ समित्या बाजुच्या कल्याण डोबिंवली महानगरपालिकेत सुध्दा ६ किंवा ७ आहेत. ठाणे महानगरपालिका मोठी आहे, तिथे ७ समित्या आहेत आणि आमच्या उल्हासनगरमध्ये १० समित्या आणि अजून परत चार समित्या, हा कळस झाला आहे आमच्या मानसिकतेचा, आम्ही कुठल्या मानसिकतेतून या ठिकाणी आणत अहोत, बाकी काय कुणाचे गेले, शहर गेले खड्डयात, महापालिका गेली खड्डयात आमचे लोक एडजेस्ट झाले पाहीजेत आणि हे चुकीचे आहे, महापौर महोदया चुकीचे आहे मॅसेज चुकीचा जाईल. आपण कोणाला  एडजेस्टमेंट करण्यासाठी समिती स्थापन करीत आहेत, शहराचे काहीच होणार नाही आणि करायचे असते तर पहीलेच केले असते, त्यासाठी समित्यांची काय गरज आहे. काम करण्यासाठी मानसिकता पाहीजे, इच्छाशक्ती पाहीजे त्यासाठी समिती किंवा सभापतींची गरज नाही. जर आपण प्रशासनाच्या माध्यमातून करू शकत नाहीत तर कबुल करा. आयुक्त महोदया, आपण इथे आयुक्त म्हणून आहेत. तुमच्यावर कलेले आरोप आहेत, भांडार विभागावर व्यवस्थित नियंत्रण होत नाही. बघा तुम्हांला ते मान्य आहे का? उद्या तुम्ही करू शकत नाहीत आणि करणारही नाही, तुम्हांला मान्य आहे का?

<u>आयुक्त स्थानी प्राधिकृत अधिकारी, अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:—</u> मा. महापौर महोदया मॅडम, सर्व सन्माननिय सभागृह, आता या समित्यांची स्थापना करणे अथवा न करणे हा प्रशासनाच्या अधिकार कक्षातला विषय नाही, तो सभागृहाच्या अधिकार कक्षतील बाब आहे. सभागृहाने निर्णय घेतल्या नंतर ज्या वेळेस प्रशासनाकडे हा विषय येतो, तेव्हा ते....

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> नाही नाही तुम्ही हे करत नाहीत, तुम्ही हे करू शकता परंतु तुमची क्षमता नाहीत म्हणून, तुमची जर क्षमता असती तर या समित्यांची स्थापना झालीच नसती, प्रशासनाची क्षमता नाही म्हणून कमिटी पाहीजे. तुम्ही स्पष्ट म्हणटलेले आहे, ठेवण्या करीता मालमत्ता दुरूस्ती आणि देखभाल करणे आवश्यक आहे, ती होत नाही. भांडार नियंत्रण नियोजन नसल्याने म्हणजे प्रशासन नियोजन करू शकत नाही. त्यामुळे तिथे भांडार समिती पाहीजे. हे चुकीचे चाललेले आहे, आम्ही त्याला कडवा विरोध करत अहोत. आणि मला वाटते की, प्रशासनाने पाठवले आहे, त्याला कधीच समर्थन दिले नाही पाहीजे.

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u> मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, आज हा जो विषय मिना सोंडे मॅडम आणि रवी जग्यासी साहेबांनी आणला आहे, तो चार समित्यांची स्थपना करणेसाठी. माझ्या मित्रांनी सांगितले आहे की, पहीलेच ९ व १० समित्या बनल्या आहेत, त्याला एक महीना पण झालेला नाही. जर आपला हा प्रश्न तीन महीन्या नंतर असता, तर त्याचे उत्तर याच सभागृहामध्ये मिळाले असते की, या समित्या काय करतात. पहीले १० वर्षात या समित्यांनी काय केले आहे, हे आम्ही आपल्यानां विचारायला पाहीजे होते.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> त्यावेळी तुम्ही आमच्या बरोबर नव्हते, भारतीय जनता पार्टीचे सदस्य आमच्या बरोबर होते, त्यांना विचारा.

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u> आपण १० वर्षाचा हिशोब दया, एक महीन्याचा हिशोब आम्ही देतो. विभागांमध्ये होणा—या भ्रष्टचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी या समित्या बनविण्यात येत आहेत आणि मी आपल्यांकडून मागच्या १० वर्षाचा हिशोब मागत नाही.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> आपल्यांना हिशोब मागण्याचा अधिकार नाही.

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u> इथे विषय आला आहे, समित्या बनवू शकतो किंवा नाही, ही माहीती पाहीजे. आबा, आपण इथे सर्वात वरिष्ट आहेत, आपल्याकडून शिकायचे आहे. हा सभागृहाचा अधिकार आहे, आपण समित्या बनवू शकतो, कायदयामध्ये तशी तरतुद आहे. आबा, ज्या चुका आपण १० वर्षे केल्या आहेत, त्या आम्ही करणार नाही. मा. महापौरजी संपुर्ण सभागृहाला माझी विनंती आहे की, या चार समित्या विभागांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणण्यात येत आहेत.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> “नौ सौ चुहे खाकर बिल्ली हज को चली”

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:–</u> या समित्यांना मंजूरी मिळायला पाहीजे आणि राज्य शासनाच्या अधिन न रहाता पास करण्यात यावे. जर कोणाचे विरोध असेल तरी चालेल. आपण निवडणूक घेऊन, भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि लोकांच्या हितासाठी पास करा, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u> मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, माझे मित्र मनोज लासी यांनी चांगल्या प्रकारे मुद्‌देसुध्द भाषण केले आहे. त्यांनी एक गोष्ट सांगितली आहे की, आपल्या कार्यकाळात भ्रष्टाचार खुप वाढलेला आहे. त्यांनी आता मान्य केले की, आपल्या कार्यकाळामध्ये भ्रष्टाचार वाढलेला आहे.

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:–</u> मागील १० वर्षापुर्वी भ्रष्टाचार झालेला आहे, तो थांबवण्यासाठी या चार समित्या आणल्या आहेत.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u> आता पण भ्रष्टाचार आहे ना? आता तीन महीन्यांमध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे.

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:–</u> मी यादी बनवली आहे, तुम्ही काय केले आहे आणि काय केले नाही मी तुम्हाला दाखवू.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u> तीन महीन्यांमध्ये आपल्या कार्यकाळामध्ये आपण किती लोकांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली निलंबित केले आहे. या विभागातल्या किती लोकांना, जसे भांडार विभाग असेल, मालमत्ता विभाग असेल किती लोकांवर आपण कारवाई केली. हे पण सभागृहाला कळू दया की, एप्रिल महीन्यापासनू तुम्ही महापौर झाल्यापासून आता पर्यत तुम्ही किती लोकांवर कारवाई करायला लावले. कारवाई केली का? नाही केली. म्हणजे याचा अर्थ भ्रष्टाचार झालेला नाही आणि कुठला कुठला भ्रष्टाचार झाला आहे, हे पण सभागृहाला कळू दया. या कमिटयांची आवश्यकता एवढी मोठी आहे आणि इथे जे बसणार आहेत, ते भ्रष्टाचार करणार नाहीत, अशी काय शाश्वती आहे. हे पण सभागृहाला कळू दया. जर ही गरज असेल आणि तुमचे म्हणणे असेल की इथे भ्रष्टाचार मोठया प्रमाणात असेल, तर तो तुमच्या काळात भ्रष्टाचार झालेला आहे. हे सिध्द होते. तुम्हांला जर आवश्यकता वाटेत असेल तर या कमिटया भ्रष्टाचारासाठी कराव्यात त्याला आमची मान्यता आहे. नाही तर आमचा विरोध आहे.

<u>सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानी:–</u> मा. महापौरजी, मा. उप महापौर, मा. आयुक्त महोदया, सर्वात पाहीले मी सभागृहाच्या सदस्या मिना सोंडे, आणि रवि जग्यासी यांना धन्यवाद देतो की? खुपच चांगल्या प्रकारे त्यांनी चार समित्यांचा विषय या सभागृहामध्ये अशासकीय प्रस्ताव आणला आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या ३० नियमाच्या अनुसार आपण कधी पण महानगरपालिकेमध्ये समित्यांची रचना करू शकतो किंवा समित्या बरखास्त करू शकतात. या महानगरपालिकेमध्ये किती तरी वेळा चर्चा झाली आहे की, आमचे विरोधी

पक्ष नेता यांचे कार्यालय लिकेंज झाले आहे. आज आपण या सभागृहामध्ये बसलो आहे, तो ७०० करोड बजेटचा सभागृहत पाणी गळत आहे आणि आमचे अधिकारी मागे बसले आहेत आणि मालमत्ता देखभाल समिती जर असती तर आमचे विरोधी पक्ष गट नेता यांचे कार्यालय गळाले नसते. इथे या पहीलेही मालमत्ता विषयावर सुर्वेजी आणि बाकीच्या सदस्यांनी चर्चा केली आहे. आपल्या शहरामध्ये महानगरपालिकेच्या जेवढया पण मालमत्ता आहेत. त्या काही ठेकेदारांकडून आपल्याला मिळाल्या आहेत, परंतु त्या रजिस्ट्रेशन करून परत घेतल्या नाहीत. या शहरामध्ये काही मार्केट आहेत, किती तरी सरकारी भुखंड आहेत, शहरामध्ये किती तरी मालमत्ता आहेत, त्याचा आपण आता पर्यंत हक्क घेतला नाही. त्यासाठी महानगरपालिकेमध्ये मालमत्ता देखभाल आणि दुरूस्ती समिती असणे आवश्यक आहे. महापालिकेत भांडार विभाग आहे, तिथून ब—याच वस्तु खरेदी केल्या जातात आणि आज पण भांडार विभागामध्ये बघितले तर, शिलाई मशिन असतील, वरलॉक मशिन असतील, महीला व बालकल्याण विभागासाठी आलेले साहीत्य असेल, अपंगासाठी आलेले साहीत्य असेल, करोडो रूपयेचा माल आज भांडार विभागात सडत आहे. तसेच आपल्याला महानगरपालिकेची जी दैनंदिनी (डायरी) मिळते, ती डायरी आपल्याला जानेवारी महीन्यात मिळायला पाहीजे, ती जुन, जुलै महीन्या पर्यंत मिळत नाही. तर भांडार विभागावर नियंत्रण ठेवण्यासाठी एक समिती असायला पाहीजे. आज महानगरपालिकेच्या नियमानुसार ३१ जुलैच्या पहीले कोणत्याही महानगरपालिकेचा पर्यावरण अहवाल मा. महासभेमध्ये सादर करणे आपला अधिकार आहे. परंतु दोन दोन वर्ष पर्यावरणाचा अहवाल सादर करण्यात येत नाही आणि पर्यावरण अहवाल सादर करण्यात येतो, परंतु तीन वेळा पर्यावरण अहवाल सादर करण्यात आला.

त्यामध्ये किती तरी चुका होत्या, त्यांचे निवारण झाले आहे का? पर्यावरण अहवाल कशा प्रकारे दुरूस्ती करण्यात यावे, त्यामध्ये काय कमी आहे, ते करण्यात आले आहे का? आपण फक्त पर्यावरण अहवाल महासभेत सादर करतो आणि आमचे सन्माननिय सदस्य हा अहवाल वाचतात आणि त्याच्यावर आपण काय उपाययोजना करू शकतो, त्यासाठी आपण काहीच करू शकत नाही. त्यासाठी पर्यावरण उपाययोजना करण्यासाठी कए नियंत्रण समिती असणे आवश्यक आहे. आपल्या शहरामध्ये कमीत कमी ५ हजार, ६ हजार विद्यार्थी प्राथमिक शिक्षण घेतात, आपल्याकडे पुर्व प्राथमिक शिक्षण समिती आहे. त्यामध्ये प्रायमरी आणि सेंकडनरी एज्युकेशन आहे. बालवाडी आणि प्राथमिक, परंतु उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये पुर्व प्राथमिक आणि सेंकडनरी महाविद्यालय, विद्यालय नाहीत. इथे सर्व प्राथमिक विद्यालय आहेत आणि प्राथमिक शिक्षण समिती या महानगरपालिकेमध्ये नाही. ६ हजारा पेक्षा जास्त गरीब मुले, जे प्राथमिक शिक्षण घेतात, त्यांच्यावर पहीले शिक्षण मंडाळाचे नियंत्रण होते. परंतु सरकारने स्कुल बोर्ड बंद केले. तेव्हापासून इथे कोणतीही कमिटी नाही, जी शिक्षण समिती असेल, तिथे प्रामिक शिक्षण घेणारे आमचे जे ६ हजार मुले आहेत, त्या शिक्षण समितीवर कोणाचे तरी नियंत्रण पाहीजे. मी सभागृहाचे सर्व सदस्य, त्यांच्या बरोबर आम्ही १० वर्ष सत्तमध्ये होतो, त्यावेळी ८ कमिटी वरून ९ कमिटी आम्ही सगळयानी मिळून बनवल्या होत्या. तेव्हा आमच्या बरोबर बसलेले लोक विरोधी पक्षामध्ये होते. तेव्हा त्यांनी एक कमिटी बनवण्यासाठी विरोध केला होता की, आपण महसुल समिती का बनवत आहेत? परंतु आमचे शिवसेनाचे सदस्य महसुल समितीवर सभापती म्हणून बसले आणि त्यांनी शहराचे महसुल वाढवले. तेव्हा आम्ही त्यांचे अभिनंदन केले आणि तेव्हा या सभागृहाच्या सदस्यांनी मान्य केले की, महसुल समिती किती आवश्यक आहे आणि आपण ८ समितीच्या जागी ९ समित्या बनवू शकतो. आमचे सदस्य, रवि जग्यासी यांनी हा विषय आणला आहे, त्यामुळे महापालिकेवर कोणताही बोजा पडणार नाही. १ लाख रूपये बोजा जर चार समित्या बनवल्या नंतर महापालिकेचा महसुल जर वाढत असेल तर करोडो रूपयेचा फायदा आणि शहराच्या लोकांचा फायदा? अशा प्रकारे गळत असलेली इमारत, शिवसेना गट नेता यांचे गळत असलेले कार्यालय ते बघत राहणे आपण पसंद करू शकत नाही. आमच्यामध्ये भेदभाव नाहीत, आमचे विरोधी पक्ष नेता यांचे कार्यालय पण सुंदर बनायला पाहीजे. सुंदर वातावरण आणि स्वच्छ वातावरणामध्ये आमचे विरोधी पक्ष नेता बसतील? तेव्हाच सत्ता पक्ष आणि विरोधी पक्ष मिळून चांगल्या प्रकारे सत्ता चालवू शकतात. तर मी सर्व सदस्यांना सांगतो की, या विषयाला आपण विरोध न करता, आपण सगळे मिळून आज सत्ता आपल्याकडे आहे, उद्या सत्ता दुस—यांकडे असेल ती अशी गोष्ट नाही की, एकाकडेच कायम स्वरूपी टीकून राहील. जो “आज हमारा है, कल आप का था” त्यासाठी या चार समित्या अत्यंत आवश्यक आहेत. आपण सर्व संमतीने हा प्रस्ताव जर पास केला तर मला आनंद होईल की आम्ही या शहरामध्ये विरोधी पक्ष नेता यांचे कार्यालय पाण्याने गळण्यापासून वाचवू शकतो,धन्यवाद. समितीचे जे सदस्य असतील ते संख्या बळावर असतील, ज्या प्रकारे अन्य समित्या आहेत जी आमची सदस्य संखा आहे, संख्या बळाच्या आधारावर सर्व पक्षाचे सदस्य या समित्यांचे सदस्य असतील, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> मा. महापौर, आयुक्त साहेब, आताच सभागृह नेता यांनी मोठे भाषण दिले आहे, की, कार्यालय गळत आहे, सभागृह गळत आहे, आम्हांला लाज वाटते की, आपली सत्ता असतांना सभागृहाची आणि कार्यालयाची अशी अवस्था आहे. खास करून विरोधी पक्ष कार्यालय ते आपण जाणूनबजून केलेला

आहे, असा आमचा आरोप आहे. १० वर्ष पुर्वी आम्ही आपल्या बरोबर सत्तेमध्ये होतो. आज महापौर तिथे बसल्या आहेत, त्या सुध्दा आमच्या बरोबर सत्तेमध्ये होत्या. जीवनभाई पण सत्तेमध्ये होते आणि आपण होते, तेव्हा मनोज लासी विरोधी पक्षामध्ये होते. त्यावेळी आपला विरोध कमी पडत होता आणि विरोध बरोबर करू शकत नव्हते.

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u> त्यावेळी आपल्याला विरोधी पक्ष समजदार मिळाला होता. जे मुद्दे शहराच्या हितासाठी होते आम्ही त्या मुद्दयांना पाठिंबा देत होतो. जेव्हा जेव्हा शहर हिताचे मुद्दे होत नव्हते तेव्हा मनोज लासीचा आवाज ५४ लक्षवेधीच्या माध्यमातून याच महासभागृहामध्ये गाजला आहे आणि याच सभागृहामध्ये उभा आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> तुम्ही स्वत:च्या स्वार्थासाठी उभे होते. बाकीच्या ज्या गोष्टी आहेत, महापौर मॅडम यांनी जो मोठे भाषण दिले की, महसुल समिती स्थापन होईल, शहराचे महसुल वाढेल आणि चांगली कामे होतील, लोकांना न्याय मिळेल. आज आपल्याकडे पाणी पुरवठा समिती आहे, त्यामुळे लोकांना न्याय

मिळत आहे का? पाणी मिळत आहे का? शहरातील पाण्याची सर्व समस्या सुटलेल्या आहेत? पाणी तो निसर्गाच्या नियमानुसार पडत आहे, त्यामुळे त्रास होत आहे, ती गोष्ट वेगळी आहे. परंतु ज्या आपल्या समित्या बनलेल्या आहेत, सार्वजनिक बांधकाम समिती आहे, सार्वजनिक बांधकाम समितीमध्ये जे कामकाज चालले आहे, ते बरोबर चालले आहे का? त्याची चर्चा आपण आताच सभागृहामध्ये केली आहे. आपली कामे होत नाहीत, तर मग लोकांना न्याय मिळाला का? वडोल गावाचे पुल बनला? त्याचे ठेकेदार कोण आहेत त्याचे नाव पण आपण ऐकले आहे आणि त्याची तक्रार कोणी केली हे पण आपल्यांना माहीत आहे, मी सांगण्याची गरज नाही. त्याचे काम बंद व्हायला पाहीजे आणि तक्रार कोणी केली आहे, हे पण मला माहीत आहे. जे आता मनोजभाई यांनी सांगितले आहे की, पोट आमचे आहे, दु:खत आहे, परंतु कधी कधी औषध आम्हांला दयावे लागते. औषध देण्याचे काम आम्ही करतो, जमाल गोटा पण आम्हीच देतो. ठिक आहे, या समित्या बनवायच्या असतील तर बनवा. आम्ही कोर्टमध्ये जाऊ आणि कोर्टमध्ये न्याय मागू आणि कोर्टाने न्याय दिला नाही तर आम्ही आंदोलन करू.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> मा. महापौर, मॅडम, उप महापौर, माझे जुने सत्ताधारी मित्र, माझे मित्र पक्ष, प्रदेशामध्ये, केंद्रामध्ये आम्ही बरोबर आहे. दुरदैवाने आम्ही इथे एकत्र नाही हे मला दु:ख वाटते. जरी आज एकत्र नाही, पण उद्या एकत्र राहू. राजकारणात कोणी कायमस्वरूपी मित्र नसतो आणि कायमस्वरूपी शत्रू नसतो. आपण सांगितले की आम्ही आंदोलन करू. जर या समित्या स्थापन झाल्या नाही तर आपण आंदालन करणे सोडून देणार का? असे पण नाही की, आंदोलन करणे हा प्रत्येक पक्षाचा लोकतंत्र अधिकार आहे. जर आपण सांगत आहेत की, आंदोलन करत आहेत, तर आम्हांला आनंद होत आहे, विरोधी पक्ष किती आंदोलन करणार, जो सत्तापक्षामध्ये बसून असेल आणि चांगल्या प्रकारे काम करील. जेव्हा एखादया वेळस व्यक्तीचा रेसमध्ये पहीला नंबर आले होता. तेव्हा पत्रकारांनी विचारले आपण काय करीत होते. तेव्हा त्यांनी सांगितले की, मी काहीच करत नव्हतो, माझा पहीला नंबर यामुळे आला की, माझ्या मागे कोणी तरी कुत्रा सोडला होता. आपण सांगितले की, आपण न्यायालयामध्ये जाणार आहेत, तो पण तुमचा अधिकार आहे. आपण जा आंदोलन करा. परंतु सत्ता पक्षा जवळ जे अधिकार आहेत, ते आपण वंचित करू शकत नाही. ज्या प्रकारे सभागृह नेता यांनी सांगितले की, आपण काल पण मित्र होतो, आज पण मित्र राहू! या सगळे मिळून आपण हा प्रस्ताव पास करू. आज आम्ही सत्तेमध्ये आहेत, उद्या तुम्ही सुध्दा सत्तेमध्ये येऊ शकतात. तेव्हा तुम्ही आम्हांला एडजेस्ट करून घ्याल आणि आज आम्हांला एडजेस्ट करू दया. असे आमचे बोडारे साहेब बोलत होते. जर आपल्या भाषेमध्ये एडजेस्ट करणे आहे, परंतु आमच्या भाषेमध्ये एडजेस्ट करणे नाही. तरी सुध्दा सर्वसंमतिने या प्रस्तावाला पास करू या, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> प्रदिपजी आपण एक तर चुकीचे बोलेले आहेत, पहीले आपण न्यायालयाचा उल्लेख केला आणि नंतर आपण बोलेले की, मागे कुत्रा सोडला. त्याचा अर्थ न्यायालय कुत्रा झाला का? असे चुकून पण झाले नाही पाहीजे.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> नाही नाही मी फक्त एक उदाहरण दिले आहे. जेव्हा विरोधी पक्ष जास्त सक्रिय होतो, तेव्हा सत्ता पक्षाला जास्त काम करावे लागते.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> ठिक आहे, कोणत्याही गोष्टी काही तरी मर्यादा असली पाहीजे. या शहरासाठी मी पहीलेच सांगितले आहे की, ठाण्यामध्ये सात समित्या आहेत, कल्याणमध्ये सात समित्या आहेत. तर या शहरामध्ये ९ समित्या, १० समित्या पहीलेच आहेत. आज आपण १४ समित्या बनवणार अहोत. पहीले काय होते, जसे की, "गिता का ग्यान बताते है बडे है"! आज कोणाच्या जवळ आहे, उद्या आनखी कोणाच्या तरी जवळ असेल आम्ही हेच सांगत आहे. तर हे परिवर्तन आहे. मराठीमध्ये एक गाणे होते. "काय होतास तु काय झालास तु" पहीले चांगले होते, जेव्हा इथे होते तेव्हा चांगले होते, आणि आता तिकडे गेल्यानंतर बदलून गेले. पहीले शहराचा विचार करत होते, आता स्वत:चा विचार करायला लागले. आता १४ समित्या बनायला लागल्या. तर या १४ समित्या खुपच जास्त झाल्या आहेत. समित्यांना आमचा विरोध नव्हता पहीलेच सांगितले आहे. महसुल समिती बनली तेव्हा या लोकांनी हरकत घेतली होती आणि आता हरकती घेत अहोत तर आनखी चार समित्या करायच्या बोलत आहेत. तर प्रत्येक वेळी भुमिका बदलली पाहीजे. प्रत्येक वस्तुची एक सिमा असते, लिमिट असते, हे सिमेच्या वरती झाले आहे. त्यामुळे याला आमचा विरोध आहे.

या वेळी सदस्या श्रीमती डिंम्पल ठाकुर हया सभागृहातून बाहेर गेल्या.

<u>महापालिका सचिव :—</u>विरोध असेल तर मतदान घ्यावे लागेल.

<u>सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानी:—</u> ठराव वाचून दाखवत आहेत.

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे १) मालमत्ता देखभाल व दुरुस्ती समिती, २) भांडार नियंत्रण समिती, ३) पर्यावरण उपाययोजना व नियंत्रण समिती, ४) प्राथमिक शिक्षण समिती या ०४ विशेष समित्यांची रचना करणेस मान्यता देत आहे.

<u>तसेच</u>

सदर समितीत पक्षीय बलाबलानुसार ९ सदस्य निवडण्यात येतील.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

<u>महापालिका सचिव :—</u>मतदान घ्यावे लागेल. जे या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या बाजूने ३२</u>

१. श्रीम.मिना आयलानी
२. श्री. जीवन इदनानी
३. श्रीमती कविता पंजाबी
४. श्रीमती इंदिरा उदासी
५. श्रीमती दिप्ती दुधानी
६. श्री. अजित गुप्ता
७. श्रीमती मिना सोनेजी
८. श्री. शंकर लुंड
९. श्री. राजेश वानखेडे
१०.श्रीमती ज्योती चैनानी
११.श्री. महेश सुखरामानी
१२.श्रीमती अर्चना करनकाळे
१३.श्रीमती मिनाकौर लबाना
१४.श्रीमती जया माखिजा
१५.श्रीमती पंचम कालानी
१६.श्रीमती लक्ष्मी सिंह
१७.श्रीमती कविता गायकवाड
१८.श्रीमती आशा बि—हाडे
१९.श्रीमती रेखा ठाकुर
२०.श्रीमती दिपा पंजाबी
२१.श्रीमती गिता साधनानी
२२.श्री. रविंद्र बागुल
२३.श्रीमती सविता तोरणे
२४.श्रीमती छाया चक्रवर्ती
२५.श्रीमती शुभांगीनी निकम
२६.डॉ. प्रकाश नाथानी
२७.श्री. रवि जग्यासी
२८.श्री. हरेश जग्यासी
२९.श्री. राजेश वदारिया
३०.श्री. जमनादास पुरस्वानी
३१.श्री. किशोर वनवारी
३२.श्री. गजानन शेळके

<u>महापालिका सचिव :–</u>जे या प्रस्तावाच्या विरोधात आहे त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या विरोधात २९ मते</u>

१. श्री. रमेश चव्हाण
२. श्री. धनंजय बोडारे
३. श्री. सुनिल सुर्वे
४. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
५. श्रीमती राजश्री चौधरी
६. श्रीमती वसुधा बोडारे
७. श्रीमती लिलाबाई आशान
८. श्रीमती चरणजीतकौर भुल्लर
९. श्रीमती ज्योती गायकवाड
१०. श्रीमती पुष्पा बागुल
११.श्रीमती ज्योती माने
१२.श्रीमती शुभांगी बेहनवाल
१३.श्री. स्वप्नील बागुल
१४.श्री. आकाश पाटील
१५.श्री. सतरामदास जेसवानी
१६.श्री. समीर कांबळे
१७.श्री. कलवंतसिंह सोहता
१८.श्रीमती ज्योत्स्ना जाधव
१९.श्रीमती अंजना म्हस्के
२०.श्रीमती मिताली चान्पुर
२१.श्रीमती सुरेखा आव्हाड
२२.श्री. राजेंद्र चौधरी
२३.श्री. शेखर यादव
२४.श्री. भारत राजवानी
२५.श्री. भगवान भालेराव
२६.श्रीमती कविता बागुल
२७.श्रीमती सुनिता बगाडे
२८.श्रीमती पुजा लबाना
२९.श्री. प्रमोद टाले

<u>महापालिका सचिव:–</u> या प्रस्तावाच्या बाजूने ३२ मते आणि प्रस्तावाच्या विरोधात २९ मते हा प्रस्ताव बहुमताने झाला.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत बहुमताने पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. २:– <u>प्रस्तावाची सूचना</u>

विशेष ०४ समित्यांची रचना करणेबाबत पालिका सदस्य श्रीमती मिना सोनेजी(सोंडे) व श्री. रवि जग्यासी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० मधील अटीनुसार महापालिकेस आपल्या विशेष ठरावाद्वारे आपले अधिकारी व कर्तव्य पैकी कोणतेही अधिकारी व कर्तव्य पार पाडण्यासाठी विशेष समितीची रचना करता येते.

त्यानुसार दि.२४/०४/१७ रोजीच्या महासभेत ९ समित्यांची रचना करण्यात आलेली आहे.

१. मालमत्ता देखभाल व दुरुस्ती समिती :— भाजी मार्केट, उद्यान, सभागृह, अशा विविध महापालिकेच्या प्रॉप्रटीवर नियंत्रण नसल्याने त्यावर नियंत्रण ठेवण्याकरिता मालमत्ता देखभाल व दुरुस्ती समिती रचना करणे आवश्यक आहे.

२. भांडार नियंत्रण समिती :— उल्हानगर महानगरपालिकेत भांडार विभागाने केलेली खरेदी विक्री, वाटप तसेच टेंडर याबाबत नियोजन नसल्याने त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भांडार नियंत्रण समिती रचना करणे आवश्यक आहे.

३. पर्यावरण उपायोजना व नियंत्रण समिती:— उल्हासनगर महानरगपालिकेने ३१ जुलै रोजी पर्यावरणाबाबत माहिती देणे आवश्यक आहे. शहरातील पर्यावरण समातोल राखण्यासाठी वृक्षरोपण करणे, तसेच विविध प्रकारच्या उपायोजना, विशेष मेहिम राबविण्याबाबत पर्यावरण उपाययोजन व नियंत्रण समिती रचना करणे आवश्यक आहे.

४. प्राथमिक शिक्षण समिती :— उल्हासनगर महानगरपालिका प्राथमिक शिक्षण अंतर्गत अंदाजित ५,५०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, शाळेची देखभाल, शाळेची दुरुस्ती, पटसंख्या वाढविणे यावर नियंत्रण ठेवण्याकरिता प्राथमिक शिक्षण समितीचा रचना करणे आवश्यक आहे.

<u>महासभा ठराव क्र: १३</u> <u>दिनांक:—१८/७/२०१७</u>

सुचकाचे नाव :— श्रीमती मिना सोनेजी

अनुमोदकाचे नाव :— श्री. रवि जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे १) मालमत्ता देखभाल व दुरुस्ती समिती, २) भांडार नियंत्रण समिती, ३) पर्यावरण उपाययोजना व नियंत्रण समिती, ४) प्राथमिक शिक्षण समिती या ०४ विशेष समित्यांची रचना करणेस मान्यता देत आहे.

<u>तसेच</u>

सदर समितीत पक्षीय बलाबलानुसार ९ सदस्य निवडण्यात येतील.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>बहुमताने</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————————

— **विषय क्र. ३:—** उल्हासनगर महानरगपालिका हददीत असलेल्या उघडयावर मटन,चिकन,मच्छि, विक्री शॉप बंद

करणेबाबतचा पालिका सदस्य श्रीमती मिना सोनेजी(सोंडे) व श्री. जमनादास पुरस्वानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

———————————————————————————————————————

<u>**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—**</u> मा. महापौर मॅडम, उप महापौर, आयुक्त साहेब, जे मटनाची दुकाने आहेत, चिकन आणि मच्छिचे स्टोर्स आहेत, ते प्रार्थनास्थळे आणि शाळांच्या जवळ आहेत. त्या बाबतीत नियम आहे की, सदरची दुकाने ही १०० मिटरच्या बाहेर असले पाहिजेत. जर आपण या वस्तु हायजनिक प्रपोजनुसार बघितले तर, ते उघडयावर ठेवले जाते. ज्यामुळे मच्छर आणि काही माश्या या पदार्थावर बसतात आणि त्याचे नुकसान करतात. त्यासाठी आपण एक ठराव पास करायला पाहीजे, जे मटन कापलेले असते, ते काचेच्या भांडयामध्ये असायला पाहीजे. त्यामुळे आपण मच्छर, माशा पासून त्याचे रक्षण करू शकतो. तिसरी गोष्ट म्हणजे केंद्र शासनाचा एक ठराव आहे की, जिथे मटन किंवा मासे कापले जातात, तिथे ते विकले जात नाही. परंतु उल्हासनगरमध्ये यावर कोणतेही निर्बध नाहीत. इथे कोणतेही मटनाचे दुकान असेल त्यांच्या जवळ

परवाना, आय.एस.आय. मार्क अशा कोणत्याही गोष्टींवर लक्ष ठेवले जात नाही. कारण की ते मटन खाल्यामुळे कोणत्याही माणसाला त्यामुळे प्रॉब्लेम होऊ शकतो. त्यासाठी मला वाटते की, जे मटनाची दुकाने असतील त्यांच्याकडे परवाना असला पाहीजे आणि जे मटन खरेदी करतात. त्याच्यावर मार्किंग असायला पाहीजे आणि तिसरी गोष्ट म्हणजे सिलाटींग वॉटर असायला पाहीजे. त्यासाठी काही नियम आहेत, जिथे विक्री होते तिथे कटींगचे काम होत नाही. दुर्भाग्य असे की, मी माझ्या वार्डामध्ये पाहीले की, एक लहान मुलगी बाहेर जात होती. रस्त्याच्या बाजुलाच एक चिंकनचे दुकान होते. त्यांनी ज्या प्रमाणे चिकन कटींग केले, आणि त्या लहान मुलीने बघितले, त्यावेळी ती मुलगी चक्कर येऊन पडली. तर या सगळया गोष्टी बाजुला झाल्या पाहीजेत. प्राथनास्थळे आणि शाळा या काही संस्था आहेत, तेथून १०० मिटरच्या अंतरामध्ये मटन, मच्छि विक्री झाली नाही पाहीजे, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. महेश सुखरामानी:—</u> मी माझी बहीण मिना सोंडे आणि जमुनादास पुरस्वानी यांना धन्यवाद देतो की, आम्ही सर्व लोक आणि सर्व सदस्य, उल्हासनगरमध्ये मटन विक्री, मच्छि विक्री जी होते ती आपण बघत आहे की, प्रत्येक गल्ली आणि प्रत्येक चौकांमध्ये याची दुकाने आहेत. त्यामुळे शहरात घाणीचे साम्रज्य पसरले आहे, आणि ही दुकाने प्रार्थनास्थळांच्या खुपच जवळ आहेत. जर आपण तिथे बोलायला गेलो तर तिथे भांडणे होत आहेत. माझे सन्माननिय सदस्यांना, महापौरांना आणि आयुक्त साहेबांना ही विनंती आहे की, लवकरात लवकर निर्णय घेऊन महाराष्ट्र शासन कलम नं.२२६ मध्ये असे नियम आहे की, त्यांना परवाना घ्यायचे आहे आणि प्रत्येक वर्षी त्याचे नुतणीकरण करायचे आहे आणि जसे ट्रेड लायसन्सचे कायदे असतात, त्याच कायदयामध्ये हे येतात. त्याप्रमाणे त्यांना त्या नियमांचे पालन करायचे असतात. जर या नियमांचे पालन केले नाही तर त्यांच्यावर कठोर कारवाई केली पाहीजे. आमचे उल्हानगर हे धार्मिक क्षेत्र आहे. येथे भरपूर मंदिरे आहेत, गुरूद्वारे आहेत, सभास्थळ आहेत. त्यांच्या जवळच या सर्व गोष्टी होत आहेत आणि महानगरपालिकेच्या प्रत्येक प्रभागामध्ये एक मच्छि मार्केट आहेत. त्यांना दुसरीकडे स्थलांतरीत करून स्थापन केले पाहीजे. कोणालाही मच्छि विकत घ्यायची असेल तर त्यांनी तिथे जायला पाहीजे किंवा त्यांना नियम लागू केले पाहीजेत. त्यांना कुठही परवाना देण्यात येवू नये. प्रत्येक प्रभागमध्ये मच्छिमार्केट आहे, तिथे त्यांची व्यवस्था करायला पाहीजे, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—</u> मा. महापौर, उल्हानगर—५ मध्ये मराठी शाळा क्र. १९ येथे चालिया मंदिराच्या बाजूला सुध्दा मच्छिमार्केट आहे. याच्या पहीले मटन मार्केट होते, त्यांची दुकाने आत मध्ये होती. त्यांची दरवाज्याची बाजू आतमध्ये होते. परंतु आता त्यांची दरवाजे बाहेरून आहेत. बाहेरच्या बाजूला बकरे कापतात, कोंबडया कापतात. जसे की मिनाताई यांनी सांगितले की, एका दुकानामध्ये कोंबडया कापत असतांना त्यांच्या वार्डामध्ये एका मुलीने बघितल्या नंतर तिला चक्कर आली. अशा प्रकारचा त्रास भरपुर मुलांना झाले आहे. मटन मार्केट असायला पाहीजेत, परंतु ते नियमानुसार असायला पाहीजेत. जे नियम असतील त्यानुसार मच्छि मार्केट, मटन मार्केट चालवा. नाही तर मुलांना आणि लोकांना त्याचा त्रास होईल.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> मा. महापौर, हा जो प्रस्ताव आलेला आहे, तो चांगला प्रस्ताव आहे. मा. सदस्यांनीया प्रस्तावासाठी ज्या ज्या सुचना केल्या आहेत, त्या सुचनांची प्रशानाकडून अंमलबजावणी होईल का? आपण महानगरपालिकेचे सभागृहामध्ये असे भरपुर ठराव करीत असतात, पण त्यांची कुठलीही अंमलबजावणी होत नाही. महानगरपालिका १९९७ मध्ये झाली आहे. त्याच्या पहीले नगरपरिषद होती. आज पर्यंत माहीत आहे की, जे मटन विक्रीते, मच्छि विक्रीते आहेत, अशा भरपुर लोकांकडे परवाने नाहीत. ही दु:खाची गोष्ट आहे. जर प्रशासन याची अंमलबजावणी करीत असेल तर ठराव करून त्याचा फायदा होईल. नाही तर त्याचा काहीही फायदा होणार नाही, जर अंमलबजावणी करीत असतील तरच ठराव करा अशी आमची मागणी आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> मा. महापौर, एकदम किरकोळ गोष्टी सांगतो की, आता जी मिना सोंडे यांनी जो प्रस्ताव मांडला आहे, तो चांगला आहे. परंतु याच्यामध्ये १०० मिटरच्या बाहेर, म्हणजे एखादी शाळा असेल, मंदिर असेल किंवा इतर काही धार्मिक स्थळे आहेत, त्यासाठी १०० मिटरचा कायदा आहे का? पहीली गोष्ट त्याचा जरा खुलासा झाला तर बरे होईल आणि जर तसे असेल तर खरोखरच या उल्हासनगर शहराच्या ठिकांनी ७० टक्के ठिकाणे शाळेजवळ आणि धार्मिक स्थळे यांच्या जवळ मटन विक्री, मच्छि विक्री अशी होते. तर कृपया करून आपण याचा पहीले खुलासा करा. नंतर सभागृहाला निर्णय घ्यायला बरे पडेल.

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:—</u> मा. महापौरजी, मी मध्येच बोलत आहे, त्यामुळे मी माफी मागतो. दुसरी पण एक गोष्ट मला विचारायची आहे, त्याचा आपण खुलासा करण्यात करावा. ज्या बाबतीत मा. सुनिल सुर्वे यांनी सांगितले आहे की, १०० मिटरच्या बाहेर जिथे मंदीर असतील, हॉस्पीटल असतील, शाळा असतील १ नंबर पासून ते ५ नंबर पर्यंत ज्याच्या मनात आले त्यांनी पाहीजे तिथे चिकन आणि मटनाची दुकाने असतात. त्याच्या नंतर चिकन आणि मटन बकरे असे लोंबकळ ठेवतात की, जे धार्मिक लोक आहेत, त्यांच्या भावना

दु:खावल्या जातात. १ नंबर पासून ५ नंबर पर्यंत मच्छिमार्केट बनलेले आहेत. इंदिरा गांधी भाजी मार्केट जो ३ नंबर येथे बनवला आहे, तिथे व्हेज, नॉनव्हेज दोन्ही आहेत. ५ नंबरमध्ये सुध्दा मच्छिमार्केट आहेत आणि १ नंबरमध्ये पण आहेत. प्रत्येक कॅम्पमध्ये मच्छिमार्केट बनले आहेत. तर मच्छिी मार्केट, मटन मार्केट, या कोणत्याही वस्तु मार्केटमध्ये ठेवायच्या आहेत आणि व्हेज, नॉनव्हेज दोन्ही आहेत. १ नंबर पासून ते ५ नंबर पर्यत ज्याला वाटले त्यांनी कुठेही ठेवण्यात येते. असा कुठेही ठेवण्यासाठी कायदा आहे का? जसे आमचे सदस्य, श्री. सुनिल सुर्वे बोलतात की, १०० मिटरच्या आतमध्ये ठेवणे असा कायदा आहे का? तर मग असा पण कायदा आहे का? १ नंबर पासून ते ५ नंबर पर्यंत कोणालाही वाटले की, जसे हॉस्पिटल असतील, मंदिर असतील, मुख्य रस्ता, गल्लीमध्ये त्यांना वाटेल तिथे ही लोक दुकान टाकतात. अशा लोकांना मच्छि मार्केटमध्ये स्थलांतरीत करायला पाहीजे. तर कृपया करून हे पण सांगा की, ज्याला पण जिथे वाटले तिथे दुकान थाटतात असा पण कायदा आहे का? त्यासाठी मार्केट आहेत, त्या सर्व लोकांनी मार्केटमध्ये जायला पाहीजे.

**उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकर:—** मा. महापौर, मा. सन्माननिय सदस्य, १०० मिटर किंवा काही असे पेसिफिक नाही. परंतु लोकांच्या भावना दु:खावल्या जावू नयेत आणि त्यांच्यावरती आपल्याला जे काही निर्बंध घालण्यात येतील हे बाकी गरज आहे. त्याच्यामध्ये आपल्याकडे ट्रेड लायसेन्सच्या प्रासेजर कुठही केल्या नाहीत किंवा ट्रेड लायसेन्स दिले जात नाहीत. त्या संदर्भात कारवाई चालू आहे. तथापी मटन विक्री करत असतांना त्यांनी कशा पध्दतीने करावे, खुल्या जागेत करू नये, त्यांनी मटन कापतांना व्यवस्थिपणे जनावरांची डॉक्टरकडून तपासणी केली पाहीजे. त्या नंतर स्टॉटर हाऊसमध्ये करावे, परंतु आपल्या सर्व भागांमध्ये स्टॉटर हाऊस नाहीत. असे अनेक प्रश्न आहेत आणि ते जर सोडवले गेले तरच आपल्यांना ट्रेड लायसन्सद्वारे त्यांना लायसन्स देण्यात येतील. नाही तर त्यांना देताच येणार नाहीत. परंतु सन्माननिय सदस्यांनी जो प्रस्ताव आणलेला आहे, तर मच्छि विक्रेते, मटन विक्रेती त्यांनी दुकानाच्या आतमध्ये मटन ठेवण्यात यावे. त्यांना धंदा करण्यासाठी आपण जो पर्यंत ट्रेड लायसन्स देत नाहीत, तर त्यांना धंदा करणे आवश्यक आहे. आपले जे काही नागरीक आहेत, त्यांचे म्हणणे आहे की, तर त्यांनी त्याच्यामध्ये त्या जनावरांची तपासणी करणे, जर ते खाण्यास योग्य असेल तरच त्याची कापणी करणे, कापणी करत असतांना योग्य त्या पध्दतीने कापणी करणे, मटन विक्री करत असतांना ते उघडयावर ठेऊ नये. त्याची योग्य ती काळजी घेण्यात यावी. हे सगळे आपल्याला कंडीशन टाकून वार्ड आफिसमध्ये तशा सुचना देवून याच्यावर रिस्ट्रेक्शन्स आणता येईल.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** प्रभाग अधिका—यांना माहीत आहे का? नाही तर त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** साहेब वार्ड ऑफिसर हजर आहेत का? गणेश शिंपी, मनिष हिवरे रशियाला गेले आहेत. महानगरपालिकेचे वार्ड ऑफिसर कुठे आहेत.

**उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकर:—** सन्माननिय सदस्य, आपण त्यांना लेखी पत्राद्वारे सगळया सुचना देवू.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** महानगरपालिकेचे सर्व अधिकारी कुठे आहेत?

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** बाकीचे अधिकारी कुठे आहेत, गणेश शिंपी आणि हे दोनच अधिकारी नाही, यांच्या बरोबर अजून अधिकारी आहेत, ते पण बोला आणि अजून कोण आहेत, भदाणे पण नाहीत.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—** सन्माननिय महापौर मॅडम, आयुक्त साहेब विषय बदली करू नका? प्लिज.

**सदस्य, श्री. सुरेंद सावंत:—** सन्माननिय महापौर मॅडम, आपण आता जो प्रस्ताव टाकलेला आहे, अशासकिय प्रस्ताव आपल्याकडे आलेला आहे, मटन विक्रीसाठी तो प्रस्ताव आलेला आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** महापौर मॅडम विषयाला धरून बोलेले पाहीजे, विषय बदलत आहेत.

**सदस्य, श्री. सुरेंद सावंत:—** विषय मला बदलायचा नाही, मी या विषयावरच बोलत आहे. मी आपल्या सभागृहाचे लक्ष वेधीत आहे की, आपण जो अशाकिय प्रस्ताव आणला आहे. त्या अशाकिय प्रस्तावाची या सभागृहाला गरजच नाही. मुळात मटन विक्री करणे, मांस विक्री करणे या बाबत नगरपालिकेचे कायदे आहेत, महानगरपालिकेचे कायदे आहेत आणि केंद्र शासनाचे पण कायदे आहेत. केंद्र शासनाने सन २००९ साली सर्व महानगरपालिकेला जो कायदा पाठवला आहे. त्या कायदयामध्ये स्पष्ट उल्लेख आहे, ज्या ठिकाणी दोन बकरे कापले जातात, ५० कोंबडया कापले जातात आणि ज्या ठिकाणी एक मोठे जनावर कापले जाते, त्या ठिकाणी आणि त्या व्यावसायीकाला, त्या कसायाला ते कापण्यासाठी संबंधित महानगरपालिकेची परवानगी घेणे बंधनकारक आहे. हा सन २००९ चा कायदा केंद्र शासनाचा आहे, हे मी सांगत नाही. केंद्र शासनाचा सन २००९ चा कायदा आहे आणि त्या प्रमाणे त्या कायदयाच्या प्रती, प्रत्येक महानगरपालिकेमध्ये, नगरपालिकेमध्ये आलेल्या आहेत. मी प्रश्न विचारतो की, महानगरपालिकेचा जो आरोग्य विभाग आहे, तो आरोग्य विभाग सद्या काय करीत आहे. आरोग्य विभागाच्या समोरच मटन विक्री सगळ होत आहे. माझ्या माहीती प्रमाणे उल्हासनगर शहरामध्ये कोंबडया आणि बक—या कापल्या जातातच, परंतु सद्या जो देशभर विषय गाजत आहे,

त्या गोहत्या पध्दतीचा विषय जो असा आहे, त्या गोहत्या पध्दतीचा बरेसचे मटन उल्हासनगर शहरात राजरोसपणे विक्रीला ठेवले जात आहे. मी ठामपणे सांगू शकतो की, उल्हासनगरच्या सम्राट अशोकनगरमध्ये आपल्याला बिफचे मटन मिळू शकते. ५ नंबर कॅम्पांमध्ये आपल्याला बिफचे मटन मिळू शकते हे मी ठामपणे सांगतो आणि या विषयावर आपले आरोग्य खाते लक्ष देत नाही. ही फार महत्वाची गोष्ट आहे. मी आपल्याला विनंती करतो की, बिफच्या मटनाचे संपुर्ण देशामध्ये विषय गाजत असतांना उल्हानगरमध्ये ते विक्री होते आणि या उल्हासनगरमध्ये भारतीय जनता पार्टीचेच राज्य आहे. बी.जे.पी.ची सत्ता आहे आणि त्यांच्या सत्तेमध्ये जर असे होत असेल तर तुम्हांला महापौर मॅडम सत्तेवर बसण्याचा अधिकार नाही. अगोदर त्याची व्यवस्था करा. उल्हानगरमध्ये जर गो हत्या होत असेल, जर बिफचे मटन विक्री होत असेल, ते अगोदर थांबवा. त्या नंतर हे जे बाकीचे कायदे आहेत, अशासकीय कायदे जे तुम्हांला ठराव करायचे असतील ते तुम्ही बिनधास्त करा. आमचे काही म्हणणे नाही. परंतु शासनाचे जे कायदे आहेत, आरोग्य विभाग आहे, त्या आरोग्य विभागाने लक्ष दयायला पाहीजे आणि मी तुम्हांला सांगतो मागच्या ५० वर्षापासून नगरपालिका होती, नगरपालिकेने आरोग्य विभागाकडे परवाने दिले आहेत. महानगरपालिका १९९७ साली झाली, १९९७ नंतर महानगरपालिकेने लोकांना किती ट्रेड लायसन्ससाठी किती लोकांना लायसन्स दिले आणि मग किती मागण्या आल्या आणि मी सांगतो की, आपण लायसन्स दिले नसतील तर हया विक्री कसे होतात. मी सांगतो, अगदी स्वच्छता निरीक्षक ऑफिसच्या समोर मटन विक्री होत असते. मग त्या ठिकाणी मटन विक्री कशी काय होते, त्या ठिकाणी बिफ विक्री कशी काय होते. या बदल सभागृहाने जास्त लक्ष दयायला पाहीजे आणि अशा प्रकारचे अशासकिय ठराव करण्यापेक्षा जो आरोग्य विभाग आहे, त्यांनी कार्यरत रहावे. कार्यरत असेल किंवा नसेल त्यांचे दुर्लक्ष होत असेल, तर अशा प्रकारे दुर्लक्ष करणा–यांनावर कारवाई केली पाहीजे. मी तर म्हणतो, आरोग्य खात्याचे कोणतेही उप आयुक्त किंवा अधिकारी असतील त्यांनी य बाबतीत खुलासा करावा आणि अगोदर सांगावे की आम्ही एवढे लायसन्स दिलेले आहेत. कारण की एवढया कोंबडया कापल्या जातात आणि एवढया बक–या आठवडयाला कापल्या जातात. एखादा मोठा जनावर या ठिकाणी कापला जातो, ही माहीती तुमच्याकडे जर असेल तर ती आम्हांला दयावी आणि नंतर हा ठराव मंजुरीस घ्यावा, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः–</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, हा जो विषय आपण इथे प्रस्तावीत केला आहे. त्याचा मुख्य उद्देश जो आहे, चिकन, मटन, मच्छि जे हातगाडयांवर उघडयावर मिळते, तिथे माश्या, मच्छर आणि उघडयावर विकल्या नंतर त्याची कोणतीही गॅरंटी असत नाही. विक्री करणारे कोण आहेत, ते आमच्या सदस्यांनी सांगितले आहे की तिथे कोणती वस्तु विकली जाते, त्याची सुध्दा माहीती नसते. घेणारा घेऊन जाईल आणि त्यासाठी उघडयावर, हातगाडीवर या वस्तु विकल्या नाही पाहीजेत. त्याचे एक दुकान असायला पाहीजे. एक नियमावली असली पाहीजे आणि त्या नियमावलीनुसार त्याचा कत्तलखाना आतमध्ये असायला पाहीजे. कशा प्रकारे विकत आहे आणि समोरची व्यक्ति काय विकत आहे, त्याची माहीती सुध्दा आपल्याला नसते. तर हा ठराव आपण आणलेला आहे, तो पास होईल. परंतु जसे आमच्या सदस्यांनी सांगितले आहे की, त्या ठरावाची अंमलबजावणी व्हायला पाहीजे. ते दुकान, चिकण, मटन, मासे हातगाडीवरती विकणे बंद झाले पाहीजे. असे झाले नाही पाहीजे की, आम्ही ठराव करणार आणि तो तसाच पडून राहील, असे व्हायला नको. तर मा. महापौर मॅडम, आपला एक सक्षम अधिकारी त्याच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी असायला पाहीजे आणि उघडयावर जे मटन, मासे विक्री होते, ते बंद झाले पाहीजे.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः–</u> सभागृह नेता योनी मटनाच्या विक्रेतेच्या बाबतीने एक कमिटी बनवावी, मटन कमिटी बनवा.

<u>सदस्य, श्री. सुरेंद सावंतः–</u> आरोग्य विभागाचे मुख्य कोण आहेत, त्यांनी या प्रश्नांचे उत्तर दयावे की, शहरामध्ये रासरोसपणे मटनाची किती विक्री होते. बेकादेशीर जे होत आहे आणि त्याला जबाबदार कोण आहे. त्यांनी जर उत्तर दिले तर आपल्याला ठराव करण्याची गरजच नाही.

<u>महापालिका सचिवः–</u> सर्वसंमतीने ठराव पास करायचा?

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः–</u> पास कसा होणार ठराव?

<u>महापालिका सचिवः–</u> याच्यामध्ये जे काही पॉईंट टाकायचे असतील ते आपण दया.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः–</u> सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत साहेब, यांनी जे प्रश्न उपस्थित केले आहेत, कायदा सांगितलेला आहे. त्याची माहीती असणे महासभेला आवश्यक आहे, महापालिकेला माहीत आहे. आता या ठिकाणी ठराव तर पास होईलच पण देहेरकर साहेबांनी सांगिते आहे, की जर एखादे जनावर कापतांना त्या अगोदर त्याची वैद्यकिय तपासणी झाली पाहीजे. आपल्याकडे वेटरनरी डॉक्टर आहेत का? लायसन्स किती दिले आहेत, ते मुद्दे त्यांनी उपस्थित केले आहेत. किती विक्रते आहेत, चिकन, मटन किंवा इतर बिफ विक्री होते का? होत असेल तर ती कुठे होते. त्याच्यावर आपण काय कारवाई करणार आहेत.

सदस्य, श्री. सुरेंद सावंत:— मी त्या एरियाचे नाव पण सांगितले आहे, जिथे ते विक्री होते.

सदस्य, श्री. धनंजय बोडारे:— ५ नंबरला आणि ३ नंबरला त्याची माहीती घ्या, भले उद्या काढा. त्याच्यात परवाने धारक किती आहेत आणि बिना परवाने किती करतात. त्यांच्यावर कारवाई काय करणार आहेत, त्याची माहीती उद्या दया.

महापालिका सचिव:— ठरावात काही मुद्दे टाकायचे आहेत का ते सांगा, म्हणजे त्याचा समावेश करता येईल.

सदस्य, श्री. सुरेंद सावंत:— पहीले प्रश्नाचे उत्तर दया. २००९ चा जी.आर. तुमच्याकडे असेल.

सदस्य, श्री. भारत राजवानी:— बी.एम.सी. ॲक्टमध्ये सुध्दा तसे नमुद आहे, त्याचे अर्टीकल मी आपल्याना काढून देतो.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:— ते करा ना, त्याची अंमलबजावणी करा. या बाबतीमध्ये महानगरपालिका अधिनिमामध्ये काही तरतुद आहे का? ते बघा. शासनाचा निर्णय काय आहे तो बघा, केंद्र शासनाचा काय नियम आहे तो बघा. त्याची अंमलबजावणी प्रशासनाने केली पाहीजे, लायसन्स घेतले पाहीजे, नसतील घेणार तर त्यांच्यावर कारवाई केली पाहीजे.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— प्रस्तावामध्ये तेवढे नमुद करा.

महापालिका सचिव:— ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्या प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या उघडयावर असलेल्या मटन विक्री, मच्छि विक्री शॉप बंद करणेबाबत शासनाचे सन २००९ चे आदेश, तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात असलेल्या तरतुदीत याचे पालन करून बंद करण्यास मान्यता देत आहे.

सदस्य, श्री. महेश सुखरामनी:— अशी तरतुद करा की, नियम व्हायला पाहीजते की, जे लायसन्स धारक जो नविन लायसन्स घेतील, त्याला तेथील स्वच्छता आणि साफसफाई करणे, आणि जो कचरा निघत असतो तो फेकण्याची जबाबदारी त्याची असेल.

सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:— सचिव मॅडम, त्यामध्ये एक सुधारणा आहे, मटन विक्रीचे दुकान बंद करणे, असे नाही. जे विदाऊट लायसन्सचे असतील त्यांना बंद करण्यात यावे.

महापालिका सचिव:— मॅडम तुमचा प्रस्तावाच असा आहे. म्हणजे ज्यांच्याकडे लायसन्स नाहीत त्यांचे दुकान बंद करणे, आणि जे नियमात नसतील ते.

सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:— होय आणि जे मार्केटच्या बाहेर पण स्टॉल लावतात आणि हातगाडी लावतात त्यांना पण बंद करणे बंधनकारक आहे.

सदस्य, श्री. भारत राजवानी :— ज्यांच्याकडे लायसन्स नाहीत, त्यांना मुदतवाढ देण्यात यावी.

सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:— रस्त्यावर बसणा—यांना परवाना देवू नका.

सदस्य, श्री. भारत राजवानी :— बंद करा, जे अतिक्रमण आहेत ते पण हटवा.

महापालिका सचिव:— ठिक आहे, मॅडमनी सांगितले आहे की, जे परवानाधारक नाहीत त्यांना फक्त रद्द करा आणि त्यांना रस्त्यावर बसू देवू नका असे ठरावात नमुद करायचे आहे का? आणि सदस्य, भारत राजवानी साहेबांनी सांगितले आहे की, त्यांना लायसन्स घेण्यासाठी मुदत दया.

सदस्य, श्री. सुरेंद सावंत:— नविन मटनाचे परवाने कोणालाही देण्यात येऊ नये. जो आला त्याला तुम्ही नविन परवाने दयाल.

महापालिका सचिव:— नियमाप्रमाणे जे आहे, ते आलेले आहे.

सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:— नियमाप्रमाणेच करा मॅडम.

काही सदस्य :—पास—पास......

महापौर तथा पीठासीन अधिकारी :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ३ :— प्रस्तावाची सूचना

उल्हासनगर महानरगपालिका हददीत असलेल्या उघडयावर मटन,चिकन,मच्छि,

विक्री

शॉप बंद करणे. पालिका सदस्य श्रीमती मिना सोनेजी(सोंडे) व श्री. जमनादास पुरस्वानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीत अनेक ठिकाणी उघडयावर मटन, चिकन, मच्छि विक्री करण्यात येत आहे. मटन, चिकन, मच्छि विक्री हे दुकानाच्या बाहेर उघडयावर लटकावून करत आहे. सदर मटन, चिकन, मच्छि विक्री हे मंदिरे, पुजापाठ करण्याचे स्थळे यांच्यापासून १०० मीटरच्या अंतरावर होणे आावश्यक आहे. कारण पुजापाठ करणा—या लोकांच्या भावना दुखावल्या जात आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> १४ <u>दिनांक:—१८/७/२०१७</u>

सुचकाचे नाव :— श्रीमती मिना सोनेजी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत असलेल्या मटन, चिकन, मच्छि, विक्री शॉप सुरु ठेवणेबाबत केंद्र शासनाचे व शासनाचे २००९ चे आदेश आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा अन्वये उल्हासनगर शहरात मटन, चिकन, मच्छि व्यवसाय सुरु करण्यास परवानगी दयावी तसेच जे लायसन्स धारक नसतील त्यांची दुकाने त्वरीत बंद करणेसाठी तसेच उल्हासनगर शहरात रस्त्यावर उघडयावर सदर विक्री करणा—यावर प्रशासनास योग्य ती कार्यवाही करणेसाठी निर्देश देत देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————

⇨ विषय क्र. ४:— <u>प्रस्तावाची सूचना</u>

महापालिका सचिव म्हणून कायमस्वरुपी नियुक्ती करणेबाबत पालिका सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी व श्री. किशोर वनवारी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

————————————————————————————————————————

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> मला एक गोष्ट सांगा, आयुक्त साहेब ही सचिवचे जे पद आहे, सचिव पद कुठल्या संवर्गासाठी आहे. त्याला काय काय अपेक्षित आहे. त्यासाठी शिक्षण काय पाहीजे, त्याची पात्रता काय पाहीजे, त्यासाठी नौकरीमध्ये किती वर्षाचा अनुभव पाहीजे. त्याच्या संदर्भात मला वाटते की जरा सांगितले तर बरे होईल.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> पासचा प्रश्न इथे काय आहे? पासचा प्रश्न इथे नाही. पात्रता असेल हा विषय इथे बसलेल्या, कशाच्या आधारावर ही पदोन्नती आणि नियमबाहय करतात. कशाच्या आधारावर ते

मला सांगा. याला आधार कुठला आहे. याचा आधार सांगा, यांची पात्रता सांगा. मी या गोष्टी वाचून दाखवतो, या गोष्टी जर असतील, जर ते नियमाप्रमाणे असतील तर ही सचिव पोष्ट बिनधास्त दया. माझे म्हणणे मला मांडू दया, मला कोर्टात जायचे आहे. नंतर तुम्हांला काय करायचे आहे ते करा. विषय असा आहे, पहीली पात्रता बघा, प्राजक्ता कुलकर्णी प्रभारी महानगरपालिका सचिव शैक्षणि अर्हता प्रमाणे बी.ए., इंग्रजी टंकलेखन,

काही सदस्य :—पास—पास......

सदस्य, श्री. भगवान भालेराव:— पास तर करा ना बाबा तुमचे बहुमत आहे. पण आमचे म्हणणे तर मांडू दया. मला या महानगरपालिकेच्या सचिव पदासाठी अर्हता पाहीजे. त्याच्यामध्ये सेवा संवर्ग सेमी एक पद प्रशाकिय सेवा पाहीजे. महानगरपालिकेमध्ये सचिव आणि नगर सचिव त्यांना काय पाहीजे नेमणूकीची पध्दत आहे. नामनिर्देशन, पदोन्नती आणि प्रतिनियुक्ती, नामनिर्देशन पदोन्नती नेमणुकीची अर्हता, नेमणूकीची पध्दत मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी आणि विद्यी शाखेच्या पदवीधारकास प्राधान्य, दुसरी नामनिर्देश केलेल्या विहीत केलेली अर्हता धारण करणा—या महानगरपालिकेच्या अस्थापनेवर शासन निर्णय क्रमांक २००७ प्र.क्र. ४६/७/१३ अ दिनांक १९ ऑक्टोंबर, २००७ मधील खुली जाहीरात वर्तमान पत्रात देवून पात्र उमेदवार निवड करणे आवश्यक आहे. पाचवी गोष्टी मा. सर्वाच्च न्यायालयाचा सिव्हील अर्जाचा क्रमांक ११६४६, ११७२४ आणि १९९६ प्रकरणी शासकिय निमशासकिय सेवेत खाजगी अस्थापनेत रिक्त पदे भरण्या करीता असे निर्देश दिलेले आहेत की, रिक्त पदे भरण्यासाठी वृत्तपत्र, दुरदर्शन, रेडीओ, नोटीस, रोजगार इत्यादी बाबत जाहीरात प्रसिध्द करून अर्ज मागविण्यात यावेत. तसे कुठल्याही प्रकारे झालेले नाही. कनिष्ठ लिपीक पदावरून सचिव नियुक्ती देणे योग्य नाही. खालील नमुद केल्यानुसार त्या काय पदावर आहेत मी इथे नमुद करतो. त्या कनिष्ठ लिपीक आहेत आणि सचिव पद हे क्लास टू अधिका—याचे पद आहे. म्हणून त्या कनिष्ठ लिपीकाला, महानगरपालिकेवर पदोन्नती देणे योग्य नाही. खाली नमुद केल्यानुसार पदोन्नतीची साखळी आहे. त्यामुळे श्रीम. कुलकर्णी यांच्या पेक्षा सेवाजेष्ठता असणा—या कर्मचा—यांना हरकती व तक्रारी घेण्याची वेळ येईल. त्यांची प्रशासकिय सेवा महानगरपालिकेमध्ये त्यांचे स्केल आहे, मला वाटते की, सहाय्यक श्रेणी, कनिष्ठ लिपीक म्हणून त्यांचे स्केल आहे रू. २०,२००/—.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:— चला पास करा पास पास.....

सदस्य, श्री. भगवान भालेराव:— पहीले मला हे पुर्ण मांडू दया, तुम्हांला काय करायचे आहे, ते करा.

काही सदस्य :—पास—पास......

सदस्य, श्री. भगवान भालेराव:— त्यांच्या अगोदर १६ लोक अशी आहेत की, त्यांना ही पदोन्नती देणे आवश्यकता आहे आणि अशी काय गरज भासली सभागृहाला, त्यांना काय गरज आहे, पहीले त्यांना दया.

काही सदस्य :—पास—पास......

सदस्य, श्री. प्रमोद टाले:— पहीले सचिव मॅडमचे करा, नंतर त्यांना देवू.

सदस्य, श्री. भगवान भालेराव:— कुठलीही गोष्ट नियमाच्या विरूध्द तुम्ही जर करत असाल, मी नियम वाचून देतो आणि असे जर असेल तर सभागृहाच्या विरूध्द मी कायदेशिर कोर्टामध्ये जाईल आणि ही सगळी प्रक्रिया मा. उच्च न्यायालयाच्या.......

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:— तो तुमचा अधिकार आहे.

सदस्य, श्री. भगवान भालेराव:— तुम्ही चुकीची पध्दत करत आहेत, हे नियमामध्ये नाही. या १६ लोकांना आधी पदोन्नती दया आणि मग त्यांना पदोन्नती दया. क्लास टू चे अधिकारी करा, इथे कामे करायला २० वर्षाचा अनुभव आहे. क्लास टू चा अधिकारी नेमा, आहे का तयारी.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:— प्रस्ताव आणा, प्रस्ताव आणा.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u> प्रस्ताव अणायचा प्रश्नच नाही. या सगळया गोष्टी सभागृहामध्ये तुमही चुकीची पध्दत आणता ही समाज्याच्या दृष्टीकोणातून आणि कर्मचा–यांच्या दृष्टीकोणातून विघातक प्रक्रिया आहे. कोणीही उठेल आणि भविष्य काळामध्ये शिपाई येऊन उप आयुक्तांचा दर्जा मागेल ही पध्दत तुमची चुकीची आहे. ही भाजप सरकारमध्ये पध्दत आहे, हेच अच्छे दिन आहेत का? कोणाचे अधिकार डवलून, कोणाचे अधिकार दाबून तुम्ही हे करत असतील तर ही चुकीची गोष्ट आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> कृपया करून एक एक करून बोला.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u> १६ लोकांना पहीले पदोन्नती दया, १६ लोकांना कायदेशिर परवानगी दया, नंतर त्याचा नियम करा. ही चुकीची पध्दत झाली आहे, माझा या प्रक्रियेला विरोध आहे आणि जे जे गैरकानूनी काम करत असतील त्यांच्यावर कायदेशिर कारवाई करा.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> मा. महापौरजी हे मच्छिी बाजार आहे का?

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> मा. महापौरजी, मी पहीले सांगतो की, विषय काय आहे, आपण बोलत आहेत पदोन्नती, पदोन्नती कुठे देत आहे. मा. महापौरजी माझा जो विषय आहे, महापालिका सचिव म्हणून कायमस्वरूपी नियुक्ती करणे बाबत. आम्ही त्यांची पदोन्नती करत नाही, आम्ही त्यांची नामनिर्देशन सचिव पदावर महासभेच्या अधिकारात करत आहे. आम्ही पदोन्नती करत असेल तर ते चुकीचे आहे. त्यासाठी मी बोलत आहे की, या विषयला मला सांगू दया. हा जो विषय आहे, प्राजक्ता कुलकर्णी सचिव पदावर कायमस्वरूपी नियुक्ती करणेसाठी आहे आणि हा पदोन्नतीचा विषय नाही. जर हा पदोन्नतीचा विषय असता, तर जसे भालेरावजी यांनी सांगितले ते चुकीचे होते. सचिव पदावर आम्ही थेट भरती करत आहेत. मी सभागृहाला सांगू इच्छितो की....

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:–</u> श्री.भालेरावजी जरा या विषयाला पुर्ण होऊ दया.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> प्राजक्ता मिलिंद कुलकर्णी ......

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :–</u>पास, पास....

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:–</u> मी पहीलेही सांगितले आहे की, सभागृहाच्या नियमाचे पालन करा. एक एक करून बोलाल तर सगळयांना समजेल.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–</u> मा. महापौरजी, आपले नगरसेवक पण मध्येच बोलत आहेत, प्रदिप रामचंदानी, मनोज लासी, मध्येच बोलत आहेत.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:–</u> मॅडम अरूण आशान पण मध्येच बोलत आहेत, त्यांना पण सांगा की, गप्प बसा.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:–</u> कृपा करून जर एक बोलत असेल तर दुस–याने बोलू नका. सगळयांना समजायला पाहीजे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> मा. महापौरजी हा जो विषय आम्ही ठेवला आहे, त्यांची कायमस्वरूपी नियुक्ती करण्यासाठी ठेवला आहे आणि प्राजक्ता कुलकर्णी ज्या आहेत या सचिव पदावर दिनांक ०२/५/२०१४ पासून प्रभारी महापालिका सचिव म्हणून इथे काम करीत आहेत. त्यांनी विधी अधिकारी या पदावर काही वर्षे या महानगरपालिकेत काम केले आहे आणि क्रिडा अधिकारी व जनसंपर्क अधिकारी म्हणून अशा अनेक पदांवर विभाग प्रमुख म्हणून त्यांनी या महापालिकेत काम केले आहे आणि आर.आर. च्यानुसार पण त्या क्वालिफाईड आहेत. जर आपण त्यांची पदोन्नती करीत आहेत, तर दुस–या लोकांना आपण पदोन्नती पासून वंचित करीत आहे, परंतु आम्ही त्यांची थेट आमचा जो अधिकार आहे, त्याचा आम्ही उपयोग करीत आहे, त्यासाठी मला फक्त एवढेच सांगायचे आहे की, विरोधी पक्षातर्फे सर्व एक एक करून बोलले तर आम्ही सगळयांचे बोलणे ऐकण्यासाठी इथे बसलो आहे.

<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:–</u> मा. महापौर, मा. आयुक्त साहेब आज महापालिका सचिव पदावर कायमस्वरूपी नियुक्ती देण्याबाबतचा एक विषय आला आहे. दोन अशासकिय प्रस्ताव आले आहेत. एक डॉ. राजा रिझवानी यांचा आहे आणि प्राजक्ता कुलकर्णी यांचा आहे. महोदय, मघाशी मा. सदस्य, श्री. भगवान भालेराव यांनी बरेचशा कायदेच्या त्रुटींचा उहापोह केला होता. आज प्रश्न असा आहे, या उल्हासनगर शहराला सचिव म्हणून काम करणे लायक किंवा शहरावर प्रेम करणारे अशा व्यक्ति एक क्वालिफाईड असेल अशा व्यक्तीची नियुक्ती होणे आवश्यक आहे. आज भालेराव साहेब, बरेचशा त्रुटी जरी काढल्या असतील. तरी आज हा महासभेचा अधिकार आहे, कोणाला नियुक्त करायचा आणि कोणाला नाही करायचा इथे सरळ दिलेला आहे. कलम ४५ (४) अन्वये नगरपालिका सचिवाच्या नेमणुका व्यतिरिक्त या कलमामुळे केलेली प्रत्येक नेमणूक राज्य शासनाकडे कायम करण्याचे अधिन असेल तर ही महापालिका त्या बाबतीत सक्षम आहे. असे जर असतांना प्रभारी म्हणून काम करत असतांना गेल्या मी २० वर्षापासून प्राजक्ता कुलकर्णी या व्यक्तिला बघत आहे. त्यांच्या कामाची क्षमता बघत आहे, त्यांची काम करण्याची पध्दत बघत आहे आणि हे सर्व असतांना त्याची एक क्रायटेरिया आहे, अर्हता आहे, अर्हता मध्ये एम.ए., एल.एल.बी., अजून एल.एस.जी.डी., एल.जी. एस. आणि जर्नलिझम म्हणजे सचिव पदाला आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता सचिव पदाला आवश्यक असलेला काम करण्याचा कालावधी आणि त्यांचे या उल्हासनगर महापालिकेमध्ये आता पर्यंत असलेले योगदान हे सर्व जर बघितले आणि जर त्याच्यामध्ये त्या कॅटेरियामध्ये योग्य असेल तर त्यांना या पदावर नियुक्त करण्यास काहीही हरकत नाही असे मला वाटते. हाच भाग डॉ. राजा रिझवानी यांचा आहे. रिझवानी आज या शहराचा एक भाग आहे. गेल्या १९९७ पासून हे मी स्वत: बघतोय, हा नंतरचा जरी असला तरी तो सोबतचा विषय आहे, या उल्हासनगर शहरावर प्रेम करणारे, उल्हासनगर शहराची धुरा सांभाळणारे या व्यक्ति जर मनापासून जर काम करीत असतील. तर त्यांना नियुक्त करण्यास काही हरकत नाही असे मला वाटते, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:–</u> मा. महापौर मॅडम आता जो विषय झाला. प्राजक्ता कुलकर्णी यांच्या या पुर्वी या पदावरती श्री. प्रकाश कुकरेजा हे अधिकारी होते आणि मला वाटते की, सन २०१४ नंतर श्रीम. प्राजक्ता कुलकर्णी यांची नेमणूक झाली. मला या गोष्टीचा अत्यंत आनंद होत आहे. या ठिकाणी जर प्राजक्ता कुलकर्णी यांची सचिवपदी  कायमस्वरूपी नियुक्ती झाली तर मला आनंद होईल. कारण मी या मताशी पुर्ण सहमत आहे. माझ्या पक्षाचे सहमत आहे. मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी लढणा–या शिवसेनेचे हेच मत आहे, या ठिकाणी जर एक मराठी माणूस, मराठी अधिकारी सचिव पदावर बसेल. तर त्याचा मला सुध्दा आनंद होईल, माझ्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना सुध्दा आनंद होईल आणि त्या प्रमाणे प्राजक्ता कुलकर्णी या एकमेव अधिकारी आहेत. जर या ठिकाणी प्राजक्ता कुलकर्णी यांचा ठराव नामंजूर झाला. तर मला वाटते की, या ठिकाणी कोणीतरी परप्रांतीय अधिकारी येऊन बसेल आणि मग मगाशी माफी असावी जैसवार साहेब, मगाशी जैसवार साहेबांनी हिंदी भाषा ऐवजी मराठीत बोलले त्यांची अशी अशुध्द मराठी भाषा आपल्याला ऐकावी लागेल. त्यासाठी शुध्द मराठी बोलणा–या प्राजक्ता कुलकर्णी आपल्या बरोबर असतील आणि त्यांचा आपल्याला पुर्ण सहाकार्य मिळेल अशी मी अपेक्षा करतो आणि या ठरावाच्या बाजूने जर माझ्या पक्षाचे सहमत असेल. तर मी त्यांच्या बरोबर सहमत आहे, जय हिंद.

या वेळी सदस्या, श्रीम. पुजाकौर लबाना, श्रीम. अर्चना करनकाळे या सभागृहातून बाहेर गेल्या.

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:–</u> भालेराव साहेब सावंत साहेबांचे ऐका काय बोलतात ते.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u> सन्माननिय महापौर, हा विषय....

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u> माझे निवेदन आहे, मी माझ्या लेटरवर निवेदन देतो की, त्या निवेदनामध्ये पुर्णपणे आले पाहीजे आणि हा विषय पुर्णपणे न्यायालयाच्या अधिकारात जाईल. हा गैरकानूनी विषय आहे, तुम्ही महापौर असतांना हा गैर विषय घेता, चुकीचा विषय घेता १४ लोकांना डावलून तुम्ही डायरेक्ट पदोन्नती देतात हे जरी बोलत असतील कायदयाने कुठेही पदोन्नतीच होते. त्याची कुठल्याही प्रकारे तुम्ही थेट नियुक्ती करू शकत नाही. महानगरपालिकेचा कुठलाही जरी कोणी दाखवले असेल, तर थेट अधिकार कुठल्याही पध्दतीचा नाही. १४ लोकांना नाकारून ही पदोन्नती होते आणि त्याला क्लास टू चा दर्जा देतात, क्लास टू चा दर्जा देणार नसेल तर त्यांनी सांगावे. सचिवला क्लास टू चा दर्जा आहे आणि त्याची पात्रता ठरलेली आहे. ती

पात्रता डावलून जर तुम्ही निर्णय घेत असाल तर चुकीचा आहे. माझे म्हणणे तेच आहे. हा माझा विरोध सभागृहाच्या ठरावामध्ये आला पाहीजे, बाकिच्या गोष्टीला माझा विरोध राहील.

या सदस्या, श्रीम. पुजाकौर लबाना, श्रीम. अर्चना करनकाळे यांनी सभागृहामध्ये पुन्हा प्रवेश केला.

काही सदस्य :–पास–पास......

महापालिका सचिव:– बहुमताने पास असेल तर मतदान घ्यावे लागेल.

सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:– देता येत आहे की, नाही हे प्रशासन ठरवेल.

सदस्य, श्री. धनंजय बोडारे:– याच्यामध्ये एक शंका आहे, प्रशासनाने ती क्लियर करावी. नियुक्ती म्हणता येइल की पदोन्नती म्हणता येईल. नियुक्ती पहीली झाली आहे, त्याच्या नंतर पदोन्नती, सर्व सभागृहाने मान्य करतो की, नियुक्ती होते की पदोन्नती.

आयुक्त स्थानी प्राधिकृत अधिकारी, अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:– नियुक्ती होते.

महापालिका सचिव:– आता सर्वसंमतीने की, मतदान घ्यायचे आहे.

सदस्य, श्री. भगवान भालेराव:– माझा विरोध आहे. मला कोर्टात जायचे आहे, माझा विरोध आहे.

महापालिका सचिव:– भालेराव साहेबांचे विरोध नोंदवत आहे.

सदस्य, श्री. राजेश वदारिया:– मतदान करण्यासाठी कमीत कमी किती सदस्यांची मागणी पाहीजे. एका सदस्यच्या मागणीनुसार मतदान होते का? मतदान होणार नाही.

सदस्य, श्री. भगवान भालेराव:– हा माझा अधिकार आहे, तुम्ही थांबवू शकत नाही.

सदस्य, श्री. मनोज सयानी:– भागवान भालेराव साहेब, जरा प्रेमाने बोला.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:– जरा प्रेमाने बोला, कशासाठी एवढे भांडत आहेत.

सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानी:– ठराव वाचून दाखवत आहेत.

ही महासभा वरील प्रस्तावनेत दर्शविल्याप्रमाणे श्रीम प्राजक्ता मिलिंद कुलकर्णी हया नगरसचिव पदावर दिनांक २/५/१४ पासून पूर्णवेळ प्रभारी महापालिका सचिव म्हणून कार्यरत असून सदर पदासाठी लागणारी शैक्षणिक अर्हता सेवा प्रवेश नियमावलीनुसार धारण करीत असून त्यांना विधी अधिकारी, क्रिडा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी या विविध वरिष्ठ पदांचा अनुभव आलेला असून नगरसचिव म्हणून ते देखील सेवा पार पाडीत असल्याने महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम ४५ अन्वये व या अधिनियमातील अनुसुची 'ड' मधील प्रकरण ३ नियम क्रमांक १ (२) च्या परंतुकीच्या तदतुदीनुसार नगरसचिव या पदावर नेमणूक केली जाण्यास योग्य आहे असे महानगरपालिकेचे मत असल्याने त्यांची पुर्वीची सेवा ही पेन्शन, अंशदान, उपदान, व इतर अनुषंगीक भत्ते इत्यादी सेवानिवृत्तीसाठी ग्राहय धरण्यात येवून त्यांच्या वयाच्या पात्रतेची अट शिथील करुन त्यांना नगर सचिव म्हणून या रिक्त पदावर महापालिकेत सदर पदासाठी मंजुर असलेल्या वेतनश्रेणी वर कायमस्वरुपी नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता थेट अंमलात येईल.

सदस्य, श्री. भगवान भालेराव:– मतदान घ्यावेच लागेल, तुम्ही ठराव करतात तर

या वेळी सदस्या, श्रीम. कविता बागुल या सभागृहातून बाहेर गेल्या.

<u>महापालिका सचिव:–</u> मतदान करण्यासाठी कमीत कमी चार सदस्यांनी मागणी केली पाहीजे, असा नियम आहे. कमीत की चार सदस्यांनी मतदानाची मागणी केली पाहीजे.

<u>सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानी:–</u> प्राजक्ता कुलकर्णी हया पहील्या पासून आमच्या अधिकारी आहेत. त्यांना फक्त सचिव पदावर घेत आहोत.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u> याच्यामध्ये माझा विरोध आहे, ठरावामध्ये नमुद झाले पाहीजे.
<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:–</u> सर्व नगरसेवकांकडून आपल्यांना हार्दिक शुभेच्छा!

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:–</u> मी अभिनंदन करतो की, एक महिला या सचिव झाल्या.

या वेळी सदस्या, श्रीम. कविता बागुल यांनी सभागृहामध्ये पुन्हा प्रवेश केला.

<u>महापालिका सचिव:–</u> आभारी आहे सर्वांची.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ४:– <u>प्रस्तावाची सूचना</u>

महापालिका सचिव म्हणून कायमस्वरुपी नियुक्ती करणेबाबत पालिका सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी व श्री. किशोर वनवारी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेचे कोणतेही कामकाज हे महापालिका अधिनियमानुसार चालत असते. सचिव कार्यालयाचे कामकाज देखील या नियमानुसार चालते. उल्हासनगरपालिकेच्या सचिव कार्यालयातर्फे महासभा, स्थायी समिती, परिवहन समिती तसेच विशेष समिती इत्यादींचे कामकाज या कार्यालयामार्फत करण्यात येते. सदर सभेचे इतिवृत्त तयार करणे, ठरावे करणे, सभांचे आयोजन करणे तसेच महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, व इतर समित्यांचे सभापतींची निवडणुक अशी कामे या विभाग मार्फत केली जातात. सदर पदाचा कार्यभार प्रभारी सचिव म्हणून सौ. प्राजक्ता मिलींद कुलकर्णी यांच्याकडे देण्यात आला आहे. त्या एम.ए., एल. एल. बी. असून एल.एस. जी. पी. आर. ओ. इत्यादी शैक्षणिक अर्हता त्यांचेकडे असून, गेल्या तीन वर्षापासून त्यांनी हे काम सक्षमपणे व यशस्वीरित्या केले आहेत. तसेच मागील १० वर्षापासून त्यांनी प्रभारी विधी अधिकारी, प्रभारी क्रीडा अधिकारी तसेच जनसंपर्क अधिकारी म्हणून देखील सदर पदाचा कार्यभार व्यवस्थितरित्या सांभाळला आहे. त्यांची सेवा २४ वर्षे झाली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४५ अन्वये शहर अभियंता नगर सचिव, मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी नेमणूक करण्याचा अधिकारी महापालिकेस आहेत. तसे या कलमाच्या ४५ (४) अन्वये नगरपालिका सचिवांच्या नेमणूकी व्यतिरिक्त या कलमान्वये केलेली प्रत्येक नेमणूक राज्य शासनाकडे कायम करण्याचे अधीन असेल म्हणजेच सचिव पद नेमण्यास महापालिका सक्षम आहे. महासभेचे उच्च शैक्षणिक अर्हता व पात्रता असणा–या अनेक वर्षे काम करणा–या कर्मचा–यांना पदोन्नतीची संधी मिळावी. म्हणून महासभेने ठराव करुन तसे प्रस्ताव महासभेपुढे आणण्याचे निर्देश दिले आहेत. सौ. प्राजक्ता मिलिंद कुलकर्णी या वरील संवर्गासाठी विहीत केलेली अर्हता धारण करीत असल्याने वरील नियम व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड मधील प्रकरण ३ मधील १ (२) च्या तरतुदीनुसार सौ. प्राजक्ता मिलिंद कुलकर्णी यांची महापालिका सचिव या संवर्गात रिक्त पदावर कायम स्वरुपी नियुक्ती होणेस महासभेपुढे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> १५ <u>दिनांक:–१८/७/२०१७</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

ही महासभा वरील प्रस्तावनेत दर्शविल्याप्रमाणे श्रीम प्राजक्ता मिलिंद कुलकर्णी हया नगरसचिव पदावर दिनांक २/५/१४ पासून पूर्णवेळ प्रभारी महापालिका सचिव म्हणून कार्यरत असून सदर पदासाठी लागणारी शैक्षणिक अर्हता सेवा प्रवेश नियमावलीनुसार धारण करीत असून त्यांना विधी अधिकारी, क्रिडा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी या विविध वरिष्ठ पदांचा अनुभव आलेला असून नगरसचिव म्हणून ते देखील सेवा पार पाडीत असल्याने महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम ४५ अन्वये व या अधिनियमातील अनुसुची 'ड' मधील प्रकरण ३ नियम क्रमांक १ (२) च्या परंतुकीच्या तदतुदीनुसार नगरसचिव या पदावर नेमणूक केली जाण्यास योग्य आहे असे महानगरपालिकेचे मत असल्याने त्यांची पुर्वीची सेवा ही पेन्शन, अंशदान, उपदान, व इतर अनुषंगीक भत्ते इत्यादी सेवानिवृत्तीसाठी ग्राहय धरण्यात येवून त्यांच्या वयाच्या पात्रतेची अट शिथील करुन त्यांना नगर सचिव म्हणून या रिक्त पदावर महापालिकेत सदर पदासाठी मंजुर असलेल्या वेतनश्रेणी वर कायमस्वरुपी नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता थेट अंमलात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>मंजुर</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————————

**— विषय क्र. ५:—** :— <u>प्रस्तावाची सूचना</u>

महापालिका वैद्यकीय आरोग्य अधिकारी म्हणून कायमस्वरुपी नियुक्ती करणेबाबत.
पालिका सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी व श्री. किशोर वनवारी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

———————————————————————————————————————
—

<u>सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानी:—</u> महापालिकेमध्ये आमच्या महापौर महोदया, मा. आयुक्त महोदया, उप महापौर मी सर्वांना निवेदन करतो की, हा जो डॉक्टरचा विषय आहे, तो शासनाच्या अधिन असतो. तर त्याला शासनाच्या अधिन राहून पास करीत आहे.

<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—</u> डॉक्टर साहेबांचे पण अभिनंदन करतो.

<u>महापालिका सचिव:—</u> ठराव वाचून दाखवत आहेत.

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५ अन्वये डॉ. राजा व्ही. रिझवानी (वैद्यकीय अधिकारी) यांची प्रदिर्घ सेवा पाहता व त्यांचा या पदावरील अनुभव तसेच महासभा ठराव क्र. ३५, दिनांक ९/७/२०१५ अन्वये शैक्षणिक अर्हता शिथील केली असून सदर ठराव लक्षात घेवून त्यांच्या पुर्वीची सेवा ही पेन्शन, अंशदान, उपदान, व इतर अनुषंगीक भत्ते इत्यादी सेवानिवृत्तीसाठी ग्राहय धरण्यात येवून त्यांच्या वयाच्या पात्रतेची अट शिथील करुन त्यांना वैद्यकीय आरोग्य अधिकारी या पदावर महापालिकेत सदर पदासाठी मंजुर असलेल्या वेतनश्रेणी वर कायमस्वरुपी शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहून नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता थेट अंमलात येईल.

<u>काही सदस्य :—</u>पास, पास......

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:–</u> मी डॉक्टरच्या नात्याने डॉ. राजा रिझवानी यांचे अभिनंदन करतो.

या उप महापौर, श्री. जीवन इदनानी, सदस्य, श्री. शेखर यादव हे सभागृहातून बाहेर गेले.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑विषय क्र. ५:– <u>प्रस्तावाची सूचना</u>

महापालिका वैद्यकीय आरोग्य अधिकारी म्हणून कायमस्वरुपी नियुक्ती करणेबाबत.
पालिका सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी व श्री. किशोर वनवारी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये सविनय आपणास कळविण्यात येते की, डॉ. राजा व्हलीराम रिझवानी वैद्यकीय अधिकारी पदावर कार्यरत असून सन १९९७ पासून कायम कार्यरत आहेत. सन २००३ पासून त्यांच्याकडे राष्ट्रीय सुधारीत क्षयरोग कार्यक्रमाची जबाबदारी आहे. त्या सोबत त्यांना जन्म–मृत्य विभागाचा पण पदभार देण्यात आला आहे. सन २०१२ पासून ते प्रभारी वैद्यकीय आरोग्य अधिकारी या पदावर कार्यरत आहेत. तेव्हापासून वैद्यकीय आरोग्य विभागाची संपुर्ण जबाबदारी त्यांच्याकडे आहे. गेल्या ५ वर्षापासून त्यांनी हे काम सक्षमपणे व यशस्वीरित्या केले आहे. त्यांची सेवा १७ वर्षे झाली असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४५ अन्वये शहर अभियंता, नगर सचिव, मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी नेमणुक करण्याचा अधिकारी महापालिकेस आहे. महासभेने उच्च शैक्षिणिक अर्हता व पात्रता असण्या–या अनेक वर्षे काम करण्या–या कर्मचा–यांना पदोन्नतीची संधी मिळावी. म्हणून महासभेने ठराव करुन तसे प्रस्ताव महासभेपुढे आणण्याचे निर्देश दिले आहेत. डॉ. राजा व्हलीराम रिझवानी हे वरील संवर्गासाठी विहीत केलेली अर्हता धारण करीत असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५ अन्वये डॉ. राजा व्हलीराम रिझवानी यांची वैद्यकिय आरोग्य अधिकारी या संवर्गात रिक्त पदावर कायम स्वरुपी नियुक्ती होणेस महासभेपुढे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> १६ <u>दिनांक:–१८/७/२०१७</u>

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५ अन्वये डॉ. राजा व्ही. रिझवानी (वैद्यकीय अधिकारी) यांची प्रदिर्घ सेवा पाहता व त्यांचा या पदावरील अनुभव तसेच महासभा ठराव क्र. ३५, दिनांक ९/७/२०१५ अन्वये शैक्षणिक अर्हता शिथील केली असून सदर ठराव लक्षात घेवून त्यांच्या पुर्वीची सेवा ही पेन्शन, अंशदान, उपदान, व इतर अनुषंगीक भत्ते इत्यादी सेवानिवृत्तीसाठी ग्राहय धरण्यात येवून त्यांच्या वयाच्या पात्रतेची अट शिथील करुन त्यांना वैद्यकीय आरोग्य अधिकारी या पदावर महापालिकेत सदर पदासाठी मंजुर असलेल्या वेतनश्रेणी वर कायमस्वरुपी शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहून नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवत्त कायम होण्याची वाट न पहाता थेट अंमलात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

————————————————————————————————————————

— **विषय क्र. ६:—** <u>**प्रस्तावाची सूचना**</u>

प्रतिनियुक्तीवरील शहर अभियंता श्री.राम जयस्वार यांना त्यांच्या मूळ विभागात परत पाठविण्याबाबत पालिका सदस्य श्रीमती मिना सोनेजी(सोंडे) व श्री. जमनादास पुरस्वानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

————————————————————————————————————————

—

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—</u> मा. महापौर मॅडम, आज कमीत कमी तीन तास आपल्या महासभेत जास्तीस जास्त रस्त्यांच्या खड्डेच्या बाबतीत जो विकास थांबलेला आहे, महापौर मॅडम इकडे जरा लक्ष दया. शहर अभियंता हे पद खुप जबाबदारीचे पद आहे. पहीली गोष्ट म्हणजे त्यांनी शहरामध्ये फिरायला पाहीजे आणि ज्या ठिकाणी जास्त समस्या आहेत, तिथे त्यांनी स्वत:हून लक्ष दिले पाहीजे. फक्त कार्यालयामध्ये बसून काम होत नाही. दुसरी गोष्ट म्हणजे माझ्या बरोबर लहान मुलांसारखी गोष्ट झालेली आहे. जेव्हा मी विनंती केली होती की, डी.पी.आर. चे रोजच इस्टिमेंट बनले पाहीजे. तेव्हा जैसवार साहेबांनी मला सांगितले की आम्ही १७ रस्त्यांचे एन.ओ.सी पाठविले आहेत. मी त्यांना विचारले की सर आपण या १७ रस्त्यांची जी एन.ओ.सी दिलेले आहेत ते डांबरीकरणासाठी आहेत की, सिमेंट कॉक्रीटीकरणाचे आहेत, त्यांनी सांगितले की मी तपासून सांगतो. तात्पर्य असे आहे की, त्यांची एवढी सुध्दा जबाबदारी नाही की, त्यांनी जी एन.ओ.सी. दिली आहे, त्याचा त्यांना माहीती असयला पाहीजे. असे शहर अभियंता शहरात असो किंवा नसो त्यांचा या शहराला काहीच फायदा नाही. त्यामुळे माझी सभागृहाला विनंती आहे की, त्यांना परत पाठविले जावे, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मा. महापौर, मा. आयुक्त महोदया, हा जो विषय आम्ही आणला आहे, त्यामध्ये कोणत्याही अधिका—याला टार्गेट करणे आमचा उद्देश नाही. आताच काही वेळा पुर्वी या सभागृहामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागावर भरपूर चर्चा झाली, पाटोलचा विषय होता, रस्त्यामध्ये खड्डे होते आणि आम्हांला वाटते की, या शहराला चांगला आणि सक्षम अधिकारी मिळायला पाहीजे. जो या शहरामध्ये काम करील. आम्हांला असे वाटत नाही की, जैसवार यांना काढून टाकू आणि दुसरे अधिकारी येतील. आमचा उद्देश एवढाच आहे की, जे पण अधिकारी आहेत त्यांनी या महानगरपालिकेमध्ये ज्याच्यासाठी आम्ही निवडून आलेले अहोत. लोकांची कामे करणे, लोकांची सेवा करणे, शहराला सुंदर बनविणेसाठी शहर अभियंता यांनी काम करायला पाहीजे. परंतु काही दिवसापासून असे दिसून येत नाही. शहर अभियंता यांना काही वेळेस बोलल्या नंतर जसे सोंडे मॅडमनी सांगितले आहे की, ४० एस्टीमेंट आम्ही बनवून एम.एम.आर.डी.ए.कडे पाठविले आहेत. परंतु त्यासाठी सुध्दा तीन महीने लागले, जर ते लवकर बनवले असते तर मी आज सर्व सभागृहातील सदस्यांना सांगतो की, उद्या सकाळी १०.३० वाजता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री काही देशांमध्ये जे कार्य करीत आहेत, त्याचे उद्घाटन करणार आहेत. त्याचे डायरेक्टर लाईव्ह या महानगरपालिकेमध्ये सुध्दा ठेवले जाईल. मी आपणा सर्वांना विनंती करतो की, कृपया करून इथे यावे आणि बघा की, महाराष्ट्राच्या अन्य महानगरपालिकेमध्ये काही हजार करोडोची कामे मा. मुंख्यमंत्री एकाच वेळी उद्घाटन करणार आहेत आणि संपुर्ण महानगरपालिकांमध्ये दाखवणार आहेत. तर आपण ते बघावे की अशा प्रकारे इतर महानगरपालिकांमध्ये करोडोची कामे होणार आहेत आणि आमची महानगरपालिका या कामांपासून वंचित राहीली जाते आणि त्याचे मुख्य कारण जो आहे, ते म्हणजे आमचे अधिकारी आहेत, आमचे शहर अभियंता आहेत. जर त्यांनी १०० ते २०० करोडचे एस्टीमेट बनवून पाठविली असती तर आम्ही आज एम.एम.आर.डी.ए.कडे मागणी केली असती आणि भरपूर असे काही प्रोजेक्ट मा. मुख्यमंत्री यांनी उद्घाटन केले असते. हा कार्यक्रम उद्या सकाळी १०.३० वाजेपासून होता. परंतु आयुक्त महोदया सांगत आहेत की, तो रद्द झाला आहे. जसे आम्हांला सांगितले होते की, उद्या हा कार्यक्रम आहे. तर आमचा हा उद्देश नाही की, कोणत्याही अधिका—याला नाव घेऊन आमची कोणाशीही दुश्मनी नाही. आम्हांला वाटते की, या शहराची कामे व्हावीत, त्यासाठी मा. आयुक्त महोदया यांना विनंती करतो की, शहर अभियंता यांना स्टेजवरती बोलवण्यात यावे आणि त्यांनी सभागृहाला आश्वासन दयावे की, त्यांनी उद्यापासूनच रस्त्यांमध्ये पडलेले खड्डे आणि

पावसाळयापुर्वी किंवा गणपती उत्सवाच्या पहीले जे पाटोल भरले जातात, त्यासाठी डांबरीकरण केले जाते, अशा प्रकारचे अन्य एस्टीमेट बनवले जातात, ज्या जुन्या वर्क ऑर्डर पडून आहेत त्या ठेकेदारांना दिल्या जातात, या सर्व गोष्टींचे आश्वासन जर सभागृहा समोर देतील आणि व्यवस्थित कामे करतील तर आमचा कोणताही उद्देश नाही की, आम्ही त्यांना या महानगरपालिकेमधून जायला सांगू. तर मी सभागृहासमोर सांगतो की, शहर अभियंता इथे येऊन आश्वासन देतील  की, पुढच्या काही दिवसात शहरातील कामे ते व्यवस्थित करतील, वेळेवर उपस्थित राहून एस्टीमेट बनवतील, आणि आमच्या नगरसेवकांच्या ज्या वर्क ऑर्डर पेंडींग आहेत त्या ते देतील आणि व्यवस्थित कामे करतील तर त्यांच्या बरोबर आम्हांलाही काम करणे चांगले वाटेल, धन्यवाद.

या वेळी उप महापौर, श्री. जीवन इदनानी, सदस्य, श्री. शेखर यादव यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> महापौर मॅडम, उप महापौर, सचिव मॅडम, सभागृह नेता यांनी सांगितले आहे की, या सभागृहाचे कोणीही सदस्य, आज पर्यंत आम्ही व्यक्तिगत  कोणत्याही अधिका—यावर आरोप प्रत्यारोप केले नाहीत, उल्हासनगर महानगरपालिकेचा आज पर्यंतचा इतिहास आहे. इथे अधिकारी येण्यासाठी तयार होत नाहीत आणि जर आले तर परत जाण्यासाठी तयार होत नाहीत. कारण की इथे आल्या नंतर त्यांचे इथल्या लोकांशी चांगले संबंध निर्माण होतात. आज जैसवार साहेब आहेत, त्यांच्या सभ्यतेवरती आमचे कोणतेही प्रश्नचिन्ह नाहीत. ते खुपच सज्जन व्यक्ती आहेत, विनम्र आहेत. परंतु त्यांच्या कामावरती खुप मोठे प्रश्न चिन्ह आहेत. त्यांनी आज पर्यंत कधीच महानगरपालिकेमध्ये शहर अभियंता म्हणून काम केले नाहीत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे इंजिनियर आहेत, त्यांच्यामध्ये काम करण्यासाठी कधीच उत्साह दिसला नाही. जे लोकल बॉडीचे नगरसेवक आहेत ते ७८ आहेत. त्यांना ५ लाख ते ६ लाख लोकांची कामे त्वरीत करायाची असतात. बघू, करू, करणार आहे, अशा प्रकारची भाषा इथे चालत नाहीत. इथे तत्परता दाखवावी लागेल. महापौर मॅडम मी आपल्याला विनंती करतो की, आपण शहर अभियंता यांना इथे बोलावून घ्या आणि त्यांना सांगा की तुमची हळू काम करण्याची जी पध्दत आहे, ती सुधारण्यात यावी. आमची आपल्याशी कोणतीही व्यक्तिगत दुश्मनी नाही. आज इथे जेवढे नगरसेवक निवडून येतात, त्यांची अपेक्षा असते, वार्डातील नागरीकांच्या अपेक्षा असतात की, त्यांची कामे व्हावीत. जर शहर अभियंता आपले विषय मा. आयुक्तापुढे ठेवतील आणि सांगतील की, नगरसेवक माझ्याकडे कामे घेऊन येतात आणि ही कामे करणे आवश्यक आहेत. तेव्हा आयुक्त साहेब काम करतील. परंतु जर स्वत:चे डोके चालवले नाही आणि आयुक्त साहेब माझे बॉस आहेत ते सांगतील तेवढेच काम मी करणार असे जर असेल तर त्या अधिका—याचा आपल्याला काहीच फायदा होणार नाही. शहर अभियंता यांनी अभिप्राय दयायला पाहीजे, याच्या पहिले शहर अभियंता असे करत होते. आयुक्त साहेबांशी बोलणी करत होते, अशी बोलणी त्यांना करावे लागतील आणि उद्या आयुक्त म्हणतील मी टेक्नीकल नाही, मला शहर अभियंता सांगतील त्या प्रमाणे करू. नंतर आपण बोलतात की, साहेब आपण जसे सांगाल तसे करतो. तुमच्या ज्या टेक्निकल गोष्टी असतील त्या आयुक्तांकडे घेऊन जायला पाहीजे आणि पुढच्या दिवसामध्ये त्यांची ही सत्व परिक्षा असेल. मॅडम असे आहे की, जे राजनैतीक लोक आहेत आमच्यासाठी रोजच निवडणूक होते. उद्या लोकसभेची निवडणूक होईल, विधानसभेची निवडणूक होईल, त्या वेळी आम्ही हे सांगणार नाही की, आमचे अधिकारी चांगले होते, परंतु ते हळू चालत होते. त्यासाठी मी विनंती करतो की, जैसवार साहेब यांनी स्टेजवर येऊन त्यांनी सांगावे की, आपला पुढचा कार्यक्रम काय आहे आणि आपण कशा प्रकारे प्रशासन गतिमान करून काम करणार आहेत.

या वेळी सदस्या, श्रीम. पुष्पा बागुल, श्रीम. कविता बागुल,  सदस्य, श्री. सागर सोनकांबळे हे सभागृहातून बाहेर गेले.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u>  जैसवार साहेब यांनी मंचावर यावे.

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:—</u>  सन्माननिय महापौर, महोदया, उप महापौर, आयुक्त महोदय, सन्माननिय सदस्यगण, आज माझ्या बद्दल जो प्रस्ताव आणला आहे. त्याच्या विषयी मी खुलासा करत आहे. मला इथे येवून एक वर्ष पुर्ण झाले आहे. या एक वर्षात मी जे काही कामे केली आहेत, ते मी तुम्हांला सांगत आहे. मी जेव्हा आलो तेव्हा आपला शहाडचा जो मुख्य रस्ता आहे, त्याचे काम बंद होते. ते काम काही टेक्नीकल कारण असल्यामुळे बंद होते, ते काम मी सुरू केले. एक वर्ष पुर्ण होत आहे, ते काम एक महीन्यामध्ये पुर्ण होणार आहे. दुसरा श्रमसाफल्य वाल्मिकी वसाहतचे काम पुर्ण झाले नव्हते, काही अपुर्ण होते, ते काम पुर्ण झाले आहे. तिसरा माझ्याच कालावधीमध्ये नालेसफाईचे काम पुर्ण झाले आहे. त्याच वेळी एम.एम.आर.डी.ए.

चे कल्याण अंबरनाथ रस्त्याच्या गटाराचे कामाचे इस्टीमेंट बनवण्यासाठी सांगितले होते, ते पण मी लवकरच पुर्ण करून पाठविण्यात आले आहे. परंतु काही कारणामुळे त्या कामाला मंजुरी मिळाली नाही आणि ते काम एम.एम.आर.डी.ए. करीत आहे.

या वेळी सदस्या, श्रीम. जोत्स्ना जाधव, श्रीम. अपेक्षा भालेराव, श्रीम. सुरेखा आव्हाड, सदस्य, श्री. प्रमोद टाले हे सभागृहातून बाहेर गेले.

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—</u> कोणत्या कारणामुळे मंजुरी मिळाली नाही, ते पण सांगा. एम.एम.आर.डी.ए. कडे आपण मंजुरी पाठवली आहे, ती कोणत्या कारणांमुळे मंजुरी मिळाली नाही.

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:—</u> कारण तर त्यांनी सांगितले नाही. त्याना ते काम स्वत:ला करायचे आहे, त्या बाबतीत त्यांनी काहीही सांगितले नाही.

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—</u> काही तरी क्युरी त्यांनी परत पाठविली असेल.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> आपण भुतकाळामध्ये काय केले ते आम्हांला माहीत आहे. जर भुतकाळामध्ये आपण चांगले काम केले असते तर आपल्या विरूध्द हा प्रस्ताव आला नसता. आम्हांला हे सांगा की, आपण भविष्यामध्ये काय काम करणार आहेत. सरकारची कोणतीही योजना बाकीच्या सर्व महानगरपालिकेमध्ये मिळत आहे. त्यामध्ये स्वच्छ भारत आहे, नगर उत्थान आहे, त्याच्या नंतर आपल्या जवळ अशा किती तरी सरकारी योजना आहेत. त्यामध्ये आपण काय करणार आहेत, हे सांगा. भुतकाळामध्ये जे झाले ते झाले, भविष्यकाळासाठी आपल्या जवळ काय योजना आहेत.

या वेळी सदस्या, श्रीम. लिलाबाई आशान या सभागृहातून बाहेर गेल्या.

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:—</u>भविष्य काळामध्ये आमच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने ग्रीन स्पेस साठी सन २०१५ — २०१६ साठी १ करोड रूपये आणि सन २०१६ — २०१७ साठी दिड करोड रूपये आणि सन २०१७ — २०१८ साठी २ करोड या योजनमध्ये आम्ही १ करोडचे टेंडर काढले आहे. ते टेंडर प्रोसेसमध्ये आहेत. दिड करोडचे जे आहे, त्याचे एस्टीमेंट बनत आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>जैसवार साहेब, जसे त्यांनी सांगितले की, भविष्यकाळामध्ये काय केले? भुतकाळामध्ये काय केले?

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> चांगली कामे कोणती केली, साडे चार करोडची एक वर्क ऑर्डर दिली होती. वडोल गावच्या पुलासाठी चौकशी लावली हे चांगले काम केले, ते पण आपण सांगा.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> दुसरे असे आहे की, आपला जो अशासकिय प्रस्ताव आलेला आहे, त्याचे कारण हेच आहे. या पुढे आपण कसे काम करणार आहेत, काय काम करणार आहेत, ते सांगा.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> सन्माननिय सदस्य, अधिका—यांच्या मान सन्मानाला ठेच पाहचणार नाही हे लक्षात घ्या.

<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—</u> महत्वाच्या कामांसाठी वेग वाढवा, हीच सगळयांची मागणी आहे. आयुक्त साहेब कधीही असे बोलत नाही की, महत्वाची कामे करू नका. आयुक्त साहेब महत्वाच्या कामांसाठी स्वत: पुढाकार घेतात. फक्त आपल्या कामाचे वेग वाढवा, शहराची जे महत्वाची कामे आहेत, ती कामे करण्यासाठी आयुक्तां जवळ प्रस्ताव पाठवा आणि त्यासाठी आयुक्त साहेब नकार देत असतील तर मग बोला.

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:—</u> मी सभागृहाला सांगू इच्छितो की, जे आपण परत परत विचारत आहेत, जे काम मंजुर नाही, त्या कामासाठी आम्ही तीन वेळा आयुक्त साहेबांजवळ हा प्रस्ताव घेऊन गेलो होतो.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> महापौर मॅडम, मी आता पर्यंत बोललो नव्हतो, मला फक्त एवढेच विचारायचे आहे, की, शहर अभियंता म्हणून फक्त सार्वजनिक बांधकाम यांच्या अधिपत्याखाली आहेत, का महानगरपालिकेच्या सगळया अस्थापना त्यांच्या अधिपत्याखाली आहेत. शहर अभियंता यांचा अर्थ काय आहे. फक्त सार्वजनिक बांधकाम विभाग हा अर्थ आहे का? ही जर समज त्यांची असेल तर मी काहीही बोलू शकत नाही.

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—</u> जर शहर अभियंता इथे राहतील तर महासभेमध्ये सार्वजनिक बांधकामाच्या समस्या कोणीही आणणार नाहीत.
<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> त्यांनी सांगितले की सार्वजनिक बांधकाम विभागाचे हे काम, ते काम, पण पाणी पुरवठा विभाग सुध्दा आहे. शहर अभियंता यांचा अर्थ फक्त एकच विभाग असा नाही, ऑल फॉर वन आहे.

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:—</u> सन्माननिय सदस्य, मी पहीलेच सांगितले होते की, माझ्या कार्यालयामध्ये इजिनियरची कमी आहे. जर मला अस्टिटंच्या रूपात इंजिनियर मिळाले तर.....

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> पाणी पुरवठयाच्या प्रस्तावावर आपण सही करतात का?

<u>सदस्य, श्री. जमुनादास पुरस्वानी:—</u> जर आपल्या जवळ इंजिनियरची कमतरता आहे, तर आपण एक वर्षामध्ये ठोक वेतनामध्ये इंजिनियर आणण्यासाठी काय काय उपाययोजना करण्यात आल्या आहेत. सभागृहाला या सगळया गोष्टी आपण सांगा.

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:—</u> आपल्या इथे इंजिनियरची कमतरता आहे, त्यामुळे प्रस्ताव पाठविण्यास उशिर होत आहे. मला इंजिनियर दया, स्टाफ दया, मी आपल्या बरोबर आहे, मला आपण सांगा की आपली कोणती कामे मी केली नाहीत. कोणती कामे माझ्यामुळे थांबले आहे.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> चुकीचे काम करण्याचा आपल्याला अधिकार आहे ना.

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—</u> सर आपल्यांना बोलण्याची आवश्यकता काय आहे? आपल्यांना स्वत:ला दिसत नाही का? रस्त्यावर किती खड्डे पडले आहेत. सभागृहाला माझी विनंती आहे की, जो पर्यंत हे शहर अभियंता राहतील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कोणतेही विषय आणणार नाहीत. कारण की आपण सगळे यांना साथ देत आहेत. याच्या नंतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे कोणतेही विषय सभागृहामध्ये येणार नाहीत. माझी विनंती आहे की, कृपया करून लक्ष दया.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> तुम्ही त्यांना अधिकार देतात, त्यांच्या जवळ चार इंजिनियर आहेत. आपण विचार करतात का?

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:—</u> मा. महापौर मॅडम, प्रदिप रामचंदानी, मिना सोंडे यांनी सर्वानी खुलासा केला आहे. आमची त्यांच्याशी व्यक्तिगत कोणतीही दुश्मनी नाही. शहराच्या कामासाठी, सर्व सदस्य बोलत आहेत की, त्यांना परत पाठविण्यात यावे. आम्हांला वाटते की, उल्हासनगरच्या ज्या समस्यां आहेत, सदस्यांची जी कामे आहेत, परंतु भविष्याकाळामध्ये कोणीही सदस्य बोलणार नाहीत की, हे काम करा, ते काम करा सगळया सदस्यांचे जे महत्वाचे कामे आहेत, हे सकारात्मक आपल्याकडून ठेवले पाहीजेत. जसे आमचे सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी यांनी सांगितले आहे की, अधिका—यांच्या समोर सबऑर्डीनेट असते, ते जाऊन जर सांगितले की साहेब हे महत्वाचे काम आहे. जर ते जाऊन सकारात्मक ठेवत असतील, हे काम आयुक्तांच्या समोर जर ठेवले की, साहेब खरोखरच पुल तुटलेला आहे, शौचालय खरोखरच पडलेला आहे, हे खरोखरच अतिशय महत्वाचे आहे. जसे आपण बोलतो की, हे महत्वाचे काम आहे. त्याला इंग्रजीमध्ये बोलतात की, नॅचरल कलाईमिटी, (नैसर्गीक आपत्ती) जर अधिकारी मोठया अधिका—यांना जाऊना सांगतील की, साहेब हे महत्वाचे काम आहे. तरी तुम्ही आम्हांला असे आश्वासन दया की, याच्या नंतर आयुक्त साहेबांकडे जाऊन मार्गदर्शन घेणार आणि जिथे काम करायचे आहे, तिथे आयुक्त साहेबांना घेऊन साईड दाखवली पाहीजे. निंबाळकर साहेबांना कोणीही सदस्य बोलतात तर ते साईडवर पाहणी करण्यासाठी जातात. जी पण सदस्यांची महत्वाची कामे आहेत ती व्हायला पाहीजेत. आमची बहीण ज्यांनी हा प्रस्ताव आणला आहे, त्यांचे आपल्याशी कोणतीही व्यक्तिगत वैर नाही. आपण सभागृहाला आश्वासन दया की, याच्या नंतर जे पण महत्वाची कामे असतील ती आयुक्तांच्या समोर ठेवली पाहीजेत आणि बोलणार नाहीत की, आयुक्त साहेबांनी ऑर्डर काढली

आहे. आपल्याला साईड पाहणी करायची असेल तर ती सुध्दा करून आणि शहर हितासाठी जी अतिमहत्वाची कामे असतील ती करण्यात यावीत, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> सन्माननिय महापौर, विशेष म्हणजे आपण ज्या अधिका—या बदल ही भुमिका मांडत आहेत, त्या अधिका—याकडे नक्की इंजिनियरचा इतका स्टाफ आहे का? आपण कोणावर आरोप करतांना त्यांना मॅन पावर देणार नाही आणि त्यांना सांगणार की, एवढे काम करून दया, ते कुठून करून देणार.

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—</u> मॅन पावर आपण देणार का?

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> मग मॅन पावर कोणी दयायची? तुम्ही इलीगल भरती थेट करू शकतात, तर इंजिनियरची भरती का करू शकत नाही. चार इंजिनियरांच्या जीवावर तुम्ही पुर्ण शहराची जबाबदारी देतात. मग त्या चार इंजिनियरांची बदली केली पाहीजे, त्या चार इंजिनियरवरती कारवाई करायला पाहीजे. एका शहर अभियंता यांच्यावर कारवाई करून चालणार नाही. इंजिनियर दिल्या नंतर ते काम करणार नसतील तर ती कारवाई योग्य आहे. इंजिनियर देत नसतील, जर त्यांच्याकडे जेवढे उपलब्ध असतील आणि ते काम करणार नसतील तर त्यांच्यावर कारवाई करणे योग्य आहे. त्यांच्याकडे माणसे नाहीत आणि चार इंजिनियरच्या जोरावर पुर्ण शहराची जबाबदारी स्विकारता आणि अशा माणसाला आपण काढून टाकण्याची भाषा वापरतात. ठिक आहे, त्यांची कार्य करण्याची पध्दती, त्यांची काम करण्याची पध्दत आपल्या सारखे फास्ट आहेत, कारण त्यांना मॅनेज सिस्टम जमत नाही. कदाचीत ती भुमिका असेल किंवा त्यांची काम करण्याची पध्दत हळू आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> मा. महापौर, याच्या पुर्वी मगाशी विषय निघाला आहे, शहर अभियंता हे प्रति आयुक्त म्हणून काम करतात. आता समस्या अशी आहे, त्यांची काम करण्याची जरी इच्छा असेल तरी आयुक्तांना विचारल्या शिवाय ते कुठलीही सही करत नाहीत.

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—</u> नुसती सहीची गोष्ट नाही, त्यांची जी पोस्ट आहे, त्या बाबतीत त्यांना नॉलेजच नाही.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> तुम्ही लक्षात घ्या, स्वत: निर्णय घ्यायची त्यांची कुवत नाही, ताकत नाही, कारण की आयुक्तांना प्रत्येक गोष्ट मी विचारायला गेलो हे करायचे किंवा नाही करायचे बजेटमध्ये तरतुद आहे, सगळया सहया झाल्या आहेत. तर आता पर्यंत टेंडर का रखडले आहेत. त्याला कारण आहे, माहीत नाही का? निर्णय घेण्याची क्षमता नाही. सर्व गोष्टी आयुक्तांना विचारायच्या आणि आयुक्त सांगतील तेच करायचे म्हणजे सांग काम्या आणि हूल नाम्या, हे बघा तुम्ही लक्षात घ्या परिस्थिती अशी आहे की, ते स्वत: निर्णय घेत नाहीत, जेव्हा पण विचारले की म्हणतात मी आयुक्तांना विचारतो. तुम्हांला सगळयांना अनुभव आला असेल. जर असे असेल, जर त्या अधिका—याला त्याची पावर समजत नसेल तर आपण इथे ठेवण्यास काय अर्थ आहे. त्यांना बोलण्यास मज्जा नाही.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> ठिक आहे, सुर्वे साहेबांनी सांगितले की, त्यांना निर्णय घेण्याचे पावर नाहीत. इथे बसलेल्या प्रमुख अधिका—यांनी सांगावे की, निंबाळकर साहेबांचे आदेश डावलून कोण पावर करतो ते सांगा. एकाने तरी आदेश काढून दाखवावेत. निंबाळकर साहेबांना डावलून एखादया अधिका—यांनी दाखवावे की मी ऑर्डर काढतो. कोणत्याही अधिका—या टॉचर करण्याची भाषा वापरायची, तुम्ही कशाला मला क्रॉस करतात. विषय असा आहे, निंबाळकर साहेबांची भुमिका एकछत्री आहे, निंबाळकर साहेबांना बोलण्याची कोणाला ताकत आहे, महापौर मॅडम, आपल्या पासून सुध्दा कोणीही निंबाळकर साहेबांना आडवत नाही. निंबाळकर साहेबांना ही गोष्ट बोलायला पाहीजे. आपण शहर अभियंता यांना काय प्रॉब्लेम आहे, कुठल्या अधिका—याला काय प्रॉब्लेम आहे, महापौर या नात्याने, उप महापौर या नात्याने आपण निंबाळकर साहेबांच्या लक्षात आणले पाहीजेत. आपण एक तर त्यांना अधिकार देत नाहीत, निंबाळकर साहेब कोणाला अधिकार राबवून देत नाहीत आणि तुम्ही त्यांच्यावर कारवाई करण्याची भाषा करतात. हे पुर्णपणे चुकीचे आहे, त्यांच्या बरोबर उभे राहीले पाहीजे, निंबाळकर साहेबांना या सगळया गोष्टी निदर्शनास आणून दिल्या पाहीजेत आणि जर जैसवार साहेब जर बोलेले, आज बोलेले जैसवार साहेब मी १० वर्क ऑर्डर देतो. तर उद्या निंबाळकर साहेब त्यांची निलंबन करण्याची ऑर्डर काढतील. तुम्ही करू शकता का? नाही करू शकत. मग त्यावेळी तुम्ही ही भाषा वापरायला पाहीजे. एक गोष्ट लक्षात ठेवा, कुठल्याही अधिका—यांला दोष देण्या पेक्षा त्या

अधिका–याची काम करण्याची पध्दत आपल्या महानगरपालिकेमध्ये नाही आणि आपण फक्त दोष देण्याची भाषा करतो,

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:–</u> भालेराव साहेब आपण मान्य करतात की, त्यांच्या हातामध्ये काहीही नाही.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u> त्यांचे अधिकार आयुक्त साहेबांनी स्वत:कडे ठेवलेले आहेत, आपण नगरसेवक आयुक्तांना बोलत नाहीत आणि आपण अधिका–यांवर घसरतो.

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:–</u> भालेराव साहेब, ही एक गोष्ट क्लियर करत आहे आपण, नंतर कुठल्याही महासभेमध्ये बोलायचे नाही.

या वेळी सदस्य श्री. शंकर लुंड, श्री. राजेश वानखेडे हे सभागृहातून बाहेर गेले आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> मा. महापौर मॅडम, या विषयावर खुप चर्चा झालेली आहे आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विषयावरच आजची ही महासभा चालली आहे. सकाळपासून हाच विषय चालू आहे, मी वाटते की, या विषयावर निवडणूक घेण्यात यावी. नाही तर सर्वसंमतीने या विषयाला पास करण्यात यावे आणि जर कोणी विरोध करीत असेल तर या प्रस्तावावर मतदान घेण्यात यावी.

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:–</u> माझा विरोध आहे, त्यांना इथे ठेवायचे नाही.

<u>महापालिका सचिव:–</u> कृपया हा ठराव कसा करायचा आणि मतदान घ्यायची किंवा नाही हे सांगावे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> मा. महापौरजी, या विषयाला वगळण्यात यावे.

<u>महापालिका सचिव:–</u> सर्व संमतीने डिफर?
<u>काही सदस्य:–</u>होय.

<u>सदस्या श्रीमती मिना सोनजी:–</u>माझा विरोध आहे की त्यांना येथे ठेवायचे नाही.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

विषय क्र. ६:– <u>प्रस्तावाची सूचना</u>

प्रतिनियुक्तीवरील शहर अभियंता श्री.राम जयस्वार यांना त्यांच्या मूळ विभागात परत पाठविण्याबाबत पालिका सदस्य श्रीमती मिना सोनेजी(सोंडे) व श्री. जमनादास पुरस्वानी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

या अशासकिय प्रस्तावाद्वारे सभागृहाचे लक्ष वेधु इच्छिते की, उल्हासनगर महानगरपालिका अतंर्गत उल्हासनगर शहरात विविध विकासाचे कामे होती घेण्यात आले असून, व काही प्रस्तावित आहेत. परंतु शहर अभियंता श्री. राम जयस्वार यांचे कोणत्याही विकास कामावर नियंत्रण नसल्याने, शहरात विकास कामे होण्यास विलंब होत आहे. उदा. शहाड येथील मुख्य रस्त्याचे कामे वेळेत न झाल्याने त्या ठिकाणी काही नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. तसेच कल्याण–अंबरनाथ रस्ता हो देखील संतगीने सुरु आहे. तसेच शहरात विविध ठिकाणी सुरु असलेल्या विकासच्या कामामध्ये विलंब व नियंत्रण नाही.

शासनाकडून व एमएमआरडीए कडून येणारा निधीचा प्रस्ताव वेळेवर न पाठविणे, तसेच नगरसेवक व प्रभाग समितीचे कामाचे प्राकलन न तयार करणे व निविदा काढण्यात विलंब करणे

तसेच महापालिका सदस्यांना वेळेत व समाधानकारक उत्तर न मिळणे अशा अनेक कारणास्तव ते आपले कर्तव्य व जबाबदारी व्यवस्थितरित्या पार पाडत नाही.

तसेच उल्हासनगर शहर स्मार्टसिटीमध्ये समाविष्ट होण्याकरिता योग्य तो प्रस्ताव देखील सादर करण्यास असमर्थ ठरले आहे. शहर अभियंता श्री. राम जयस्वार हे कामामध्ये सक्षम नसल्यामुळे त्यांना महापालिकेच्या प्रतिनियुक्तीवरुन त्यांच्या मूळ विभागात पाठविण्याबाबत येत्या महासभेत अशासकीय प्रस्तावद्वारे प्रस्ताव मांडत असून, निर्णय होणेस प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: १६ अ — दिनांक:—१८/७/२०१७

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेली कारणे लक्षात घेऊन प्रतिनियुक्तीवरील शहर अभियंता श्री. राम जयस्वार यांना त्यांच्या मूळ विभागात परत पाठविण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

मंजुर

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

---

—

⇨ विषय क्र. ७:— प्रस्तावाची सूचना

महापालिकेच्या आस्थापनेवर सन २००३ पासुन ठोकवेतनावर कार्यरत असणा—या प्रतिक्षा यादीतील कर्मचा—यांना अनुकंपा तत्वावर महापालिका सेवेत कायमस्वरुपी सामावुन घेणेबाबतचा पालिका सदस्य, श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— महापालिकेच्या अस्थापनावर सन २००५ पासून ठोक वेतनावर कार्यरत असणा—या प्रतिक्षा यादीतील कर्मचा—यांना अनुकंपा तत्वावर महापालिका सेवेत कायमस्वरूपी सामावुन घेणेबाबतचा केलेल्या महासभेच्या ठरावाची अंमलबजावणी होत नसल्या बाबत. अनुकंपा तत्वावरच्या लोकांचा साहेब हा २२/०८/२००५ रोजी झालेला ठराव आहे. किती दिवसात या सगळयांना कायमस्वरूपी सामावून घ्याल.

उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकर:— मी आज ते बघितले आहे, मला फक्त थोडासा कालावधी पाहीजे.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— मा. महापौरजी, हा गंभीर विषय आहे, आपण याचा खुलासा करा. काही वर्षाचा हा विषय आहे, तो सुर्वे साहेबांनी आणला आहे, मी त्यांना धन्यवाद देतो. हा जो अनुकंपाचा विषय आहे, हा काही वर्षापासून प्रलंबित आहे. पहीले शासन निर्णय होता की, अनुकंपामध्ये प्रत्येक वर्षी जी पदे रिक्त होत असतील त्यांच्या जागी ५ टक्के घेण्यात यावेत ते आता १० टक्के झाले आहे. परंतु काही वर्षापासून आम्ही १० टक्के भरती केलेली नाही. त्यासाठी मी निवेदन करतो की, या १० टक्के प्रत्येक वर्षामध्ये घेण्यात येतील सन २०१७ मध्ये हे ठिक नाही. सन २०१६ मध्ये एक पण भरती केले नाही, सन २०१५ मध्ये सुध्दा एकही घेतले नाही आणि हा त्यांचा जे वेतन आहे, १०,०००/— रूपये ते आता १४०००/— रूपये एक दिड वर्षापासून केलेला आहे. तर त्यांना संपुर्ण भरपाई करून दिली पाहीजे. जे

४०००/– रूपये कमी दिले आहेत आणि जेवढे पण अनुकंपाचे आहेत, तर आपण खुलासा करा की किती लोक आहेत, सन २०१६ व २०१७ चे १० टक्के करून सगळयांना दयायला पाहीजे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> हे किती दिवसात होईल.

<u>सदस्य, श्री. अरूण आशान:–</u> आयुक्त साहेब, आपल्या कर्मचा–यांच्या गेल्या नऊ महीन्यापासूनचा डी.ए. आणि प्रवास भत्ता पण आहे. हा विषय सुनिल सुर्वे साहेबांनी घेतला आहे, तो कर्मचा–यांच्या बाबतीतलाच आहे. चेक असून सुध्दा अजून ते अदा झाले नाहीत. निवडणूकीचे पण जास्त कामाचे भत्ता जे पेंडींग आहेत ते पण या विषयामध्ये धरून त्यांना पण ते देण्यात यावे.

<u>उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकर:–</u> निवडणूकी संदर्भात जे काही निर्देश येत आहेत,

<u>सदस्य, श्री. अरूण अशान:–</u> पण तो डि.ए. आणि प्रवास भत्ता जो नऊ महीन्यापासून त्यांचा आहे, तो अजून त्यांना अदा केलेला नाही. विषय कर्मचा–यांचा असल्यामुळे तो पण तुम्ही त्याच्यामध्ये घ्या.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u> देहेरकर साहेब ही यादी मला वाटते की, याच्यामध्ये ५३ लोकांचे केले आहे, १३० लोकांना देण्यात यावे आणि त्यांना त्यांच्या शिक्षणानुसार प्रमोशन देण्यात यावे.

<u>सदस्या, श्रीम. अर्चना करनकाळे:–</u> मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, माझे पण म्हणणे आहे की, सफाई कर्मचारी आपले इथे आहेत, पण ते १० ते १२ वर्षे प्रभारी लिपीक म्हणून काम करीत आहेत. त्यांचा विषय कधी आणणार आहेत, त्यांना पदोन्नती कधी देणार आहेत ते पण सांगा. त्यांच्या पाठीमागून येणारे लोक पदोन्नती घेऊन पुढे जात आहेत, ते सफाई कर्मचारी म्हणून त्यांचे शिक्षण पण आहे, प्रभारी लिपीक म्हणून ते काम पण करीत आहेत. त्यांना कधी पदोन्नती देणार आहेत.

<u>उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकर:–</u> मा. महापौर, सन्माननिय सदस्य, कोणत्याही आस्थापनेवर आपण नियुक्ती करीत असतांना दोन पध्दतीने केलेल्या, एक तर थेट पध्दत किंवा पदोन्नती पध्दतीने सुदैवाने इथे येण्या पुर्वी मला शासनाने जे उप संचालक पद दिले होते. त्या पदावर काम कारीत असतांना राज्यातील ४०० नगरपालिका मधील जवळ जवळ ६७ हजार अधिकारी आणि कर्मचारी यांचे अस्थापना माझ्याकडे होते. सुदैवाने मला तिथे चांगला अनुभव मिळाला आहे. म्हणून मी आपल्याना काही सांगू इच्छितो की, पहीली गोष्ट म्हणजे यातला आपण विषय वाचला तर ठोक वेतनावर कार्यरत असणा–या प्रतिक्षा यादीतील कर्मचा–यांना आता या ठोक वेतनावरील कर्मचा–यांची माहीती घेतली आहे. ते १३० कार्यरत आहेत, आणि हे १३० जे आपण लावलेले आहेत. ते एक तर अनुकंपा तत्वावर आपण त्यांना लावू शकलो नाही, म्हणून त्यांना घेतलेले आहेत. त्यामुळे त्यांचा अनुकंपाचा क्लेम आहेच. त्यामुळे हे नविन नाहीत की त्यांना घेतलेच पाहीजे, कायदयानुसार सन २०१४ चा जो जी.आर. आहे, पुर्वी ५ टक्के होते, आता १० टक्के केले आहे. दर वर्षी जी रिक्त पदे होत असतात, १० टक्के आपल्याला सामान्य प्रशासनाने विभागाने परमिशन दिले आहे की तुम्ही अनुकंपा तत्वावर घ्या. आता जेवढी आपली दरवर्षीची रिक्त पदे असतील, आज आपली रिक्त पदे जी काही काढलेली आहेत.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:–</u> देहेरकर साहेब अर्चना करनकाळे मॅडमचा एक प्रश्न आहे, जे सफाई कामगार प्रभारी लिपीक म्हणून १० ते १२ वर्षे काम करीत आहेत, त्यांचाही याच्यामध्ये होणार का?

<u>उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकर:–</u> आता हा झाला अनुकंपा तत्वावरचा....

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:–</u> हा जो मुद्दा आहे, प्रस्ताव अनुकंपा तत्वाचा आणण्याचे कारण आहे. शासनाचा जी.आर. आहे, ५ टक्के, १० टक्के सन २०१४ ला झालेला आहे. आपण ५ टक्केनुसार, १० टक्केनुसार भरती केली का? कधी पासून केली नाही, म्हणून आलेला आहे. समजा २००५ साली ५ टक्के होती ती आपण केली का? २००६ साली ५ टक्के ती आपण केली का? आज पर्यंत किती केली नाही आणि का केली नाही?

<u>उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकर:–</u> या संदर्भात पुर्वीचे का झाले नाही, एक तर आपले सेवा प्रवेश नुकतेच मंजूर झालेले आहेत. त्याच्यामध्ये

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u> सेवा प्रवेश नियम आणि अनुकंपा भरती याचा काहीच संबंध नाही.

<u>उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकरः—</u> रिक्त पदे आपल्यांना जी मिळतात, ती रिक्त पदे त्यातून गेलेत त्यातून रोष्टर काढावे लागतो, त्या रोष्टर प्रमाणे जे काही बसतात, एक तर ओपन मधले आणि कास्टमधले ते आपल्याला भरती करावे लागतात आणि हे आपल्याला बंधन १० टक्के आहे. ते पण आपण काढले तर ४६ लोक भरता येतात.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u> ४६ तरी फायनल झाले का?

<u>उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकरः—</u> एकुण ५४ जणांची लिस्ट तयार झाली, त्यामध्ये ८ सफाई कर्मचारी आहेत. त्यांचे फक्त टोटली छानणी करायची आहे की, हे त्यांनी व्यवस्थित, विहीत वेळेत आपल्याला अर्ज सादर केले होते का? आणि त्यांच्या ज्या नियुक्त्या होत्या, कारण की अनुकंपावर नियुक्त्या करत असतांना जे पुर्वीचे रोजनदारीवर आहेत, त्यांना आपण घेतले नाही.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u> अजून छाननी बाकी आहे का?

<u>उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकरः—</u> आता मी नविन आलेलो आहे, मला ते फक्त पाहयचे आहे,

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u> पुर्वीचे अधिकारी जाताना नविन अधिका—याला चार्ज देतो, पुर्वी काय केले, नाही केले, तुम्ही आहेत ना इथे. तुम्ही आता आलेत पण मॅडम आहेत, त्यांना माहीत असेल. छाननी झालेली आहे किंवा नाही.

<u>उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकरः—</u> झालेली आहे. ही फाईल गेलेली आहे, एकुण ४६ लोकांचे आणि ८ लोकांचे त्यांनी केलेली आहे. फक्त साहेबांशी चर्चा करायची होती.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u> १३० ची यादी आहे, त्यांना कसे समाविष्ट करण्यात येईल.

<u>उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकरः—</u> कारण की सदर आपल्याकडे ज्या रिक्त जागा आहेत, त्या प्रमाणे ४६ लोकांना १० टक्के प्रमाणे भरता येतील.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u> मागच्या वर्षी पण भरलेल्या नाहीत, मग ते सगळे करत १० टक्के प्रमाणे विचार केला तर होईल.

<u>उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकरः—</u> दरवर्षीचे आपला जो हिशोब असतो, की या वर्षी इतके रिक्त झाले आहेत. ते आपण फॉरवर्ड करीत आलो आहे.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u> ४६ होतात. मग बाकीचे उरलेले.

<u>उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकरः—</u> ते जशा जशी जागा रिक्त होतात, तशा तशा घेणार आणि आपण त्याच्यामध्ये काय करीत आहे, आता ....

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u> महापौर मॅडम, जरा माझे म्हणणे ऐकुण घ्या, आपण मागच्या वेळी हा जो ठराव केला आहे, हा एक वर्षा पुर्वी झालेला आपला ठराव आहे. एक वर्षा पुर्वी झालेल्या ठरावाची अंमलबजावणी झाली नाही. म्हणून हा विषय परत आणावा लागला. आता देखील तुमच्याकडे माहीती पुर्ण नाही. कारण की १३० कर्मचारी माझ्या माहीती प्रमाणे ५६ लोक आता बसू शकतात आणि पुढच्या सप्टेंबर महीन्यामध्ये बाकीचे जे आहेत, ते कर्मचारी सुध्दा सप्टेंबर ते ऑगस्ट पर्यंत बसू शकतात. तर हा विषय आम्हांला इथे येवून चर्चा करण्याचा काही अर्थच उरत नाही आणि परत उत्तरे, ठराव पास झाला, जर तुम्हांला मान्य नव्हते तर तुम्ही विखंडीत करायला पाठवायला पाहीजे होता. त्याला कालावधी तीन महीन्याचा होता. तीन महीने, चार महीने, सहा महीने आता एक वर्षे झालेला आहे. त्यामुळे हा ठराव लागू झाल्यामुळे त्याची अंमलबजावणी आपण किती दिवसात कराल. एकदम सिंपल शब्दात तुम्हांला विचारतो, किती दिवसात हा पुर्ण कराल आणि त्याची जबाबदारी कोण घेणार आहे. हे फक्त या सभागृहाला कळवावे आम्ही जास्त उहापोह करत नाही. त्यांना जसे

आबानी सांगितले की, सर्व सदस्यांनी पण सांगितले आहे. सन २०१४ चा जो ठोक वेतन आहे, त्याचे फरक आपण त्यांना कधी देणार आहेत. या सगळया गोष्टी जो पर्यंत तुम्ही सांगत नाहीत, या सभागृहाला कोणी सांगत नाही तर आम्ही कसे काय, एक वर्षा पासून तुम्ही त्या फाईलला हात लावला नाही. मी तर म्हणेल की एक दम खाली पडलेली गोष्ट आहे, घाणेरडी गोष्ट आहे ही, जाणीव पुर्वक या लोकांना लांब ठेवणे, एक तर त्यांची घरातील माणसे दगावली, एक तर लाईन मॅन होता, तो इलेक्ट्रीक शॉक लागून ऑन दी स्पॉट मृंत्यु पावला आहे, त्याच्या मुलाला देखील सहा वर्षे झाली असेच ठेवले आहे. भावना वैगेरे आहेत का नाहीत तुमच्या मध्ये, मला वाटते अधिका—याना एखादी जबाबदारी, एक पालककत्व म्हणून आहे की नाही, का सगळेच विकून खाल्ले आहे. या शब्दात बोलण्याची माझी वेळ आली आहे. सारखा ठराव आणत आहे, तळमळणीने मागच्या वेळेत १३ लोकांचे आणले, त्यातील दोन लोक ठेवली. मागच्या वेळीची दोन लोक ठेवली कारण की ते बसत नाही. बसत का नाही? कारण विचारले तर ते पात्र नाही. पात्र नाहीत तर ते सात वर्षापासून काम कसे करतात. पहीली गोष्ट पात्र नाहीत आणि पात्र होती म्हणून तुम्ही त्यांना ठेवले. ते अजोबांच्या जागेवर लागलेले आहेत. त्यांच्या मुळ संचिकामध्ये त्यांनी नमुद केले आहे की, त्यांची सेवा पुस्तकामध्ये नोंद आहे. त्यांचे प्रतिज्ञा पत्र आहेत, त्याला कोणाची हरकती नाहीत. तुम्ही लक्षात घ्या हा घोळ काय आहे, मला पण समजत नाही.सात वर्षा पासून काम करीत आहेत. त्या दोघांनाही पात्रतेच्या बाहेर काढले आहे. एक लाईन मॅन आहे, त्या दुर्दैवाच्या सगळया गोष्टी आहेत. बाकीचे पण विषय आहेत, मा. महापौरजी मी सभागृहाचे जास्त वेळ घेत नाही. मी ठराव देतो, तुम्ही ताबडतोब या १५ दिवसात करून दया.

या वेळी सदस्या, श्रीम. पंचम कालानी, श्रीम. आशा इदनानी, सदस्य, श्री. महेश सुखरामानी हे सभागृहातून बाहेर गेले.

<u>उप आयुक्त, श्री. संतोष देहेरकर:—</u> मगाशी मॅडम बोलल्या आहेत. त्याच्यामध्ये मी पहील्यांदाच बोललो आहे, आपल्याला एक तर थेट पध्दतीने किंवा पदोन्नतीने आपण नियुक्ती करत असतो. आता हे जे सफाई कर्मचारी, लिपीक म्हणून हे पदोन्नतीने येतात. पदोन्नती देत असतांना सिनेरीटी बघितली जाते. त्या सिनेरीटी प्रमाणे जे काही आहे, पदोन्नतीची टक्केवारी ठरलेली आहे.

<u>सदस्या, श्रीम. अर्चना करनकाळे:—</u> तरी पण खुप वर्षा पासून कधी देणार, सिनेरीटी प्रमाणे कधी देणार. आता शासनाचा जी. आर. आहे की, २५ लोकांना घ्यायचे आहे. परंतु त्यांना का घेत नाहीत. त्यांच्यामध्ये एक एक, दोन दोन घेतले असते तर आता ते संपले असते. ती लोक योग्य काम करीत आहेत. त्यांची कामाची पण चाचणी घ्या, ते करत आहेत किंवा नाही. ते लायक आहेत म्हणून त्या विभागामध्ये १० ते १२ वर्षा पासून आहेत. लोकांनवर पण अन्याय करू नका मुळात एस. सी. समाजाच्या काही महीला पण त्याच्यामध्ये आहेत. त्यांच्यावर अन्याय होत आहे, त्यामुळे मी तुम्हांला सांगते की, ते पण तुम्ही लवकरात लवकर तपासणी करून त्यांना पदोन्नती देण्यात यावी.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> ठराव वाचून दाखवतात.

ही महासभा वरील वरील प्रस्ताव विचारात घेता उल्हासनगर महानगरपालिकेतील अनुकंपा तत्वावरील (ठोक वेतनावरील) कार्यरत असणा—या २००५ ते २०१७ पर्यंतच्या सर्व कर्मचा—यांची शासन निर्णयानुसार उपलब्ध होणा—या पदांवर सदर कर्मचा—यांना प्रशासनाने तात्काळ कायम नियुक्ती देवुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील महासभे समोर माहितीसाठी सादर करण्याबाबत निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

तसेच ज्या जागा बाकी आहेत, आणि ३० ते ३३ कर्मचारी आता वाढलेले आहेत, त्यांच्या मुलांना पण त्या अनुषंगाने जर बसत असतील तर, कायदयात जे बसते ते करा आम्ही कायदेच्या बाहेर काहीच सांगत नाही, धन्यवाद.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑विषय क्र. ७:– प्रस्तावाची सूचना

महापालिकेच्या आस्थापनेवर सन २००३ पासुन ठोकवेतनावर कार्यरत असणा–या प्रतिक्षा यादीतील कर्मचा–यांना अनुकंपा तत्वावर महापालिका सेवेत कायमस्वरुपी सामावुन घेणेबाबतचा पालिका सदस्य, श्री. सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

प्रस्तावना

उपरोक्त विषयाबाबत आम्ही आपल्या निर्दशनास आणू इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिकेत अनुकंपा तत्वावर नियुक्ती दयावयाच्या कर्मचा–याना महासभा ठराव क्र. २३६ दि. २४/११/२०१० अन्वये ठाणे महानगरपालिकेच्या धर्तीवर वर्ग क्र.३ व ४ च्या पदावर एकत्रित वेतनावर नियुक्ती दिलेली असून आजपर्यंत या वेतानावर सदर कर्मचारी आपला व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह व शिक्षणाचे खर्च तटपुंज्या मिळणा–या ठोकवेतनावर म्हणजे रुपये १०,०००/– गुजराण करीत आहे. या मिळणा–या ठोकवेतनवर अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामध्ये होणारी भाववाढ, मध्ये त्याना त्यातच आपला खर्च भागवावा लागत असल्याने कठीण परीस्थितीचा सामना करावा लागत आहे. अशा परीस्थितीत ते कायम होण्याची वाट पहात काम करीत आहे.

महाराष्ट्र शासन क्र. अनुकंपा २०१४/प्र.क्र./५१/२००४/आठ/दि.२२/०८/२००५ अन्वये अनुकपा नियुक्तीसाठी गट क आणि ड मध्ये प्रति वर्षी रिक्त हाणा–या ५ पदे भरणाच्या मर्यादेमध्ये वाढ करुन प्रतिवर्षी रिक्त होणा–या पदाच्या १०,२५,५० अशा पध्दतीने अनुकंपावरील प्रतिक्षा यादीतील पदे भरण्याबाबत शासनाने निर्देश वेळोवळी दिलेले आहेत. परंतु महानगरपालिकेतील संबधित विभागाकडून वेळेत कार्यवाही होत नसल्याने या कर्मचा–यांना त्यांच्या हक्कापासून दूर रहावे लागत आहे ही वस्तुस्थिती आहे.

महापालिकेच्या सर्वसाधारण महासभेमध्ये महापालिका सदस्य या विषयावर चर्चा करुन या सर्व कर्मचा–याना महापालिकेच्या सेवेत कायम स्वरुपी घेवून तसा लाभ देण्याबाबत दि. १८/१२/२०१५ ठराव क्र. ५८ (१) पारीत करुन कार्यवाहीच्या सुचना देवूनही संबधित विभाग कार्यवाही करीत नाही हे महासभेमध्ये सदस्यानी केलेल्या ठरावाचा अवमान आहे.

महासभा ठराव क्र: १७ दिनांकः–१८/७/२०१७

सुचकाचे नाव :– श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

ही महासभा वरील वरील प्रस्ताव विचारात घेता उल्हासनगर महानगरपालिकेतील अनुकंपा तत्वावरील (ठोक वेतनावरील) कार्यरत असणा–या २००५ ते २०१७ पर्यंतच्या सर्व कर्मचा–यांची शासन निर्णयानुसार उपलब्ध होणा–या पदांवर सदर कर्मचा–यांना प्रशासनाने तात्काळ कायम नियुक्ती देवुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील महासभेसमोर माहितीसाठी सादर करण्याबाबत निर्देश देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :– विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

⇨ **विषय क्र. ८ :— प्रस्तावाची सूचना**

महापालिकेच्या अतिआवश्यक विभागात मोडणारे वालमन/पंप्म ऑपरेटर यांना महापालिकेच्या आस्थापनेवर घेण्यात पालिका सदस्य श्री.सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** हा विषय आणतांना माझ्या डोक्यात येत होते की, त्या कर्मचा—यांना कामांवर ठेवायला पाहीजे होते, पण ते ठेकेदारांकडे असल्यामुळे आपल्याला कायम करता येत नाहीत. कमीत कमी त्यांना मिनिमम वेतन तरी दया. जे मिनिमम वेतन आहे, ते त्यांच्या खात्यामध्ये तो ठेकेदार जमा करतो की नाही ही जबाबदारी कोणाची आहे. मा. सुप्रीम कोर्टाचा आदेशानुसार आपण त्यांना जे मिनिमम वेतन देतो, ते मिनिमम वेतन देण्याची जबाबदारी, ठेकेदार त्यांना मिनिमम वेतन देतो की नाही ही जबाबदारी कोणाची आहे. महानगरपालिकेने ती जबाबदारी पार पाडावी आणि त्यांना नियमानुसार वेतन त्यांना मिळावे एवढीच विनंती आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, याचा ठराव काय करायचा हे सांगा. जो विषय सुर्वेजीनी आणला आहे. ते आपण पहीले समजावून घ्या आणि ठराव कसा करायचा? हे ठेकेदारी पध्दतीवर पंप ऑपरेटर करणेचे काम आपण ठेकेदाराला दिला आहे आणि हे जे कर्मचारी आहेत, ते ठेकेदाराचे कर्मचारी आहेत. त्यांना वेतन देणे, त्यांचे संरक्षण करणे हे आपले कर्तव्य नाही. ठेकेदाराचे कर्तव्य आहे. तर आपण ठराव कसे करायचा.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** जमुनादासजी हुशार आहेत, मी फक्त त्यांच्या भावना कळविल्या आहेत. त्यांना वेतन मिळत नाही. ठराव करायची गरज आहे. प्रशासनाचे आणि तुमचे कान उघडण्यासाठी त्यांना ऐकायला येत नाही. त्या करीता फक्त सांगितले आहे. ठराव होत नाही हे मला कळते.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** मा. महापौर, सुर्वे साहेबांनी जो अशासकिय प्रस्ताव आणला आहे. त्यामध्ये जो ठेकेदार आहे, जे ठेकेदाराचे कामगार आहेत, त्यांना पगार वेळेवर मिळायला पाहीजे. जो मिनिमम वेतन आहे, तो त्यांना मिळायला पाहीजे. ती जबाबदारी प्रशासनाची आहे. प्रशासनाला सांगून, आपण त्यांना आदेश देवून त्यांचे वेतन देण्याची जबाबरी त्याच्यावर टाका.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** कोणार्कचे कच—याचे ठेकेदाराला पण हाच नियम लागू होईल.

**सदस्य, श्री. रमेश चव्हाण:—** मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, डॉ. प्रिती जैन भाटीया, त्यांचे अभिनंदन करणे बाबत मा. महापौर महोदया आपणास कळविणेत अतिशय आनंद होत आहे.

**महापालि सचिव:—** या ठरावाचे काय करायचे ते पहीले सांगा. नंतर पुढचे विषय घेण्यात येतील.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** हा ठराव जे जे महानगरपालिकेचे याच्यामध्ये जे जे ठेकेदार आहेत, ते कर्मचा—यांना नियमाप्रमाणे पगार देण्यात यावा एवढेच मग ते कच—याचे टेंडर असेल, तुमचा वॉलमनचा टेंडर असेल असे अनेक टेंडर असतील.

**महापालिका सचिव:—** या मध्ये ठराव काय करायचा? डिफर किंवा अमान्य.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** फक्त प्रशासनाला समजण्यासाठी आहे, ठराव होतो.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—** प्रशासनाने फक्त आपल्या सदस्यांची जी भावना आहे ती समजून घ्यावी आणि नियमाप्रमाणे ठेकेदाराने त्यांना वेतन दयायचे आहे, मेडीकल दयायचे जे काही सदस्यांची भावना आहे. प्रशासनाने फक्त त्याची दक्षता घ्यावी.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—** अमान्य करा, अमान्य.

**काही सदस्य:—** अमान्य, अमान्य.

<u>महापालिका सचिव:—</u> हा प्रस्ताव सर्वानुमते अमान्य करण्यात येत आहे.

<u>काही सदस्य :—</u>होय.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ विषय क्र. ८:— <u>प्रस्तावाची सूचना</u>

महापालिकेच्या अतिआवश्यक विभागात मोडणारे वालमन/पंप्म ऑपरेटर यांना महापालिकेच्या आस्थापनेवर घेण्यात पालिका सदस्य श्री.सुनिल सुर्वे यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयाबाबत आम्ही आपल्या निर्दशनास आणू इच्छितो की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या अतिआवश्यक विभाग म्हणून पाणी पूरवठा विभाग मोडत असून या विभागात कार्यरत कंत्राटी वालमन, मेस्त्री, जोडारी, पंम्प ऑपरेटर या पदावरील कर्मचारी गेल्या अनेक वर्षापासून या विभागात काम करीत आहे दिवसेंदिवस पाण्याच्या सदंर्भातील तक्रारी तसेच काही नागरीक, पदाधिकारी याच्या रोषास सामोरे जाणारे हे वरील कर्मचारी अशा परीस्थितातीत या विभागात काम करीत आहे. अशा कर्मचा—याना तटपुंज्या वेतनावर व पगार देखील वेळेत मिळत नसून देखील ते काम करीत आहे. महापालिकेत अनेक पदे हे सेवानिवृत्ती व दिवगंतामुळे रिक्त आहेत सदर रीक्त कंत्राटत्री कर्मचा—यांनी आमच्याकडे तशी विनंती केली आहे. तसेच इतर महानगरपालिकेत अशा कर्मचा—यांना त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांना न्याय दिला आहे.

वरील कर्मचारी हे गेल्या अनेक वर्षापासून नियमित काम करीत आहे व त्याना त्या परीसरात सोडण्यात येणा—या पाण्याची वेळ व तेथून जाणा—या जलवाहीन्याची माहिती असल्याने त्यांना वरील पदावर घेतल्यास कार्यालयीन कामकाज सुकर होईल.

तरी वरील विषयी चर्चा करुन निर्णय घेण्याकरिता येत्या महासभेमध्ये विषय घेण्यात यावा, ही विनंती.

<u>महासभा ठराव क्र:</u> १८ <u>दिनांक:—१८/७/२०१७</u>

सुचकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

अनुमोदकाचे नाव :— श्री. किशोर वनवारी

हो महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महापालिकेच्या अतिआवश्यक विभागात मोडणारे वालमन/पंप्म ऑपरेटर यांना महापालिकेच्या आस्थापनेवर घेण्याचा प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण:—</u> मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, डॉ. प्रिती जैन भाटीया, त्यांचे अभिनंदन करण्यासाठी त्यांना सभागृहामध्ये बोलविण्यात यावे. मी तुम्हांला पत्र दिले आहे आणि दुसरा विषय असा आहे की, उल्हासनगर महानगरपालिकेचे, शिवसेनेचे २७ नगरसेवक यांचे मानधन महाराष्ट्रातील शेतक—यांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी शिवसेना मदत निधी नावाने चेक देण्याबाबत. आम्ही सर्वांनी त्या पत्रावर सहया केल्या आहेत, आमचे सर्वांचे जून महीन्याचे मानधन.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> आमचे परस्पर एक महीन्याचे पगार देण्यात यावे.

<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u> राष्ट्रवादी पार्टीतर्फे जे चार नगरसेवक आहेत, त्यांचे पण मानधन देण्यात यावे.

<u>महापालि सचिव:—</u> शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्षातर्फे त्यांचे मानधन. राष्ट्रवादीपक्षाने मत दयावे.

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—</u> मा. महापौर मॅडम, विरोधी पक्ष नेता, रमेश चव्हाण साहेबांनी जे डॉ. भाटीया यांचे उल्लेख केलेला आहे. सभागृहाला त्यांचे समाजकार्य काय आहे, ते माहीत पडले पाहीजे? त्यांचे समाजकार्य काही नाही. शी इज नॉट डुईंग सोशल वर्क. कशाला सन्मान, त्या पेक्षा ज्ञानदा मंदिरची शिक्षिका आहे त्यांचे करा.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> महापौर महोदया, शिवसेनेच्या सर्व सदस्यांनी एक उल्हासनगरची एक मुलगी किंवा उल्हासनगरची सुन ऑल इंडिया लेवलला स्किन स्पेर्धेमध्ये किंवा मिस इंडिया म्हणून सन्मानीत होते आणि ती आता लंडनला ९ सप्टेंबर रोजी जे मिस युनिर्वसल या स्पर्धेसाठी इंडियाला रिप्रेजेंटेटीव्ह उल्हासनगरची मुलगी आहे. म्हणून अशा लोकांचे...

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—</u> कबुल आहे. पण त्यांची...

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> अशा लोकांचे सन्मान होणे गरजेचे आहे. या प्रत्येक गोष्टीमध्ये प्रत्येकाचे मुल्यमापन वेगळे असते. कोणामध्ये काय क्वालिटी असतात, कोणामध्ये काय क्वालिटी असतात अशा प्रकारच्या या उल्हानगरच्या मुलीचे इथे सत्कार होणे गरजेचे आहे. जेणेकरून त्याचा आदर्श लोकांनी घ्यावा की, इंडिया लेवलला सुध्दा येणे फार मुश्किल आहे आणि आता इथे युनिर्वसला चाललेली आहे, तिच्या पुढच्या भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा!

यावेळी युनिर्वसलला जाणा—या मुलीचा सत्कार करण्यात आला.

<u>महापालि सचिव:—</u> आता पहिली सभा संपली आहे.

सांयकाळी ६.५० वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:–१९/७/२०१७

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/७/२०१७ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

४

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा दिनांक १९/७/२०१७ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती मिना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मिना कुमार आयलानी –– महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी –– उप–महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ४२ | श्रीमती कविता लाल पंजाबी |
| ४ | श्रीमती पुजा सचिन भोईर | ४३ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| ५ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ४४ | श्री. गजानन प्रल्हाद शेळगे |
| ६ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ४५ | श्रीमती ज्योती प्रकाश (पिंटो) बठिजा |
| ७ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४६ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी |
| ८ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ४७ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ९ | श्रीमती पंचम उमेश कालानी | ४८ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| १० | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४९ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ११ | श्रीमती आशा नाना बिराडे | ५० | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १२ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ५१ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| १३ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ५२ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| १४ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ५३ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १५ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ५४ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १६ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ५५ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| १७ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ५६ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १८ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा | ५७ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १९ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ५८ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| २० | श्रीमती गीता लालचंद साधनानी | ५९ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| २१ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ६० | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| २२ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ६१ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| २३ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ६२ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| २४ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ६३ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| २५ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ६४ | श्रीमती पुजाकौर श्यामसिंग लबाना |
| २६ | श्रीमती शुभांगीनी निकम | ६५ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| २७ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ६६ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २८ | श्री. भगवान शंकर भालेराव | ६७ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २९ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ६८ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| ३० | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ६९ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| ३१ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ७० | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| ३२ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ७१ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| ३३ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ७२ | कु. कविता सुरेश गायकवाड |
| ३४ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ७३ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| ३५ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ७४ | श्री. विकास परशुराम पाटील |

| | | | |
|---|---|---|---|
| ३६ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ७५ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३७ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ७६ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३८ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ७७ | श्री.सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३९ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ७८ | श्री. अरुण लक्ष्मण आशान |
| ४० | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ७९ | श्रीमती आशा जीवन इदनानी |
| ४१ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती सरोजिनी मुरलीधर टेकचंदानी, २. श्रीमती कविता सुधिर बागुल, ३. श्रीमती मिनाक्षी रवी पाटील, ४. श्री. विजय चाहु पाटील

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१४. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
१५. श्रीमती विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
१६. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
१७. श्री. संतोष देहेरकर, उप–आयुक्त, मुख्यालय
१८. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
१९. श्री. सुखदेव बलमे, मुख्य लेखा परिक्षक
२०. श्री. अशोक जाधव, उप लेखा परिक्षक
२१. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
२२. श्री. महेश सितलानी, उप अभियंता
२३. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
२४. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
२५. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
२६. श्री. नंदु समतानी, सहा. आयुक्त, एलबीटी
२७. श्री. भास्कर मिरपगार, प्र. अग्निशमन अधिकारी
२८. श्री. बाळु नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
२९. श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक
३०. श्रीमती छाया डांगळे, प्र. सहा. आयुक्त,विधी
३१. श्रीमती अलका पवार, प्र. सहा. आयुक्त
३२. श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
३३. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर
३४. श्रीमती निलीमा कदम, कॅशिअर, शिक्षण मंडळ

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी

दुपारी २.४० वाजता वंदे मातरम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव:–</u> दिनांक १९/०७/१७ रोजीची सर्वसाधारण सभा आहे. विषय क्र. १ प्रश्नोत्तर आहेत. काल प्रश्न ७ पर्यत झाले होते.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u> मा. महापौर मॅडम आपल्या सभागृह चे सदस्य श्री. प्रमोद टालेजी आहेत, यांचे पुत्र श्री. अभिषेक प्रमोद टाले, ते यु.पी.एस.सी केंद्रीय नगरीक सेवा परिक्षा मधे चांगल्या क्रमांकाने पास झाले आहेत. त्यांचा पण अभिनंदन चा ठराव आपण या सभा द्वारे केला पाहिजे, तर आपण असे करणार आशी मी अपेक्षा ठेवतो.

<u>सदस्य श्री. प्रदीप रामचंदानी:–</u> मा. महापौर महोदया, श्री. अभिषेक टाले उल्हासनगर शहरासाठी गर्वाची गोष्ट आहे. आले आहे का श्री. अभिषेक टाले? आज, त्यांला बोलावुन त्यांचे आपण

अभिनंदन केले पाहिजे. पुढच्या सभेत करु. श्री. एल.बी पाटीलची जी मुलगी आहे, त्यांचे पण अभिनंदन केले पाहिजे. त्यांनी टॉपर केले आहेत, दोघांना पुढच्या सभेत बोलावुन आपण त्यांचे अभिनंदन करु या.

महापालिका सचिव :– आता अभिनंदन प्रस्ताव करायचा आहे. या मिंटीगमध्ये? ठीक आहे.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :– सदरचा प्रस्ताव सर्वानुमते पुढीलप्रमाणे संमत करण्यात येत आहे

---

☑ अभिनंदन प्रस्ताव

उल्हासनगर महानगरपालिकेचे सदस्य श्री. प्रमोद टाले यांचे पुत्र श्री. अभिषेक प्रमोद टाले हे यु.पी.एस.सी केंद्रीय नागरीक सेवा परिक्षा मध्ये चांगल्या क्रमांकाने पास झाले आहेत.

तसेच श्री. एल.बी पाटील यांची मुलगी ही परिक्षेत उत्तीर्ण होवुन टॉपर आली आहे. या दोन्ही मुलांचे अभिनंदन करण्यास प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. १९ ब दिनांक :– १९/७/२०१७

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :– श्री. दिपक सिरवानी

ही महासभा श्री. अभिषेक प्रमोद टाले व श्री. एल. बी. पाटील यांची मुलगी यांचे अभिनंदन करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– प्रश्नोत्तर चा तास सुरु होत आहे. २.४९ मिनिटे झाली आहेत. प्रश्न क्र.७ पुर्ण झाले होते. प्रश्न क्र.७ सुर्वे साहेबांचा होता. प्रश्न क्र. ८ हा श्रीम. मिनाताई सोनेजी चा आहे. अजुन उत्तर प्राप्त नाही आहे, प्रश्न क्र. ९ हा श्री. भारत राजवानी चा आहे,

सदस्य श्री. सुनील सुर्वे :– उत्तर प्राप्त झाले नाही म्हणजे काय? प्रश्न कुठला आहे वाचुन तर दाखवा?

महापालिका सचिव :– विभागाकडुन आले नाही उत्तर.

सदस्य श्री. सुनील सुर्वे:– उत्तर प्राप्त नाही म्हटल्यावर असा कुठला प्रश्न आहे?

सदस्य श्री. धनंजय बोडारे:– आयुक्त साहेब, या पुर्वी अशी प्रथा होती, की महासभेच्या दोन दिवस किवा तीन दिवस अगोदर आयुक्त सर्व एच.ओ.डी. ची मिंटीग घ्यायचे, महासभांचे प्रश्नांचे उत्तर काय दिले जात आहेत ते पहायचे, तर कालच्या मिटींगमध्ये आम्हांला असे जाणवले की, ब–याच प्रश्नांचे उत्तर निरंक आहेत, निरंक म्हणजे काय? प्रश्न विचारलेला आहे त्याचा अर्थ आहे का नाही? लोक प्रश्न विचारतात, नगरसेवक प्रश्न विचारतात त्यांचे सर्मपक उत्तर मिळत नाही, त्या विषयावर चर्चा होणार नाही, पण उत्तर मिळालीच नाही, एप्रिल महिन्यातील प्रश्न आहे, पण तेचे अजुनही उत्तर नाही, म्हणजे ही बैठक घ्यायची आणि त्यामध्ये ती चर्चा, प्रश्नाचे जर व्यवस्थित उत्तर मिळाले नाही जास्तीत जास्त पुढचे प्रश्न विचारता येतील. पण उत्तरच मिळत नाही, त्यामुळे चर्चा अडते, कालच्या फक्त अर्धा तासाच्या मिटींग मध्ये फक्त दोन प्रश्नावर चर्चा झाली, कारण उत्तरच बरोबर नव्हते, या विभागाने सांगितले हे माझे प्रश्न नाही, त्या विभागाने सांगितले माझा प्रश्न नाही, असेच उत्तर संपते, आपण याची दखल घ्यावी आणि नगरसेवक विचारलेले प्रश्नाचे उत्तर समर्थक आणि सार्थक असली पाहिजे.

<u>सदस्य श्रीम. मिना सोनेजी :—</u> साहेब प्रश्न पण एकदम सरळ आहे, आपले महानगरपालिकाच्या हद्दीत उमपा चे शाळेमध्ये प्राथमिक शाळा किती आहेत? पुर्व प्रथामिक शाळा किती होते? प्रत्येक शाळेमध्ये १ ते ७ च्या विध्यार्थीची हजेरपट संख्या किती आहे? साहेब, जर हे आपल्या कडे उपलब्ध नाही आहे, हे कसे काय शक्य आहे? आणि हा प्रश्न मे (MAY) मधे आपण विचारलेला आहे, मे, जुन आणि जुलै, चार महिने व्हायला आले साहेब, हे असे आपले प्रशासन आहे, साहेब, काय उत्तर याला? आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकरयांचे आपल्याकडे नोंद नसते का? सोपी लिस्ट आहे.

<u>उप आयुक्त श्री. संतोष देहरकर :—</u> मा. सभागृह कृपया हा जो विषय आहे, याची १५ मिंनिटात मी तुम्हाला माहिती देतो. तो पर्यंत दुसरा विषय.

<u>सदस्य श्रीम. मिना सोनेजी :—</u> साहेब प्रश्न उत्तर संपन्याआगोदर मला द्यावे.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र. ९ हा प्रश्न श्री. भारत राजवानी यांचा आहे.

**?**

<u>प्रश्न क्र. ९ :—</u> उल्हासनगर मनपा क्षेत्र में कल्याण—बदलापूर रोड के विस्तारीकरण का काम शहर डीपी के तहत हो रहां है क्या ? कन्झैनसे प्लान को उल्हासनगर मनपा प्रमाण मानकर चल रही है ?

अ.) रोड का सेंटर डीपी के अनुसार तय किया गया है या फिर डिवायडर को सेंटर मानकर किया गया हैं ?

ब.) मनपा रोड विस्तारीकरण रिपोर्ट के अनुसार, कितने निर्माण यु नं. प्राप्त है, कितने ई नं. प्राप्त है, कितनो को मालकाना हक याने सनद प्राप्त है?

क) सभी निर्माणोंको एक ही तरह कें नोटीस दिये गये है या फिर वैध— अवैध निर्माणों के अनुसार, अलग अलग नोटीस दिये गये है?

ड.) जिनके पास जमीनों का मालकाना हक है, क्या उनके मामले मे लॅन्ड ॲक्विजिशन या अन्य कोई कानुनी जमीन हस्तांतरण की प्रक्रिया को पुरा किया गया है?

ई.) संबंधित रोड विस्तारीकरण के काम की वर्तमान स्थिती क्या है?

<u>उत्तर:—</u> सार्वजनिक बांधकाम विभागातील सर्व उप अभियंता व लिपीक यांची पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीचे कामी नियुक्ती झालेली आहे. सदर विभागामध्ये कोणीही अधिकारी व कर्मचारी उपलब्ध नाही. त्यामुळे आपणांस या महासभेमध्ये प्रश्नाचे उत्तर न देता पुढील येणा—या महासभेमध्ये देण्यात येईल.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u> या प्रश्नाचे उत्तर कुठे आहे?, आत मध्ये उत्तर नाही आहे, शहर अभियंता रजेवर आहे. उत्तर कुठे आहे? काय चर्चा करणार? उत्तर तर असले पाहिजे ना? ते कोणाच काम आहे? विभागातुन अजुन उत्तर आले नाही.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u> मा. महापौर महोदया आणि सर्व मा. सदस्य, ह्या प्रश्नाचे उत्तर त्यांनी शहर अभियंताला देण्यासाठी लिहिले आहे, पण हा नगररचनाचा विषय आहे. जेवढी माहिती माझ्याकडे आहे मी तुम्हाला सांगु शकतो. आता जो आपला कल्याण अंबरनाथ रोडचा विषय आहे. त्याच्यात आपण डि.पी प्लान किवा रोड डिवाईडर आहे, यामध्ये जी आम्हाला निवड होते, आयुक्तांच्या अधिकाराच्या आधी होते. रोड डिवाईडर जो वर्षापासुन ज्या अवस्थेत होते, ज्या आधारवर आम्ही डिमार्केशन केले त्या आधारवर आम्ही कायम केले आहे, आणि त्या आधारावर आम्ही ज्याच्या नावावर जागा होते, त्याना कंपेनसेशन देण्याचे आदेश पण मी माझ्या पत्रामध्ये लिहिले आहे, आणि त्याला तीन महिन्यात पुर्ण करण्याची बांधिलकी मी स्वत:ला केले आहे. दुर्भाग्यवश कुठले लोक त्याला कोर्टामध्ये घेऊन गेले आणि त्यामुळे त्यावर स्थगिती आली आहे, त्यामुळे आम्ही त्यांच मालमत्ता आपल्या ताब्यात करता येत आहे, किवा त्यांला रोड बायडींग करता नाही येत आहे. तर जेव्हा हायकोर्टाचा मॅटर सेटल होईल आणि आदेश जे आम्ही पास केले आहेत, आणि जो पर्यंत हायकोर्टचा आदेश येत नाही किंवा जेव्हा हायकोर्टचे आदेश मिळतील तेव्हा आपण, आपला मुलभूत प्रश्न आहे कि आपण डि.पी फॉलोअप करतो किंवा डिवाईडर फॉलोप करतो, तर कायदयाने आपण डि.पी फॉलोअप केले पाहिजे, परंतु डि.सी. रुलस

मधे आयुक्तांला एमपावर केले आहे जर स्थानिक परीस्थिती मध्ये काही मुळभूत अडचण आहे तर the commissioner can change alignment a little bit subject to the DP and others what the DP is, आणि त्याचा हिशोबाने मी माझे बोलण्याचे आदेश व्यवस्थित मार्चच्या पहिल्या आठवड्यात केला होता, ज्याच्या विरोधात शहरवासी कोर्टीत गेले आहे,

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u> आपल्या आधी जे आयुक्त आले होते, त्यांनी हे व्यवस्थित आयुक्ताच्या हिशोबात काम केले होते का? त्यांने आपल्या अधिकारच्या हिशोबाने जे alignment बदली केले होते त्या हिशोबाने नोटीस काढली आहे,

<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u> त्या नोटीस बद्दल मला काही महिती नाही, परंतु हया बद्दल जर माझ्याकडे कोणी तक्रार केली असती तर मला आधीच लक्षात आले असते, पहिल्यांदा मला आपल्याकडुन ही तक्रार कळली,

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u> तुमच्या मेजरमेंटच्या आधी लोकांने विरोध केला आहे, त्याचा कुणालाही रिप्लाय दिला नाही.

<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर</u>:– असे काही माझ्या समोर आलेल नाही. ज्यांचे आम्ही ऐकले अशा ३६ केसेस होत्या त्यांना मी प्रत्यक्ष बोलवले आणि नंतर त्यांची ऑर्डर पास केली. काही लोक असे आहेत जे कोर्टातही नाही गेले त्यांना पण बोलावून त्यांचेही ऐकले आणि त्यांची काही हरकत ही नाही असच समजल पाहिजे कोणी त्यांना चॅलेंजच करत नाही. आणि त्यांच्या बाजूने कोणतीही ऑर्डर महापालिकेकडून पास होत नाही त्यामुळे असे समजले पाहिजे की त्यांची काही हरकत नाही असच समजले पाहिजे.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी:–</u> तिथे किती तरी लोकांचे घर गेले आहे. दुकाने गेली आहेत त्याना कार्यालयीन नोटीस दिली नाही त्यांना जमिनीच्या हिशोबाने नोटिस दिली पाहिजे होती कुणालाही ती कार्यालयाकडून दिली नाही.

<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u> ही आमची वर्षापासुनची प्रोसिजर आहे. ज्यात आम्ही आपण जसे बोलत आहात जमिनिच्या हिशोबाने या टाऊन प्लॅनिंग ॲक्टमध्ये जमिनीच्या हिशोबाने नाही, एम.आर.टी.पी. ॲक्टमध्ये आम्ही कारवाई करतो. त्याच्या मध्ये आम्ही डीम जेव्हा एम.आर.टी.पी. चा डीपी अंतिम होतो तेव्हा त्याच्यात डीम ॲक्वेजेशन मानले जाते. अन्डर सेक्शन हड्रेंड ॲन्ड टवेंन्टी सिक्स या हड्रेड ॲन्ड टवेन्टी सेवन सेक्शन त्या हिशोबाने कारवाई झाली होती. माझ्या येण्या अगोदर एक वर्षापुर्वी ती कारवाई झाली होती. परंतु आपल्याला ज्या कुणाचे जमिनीच्या हिशोबाने टायटल असेल किंवा सीडी असेल त्यांचे आम्ही प्रॉपरली आम्ही कंपेनसेशन घेण्यासाठी आम्ही कमेंटमेंट केले आहे.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी:– </u>ठीक आहे, कमेंटमेंट केलेले आहे किवा चालू आहे.

<u>सदस्य श्रीम. सुनिता बगाडे :–</u> मा. महापौर जी राजवानी साहेबांचा प्रश्न आहे.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी:–</u> मेन जे सुचना तुम्ही देणार होते कमिशनर आपल्या पॉवरच्या हिशोबाने ते लोकांना माहिती झाली पाहिजे होते. कोणालाही माहिती नाही की कमिशनर त्या पॉवरने त्या ॲक्टला वापर करून सुचना देत आहेत.

<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर:— </u>ती गोष्ट झाली आहे त्या गोष्टीला एक वर्षे झाले आहे. आता आम्ही त्यांचे जे काही कंम्पन्सेशन आहे ते आम्ही देण्याचे कमेंटमेंट देत आहोत. त्यांचे कडे वॅलिड लिगल कागदपत्रे आहेत, सनद आहे किंवा सीडी आहे यु सर्टिफिकेट जे तुम्ही कागद म्हणता त्याचा अर्थ फक्त पझेशन होतो. त्याचे आम्ही कसे कंम्पन्सेशन देणार ते आम्ही बघतो. परंतु ज्यांच्याकडे सीडी आहे किंवा सनद आहे शंभर टक्के ही इज इन टायटल फॉर रिझनेबल पोझिशन जे काही असेल ते त्यांना मिळेल. ते भले मॉनेट्रिटम्स मध्ये मिळेल किंवा त्यांना टी.डी. आर नुसार मिळेल.

<u>सदस्य श्री. राजेश वधरिया:— </u>मी तुमच्या लक्षात देऊन माझे म्हणणे सांगू इच्छीत आहे, की त्या रोडवर एक एफ एम किराणा म्हणून एक प्रॉपर्टी आहे आणि हाय कोर्टाने त्यांना स्टे दिला आहे. ज्याला आजपर्यंत आपण तोडले नाही. त्यांनी तुमच्याकडे कंपेनसेशन ची मांगणी केली आहे अल्टरनेट साईटची. आणि हाय कोर्टने एक आणि दोन लोकांना अल्टरनेट साईटची दिली आहे. एक जणाला दिली आहे. तर त्यांनापण अल्टरनेट साईट देऊन त्यांना तुम्ही मोकळे का नाही करत. जागा का नाही आपल्या ताब्यात घेत आहात.

<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर:— </u>अल्टरनेट साईट देण्यासाठी आपल्याकडे एकतर तेवढी अल्टरनेट साईड उपलब्ध पाहिजे तो एक मुद्दा आहे. कोणत्याही रोड कटिंग आम्ही करत असताना तर अल्टरनेट साईड कॅन बी गिव्हन ऑन कम्प्लनेशनल ग्राउंड होणे गरजेचे आहे. नॉट ॲज अ लिगल देअर राईट्स च्या हिशोबाने आम्ही त्यांना देऊ शकत नाही. दॅट ईज नॉट कंपंसेशन दॅट ईज नॉट बायडिंग ऑन कार्पोरेशन परंतु त्यांच्याकडे उपलब्ध आहे तर डिपेंडिंग ऑन दॅट आम्ही त्यांना देऊ शकतो.

<u>सदस्य श्री. राजेश वधरिया:— </u>जागा महापालिकेकडे कडे उपलब्ध आहे त्यांनी तुम्हाला जागापण सांगितली आहे.

<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर:— </u>होय इंदिरा गांधी मार्केट

<u>सदस्य श्री. राजेश वधरिया :— </u>विठलवाडी स्टेशनच्या बाहेर महानगरपालिकेचा जुना जकात नाका होता आता जकात बंद झाली आहे तर ती जकात नाक्यानी जागा रिकामी पडलेली आहे. त्या जकात नाक्याच्या बाजूला छोठे मोठे काम आहे गोळी बिस्कीट विक्री करतात त्याच्या दुकान आहे. त्याची ती मागणी आहे की ती जागा तुम्ही त्याना त्यावा तर त्याची कम्पेनसेंशन होईल. जर ऐक ऐक करुन आपण सेटल करत जाऊ तर जर हा मॅटर सुटेल नाहीतर वर्षानुवर्ष.....

<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर:— </u>याच्यामध्ये बघितले पाहिजे की, एकतर याच्यामध्ये खूप काही वेरियेशन्स आहेत ज्याच पुर्णपणे दुकान आणि प्रॉपर्टी गेली आहे. त्यांना प्राधान्य दिल पाहिजे.

<u>सदस्य श्री. राजेश वधरिया :— </u>मी तुम्हाला सांगू इच्छितो की, ज्यांच दुकान पुर्ण गेले आहे एक. त्याना दुकानाची सनद आहे दोन. तर तिसरा जे तुम्ही म्हणत आहात की प्रॉपर्टी असली पाहिजे तर प्रॉपर्टी पण आहे.

<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर:— </u>ठीक आहे.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u> आयुक्त महोदय, पण मी आपल्या समोर माझा प्रश्न ठेवत आहे राजवानीजींनी जो प्रश्न मांडला आहे तुम्ही हे मान्य करत आहात का की प्रशासनाकडून मार्कींग देण्यामध्ये कुठेना कुठे काही चुक झाली आहे.

<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> समोरासमोर बघितले पाहिजे की, अस मी मान्य करणारही नाही किंवा मी त्याला दुर्लक्षही करणार नाही. कमी व जास्त जी आपण मार्किंग केली आहे त्याचे पुर्ण मी स्वत: जाऊन रोडचे तीन किलोमीटर जे काही कमी व जास्त ते केले आहे. जे आपल्याला शंभर फुटाचे डिमार्केशन पाहिजे. जे लोक कोर्टात गेले आहेत त्यांना सोडून बाकी पुर्ण डिमार्केशन पुर्ण आहे.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u> नाही सर माझ म्हणण्याचा अर्थ असा आहे की जे लोक कोर्टात गेलेले आहेत कोर्टाने त्यांची सुनावणी केलेली आहे त्याचा अर्थ असा की जे कोर्टात गेले नाहीत त्यांनी न्यायाची मागणी नाही केली त्यांना सोडुन दिले पाहिजे. जे लोक कोर्टात गेले आहेत त्याचा अर्थ असा आहे की प्रशासनाची चुक झाली आहे की डिव्हाईडर ला पन्नास फुट पकडुन केले गेले होते पण अस नव्हतं. खरोखर काय आहे ते सांगा आम्हाला.

<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> ही गोष्ट जेव्हा कोर्टात गेली आहे तर कोर्टाने आता आम्हाला जर ती गोष्ट चुकीचे होती तर ती पॉवर आम्हाला नसती तर आम्ही डिव्हाईडर ला लक्षात ठेऊन जर अलायमेंट केल आहे तर पुर्ण रूपाने इलिगल होते तर कोर्ट त्या वेळी त्यांची केस त्यांच्या बाजूने ठरवली गेली असती. आता कोर्टाने अस सांगितले आहे की, तो जो डीपी फाईनल होत आहे तो डिव्हाडरच्या नुसार त्याला समजून केला आहे. कमिशनरला हे अधिकार आहेत का, हे राज्य सरकारला कोर्टाने विचारले आहे. त्याचे उत्तर राज्य सरकारने एफीडेविट बनवून दाखल केले आहे. त्याच्या नंतरही कार्यालयाकडून डीपी फायनल झाला नाही. त्याचे गझेट पब्लिकेशन झालेले नाही त्यामुळे ही केस अजून फायनल झाली नाही.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u> साहेब माझा दुसरा विषय असा आहे की, येत्या दिवसात शिवसेना कार्यकर्त्यांनी मोर्चा काढला होता त्यावेळी त्यांनी असे म्हटले होते की कल्याण अंबरनाथचे जे लोक बेघर झाले आहेत किंवा ज्यांचे दुकान गेले आहेत दोन वर्षापासुन अजुनपर्यंत त्यांना पर्यायी जागा दिली गेली नाही तर आम्ही जे ठरवले होते की, इंदिरा गांधी मार्केट मध्ये देऊ पण ते इंदिरा गांधी मार्केट कोणत्या तरी कारणाने आमची मालकी नाही त्यामुळे खूप उशिर होत आहे. तर आपल्या अधिकारात आहे काही जागा अशा आहेत की ज्या महानगरपालिकेच्या शाळा आहेत जिथे त्यांच्या बाहेर जागा दिली गेली पाहिजे आणि केस टु केस जर दोनशे अडुसष्ट आहे (२६८) त्यामध्ये पन्नास शंभर अस करत करत या केसचा निपटारा केला पाहिजे. तर मी समजतो की, लोकांचा विश्वास पण वाढेल. आणि राजनैतिक दलांची साखळी पण बांधली राहिल. कारण की हा शंभर फुटांचा रोड बनवायचा निर्णय घेतला होता त्यावेळी सगळयांना आश्वासन दिले होते की आपल्याला ईथपर्यंत की विधानसभा च्या पटलावर मा. मंत्री आपले रणजित पाटील जी त्यांनी पण म्हटले होते की ज्यांची पण जागा जात आहे जी वैध आहे अवैध आहे शतप्रतिशत जागा जात आहे त्यांना पर्यायी जागा मिळेल. पण खूप खेदाने सांगितल जाते की, डिसेंबर २०१५ पासून दोन वर्षामध्ये त्यांची रोजीरोटी गेली आहे पण त्यांना पर्यायी जागा दिली गेली नाही. मी प्रशासनाला आयुक्त साहेबांना निवेदन करतो की, छोटया छोटया भागात जिथे १० दुकाने असतात किंवा १५ दुकाने असतात अशा जागांना उल्हासनगरमध्ये आयडेंटीफिकेशन द्या. आणि त्यांना पर्यायी जागा द्या. अगर आपले २०० मधून ५० ते ६० झाले तर तुमच काम कमी होईल. आणि आपण पुढे चालत राहू अशी माझी विनंती आहे.

<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> सभागृहाला आणि मा. सर्व सदस्यांना ही पण गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, या विषयात जस कंपेनसेशन ग्राउंड किंवा त्यांच रिॲब्लिटेट करणे किंवा पर्यायी जागा देणे जितक गरजेचे आहे तितकेच हा कल्याण अंबरनाथ रोड हा आपल्या उल्हासनगरचे नाक (शान) आहे त्याला थांबवून ठेवणे भले कोणत्याही कारणाने किंवा कोर्ट मॅटरच्या निमित्ताने. ते पण तितकच चुकीच आहे त्याचे लवकरात लवकर निपटारा झाला पाहिजे. आपण एका बाजूने बोलतो त्यांना काही लोकांना कंपेनसेशनमिळाले पाहिजे त्यांना पर्यायी जागा मिळाली पाहिजे तो आपला रस्ता अजून बनवायला सुरू पण झालेला नाही कारण त्याला कोर्टाचा स्टे आहे. प्रशासनाला तेव्हा त्याच्यात खात्री येईल. प्रशासन यासंबंधी हरकत करतील. की कुणाला यामध्ये कम्पेंन्सेशन दयायचे आहे पर्यायी जागा द्यायची आहे जेव्हा त्यांना वाटेल आपला रस्ता पण बनत आहे म्हणजे रस्तापण तसाच अडकून राहील आणि आपण त्यांना पर्यायी जागा देत आहोत त्याचा अर्थ मी खोट बोलत नाही ही माझी जबाबदारी आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> मा. आयुक्त जी आपण जसा विषय मांडला की तो रोड खूप गरजेचा आहे पण ज्या लोकांना आपले पुर्ण दुकान दिले त्या लोकांन वर अन्याय आहे.

<u>आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर:—</u> मी मान्य करतो.
<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> ज्या लोकांनी कोर्टात गेले ती लोक नाही ज्या लोकांनी कुर्बानी दिली.ज्या लोकांनची दुकाने गेली.
<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर</u>:— हे बघा मी कोणा वर पिन पॉइंट करणार नाही. परंतु प्रशासनाला आज अडचण आहे ना की आम्ही एम.एम.आर.डी ला ठेका दिले नंतर पण .......
<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> असे दोनशे तीनशे लोक काय करणार जे लोक कोर्टात गेले आहे? त्या लोकांच्या विषय वेगळा आहे. आणि कोर्टात गेलेल्या लोकांच्या विषय वेगळा आहे. त्याची इंच्छा नाही कोर्टात जाणेची.
<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> मग मान्य काय आहे? की त्यांना पर्यायी जागा देणेची आमची जी जिम्मेदारी आहे जर ध्यानपुर्वक बघायच्या तर शहराची जी रोड बनवणेची जिम्मेंदारी जी आपली आहे त्यानां दुर्लक्ष करायची का?
<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> त्या मध्ये आमची प्रशासन आणि आम्ही दोन्ही कोर्टात जाऊन त्या लोकांशी बोलवायची तयारी करु परन्तु ज्या लोकाचे दुकाने गेले ते लोक त्याना काय बोलणार? की तुम्ही कोर्टातून केस मागे घ्या. ते लोक त्यांचे ऐकणार का? एक विषय त्या रोडवर असापण आहे तिथे खूप काही कल्याण अंबरनाथ रोडवर लोकांवर आम्ही अन्याय करत आहोत. काही असे गरीब लोक जेव्हा महासभेत हा विषय आला होता त्या रोडचे शंभर फुटाचे कटिंग करणार आहोत आणि ज्या लोकांना पर्यायी जागा पाहिजे त्या लोकांना पर्यायी जागा देणार. आणि ज्या लोकांचे दुकाने रोड कटिंग मध्ये जात आहेत त्यांना वन प्लस टू बनवायला देणार. त्यावेळी ज्या लोकांकडे पैसे होते त्या लोकांनी ग्राउंड प्लस टू तुमच्या आधीच बनवून घेतले. पण असे तीस चाळीस गरीब लोक आहेत त्यांचे शंभर फुट दोनशे फुट दुकाने उरलेली आहे. ज्यांचे कटिंगमध्ये पण दोनशे दोनशे तीनशे तीनशे पण गेलेले आहे असे जे गरीब लोक तेथे थांबलेले आहेत ज्यांचे आजपर्यंत आपण थांबवून ठेवलेले आहे आणि त्यांना आम्ही वारंवार एकच गोष्ट सांगत आहोत की, जे लोक कोर्टात गेलेले आहेत ते लोक आपला स्टे मागे घेतला तर आपण... पण ते लोक एकदम वेगळे आहेत. पण ज्या लोकांनी स्टे दिला आहे ते लोक या शहराचा चांगला विचार करत नाहीत. आणि ज्या लोकांनी कुर्बानी दिली आहे ज्यांचे दुकाने गेली आहेत जे लोक चांगले विचार करत आहेत ते लोक भोगत आहेत. तर मी आपणाला विनंती करतो की, या रोडच्या विषयावर गंभीरपणे विचार करुन आणि आपले चांगले वकील उभे करुन ज्या लोकांनी स्थगन घेतले आहे त्यांचा स्थगन मागे घेण्याची जबाबदारी आपली आहे. महापालिकेची आहे सर्वांची आहे. पण ते लोक ज्यांची दूकाने गेली आहेत ज्यांच्याकडे रोजी रोटी नाही त्यांची जबाबदारी नाही. त्यांच्यावर जर आपण थोपले तर त्यांच्यावर अन्याय होईल.

<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर</u>:— जस काही मान्यवर सदस्य मला भेटतात त्यांना मी खूप काही बोललो आहे की माझी याबाबतीत जी पॉलिसी आहे ती एकदम तयार आहे. ज्या लोकांनी पहिले बनवले आहेत कोणी कमी कोणी जास्त बनवलेले आणि तर प्रत्येकाचा जितके इनटायटलमेंट आहे आणि त्याच जेवढ जास्त बनवलेल आहे त्या हिशोबाने त्यांना त्यांच्या प्रिमियम किंवा जे काही त्यांच फॅनेल्टी चारजेस वन टाईम आहेत ते भरुन त्यांना आम्ही रेग्युलाईज करण्याचे माझ्या डोक्यात कायम आहे ती पॉलिसी. मला एक दिवस पण नाही लागणार त्याला कागदावर लिहून तुमच्या समोर ठेवण्यासाठी. जस मी म्हणालो......

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :— </u>हा एक दिवस कधी येणार? इथे तुम्ही सप्टेंबर महिन्यात आलेले आहात आणि मी ऑक्टोंबर महिन्याच्या पहिल्या महासभेत हा मुद्दा उचलला होता. तेव्हा आपण म्हणाले होते की मी नवीन आहे मला या विषयावर अभ्यास करायला वेळ पाहिजे. मागचे पाच महिने आणि परत येवुन तीन महिने अजून  झाले आहेत साहेब.

<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर</u>:— हा जो तीन महिन्याचा कालावधीचा ब्रेक लागलेला आहे....

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :—</u> ते तीन महिन सोडुन पण साहेब तुम्हाला सात महिने झालेले आहेत.

<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर</u>:— या तीन महिन्याच्या आधी दोन महिने आपली निवडणूक होती. सर्व थोडी समस्या तूम्हीपण समजून घ्या.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :— </u> मागची दिवाळी, दसरा, ईद, आणि नवीन वर्षाच्या गोष्टी करत होते त्यांचा धंदा जात आहे. आणि परत नवीन वर्षाचे दिवाळी, दसरा, ईद येत आहे. तर कृपया तुमच्या कडून अशी अपेक्षा आहे त्या एक दिवसाची वाट पूर्ण उल्हासनगर बघत आहे.

<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर</u>:— माझी पण एकदम छोटीशी अपेक्षा आहे की, ज्या लोकांनी त्या रस्त्याच्या कामामध्ये अडचन आणली आहे मी त्यांनापण मदत करत आहे.

<u>सदस्य श्री. मनोज सयानी :— </u> आपल्याजवळ जे कोर्टात लोक गेले आहेत त्यांच्यासाठी तुमच्याकडे काही उपाय आहे तर ते उपाय तुम्ही आम्हाला सांगा. तुम्ही मध्ये वर्तमानपत्रात दिले होते की, जे व्यापारी कोर्टात गेले आहेत ते आपली केस मागे घ्या. आम्ही व्यापारांना सांगितल की मागे घ्या तर ते व्यापारी लोक आम्हाला मारायला येतात. आणि म्हणतात की, आम्ही कोर्टात गेलो तर आम्ही सुरक्षित आहोत. जे कोर्टात नाही गेलेत त्यांचे काय हाल आहेत?

<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर</u>:— जस की मी आधीपण सांगितले आहे जे राहिलेले व्यापारी आहेत त्यांना पण आम्ही प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे एवढी मदत आपण आवश्य करत आहोत जे पण बनलेल आहेत अजुनही ज्यांना स्टेट्सला ठेवलेले आहे कारण की, ते पण सर्व नाजायज आणि इलिगली आहे. ते पण आम्ही तोडत नाही. तेवढी मदत अवश्य आम्ही करत आहे.

<u>सदस्य श्री मनोज सयानी :— </u> मी मान्य करत आहे तेवढी मेहरबानी तुमची पुर्ण शहरावर. कितीदा बोलून झाले या सदनमध्ये तुम्ही ते करत नाही. आज जे वीस, बावीस आणि एकविस जण आहेत. ते लोक कोर्टात गेलेले आहेत. त्यांच्या कोठे न कुठे अर्लटरनेट साईट पाहून त्यांच्याकडुन अंडरटेकींग घेऊन त्यांची गोष्ट समाप्त करण्याचा टाईम आलेला आहे. आपण म्हणणार जे कार्टात गेले आहे त्यांनी परत जावे ते म्हणार आम्हाला पर्यायी जागा मिळणार नाही, त्या भानगडीत मध्ये ते २१ लोक आणि आपण २२ लोकांच्यामुळे ते २०० दुकाने......

<u>आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर</u>:— काय झाले या मध्ये एक गोष्ट सांगु इच्छित आहे, मला असे वाटल नाही की कोर्टात ऐवढा वेळ लागणार कोर्टाची तारीख जवळ होती आणि तुम्ही पण बघितल होत की, डी.पी. आपला जेव्हा फायनल होता आणि प्रेजेनटेशन झाल अस वाटत होत की, डि.पी. आठ दिवसात येणार जेव्हा डि.पी. येईल तेव्हा मी ही केस फाईनल करून घेईल. मला वाटत नव्हते की त्याच्यात वेळ लागेल मला असे माहित पडले की, याच्यात थोडावेळ जाईल तुमची पण तो गोष्टी बरोबर आहे. यामध्ये मी विचार करून काही ना काही करेल. एका गोष्टीचा खेद असणार जेव्हा मी दोनशे व्यापाऱ्यांचे निवारण करत आहे परंतू काही मोजक्या व्यापाऱ्यामुळे माझा परपज सिध्द होत नाही. मनापासुन जे काम करण्याची इच्छा असते तांत्रिक दृष्टीने ते मी करणार.....

<u>सदस्य श्री मनोज सयानी :–</u> तुमच्या गोष्टीत आम्ही पुर्णपणे सहमत आहोत, पण ते २२ लोकांमुळे तिथे एक हजार दुकानवाले अजुन हैरान आहेत, तिथे नाली बनलेली नाही रोड बनलेला नाही त्यांचा व्यापार बंद आहे.

<u>आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर</u>:– माझी विनंती आहे, जेव्हा आपण दोनशे लोकांना घेऊन हा मुद्दा उचलता आहे तेव्हा आपण त्या २५, ३० लोकांना समजविण्याचा प्रयत्न तरी करा.....

<u>सदस्य श्री मनोज सयानी :–</u> साहेब आम्ही समजावुन सांगितले आहे, माजी आयुक्त मनोहर हिरे साहेब आणि उपायुक्त नितिन कापडणीस साहेब त्यांच्याकडुन अंडरटेकींग पण घेतले आहे. सर्व लोकांकडुन की, जसे निर्णय लागणार तेव्हा तुम्हाला पर्यायी जागा देणार आपण ती फाईल काढुन घ्या त्यांना बोलवुन त्यांच्याकडुन बसुन बोलुन घ्या एकटा दुकटा ऐकणार नाही बाकी आम्ही हस्तक्षेप करणार ना आम्ही तुमच्या सोबत आहोत.

<u>आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर</u>:– ठिक आहे, पुर्ढच्या महासभेत मी हा प्रस्ताव आण्याचा प्रयत्न करेल....

<u>सदस्य श्री भारत राजवानी :–</u> विषय वेगळा आहे हा विषय एकदम वेगळा झाला.

<u>सदस्य श्री मनोज सयानी :–</u> नाही नाही भरतजी सभागृहात अस आहे का, जे प्रश्न देणार तेच बोलु शकतात.

<u>सदस्य श्री सुनिल सुर्वे :–</u> हा विषय वेगळा आहे तुम्ही मला बोलत होता स्व:त तुम्ही समजुन घ्या.

काही सदस्य एकत्र आवाजात बोलत होते त्यामुळे काही समजले नाही.

<u>महापौर तथा पिठासीन अधिकारी :–</u> राजवानीजी आपण बोलावे.

<u>सदस्य श्री प्रदिप रामचंदानी :–</u> धिस ईज अगेन्स नेचअर ऑफ जस्टीस की २५ लोक जर नाही करतात तर हजार लोकांशी नाही करणार हे अस नाही व्हायला पाहिजे माझ म्हणणे असे आहे साहेब की, तुम्ही सुरूवात करा....

<u>सदस्य श्री सुनिल सुर्वे :–</u> नाही आमच्याकडे पण विषय आहेत, बोलायला विषय आहेत विषयांतर होत आहे चुकीच...

<u>सदस्य श्री भारत राजवानी :–</u> मदत करायची होती तर प्रशासनाने जी चुक केलेली आहे त्या मुद्दावर करायची होती. जी लोक कोर्टात गेले आहे आणि ती लोक विस्थापित झाले आहेत त्या लोकाना मदत करणासाठी ज्या त्यानी चुकी केली आहे त्याच्यासाठी बोलला असता तर त्याना समजले असते. तुम्ही केले प्रदीप जी त्यांचा बदल धन्यबाद. तुम्हाला तर ठेका घ्याच्या आहे एकचा ठिकाणी तीन मजला बनवायचा आहे.

<u>सदस्य श्री मनोज सयानी :–</u> माहिती आहे माहिती आहे तिथे बिल्डीग कोणाची आहे.माहिती आहे सर्वाना.

<u>सदस्य श्री भारत राजवानी :–</u> होय माहिती आहे ती बिल्डींग माझी आहे.

<u>सदस्य श्री राजेंद्र चौधरी</u>:– प्लान पास करून बनवलेली आहे अनाधिकृत बांधकाम केलेले नाही.

<u>महापौर तथा पिठासीन अधिकारी:–.</u> भारत जी आपण चालू ठेवा.

<u>सदस्य श्री भारत राजवानी :–</u> साहेब यात जे विशेष आहेत की प्रशासनाने जी चूकी केली आहे त्या बददल काही खुलासा केलेला नाही आहे

<u>आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर:–</u>तुमचा जो मुददा आहे त्याचा खुलासा तुम्हाला संबंधित विभाग देणार. आज तिथे मंत्री महोदय कडून नगररचना साठी सुनावणी होती त्याच्यासाठी श्री. कुमार जग्यासी तिथे गेलो आहे. मला असा वाटत नाही तरी कोणी नगररचना विभागात संबंधित अधिकारी आहे का?

<u>सदस्य श्री भारत राजवानी :–</u> ठीक आहे तर पुढच्या महासभेत घ्या.

<u>आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर</u>:– ठीक आहे.

<u>सदस्य श्री भगवान भालेराव :–</u> साहेब दहावा प्रश्नाचे उत्तर दिले नाही पण माझा एक साधा सरळ प्रश्न आहे अति महत्वाचा आहे उत्तर प्राप्त नाही पण विषय मुददा एकच आहे आपल्याकडे

नगररचनाकार नाही त्याच्या संदर्भात नगररचनाकार होते कर्पे त्यांच्या काळामध्ये जे ३८ प्लॉन झालेत त्या ३८ प्लॉन संदर्भात याच महासभेमध्ये मला उत्तर मिळेल तर बरे होईल. तुमच्या निर्देशनात आणून दिले त्याच्यावर कारवाई झाली तर बर होईल. ३८ प्लॉन झालेत त्या ३८ प्लॉनमध्ये विरोधात बसलेले श्री. मनोज लासी यांनी जोरात आवाज उठवला होता आणि सत्तेमध्ये बसलेलया आम्ही तेव्हापण आवाज उठवला होता ३८प्लॉनला स्थगिती मिळाली त्याच्या परिस्थिती अशी झाली की तेव्हा ३८प्लॉन मध्ये नंतर सगळीच कामे चालू झाली त्याच्यातून काहीतरी १०–१५ लोकांनी कुठेतरी स्टे आणला पुणेवरून आणि मग कामे चालु झाली विषय असा साहेब ३८ प्लॉन संदर्भामध्ये कुठलीही कारवाई झाली नाही. पुर्णच्या पुर्ण प्लॉन बोगस होते आयुक्ताने सिध्द झाले होते महासभेला समजले होते आता जर उद्या कामे पुर्ण बिल्डींगचे चालू झाले त्या जर बिल्डींगमध्ये सामान्य लोकांनी घरे घेतली आणि त्या स्टेच्यावरती जर आहे जर उद्या चुकीचे झाले तर सामान्य लोकांची परिस्थिती काय होणार तर ती कामे ताबडतोब थांबली पाहीजे.

**आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर**:– स्थगिती आदेश आजपण आहे कोण म्हणते त्याची स्थगिती उठवली आहे

**सदस्य श्री भगवान भालेराव** :– त्याच्यावर २५ बिल्डींगपण तयार झाली आहे. कामेपण चालू झाली असे म्हणणे आहे.

**आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर**:–ती असेल बेसीकली काय झाले आपले डिर्पाटमेंटचे ते दोन्ही महत्वाची मुळ पदे नाहीत आहेत नगररचनाकार नाही आणि ए डी टी पी नाही आहेत माझ्या माहीती प्रमाणे माझ्याकडे जे अर्ज चौकशीचे आले होते त्यावेळेला ज्या अधिकाऱ्यांनी परवांनगी दिले होते ज्या दर्जाच्या त्यांनीच परत चौकशी करावी हे अभिप्राय नव्हते की स्वतंत्रपणे त्यांची चौकशी त्यांच्या सचालका मार्फत व्हावी असे मी पत्र पाठविलेले आहे. आणि प्रकरण त्यांच्याकडे सुपुर्द केलेले आहे. त्यानंतर त्यांच्याकडून माझ्याकडे काही प्रती उत्तर मिळाले नाही.

**सदस्य श्री भगवान भालेराव** :– त्याच्यावर २५ बिल्डींगपण तयार झाली आहे.

**आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर**:–ती त्यांची जबाबदारी असेल जर त्यांनी नियमाप्रमाणे केले नाही केव्हाही बांधले शेवटी आपण जो मुद्दा मांडला आहे की घर घेतल आणि त्याचे काही नुकसान झाले घर घेतांना प्रत्येकानी त्याच्यामध्ये प्लॉन मंजुरी त्याच्या ओसी किंवा त्याचे काही सी. सी आहे ते त्यांनी तपासून आणि त्याची माहीती घेवून घेतले पाहीजे त्यांनी करायलाच पाहीजे प्रत्येकांनी शिकवणी करून ही आपली जबाबदारी नाही आहे.

**सदस्य श्री भगवान भालेराव** :–१२ पासून आजपर्यंत फक्त ६ वर्षे गेले

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:–** स्टे कोणाचा होता याची जाणीव कोणाचा स्टे होता यावर आम्हाला हे प्रशासनाने कळवावे हा कोणाचा स्टे होता

**आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर**:–जनरल बॉडीमध्ये चर्चा होऊन त्याच्यावर स्थगिती आहे अशी माझी माहीती आहे.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:–**प्रशासनाचा स्टे होता की त्याचा प्रशासनाने स्टे दिला होता की याची आम्हाला जाणीव नाही म्हणून विचारले

**आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर**:–आता हे विषय मी खुप दिवस पाहीले नाही

**सदस्य श्री भगवान भालेराव** :–सन्मानिय आमदारांनी सुध्दा त्याच्यावर आवाज उठविला होता मा. आमदारानी आवाज उठविल्यानंतर उल्हासनगरची ज्योती कलानी सन्मानिय आमदार प्रश्न विचारल्यानंतर त्याच्यावर स्थगन प्रश्न होता

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:–**स्टे चे कागद पत्र आम्हालाही जाणीव असायला हवी आम्हाला अजुनपर्यंत माहीती नाही स्टे आहे की नाही आहे?

**सदस्य श्री भगवान भालेराव** :–त्यावेळी तुम्ही काय झोपले होते काय?

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे** :–महासभेमध्ये चर्चा पण केली आहे खोटेपणाचा जुलूम आहे साहेब याच्यावर चर्चापण केली आहे.

**सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:–**हो साहेब मी झोपलो होतो पण आता माझी चुक झाली

**सदस्य श्री भगवान भालेराव** :–आता तुम्ही घरी जावून झोपा

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे** :—फक्त प्रश्न उत्तराचा काळ संपला आहे ऐवढ आहे

**आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर**:—तुम्ही तर झोपले काही जागे असतील

**सदस्य श्री भगवान भालेराव** :—साहेब बघा त्याच्यामध्ये अति महत्वाचा विषय आहे आता त्या बिल्डींगी पुर्ण तयार झालेल्या आहेत.

**आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर**:—तयार झाल्या असतील तर ती जबाबदारी त्यांची राहील आम्हाला तुम्ही सांगितले तर आम्ही त्याची तपासणी करू

**सदस्य श्री भगवान भालेराव** :—विषय असा आहे साहेब आता त्याच्या तपासण्या कोर्टाच्या झाल्या असतील ते अनाधिकृत असतील आता त्या ज्या बिल्डींगी झाल्या त्या अनलिगलच असतील ना?

**आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर**:—त्यावर स्थगिती असतांना बांधल्या त्यांना ईरेग्युलर म्हणतात ईरेग्यूलर नाही म्हणता येणार

**सदस्य श्री भगवान भालेराव** :—मग त्याच्यावर कारवाई व्हायाला पाहीजे

**आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर**:—ईलिगल इज डिफंस्ट आणि ईरेग्यूलर इज डिफ्रंट इन लिगल म्हणजे जे नियमात न बसणारे बांधकाम.

**सदस्य श्री भगवान भालेराव** :—स्थगितीच दिलेली आहे त्यांना पुर्णपणे महानगरपालिकेने स्थगिती दिलेली आहे.

**सदस्य श्री राजेंद्र चौधरी**:— चौकशी करून त्याच्यावर अजुनपर्यंत काही कारवाई झाली नाही

**आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर**:—बघतो मी

**सदस्य श्री राजेंद्र चौधरी**:—सीडी बोगस आहे ११३८ नंबर प्लॉट आहे लोक त्यांची चर्चा करतात व्हॉट्सअपला महानगरपालिकेची बदनामी होते. आपले अधिकारी त्यावर कुठलीही कारवाई करत नाही किंवा साधी चौकशीही करत नाहीत. फार दु:ख वाटते या गोष्टीवर आम्ही नगरसेवक आपल्याला रायटिंगमध्ये प्रत देतो त्याचे आम्हाला उत्तरे मिळत नाही. आपल्या काळामध्ये असे होवू नये नगरसेवकांच्या बाबतीमध्ये ऐवढी आपण काळजी घ्यावी.

**आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर**:—ठिक आहे.

**सदस्य श्री धंनजय बोडारे** :— या विषयावर काल चर्चा झाली हा टाऊन प्लॅनिंगचा विषय आहे शासन दुर्लक्ष करतय प्रशासन कुठेतरी कमी पडतय राज्य शासन वर्षानुवर्ष या महानगरपालिकेच्या बाबतीत काय होते ते समजत नाही टाऊनप्लॅनर येत नाही आला तर तो बरोबर येथे सर्व व्यवस्थीत करून जातात किती तरी वर्षा पासून येथे टाऊन प्लॅनर कर्पे आले गेले त्या अगोदर सुध्दा ही पोस्ट रिक्त होते आमच्या काल एक लक्षवेधी होती अर्चना करणकाळे मॅडमनी टाकलेली त्यावर चर्चा करतांना मी किंवा एखादया कुठल्याही सर्वसामान्य नागरीकांनी तुमच्याकडे एम आर टी पी सेक्शन ४४ नुसार प्लॉन मंजूर केल्यानंतर किती दिवसात मुदत दयायाची प्रशासनाला ६० दिवसाच्या आतमध्ये पुर्वी ६० होती आता ३० दिवसाच्या आत त्यांनी जर विहीत कायदयानुसार किंवा अधिकृत त्यांनी आपल्याकडे सादर केले आहे त्यानंतर त्यांनी प्लीन्थ सर्टीफिकेट टाकले आणि ६० दिवसाच्या आत प्लींन्थ सर्टीफिकेट दयायाचे जर दिले नाही टिल टु बी मला अस वाटते की येथे उल्हासनगरच्या लोकांना चालू करावे लागणार आहे. कारण शासनाचे इकडे पुर्ण दुर्लक्ष आहे वारंवार मागणी करून.........

**आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर**:—मुलभुत प्रश्नाकडे जे आपण लक्ष देत नाही जी कमतरता आहे जी लिमिटशन आहे जर डिपार्टमेंटकडे वालीस तर नसेल आणि ते आपण कुठेतरी चुकून ज्या आपण इतर सबऑर्डीनेट अधिकारीच्या आधारात चालवत असून ही परिस्थिती स्वभाविक आहे आयुक्त किंवा उप आयुक्त हे ते टॅक्निकल डिपार्टमेंट पुर्णपणे मुलभुत महत्वाची पदे रिक्त असतांना ते पण एक दोन महीने नाही वर्षानु वर्षे जर रिक्त राहतील त्यामध्ये ही अडचण आपल्याला याच्यामध्ये आम्ही पण पाठपुरावा शासनाकडे केलेला आहे. मला वाटते त्याच्या प्रती पण आपण दिलेल्या आहेत.

**सदस्य श्री धंनजय बोडारे** :—शासनाला जे मी काल सुध्दा महापौरांना सांगितले तुम्हाला सुध्दा सांगतो की शासनाकडे अशी आमची सर्व महासभेची भावना आहे. येथून पुढे उल्हासनगरची लोक परवांनगीसाठी टाकतील आणि कामे सुरू करतील इच्छूक सर्व सामान्य लोकांची फसवणूक झाली

तर त्याला राज्यशासन जबाबदार राहतील. नगरविकास विभाग जबाबदार किंवा मा. मुख्यमंत्री जबाबदार राहतील.

आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर:—जी डिम परमिशनची सुध्दा जी सवलत आहे किंवा जे त्याला अधिकार आहेत तो सुदधा प्रिव्हालिंग जे नियम आहेत प्रिव्हालिंग जे त्याचे प्लॉन आहे तो त्या नियमात बसला पाहीजेत डिम परमिशन असा नाही की जो की लोक चुकीचे परवांनगी मागीतले आहे आणि त्याच्यात आम्ही काही उत्तर नाही दिले तर म्हणजे त्याला चुकीचे बांधकाम करायला त्याला मुभा आहे.

सदस्य श्री धंनजय बोडारे :—नाही नाही चुकीचे काही असेल तर लगेच पाडून टाकायचे

आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर:—हा तेच आहे डिम परमिशनसाठी मी ऐकणार नाही मी तर खुले आम सांगणार मला जर मर्यादा आहेत आणि लोंकाची अडचण होत तर दि आर व्हेरी फ्री टु फॉर डिम परमिशन

सदस्य श्री धंनजय बोडारे :—आणि हा जो २८, ३८ प्लॅनचा विषय जो विषय जो झालेला आहे प्रशासनाचे काम आहे का एकदा आयुक्तांनी स्टे दिल्या नंतर स्टे दिला तर ठिक आहे पण नंतर किती दिवसामध्ये त्यावर चौकशी केली पाहीजे बरोबर आहे की नाही ए डी टी पी इकडे आपल्याकडे आल्यानंतर किंवा दुसऱ्याकडे कुठल्या पर्याप्त संस्थेकडून किंवा पर्यायी व्यवस्था निर्माण केलेली लोकांनी किती त्रास चार चार वर्षे टी पी नसणार तुमची तर लोकांनी वाट पाहायाची का?याच्यामध्ये पाच टक्के दहा टक्के चोर असतील ३८ मध्ये १० टक्के किंवा २० लोक चोर असतील पण १८ लोक जे कायदयानुसार काम करू इच्छिता त्यांचे काय होईल ते प्रशासनाचे काम होते एखदया चुकीचे असेल तर रिवोक करा आणि ज्यांचे कायदेशिर आहेत अधिकृत आहेत त्याला रेग्यूलर करा इरेग्यूलर झाले नसते.

आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर:— रेग्यूलरची दोन्ही पदे किंवा एक जरी किमान भरला केला हे सर्व विषय आपण प्राधान्यणे आपण भरला केला तो पर्यत मला वाटत किती तरी आपण हेचा मध्ये चर्चा केली मला वाटत हि मूलभूत अडचण जो पर्यत छुटत नाही तो पर्यत ज्याच्या जूनियर ऑफिसरचा प्रपोजलवर मी कुठल्या ही निर्णय घेणार नाही शम्भर टक्के.

सदस्य श्री धंनजय बोडारे :— निर्णय घेऊ नका पण आम्ही त्या पध्दतीने लोकानी सांगणार की टील टू बी अप्रूव्ह.

आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर:— होय.

सदस्य श्री धंनजय बोडारे :— आम्ही हतबल आहोत.

आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर:— मला वाटते की हा प्रश्न शासनाकडे जरा मांडला तर.....

सदस्य श्री धंनजय बोडारे :— वारंबार मांडलेला आहे.

सदस्य श्री भगवान भालेराव :— साहेब माझे म्हणणे असे आहे की आपल्याकडे इंजिनियर पण आहेत ना.

आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर:— इनजिनियर इज देअर बट टाऊनप्लानर हा कशासाठी असतो इंजिनियर इज डिफरेंट. असा नाही

सदस्य श्री भगवान भालेराव :— काम बंद करु शकत नाही.

आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर:—आज आपण परवानगी का देत नाही? म्हणून प्रश्न विचारतात आहे मला हे करायचे नाही की उदया चूकीचे परमिशन का दिले? हा प्रश्न विचारणेची वेळ येऊ दयायची नाही. दिस रुल म्हणुन ते झाले नाही काम तरी चालेल पण चूकीचा व्हायला नको पाहिजेत.

सदस्य श्री भगवान भालेराव :— हो पण नागरिकानां काय दिले पाहिजेत हयाच्यातून?

आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकर:— शासनाकडे पाठवा त्यानां हे काय करणार?

सदस्य श्री भगवान भालेराव :— नाही नाही नागरिकानां आपण महानगरपालिकेचा आपल्या कर्तव्य नाही यामध्ये वर्क ऑडर झाले नाही अजून प्लान तयार नाही.

आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकरः— आपले महानगरपालिकेत कुणी नगररचनाकार ए.डी.टी.पी यायला तयार नाही ही एक गोष्ट किवां तिथे कोणी ऑर्डर केली तर त्याच्यामध्ये हजर होत नाही.किंवा शासन ही त्या बदल ...

सदस्य श्री भगवान भालेराव :— साहेब माझ्या साधा विषय आहे की तिथे घर घेणार लोकांचे संर्दभात आपण महानगरपालिकेत काय करु शकते?

आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकरः— त्यांनी प्लान तपासून घ्याला पाहिजेत.की कायदेशिर आहे का? त्यांनी जे सबमिट केले आहे त्याच्यां मध्ये त्यानी डी परमिशन आहे त्यांच्या अधारे तरी करायला पाहिजेत. सर्व गोष्टीचे उत्तर प्रशासनाने दिले पाहिजेत.

सदस्य श्री भगवान भालेराव :— महानगरपालिकेने आपण ते बिल्डींगचे बाहेर लावले पाहिजेत नाही तरी की प्लान मंजूर नाही म्हणून आर्थिक प्लान बाबतीत मी सांगतो तुम्हाला. बाकीच्या बाबतीत सांगत नाही.

आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकरः— आपण नागरिकांना हयाच्यामध्ये दिलासा मला वाटत नाही की काही खात्री देवू शकू त्यांच्या हयावर त्यांनी घर घ्यावी.

सदस्य श्री धंनजय बोडारे :— तुम्ही मान्य केलेला आहे की ३८ बिल्डींगच्या स्टे उठलेला आहे. तर त्या सबंधित प्रभाग अधिकारी यांना सांगा की कुठल्या कुठल्या ३८ बिल्डींग पैकी त्या प्रभाग ऑफिसर यानां सांगा की कुठल्या बांधकाम चालू आहे ते बन्द करा.

आयुक्त श्री राजेंद्र निंबाळकरः— ठीक आहे.

महापालिका सचिवः— प्रश्न उत्तराची वेळ संपली आहे.

सदस्या श्रीम. मिना सोनेजी :— मॅडम माझे प्रश्नाचे उत्तर नाही मिळाले. असे कसे संपले मॅडम?

महापालिका सचिवः— सभागृहानी ठरवावे परत पुढची महासभा पण करायची आहे.

सदस्या श्रीम. मिना सोनेजी :— उत्तर नाही मिळाले तर मी खाली बसणार.

सदस्य श्री प्रदीप रामचंदानी :— नाही नाही वेळ कुठे संपली आहे?

सदस्या श्रीम. मिना सोनेजी :— उत्तर नाही मिळाले. तर मी खाली बसणार.

महापालिका सचिवः— २.४९ ला सुरु झाली होती ही सभा आणि २.४९ ला सुरु झाली होती प्रश्न उत्तरे.मग अर्धातास आहे न. २.४९ ला शुरु झाली होती प्रश्न उत्तरे २.५९ नाही सर २.४९ बोलत आहे सर्व संमतीने ठरवा मग काय आहे तर प्रश्नउत्तराचा तास संपला आहे. मॅडम म्हणतात उत्तर आता पाहिजेत.

सदस्या श्रीम. मिना सोनेजी :— मी खाली बसणार. का की तीन महिने व्हायला आलेत. आणि आपल्याकडे प्रश्न काय आहे साहेब? की आपला प्राथमिक शाळा किती आहेत? आणि शाळेमध्ये...

श्री. संतोष देहरकर (उपायुक्त मुख्यालय) :— मा. महापौर मा. सभागृह पहिला प्रश्न होता मा. सदस्याच्या की प्राथमिक शाळा किती व पूर्व प्राथमिक शाळा किती हा पहिला प्रश्न होता आपल्याकडे जे उत्तर आहे त्या प्रमाणे प्राथमिक शाळा दोनशे दोन आहे व पूर्व प्राथमिक शाळा शिक्षण विभागात अर्तगत येत नसल्या कारणाने सदरची बाब या आपल्याकडे नाही साहेब. दुसरा प्रश्न आपला होता की प्रत्येक शाळामध्ये १ ते ७ च्या विदयार्थ्यांची हजेरी पट संख्या किती आहे प्राप्त माहिती अनुसार पासष्ट हजार सहाशे बाव्वन इतकी आहे. तिसरा प्रश्न...

सदस्य श्री जमनादास पुरस्वानी :— हे तुम्ही आपल्या महानगरपालिकाच्या सांगत आहेत की पूर्ण महाराष्ट्राच्या सांगत आहेत.

सदस्या श्रीम. मिना सोनेजी :— आमच्या उल्हासनगरचे आहेत का?

सदस्य श्री राजेंद्र चौधरी :— नाही नाही त्यानी माहिती काय मागितली महापालिका शाळेची न?

सदस्य श्री सुरेंद्र सांवत :— उल्हासनगर महानगरपालिका शाळेची सांगा न तुम्ही खाजगी शाळेची नको सांगा तुम्ही फक्त उल्हासनगर पालिकाच्या सांगा किती शाळा आहेत ते सांगा खाजगी शाळेचा नको सांगू.

सदस्या श्रीम. मिना सोनेजी :— साहेब, महानगरपालिकेची लोक संख्या किती आहे टोटल? महानगर पालिकाचे विदयार्थी .

**श्री. संतोष देहरकर (उपायुक्त मुख्यालय) :—** महानगरपालिकाचे लोक संख्या जर त्याच्या सेन्सस प्रमाणे...

**सदस्य श्री प्रदीप रामचंदानी :—** महानगर पालिकाचे शाळेची पट संख्या किती आहे?

**श्री. संतोष देहरकर (उपायुक्त मुख्यालय) :—** दुसरे की किती शाळानी सरकारकडून अनुदान मिळते ५२ शाळेला सरकारकडून अनुदान मिळते अनुदान विचारतात न अनुदान

**सदस्य श्री सुरेंद्र सांवत :—** आयुक्त सो. तुम्ही आम्हाला खाजगी शाळेची माहिती नको दया फक्त महानगर पालिकाची शाळा किती आहे ते सांगा आणि महापालिकाचे किती विदयार्थी आहे आणि किती हजर आहेत त्याची आंम्हाला माहिती व्हावी. बरोबर न काही शाळांची आमच्याकडे यादी तयार आहे.

**श्री. संतोष देहरकर (उपायुक्त मुख्यालय) :—** किती शाळानी सरकारकडून अनुदान मिळते ५२ शाळानी सरकारकडून अनुदान मिळते

**सदस्य श्री सुरेंद्र सांवत :—** इथे प्रश्न का विचारतात आहे? प्रश्नाचा विषय नाही आहे.

**सदस्या श्रीम. मिना सोनेजी :—** साहेब अता मला महानगरपालिकाचे विदयार्थी किती आहे ते पाहिजेत

**श्री. संतोष देहरकर (उपायुक्त मुख्यालय) :—** ६०५१

**सदस्या श्रीम. मिना सोनेजी :—** आणि आपल्याकडून लेखीस्वरुपात मला यादी पाहिजेत. ५२ शाळा जे आहेत त्याच्यामध्ये अनुदान किती शाळांना मिळते सर्व यादी पाहिजेत. धन्यवाद.

**श्री. संतोष देहरकर (उपायुक्त मुख्यालय) :—** होय.

**महापालिका सचिवः—** प्रश्नोउत्तराचा तास संपला आहे. आपल्याकडे या सभेसाठी स्थगन प्रस्ताव आले आहे आणि सात लक्षवेधी आले आहे मी वाचते स्विकारायची आहे की नाही दोन लक्षवेधी मॅडमने स्विकारल्या आहेत आणि स्थगन प्रस्ताव स्विकाराचे आहे की नाही सर्व संमतीने होईल. स्थगन प्रस्ताव आहे सुचकाचे नाव आहे श्री.कलवंतसिंह सोहटा अनुमोदकाचे नाव श्री. राजेंद्र चौधरी

**स्थगन प्रस्ताव क्र. १**

सुचकाचे नाव :— श्री. कलवंतसिंह सहोता

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

विषयः—मुस्लिम समाजाचा कब्रस्तानचा विषय सोडविणेबाबतचा स्थगन प्रस्ताव मा.महापौरांनी स्थगन प्रस्तावाना मान्यता दिली आहे.

**स्थगन प्रस्ताव क्र. २**

सुचकाचे नाव :— श्रीमती सविता तोरणे

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती शुभांगिनी निकम

विषयः— वडोल गावातील रखडलेल्या पुलाच्या कामाबद्दल स्थगन प्रस्ताव

**लक्षवेधी सूचना क्र. १**

सुचकाचे नाव :— श्री. प्रदिप रामचंदानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. मनोज सयानी

विषयः— विविध विषयांवर प्रभावी तोडगा काढण्याबाबतची लक्षवेधी सूचना अमान्य करण्यात आली आहे.

**लक्षवेधी सूचना क्र. २**

सुचकाचे नाव :— श्रीमती शुभांगी बेहनवाल

अनुमोदकाचे नाव :— श्री. अजित गुप्ता

विषयः— महापालिका शाळेची पुर्नबांधणी व वडोल गावालगत कोसळलेल्या पुलाचे नव्याने बांधकाम करीता वापरण्यात येणा—या साहित्याचा दर्जा व काम निष्कृष्ट असल्याने अशा ठेकेदाराचा ठेका रद्द करुन त्या कंपनीस काळया यादीत टाकणेबाबतची लक्षवेधी सूचना

ही पण लक्षवेधी अमान्य करण्यात आली आहे.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:— पाईन्ट ऑफ ऑडर.
महापालिका सचिव:— पहिले स्विकारु दया मग बोला.

लक्षवेधी सूचना क्र. ३

सुचकाचे नाव :— दिपक एल सिरवानी
अनुमोदकाचे नाव :— कविता एल पंजाबी
विषय:— मालमत्ता कराची थकबाकी प्रदान करातून सूट देणेबाबतची लक्षवेधी सूचना.
ही लक्षवेधी मा. महापौरांनी मान्य केली आहे.

लक्षवेधी सूचना क्र. ४

सुचकाचे नाव :— श्री. शंकर लुंड
अनुमोदकाचे नाव :— श्रीमती मिनाताई सोनेजी
विषय:— न्यायालयाने स्थगिती आदेश उठविलेल्या अनाधिकृत बांधकामावर कार्यवाही होत नसल्याबाबतची लक्षवेधी सूचना.

लक्षवेधी सूचना क्र. ५

सुचकाचे नाव :— श्री. शंकर (शेहरी) लुंड
विषय:— रिगार्डींग रिहॅबीलेशन ऑफ रेसीडेंट्स ऑफ डेंजरर्स बिल्डींग /स्ट्रक्चर टु हुम रिसेंटली द नोटिस हॅव बिन इश्यूड बाय युएमसी याबाबतची लक्षवेधी सूचना.

लक्षवेधी सूचना क्र. ६ सुचकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया
अनुमोदकाचे नाव :— श्री. हरेश जग्यासी
विषय:— उल्हासनगर १ ते ५ मधील रस्त्यांमधील खड्डे पाटोल्स भरणेबाबतची लक्षवेधी सूचना.
ही पण अमान्य केली आहे लक्षवेधी क्रमांक ४,५,६ अमान्य.

लक्षवेधी सूचना क्र. ७

सुचकाचे नाव :— श्री. प्रदिप रामचंदानी
अनुमोदकाचे नाव :— श्रीमती मिना सोनेजी
विषय:— सार्वजनिक बांधकामा विभागाच्या निविदेबाबतची लक्षवेधी सूचना

ही मान्य करण्यात आली आहे. दोन लक्षवेधी मान्य केल्या आहेत मा. महापौरांनी त्याच्या अधिकारात. स्थगन प्रस्ताव हा मुस्लिम समाजाविषयी आहे. आधी तो स्विकारावा अशी मा. महापौरांनी संमती दिली आहे. सर्व सभागृहाची संमती आहे.

सदस्य श्री मनोज सयानी :— मा. महापौर जी आपण मुस्लिम समाजाच्या स्थगन प्रस्तावाची मान्यता दिली आहे तो आपला अधिकार आहे. कविता तोरणे रगडे मॅडम चा जो मुद्दा आहे वडोलगावचा पुलाचा त्यांनी जो स्थगन प्रस्ताव महासभेत मांडला आहे तो अति आवश्यक आहे. आता नुकतेच गणेश जैयसवाल नावाच्या मुलाचा मृत्यू झाला आहे. आयुक्त साहेबांना या गोष्टीची पुर्ण माहिती आहे. त्यांची जी मागणी आहे काही ना काही पर्यायी व्यवस्था रोज तिथे १५०० संख्येपेक्षा जास्त विद्यार्थी आहेत. आणि दीड किलोमीटर फिरुन आपल्या शाळेत जातात. तर महापालिका तर्फे तिथे काही ना काही बसची सोय किंवा टेम्पो रिक्शाची सोय जे मुले विद्यार्थी आहेत त्यांच्यासाठी होणे आवश्यक आहे. नाहीतरी काय होणार मुले रोज तिकडुन शाळेमध्ये जाण्यासाठी जाणार आणि त्यांना तिथे अपघाताचे शिकार व्हावे लागेल. आतापर्यंत दोन मृत्यु झाले आहेत. शिवसेना पार्टीने यावर खुप मोठा मोर्चा काढला होता. याच्यावर बरेच लोकांचा हस्तक्षेप आहे. तर काही ना काही तिथे व्याप आहे प्रवासासाठी. त्यांच्यासाठी पर्यायी टेम्पो ट्रव्हलर किंवा मिनीबस शाळेच्या वेळी त्यांना सोडण्यासाठी आणि घेण्यासाठी अशी सगळया सभेच्या सदस्यांना विनंती आहे.

सदस्य श्री राजेंद्र चौधरी :— मा. महापौरजी, ........

सदस्य श्री दिपक सिरवानी :— चौधरी साहेब, एक मिनिट. आज सकाळी परत एक मुलगा वाहण्याची शक्यता होती.

**सदस्य श्री राजेंद्र चौधरी** :– जे आपण दुसरी लक्षवेधी स्वीकृत केलेली आहे. त्याच्यात काल बरीच काही चर्चा झाली आहे. आणि त्याच्यामध्ये सर्व लोकांनी चर्चा केली आहे. या सभागृहात चर्चा झाली आहे काल. तर यासाठी आपण ही लक्षवेधी न घेता ती लक्षवेधी घ्या ती लक्षवेधी आवश्यक आहे. वडोलगावच्या ब्रीजची. माझी सभागृह नेत्यांना विनंती आहे की आपण ती लक्षवेधी रद्द करून ही लक्षवेधी घेतली तर बरे होईल.

**सदस्य श्री दिपक सिरवानी** :– धन्यवाद महापौर मॅडम जी लक्षवेधी आपण स्विकारली.

**महापालिका सचिवः–** लक्षवेधी वर कोणीही चर्चा करणार नाही स्थगन प्रस्ताव आला आहे. तर सर्व चर्चा बाजूला ठेवुन सर्वप्रथम स्थगन प्रस्तावावर चर्चा होईल. लक्षवेधी स्विकारणे मा. महापौरांचा अधिकार आहे. आणि त्यांनी दोन स्विकारल्या आहेत. हा ठिक आहे आता स्थगन प्रस्तावावर चर्चा करायची आहे ज्यांचे सूचक कलवंतसिंह सोहटा आणि अनुमोदक श्री. राजेंद्र चौधरी **मुस्लिम** समाजाचा कब्रस्तानचा विषय सोडविणेबाबतचा. आणि नंतर लक्षवेधी वर चर्चा होईल. स्थगन प्रस्ताव सामावुन घ्यायचा काय?

**काही सदस्यः–**होय.

महापौर तथा पीठासीन अधिकारी :– स्थगन प्रस्ताव सामावुन घेण्यात येत आहे.

---

☑ **विषय :–मुस्लिम समाजाचा कब्रस्तानचा विषय सोडविणेबाबत**

सूचकाचे नांव :– श्री. कलवंतसिहं सहोता
अनुमोदकाचे नावः– श्री. राजेंद्र चौधरी

स्थगन प्रस्ताव

**महासभा ठराव क्र. :– १९ क** दिनांक : १९/७/२०१७

ही महासभा पालिका सदस्य श्री. कलवंतसिंह सहोता यांच्याकडुन प्राप्त झालेला स्थगन प्रस्ताव सभेच्या कामकाजात दाखल करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य श्री कलवंतसिंह सोहटा** :– मा. महापौर मॅडम, मा. उपमहापौरजी, आयुक्त जी, आणि सचिव जी, हा जो स्थगन प्रस्ताव मुस्लिम समाजाचा कब्रस्तानासाठी आणला गेला आहे त्या मुद्दयांवर सभेच्या ब–याच सदस्यांना माहिती आहे. याविषयी जस की, या सभागृहात चर्चा केली आहे आणि म्हारळ गावामध्ये सर्वे नं ५८ वर ८००० चौ.मी. जागा कब्रस्तानासाठी दिली आहे. त्या मुद्दयावर आधीपासूनच न्यायालयामध्ये प्रकरण स्थगित आहे. कारण की महानगरपालिकेने लेखी दिले आहे की, लॉयन ऑर्डरच्या परिस्थिती उद्भवणार. त्यासाठी स्थगिती दिली आहे. आणि न्यायालयाने मान्य केले आहे. आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकरनवीन डी.पी मध्ये जे आता आले आहे त्याला पुन्हा तिथे कब्रस्तान रद्द करून पब्लिक युटीलिटी दाखविले जात आहे डीपीमध्ये. माझी अपेक्षा तुमच्या कडून अशी आहे की आपली महानगरपालिकाची जी जागा आहे दोन एकरची ८०००चौ. मी जागा आहे आपण येथे कब्रस्थान देऊ शकत नाही तुम्ही सांगता न्यायालयामध्ये प्रलंबित आहेत,न्यायालयमध्ये जी बाजू मांडायची आहे महानगरपालिका तर्फे ते आपल्याला मांडायची आहे. तर तुम्ही गंभीरतापूर्वक विचार करुन कोणी वरिष्ठ वकील करुन लवकरात लवकर निर्णय घेतल्या पाहिजेत. आणि नविन डी.पी मध्ये जो बदल केला जात आहे

त्यासाठी पण  महानगरपालिका तर्फे प्रस्ताव पाठविले पाहिजेत की जुने सर्वे नं. ५८ वर जे कब्रस्तान दिले होते तिथे परत दिले पाहिजेत. कारण की त्यांना आपली मालकी हक्काची जागा आपण देवू शकत नाही तर नविन जे चार विकल्प आम्हाला सांगितले गेले आहे ते जे चार विकल्प तुम्हाला पण माहिती आहे आणि त्यासाठी आपल्या कार्यालयामध्ये पण चर्चा झाली होती. त्या चार विकल्पमधून एक पण जागा रिकामी नाही आहेत आणि ते संभवपण नाही की आपण ती जागा रिकामी करू शकेल. कारण की, जे बस टर्मिनल आहेत ते पण न्यायालयात आहेत आणि कोर्टात केस चालू आहे. दुसरी जी जागा आहे अशोक नगर मध्ये तिथे आधीच वस्ती वसलेली आहे. ती रिकामी करणे शक्य नाही.  तिसरा खाजगी मालमत्ता हरमन मोहता जी सांगत आहे जर आपण आपली मालकीची जागेवर देऊ शकत नाही तर खाजगी मालमत्ता कशी करू शकणार.

<u>**सदस्य श्री राजेंद्र चौधरी**</u> :— आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर आज हा स्थगन प्रस्ताव महासभेत आला आहे आपल्या सगळयांना माहित आहे की उल्हासनगर शहरामध्ये राहणारे जे मुस्लिम भाई आहेत ते मागील ३ वर्षापासून लढाई लढत आहेत. कब्रस्तान त्यांना पाहिजे म्हणून ते लढत आहेत. आणि आपण आणि आम्ही मिळून त्यांना सीट नं ५८ ही जी दोन एकर जागा आहे महानगरपालिकाची ती आपण त्यांना दिली होती. आणि त्यांना दिल्यानंतर त्यांनी तेथे त्यांच कामकाज सुरू केले होते. दोन विधीपण तिथे झाल्या होत्या त्यांनी केल्या होत्या. त्यानंतर अस काय झाल की, प्रशासनाने त्याच्यावर स्थगिती आणली. स्थगिती आणल्यानंतर त्या कब्रस्तानाला कुलूप लाऊन दिले सील करून दिले. त्याकारण तिथे दफन करणे बंद केले. हे अस का झाल प्रशासनाने असा का निर्णय घेतला. हे मला समजल नाही. म्हणून त्यासाठी स्थगन प्रस्ताव येथे आणला गेला आहे. दुसरी गोष्ट या विषयाला महापालिकेने स्थगिती दिली त्यांनतर काही लोक न्यायालयात गेले. ठीक आहे, न्यायालयाचा विषय न्यायालयाचा आपण आदर करतो. पण आपण आपला सल्ला या शहराचे जे प्रतिनिधी आहेत त्यांचा सल्ला काय आहे ते पण न्यायालयाला आणि महाराष्ट्र शासनाला माहित पडायलाच पाहिजे की आम्ही या स्थगन प्रस्तावाव्दारे या महासभेमध्ये एक प्रस्ताव आणतो की ५८ नंबर जी साईड त्यांना दिलेली होती त्यांना परत दिली पाहिजे. जर या विषयाचा निर्णय सर्व संमतीने होत आहे तर न्यायालयाला पण वाटेल की हा विषय बरोबर आहे. तिकडच्या लोकप्रतिनिधीची पण इच्छा आहे तिथला ५८ नंबर सर्वे सीट नंबर जो आहे त्यांना दिला पाहिजे. त्यासाठी त्यांचा जो ५८ नंबर सर्वे आहे त्यांना लवकरात लवकर मिळेल आणि न्यायालयपण त्याच्यामध्ये लवकरात लवकर निर्णय देईल अस मला वाटत आहे. त्याच्यासाठी हा ठराव ईथे आणला आहे. तर माझी सर्वांना विनंती आहे महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, आयुक्त साहेब, आणि सभागृह नेता, विरोध पक्ष नेता आहेत सर्व पार्टीचे सदस्य आहेत त्यांना विनंती आहे की, आपण हा ठराव इथे पास करत आहात. पारित करून न्यायालयाला पाठवणार जो की महानगरपालिका आपली पार्टी आहे त्याच्यामध्ये. महानगरपालिकेचे जे वकील आहेत त्यांना देऊ. आणि महानगरपालिकेचे वकील तिथे आपली बाजू मांडणार की, महानगरपालिकेतर्फे हा ठराव आलेला आहे. मग न्यायालयाला पण असे वाटणार की तेथील लोकप्रतिनीधी जे आहेत त्या ठरावाच्या बाजूने आहेत सीट नं ५८ च्या बाजूने आहेत. तर लवकरात लवकर निर्णय लागणार अस मला वाटते. महाराष्ट्र शासनाने पण त्याच्यात अस दिलेल आहे. की आपण दुसरी साईड देत आहोत तर आमचे सदस्य बिट्टू भाईने सांगितल आहे की तिकडची परिस्थिती अशी आहे की, तिथ जर कब्रस्तान ची गोष्ट केली तर आपल्या मुस्लिम भाईंना कब्रस्तान मिळण्यासाठी चाळीस वर्षे अजून लागणार पण मिळणार नाही. जर मिळणार नाही तर त्यांना आपण असेच फिरवत राहणार का? दिशाभुल करायची का? की असच त्यांना आश्वासन देत राहायचे का? की तुम्हाला आम्ही कब्रस्तान देतो देतो. ज्या गोष्टी त्यांच्या हातात आहेत त्या देण्याचे काम तुम्ही सर्व लोक मिळून आणि आपण सर्व मिळून केल पाहिजे अस मला वाटते. आणि त्याबाबतीत आपण निर्णय घेणार अस मला वाटते. धन्यवाद.

<u>**सदस्य श्री भगवान भालेराव**</u> :— सन्माननीय महापौर, उपमहापौर, आयुक्त साहेब, चौधरी साहेबांनी आणि बिट्टू भाईने जो प्रश्न उपस्थित केला आहे उल्हासनगरच्या मुस्लिम बांधवांचा आणि आपल्या सर्व धर्मियांचा जिव्हाळयाचा प्रश्न आहे. मेल्यानंतरही आपण त्यांना जागा देऊ शकत नाही. जागा

दिली ती जागा दिली नाही दिली तरी सारखेच झाली. मधल्या काळामध्ये दोन प्रेत तिथे दफन केल्या त्याच्यानंतर जो वाद निर्माण झाला म्हारळ ग्रामपंचायत संदर्भात. महापौर मॅडम तिथे नंतर कोर्टात गेले आणि कोर्टातून आपण एक विशिष्ट गोष्ट करतो आहे. महानगरपालिकेच्या वतीने जे कांबळे म्हणून वकील आहेत ते बाजू मांडतात. आपण तिथे जर या समाजाच्या वतीने सिनियर कॉन्सिल जर दिला तर चांगले सिनियर कॉन्सिल दिले तर लवकरात लवकर विषय मार्गी लागेल. पण त्यानंतर ही आपण सगळ राजकारण न करता महापौर मॅडम आपण ही मला वाटते की ग्रामपंचायत आपल्या पक्षाच्या माणसांची आहे. तिथे सदस्य आपल्या पक्षाचे आहेत बीजेपीचे आहे. त्यांना जर आपण विश्वासात घेतले उपमहापौर आणि आपण आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकरबरोबर एक बैठक आयोजित करा हा जातिय जो तणाव आहे तिथला तो तणाव दूर करण्यासाठी आपण जर प्रयत्न केले तर ख–या अर्थाने ते बरे होईल. कारण हा कोर्टामध्ये जर आपल्या बाजूने निर्णय लागला तरी मला वाटते तिथले जे लोक आहेत स्थानिक लोक आहेत त्यांची बघण्याची जी भूमिका आहे आणि तणावाचे जे वातावरण आहे ते काय कमी होणार नाही. त्यांना जर विश्वासात घेऊन इकडे कोर्टामध्ये आपण आपली बाजू मांडली पाहिजे आणि त्यांना विश्वासात घेऊन हा जो समाजवादाचा वाद आहे तर जर हा वाद मिटला तर आपल्या उल्हासनगरच्या दृष्टीकोनात चांगले होईल.

**सदस्या श्री मिना सोनेजी** :— उल्हासनगर एक असे शहर आहे हिन्दुस्तानमध्ये जिथे जिवंत माणसाला पण जागा मिळत नाही इलिंगली राहत आहेत. आणि मेल्यानंतर पण त्यांना रितसर जागा मिळत नाही. या मानवतेचा दृष्टीकोणातून सर्व राजनितिक पार्टीनां एकत्र होवून मुस्लिम समुदाय जे आपल्या आहे अल्पसंख्यामध्ये आहे पण त्यांची संख्या आपल्याकडे जास्त आहेत. त्यांच्यावर अन्याय होत आहे. इथे त्यांना न्याय मिळाला पाहिजे. मी विनंती करत आहे. आणि लवकरात लवकर त्यांना ताबा दिला पाहिजेत. धन्यवाद.

**महापौर तथा पिठासन अधिकारी:—** सन्मानीय चौधरी जी तुम्ही तुमचा प्रस्ताव दया. आणि....

**सदस्य श्री मनोज सयानी** :— मा. महापौर जी, उपमहापौर जी आयुक्त साहेब, सचिव मॅडम धन्यवाद चे पात्र आहे कलवंतसिंह बिट्टुजी आणि राजेंद्र चौधरी जी बरेच चांगले वाटेल की चौधरीजी हिन्दीमध्ये बोलले मराठीमध्ये जास्त ऐकले आहे पहिल्यांदा हिन्दी मध्ये बोलताना ऐकले आहे सदनामध्ये. धन्यवाद. आयुक्त साहेब, महापौर जी हा मुद्दा मागील काही वर्षाने उल्हासनगर मध्ये रखडवला जात आहे. त्याच्या मागे काय राजकारण आहे आणि काय नाही हे समाजालाच माहित आहे आणि आपल्या सर्वांना पण माहित आहे. पण आज सौभाग्याने अशी वेळ आली आहे आज हे सदन साक्षी आहे आज आपल्या सर्वांची सहमती झाली आहे. मागील पाच वर्षापासून ओरडत आहे की मुस्लिम समाजाला कब्रस्तान मिळाले पाहिजे मिळाले पाहिजे. कुठेना कुठे सहमतीची कमी होती. काही कारणे होती. पण आज बरेच चांगले दिवस आहेत मुस्लिम समाजाच्या लोकांसाठी. की आज पुर्ण सदन त्यांच्या सोबत आहे. कब्रस्तान त्यांचा अधिकार आहे दफनभूमी त्यांचा अधिकार आहे तो त्यांना मिळाला पाहिजे. सीट नं. ५८ वर मिळतात की कुठे मिळतात कसे मिळतात. आज प्रस्ताव आलेला आहे ५८ वर मिळाला पाहिजे या प्रस्तावाचे आम्ही सर्व समर्थन करतो आमची पार्टी राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी आमदार हो किंवा माजी आमदार पप्पू कलानी यांचा अजेंडा आहे. की मुस्लिम समाजाला या शहरात दफनभूमी मिळाली पाहिजे.

**सदस्य श्री. भारत राजवानी** :— तुम्ही राष्ट्रवादीचे कधी झालात. तुम्ही तर बीजेपीचे आहात. राष्ट्रवादीचे तर आम्ही इथे बसले आहोत.

**सदस्य श्री. मनोज सयानी** :— भारत जी इतक्या इतक्या संवेदनशील मुद्दयावर तुम्हाला मस्करी येत आहे. लोक बघत आहेत.

**सदस्य श्री. भारत राजवानी** :— मस्करी नाही. मी त्यांच्या सोबत आहे.

**सदस्य श्री. मनोज सयानी** :— तुम्हाला हसायला येत आहे. तुम्ही तुमच्या वरिष्ठांकडुन शिका. की कोणत्या मुद्दयावा हसायला पाहिजे आणि कोणत्या मुद्दयावर हसायला नाही पाहिजे.

**सदस्य श्री. भारत राजवानी** :— तुम्ही मस्करी केली तर चालेल. की मराठीत बोलले आहे.

**महापौर तथा पिठासन अधिकारी:—** प्लीज भारत जी शिस्तीत वागा.

**<u>सदस्य श्री. मनोज सयानी</u>** :– महापौर जी, मनोरंजनासाठी आपल्याकडे बरेच काही मुद्दे आहेत आपण ते आरामात करू पूर्ण पाच वर्षे आहेत. महापौरजी या प्रस्तावावर आमच पूर्ण समर्थन आहे. की मुस्लिम समाजाला कब्रस्तान मिळाले पाहिजे याच्यावर आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर विशेष एक अधिकारी नेमला पाहिजे. जे या प्रकरणाला कोर्टामध्ये आणि कोर्टाच्या बाहेर कोणाचा विरोध आहे की नाही याच्यावर वर्कआऊट झाले पाहिजे. राहिली आम्ही सर्व राजनितिक लोकांची गोष्ट आपण जेव्हापण जिथेपण मुस्लिम समाजाच्या दफनभुमीसाठी आम्हाला बोलवाल आम्हाला सांगणार त्याच्यामध्ये हस्तक्षेप करण्यासाठी सांगणार तर आम्ही करणार. पण त्याच्यात भुमिका तुमची आहे. कारण की, या वस्तूची नोंद व या वस्तूचा महानगरपालिकेला ताबा प्रत्येक वस्तू पेपरवर ऑन पेपर ऑन रिपोर्ट मिळालेले आहेत. पण आता हस्तक्षेप तुम्हाला करायचा आहे. विधी विभागाला करायचा आहे. प्रत्यक्ष वस्तुस्थिती अशी आहे. आम्ही राजनितीक लोक भलेही शिवसेना असो भाजप असो किंवा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी असो तुम्ही जेव्हापण तुमची इच्छा असेल तेव्हा आम्ही तुमच्या सोबत असणार या मुद्दयावर. धन्यवाद.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे</u>** :– महापौर महोदया, उप महापौर, आयुक्त साहेब, चर्चा तुमच्या लक्षात आलेली असेल महासभेत की, तुमच्या दालनात पण मागे चर्चा झाली होती. संपूर्ण महासभेत एकमताने येथे तीन वेळा ठराव झालेले आहेत. पण कधी या मुस्लिम कब्रस्तानावर या मुस्लिम बांधवांसाठी कधी कोणीही विरोध केलेला नाही. सर्व सभागृह यांच्या बरोबर कारण की जिवंतपणी माणूस कसा जगतो त्यापेक्षा मेल्यानंतर तेवढया जागा मिळाल्या पाहिजेत.त्यांना कल्याणला जायचे त्यांना अंबरनाथला जायचे उल्हासनगरच्या नागरिक उल्हासनगर मध्ये त्यांना शेवटी शेवटच्या इच्छास्पद प्रत्येकांची. अमेरिकेला गेलेला माणुस शेवटी मात्रभुमिला घेवून जा म्हणतात शेवटी मयत. आणि इथे मयत झालेनंतर त्यांना अंबरनाथ किंवा कल्याणला जावा दुर्दैवची गोष्ट आहे.१९७४ पासून त्या ठिकाणी हा प्लॉट मुस्लिम कब्रस्तानसाठी आरक्षित होत नव्याचा डी.पी प्लॅनमध्ये सुध्दा तोच आला होता आता आम्ही जो प्रस्तावित करुन पाठविलेला आहे त्यामध्ये सुध्दा मुस्लिम कब्रस्तानसाठी राखीव आहे. आता हे काम जसे मनोज लासीने सांगितले आहे आता हे काम प्रशासनाचे आहे. महासभेने पारित केलेला ठराव प्रशासनाचे पूर्वीपासून असलेला मत कितीदा आरक्षण कुठल्या आहे कब्रस्तानचे आणि जर तिथली लोक स्थानिक लोक पण असतिल जे काही बिल्डर असतील. त्याला विरोध करत असतील त्यांना उत्तर देण्यापूर्वी जसा आता तुम्ही चौधरीनां सांगितल की आम्ही राम आपटे म्हणून वरिष्ठ वकील दिला आहे यापूर्वी तुम्ही दिल असत तर कदाचित स्थगिती मिळाली नसती. तर आता ही आपली भूमिका आहे की त्या ठिकाणी लवकरात लवकर त्या लोकांना कब्रस्तान त्यांची दफन भूमी कशी मिळेल लवकरात लवकर त्यासाठी महापालिकेकेकडून न्यायालयामध्ये एक कणखरपणे किंवा खंबीरपणे बाजू मांडून जे आपले आरक्षण आहे ते आपल्या पदरात पाडून घ्यावं आणि त्यांना लवकरात लवकर चालु करण्यासाठी परवानगी देण्यासाठी जे जे काही करता येईल ते करा संपूर्ण सभागृह आणि संपूर्ण उल्हासगनर आपल्या बरोबर आहे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी</u>** :– मा. महापौर जी, मा. आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर सभागृहाचे सर्व सदस्य हा विषय कलवंत सिंग बिट्टु भाई, श्री. राजेद्र चौधरी यांनी घेतल आहे ते खरोखर धन्यवादाचे पात्र आहेत. त्यांनी मानवतेचा सुंदर परिचय दिला आहे. त्यांना परत एकदा मनापासून धन्यवाद. मा. आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकरहा विषय जो आपल्या सभागृहाच्या दोन सदस्यांनी मांडला आहे त्यांना मनापासून धन्यवाद करत आहे. सभागृहाचा कोणीही सदस्य अस म्हणत नाही की आम्ही मुस्लिम समाजाला कब्रस्तान देऊ नये. या सभागृहामध्ये आधीपण हा विषय पारित झालेला आहे आणि जो आपला आहे त्याच्या मध्ये पण सर्वे नं. ५८ वर कब्रस्तान आहे. हा विषय आला की ज्यांच्या ताब्यात जमीन होती त्यांनी नोंदणी करून ती जागा आमच्या ताब्यात दिली. आणि कब्रस्तान साठी ती जागा आम्ही ठेवली होती आणि तिथे दफन भूमीचे कामपण सुरू केले होते. आणि दोन दफन पण तिथे झाले. नंतर ते काम थांबले. आणि आता जे आपले भाउ कलवंतसिंह बिट्टू यांनी हा विषय आनला आहे त्यांनी इथे लिहून दिलेले आहे की जे नवीन डीपी येत आहे त्याच्यात काही फेरबदल झालेला आहे तर मी मा. आयुक्त श्री. राजेंद्र

निंबाळकरआपल्याला निवेदन करतो की, सभागृहाला अवगत करा की सत्यता काय आहे. हा जो ५८ नं सर्वे आहे जी आपली जुनी डीपी झाली होती आणि सभागृहाचा ठराव होता की तिथेच दफनभूमी झाली पाहिजे कब्रस्तान झाले पाहिजे आज जी शंका होत आहे की नवीन डीपी आहे त्यात काही बदल झालेले आहेत त्यावषयी आपण सभागृहाला सांगावे. आणि हे आश्वासन दयावे की सभागृहाचे जे मत आहे की कब्रस्तान त्याच ठिकणी झाले पाहिजे जिथे पहिल्यापासून होते. आम्ही ज्या जमिनीचे नोंदणी करून घेतली होती अणि सर्वाना आम्ही विश्वासात घेऊन ही कब्रस्तानाची जागा निश्चित केली. आणि नंतर काही दिवसांपासून आमचे मुस्लिम बंधू आज त्रस्त आहेत. हा विषय कोर्टात स्थगित आहे. तर कोर्टातुन कसा निपटवला जाईन ज्या प्रकारे तिथेपण या सभागृहाचे मत आणि तुमचे मत आणि जुनी डीपी हे सर्व ठेवुन त्या लोकांवर न्याय व्हावा वारंवार त्यांना आम्ही आश्वासन देतो की हे काम होईल पण काही वर्षापासून ते प्रलंबित राहत आहे. पण माझ आपल्याला निवेदन आहे की २०१७जे आहे त्याच्या आधीच आधी कारणकी आमची डीपी पण ८ ते १० दिवसात येणार आहे. आणि डीपी च्या विषयी पण खुलासा केला आहे. की नव्या डीपी मध्ये काही बदल आहेत त्याचापण आपण खुलासा करावा. की आपल्याकडे ठराव आलेला आहे का? जी.आर आलेला आहे की अजून येण्याचा बाकी आहे. हे आपल्याला माहिती आहे की नाही तर ही पूर्ण माहिती संपूर्ण सभागृहाला दयावी. आणि मा. महापौर जी आपण पण पुर्ण सभागृहाचे मत बघु आम्ही यावेळेच्या बजेट मध्ये चार वाजता बजेट ची मिटिंग होणार आहे त्याच्यामध्ये कब्रस्तानासाठी आम्ही रू. पन्नास लाख निधी ठेवला आहे. तर आपल्या कार्यकालामध्ये हे काम झाले पाहिजे आणि काही वर्षापासून मुस्लिम बंधू त्रस्त आहेत त्यांना हे कब्रस्तान या वर्षीच २०१७ मध्येच जितके लवकर होईल तितक्या लवकर त्याना त्यांच्या ताब्यात मिळाले पाहिजे. आणि त्यांचे ट्रस्ट त्यांची संस्था किंवा जे पण त्याच्या देखरेखीसाठी तयार आहेत त्यांना हे कब्रस्तान ताब्यात दिले पाहिजे. धन्यवाद.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी</u> :— साहेब माझा प्रश्न हा आहे की, जी साईट नं. ५८ आहे ती महानगरपालिकेच्या मालकीची आहे आपल्या मालकीची आहे. आपण तिथे कब्रस्तानासाठी आरक्षण दिले आहे आणि अस काय झाल आमची जमीन आमची महासभा त्यांना देत आहे त्यांना न देता आम्ही दुसऱ्या ठिकाणी देत आहोत जी आपली जागा नाही. आपली इच्छा आहे देण्यासाठी परंतु अस काय होत आहे की, ज्या कारणाने दिली जात नाहीये. महानगरपालिकेच्या प्रशासनाने अस कोणते पत्र लिहले आहे काय सरकारला की ही जमीन नका देऊ या जागेवर ती दया अचानक असे फेरबदल का होतात आमच्यासाठी हा आश्चर्याचा विषय होऊन जातो. कारण हे संपूर्ण सभागृह पुर्ण एकमताने ५८ नं सर्वे दिला आहे पण का हे फेरबदल होऊन जातात. यामागे तुमच्याकडे जी गुप्त माहिती आहे किंवा काही आतील गोष्टी असतील तर त्या आमच्याशी शेअर कराव्यात.

<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> अशी काही गुप्त माहिती आमच्याकडे नाही. आणि असली तरी ती गुप्तच राहते. हा म्हारळ गावचा जो आपला २ एकराचा प्लॉट आहे त्याबद्दल आम्ही मागच्या जानेवारीमध्ये या विरूध्द खुप काही आंदोलने झाली त्यानंतर पोलिसांकडून एक रिपोर्ट आला होता प्रशासनाला त्या आधारावर मागच्या डी.एम.सी. ने त्याला स्थगितीचे आदेश दिले होते. त्या कारणाने जानेवारीनंतर दोन मृतदेह तिथे दफन केले गेले त्यानंतर तिथे स्मशानभूमीचा वापर झालेला नाही. यामध्ये काही लोक कोर्टातही गेले होते कोर्टामध्ये पण हा मॅटर चालू आहे. आणि आता जो डीपी आपला फायनल झाला आहे ज्याची ऑफिशियल कॉपी आपल्याला आलेली नाही परंतु जी माहिती मला मिळालेली आहे त्या हिशोबाने सर्वे नं. ५८ चे जे आरक्षण आहे दफनभूमीचे ते बदलून पब्लिक युटीलीटी केल आहे. आणि त्या बदल्यात आम्हाला अजून चार जागेवर चार वेगवेगळया जागेवर त्यांनी स्मशानभूमीचे आरक्षण दाखवले आहे. या परिस्थितीत चार जागांचे एकतर हरमन मोहता एम. एल. ए मॅडमच्या इथे एक जागा आहे आणि दुसरा एक सम्राट अशोक नगर आहे तेथे आधीच स्लम बस्ती तेथे आहे जी ताब्यात यायला खूपच अडचणी येतील आणि ते स्मशानभूमीचे जसा सर्व मान्यवरांनी सांगितले की खुपच आपत्ती होउ शकते. आणि एक खाजगी जागा आहे शहाड च्या जवळ

<u>सदस्य श्री. कलवंतसिह सोहटा</u> :– हरमन मोहता.

<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u> नाही ती सोडून अजून एक आहे तर अशा चार जागा आम्हाला प्रस्तावित केल्या डिटेल्स मी तुम्हांला देऊ शकतो. हा अजून आपला एक प्लॉट जो आहे आपला ट्रान्सपोर्टचा तिथेपण त्यांनी आरक्षण केल आहे. तर अशा परिस्थितीत गर्व्हमेंट एज अ सेक्रोसंड एज पर डीपी कनर्सन डीपी जर अंतिम सरकारने केला आहे त्यामध्ये हा ५८ नं. सर्वे जो आहे तो बदलून आता त्याला पब्लिक युटीलीटी केला आहे या परिस्थितीत शासनाच्या हाताखाली आपण काम करत आहोत तर आपण त्या डीपीच्या विरूध्द Unless There is some change by the Government who is superior authority than the corporation and genral body. आणि कोर्टात जो मॅटर प्रलंवित आहे त्यांचे आदेश आणले शिवाय कारण की कोर्टात मध्ये प्रशासन पण पार्टी आहे. प्रशासनाला पण उत्तर दयावे लागेल की आपण हे आरक्षण का बद्दल केले आहे? त्याचे काय कारण आहे? त्याचेसाठी कोर्ट आपलेला विस्तृतपणे विचारू शकतात. जेव्हा हा मुददा माझ्या समोर मागच्या आठवडयात आला होता त्यावेळी मी त्यांना सुचवलेले पण मुस्लिम समाजाचे बांधवांना की तुम्ही यामध्ये पार्टी नाही. ज्याचे दु:ख आहे ते कोर्टात व्यवस्थितपणे सागू शकतात.तर तुम्ही रीतसर पार्टी कोर्टमध्ये २४, २५ ला सुनावणी आहे त्याचा आधीच तुम्हीपण एक चांगला वकील बघून तुम्हीपण कोर्टात... कारण की ज्यांना हे कॉन्ट्रेस केलेले आहे ते वेगळे आहे आणि आम्ही एक वेगळी पार्टी एज कॉर्पोरेशन एज ए गॅव्हरमेंन्ट आहे. ज्याना यात अडचण आहे त्यांची अडचण कोर्टला जास्त माहिती पडेल जेव्हा ते लोक यामध्ये स्वत पार्टी होणार. देन कोर्ट कॅन हेव प्रॉपर अन्डरस्टॅन्ड ऑफ द मॅटर एन्ड गीव प्रॉपर जजमॅन्ट. जेव्हा मी त्यांना सुचवले तेव्हा भौतिक ते लोकांनी स्विकारले आहे आणि कोर्टमध्ये पण जात आहेत. या परिस्थिती मध्ये महानगरपालिके तर्फे या प्रशासनतर्फे यामध्ये हस्तक्षेप करणे लिगंल नाही होणार वैध नाही होणार. दॅट विल बी एज इट चॅलेन्जींग द गॅव्हरमॅन्ट डी पी डिसिजन.

<u>सदस्य श्री. कलवंतसिह सोहटा</u> :– हे जे तुम्ही सांगितले कोर्टमध्ये पण आहे कोर्टला आव्हान करणे किंवा राज्यसराकारला आव्हान करणे ते आमचे काम नाही की आम्ही त्याना सांगू सत्य काय आहे. त्या लोकांनी बदल केला आहे नव्या डीपीमध्ये केला आहे.

<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u> त्या दिवशी मी तुम्हाला हे पण सांगितले आहे. कोणत्या आधारावर आम्ही हे स्थगिती आदेश दिले होते. त्या परिस्थितीमध्ये काही बदल झाला असेल तो पोलिस डिपार्टमेंट कारण की तो कायदा व सुव्यवस्था आहे नॉमिनल इशू आहे. जे की म्हारळचे ग्रामपंचायत किंवा तिथे राहणारे लोक आहेत त्यांनी आपत्ती व्यक्त केली आहे. त्या आधारावर पोलिस आपला रिपोर्ट वेगळे पाठवू शकतात. काल डीसीपी कमिशनर साहेब माझ्याकडे आले होते या विषयावर माझे त्यांच्याशी विस्तारित पणे बोलणे झाले. आम्ही दोघांनी एकत्रितपणे जे काही ओरिजनल रिजर्वेशन आहे म्हारळचे प्लस जे अल्टरनेट साईड सुझाव दिले आहेत त्याचे पाहणी आम्ही करणार आणि डिसीपी सेट ही विल बी सबमिट फ्रेश रिपोर्ट इफ इट रिक्वायर. जर परिस्थितीमध्ये काही बदल आहेत तर ते आम्हाला रिपोर्ट पाठवतील. कारण जे कारण बनले होते ते बदल करण्यासाठी त्याच कारणाला काही नवीन परिस्थितीचा आम्हाला त्यांनी रिपोर्ट पाठवणे हे गरजेचे आहे. इट इज नॉट प्रशासन आपल्याकडून कायदा व सुव्यवस्था समजवणे किंवा त्यावर गैरसमज आम्ही करू शकत नाही.

<u>सदस्य श्री. कलवंतसिह सोहटा</u> :– नाही साहेब पण सत्यता तर सांगू शकता ना....

<u>आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u> जेव्हा डीसीपी चा रिपोर्ट येईल त्यानंतर आम्ही त्याच्यावर विचार करू.

<u>**सदस्य श्री. कलवंतसिह सोहटा**</u> :– साहेब तुम्हांला काय वाटते? दुस–या ठिकाणी जागा देण्यासाठी महानगरपालिका घोषित करणार तेव्हा तिथे विरोध नाही का होणार? त्याच्यात कायदा वसुल व सुव्यवस्था ची परिस्थिती निर्माण नाही होणार का?

<u>**आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर**:–</u> सर्व ठिकाणी अस होत कारण की ........

<u>**सदस्य श्री. कलवंतसिह सोहटा**</u> :– यासाठी आपली ही जबाबदारी आहे ना साहेब.

<u>**आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर**:–</u> आपण जसे कोर्टात जात आहात आपण पण शासनाला पण भेटू शकतात त्यांना पण ही परिस्थिती तुम्ही सांगु शकता. सॅवर इन सायक्रो साईन त्याच्यामधील दोन तर इतिवृत्त टाकले आहेत त्याच्यामध्ये.

<u>**सदस्य श्री. कलवंतसिह सोहटा**</u> :– आम्ही तर जात आहोत जसे तुम्ही सांगितले होते. जसे तुम्ही मार्गदर्शन केले होते त्या हिशोबानी मुस्लिम समाजाचे लोक जात आहेत. पण तसे आपले पण कतर्व्य आहे की त्यांना सागावे.

<u>**आयुक्त श्री. राजेंद्र निंबाळकर**</u>:– पोलिस रिपोर्ट आले नंतर मी स्वतंत्रपणे आपल्या सर्वे सरकारकडून पाठवणार

<u>**सदस्य श्री. कलवंतसिह सोहटा**</u> :– धन्यवाद.

<u>**सदस्य श्री. धनंजय बोडारे**</u> :– महापौर महोदया आयुक्त साहेबानी सांगितले आहे की जे येणार डीपी प्लॅन आहे त्याच्यामध्ये कायदेशीर माहिती मिळाली आहे की त्या प्लॉटला पब्लिक यूटीलीटी मध्ये दिलेले आहे आणि सम्राट अशोक नगरला कब्रस्तानासाठी दिलेला आहे. हा मुददा अधोरेखित करून स्थगन प्रस्तावाच्या माध्यामातून हा प्रस्ताव सरकारकडून पाठवावे की सरकारच्या विश्वासहर्ता त्याच्या मागे लागली आहे. सरकार म्हणजे काणीतरी ऐक अधिकारी असतात त्यांच्या मनात जे येतात ते करतात. आणि सरकारच्या आधिन आतात अशी गोष्ट आहे. कोण अधिकारी होत ज्यांनी सम्राट अशोक नगरवर स्वाक्षरी केली त्यांना विचार, कोणीतरी असेल डायरेक्टर असेल डेप्युटी डायरेक्टर असेल टॅक्निकलचा जे काही असेल नगरविकासाचा असेल ज्यांनी केला असेल ते बांधला असेल,
तर हे कोणी केले सम्राट अशोक नगरमध्ये कब्रस्तान साठी जागा देत आहे. या स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातुन विचारा. आणि येथे जो ओपन प्लॉट आहे जो ७४ पासून एम.एम.आर.डी. ने तेव्हा बी एम.आर.डी. ची होती एम.एम.आर.डी. ने केला. महानगरपालिकेने केला. आता परत महानगरपालिकेने केला. महानगरपालिका आणि एम.एम.आर.डी. ला आदी एम.एम.आर.डी. विचारले तेव्हा अक्कल नव्हती का? तिथे मुस्लिम कब्रस्तान केलेले आहे. आणि आधीचे जे ऑफीसर आहे मी सरकार नाही म्हणत एक ऑफिसर असेल त्या आफिसर ने आपली मनमानी करून बदल केला. आणि ते सरकारचे म्हणणे आहे. ही अशी गोष्ट झाली. तर या स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून ठराव करायचा आहे की शासनाच्या विश्वासार्थ जाण्यासारख प्रयोजन किंवा प्रपोजर या ठिकाणी उल्हासनगर मध्ये पाठवायचे आहे. शासनाचा कुठलाही निर्णय हा सामाजिक बांधिलकीतून नसून कोणाच्यातरी बांधिलकीसाठी त्यांनी सामाजिक बांधलकीतून सोडून एक वैयक्तिक बांधिलकीत पाळले जाते अशा प्रकारे शासनाचे निर्णय आहेत. अशा प्रकारचा ठराव शासनाला गेला पाहिजे. कोणाच्यातरी सांगण्यावरून आपण पूर्ण समाजावर अन्याय करत आहोत. महानगरपालिकेचे म्हणणे आपण खोटे ठरवत आहोत. येथे सभागृहाचे म्हणणे खोटे ठरवत आहोत. आणि कोणीतरी उभे करतो आहे. कायदा आणि सुव्यवस्था निर्माण होईल कुठे होणार नाही सम्राट

अशोक नगर मध्ये कब्रस्तान होऊ शकते का? हरमन मोहता या ठिकाणी होऊ शकतो का? हे शहराच्या एका ठिकाणी एका कोप–यात ठीक आहे कब्रस्तान त्या ठिकाणी झाले पाहिजे. वर्षानुवर्षे तिथे ते असताना एक ऑफिसर कोणीतरी बदलत आहे जे ऑफिसर ज्यांनी बदलले आहेत त्यांची चौकशी करण्याचा प्रस्ताव या ठिकणी विचार माध्यमातुन करावा जो कोणी असेल मुख्यमंत्र्यांनी ते केलेले नाही. मुख्यमंत्री काय उल्हासनगरचा कोपरा न कोपरा पण त्या अधिकारी आणि कमीत कमी ईथल्या उल्हासनगरच्या अधिका–यांचे सहकार्य तरी घेतलेच पाहिजे. ते घेतलेले दिसत नाही आणि घेतले असेल तर इथला अधिकारी जबाबदार असेल. चुकीचा मार्गदर्शन केले म्हणून. तर तो या प्रस्तावामध्ये.

<u>महापौर तथा पिठासन अधिकारी:–</u> तुम्ही आपला प्रस्ताव दया.
<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे</u> :– आमचे तीन प्रस्ताव झाले आहे हया विषयवर कितीदा सरकारकडे पाठवायचा. १९९७ मध्ये झाला त्यांना थेट देणेसाठी झाला.
<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:–</u> हि महासभा असा ठराव करते की उल्हासनगर शहरातील मुस्लिम बांधवानसाठी कब्रस्तान सीट नं. सर्वे नं.५८ नविन सर्वे नं.१६ म्हाळल गाव उल्हासनगर–१, ८ हजार चौ. फुट क्षेत्रफळाचे भूखंड आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेचे जे आहे जे उल्हासनगर महानगरपालिकेने मुस्लिम समाजाला कब्रस्तान म्हणून दिलेले आहे त्या ठिकाणी दोन मृतदेह दफन झालेले आहे आणि तीच जागा उल्हासनगर महानगरपालिकाची असताना महानगरपालिकेचा स्वत:ची असताना महानगरपालिकाने कुठल्या ठराव न करता किंवा कुठल्या ही प्रपोजल शासनाकडे न पाठवता तो शासनाने डीपी मध्ये बददल केला कसा ? आणि तो डीपी मध्ये बददल केलेला आहे तो चूकीचा आहे हि महासभा पुन: शासनाचा निर्देशनास आणून देणेसाठी प्रस्ताव करते की व न्यायलयाच्या आधिनराहून प्रस्ताव करते की सीट नं. सर्वे नं. ५८ नविन सर्वे नं.१६ म्हाळल गाव उल्हासनगर–१, ८ हजार चौ. फुट क्षेत्रफळ हा भूखंड पुन: मुस्लिम बांधवाना जो महानगरपालिकाने दिलेला आहे तो देण्यात यावा. शासनाचा आणि न्यायालयाच्या अधीन राहून हा ठराव करत आहे.

<u>महापालिका सचिव:–</u> ठराव पास सर्वसंमतीने की कसे ते सांगा?

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:–</u> हे शासनाचा लक्षत आणून देण्यासाठी आणि मा. न्यायलयाचा लक्षात आणून देण्यासाठी हा आपला ठराव आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे</u> :– आपण सुध्दा ही महापालिकेची सभेची भूमिका शासनाला आणि मुख्यामंत्र्यांना तातडीने लिहा.

<u>काही सदस्य:–</u> पास, पास

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ <u>स्थगन प्रस्ताव</u>

विषय :–<u>मुस्लिम समाजाचा कब्रस्तानचा विषय सोडविणेबाबत.</u>

सूचकाचे नांव :– श्री. कलवंतसिंह सहोता
श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव:– श्री. राजेंद्र चौधरी
श्री. दिपक सिरवानी

उल्हासनगर शहरात मुस्लिम समाजाचा कब्रस्तानचा विषय हा एक महत्वाचा विषय असून सद्या सदर विषय हा न्यायप्रविष्ठ आहे.

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात जुना सर्वे नं. ५८, व नविन सर्व्हे नं.१६, म्हारळ गाव, उल्हासनगर–१ येथिल ८,००० चौ.मी. क्षेत्रफळाचा भुखंड प्रारुप विकास योजनेनुसार आरक्षण क्र. १६ अन्वये दफनभुमीसाठी आरक्षित करण्यात आलेला आहे. तसेच याठिकाणी मुस्लिम समाजाचे दोन मृतदेह दफन करण्यात आलेले आहेत.

महानगरपालिकेच्या नविन सुधारीत आराखडययानुसार सदरची जागा सार्वजनिक उपयोगासाठी (पब्लिक युटिलिटीसाठी) राखीव ठेवण्यात आली आहे. महानगरपालिकेने कायदा व सुव्यवस्थेचे कारण दाखवुन कब्रस्तानच्या विषयाला स्थगीती दिली आहे.

सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने मा. न्यायालयाच्या अधिन राहुन ही महासभा सदरच्या स्थगन प्रस्तावाद्वारे नविन प्रस्ताव सादर करुन पुर्वीची सर्वे नं. ५८ व नविन सर्व्हे नं. १६, म्हारळ गाव, उल्हासनगर–१ ही जागा मुस्लीम समाजाच्या कब्रस्तानासाठी देण्यात यावी असा प्रस्ताव सादर करीत आहे. सदर स्थगन प्रस्तावाची महासभेत सविस्तर चर्चा होवून निर्णय घेण्यात यावा, ही विनंती.

महासभा ठराव क्र. :– १९ ड                                        दिनांक : १९/७/२०१७

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर क्षेत्रात जुना सर्वे नं. ५८, व नविन सर्व्हे नं. १६, म्हारळ गाव, उल्हासनगर–१ येथिल महापालिकेच्या मालकीचा ८,००० चौ.मी. क्षेत्रफळाचा भुखंड दफनभुमीसाठी देण्यास पुन्हा शासनाच्या निदर्शनास आणून देणेस व न्यायालयाच्या अधिन राहून मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–१)

२)

अनुमोदकाची सही/–१)

२)

सर्वानुमते

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिवः–आता दुसरी सभा बजेटची सभेची वेळ झाली आहे ती सभा सलगपणे सुरु करु या कसे?

सदस्य श्री. सुनिल सुर्वेः– ५० मिनिट उशीरा सुरु झाले होते पहिले तर ५० मिनिटे कुठेतरी अॅडजस्ट करा

महापालिका सचिवः– सर्व संमतीने ठरवा तुम्ही जे काही आहे. सर्व संमतीने ठरवा हेच विचारते.

सदस्या श्रीम. जोत्स्ना जाधवः– मा. महापौर उप महापौर आणि आयुक्त साहेब अशासकीय प्रस्ताव मांडयचे आहे त्याबददल सचिव मॅडम बोलतच काही बोलतच नाही आहे.

महापालिका सचिवः– दुस–या सभेची वेळ होवून गेली आहे.

सदस्य श्री. अरुण आशान :– पहिले ही तुम्ही सभा उशीरा सुरुवात केली राहिलेल्या विषय घ्यावा लागेल तुम्हाला.

<u>महापालिका सचिव:—</u> ठीक आहे, मी निर्देशनास आणून दिली आहे की अर्थसंकल्पच्या संबधित...

<u>सदस्य श्री. अरुण आशान</u> :— तुम्ही लवकर सभा सुरुवात करत नाही मा. महापौर मॅडम उशिरा येतात क्षमा असावी.

<u>सदस्य श्रीम. सुनिता बगाडे:—</u> मा. महापौर मॅडम हा प्रश्न फक्त ५नं. साठी नाही आहे उल्हासनगर शहर पूर्ण आहे. मॅडम माझा प्रश्न आहे हा जे प्रस्ताव आहे मुस्लिम समाजाचा जे फक्त उल्हासनगर—१ साठी आहे की पूर्ण १ ते ५ नं. पर्यत आहे. मग इथे उल्हासनगर—१ लिहिला आहे ना कारण की उल्हासनगर—५ चे कब्रस्तान पास झालेला आहे ९९ मध्ये मग पूर्ण उल्हासनगरसाठी आहे १ते ५ पर्यत.

<u>महापालिका सचिव:—</u> लक्षवेधी सुचना आहे सुचकाचे नाव आहे श्री. दिपक सिरवानी आणि अनुमोदकाचे नाव आहे श्रीमती कविता पंजाबी त्यानी लक्षवेधी सुचना मांडायची आहे.

---

<u>लक्षवेधी सूचना क्र. १</u>

सुचकाचे नाव :— दिपक एल सिरवानी

अनुमोदकाचे नाव :— कविता एल पंजाबी

**विषय:—** मालमत्ता कराची थकबाकी प्रदान करातून सूट देणेबाबतची लक्षवेधी सूचना.

उल्हासनगर महानगरपालिकाक्षेत्रात अंदाजे एकुण १,७२,००० मालमत्ता अस्तित्वात असून दिनांक ३१मार्च २.०१७ अखेर मालमत्ता करापोटी अंदाजे ३७५ कोटी रक्कमेची रक्कमेची थकबाकीप्रलंबीत आहे. मालमत्ता कराचे वार्षिक देयके ३० जून २०१७ पर्यंतभरणा केल्यास संबंधितांना मालमत्ता करात ५ टक्के सुट अनुज्ञेय आहे. परंतु वर्ष २०१७—१८ साठी तयार करण्यात आलेले देयके जून ओलांडला तरी अदयापपर्यंत वितरति करण्यात आल्याचे दिसत नाही. त्यामुळे मिळकत धारकास सुटचा लाभ मिळू शकरणार नाही. एकूण सर्व देयके वितरीत करणेमसाठी किती कालावधी लागेल याचाही अदयापपर्यंत बोध होत नाही. अशा परिस्थितीत थकबाकी रक्कमेचे प्रमाणात वाढ होत आहे.

तरी थकबाकी रक्कम जास्तीत जास्त वसुली होण्याच्या दृष्टीने उपाययोजना म्हणुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १५—१ अ मध्ये मालमत्ता कर देण्यास प्रथमत: पात्र असलेली व्यक्ती किंवा व्यक्तीचा वर्ग महापालिकेने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसारमालमत्ता कराच्या थकबाकीची रक्कम प्रदान करील. अशाा मालमत्ता कर प्रदान करण्यास प्रथमत: पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तीच्या वर्गाला राज्य शासन मान्य करील अशी सुट देता येईल अशी तरतुद करण्यात आली आहे.

सदर तरतुदीनुसार शासन मंजुरीच्या अधिन राहून उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मिळकत धारकांना मालमत्ता करापोटी प्रलंबित असलेल्या थकीत रक्कमेवर सुट देणेसाठी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सुट लागु असलेल्या कालावधी | प्रस्तावित सुट |
|---|---|---|
| १ | दिनांक १ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर, २०१७ | मालमत्ता करापोटी दि. ३१/३/२०१७ पर्यंत प्रलंबित असलेल्या सामान्य करांचे थकबाकी रक्कमेवर सूट १० टक्के अनुज्ञेय असेल. |
| २ | दि. १ ऑक्टोंबर ते दि. ३० नोव्हेंबर, २०१७ | मालमत्ता करापोटी दि. ३१/३/२०१७ पर्यंत प्रलंबित असलेल्या सामान्य करांचे थकबाकी रक्कमेवर सूट ७ टक्के अनुज्ञेय असेल. |

मालमत्ता कराची थकबाकी प्रदान करण्यातून अनुज्ञेय असलेली सुट व त्याच्या कालावधीसंबंधी नागरीकांना जाहिरातीद्वारे अवगत करण्यास विनंती.

---

<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी:—</u>धन्यवाद महापौर महोदया, आपण ही लक्षवेधी स्विकारली आहे, ही संपुर्ण उल्हासनगरच्या कराच्या सुटबाबत आहे. १ लाख ७२ हजार कर पे आहे उल्हासनगरचा. आपण प्रत्येक वेळी कराचे बिल पाठवित होतो. कराची नोटिस पोस्टाने पाठवित होतो. आता असे पाहण्यात आले की महिला बचत गटवाल्यांने ही जबाबदारी देण्यात आली चांगली गोष्ट आहे. महिला ही सक्षम असली पाहिजे. परंतु त्या महिला बचत गटवाल्यांनी त्याची पोचपावती किंवा पावती प्रशासनाकडे पोहाचवली नाही. असे अनुमान

पाहण्यात आले की मार्च महिन्यापर्यंत आम्हांस नोटिस मिळत होती. तर त्यानुसार कर भरला जात होता आणि आम्हांस सुट सुध्दा मिळत होती, हे १५२ (अ) कलम मध्ये आहे. तर माझी आपणांस सूचना आहे की, येणा–या कालावधीमध्ये १ ऑगस्ट ते ३० सप्टेंबरपर्यंत सुट दिली जावी जसे की ३७५ कोटी कर भरायचा आहे तसे आपणांस आयुक्त महोदयांकडुन सुध्दा ही माहिती मिळते. १ ऑगस्ट ते ३० सप्टेंबरपर्यंत ३१/३/२०१७ पर्यंत ज्यांच्याकडे जनरल कर उरला आहे. त्यात १० टक्क्याची सुट देण्यात यावी. १ ऑक्टोंबरपासुन ते ३० नोव्हेंबरपर्यंत ७ टक्के सुट देण्यात यावी. सर्वच उल्हासनगरवाशियांना करात सुट देण्याचा फायदा मिळाला पाहिजे. धन्यवाद।

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–मा. महापौर महोदया, सर्व सदस्य, सर्व शहराच्या मालमत्ता कराच्या माध्यमातुन वसुली आणि करंट या दोन्ही विषयातुन ३७५ कोटी वसुल करणे बाकी आहे. आमचा आजपर्यंतचा जो अनुभव आहे की मागील दोन वर्षापासुन आम्ही ३ वेळा अभय योजना जाहिर केली होती. त्याबद्दल माझ्याकडे फिगर आहेत परंतु डिटेल्स नाही. माझ्या लक्षात आहे की २० कोटीपेक्षा जास्त फरक नाही आहे. तिन्ही मिळुन तर हे सिध्द होते की, अभय योजना करा किंवा नियमित वसुली करा, लोकांमध्ये कर मुदतीत भरण्याची किंवा स्वत:हुन भरण्याची, आपण त्यांना एवढी सुविधा दिली आहे कर भरण्यासाठी त्याबाबत संपुर्ण शहरात सेंटर आहेत, परंतु लोक स्वत:हुन भरत नाहीत. जोपर्यंत आपण सक्तीची कारवाई नाही करत. तर अभय योजनेसाठी लोक आता सुध्दा वाट पाहत आहेत, की अभय योजना येणार, अभय योजना येणार म्हणुन कर भरत नाहीत. हे कारण दाखवत आहेत तर मला असे वाटते की, तर अभय योजना असा टुल आहे तो प्रत्येक वर्षी न वापरणारा टुल आहे. तो केव्हा वापरला पाहिजे जेव्हा त्याच्या माध्यमातुन जास्त फायदा होईल.

सदस्य श्री. दिपक सिरवानी :–ही अभय योजना नाही, करातुन सुट देण्यासाठी १० टक्के देणे ते ३० जुनच्या आधी त्यांना बिल मिळाले पाहिजे, १ एप्रिल ते ३० जुनपर्यंत.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–तर आपण काय म्हणता १० टक्के. हे अभय योजनेसारखेच आहे. ठिक आहे, फायदा जो आपण मार्चपर्यंत नाही देवु शकणार त्यासाठी ठिक आहे. आपण कधी पर्यंत म्हणता?

सदस्य श्री. दिपक सिरवानी :–१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबरपर्यंत.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:– वुई कॅन गिवन बाय वन मंथ आय कॅन अंडरस्टॅण्ड. आपण जर दुस–या महापालिकेत जर पहाल की जो व्यक्ती कर वेळेत भरत असेल तर त्यास जास्तीत जास्त करात ५ टक्के सुट मिळते.

सदस्य श्री. दिपक सिरवानी :–ठिक आहे साहेब, आपण एक महिन्याची सुट घेवुन दया.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–आम्ही त्याचा संपुर्ण अंदाज लावतो. मी असे समजलो की आपण अभय योजनेबद्दल बोलत आहात. आम्ही वेळेवर बिल देवु नाही शकलो त्याचे सुध्दा काही वेगवेगळी कारणे आहेत. परंतु आता जसे बचत गटाच्या माध्यमातुन आपण डिस्ट्रब्युशन केले त्यात काही तक्रारी आहेत, काही कमी आहेत, जर आपण त्यात पाहाल तर , मी स्वत: व्हिझीट करतो, सर्वांना विचारतो, मोस्ट ऑफ द पिपल्स दे हॅव रिसीव्ह द् बिल. कंपेअर टु पोस्टल, आता त्यांना मिळाले आहे.

सदस्य श्री. दिपक सिरवानी :–जर पोचपावती मिळेल तर आपणाकडे एक प्रुफ राहिल.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–नाही, नाही, आपण हे पाहिले पाहिजे की, त्या महिला वर्ग अनऑर्गनाईज्ड सेक्टर मधुन आल्या आहेत. त्या व्यतिरिक्त त्या एवढया शिकलेल्या नाहीत. काही काही महिलांना ते देता येत नव्हते म्हणुन त्यांनी परिवारातील सदस्यास कामावर लावले, आपल्या मुलांना, आपल्या पतीला, आपल्या भावाला परंतु ते काम इमानदारीने व मेहनतीने पुर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. आपले जे पगारी लोक आहेत त्यांच्यात जास्त कमी आहेत. या गोष्टी ऍप्रिशिएट केल्या पाहिजेत.

सदस्य श्री. शंकर लुंड :–प्रभाग अधिका–यांचे सहकार्य नाही मिळाले. प्रभाग अधिका–यांनी उलट त्यांना...

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–मी तेच म्हणत आहे. ठिक आहे, या गोष्टी वेगळया आहेत.

सदस्य श्री. शंकर लुंड :–माझा विरोध नाही, माझी विनंती आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–ठिक आहे, मी याबाबत गंभीरतेने विचार करेन. टाईम पिरीअड दोन दोन महिने देण्याची आवश्यकता नाही. आपण १० टक्के ऐवजी ५ टक्के एवढे देवु. आणि आणखी एक महिन्यासाठी २ किंवा ३ टक्क्याचे आपण देवु.

सदस्य श्री. दिपक सिरवानी :–ठिक आहे साहेब.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी:–साहेब, मला आठवत आहे, निवडणूकीच्यावेळी जो वोटिंग करेल त्यास सुध्दा करात सुट देणार की जेणेकरुन लोक जास्त मतदान करतील.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–त्याबाबत आपण सेल्फीची योजना बनविली होती. आम्ही १०० मालमत्ता आयडंटीफाय केल्या होत्या. प्रभागातुन पाच अशा सूचना केल्या होत्या परंतु ते प्रस्ताव तीन महिन्याच्या गॅपमुळे राहिले ते पुढील महासभेपर्यंत येवुन जाईल. मी स्वत: लोकांना सांगितले की आपण जर सोडुन देणार तर लोकांचा विश्वास गमविणार. तर अशा मामुली योजनेवर सुध्दा लोक विश्वास करणार नाहीत.

**<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:</u>**—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य, आज आपण हा मालमत्ता कराबाबतचा विषय येथे घेतला, बचतगटवाल्यांना आपण हे काम दिलेले आहे, त्या महिलांनी इतक्या चांगल्या त—हेने ही कामे केलेली आहेत आणि गेल्या पाच पाच व दहा दहा वर्षात पावती न मिळालेले घर आहेत आणि यावर्षी सर्वांना पावती मिळाली व कराचा भरणा व्यवस्थित होत आहे. आपल्या सुध्दा काही चुका होतात त्या महिलांना एप्रिलमध्ये बिल देण्यासाठी दिले पाहिजे. त्यांना सुटेबल होईल आणि आता पावसाळयाच्या दिवसात सुट दिली तर आणखी चांगले होईल, आपण बैठकी घेवुन अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. खरच मी धन्यवाद मानते. आणि महिलांना अशीच पुढे कामे मिळत राहो अशी आशा करते.

**<u>सदस्य श्री. शंकर लुंड :</u>**—साहेब, या महिला बचत गटवाल्यांना पावती दयायची नव्हती आम्ही जो उशिर केला आहे, महिला बचत गटवाल्यांनी चांगले काम केले आम्ही एचओडीमध्ये एप्रिशिएट केले. त्यांना बिले हॅण्डओव्हर केले. त्या आमच्या घरी सुध्दा आल्या होत्या, मी आपणांस व्हाट्सअप सुध्दा केले होते. हा मुद्दा जो आहे की महिला बचत गटवाल्यांना न देण्यासाठी असे नाही म्हटले तर त्यांनी बिले उशिरा पोहचवली आहेत कारण आपण त्यांना उशिरा दिले. यात दावा केला की एक महिना त्यांना सुट दिली जावी. धन्यवाद।

**<u>महापालिका सचिव :</u>**—लक्षवेधी सूचना क्र. २ जी आहे

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

---

## <u>लक्षवेधी सूचना क्रमांक २</u>

**विषय:**— सार्वजनिक बांधकामा विभागाच्या निविदेबाबतची लक्षवेधी सूचना.

सुचकाचे नाव :— श्री. प्रदिप रामचंदानी

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती मिना सोनेजी

सदरील विषयावर चर्चा करणेत येवून प्रभावि तोडगा काढण्यात यावा. सदरचे विषय खालीलप्रमाणे.

सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये जानेवारी २०१६ पासुन झालेल्या निविदेची संख्या किती आहे? त्यांचे टेंडरांचे वर्क ऑर्डर देण्यात आलेले आहेत. जर झालेले नाहीत तर त्यासाठी झालेल्या विलंबाचे कारण काय?

तरी याबाबत महासभेमध्ये चर्चा होवून ठोस तोडगा काढण्यात यावा, ही विनंती.

---

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:</u>**—एक मिनिट मला पहिल्या लक्षवेधीवर निर्णय दयायचे आहे.

**<u>महापालिका सचिव :</u>**—मा. आयुक्त साहेब, श्री. दिपक सिरवानी यांच्या लक्षवेधीबाबत निर्णय देत आहेत.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:</u>**—मी कायम करतो, स्पष्ट करतो की, आपण जी सूचना दिली त्यात थोडा फेरबदल करुन ज्यांना आता मालमत्ता करपावती मिळाल्या आहेत, तर सर्वांना मिळाल्या आहेत तर, त्याबाबत १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्टपर्यंत जो कर भरेल त्यास ५ टक्के रिबेट देणार व जे ३० सप्टेंबरपर्यंत भरणार ३१ ऑगस्ट नंतर तर त्यांना ३ टक्के आपण सुट देणार परंतु त्याच्या काही अटी शर्ती सुध्दा असतील की त्यांनी संपुर्ण कर भरला पाहिजे, असे नाही की अर्धे आता व अर्धे नंतर भरणार. ३० मार्चपर्यंतची जी रक्कम आहे व करंट वर्षाची जी आहे ती, दोन्ही.

**<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :</u>**—ठिक आहे साहेब.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:</u>**—साहेब, धन्यवाद।, साहेबांनी खरच कबुल केले की आमच्या कर विभागापेक्षा महिलांनी चांगले काम केले.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:</u>**—मी सांगत आहे की त्या अनऑर्गनाईज्ड सेक्टरच्या आहेत, त्यांना प्रत्येक महिन्यात पगार मिळतो त्यांच्यावर जास्त जबाबदारी आहेत, त्या महिला १४ रुपयांसाठी काम करत आहेत त्यात त्या अनऑर्गनाईज्ड सेक्टरमध्ये अशिक्षीत आहेत, मी म्हणतो जे आमचे कर निरिक्षक आहेत त्यांच्या विरुध्द, त्यांच्या तुलनेने. परंतु त्यात काही कर निरिक्षक चांगले काम करत आहेत.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:</u>**—साहेब, एकदम बरोबर आहे, मी हरकतीच्या मुद्दयावर बोलतो, याच्यावर एक विषय असाच आहे. आपल्या महत्वाचा जो महापालिकेचा बेस आहे ऑडिट डिपार्टमेंट त्याच्या मुख्यपदी बसलेले श्री. बलमे आहेत त्यांची बदली करीता वरुन आदेश असतांना त्यांना थांबविले गेले आहे. बीपीएमसी ॲक्टची पुर्ण वाट लावली आहे. मी तुम्हांला पत्र दिले आहे त्यात मी सविस्तर दिले आहे. अशा व्यक्तीला तुम्ही ठेवण्याचे कारण मला समजले नाही, कारण की श्री. लेंगरेकर साहेबांना तुम्ही एका दिवसात पाठवुन दिले, एका दिवसात, ज्या दिवशी आदेश आला त्याच्या दुस—या दिवशी हा भेदभाव आम्हांला समजला नाही. या

हरकतीच्या मुद्दयावर जसे तुम्ही म्हणत आहेत, चार वर्ष येथे राहुन जे बीपीएमसी ॲक्ट येथे पाळायचे आहे, त्यावर काही कार्यवाही नाही किंवा त्यांना न पाठविता येथेच ठेवण्याचे धोरण तुम्ही अवलंबिले आहे?
आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—पहिली गोष्ट आपण जे म्हणत आहात त्यांच्या कामामध्ये काही त्रुटी असतील आपण सर्वसामान्य बोलण्यापेक्षा आपण स्पेशिफीक जे बोलत आहात...
सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—मी पत्रामध्ये स्पष्ट लिहिले आहे. तुमच्याकडे नाही तर मी तुम्हांला पत्र देतो.
आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—दुसरा मुद्दा श्री. बलमेंच्या जागी दुसरा पर्यायी अधिकारी अदयाप दिलेला नाही,
आपणाकडे आधीच अधिका—यांची कमतरता आहे, त्यांच्याकडे जरी ऑडिटचे काम असेल मला जशी गरज पडेल ती ती कामे मी त्या त्या अधिका—यांकडुन करत असतो.
सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—श्री. लेंगरेकर साहेबांना थांबविले असते तर चालले असते.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—श्री. लेंगरेकरांचे रिलीव्ह आदेश आलेत ना.
सदस्य श्री. विजय पाटील:—थांबवुन ठेवले असते तर काही अडचण नव्हती.
आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—पर्यायी व्यवस्था नव्हती.
सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—आता नगररचनाकार नाही पर्यायी व्यवस्था नाही, तरी तुमचे काही ना काही चालु आहे ना?
आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—परंतु जर रिलीव्ह ऑर्डर नसतील तर मी कुणालाच रिलीव्ह केले नसते.
सदस्य श्री. मनोज सयानी :—केले होते, केले होते. २/६/२०१७ ला त्यांना रिलीव्ह केले.

सदस्य, श्री.सुनिल सुर्वे :— बलमे साहेब आहेत त्यांच्या बदलीची वरून ऑर्डर आलेली आहे, परंतु त्यांना थांबवले गेले आहे. बी.पी.एम.सी. ॲक्टची पुर्ण वाट लावली आहे. मी तुम्हांला पत्र दिले आहे, त्याच्यात सविस्तर लिहीले आहे. अशा व्यक्तीला तुम्ही ठेवण्याचे कारण मला समजले नाही, कारण की लेंगरेकरांना एक दिवसात पाठवून दिले. त्या दिवशी ऑर्डर आली आणि दुस—या दिवशीच, हा भेदभाव मला समजला नाही. चार वर्षे इथे राहून बी.पी.एम.सी. ॲक्ट पाळायचा आहे. त्याला काही कारण नाही आणि त्यांना इथे ठेवण्याचे धोरण तुम्ही अवलंबिले आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— पहीली गोष्ट म्हणजे आपण म्हणतात की, जर त्यांच्या कामांमध्ये काही त्रुटी असतील तर आपण जनरल बोलण्यापेक्षा आपण मला स्पेसिफिक सांगितले तर मला बघता येईल.

सदस्य, श्री.सुनिल सुर्वे :— साहेब पत्र दिले आहे, त्याच्यामध्ये सर्व नमुद केले आहे. मी तुम्हांला पत्र देतो.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— मला तुम्ही पत्र दया, दुसरा मुद्दा म्हणजे बलमेच्या जागी दुसरे अधिकारी दिलेले नाहीत. आपल्याकडे आधीच अधिका—यांची कमतरता आहे. त्यांच्याकडे जरी ऑडीटचे काम असेल, मला जसे गरज पडेल तेव्हा इतरही काही कामे मी त्या त्या अधिका—याकडून करत असतो. बलमेच नाहीत, तर कोणालाही.
सदस्य, श्री.सुनिल सुर्वे :— लेंगरेकर साहेबांना थांबवले असते तर बरे झाले असते.
आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— लेंगरेकर साहेबांच्या जागी दुसरे अधिकारी आले.
सदस्य, श्री.सुनिल सुर्वे:— साहेब जरी रीलीवर आले तरी पण त्यांना थांबवून ठेवले असते तर काही अडचण नव्हती. शिंदे साहेब पण आपलेच होते.
आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— पर्यायी व्यवस्था झाली म्हणून पाठवण्यात आले.
सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:— पर्यायी व्यवस्था असे नाही, आता नगररचनाकार नाहीत, पर्यायी व्यवस्था नाही तरी काहीना काही तुमचे चालू आहे. मागच्या नगररचनाकार यांना आपण बोलवतो.
आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— रीलीव्ह असे पर्यायी व्यवस्था नसतांना केलेच नसते आणि कोणालाच करणार नाही.
सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:— केले होते साहेब, सन २०१७ ला त्यांना रीलीव्ह केले होते, पण एक आणि दोनला ते सुट्टीवर गेले आणि रेकॉर्डला आहे, १ तारखेला ते परत आले, श्रीमान कन्ट्रेक्शनवर त्यांनी स्वाक्षरी केली. त्यांनी सुट्टी टाकली होती, एक आणि दोन तारखेला, १ तारखेला ते उपस्थित होते आणि त्यांनी श्रीमान कन्ट्रेक्शनवर स्वाक्षरी केली.
आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— ती माझी जबाबदारी आहे, मी त्यांना सांगितले की, जरी मी तुम्हांला रीलीव्ह केले असेल तरी अगोदरच्या आयुक्तांनी...
सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:— तेव्हा शिंदे साहेब होते.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> शिंदे साहेबांनी जाता जाता केले असेल. वनस कमिशनर वुइज वर्किंग अँज दि वनरशिप व्हिदाउट रिसपॉसिबिलिटी त्यांच्या ऑर्डर मला करायच्या असतात. महानगरपालिकेचे काम मला करायचे आहे, शिंदे साहेबांना चालवायचे नाही.

<u>सदस्य, श्री.मनोज सयानी:—</u> तुम्हांला चालवायचे आहे, ही गोष्ट नाही, त्या वेळेस ते इथे या खुर्चीवर बसले होते.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> त्यांनी रीलीव्ह केले, परंतु मी दोन दिवसापुर्वी रूजू झालो आहे.

<u>सदस्य, श्री.मनोज सयानी:—</u> आपल्या नंतर यावर आक्षेप नाही, तुम्हांला पुर्ण अधिकार आहे. आपण सांगितले की, बलमे साहेबांना शिंदे साहेबांनी रीलीव्ह केले आहे. ते सुट्टीवर निघून गेले आहेत. ज्या दिवशी ते सुट्टीवर गेले आहेत, ती सुट्टी रेकॉर्डला आहे, त्या वेळेस ते महानगरपालिकेत उपस्थित आहेत आणि श्रीमान कंन्ट्रक्शनच्या कंपनीच्या एका कागदपत्रावर त्यांनी स्वाक्षरी केली आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> ही गोष्ट मी सुर्वे साहेबांनी पण सांगितली होती. सुट्टीच्या दिवशी कार्यालयात येऊन काम करणे ही चुकीची गोष्ट नाही.

<u>सदस्य, श्री.मनोज सयानी:—</u> त्यांनी ते काम दुस—याला करून दयायचे नाही, म्हणून त्यांनी दोन दिवस सुट्टी टाकली. जेव्हा कंठे मॅडम परत आल्या तेव्हा, ते परत आले.

<u>सदस्य, श्री.सुनिल सुर्वे :—</u> माझ्या पत्रामध्ये मी स्पष्ट नमुद केले आहे, साहेब तुम्ही लक्षात घ्या. हे चुकीचे चालले आहे, आमचे मत चुकीच्या गोष्टी बदल आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> माझे स्वत:चे अनुभव बलमे साहेबांच्या विषयी चांगले आहे. भले उल्हानगरच्या निवडणूकीचे काम असेल, मी पनवेलमध्ये निवडणूकीच्या कामासाठी मी ब—याच अधिका—यांना काम दिले होते. जो पर्यत एखादया व्यक्ति विषयी आपण मला व्यवस्थित सांगत नाही, तो पर्यंत मी. कोणालाही ऑन रेकॉर्ड...

<u>सदस्य, श्री.सुनिल सुर्वे:—</u> साहेब मी पत्र दिले आहे. ऑन रेकॉर्ड पत्र दिले आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> मग मी बघतो ना, आता ते जे काही सांगत आहेत, तो मुद्दा मला माहीत नाही.

<u>सदस्य, श्री.मनोज सयानी:—</u> साहेब आपण सांगितले की, पर्याय नाही, मी पर्यायवरच बोललो आहे, माझे व्यक्तिगत बलमे साहेबां बरोबर काहीच नाही, त्यांच्या बरोबर माझे काही घेणे देणे नाही आणि काही काम पण नाही. आपण सांगितले की, पर्याय नाही. ब—याच विभागांमध्ये खरोखर अधिकारी नाहीत, त्यांना आपण रीव्हाईड केले आहे, जसे सेलवन आपण त्यांना बोलत आहे, ठिक आहे, आपल्या जवळ पर्याय नाही, ठिक आहे, परंतु पर्याय आहे, शासनाने फासे अधिकारी म्हणून पर्याय पाठवले आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> फासे हे ज्युनियर ऑफिसर आहेत.

<u>सदस्य, श्री.सुनिल सुर्वे:—</u> साहेब ती पोष्ट आपल्याकडे नाही, तरी पण तुम्ही त्यांना आपल्याकडे ठेवू शकतात.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> पहील्या आयुक्तांच्या ज्या पण ऑर्डर होत्या, ज्या बरोबर होत्या, त्या व्यवस्थित चालण्या लायक होत्या. त्यांच्यामध्ये मी हस्तक्षेप केले नाही. परंतु एक महीन्यामध्ये माझ्या लक्षात आले की, समस्या वाढत आहेत. तेव्हा मी या ऑर्डर बदली केल्या. त्याच्यामध्ये अशी एक ऑर्डर आहे की, त्यामुळे मला त्रास होत आहे. एक माणूस त्या पदावर व्यवस्थित काम करीत आहे, त्यांना सोडून आपण वाट बघत आहे की, दुसरा माणूस येत आहे. आपल्याना माहीत आहे की, शासनाकडून रीलीव्हर येण्यासाठी किती तरी दिवस निघून जातील.

<u>सदस्य, श्री.मनोज सयानी:—</u> रीलीव्हर येण्यासाठी वेळ लागेल, आपल्यांना पसंत आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> पसंत आहे ही गोष्ट नाही, माझ्यासाठी प्रत्येक माणूस माझ्या समोर येणारा बरोबर आहे, जो पर्यंत तो स्वत: सांगत नाही की, मी बरोबर आहे.

<u>सदस्य, श्री.सुनिल सुर्वे:—</u> मी पत्र दिले आहे, पॉईटनुसार चेक करा आणि रीझल्ट दया, त्याची सत्यता तपासा.

<u>सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:—</u> मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब आणि सचिव मॅडम, पॉईंट ऑफ ऑर्डरवर भरपूर चर्चा झाली आहे. सन्माननिय सदस्यांनी सांगितले आहे की, अधिकारी रीलीव्ह झाल्या नंतरही ते सही करीत आहेत, प्रशासनासाठी हा एक गंभीर विषय आहे.

<u>सदस्य, श्री.भगवान भालेराव:—</u> लक्षवेधीवर बोलायला सांगा.

<u>सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:—</u> लक्षवेधीवरच बोलत आहे, परंतु शिवसेनेच्या सदस्यांनी विषय उचलला मला असे वाटते की, आता पण शिवसेना आणि बी.जे.पी. यांची आता पण युती आहे. जसे की शिवसेनेचे कोणी सदस्य जेव्हा आवाज उठवतात तर मला वाटते की, त्यांना समर्थन करा. ही माझी जुनी पध्दत आहे. बदलण्यासाठी वेळ लागेल.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> प्रदिपजी आपण विषयाला धरून बोला.

**<u>सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:—</u>** मा. आयुक्त महोदय, आजची जी लक्षवेधी आहे, त्या बाबतीत मी आपल्याकडे सर्वात जास्त आलो असेल. कारण की आपण एक ऑर्डर काढली होती. सर्व कामे बंद करण्यात यावीत. या विषयावर काल खुप चर्चा झाली होती आणि सर्व सदस्य एका स्वरामध्ये बोलत होते. परंतु आपण इथे हजर नव्हते, त्यामुळे आम्ही ठरवले की आपल्या समोरच या विषयावर चर्चा केली जाईल. कारण की आपण ठोस निर्णय देतील की, मागच्या काही वर्क ऑर्डर देण्याच्या बाकी आहेत. जे टेंडर झालेले आहेत. जैसवार साहेबांनी आम्हांला काल टोटल फिगर सांगितली होती. एकुण ४३६ टेंडर संपुर्ण वर्षामध्ये केले होते आणि ४३६ मधून फक्त ५० वर्क ऑर्डर देण्यात आले आहेत. बाकीचे टेंडर जशाच्या तसेच पडून आहेत. तर यामध्ये माझे निवेदन आहे, मी महापौर मॅडमला सुध्दा निवेदन करतो की, आयुक्त म्हणतात की मला काही आदेश होतील किंवा सभेमध्ये मला कोणी म्हणेल की तर मी करू शकतो. हे आपण काही दिवसापुर्वी सांगितले होते. सर मी माझ्या मनाचे सांगत नाही. सुरूवातीला सांगितले होते आणि मी एकदम इमानदारीने सांगत आहे.

**<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>** मी त्वरीत खुलासा करतो की, मी असे कधीच बोललो नव्हतो मी जे झोपेत बोललो असेल तेच मी इथे सांगेल. असे मी कधीच सांगणार नाही कारण की, हे सर्व विषय फायनासीयलशी रीलेटेड आहते. तर आम्ही तिजोरी बघणार नाही आणि आम्ही धडा धड ऑर्डर देत जाऊ असे मी खरोखर बोललो होतो?

**<u>सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:—</u>** सर असे आहे की, जेव्हा पण आयुक्त साहेब यांची बदली होते, ज्या जुन्या रितीरिवाज असतात, त्यांना तिथेच थांबवत नाही. त्यांना थोडा वेळ देतात. आपण आल्या नंतर २२/९/२०१६ ला जेव्हा रूजू झाले आणि १० व्या महीन्यामध्ये आपण ५ ते १० ऑर्डर काढल्या माझे असे म्हणणे आहे की, जे जुने आयुक्त होते, त्यांनी ज्या ऑर्डरवर सहया केल्या होत्या, एस्टीमेंटवर सहया केल्या होत्या आणि त्या आधारावर जे टेंडर निघाले होते. या विषयावर किती तरी चर्चा झालेली आहे आणि आपण सकारात्मक निर्णय दिले नाही. त्यामुळे मी महासभेसमोर आपल्याला विनंती करतो की, जेवढया वर्क ऑर्डर आहेत, जेवढे टेंडर झालेले आहेत, त्यांचे त्वरीत ऑर्डर देण्यात यावी. काही लोकांनी काही दिवसा पुर्वी अनामत रक्कम भरली आहे. याच्यावर आपल्याला निर्णय घेयचा आहे. एक सिस्टीम होती की, टेंडर होत होते आणि स्विकृतीपत्र दिले जात होते आणि काही विभागांमध्ये बाकीची फॉर्मालिटी होत होती. तो पर्यंत ठेकेदार काम सुरू करीत होते. अशी पण परिस्थिती आपल्याला सांगितली. कारण की, स्विकृतीपत्र म्हणजे वर्क ऑर्डर आहे आणि मी महापौरांना विनंती करतो, आयुक्त साहेबांना विनंती करतो आणि सभागृहाला सुध्दा विनंती करतो की, जेवढे पण टेंडर झाले आहेत, त्यांच्या वर्क ऑर्डर देण्याच्या बाकी आहेत. त्या वर्क ऑर्डर त्वरीत देण्यात याव्यात अशी महासभे समोर माझी विनंती आहे. कृपया या विषयावर त्वरीत लक्ष देण्यात यावे. महापौर मॅडम, मी आपल्या आदेशाची अपेक्षा करतो.

**<u>सदस्य, श्री.सुनिल सुर्वे:—</u>** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, सचिव मॅडम, प्रदिप रामचंदानी यांनी जे निवेदन महासभेपुढे मांडले आहेत. त्या एकदम सविस्तर मांडल्या आहेत. कारण की आम्ही तुम्हांला असे पण म्हणू शकत नाही की, आमचा मागचा निधी संपुर्ण दया. जे काही टेंडर झाले आहेत, त्या अनुषंगाने कामेही झाली आहेत. त्याच्यामध्ये मॅन्युअल टेंडर आहेत आणि ई—टेंडर आहेत आणि आम्ही लोकांना आर्वजून सांगितले आहे की, हे काम पास झाले आहे, ते काम होईल. काम पास झाले आहे, टेंडर पुर्ण झाले आहे आणि आम्ही ठेकेदारांकडून विनंती करून घेतले आहेत. मला वाटते की या उल्हासनगरच्या नागरीकांच्या वर अन्याय होईल. जी कामे प्रस्तावीत केली आहेत, काही कामांना आपण मंजूरी देवून वर्क ऑर्डर पण दिल्या. त्या नंतर तुमच्या आदेशा नंतरही काही ५० एक कामांना तुम्ही वर्क ऑर्डर दिल्या आहेत. त्या कामांची यादी आणि इतर कामांची यादी याच्यामध्ये काय फरक आहे, त्या एकदम महत्वाच्या वाटल्या म्हणून तुम्ही देवून टाकल्या. आमच्याकडच्या ज्या काही राहील्या, मी दुदैवाने सांगतो की, माझ्या लाईफमध्ये स्थायी समिती, सभापती पद मिळाल्या नंतर माझे स्वत:चे निधीमधला वार्डामध्ये एकही काम तुम्ही केलेले नाहीत. मला बोलायला अत्यंत वाईट वाटते. मला वाटते या महापालिकेला आपण आय.एस.आय. आयुक्त म्हणून आम्हांला पहीले अधिकारी मिळाले आहेत आणि ते आमची व्यवस्थित कामे करतील. म्हणून ते झालेले टेंडर असतील आमची तुम्हांला विनंती एवढीच आहे की,जे झालेले टेंडर आहेत, आम्ही मागच्या संपुर्ण निधी बद्दल बोलत नाही. ज्या प्रोसेस झाल्या आहेत, काही कामे झाली आहेत. काही कामे होणार आहेत, ई—टेंडरच्या माध्यमातून असतील किंवा मॅन्युअल टेंडरच्या माध्यमातून झालेले असतील, प्रत्येक विभागामधल्या फक्त सार्वजनिक बांधकाम विभाग नाही, पाणी पुरवठा विभागातल्या पण, तरी कृपया आपण त्यांचे आदेश दयावेत. जे झालेले आहेत आणि नविन जे असतील ते आपण लवकरात लवकर करावे ही विनंती, मा. महापौरजी प्लीज.

**<u>सदस्य, सतरामदास जेसवानी:—</u>** मा. महापौर मॅडम, या विषयावर आपण आदेश देणार असतील तर सर्वांना आनंद होईल जी कामे थांबली आहेत. ती लवकरात लवकर करण्यात यावी. शहरातील लोक आपल्या आदेशाची वाट बघत आहेत की, आपण आदेश कधी देणार आहेत आणि या आदेशाची अंमलबजावणी आयुक्त साहेब कधी करणार आहेत. कारण आमच्या जवळपास असलेली जी अंबरनाथ नगरपालिका आहे,

तिथे सिंमेटचे खुप चांगले रोड बनत आहेत. तेव्हा लोक बोलतात की, नगरपालिकेमध्ये सिंमेटचे बनतात, मोठमोठे पुल बनत आहेत. तर आपल्या महानगरपालिकेमध्ये महासभेमध्ये नगरसेवक काय करतात? असे प्रश्न करतात. या बाबतीत नगरसेवक कामे होण्यासाठी बोलत का नाही? तरी कृपया करून नगरसेवकांना नाहक शिव्या मिळतात हे लक्षात घेऊन जी कामे बंद आहेत, जो नगरसेवक निधी आहे, तो थांबवला आहे. आता जो आपले स्थायी समिती बजेट आहे, आज त्याला मान्यता देणार आहे, ते कशासाठी मान्यता देणार. आम्ही लोकांनी काय करायचे, जो पहीला बजेट पास केला होता. त्यामधून आम्हांला फंड मिळाला नाही. महापौरांचे जे हक्क होते तो सुध्दा त्यांना मिळाला नाही, उप महापौरांचे हे हक्क होते, तो त्यांना मिळाला नाही आणि नगरसेवकांचे जे हक्क होते, ते त्यांना मिळाले नाही. तर स्थायी समितीने जो बजेट बनवला आहे, त्याला आम्ही मान्यता जर दिली तर लोक आमच्यावर विश्वास कसे करणार. एक सी.ओ. असतात ते जर वसुली करू शकतात, शहर सुधारू शकतात तर आए.ए.एस. अधिकारी आमचे साहेब शहर सुधारण्यासाठी त्यांच्या मनामध्ये पण आहे, परंतु सुधारणा करण्यासाठी निर्णय का होत नाही? तरी कृपया आपल्यांना आणि आयुक्त साहेबांना हात जोडून विनंती आहे की, नगरसेवकांना शिव्या ऐकायला लावू नका लोक बोलत असतात की, आमच्यासाठी काही तरी करा, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:—</u> मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, आजचा हा विषय प्रदिप रामचंदानी यांनी सभागृहामध्ये प्रस्तुत केला आहे. मा. आयुक्त साहेब या विषयावर मी आपल्याला काही सांगू इच्छितो की, सन २०१२ ते २०१७ हा जो महापालिकेचा कार्यकाळ होता, या कार्यकाळामध्ये जो वार्षिक बजेट सन २०१५—२०१६ आणि २०१६ — २०१७ दोन वर्षाचा जो वार्षिक बजेट होता. या मध्ये सन २०१५—२०१६ मध्ये तत्कालीन आयुक्त, श्री. मनोहर हिरे साहेबांनी सभागृहाच्या काही वरीष्ठ सदस्यांना निवेदन केले होते की, फंड नसल्यामुळे आपण लोक एक वर्षाचा जो बजेट आहे, सन २०१६—२०१६ चा नगरसेवक निधी महापौर निधी आणि अन्य जे निधी आहेत, प्रभाग समिती निधी ते घेऊ नका तर सन २०१६—२०१७ ची आपली जी निवडणूक आहे, त्यासाठी सन २०१६—२०१७ चा जो निधी आहे, तो संपुर्ण तुम्हांला देऊ आणि निवडणूकीची वेळ असेल आणि तुम्हांला वार्डामध्ये काम करणे योग्य राहील. सभागृहाच्या सर्व गट नेत्यांनी, वरीष्ठ नेत्यांनी सन २०१५—२०१६ चे बजेट मध्ये जो निधी होता, त्या मधून १ रूपयाचा सुध्दा निधी नगरसेवकांना मिळाला नाही. सन २०१५—२०१६ मध्ये काहीच मिळाले नाही. त्यामुळे वार्डा मधील कामे तशीच राहीली. सगळयांना विश्वास होता की, सन २०१७ मध्ये निवडणूका आहेत, त्यावेळी २०१६ मध्ये इस्टीमेंट बनवतील, आणि कामे होतील आणि सन फेब्रुवारी, २०१७ मध्ये निवडणूका होतील. परंतु ऑगस्ट, सप्टेंबरमध्ये इस्टिमेंट बनवायला सुरूवात झाली, टेंडर झाले आणि सन २०१६ ऑगस्ट किंवा सप्टेंबरमध्ये आपण निवडणूकीच्या पहीले चार्ज घेतला आणि जे टेंडर झाले होते, ज्यांचे वर्क ऑर्डर देणे बाकी होते, कारण टेंडरची प्रक्रिया पुर्ण व्हायला वेळ लागला होता आणि काही ठेकेदारांनी नगरसेवकांच्या वार्डामध्ये काम करणे सुरू केले होते. निवडणूकीची वेळ होती आणि दोन वर्ष काम झाले नव्हते. तर अशा प्रकारे कामे सुरू झाली होती. परंतु टेंडरची प्रक्रिया सुरू झाली होती, जेव्हा टेंडरची प्रक्रिया सुरू होते. तेव्हा टेंडर पुर्ण होण्याच्या आधी काही कामे सुरू होतात. त्या वेळी आपण इथे आल्यावर सर्व कामे थांबविण्यात आली आणि टेंडरच्या वर्क ऑर्डर झाल्या नाहीत. तेव्हा पासून आम्ही लोक निवडणूकीमध्ये व्यस्त झालो होतो आणि आपल्यांना पण काही वेळेस सांगितले होते की, साहेब ही कामे करणे अतिआवश्यक आहेत. अशा प्रकारे निवडणूका जवळ आल्या नंतर आचारसंहिता लागली आणि सर्व कामे थांबली. आम्हांला आशा होती की, जशी निवडणूक संपेल आणि आणि ज्या वर्क ऑर्डर थांबल्या आहेत त्या आपण आम्हांला दयाल आणि उल्हासनगर शहरामध्ये दोन वर्षापासून जे छोटे छोटे काम जे सर्व नगरसेवकांनी प्रभाग समिती निधीतून, नगरसेवक निधीतून, महापौर निधीतून आणि स्थायी समिती सभापती निधीतून आम्ही ठेकेदारांना करण्यासाठी बोललो होतो, आश्वासन दिले होते की आपल्यांना या कामांची वर्क ऑर्डर मिळेल कारण की, टेंडर झालेला आहे आणि अनामत रक्कम सुध्दा भरलेली आहे. परंतु वर्क ऑर्डर न मिळाल्यामुळे त्यांना गभींर परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. त्यासाठी मा. आयुक्त साहेब, मागच्या अडीच वर्षापासून कमीत कमी २५, २५ करोडचा बजेट जो नगरसेवक निधी, महापौर निधी, उप महापौर निधी, प्रभाग समिती निधी आणि स्थायी समिती, सभापती निधी आम्ही लोकांनी घेतला नाही आणि आपण आजच या महासभेमध्ये आमचा सन २०७—२०१८ चा वार्षिक बजेट सादर करणार आहेत. ठेकेदारांना आणि आम्हांला नगरसेवकांना भिती वाटते की, दोन वर्षामध्ये आम्ही जी तरतुद केली होती. त्यावेळी नगरसेवक निधी मिळाला नाही आणि प्रभाग समिती निधी मिळाला नाही. तर सन २०१७—२०१८ चा जो बजेट आहे, मधून काही कामे करण्यासाठी मिळेल. त्यासाठी मी आपल्यांना विनंती करतो की, जी कामे दोन वर्षा पासून निवडणूकीच्या पहीले आम्ही आगस्ट, सप्टेंबरमध्ये ठेकेदारांकडून करून घेतली आहेत, ज्याचे टेंडर पण झाले आहेत आणि अनामत रक्कम सुध्दा भरलेली आहे. परंतु फक्त वर्क ऑर्डर न मिळाल्यामुळे कामे थांबली आहेत. आपण लवकरात लवकर वर्क ऑर्डर देण्यात यावी आणि ज्या ठेकेदारांनी कुठून तरी पैसे जमा करून शहरामध्ये वार्डातील समस्या सोडवण्यासाठी खर्च केले आहेत, त्या गरीब ठेकेदारांना त्यांचे पेमेंट मिळायला पाहीजेत. जी कामे झाली

आहेत, त्यांचे वर्क ऑर्डर आणि जी कामे थांबली आहेत, जे टेंडर झालेले आहेत, अशा प्रकारची सर्व कामे झाली पाहीजेत. मा. महापौर मॅडम, मी आपल्यांना निवेदन करतो की, आपण मा. आयुक्तांना सांगा की, जी कामे थांबली आहेत, त्यांना त्वरीत वर्क ऑर्डर देण्यात यावे, धन्यवाद.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— सन्माननिय आयुक्तजी, सन्माननिय सदस्य, आयुक्तजी आपल्याकडून खुप आशा आहेत.....

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— मा. महापौर मॅडम,

सदस्य, श्री.भगवान भालेराव:— मा. आयुक्त साहेब, आमचे बेंच वाजले पाहीजेत अशी काही तरी घोषणा करा.

आयुक्त, श्री.राजेंद्र निंबाळकर:— काही वर्षा पुर्वी एक हिन्दी चित्रपट आला होता, “आमदनी अठानी खर्चा रूपया”

सदस्य, श्री.मनोज सयानी:— हा चित्रपट खुप चालला होता, सर.

आयुक्त, श्री.राजेंद्र निंबाळकर:— चित्रपट खुप चालला होता, त्यामधून काही तरी शिकायला पण पाहीजे आणि आपली महानगरपालिका त्याच परिस्थितीत उभी आहे. तेव्हा याच्या पासून सगळयांनी चांगले शिकायला पाहीजे. माझे काही जास्त भाषण किंवा माझे ज्ञान आपल्याला सांगायचे नाही. परंतु मी आर्वजून सांगतो की, आजच्या स्थितीत महापालिकेची स्थिती खरोखर दोलायममान आहे. प्रशासनाने प्लॅन केले आहे की, प्रॉपर्टी टॅक्स आणि इतर वसुली आहे ती आपल्या डेव्हलेपमेंट चार्जच्या माध्यमातून येणारा पैसा आहे. त्यासाठी आम्ही संपुर्ण तयारी केली आहे. परंतु आजच्या वेळेला कोणतेही काम मुलभूत सुविधा देण्याशिवाय आणि त्याच्या नंतरची जी कामे आहेत, ती करण्याच्या परिस्थितीत नाहीत. जी ४०० कामे आहेत, ते मी आल्यानंतर थांबवली आहेत, त्या ४०० कामांसाठी कमीत कमी १०० करोड रूपये खर्च आहे, संपुर्ण ४०० कामे जे मी बोलत आहे, त्यांचे टेंडर, इस्टिमेट झालेले आहेत, फक्त वर्क ऑर्डर देणे बाकी आहे. १०० करोड आहे हे मला माहीत आहे, डिटेल्स आपणाला देऊ शकतो. हया वर्क ऑर्डर देण्यासाठी आमची मागणी १०० करोड आहे. आजच्या वेळेला ठेकेदार रोज मला येऊन भेटतात की, मागच्या पाच वर्षा पासून ज्यांनी काम केले आहे, त्यांचे वेगळे २०० करोड किंवा जास्त थकबाकी ठेकेदारांना बील देण्याचे बाकी आहे. या सगळया परिस्थितीत जर आपण काम थांबवून फॉर्मुल्या शिवाय किंवा रेगुलेशन शिवाय आपण विचार न करता टेंडर केले आहेत, आपण बोलत अहात की वर्क ऑर्डर दया, आपल्यांना वाटते की, ठेकेदारांना वर्क ऑर्डर देण्या बरोबरच त्यांना पेमेंट पण देण्यासाठी त्यांना आश्वासन देऊ शकतो की नाही. ही पण गोष्ट विचार करण्यासारखी आहे. ठेकेदार पण माणूसच आहे, तो आपल्या दबावामध्ये येऊन लोकांसाठी कामे करतील, बरेच ठेकेदार मागच्या पाच वर्षा पासून इथे फे—या मारत आहेत. त्यांना अजून उशिरा पेमेंट देण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत नाही. या विषयी पण आपण विचार करायला पाहीजे. जेव्हा आपल्याला टॅक्सची वसुली येईल. आज जर आपण परिस्थिती बघितली तर प्रत्येक महीन्याचा कमिटेड जो कमीत कमी खर्च आपल्याला करायला पाहीजे. तो ३२, ३५ करोड आहे आणि जो आपल्याला आमदानी ग्रॅडच्या माध्यमातून येतो, तो १५ ते २० करोडच्या वरती नाही. आपल्याला कमीत कमी जो खर्च करायचा आहे, तो प्रॉपर्टी करातून १५ करोड मिळाला पाहीजे. आपल्याला मागच्या साडेतीन, चार महीन्यामध्ये फक्त १८ करोड मिळाला आहे. म्हणजे प्रत्येक महीन्यामध्ये आपल्याला चार करोड पण मिळाले नाही, तो १५ करोड यायला पाहीजे. १० करोडचा करंट बजेटचा डेपीसिट तीन महीन्याचा या वर्षासाठी केला आहे. मागचे ४०० कामांसाठी १०० करोड आणि मागच्या पाच वर्षा पासून ठेकेदारांचे जी कामे झाली आहेत, आपले नशीब आहे की, ते कोर्टात गेले नाहीत. नाही तर आपल्याला कोर्टाला उत्तर दयावे लागले असते, तुम्ही वर्क ऑर्डर दिल्या आहेत, ॲग्रीमेंटवर सहया केल्या आहेत, कामे पुर्ण करून घेतली आहेत आणि त्यांना पैसे देण्या न देता आपण अजून नविन कामे चालू करीत आहेत, याचा अर्थ “आमदनी अठानी खर्चा रूपया” याचा पण आपण विचार करीत अहात की नाही. त्याचा विचार कोण करणार, याचे उत्तर मला आपल्या सगळयांकडून पाहीजे.

सदस्य, श्री.मनोज सयानी:— मा. आयुक्त साहेब आपण सांगितले की, एक चित्रपट चालला होता “आमदनी अठानी खर्चा रूपया” परंतु अजून एक चित्रपट आला होता, “प्यार का वादा, आधा आधा” तर मी तुम्हांला आपण स्वत:च निवडणूकीच्या पहीले बोलले होते की, अर्धा अर्धा मी करायला तयार आहे. परंतु आजची परिस्थिती मला मान्य आहे. आज आपले जे उत्पन्न आहे, ते खुपच कमी आहे आणि जो आहे ते खुप कमी आहे आणि तेथून पण संपुर्ण वसुली येत नाही. परंतु आपण टॅक्स वसुली बाबत बोलत आहेत, ज्या मुलभुत सुविधा आहेत, त्यामध्ये पाणी, साफसफाई, लाईट, रोड, गल्ली बोळ या पहीले दिल्या पाहीजेत.

आयुक्त, श्री.राजेंद्र निंबाळकर:— ती कामे ३५ करोडमध्ये येतात.

सदस्य, श्री.मनोज सयानी:— त्या पण आवश्यक आहेत, ती पण कामे होत नाहीत. जर आपण बोलत आहेत की, ठेकेदारांनी कामे केली आहेत, त्यांच्या पेमेंटचा पण विचार केला पाहीजे. आमची या लक्षवेधीच्या माध्यमातून संपुर्ण सभागृहाची हीच मागणी आहे. आपण काल नव्हते या सभागृहामध्ये दिड तास चर्चा झाली. ज्या वर्क ऑर्डर दिल्या आहेत, त्या बाबतीत आपणाला जी माहीती आहे, ती माहीती कमी आहे. मी तुम्हांला

माहीती देतो की ज्या वर्क ऑर्डर दिल्या आहेत त्यांची ७० टक्के कामे झाली आहेत. त्यांचे पेमेंट जास्त नाही १० ते १५ करोड असतील. आपण जे १०० करोड बोलत आहेत, ती कामे आम्ही सुरू केली होती. ते ४०० करोड असतील. वर्क ऑर्डरवर जी कामे आहेत, ती कामे पुर्ण झाली आहेत, स्विकृतीपत्र वर्क ऑर्डरच असते. ज्यांना स्विकृतीपत्र दिले आहेत, ते जर उद्या कोर्टात गेले तर आपल्यावर खटला चालू शकतो. जी कामे स्किृतीपत्र दिल्या नंतर चालू केली आहेत, त्यांना लवकरात लवकर मान्यता मिळाली पाहीजे. हेच ठेकेदार ज्यांनी कामे केली आहेत आणि पुढे त्यांच्याकडून कामे करून घ्यायची आहेत, मुलभुत सुविधांबाबत आहेत ती त्यांनी करावी आणि बाहेरचे ठेकेदार आपण आयात करू शकत नाही. आपल्या शहरामध्ये बाहेरचे अधिकारी यायला बघत नाहीत, तसेच बाहेरचे ठेकेदार सुध्दा यायला बघत नाहीत. आपण मिळूनमिसळून याच ठेकेदारांडून किंवा बाजुच्या ठेकेदारांकडून कामे करून घ्यायला पाहीजेत. त्यांना आपण काहीना काही कामांची वर्क ऑर्डर दयायला पाहीजेत तेव्हाच ते येतील आणि काम करतील. तर आपल्याना सभागृहाच्या माध्यमातून निवेदन आहे की, १० ते १२ करोडची जी लिस्ट आहे. जी सभागृह नेता यांनी आपल्याकडे प्रस्तुत केली आहे. तीच्यावर आपण लक्ष दिले तर ही गाडी पुढे जायला लागेल. आज गाडी थांबली आहे, आपण बोलत आहेत की, टॅक्स वसुली करा, परंतु दिड वर्षा पासून कुठलाच विकास झाला नाही. आपण सप्टेंबर महीन्यामध्ये नविन आले, निवडणूका चालू झाल्या तेव्हा आम्ही निवडणूकांमध्ये व्यस्त होतो, त्या वेळेस तुम्ही आम्हांला फंड दिला नाही. आम्ही तो फंड राखून ठेवला होता आणि कोणीही राजकारणी फंड राखून ठेवतात की निवडणूकीच्या वेळी करू. निवडणूकीच्या वेळी आम्ही लोक ठण ठण गोपाळ झाले, त्यामुळे बरीच लोक मागच्या वेळेस ८६ शिटे होती, त्यामधून फक्त ३२ लोक निवडून आले. आर्धे लोक निवडून आले नाहीत, त्याचे कारण आहे की, फंड मिळाला नाही.

<u>आयुक्त, श्री.राजेंद्र निंबाळकरः—</u> मी सभागहाचे अभारी आहे की, जे लोक निवडून आले नाहीत, त्यांना इंथे आतमध्ये बसण्याची परवानगी नाही. आपण तर सगळे निवडून तर आले आहेत.

<u>सदस्य, श्री.मनोज सयानीः—</u> आता जी नविन बॉडी निवडून आली आहे, त्यांच्या सोबत आपण सकारात्मक रहावे आणि जी १० ते १२ करोडची कामे आहेत, त्याबाबती आपण सकारात्मक रहावे, धन्यवाद.

<u>आयुक्त, श्री.राजेंद्र निंबाळकरः—</u> जी कामे १० ते १५ करोडची आहेत, ती बघावे लागतील, ती कामे किती अर्जेट आहेत आणि खरोखर किती कामे झाली आहेत. त्याची माहीती मला मिळतच असते.

<u>सदस्य, श्री.मनोज सयानीः—</u> खरे तर कामे झाली आहेत की नाही, किती झाली आहेत ते पहीलेच बघायला पाहीजे होते. जी झाली आहेत, राजनैतिक लोकांनी जेव्हा दबाव टाकला तेव्हा अधिका—यांनी कामे करून घेतली.

<u>सदस्य, श्री.सुनिल सुर्वेः—</u> सर एकच मिनिट ऐकुन घ्या, तुम्ही वारंवार सांगतात की परिस्थिती खराब आहे. आपण बजेट बनवतो त्याच्यामध्ये सर्व कर्मचा—यांचा पगार, गाडी भत्ते, अजून त्यांचे काही भत्ते असतील ते आपण घेतो. आता परिस्थिती खराब आहे, त्याच्यात कुठे आपण कपात करतो का? आपण केली आहे का? ज्या विभागांमधून उत्पन्न आहे, विभागांमधून आपल्याला उत्पन्न यायचे आहे. त्या विभागांवर तुमचे लक्ष नाही. टॅक्सच्या बाबतीत आपण थोडा फार लक्ष दिल्या नंतर फरक पडला आहे. स्थानिक संस्था कराची वसुली बाकी आहे. स्थानिक संस्था करामध्ये पाच, सहा माणसे नेमलेली आहेत. कोण नेमलेली आहेत, माहीती नाही, त्यांनी काय कामे केलीत, त्यांचा पगार काय आणि त्यांनी वसुली काय केली. स्थानिक संस्था कर असे माध्यम आहे की, मी कालच तुम्हांला जाहिरातीच्या ठेक्या बदल म्हणटले, वर्षा न वर्ष तो ठेका निघत नाही. जिथून उत्पन्न येणार आहे, तिकडे लक्षच नाही. आपण फक्त परिस्थिती खराब आहे. त्या शहरातल्या नागरीकांच्या जीवावर आम्ही अधिकारी आणि नगरसेवक म्हणून काम करतो. नगरसेवक म्हणून निवडून येतो, त्यांच्या मुलभुत अधिकारांवर गदा आली. फक्त आमचे पगार एवढेच महत्वाचे आहे का?

<u>आयुक्त, श्री.राजेंद्र निंबाळकरः—</u> आपले निरीक्षण मी सन्मान करेल, परंतु ते बरोबर आहे, असे म्हणणार नाही. आपले महत्वाचे उत्पन्नाचे साधन प्रॉपर्टी टॅक्स आहे. ज्याच्यामध्ये बिल बजावण्या पासून जे काम आहे, तिथून आपण सुरूवात केलेली आहे. तर कृपया चुकीचे विधान करू नये की, याच्यामध्ये माझे लक्ष नाही, प्रशासनाचे लक्ष नाही किंवा आम्ही काम करत नाही.

<u>सदस्य, श्री.सुनिल सुर्वेः—</u> साहेब, मी तुमच्या बदल चुकीचे विधान नाही केले, ज्या क्षमतेने आपले वर्कर काम करीत आहेत, त्या क्षमतेमध्ये काही प्रॉब्लेम आला नाही पाहीजे.

<u>आयुक्त, श्री.राजेंद्र निंबाळकरः—</u> याच्यामध्ये जी पावले उचलायला पाहीजेत, जी लोक काम नाही करत, मागच्या महीन्यात मी त्यांचे पगार रोखून ठेवले होते. एक परत त्यांना संधी दिली आणि आता परत या महीन्यामध्ये मी त्यांचा आढावा घेणार आहे आणि त्या नंतर त्यामध्ये परत ज्यांचे काम कमी आहे, त्यांच्यावर सक्तीचे उपाय त्याच्यामध्ये ऐक्शन घ्यायची आहे आणि आम्ही शंबर टक्के घेत अहोत. त्यामुळे याच्यामध्ये कुठेही प्रशासन अजीबात शिथील नाही आहे, उलट वसुलीच्या बाबतीत आम्ही खुप जागरूक आहे आणि त्याच्यामध्ये सगळे लोक खुप तळमळीने काम करीत आहेत. त्यामुळे या सगळया गोष्टी आपण विचारात घ्यायला पाहीजेत. आपण जे मुद्दे सांगितले आहेत, त्याच्यामध्ये समजा १५ कोटीचें कामे असतील परंतु ते

सुध्दा फंड उपलब्ध झाल्यावर आपण पहीले ज्यांनी वर्क ऑर्डर घेऊन काम केले आहे, त्यांना आपण प्राधान्य दिले पाहीजे. हा मॅसेज दिला गेला पाहीजे की काही पण रिलेबिटी करा, भले कोणाच्या दाबावामध्ये येऊन किंवा परिस्थितीमध्ये अर्जिसिटी परंतु प्रोसेसर इज प्रोसेसर देअर इज ५ (२) (२) प्रोव्हीजन अर्जेन्सी बट टील कोणी वरली बोलतात किंवा आयुक्त बोलतात काम करतात आणि नंतर कामाचे टेंडर बनतात दिज कांईड ऑफ मॅसेज आपण ठेकेदाराला किंवा सर्वसामान्य नागरीकांना दयायला नाही पाहीजे. जर आपण मागच्या तारखेमध्ये वर्क ऑर्डर देत असतील तर मला वाटते की ते चुकीचे आहे.

सदस्य, श्री.सतरामदास जेसवानी:— जो पर्यंत परिस्थिती सुधरत नाही, तो पर्यंत महासभा झाली नाही पाहीजे. कृपया आपण खुलासा करा की, नगरसेवक घरीच बसले पाहीजेत. एक वेळा आपण घोषणा करा की, आपली परिस्थिती खराब आहे. नगरसेवकांना आपण त्रास देवू नका, कृपया करून एक आदेश पत्रकारांना दया ते वृत्तपत्रामध्ये छापतील.

सदस्या, श्रीम.ज्योत्सना जाधव:— मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, मी मघासपासून सचिव मॅडमला पण सांगते की, अशासकिय प्रस्ताव मांडायचा आहे पण त्या काही बोलतच नाहीत. तर मला तो अशासकिय प्रस्ताव आता मांडायचे आहे.

महापालिका सचिव:— आधीचे विषय पुर्ण झाले पाहीजेत मॅडम, ते झाले की नियमित तुमचा प्रस्ताव येईल त्या शिवाय बोलता येणार नाही.

सदस्या, श्रीम.ज्योत्सना जाधव:— तुमची काही प्रतिक्रियाच चेह—यावर दिसत नाही.

महापालिका सचिव:— मी पहीलेच सांगितले आहे.

सदस्य, श्री.धनंजय बोडारे:— आयुक्त साहेब संपुर्ण सभागृहाची भावना आपण ऐकलेली आहे. तुम्ही आणि आम्ही पब्लिक बॉडीमध्ये आहे आणि कुठल्या को ऑपरेटीव्ह बॅंकेमध्ये नाही. त्यामुळे बॅलनशिट बरोबर आमचे तारतम्य झाले पाहीजे. डेफिसिएट बजेट किंवा प्राफीट आणि बजेट हे महाराष्ट्र शासनामध्ये चालते, केंद्रशासनामध्ये प्रत्येक ठिकाणी चालते. आज आपल्याकडे आलेला पैसा तो खर्च केला पाहीजे असे काही नाही आणि काही ठिकाणी जसे इमरजन्शी आल्या नंतर तुम्ही शब्द टाकल्या नंतर तुम्हांला सुध्दा करायचे आहे. मागच्या वर्षी इमरजेन्शी अशीच आली की, गणपती उत्सव साजरा करायचा आहे. परंपरा आहे, हा तुमचा आणि आमचा सण आहे. कल्याणच्या डि.सी.पी.यांनी किंवा कल्याणच्या महापालिका आयुक्तांनी तिकडे निर्णय घेतला की, उल्हासनगरचे गणपती इकडे विसर्जन करता येणार नाही. तत्कालीन आयुक्त हिरे साहेब आणि डि.सी.पी. इथे बसले आणि आता करायचे काय? गणपती उत्सव चार दिवसामध्ये येत आहे आणि आपल्याकडे गणेशघाट नाही. त्यांनी तात्काळ कोण करू शकतो त्याची चर्चा झाली आणि मग केशू रामचंदाणी यांना बोलवले आणि तिथे गणेशघाट बनवले. म्हणजे अशा परिस्थितीमध्ये काही ठिकाणी कामे करावी लागतात. मी पहीलेच सांगितले आहे, ही आपली पब्लिक बॉडी आहे. तिथे तुम्ही आणि आम्ही बरोबर चालले पाहीजे. आम्ही हेकेखोरपणाने चालले नाही पाहीजे आणि तुम्ही प्रशासनाने सुध्दा हेकेखोरपणाने चालले नाही पाहीजे. त्यामुळे एकमेकांच्या भावना समजून घेतल्या पाहीजेत. फक्त तिथे अधिका—यांनी केले तर ते बरोबर आणि नगरसेवकांनी केले ते चुकीचे असे होता कामा नये. सन २०१५—२०१६ मध्ये एकही पैसा नगरसेवक निधीमध्ये गेला नाही, प्रभाग समिती निधीमध्ये गेला नाही, सन २०१६—२०१७ मध्ये सुध्दा तसेच झाले. म्हणजे आमच्या सुर्वे साहेबांनी सांगितले की संपुर्ण पैसा फक्त प्रशासनाकडेच का? ही महासभा, आय. ए.एस चांगल्या दर्जाचे अधिकारी इथे यायचे त्यांनी फक्त पगार काढण्या पुरतेच उत्पन्न काढायचे असे काही आहे का? म्हणजे लोकांची कामेच होणार नाहीत तर महापालिकेचा उपयोग काय? कालच्या मिटींगमध्ये सांगितले पाणी आम्ही व्यवस्थित देत नाही, पाण्याची बोंब आहे. पाऊस चांगला पडला आहे, म्हणून ठिक आहे. साफसफाई नाही, तुम्ही ऐकत आहात, टॅंकर बंद झाले तुम्ही सांगितले ते आम्ही मान्य केले ठिक आहे, पण ज्या विभागामध्ये पाणी जात नाही, तुम्हांला सांगितले मग प्रायव्हेट टॅंकर मागवतात. सार्वजनिक बांधकाम विभागाची बोंब तुम्ही बघितली आहे. नगररचनाकार इथे नाही, म्हणजे लोकांना आम्ही देत काय आहे. म्हणजे फक्त कर्मचा—यांनी आणि अधिका—यांनी यायचे आणि पगार काढायचा आणि जायचे, मग खतगांवकर साहेब आले, हिरे साहेब आले त्यांनीही असेच सांगितले. जसे आता मनोज लासी यांनी सांगितले, हिरे साहेबांनी सांगितले की पुढच्या वर्षी निवडणूकी नंतर आम्ही तुम्हांला पुर्ण निधी देवू. हिरे साहेब निघून गले त्यांचा शब्द तसाच राहीला. आता तुम्ही आले, तुम्ही सांगितले ५० टक्के आम्ही देवू. कमीत कमी निवडणूकीच्या काळामध्ये हे करावेच लागतात. तर तुम्ही प्रत्येक्ष पाहणी करून आमचेही ऐकू नका, पण असेही नको की, लोकप्रतिनिधीना वाटायला नको की, प्रशासन हेकेखोर करतात. परंतु शेवटी तुमचे आम्हांला सहकार्य आणि आम्हांला आमचे सहकार्य हे चालणार नाही. त्यासाठी एक मध्यम मार्ग काढून जे जे कामे आवश्यक होते, ते आपल्या टीमला सोबत घेऊन ती कशी कार्यान्वयीत करता येतील ती आपण करा. जेष्ठ पुरस्वांनी यांनी दिलेली लिस्ट ती खरीच असेल किंवा काय हे माहीत नाही. तर माझ्याकडे पण माहीती आलेली आहे, आपण सुध्दा टोटल कामे त्यामध्ये ३१४ एक प्रकारामध्ये त्यामध्ये ७, ६.७० करोड रूपये, त्या नंतर दुसरी ६७ टेंडर आहेत, त्याच्यामध्ये ४.११ करोड रूपये आणि दुसरे काही तरी ५६ टेंडर आहेत, त्यामध्ये १.१७

करोड त्या पैकी आपण बरीचशी कामे दिलेली सुध्दा आहेत. आता ही प्रायोटीटी आपण ठरवलेली आहे. कदाचित गटनेत्यांना बसवून ती प्रायोटीटी ठरवा, कारण की तुम्ही आणि आम्ही एकत्रित चाललो पाहीजे. तुम्ही प्रायोटीटी ठरवली आहे, तशी इतर लोकांना विचारा की प्रायोटीटी काय आहे? आणि त्यातला एक मार्ग काढा. नाही तर मग पुढचा बजेट होणार नाही. मागचा बजेट ३१४ कोटींचा आहे आणि पुढचा बजेट प्रशासन ५७० कोटी ठरवत आहे, हे कुठल्या आधारीत आहे. मग एवढे प्रायोटीटी होते मग ही कामे थांबवली कशाला. म्हणजे प्रशासन आता खोटे बोलत आहे, नाही तर प्रशासन पुर्वी खोटे बोलते. जर पुर्वीचे उत्पन्न ३१४ कोटीच आहे, तर आताचे ५७० आहे, मी उदाहरण देतो नविनमध्ये म्हणजे प्राजेक्टेड असेल. पुर्वीच्या प्रशासनाने जे बजेट दिले होते. जसे आता सुर्वेनी सांगितले की स्थानिक संस्था कर बालाजी खतगांवकर होते, तेव्हा त्यांनी सांगितले म्हणजे अधिकारी बोलले ते बरोबर, त्यांनी सांगितले होते. टॅक्सची वसुली बरोबर व्हावी, स्थानिक संस्था कराची वसुली बरोबर व्हावी. स्थानिक संस्था कराची वसुली साधारणता जुलै, २०१२ पासून सुरू झाली. त्यावेळेस महापालिकेचे उत्पन्न जवळपास १२ कोटीच्या आसपास होते आणि स्थानिक संस्था कराच्या माध्यमातून ६ ते ७ कोटी येत होते. म्हणजे दर महीन्याला ६ ते ७ कोटींची चोरी होते. ते आम्ही प्रशासनाच्या, त्या वेळेच्या आयुक्तांच्या लक्षात आणून देत होतो. तत्कालिन आयुक्त काय सांगायचे की हे असेसमेंट सिस्टम आहे. ती चोरी आम्ही पकडणार कोणालाही जावू देणार नाही. ६ कोटी येतो, ना त्याचा फायदा नक्कीच प्रशासनाला भविष्यात होईल. एक वर्षा नंतर असेसमेंट होईल, दोन वर्षा नंतर असेसमेंट होईल. महापौर, उप महापौर इथे उपस्थितीत आहेत. सगळी आपली वसुली नंतर होईल. ती वसुली करण्याची जबाबदारी कोणाची होती. आयुक्तांची, प्रशासनाची, ती नगरसेवकांची किंवा नागरीकांची नव्हती. जे नागरीक प्रामाणिक आहेत, त्यांना सुविधा देवून जे नागरीक चोर आहेत, त्यांना दंड लावणे प्रशासनाचे काम आहे. त्यावेळेस चार वेळा किंवा पाच वेळा सुरेश जाधव, सुनिल सुर्वे, सुभाष मनसुलकर, राजेश वानखेडे यांनी प्रस्ताव आणले होते. जर चोरी होते, ज्या गाडया पकडल्या जातात, नाही नाही त्या सोडून दया, नाके उठवले. एल.बी.टी. चोरी होते, १२ कोटी रूपये उत्पन्न असलेल्या एल.बी.टी. चे ६ ते ७ कोटी उत्पन्न होते, म्हणजे ६ कोटींचे नुकसान दर महीन्याला महापालिकेचे होते. त्यांनी सांगितले नाही हे होणार. हे असे मागच्या तीन वर्षामध्ये किती झाले. जवळपास तीनशे ते अडीसचे कोटीचा महसुल महापालिकेकडे पडलेला आहे, जर त्या आयुक्तांनी सांगितले असेल तर हे खरे असेल तर, खोटे असेल तर तसे सांगू नये. ते खोटे बोलले होते. म्हणजे आम्ही आयुक्तांवर विश्वास ठेवायचा, एक आयुक्त येतात, मी काल विषय काढला ही मनमानी झाल्या सारखे चालले, सरसकट बदली, त्याचे परिणाम काय? दुषपरिणाम काय? आम्ही ते स्विकारायचे, आम्ही स्विकारायचे म्हणजे जनतेने स्विकारायचे त्याचे परिणाम आम्हांला भोगावे लागले. तर सर्वकंष विचार करून लोकांची कामे झाली पाहीजेत. नगरसेवकांनी निवडणूकीमध्ये किंवा प्रशासनाने त्यांना दिलेले मनोज यांनी सांगितले की “प्यार का वादा, आधा आधा” चित्रपट होता. असे करून आपण चालू या शहराचा विकास यासाठी नगरसेवक तळमळीने सांगतात. ठेकेदार काम करतात नाहीतर ठेकेदार तुमच्यावर विश्वास ठेवणार, मग ती झालेत का? किंवा जी व्यवस्थित आहेत. त्यासाठी सहकार्य करा एवढेच या निमित्ताने सांगतो. संपुर्ण सभागृहाची ती भावना आहे.

<u>सदस्य, श्री.भगवान भालेराव:—</u> आयुक्त साहेब, आताच बोडारे साहेबांनी स्थानिक संस्था कराच्या संदर्भात सांगितले, आपल्याकडे असेसमेंट करण्यासाठी जी लोक आपण बोलवली आहेत. विसपुते आणि त्यांची काही पाच ते सहा लोक आहेत. साहेब आपण त्यांना सन २०१२—२०१३ चे असेसमेंट करायला सांगितले आहे, आणि रिफंड दयायला सांगितले होते, तुम्ही कदाचित तुमच्या लक्षात आहे किंवा नाही विचारा त्यांना, त्यांनी २०१४ चे असेसमेंट रिफंड देवून टाकले आहेत. काय संबध आहे, २०१२—२०१३ चेच दयायचे आहे. परंतु त्यांनी २०१४—२०१५ पर्यंत रिफंड दिले आहे. १ कोटीचा निधी आपल्या लोकांनी परस्पर त्यांना दिले आहे. यांची चौकशी करा, वस्तुस्थिती समजेल. म्हणजे ते काय करतात? ते बघा ते रिटायर असल्यामुळे ते लक्ष देत नाहीत. त्यांचे लक्ष वेगळया मार्गाने चालू आहे. त्यांनी रिफंड २०१४—२०१५ चा पण देवून टाकला आहे. म्हणजे अशी परिस्थिती तुमचे लक्षच नाही, त्यांच्यावर स्थानिक संस्था कराचे काय चालले आहे. स्थानिक संस्था कराची वसुली किती येते, स्थानिक संस्था करामध्ये काय गोंधळ चालले आहे. त्याची जरा चौकशी करा. लेंगरेकर साहेबांनी मधल्या काळामध्ये जो गोंधळ केला आहे. त्याचीही चौकशी करा, एल.बी.टी. संदर्भात गट नेत्यांची एक स्पेशल मिटींग लावा. ती वस्तुस्थिती तुम्हांला मी देतो, पुराव्यानिशी, स्थानिक संस्था कराचे एका माणसाचे पावने दोन कोटी वसुली असतांना त्याला कालांतराने फक्त ५ लाखाचा चेक भरायला लावला आणि ५ लाख भरले तर १ कोटी, ७० लाख गेले कुठे, म्हणजे अशी परिस्थिती आहे. अशा पध्दतीच्या २० केसेस माझ्याकडे आहेत. त्याच्यासाठी मला वाटते गटनेत्यांची एक मिटींग लावा, तुम्हांला या एल.बी.टी. च्या संदर्भात सगळया काय काय गोष्टी आहेत त्या समोर येतील. त्याच्या नंतर त्यांच्यावर कारवाई होईल.

<u>सदस्य, श्री.धनंजय बोडारे:—</u> आता ७ ते ८ कोटीचे नुकसान स्थानिक संस्था कराच्या माध्यमातून झाले आहे. नंतर होईल असे सांगितले आहे. म्हणजे एक वर्षाचे ९६ कोटी, तीन साडेतीन वर्षाचे सरळसरळ ३०० कोटी आहेत. पण ते वसुल होत नाही. चार बिल्डरचे २० कोटी, ९ कोटी, ७ कोटी, ४ कोटी असे पत्र दिले आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** सन्माननिय आयुक्तजी, सभागृहाच्या सर्व सदस्यांच्या भावना आपण समजून घ्या. दोन वर्षापासून दु:खी आहेत, त्यांच्या वार्डामध्ये कामे झाली नाहीत. टेंडर झाले आहेत, परंतु वर्क ऑर्डर दिल्या नाहीत. तरी त्यांच्या भावना समजून घ्या आणि आपण स्वत: लक्ष देवून वर्क ऑर्डर का दिल्या नाहीत, कृपया करून लक्ष दया. लवकरात लवकर त्यांच्या भावना समजून घ्या आणि खुश करा असे मी तुम्हांला आदेश देत आहे.

**महापालिका सचिव:—** विषय क्र. २ वाचून दाखवितात.

———————————————————————————————————————————

**विषय क्र. २ :—** मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १८/३/२०१७, ५/४/२०१७ व दिनांक २०/४/२०१७ त्यात २४/४/२०१७ व २८/४/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

———————————————————————————————————————————

**काही सदस्य:— पास पास**

---

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** मागील सभेचे दिनांक १८/३/२०१७, ५/४/२०१७ व दिनांक २०/४/२०१७ त्यात २४/४/२०१७ व २८/४/२०१७ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

☑ **विषय क्र. २ :—** मागील सर्वसाधारण महासभा दिनांक १८/३/२०१७, ५/४/२०१७ व दिनांक २०/४/२०१७ त्यात २४/४/२०१७ व २८/४/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव: श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव : श्री. सुनिल सुर्वे

**महासभा ठराव क्र. १९ इ** **दिनांक : १९/७/२०१७**

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या दिनांक १८/३/२०१७ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ६३ पर्यंतचे, दिनांक ५/४/२०१७ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते २६ पर्यंतचे व दिनांक २०/४/२०१७ त्यात २४/४/२०१७ व २८/४/२०१७ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते १३८ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---


**महापालिका सचिव:—** विषय क्र. ३ वाचून दाखवितात.

———————————————————————————————————————————

**विषय क्र. ३ :—** उल्हासनगर महानगरपालिकेचा महासभा ठराव क्र. ३२, दिनांक ७/१२/२०१६ मध्ये अंशत: फेरबदल करणे.

---

**महापालिका सचिव:—**हा ठराव शासनाकडे पाठवायचा आहे का?

यावेळी श्रीमती शुभांगीनी निकम, श्रीमती रेखा ठाकुर सभागृहातुन बाहेर गेल्या. 

**सदस्य, श्री.राजेश वदारिया:—** इतिवृत्ताची वाट न पहाता पास....

**महापालिका सचिव:—** यामध्ये फक्त बदल असा आहे की, रस्ता अनुदान ऐवजी विशेष रस्ता योजने अंतर्गत इतिवृत्ताची वाट न पहाता...

**आयुक्त, राजेंद्र निंबाळकर:—** नाही तसे नाही, आपण चारही रस्ते क्लब करून ते आपण रस्ता अनुदान म्हटले आहे, त्या पैकी एक रस्ता आपला सर्वसाधारण रस्ता अनुदान आहे. तीन रस्ते जे आहेत ते विशेष रस्ते अनुदान आहे. तर ते कुठले रस्ते विशेष अनुदान आणि कुठले रस्ते सर्वसाधारण अनुदान ते नमुद करायचे ते आम्ही आमच्या पध्दतीने करून.....

 यावेळी श्रीमती रेखा ठाकुर यांनी सभागृहात पुन: प्रवेश केला.

**महापालिका सचिव:—** इतिवृत्ताची वाट न पहाता पास...

**काही सदस्य:—** पास पास...

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ३ :—** उल्हासनगर महानगरपालिकेचा महासभा ठराव क्र. ३२, दिनांक ७/१२/२०१६ मध्ये अंशत: फेरबदल करणे.

**प्रस्तावना**

शासन निर्णय क्रमांक जीईएन—२०१५/प्र.क्र.८२/नवि—१६, दिनांक ०८ मार्च, २०१६ या कार्यालयास प्रापत झाला असून सदर शासन निर्णयान्वये ''राज्यातील महानगरपालिका /नगरपरिषद/नगरपंयायत यांना रस्ता अनुदान योजनेअंतर्गत विविध महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांकरिता ''अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर'' निधी वितरित आला असून सदर शासन निर्णया सोबतच्या अनुसूचित अनुक्रमांक ७ वर ''ड'' वर्ग महानगरपालिका म्हणुन उल्हासनगर महानगरपालिकेस एकूण रु.३,७५,००,०००/— (अक्षरी रक्कम रुपये तीन कोटी पंच्याहत्तर लक्ष मात्र) एवढी रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे खालील रस्त्यांची कामे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | रस्त्यांची लांबी | अंदाजित प्राकलनिय किंमत |
|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर—३ प्रबुध्द नगर येथील ४० फुट रुंद प्लायवुड फॅक्टरी ते गॅस गोडावून पर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करणे | २२५ मीटर | रुपये ७५,००,०००/— |
| २ | उल्हासनगर—१ येथील ८० फुट रुंद बसस्टॅण्डच्या बाजूचा परिसर, आशा कोल्ड्रींग्स ते पोलीस चौकी पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण/मजबुतीकरण करणे | २२५ मीटर | रुपये ७५,००,०००/— |
| ३ | उल्हासनगर—५ येथील ८० फुट रुंद कैलाश कॉलनी चौक येथील रस्त्याचे डांबरीकरण/मजबुतीकरण करणे | २२५ मीटर | रुपये १,५०,००,०००/— |
| ४ | उल्हासनगर—४ येथील ८० फुट रुंद श्रीराम चौक येथील स्वर्गीय आनंद दिघे प्रवेशद्वार जवळील रस्त्याचे डांबरीकरण/मजबुतीकरण करणे | १०० मीटर | रुपये ७५,००,०००/— |
| | **एकुण** | | रुपये ३,७५,००,०००/— |

सदर रस्ते हे राज्य महामार्गास जोडणारे मुख्य रस्ते असून रहदारीचे व वाहतुकीचे दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहेत. सातत्याने मोठया प्रमाणात वाहतुक सदर रस्त्यावरुन सुरु असते. सदर परिसरात छोटया उदयोगाचे कारखाने, लोकवस्ती वसलेली आहे. रस्त्याची परिस्थिती खराब असल्याने नागरिकांना व वाहतूकीस अत्यंत अडचण निर्माण होत आहे. दरवर्षी पावसाळयापूर्वी या रस्त्यांवरील खड्डे महापालिकेस भरावे लागतात, त्यामुळे वेळेचा व निधीचा अपव्यय होतो.

वरील परिस्थितीचा विचार करता उक्त तक्त्यांत नमुद केलेल्या रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम संदर्भिय शासन निर्णयान्वये ''रस्ता अनुदान'' या योजनेअंतर्गत हाती घेणेकरिता मा. महासभेचा मंजूरी ठराव क्र.३२ अन्वये रस्ता अनुदान अंतर्ग प्रापत होणा–या निधीतून निविदा प्रक्रिया करणेस मान्यता दिलेली आहे.

आता प्रादेशिक उपसंचालक नगरपालिका प्रशासन, कोकण विभाग, यांचे पत्र क्र. साशा/का–३/नपा–२/कावि–४९/प्रशासकीय मान्यता/२०१७, दिनांक २९/०४/२०१७ अन्वये असे कळविले आहे की, अ.क्र. २, ३, ४ क्रमांचे रस्ते हे विशेष रस्ता अनुदानातुन व अ.क्र.१ हे फक्त रस्ते अनुदानातून करावयाचे असल्याचे मा. महासभेची मंजूरीसाठी कळविले आहे.

तरी वरील प्रमाणे महासभेचा मंजूरी ठराव क्र. ३२ दिनांक ०७/१२/२०१६ मध्ये अंशत: फेरबदलासाठी सविनय सादर.

कृपया मा.महासभेची मंजूरी मिळावी.

<u>महासभा ठराव क्र: २०</u> <u>दिनांक:– १९/७/२०१७</u>

सुचकाचे नाव :– श्री. किशोर वनवारी

अनुमोदकाचे नाव :– श्री. प्रमोद टाले

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेचा महासभा ठराव क्र. ३२, दिनांक ७/१२/२०१६ मध्ये खालील अंशत: फेरबदल करणेस मान्यता देत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित प्राकलनिय किंमत | योजनेचे नाव |
|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर–३ प्रबुध्द नगर येथील ४० फुट रुंद प्लायवुड फॅक्टरी ते गॅस गोडावून पर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करणे | रुपये ७५,००,०००/– | सर्वसाधारण रस्ता अनुदान |
| २ | उल्हासनगर–१ येथील ८० फुट रुंद बसस्टॅण्डच्या बाजूचा परिसर, आशा कोल्ड्रींग्स ते पोलीस चौकी पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण/मजबुतीकरण करणे | रुपये ७५,००,०००/– | विशेष रस्ता अनुदान |
| ३ | उल्हासनगर–५ येथील ८० फुट रुंद कैलाश कॉलनी चौक येथील रस्त्याचे डांबरीकरण/मजबुतीकरण करणे | रुपये १,५०,००,०००/– | विशेष रस्ता अनुदान |
| ४ | उल्हासनगर–४ येथील ८० फुट रुंद श्रीराम चौक येथील स्वर्गीय आनंद दिघे प्रवेशद्वार जवळील रस्त्याचे डांबरीकरण/मजबुतीकरण करणे | रुपये ७५,००,०००/– | विशेष रस्ता अनुदान |
| | **एकुण** | **रुपये ३,७५,००,०००/–** | |

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव:–</u> विषय क्र. ४ वाचून दाखवितात.

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

⇨ **विषय क्र.** ४ :– महसूल समिती सदस्य श्री. भारत रा. राजवानी (गंगोत्री) यांचा राजीनामा मंजूर करणे व त्यांच्या जागी नविन सदस्याची नेमणूक करणे.

---

<u>काही सदस्य:—</u> इतिवृत्ताची वाट न पहाता पास पास...

<u>महापालिका सचिव:—</u> मा. महापौर मॅडमच्या हातामध्ये दयायचे आहे, माझ्या हातामध्ये नाही. तुम्ही नाव सांगा मी पत्र बनवेल.

<u>सदस्य, श्री.भारत राजवानी:—</u> पुजाकौर लबाना, यांच्या नावाचे पत्र दिले आहे.

<u>महापालिका सचिव:—</u> ठिक आहे, पास.

<u>काही सदस्य:—</u> पास पास...

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ४:—** महसूल समिती सदस्य श्री. भारत रा. राजवानी (गंगोत्री) यांचा राजीनामा मंजूर करणे व त्यांच्या जागी नविन सदस्याची नेमणूक करणे.

<u>प्रस्तावना</u>

श्री. भारत रा. राजवानी (गंगोत्री), पालिका सदस्य यांच्या दिनांक ११/५/२०१७ रोजीच्या पत्रानुसार माहे एप्रिलच्या सर्वसाधारण महासभेमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्यावीने महसुल समिती सदस्य म्हणुन त्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली होती. परंतु त्यांनी तीन समितींवर आपले नाव दिलेले असून नियमानुसार फक्त दोन समितीवर आपले नाव देता येवु शकते. त्यानुसार महापालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाज नियम १९९७ मधील ४ (ब) मधील (२) अन्वये ''एकाच वेळी दोन पेक्षा अधिक विशेष समित्यांवर कोणत्याही पालिका सदस्यांस नेमता येणार नाही.'' अशी तरतुद आहे.

श्री. भारत रा. राजवानी, पालिका सदस्य यांनी त्यांच्या सदर पत्रान्वये महसुल समिती सदस्य म्हणुन राजीनामा मंजुर करण्याबाबत विनंती केली आहे व मंजूरीनंतर त्यांच्या जागी नविन सदस्याच्या नावाची घोषणा करावी, असे नमुद केले आहे.

तरी श्री. भारत रा. राजवानी (गंगोत्री) यांचा महसूल समिती सदस्य पदाचा राजीनामा मंजुर करुन त्यांच्या जागी नविन सदस्याची निवड करण्यासाठी महासभेपूढे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> २१      <u>दिनांक:—१९/७/२०१७</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महसूल समिती सदस्य श्री. भारत रा. राजवानी (गंगोत्री) यांचा राजीनामा मंजूर करीत आहे व त्यांच्या जागी श्रीमती पुजाकौर लबाना या सदस्याची नेमणूक करीत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव:—</u> विषय क्र. ५ वाचून दाखवितात.

---

—

⇨ **विषय क्र. ५ :—** अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नियामक मंडळावर महापालिकेचे प्रतिनिधी

म्हणुन तीन पालिका सदस्यांच्या नावाची शिफारस करणेबाबत.

---

**सदस्य, श्री.रमेश चव्हाण:–** शिवसेनेकडून श्री. चंद्रशेखर केशव यादव यांचे नाव घेण्यात यावे.

**महापालिका सचिव:–** कृपया सदस्यांनी नावे दयायची आहेत, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी तीन प्रतिनिधी पाठवायचे आहेत.

**सदस्य, श्री.मनोज सयानी:–** भारतीय जनता पार्टीच्यातर्फे मिना सोंडे यांचे नाव घेण्यात यावे

**महापालिका सचिव:–** साई पक्षातर्फे श्री. दिपक सिरवानी यांचे नाव आहे., तीन नावे आली आहेत, सेनेतर्फे चंद्रशेखर यादव आणि भाजपातर्फे श्रीम. मिना सोंडे, हा पण ठराव इतिवृत्ताची वाट न पहाता पास करावा लागेल, कारण ११ ऑगस्ट पर्यंत अर्जेंट पाठवायचा आहे,

**काही सदस्य:–** इतिवृत्ताची वाट न पहाता पास पास....

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ५:–** अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नियामक मंडळावर महापालिकेचे प्रतिनिधी म्हणुन तीन पालिका सदस्यांच्या नावाची शिफारस करणेबाबत.

**प्रस्तावना**

अ.भा.स्था.स्व.सं. मुंबई यांचेकडील दिनांक ११/५/२०१७ रोजीच्या पत्रानुसार अ.भा.स्था.स्व.संस्थेच्या नियामक मंडळावर महानगरपालिकेच्या तीन प्रतिनिधींची संस्थेच्या नियमावलीमधील नियम २ (अे), (बी) आणि ६ अनुसार तयार करावयाच्या मतदार यादीत महापालिका प्रतिनिधी म्हणुन महापालिकेतर्फे शिफारस करायची आहे.

उल्हासनगर महापालिका अ–प्रवर्गातील ए–५ या प्रवर्गात मोडते. यास्तव आपल्या महापालिकेत निवडून आलेल्या सदस्यांमधुन तीन सदस्यांची निवड करुन पुर्णनावे, पत्ते इत्यादी माहिती अ.भा.स्था.स्व. संस्थेच्या बांद्रा येथिल कार्यालयात (ऑल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ लोकल सेल्फ गर्व्हमेंट, एम.एन.रॉय. हयुमन डेव्हलोपमेंट कॅम्पस, फ्लॉट नं. ६, एफ ब्लॉक, गर्व्हमेंट कॉलनी, बिल्डींग नं. ३२६, टीपीएस रोड नं. १२ (बीकेसी) बांद्रा (पु. मुंबई–४०० ०५१) येथे दिनांक ११ ऑगस्ट २०१७ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत या तत्पुर्वी पोहचतील अशा त–हेने पाठवायची आहेत. त्याबाबत महापालिकेचा ठराव व साक्षांकित इतिवृत्त हेही अ.भा.स्था.स्व.संस्थेकडे पाठवायचे आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेत नव्याने निवडून आलेल्या सदस्यांची संख्या ७८ असून त्यांचे पक्षीय संख्याबळ खाली दर्शविल्याप्रमाणे आहे.

| भाजपा | शिवसेना | सेक्युलर अलायन्स ऑफ इंडिया गट | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | आरपीआय (ए) | पीपल रिपब्लीकन पार्टी | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | भारीप बहुजन महासंघ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३२ | २५ | १२ | ४ | २ | १ | १ | १ | ७८ |

वरील पक्षीय संख्याबळ लक्षात घेता कोणत्या तीन सदस्यांच्या नावाची अ.भा.स्था.स्व.संस्था मुंबई यांच्याकडे शिफारस करायची याबाबत निर्णय घेण्यासाठी महासभेपुढे प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र: २२** **दिनांक:–१९/७/२०१७**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. सुनिल सुर्वे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नियामक मंडळावर महापालिकेचे प्रतिनिधी म्हणुन

१. श्री. चंद्रशेखर केशव यादव
२. श्रीमती मिना सोनेजी
३. श्री. दिपक (टोनी) सिरवानी

या तीन पालिका सदस्यांच्या नावाची शिफारस करीत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव:—</u> विषय क्र. ६ वाचून दाखवितात.

———————————————————————————————————————
—

**विषय क्र ६** :— श्री. किशोर ल. तलरेजा, लिपिक यांना त्यांच्या पत्नीच्या वैद्यकीय उपचारासाठी रुपये १,५५,०२०/— इतकी वैद्यकीय प्रतिपुर्ती मिळणेबाबत.

———————————————————————————————————————

<u>सदस्य, श्री.भगवान भालेराव:—</u> नियमाप्रमाणे जे देता येतील ते दया.
<u>सदस्य, श्री.राजेश वदारिया:—</u> इतिवृत्ताची वाट न पहाता पास...
<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ६**:— श्री. किशोर ल. तलरेजा, लिपिक यांना त्यांच्या पत्नीच्या वैद्यकीय उपचारासाठी रुपये १,५५,०२०/— इतकी वैद्यकीय प्रतिपुर्ती मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

श्री. किशोर ल. तलरेजा, लिपिक, यांना त्यांच्या पत्नीच्या वैदयकिय उपचारासाठी फोर्टीज हॉस्पिटल, कल्याण येथील खाजगी रुग्णालयात दिनांक ३/७/२०१५ ते दिनांक ६/७/२०१५ पर्यत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रूपये १,८६,५७०/— इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे. तरी त्यांनी ११/९/२०१५ च्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

शासन निर्णय क्र.वैखप्र—२०११/प्र.क्र.३३३/११/रकावि/—२, दिनांक. १६ नोव्हेंबर २०११ अन्वये शासन मान्य रुग्णालयात घेतलेले उपचार शासन नियमाप्रमाणे संपुर्ण अनुदेय ठरतो. फोर्टीज हॉस्पिटल, कल्याण हे शासन मान्यता नाहि. त्यामुळे त्यांना संपूर्ण खर्चाच्या ९५ टक्के व ९० टक्के अनुज्ञेय ठरतो.

तसेच स्थायी समिती ठराव क्रमांक ९० दिनांक १०/९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचा—यांना व त्यांच्या कुटुंबियांना तातडीच्या आजारांवर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम १९६१ लागु करणेस शिवाय १) हृदयविकारावरील उपचार (२)उपमार्गसाचक हृदयशस्त्रक्रिया (३) ॲन्जियोप्लॉस्टी (४)मुत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया (५) रक्ताचा कर्करोग या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकिय रुग्णलयाकडून अंकित करण्यात येणा—या अंदाजीत खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

सबब, श्री. किशोर ल. तलरेजा, लिपिक यांच्या पत्नीचा आजार आकस्मिक आजारापैकी गंभीर आजार—अ.क्र १ या आजारामध्ये मोडतो त्यासाठी त्यांनी कोणतीही अग्रीम घेतलेली नाही. त्यामुळे त्यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. १,५५,०२०/— इतका मिळणेकरीता मा. महासभेच्या मंजूरीकरीता प्रस्तावित करणत येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> २३ <u>दिनांक:—१९/७/२०१७</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. किशोर ल. तलरेजा, लिपिक यांना त्यांच्या पत्नीच्या वैद्यकीय उपचारासाठी रुपये १,५५,०२०/— इतकी वैद्यकीय प्रतिपुर्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिवः—</u> विषय क्र. ७ वाचून दाखवितात.

———————————————————————————————————————
—

⇨ **विषय क्र ७ :—** श्री. नितिन कैलास करोतिया, लिपिक यांना त्यांच्या वडीलांच्या वैद्यकीय उपचारासाठी रुपये ४,९०,०३५/— इतकी वैद्यकीय प्रतिपुर्ती मिळणेबाबत.

———————————————————————————————————————

<u>काही सदस्यः—</u> इतिवृत्ताची वाट न पास पास.....

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ७:—** श्री. नितिन कैलास करोतिया, लिपिक यांना त्यांच्या वडीलांच्या वैद्यकीय उपचारासाठी रुपये ४,९०,०३५/— इतकी वैद्यकीय प्रतिपुर्ती मिळणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

श्री. नितिन कैलाश करोतिश, लिपिक, यांना त्यांच्या वडीलांच्या वैदयकिय उपचारासाठी फोर्टीज हॉस्पिटल, कल्याण येथील खाजगी रुग्णालयात दिनांक २८/४/२०१४ ते दिनांक १५/५/२०१४ पर्यत दाखल करण्यात आले होते. त्यासाठी त्यांना रूपये ५,३६,४८३/— इतका खर्च झाला असून त्यांनी सोबत सर्व वैद्यकीय बिल जोडले आहे. तरी त्यांनी १६/६/२०१४ च्या अर्जान्वये वैद्यकीय परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

शासन निर्णय क्र.वैखप्र—२०११/प्र.क्र.३३३/११/रकावि/—२, दिनांक. १६ नोव्हेंबर २०११ अन्वये शासन मान्य रुग्णालयात घेतलेले उपचार शासन नियमाप्रमाणे संपुर्ण अनुदेय ठरतो. फोर्टीज हॉस्पिटल, कल्याण हे शासन मान्यता नाहि. त्यामुळे त्यांना संपूर्ण खर्चाच्या १०० टक्के व ९० टक्के अनुज्ञेय ठरतो.

तसेच स्थायी समिती ठराव क्रमांक ९० दिनांक १०/९/१९९७ अन्वये महापालिका कर्मचा—यांना व त्यांच्या कुटुंबियांना तातडीच्या आजारांवर उपचारासाठी करण्यात आलेल्या खर्चाची प्रतिपूर्तीसाठी महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल) नियम १९६१ लागु करणेस शिवाय १) हृदयविकारावरील उपचार (२)उपमार्गसाचक हृदयशस्त्रक्रिया (३) ॲन्जियोप्लॉस्टी (४)मुत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया (५) रक्ताचा कर्करोग या उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती शासकिय रुग्णलयाकडून अंकित करण्यात येणा—या अंदाजीत खर्चास १०० टक्के देयक अदा करण्यासाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत केले आहे.

सबब, श्री. नितिन कैलाश करोतिश, लिपिक यांच्या वडीलांचा आजार आकस्मिक आजारापैकी गंभीर आजार—अ.क्र १ या आजारामध्ये मोडतो त्यासाठी त्यांनी कोणतीही अग्रीम घेतलेली नाही. त्यामुळे त्यांना वैदयकिय उपचारावरील खर्च रु. ४,९०,०३५/— इतका मिळणेकरीता मा. महासभेच्या मंजूरीकरीता प्रस्तावित करणत येत आहे.

<u>महासभा ठराव क्रः</u> २४ <u>दिनांकः—१९/७/२०१७</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल सुर्वे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. नितिन कैलास करोतिया, लिपिक यांना त्यांच्या वडीलांच्या वैद्यकीय उपचारासाठी रुपये ४,९०,०३५/— इतकी वैद्यकीय प्रतिपुर्ती करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिवः— विषय क्र. ८ वाचून दाखवितात.
————————————————————————————————————————————
—

⇨ विषय क्र. ८ः— प्रस्तावाची सूचना

मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्याकडील पारीत झालेल्या आदेशाचे विरोधात पुनश्च याचीका दाखल करणेबाबत किंवा मा. सर्वोच्च न्यायालय यांचेकडे अपिल दाखल करणेबाबत पालिका सदस्या श्रीमती ज्योत्स्ना जाधव यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

————————————————————————————————————————————

सदस्या, श्रीम.ज्योत्सना जाधवः— मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, अशाकिय प्रस्ताव मी मांडत आहे. मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्याकडील पारीत झालेल्या आदेशाचे विरोधात पुनश्च याचीका दाखल करणेबाबत किंवा मा. सर्वोच्च यांचेकडे अपिल दाखल करणेबाबत. मा. महापौर मॅडम शिट नं. ७६, यु. नं. १३२, १३३, १३४, १३५ रहिवासी क्षेत्रात खेळाचे मैदान आणि बाधित होणा—या रहीवाश्या करीता राहण्याची घरे, या करीता हा भुखंड राखीव आहे. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये बिल्डर धार्जीना अधिका—यांनी संगनमताने कायदयाचा गैरवापर करून व कागदपत्रांची अफरातफर करून महापालिका आरक्षित मोकळी जागा तसेच बाधित क्षेत्रात रहीवाशांना राहण्याची घरे, खेळाचे मैदान या आरक्षणाच्या बाबतीत महापालिकेने आपल्याकडून कुठल्याही प्रकारचे बचाव कार्य न करता कागदपत्रांची अफरातफर करून ही जागा बिल्डरांना मिळवून दिलेली आहे. या कामी जे अधिकारी व कर्मचारी यांनी मदत केली आहे, अशा अधिकारी व कर्मचारी यांच्या विरूध्द कठोर कारवाई होणेबाबत तसेच या आदेशा करीता ज्या ज्या कर्मचा—यांनी खोटी माहीती सादर केलेली आहे, त्यांच्या विरूध्द सखोल चौकशी होऊन कारवाई होणे बाबत. तसेच या आदेशा विरूध्द मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्याकडे पुनश्च फेर चौकशी करीता दाखल करणेबाबत. अथवा मा. सर्वोच्च न्यायालय यांचेकडे मा. उच्च न्यायालय यांच्या आदेशा विरूध्द अपिल दाखल करणे कामी या महासभेमध्ये सखोल चर्चा करणे करीता अशासकिय प्रस्ताव मांडत आहे.

यावेळी सदस्या श्रीमती शुभांगिनी निकम यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

सदस्य, श्री.राजेंद्र चौधरीः— या प्रस्तावाला मी अनुमोदन देतो, मा. सदस्या जाधव मॅडम यांनी जो अशासकिय प्रस्ताव आणला आहे. हा एक विषयासाठी मांडलेला प्रस्ताव आहे. माझ्याकडे तो पुढे जाऊन माहीती आहे. या उल्हासनगर शहरामध्ये बोगस सिडी सनद बनवण्याचे काम आपल्या अधिका—यांच्या माध्यमातून आणि प्रांतकार्यालयाच्या अधिका—यांच्या माध्यमातून जोरात सुरू आहे आणि ते रॅकेट या ठिकाणी काम करीत आहे आणि त्याची चौकशी मा. आयुक्तांनी ॲन्टीकरप्शन ब्युरो यांच्या माध्यमातून करावी अशी मी मागणी करतो. मी मा. मुख्यमंत्र्यांना त्या संदर्भात एक पत्र दिलेले आहे की या शहरामध्ये जे काही बिल्डरर्स आहेत, काही वास्तुविशारद आहेत हे कायदयाच्या चौकटीत राहून या महानगरपालिकेच्या जागेवर, शासनाच्या जागेवर, महानगरपालिकेच्या शौचालयाच्या त्या जागेवर आपल्या बोगस सिडी सनद बनवून महापालिकेच्या नियमाच्या अधिन राहून प्लॅान पास करून घेऊन अनधिकृत बांधकाम करीत आहेत आणि महापालिकेचे राखीव भुखंड, शासनाचे राखीव भुखंड शासनाच्या व महानगरपालिकेचे शौचालय हडप करतात. माझ्याकडे २५ बोगस सिडी सनद आहेत. त्या तुम्हांला मी दाखवतो, नाही तर त्या तुम्हांला नंतर तुमच्या कार्यालयामध्ये देतो. काही प्रकरण आपल्याकडे उघडकीस आले आहेत. त्यामध्ये आपण चौकशी केली, या शहरातल्या काही नागरीकांनी मागणी केली उल्हासनगर महानरपालिकेकडे ती सिडी चौकशीसाठी आपल्याकडे पाठविली आहे. ती आपण प्रांतकार्यालयाला वेरीफाय करून दिली आहे का? दोन वर्षा पुर्वी परवाना पास करण्यासाठी आपल्या अधिका—यांनी पाठविलेली सिडी तिथले अधिकारी ती बरोबर आहे, असे सांगून देतात आणि त्या आधारे आपली महानगरपालिका जर परवाने पास करत असेल आणि नंतर दोन वर्षानी माहीती मागितली तर मग ती

संचिका आढळून येत नाही. म्हणून आपल्याला ही माहीती देता येत नाही. असे पत्र कमीत कमी १० प्रकरणामध्ये आलेले आहेत. तसे एक प्रकरण आहे, मी तुम्हांला त्याची माहीती देतो. एक प्रकरण आहे, त्याच्यामध्ये शिट नं. ११३८ बॅरेक नं. ११३८, रूम नं. १३, १४, १५ शिट नं. २१ कॅम्प नं. ३ बांधकाम परवाना क्र. ९७१३ यु.नं. ५९ आणि शिट नं. ५६ हा दुसरा मॅटर आहे. यामध्ये सिडी आपल्या महापालिकेकडे कोणी तरी मागणी केली आहे. प्रांत कार्यालयाकडे आणि त्यांना ही सिडी आपल्या पालिकेकडून वेरीफाय करून दिली आहे का? त्यांनी सांगितले की आमच्या कार्यालयाकडे ही मुळ संचिका सापडत नाही. तर त्यांनी आपल्या महापालिकेला अर्ज केला की, याच्यातील सर्व डॉक्युमेंट बोगस आहेत आणि आपल्या आयुक्तांनी त्यांची हिअरींग घेतली. ज्यांना परवाने पास करून दिले होते, त्या लोकांना बोलवले ते लोक तिथे हिअरींग वळेला हजर राहीले नाहीत. आपण एक आदेश काढला की, ही महानगरपालिका १५ दिवसाच्या आत त्वरीत या कार्यालयाला आपले कागदपत्र हजर केले नाहीत. तर आपले पुढील आदेश होईपर्यत आपले बांधकाम हे बंद ठेवा आणि त्वरीत ही कागदपत्र आपण दिले नाही तर नियमानुसार आपणावर कारवाई करण्यात येईल. नियम पण आपण सांगतो, परंतु त्यांच्यावर कारवाई कुठली होत नाही. तर माझी आपल्याला आयुक्त साहेब विनंती आहे, हे सगळे बोगस सिडीचे प्रकरण आपल्या कार्यालयात आपल्याकडे देतो. मी तसे मुंख्यमत्र्यांना पत्र लिहून तशी मागणी केली आहे. त्याचेही पत्र माझ्याकडे आहे. आपण या प्रकरणात सखोल चौकशी करण्यासाठी अॅन्टीकरप्शन ब्युरोला पत्र लिहा आणि त्याची मागणी करा सखोल चौकशी करा. दुध का दुध पाणी का पाणी समोर येऊ दया आणि जे कोणी असे महापालिकेचे भुखंड हडप करतात. त्यामध्ये जे अधिकारी असतील, प्रांतअधिकारी असतील किंवा प्रांताचे अधिकारी असतील, महापालिकेचे अधिकारी असतील, नगररचना विभागाचे अधिकारी असतील. त्यांच्या सर्वांवर कारवाई होणेसाठी आपण प्रयत्न करावे अशी माझी आपल्याना विनंती आहे.

<u>सदस्य, श्री.अरूण अशान:—</u> मा. महापौर मॅडम, उप महापौर, मा. आयुक्त साहेब, सचिव मॅडम, आज जो हा अशाकिय प्रस्ताव श्रीम. ज्योत्सना जाधव यांनी आपल्या समोर मांडलेला आहे आणि सदस्य, श्री. चौधरी साहेब ज्या विषयवर बोलले खरे म्हणटले ही महासभा सुरू झाल्यापासून तेव्हापासून जागेचा विषय चालू आहे. आज हा विषय जो आहे, आयुक्त साहेब आपण आपली जागा सोडून दुसरी जागा मागण्यासाठी मगासपासून बोलत आहे. परंतु आपल्याकडे कोणी जागा दयायला येतात आणि जागा घेत नाही. अशी परिस्थिती उद्‌भवून काही लोकांनी याच्यामध्ये अफरातफर केली आहे. त्या पैकी मा. उच्च न्यायालयामध्ये जी याचिका दाखल केली होती, ७४, ७६ आपली २०१२ मारवल डेव्हलपर्स विरूध्द उल्हासनगर महानगरपालिका आणि महाराष्ट्र शासन_आयुक्त साहेब, मी तुम्हांला काही कागदपत्र दाखवणार आहे. शिटी एस नं. १९३९ ब, क आणि ड आणि शिटी एस नं. १९४० क आयुक्त साहेब, हा एक प्रकारचा घोटाळा म्हणता येईल. कारण की जी परिस्थिती नव्हतीच ती परिस्थिती निर्माण करून त्या विषयाला आकार देवून असा बनाव केलेला आहे आणि तो बनाव एक दोन वर्ष नव्हे तर पाच, सहा वर्षे कोर्टामध्ये चालू आहे आणि त्याच्यामध्ये हा निर्णय दिलेला आहे आणि मा. उच्च न्यायालयामध्ये त्याच्यामध्ये निर्णय दिला आहे. आयुक्त साहेब तुम्हांला मी एक सांगू इच्छितो प्रशाकिय मालमत्तासाठी ज्या वेळेस पत्र दिले जात, त्या प्रशाकिय मालमत्ताचे पत्र नियमावलीमध्ये दयावे लागते. फक्त पत्र देवून ते पण त्याच्या नंतर त्या पत्राच्या अनुषंगाने माहीतीच्या अधिकार घेऊन त्या पॉपर्टीचे कसे हस्तांतरण केले आहे, ते तुम्हांला मी थोडक्यात सांगतो. सभागृहाने याच्याकडे लक्ष दयायचे आहे. कारण जमिनीच्या विषयावर आपण मघापासून सर्वानी बघितले आणि ऐकले आहे. आपण मागत आहे, मा. माझे सभागृहातील सदस्य यांची एक लक्षवेधी होती. प्रदिप रामचंदानीची त्यांनी घेतली नाही. त्याच्यामध्ये नऊ नंबरच्या विषयामध्ये एक सुचना होती. तर मी त्या विषयी सांगू इच्छितो की, दिनांक १४/१०/२००८ रोजी एक पत्र श्री. मनोज लालवानी या माणसाने आपल्या कार्यालयामध्ये दिले की, मला ही प्रशासकिय मालमत्ताचे पत्र त्यांनी दाखले केले. ही मालमत्ता मला दयायची आहे. जो की हा भुखंड, खेळाचे मैदान, हाऊसिंग बोर्ड ऑफ ज्वेलर्स म्हणजे बाधीत होणा—या लोकांसाठी रस्त्याची जमीन या करीता आरक्षित होते. काही भाग रहिवासी क्षेत्रामध्ये होता. दिनांक १४/१०/२००८ रोजी हे पत्र दिले. या पत्राला सन २०१२ पर्यंत दिनांक १४/१०/२००८ त्या नंतर सन २०१२ पर्यंत कोणीही विचारणा केली नाही. पत्र आले कुठे, गेले कुठे माहीत नाही. परंतु तोच इसम या महानगरपालिकेमध्ये माहीती अधिकारा खाली सन २००८—२००९ ची माहीती मागतो आणि त्याला सन २०१२ मध्ये आपण सर चार नंबरचे पत्र बघा, तुम्हांला पेपर दिले आहेत. त्याच्यामध्ये त्यांला माहिती अधिकाराखाली उत्तर मिळते, ते माहिती अधिकाराखाली उत्तर तत्कालीन जे आपले माहिती अधिकारी होते, त्यांनी त्याला उत्तर दिले आहे की श्री. मनोज लालवानी व इतर यांनी दिनांक १४/१०/२००८ रोजी मा. आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांच्या नावाने प्रशासकिय मालमत्ता या विषयाची दिलेली नोटीस महापालिकेस प्राप्त झालेली आहे. त्याच्या नंतर त्यांनी म्हणटले आहे की, आवक रजिस्टरमध्ये नोंद असलेल्या पानांची झेरॉक्स प्रत सोबत जोडत आहे. साहेब ही जी स्टोरी एका चित्रपटापेक्षा काही कमी नाही, की सगळे अधिकारी पुढे काय म्हणतात ते आपण जरा कटाक्षाने ऐका, आपणास जे पेपर सादर केलेले आहेत, श्री. मनोज लालवानी यांना उत्तर दिल्या नंतर त्यांनी म्हणजेच सन २०१२ ला रिट

पिटीशन याचिका मा. उच्च न्यायालयामध्ये दाखल केली. त्याच्यामध्ये त्यांनी सांगितले की, सन २००८ ला प्रशासकिय मालमत्ताची नोटीस महानगरपालिकेला दिलेली आहे. महानगरपालिकेने मला काहीही उत्तर दिलेले नाही आणि त्या मालमत्ताची नोटीस दिलेले पत्र, प्रशासकिय मालमत्ताची पत्र सन २०१२ ला प्राप्त केलेले आहे म्हणजेच ते महानगरपालिकेत आहे. म्हणजे अकार्यक्षम प्रशासन चार, चार, पाच पाच वर्षे एका पत्राचे उत्तर देत नाही. म्हणून हा कसा घोटाळा केला आहे. महानगरपालिकेच्या वतीने ज्या ज्या लोकांनी याच्यामध्ये प्रश्न उदभवले होते, ज्याचे उत्तरे दिले आहेत. ते मा. उच्च न्यायालयाची दिशाभूल करून या समोरच्या मारवल डेव्हलपर्स यांनी मालमत्ता हडप कलेली आहे. मारवल डेव्हलपर्सनी जेव्हा रिट पिटीशन याचिका दाखल केली त्यामध्ये दिनांक १९/१०/२०१२ ला या रिट पिटीशनच्या विरूध्द आपण एक वकिल नेमला नंतर आपण या रिट पिटीशनसाठी आपण हे खरोखर पेपर आले आहेत की नाही हे तपासण्या करीता कारणे दाखवा नोटीस दिली. ती कारणे दाखवा नोटीस त्या वेळी संबधित जे लिपीक होते, त्यामध्ये श्रीम.भावना गुरूनानी, श्री. जीवन गोविंदे, श्री. सिकंदर हिवाळे आणि श्रीम. रेश्मा नागपुरे, साहेब या चार चार लोकांना दिनांक १९/१०/२०१२ ला कारणे दाखवा नोटीस दिली आहे आणि त्यांच्याकडून २०/१०/२०१२ ला उत्तर मागविले त्याच्यामध्ये सर्वात प्रथम श्रीम. भावना गुरूनानी यांनी सांगिले की, दिनांक १४/१०/२०१२ रोजी सामान्य प्रशासन विभागामध्ये प्राप्त झालेले आवक नोंद रजिस्टर क्रमांक ५०७३ या बाबत माझ्याकडे खुलासा मागविण्यात आलेला आहे. दिनांक १४/१०/२००८ रोजी मी शिक्षण मंडळ, उल्हासनगर महानगरपालिकेत कार्यरत होते. त्यामुळे सदर पत्रा बाबत माझे काहीही संबध नाही. सदर विषया बाबत माहीती उपलब्ध करून देण्यासाठी मी नागरीक सुविधा केंद्राचे टेबलाचे सर्व कप्पे व सामान्य प्रशाासन विभागाची कपाटे शोधले असता, पत्र सापडले नाही. महापौर मॅडम, आयुक्त साहेब याच्या नंतर याच्यामध्ये दुसरा जो लिपीक आहे, श्री. जीवन गोविंदे त्यांनी असे दिले आहे की, दिनांक १४/१०/२००८ रोजी आवक रजिस्टर क्रमांक ५०७३ शोधण्यासाठी मी कपाटे व टेबलाचे खण तपासले असता, सदरचे पत्र व नोंद वहया आढळून आल्या नाहीत. साहेब याच्यामध्ये सगळया कर्मचा—यांना बोलावले, त्यामध्ये श्री. सिकंदर हिवाळे, यांनी सुध्दा सांगितले की, जावक क्रमांक ५०७३ या क्रमांकाचे पत्र नोंद होऊन सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्यात आलेले आहे. हया एका माणसाने सांगितले की, नोंद घेऊन पाठविण्यात आलेले आहे. परंतु त्याच दिवशी हा सगळा खुलासा श्रीम. रेश्मा नागपूरे, या लिपीकाने केला, त्या रेश्मा नागपूरे काय म्हणतात दिनांक ११/०१/२०११ च्या आदेशान्वये मला लिपीक या पदावर पदोन्नती देण्यात आलेली असून दिनांक १२ जानेवरी, २०१२ पासून सामान्य प्रशासन विभागाच्या मी आवक टपाल वहीत नोंद घेऊन मी टपाल वाटपाचे काम करीत आहे. दिनाक ११ जानेवारी, २०११ रोजी सदर टेबलेचे मी काम स्किारले असता, संबंधित लिपीकाने नोंद वहया माझ्या ताब्यात दिलेल्या नाहीत. या लिपीकाला त्या नोंद वहया ताब्यात दिलेल्या नाहीत. परंतु मी स्वत: हे पत्र शोधले, त्या नंतर, साहेब या गोष्टीकडे आपण लक्ष दया. त्या नंतर श्री. जीवन गोविंदे, श्री. सिकंदर हिवाळे, श्रीम. भावना गरूनानी यांच्या बरोबर कपाटे व टेबलाचे खण शोधले आहेत, त्यामध्ये सदर नोंद वहया आढळून आलेल्या नाहीत. श्री. सिकंदर हिवाळे म्हणतात की, हे मी पाठवलेले आहे. अगोदरच्या त्यांच्या पत्रामध्ये त्यांना माहीती आहे, दुस—या पत्रामध्ये ते त्यांच्या बरोबर कपाटे शोधतात, सांगतात की, हे पत्र मिळालेले नाही. आयुक्त साहेब हा सगळा बनाव, मध्यांतरी चाललेला हा जो प्लॉनचा सगळा घोळ, ज्यामध्ये काही बरेचशा लोकांनी ॲक्युजेशन रिझंवेशन बदली करण्याचे सगळ कारस्थान केले आणि आज जो मुद्दा आपल्याकडे उपस्थित झालेला आहे. त्यामध्ये हे प्रकरण इथेच न थांबता, अजून याच्या पुढे गेलेले आहे. आयुक्त साहेबांना दिनांक, या मध्ये ज्यांनी उप आयुक्तनी ज्यांनी माहीतीच्या अधिकारामध्ये तत्कालीन मुख्य लिपीक, मला वाटते ते आता सेवानिवृत्त झाले आहेत, श्री. रमेश काजळे, यांना पत्र दिले की, आपण ही माहीती कशी काय उपलब्ध करून दिली. कारण रिटपिटीशन याचिका महानगरपालिकेच्या विरोधामध्ये दाखल झाली आहे. त्या मध्ये काजळे साहेबांनी उत्तर दिले आहे, ज्यांनी हे पत्र स्किारले, ज्यांनी हया पत्राचे माहीती अधिकार दिला आहे. तीच व्यक्ती काय सांगते, माहीती अधिकाराखाली पत्र प्राप्त झाले आहे. माहीती अधिकारा बरोबर पत्र सापडले ते उत्तर नोंदवहीत शोधण्याचे प्रयत्न सुरू असून ते प्राप्त झाल्यावर सादर करण्यात येईल. त्यांनी माहीती अधिकारामध्ये नोंदवहीची प्रत दिलेली आहे आणि आता त्यांच्याकडे नोंद वही सापडत नाही. हा सन २००८ ते सन २०१२ आणि २०१२ ते २०१५ चा प्रवास आहे. या मध्ये काय काय घडू शकते? हा इतिहास मी तुम्हांला ते कागदपत्र दिलेले आहेत. याच्या वरच न थांबाता, उल्हासनगर महानगरपालिकेने अजून पुढे जाऊन नगररचना विभागामध्ये त्यांना कारणे दाखवा नोटीस पाठविली की, तुमच्याकडे ॲक्युजेशन पॉपर्टीचे पत्र आले आहे का? त्यामध्ये ज्या ज्या लोकांना नोटीस पाठवली, ती लोक श्री. सुरेश चुग, लिपीक, श्री. संजय पवार, कनिष्ठ अभियंता, श्री. दिपक ढोले, कनिष्ठ अभियंता, श्री. परदेशी, लिपीक आणि उमेश ठाकुर, लिपीक हे त्या विभागामध्ये त्या वेळेस कार्यरत होते. त्या सगळया लोकांनी दिनांक ०९/११/२०१२ ला खुलासा सादर केलेला आहे की, मी वाचून दाखवतो श्री. सुरेश चुग, लिपीक, श्री. संजय पवार, कनिष्ठ अभियंता यांनी सदरचे पत्र नगररचना विभागात आवक झाल्याचे आढळून आले नाही. असा खुलासा सादर केलेला आहे. तसेच श्री. दिपक ढोले, कनिष्ठ अभियंता, श्री. परदेशी शरद

लिपीक, श्री. उमेश ठाकुर, लिपीक हे कर्मचारी इतर विभागात कार्यरत होते. तसेच श्री. दिलीप बिराडे, लिपीक हे त्यावेळेस शिपाई पदावर होते. सदरच्या विषयी आम्हांला माहीती नाही, असा खुलासा केलेला आहे. साहेब जर का पत्रच आले नाही, पत्र दिले गेले नाही. ते महानगरपालिकेला माहीतीच नाही, असे महानगरपालिकेच्या एका पत्राला मागची तारीख दाखवून त्याचे माहीती अधिकारात उत्तर घेऊन महानगरपालिकेच्या विरोधामध्ये जे खेळाचे मैदान, आज या १३ कि.मी.च्या क्षेत्रामध्ये, साहेब मुलांना खेळण्यासाठी मैदान नाही. आज बाधित होणा—या रस्त्यासाठी लोकांना जागा नाही. त्या करीता आपल्याकडे हा प्लॉट उपलब्ध होता. परंतु एवढी मोठी गंभिर बाब शासनाने, प्रशासनाने डोळेझाक केली. यावर सुध्दा आयुक्त साहेबांनी त्यावेळेस एक करारनामा दाखल केला. हे सदर पत्र आणि अशी नोटीस प्राप्त झाली नाही. त्यावेळेचे सन्माननिय तत्कालिन आयुक्त साहेब, श्री. बालाजी खतगांवकर यांनी एक करारनामा दाखला केला. त्या करारनाम्यांमध्ये त्यांनी सरळ सरळ उल्लेख केला आहे. मी आपल्या माहीती करीता वाचून दाखवतो. विथ रेफरन्स पॅरा नं. ७ इट इज सबमिटेड दॅट पिटीशनर पर्चेस नोटीस दिनांक १४ ऑक्टोंबर, २००८ वाज नॉट सर्व इन दि ऑफिस ऑफ दि टाऊन प्लानिंग डिपार्टमेंट ऑर दि ऑफिस आफ दि म्युनिसिपल कमिशनर. साहेब १६ नंबरचा तुम्ही बघा दि पिटीशनर क्लेम दॅट हाऊस सर्व्ह पर्चेस नोटीस डेटेड १४/१०/२००८ हाऊ इज दि म्युनिसिपल कमिशनर हॅज नो रेकॉर्ड ऑफ पर्चेस नोटीस ऑन इट इज फाईल आईदर इन दि ऑफिस ऑफ टाऊन प्लॅनिंग डिपार्टमेंट ऑर दि ऑफिस ऑफ दि म्युनिसिपल कमिशनर दि इनवर्ड रजिस्टर मेंटेंन इन दि ऑफिस ऑफ टाऊन प्लॅनिंग डिपार्टमेंट अॅन्ड दि ऑफिस ऑफ म्युनिसिपल कमिशनर हॅज नो एंटरी ऑफ दि अॅपलिकेशन ऑफ रिसिप्ट डेटेड १४/१०/२००८ आयुक्त साहेब स्वत: म्हणतात की, असे काही पत्र आणि अशी काही एंटरीच नाही. या नंतर साहेब हे प्रकरण इथेच थांबते. तीन वर्षे या प्रकरणामध्ये काही हालचाल होत नाही. परंतु तीन वर्षा नंतर असे काही घडते, या उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये की त्यावेळचे तत्कालिन उप आयुक्त, नितीन कापडणीस साहेब तिथे जन्माला येतात आणि ते जादूची छडी फिरवतात आणि नितीन कापडणीस साहेब पुरवणी करारनामा दाखल करतात, त्या पुरवणी करारनाम्यामध्ये १७ नंबरचा साहेब बघा तुम्ही त्या करारनाम्यामध्ये नितीन कापडणीस साहेब असा उल्लेख करतात की, जनरल अॅडमिनिस्ट्रेशन डिपार्टमेंट ऑफ दि डेट ऑफ ०१/१०/२००८ ते ३१/३/२००९ मध्ये त्यांनी हे सगळे शोधले टाऊन प्लॅनर ऑफ दि म्युनिसिपल कॉर्पोरेशन आय से दॅट ऑफटर फाईलिंग दि अॅफेडेव्हीट ऑफ रिप्लाय दि डिसपॅच रजिस्टर मेंटेंन फॉर दि टाऊन प्लॅनिंग डिपार्टमेंट हॅज बिन ट्रेस्ट म्हणजे त्यांना हे डिसपॅच रजिस्टर तिथे मिळाले आहे. रजिस्टर लेवल ऑफ दि एंटरी फॉर रिसिप्ट ऑफ दि शेड नोटीस म्हणजे ती १४/१०/२००८ ची नोटीस ती २०१२ पर्यंत कोणालाच सापडली नाही आणि ती नोटीस उप आयुक्त यांना सन २०१५ ला सापडते. आयुक्तांनी मा. उच्च न्यायालापुढे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे की, हे पत्र मिळालेले नाही. असे असतांना सुध्दा उप आयुक्त, त्याच्या नंतर तीन वर्षामध्ये हे पत्र शोधतात आणि त्याच्यामध्ये यावरच ते थांबत नाही. या पुढे जाऊन उप आयुक्त महाशय म्हणतात आय से दॅट दि प्लानिंग अॅथारिटी इन दि परसन ऑफ दि प्रिपरेशन ऑफ दि रिझॅव्ह डेव्हलेपमेंट प्लॅन हॅज रिम्युज दि रिझॅव्हरेशन फॉर्म दि सेल अॅन्ड रसिडेनशियल झोन म्हणजे आमचा जो नविन प्लॅन गेला आहे. तो ३१ कामे मंजुर करायला दिला आहे. त्याच्यामध्ये तुम्ही हे सगळे क्षेत्र तुम्ही वगळा आर झोन तुम्ही त्यांना दया. हाऊसिंग किंवा डिझहाऊसिंग आणि खेळाचे मैदान वगळा, आणि तशी न्यायालयाची दिशाभूल करून सन्माननिय आयुक्त साहेब हा सगळा प्रकार घडवून आणला आणि हायकोर्टाची मान्यता घेतली. मला असे म्हणायचे आहे, की या सगळया गोष्टी होत असतांना आपण उल्हासनगर महानगरपालिकेने आपल्याकडे जागा नाही म्हणून आपण सकाळपासून चर्चा करीत अहोत. परंतु ही एक नोटीस तिथे दिलीच नाही. ती २००५ मध्ये कशी काय मिळाली? या आदेशाच्या विरूध्द आपण रिटपिटीशन परत का केले नाही. मा. आयुक्त साहेब आपण या मधल्या काळामध्ये नव्हते, या मधल्या काळामध्ये शिंदे साहेब म्हणून आयुक्त होते. काही प्रशासनाचा विषय नसतांना सुध्दा दोन पक्षाचा विषय असतांना त्यांनी दुस—या एका पक्षाची बाजू मांडण्या करीता वरिष्ठ वकिल दिले होते. जेणेकरून त्यांचा काहीच संबंध नाही. परंतु ही महानगरपालिकेला मिळणारी जागा, महानगरपालिकेला ती पर्चेस नोटीस दिलेली असतांना ती दिलीच गेली नाही. असा बनाव असतांना महानगरपालिका आपली बाजू नीट मांडू शकली नाही आणि हया सगळया लोकांनी ज्या ज्या लोकांनी याच्यामध्ये सांगितले की हे पेपर मिळाले नाहीत. मग २०१५ नंतर पेपर मिळाल्या नंतर त्यांच्यावर काय कारवाई केली. महानगरपालिकेला साहेब आपण हा प्लॉट बघितला तर तो थोडा फार नाही. साडे नऊ हजार पेक्षा जास्त चौरस फुटाचा आहे आणि आज ही तो प्लॉट रिकामा आहे. उल्हासनगर शहरामध्ये आज रस्तारूंदीकरणामध्ये बाधित झालेल्या लोकांनी कुठे राहयचे आहे. हा प्रश्न तिथे निकाली निघाला असता. एक चांगले मैदान आज त्या एरियामध्ये कारण गोल मैदान जे आहे, त्याचे चार तुकडे झाले आहेत. त्यामुळे त्या सभोवताली आणि त्या परिसरामध्ये त्या लोकांना एक चांगले मैदान तिथे मिळाले असते, चांगले उद्यान तिथे डेव्हलेपमेंट करू शकलो असतो, महानगरपालिकेची एक चांगली स्किम राबवू शकलो असतो. परंतु बिल्डर धार्जिण्या, ज्या काही तुमच्या सरकारी लोकांनी मी थेट आरोप करीन कारण की, हे पत्र तुमच्या कार्यालयामध्ये, महानगरपालिकेमध्ये दिले गेले असतांना सुध्दा ते दिले गेले आहे आणि

त्यामध्ये सन २००८ ते २०१५ असा सात वर्षाचा प्रवास या एका पत्रावर पर्चेस नोटीस देतांना त्याच्या बरोबर त्यांनी जे पुरावे दयायला पाहीजे होते. ते काहीही ने देता, फक्त एक पत्र सामान्या प्रशासनाला देवून कोर्टा समोर अशी बाजू मांडली की, महानगरपालिका आम्हांला काही देवू शकत नाही. म्हणू आम्हांला हे प्लॉन आम्हांला परत दया आणि तिथले रिर्झव्हेशन चेंज करा, असा आदेश मा. उच्च न्यायालयाकडून घेतला. साहेब खरे म्हणटले तर मघाशी चौधरी साहेबांनी सांगितले की बरेचशे घोटाळे, बरेचशा या ज्या काही घटना आहेत. त्या तुमच्या समोर त्यांनी मांडल्या आहेत. असे असतांना याच्यामध्ये कुठल्याही प्रकारची चौकशी नाही. चौकशी तुम्ही कधी करणार आज याच्यामध्ये आपल्याला रिव्यु दाखल करायला पाहीजे. कारण हा एवढा मोठा प्लॉट आपल्याला मिळाला पाहीजे. आपल्याला इथे रिव्यु दाखल करता येत नसेल तर आपण सुप्रिम कोर्टात जायला पाहीजे. साहेब आपण थोडया दिवसापुर्वी बोलला होता. प्रभाग समिती क्र.४ मध्ये आपली मिटींग झाली होती, आपला डंपिंगचा विषय प्रलंबित होता की आपल्याकडे जागा मिळत नाही. उद्या मुलांना खेळायला मैदान मिळणार नाही. बांधीत होणा–या लोकांनी कुठे रहायचे, रस्ते रूंद कसे करायचे हा विषय तुमच्या समोर आहे. अशा वेळेस आपल्या समोर हा प्लॉट असतांना प्रशासनाने का डोळेझाक केली? मला तर म्हणायचे आहे की हे सगळ प्रकरण सन्माननिय माझे पत्रकार बंधू बघतात. त्या सगळयांना मी विनंती करील की, याच्या मागे जो कुणी आहे, त्याचा पडदाफाश झाला पाहिजे. हे पत्र कसे काय आले? सन २००८ मध्ये दिलेल्या पत्र, त्याचे उत्तर सन २०१२ ला मिळते, तीन वर्षात, परंतु प्रशासनाला मात्र पत्र सापडत नाही, प्रशासनाला ते रजिस्टर सापडत नाही. सन २०१२ च्या नंतर सन २०१५ मध्ये ते रजिस्टर सापडते. अशी काय जादू होती की, ते रजिस्टर फक्त तीन लोकांना दिसते. एक श्री. सिकंदर हिवाळे, एक नितीन कापडणीस साहेब आणि रमेश काजळे बाकीचे लोक निष्कर्ण आहेत त्यांचे काय? त्यांनी कपाटाचे खण शोधले, सगळे ठिकाण शोधले मग ते रजिस्टर जिवंत कसे झाले. सर एवढया मोठया कालावधीमध्ये काहीही होऊ शकते. ज्या ज्या लोकांनी हा फेर बदल केला आहे. यावर आपण सर एक चौकशी नेमावी, त्यांच्यावर कठोर कारवाई करावी. त्याच्या अगोदर हायकोर्टाने या आदेशात सहा महिन्याची मुदत दिलेली आहे. सर ही कॉपी अपलोड झाली ०७/३/२०१७ ला आणि डाऊन लोड झाली ०१/७/२०१७ ला आपल्याकडे वेळ आहे. जर का हा मुद्दा वेळेत आणला नसता तर डि.पी. मध्ये चेंज करून नंतर आपल्याला कुठल्याही प्रकारचा याच्यावर बोलण्याचा किंवा अपिल करण्याचा प्रश्न राहीला नसता. परंतु या अशा काही गोष्टी नगरपालिका प्रशासनाने आपल्या पासून लपवून ठेवल्या, महानगरपालिकेचा जो तुमचा विधी विभाग आहे, त्यांनी तुम्हांला सांगायला पाहीजे होते. परंतु त्यांनी तसे काही सांगितले नाही. आपण यावर निर्णयाच्या नंतर महानगरपालिका जर का केस हारते त्याच्या विरोधात आपण अपिल दाखल करायला पाहीजे होते. परंतु तसा अपिलही आपण दाखल केला नाही. आयुक्त साहेब गंभीर विषय आहे. या मध्ये महानगरपालिकेची खुप मोठी बदनामी आहे. एक पत्र देवून जर का हा निर्णय महानगरपालिकेच्या विरोधात जात असेल तर आज जेवढे उप आयुक्त, आय.एस. आय. अधिकारी, एवढे लिपीक, कर्मचारी, शिपाई या सगळयांना कोणालाही पत्राची माहीती नसतांना या पत्राचे अफरातफर करून हा निर्णय होतो, ही गंभीर बाब आहे. आयुक्त साहेब आपण या हायकोर्टाच्या रिटपिटीशनच्या विरूध्द मध्ये रिट याचिका पुनश्च दाखल करा. जर का पुनश्च रिट याचिका दाखल होत नसेल, तर मा. सुप्रिम कोर्टामध्ये आपण रिट याचिका दाखल करा. आपल्याकडे वेळ आहे आणि आपण चौकशी आदेश लावा. संपुर्ण उल्हासनगर शहर, आज सर आपल्याकडे बघते, आज पहील्यांदा जमिन घोटाळा उघडकीस येत आहे, तो पण एवढा मोठा आणि याच्या मध्ये चौधरी साहेबांनी सांगितले की, कितीतरी असे घोटाळे आहेत. परंतु तुमच्याकडे हा एक नमुना आहे आणि ही सुरूवात आहे. कागदपत्रासह पुरावे साहेब मी तुम्हांला दिलेला आहे आणि हे सर्व पुरावे मा. उच्च न्यायालयामध्ये सादर केले गेलेले आहेत, त्यामुळे एक्झीबिट झालेले आहेत. त्यामुळे हा तुम्हांला नजरबाहय करता येणार नाही. तरी माझी विनंती आहे की, या प्रकरणामध्ये सखोल चौकशी लावावी. या प्रकरणामध्ये जे अधिकारी/कर्मचारी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करावी आणि आपण विधी विभागाला आदेश दयावेत की यावर तुरंत रिटपिटीशन पुनश्च म्हणजे फेर चौकशीसाठी रिव्यु दाखल करू शकतो. जर दाखल करता येत असेल तर दाखल करा किंवा मा. सुप्रिम कोर्टामध्ये याच्या विरूध्द दाखल करून ही जमीन आपल्याला परत मिळवा. महापौर मॅडम आज मी सदस्या, ज्योत्सना सुरेश जाधव यांचे खरोखर कौतुक करेल आणि मी आमचे सन्माननिय सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी साहेबांचे कौतुक करेल की, हे काही असे संपुर्ण घोटाळे आहेत, त्यांनी सुरूवात तर केली, त्यामध्ये सुरूवात केली, ती जी जमीन आपल्याला मिळणार होती ती, आज संपुर्ण सभागृह मॅडम शांतपणे ऐकत आहे. संपुर्ण सभागृहाला माहीती आहे की, याच्यामध्ये अधिकारी किती आहेत आणि कर्मचारी किती आहेत. काल आपण ऐकले अधिका–यांच्या बाबतीत मिना सोंडे मॅडम पण जोर जोरात ओरडत होत्या. कारण की अधिकारी अकार्यक्षम आहेत, सक्षम नाहीत. आज सभागृहाच्या सगळया लोकांना माहीती आहे. अधिका–यांनी ही गोष्ट जर का आयुक्त साहेबांच्या निदर्शनास आणून दिली असती, विधी विभागाने निदर्शनास आणून दिली असती तर मला वाटते आज एवढा मोठा प्लॉट आज आपल्या ताब्यात असता आणि आपण याच्यामध्ये काही तरी करू शकलो असतो. खरे म्हणटले तर महापौर मॅडम, तुमच्याकडे मी खुप आशेने बघतो की, आपण वरती

स्टेजवर बसून प्रत्येक गोष्टीचा निवारण करतात. आज हया पण गोष्टीं करीता आयुक्त साहेबांना सांगा की, याच्या मध्ये रिटपिटीशन दाखल करा, सुप्रिम कोर्टामध्ये याचिका दाखल करा आणि याच्यामध्ये वरिष्ठ वकिल उभे करा, त्या वरिष्ठ वकिला करीता ५, १०, ५० लाख रूपये फी गेली तरी दया, पण या भुखंडाची किंमत तुम्ही जर ऐकाल तर तुमच्या पायाखालची वाळू सरकून जाईल. या भुखंडाची किंमत आजच्या रेडीरेकनच्या रेट मिटरला आहे. १८,१००/— रूपये, १८,१००/— रूपये X १९,२०० चौरस वाल X १०.७६, १,७३०५१/— स्केअर फुट याला आज रेडीनेकरनची किंमत आहे, आर. आर. प्रमाणे बाजार मुल्य आर. आर. प्रमाणे जो रेट शासनाचा आहे २९,११,३०९/— रूपये, आर. आर. प्रमाणे साहेब, आपण खरोखर हा विषय गंभीरतेने घ्या. एवढी माहीती जमा केलेली आहे आणि या माहीतीच्या अधिकारामध्ये तुम्ही जर चौकशी लावली नाही किंवा रिव्यु दाखल केले नाही किंवा तुम्ही मा. सुप्रिम कोर्टामध्ये याचिका दाखल केली नाही, तर आज त्याची सभागृहामध्ये चर्चा होईल. चर्चेचा काहीही होणार नाही, तरी माझी विनंती आहे, संपुर्ण सभागृहाला विनंती आहे की आपण कुठल्याही बिल्डरधार्जीण्या लोकांना पाठिशी घालू नका. हे घोटाळे उघडकीस करण्या करीता संपुर्ण शहराने आपल्याला निवडून पाठविलेला आहे, मला तर पक्षाने पाठविलेले आहे. पक्षाची भुमिका आणि या सभागृहाची गरीमा मी राखत आहे. महापौर मॅडम, आपण ही गरीमा राखा आणि याच्यामध्ये आदेश दया की, याच्यामध्ये तुम्ही तुरंत रिटपिटीशन याचिका दाखल कराल, दोषी अधिका—यांवर कारवाई कराल. ज्यामध्ये फेर बदल केले आहेत त्यामध्ये एक्सपर्ट पिटीशनरला सांगून पुण्याला पाठवून तिथे रजिस्टर असतील ते तपासा, नसतील तर का नाही ते तपासा आणि हायकोर्टामध्ये आपण वरिष्ठ वकिल देवून ही जागा परत मिळवावी, असे मी सभागृहाला विनंती करतो.

<u>सदस्य, श्री. सुरेंद्र सावंतः—</u> आयुक्त साहेब, खरोखर आजच्या महासभेमध्ये नवनिर्वाचित नगरसेविका श्रीम. ज्योत्सना जाधव यांनी या शहराचा खुप अभ्यास केलेला आहे, त्यांना या सभागृहामध्ये येऊन फक्त तीन ते चार महीने झालेले आहेत. परंतु माझ्या माहीती प्रमाणे त्यांनी आज जो मुद्दा उपस्थित केलेला आहे, मला असे वाटत नाही की, त्यांचा २५ वर्षाचा अनुभव आहे. त्यांच्या पाठिशी त्यांचे पती देव असतील, सुरेश जाधव असतील त्यांचे पण मी अभिनंदन करतो आणि या ठिकांनी आजचा जो मांडला, अरूण अशान साहेबांनी यांचे पण अभिनंदन करायला पाहीजे आणि त्या ठरावाला राजेंद्र चौधरी साहेबांनी पण अनुमोदन दिले, त्यांचे पण अभिनंदन केले पाहीजे आणि खरोखरच एवढी मोठी जागा आपल्याकडे उपलब्ध असतांना जवळ जवळ साडे नऊ हजार स्केअर फुट जागा असतांना आपण मगाशी सांगत होता की, आयुक्त साहेब, आम्हांला पर्यायी जागा नाही, दुकानदारांना पर्यायी जागा नाही. एवढा मोठा प्लॉट असतांना आपण दुसरीकडे बघत अहोत. तर माझी अशी आपल्याना विनंती आहे की, सभागृहाला सुध्दा नम्र विनंती आहे की, आपण अशा प्रकारचे प्लॉटस आपल्या ताब्यात घ्यावेत. अरूण अशान यांनी सांगितल्या प्रमाणे जर आपण हायकोर्टामध्ये पुनश्च याचिका दाखल करू शकलो नसलो तर आपण सुप्रिम कोर्टामध्ये जाऊ या परंतु एवढा मोठा प्लॉट आपण आपल्या ताब्यात घेऊ . एवढेच मला सांगावसे वाटते, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u> ज्योत्सना मॅडमनी जरी प्रस्ताव आणला असला तरी त्याची मागची भुमिका श्री. अरूण अशान यांनी स्पष्ट केली आहे. साहेब असे २००९ पासून ते २०१५ पर्यंत जे पत्र अस्थित्वातच नाहीत. त्या पत्राची अशी विल्हेवाट लावून, खोटे पत्र कोर्टाच्या समोर सादर करून ते पत्र सादर केले नाही. ते पत्र हाय कोर्टालाही दिलेले नाहीत. फक्त एका अधिका—याने सांगितले की ते पत्र उपलब्ध आहे. त्या अनुषंगाने ती जागा ज्या बिल्डराने बळकावण्याचा हा घाट रचला आणि त्याला मिळाली. मधल्या काळात आपण काय निर्णय घेणार, एवढया मोठया जागेचा निर्णय घेणे गरजेचे आहे. नाही तर गोल मैदान सारखी जागा असेल, सपना गार्डन असेल, बोट क्लब असेल अशा सगळयाच जागा मला वाटते भविष्यकाळामध्ये अशा अधाराने निघून जाऊ शकतात. दुसरी गोष्ट अशी आहे की, मनोज लासींना मला वाटते कदाचित याची कल्पना नसेल, सन्माननिय आयुक्त साहेब तुम्हांला मी सांगतो, दोन चार दिवसापुर्वी मा. आमदार साहेबांचे पत्र मी वाचले आहे, याच संदर्भातील आहे. मला वाटते कदाचित तुम्हांला कल्पना असेल.

<u>सदस्य, श्री. मनोज सयानीः—</u>भगवान भालेराव साहेब, आम्हांला याची सर्व कल्पना आहे. आम्हांला माहीत आहे, तो असर कुठे होणार. आम्ही जो बाण सोडला आहे, त्याचे असर कुठे होणार आहे. इथे होणार किंवा तिथे होणार ते पण आम्हांला माहीत आहे.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेरावः—</u> विशेष म्हणजे आपल्या शहराच्या आमदारांनी पण हा मुद्दा उचलेला आहे. इथे सभागृहामध्ये आमचे अरूण आशान आणि ज्योत्सना मॅडमनी उचलेला आहे. हा विषय किती गंभीर आहे. शहराच्या ज्या असलेल्या जागा, हडपण्याच्या बिल्डरांकडून हा जो डाव आहे. विशेष म्हणजे आयुक्त साहेब, कुणाची सभागृहाची वाट न बघता आपण आपल्या पातळीवर हा निर्णय घेतला पाहीजे आणि त्वरीत निर्णय घेऊन, या मुदतीच्या आत, सर्वोच्च न्यायालय किंवा हायकोर्टामध्ये पुनश्च याचिका ही दाखल करून ताबोडतोब या जागेचा भविष्यात निर्णय लागला पाहीजे, तर कोणी असा बिल्डर आपल्या जागा जर

हडपण्याचा प्रयत्न करीत असेल तर त्याच्यावर गुन्हा दाखल झाला पाहीजे आणि ज्या ज्या अधिका—याने मध्ये कापडणीस सारखे अधिकारी असतील, कापडणीस सारखे अधिकारी एवढी मोठी चुक करू शकतो. हे जेव्हा हायकोर्टाकडून आपल्या निदर्शनास यायला लागले. तर याचीही चौकशी झाली पाहीजे आणि याच्यामध्ये जे जे असतील, भले राजकारणी असतील, बिल्डर असतील जे कोणी असतील, त्यांच्या सर्वांवर कारवाई झाली पाहीजे. अशी काही तरी ठोस यंत्रणा महानगरपालिकेच्या वतीने झाली पाहीजे, अशी मी विनंती करतो.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:— महापौर मॅडम, उप महापौर साहेब, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, हा जो अशाकिय प्रस्ताव श्रीम. ज्योत्सना सुरेश जाधव यांनी आणलेला आहे. खरोखरच आता जेव्हा माझे मित्र बोलत होते. तर हा प्रस्ताव त्यांनीच आणायला पाहीजे होता. पण मला वाटले की, तो का आणला नाही, कारण ते स्विकृत सदस्य आहेत. स्विकृत सदस्याला असे अशाकिय प्रस्ताव आणता येत नाही. आमचे मित्र अरूण अशान यांनी अभ्यास खुप केला आहे. त्यांना मी धन्यवाद देतो. एक ४५ मिनीट मला हे सभागृह कोर्टचा रूम वाटत होता. बारकाईने सांगितले आहे. या तारखेला इथे पत्र गेले, मला यांचे धन्यवाद करायला काहीही हरकत नाही की, हे चांगले वकिल होऊ शकतात. अजूनही वेळ आहे, एल.एल.बी. मध्ये प्रवेश घेतला तर चांगले वकिल होऊ शकतात. पण कसे आहे, आपण या विषयावर मी सर्वात अगोदर हेच सांगणार आहे की, प्लॉटवर जर कोणत्याही महानगरपालिकेने रिझर्वेशन टाकले असेल म्हणजे ती मालमत्ता महानगरपालिकेची असते. माझे असे म्हणने आहे, की जर रिझर्वेशन जागा महानगरपालिकेच्या जर डेव्हलेपमेंट प्लॉनमध्ये लागली, याचा अर्थ कदापी नाही की, ती जागा महानगरपालिकेची झाली. जो पर्यंत आपण ताबा घेत नाही, १९७० च्या प्लॉनमध्ये खुप जागेंवर आपण रिझर्वेशन लावलेले आहेत. आता मी तुम्हांला सांगतो की, आपण २०१४ मध्ये जो नविन डि.पी. प्लॉन पास केला, त्याच्यामध्ये ६९५ जागांना आपण रिझर्वेशन होते, त्याच्यात बदल केले. त्याच्यात आमचे काही इकडचे मित्र जे होते. त्यांचाही मी तुम्हांला इतिवृत्त वाचून दाखवत आहे. त्या वेळी आज ते आमच्या सत्तेमध्ये नाहीत, तर उद्या ते सत्तेमध्ये राहतील तर त्यांनी काय सांगितले होते, आता आपले धनंजय बोडारे साहेब, गेल्या २४ डिसेंबर पासून आज पर्यंत मला वाटते की, ही सहावी किंवा सातवी महासभा आहे, त्यासाठी सर्व पक्षीय गटनेते व पदाधिकारी, विरोधी पक्ष नेते, सभागृह नेते, महापौर, उप महापौर, सर्व अअधिकारी एकत्र बसले, अगोदर सुरूवातील शेफ्ट ज्या कंपनीने तयार केलेला नकाशा आणि त्यावर ६ जुनला हा नकाशा, ४ एप्रिलला प्रसिध्द झाला. त्या नंतर दोन महीने लोकांच्या सुचना व हरकती मागविण्यात आल्या होत्या आणि ६ पासून साधारणत: जी तज्ञ समिती महापालिका तीन प्रतिनिधी आहेत. अशी ही समिती होती. लोकांच्या सुनवण्या घेण्यात आल्या आणि मग त्यांचा अंतिम अहवाल दिला. मी आज सभागृहा समोर अंतिम अहवाल शेफ्ट कंपनीला प्रारूप विकासाचा आराखडा दिला गेला. त्यातून सर्व सुधारणा करून शेफ्ट कंपनी मुळात तथ्य दिलेल्या आणि केलेला बदल, जो बदल केलेला आहे, ते मी नमुद करतो आणि आयुक्त साहेब, त्याची काटेकोरपणे काळजी घ्यावी. म्हणजे आपले मागचे सभागृह नेते म्हणतात की ... ..

सदस्य, श्री. धनंजय बोडारे:— एक मिनिट माझा उल्लेख करतात, नक्की काय वाचतात ते मला कळू दया.

सदस्य, श्री. अरूण आशान:— रामचंदानी साहेब आपण जो मुद्दा उपस्थित केला आहे, त्याच्या बदल मी बोलतो, ही महानगरपालिकेची जागा नाही असे मला म्हणायचेच नाही. आपण समजत नाही, रामचंदानी साहेब आपण विषय बदली करत आहेत. प्रदिपजी आपण जरा दोन मिनिट ऐका हा जो प्लॉट आहे...

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:— जेव्हा तुम्ही बोलत होता, तेव्हा ४५ मिनिट आम्ही काहीच बोललो नाही.

सदस्य, श्री. अरूण आशान:— परंतु आपण सभागृहाची दिशाभुल करीत आहेत. आम्हांला म्हणायचे होते ते तुम्ही ऐकुण घेतले नाही. तुम्ही आमची प्रसंशा केली.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:— मी तुम्हांला काय सांगतो जेव्हा माझे बोलणे संपेल तेव्हा माझ्या ज्या काही त्रुटी असतील तर तुम्ही बोला. माझे बोलणे संपू दया,

सदस्या श्रीमती लिलाबाई आशान:—गप्प बसा, माझ्या मुलाला बोलु दया. बोलुच नका काही.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—आई मी सुध्दा तुमच्या मुलासारखा आहे, आई मी पण तुमचा मुलगा नाही काय?

सदस्य, श्री. अरूण आशान:— फक्त सभागृहाची दिशाभुल करू नका बोला.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:— जर मी दिशाभुल करतो, तर तुम्ही त्याची दिशा सुधारा. तुम्हांला संधी मिळणार आहे. जेव्हा तुम्ही बोलत होते, तेव्हा आम्ही गुपचुप ऐकले आता आमचे ऐका. आपण जेव्हा २०१४ ची १९७० नंतरची २०१४ ची जी डि.पी. प्लॉन आले. त्याच्यात आम्ही ६९५ सुधारणा केल्या म्हणजे ते आम्हीच केले, त्याच्यात १५६ रिग्रेशन ओपन होते, त्यांना रहीवासी केले, याच महासभेने केले. आता हे सांगायचे आहे की, जर आपली रिझर्वेशनची जागा आपल्या ताब्यात आहे, आता तुम्हीच म्हणतात महानगरपालिकेच्या तिजोरीत खडखडाट आहे. आपण १९६० पासून एक तरी महानगरपालिकेची जागा ऐक्वायर केली आहे का? त्याला रेडीरेकननुसार पैसे दिले आहे का? त्यांना टी.डी.आर. दिले आहे का? जर काही दिले नाही, जर कोणी कुठे जातो. आपण इथे काय करतो सगळे बसून, आपण न्यायालयावर टीका करतो की,

त्यांनी चुकीचा निर्णय दिला आहे. जर न्यायालयाने चुकीचा निर्णय दिला आहे, तर आमच्या सदस्यांनी न्यायालयाची प्रक्रिया न्यायालयामध्ये आणायला पाहीजे. आता याच्यात तुम्ही सांगितले या अधिका—यानी असे केले, त्या अधिका—यांनी तसे केले, सगळेच निघून गेले. हा तुमचा अधिकार आहे. तुम्ही सतत न्यायालयात जाऊ शकतात. फक्त राजकारण करण्यासाठी आणि हे एवढया जागा आहेत, त्याच्यावर किती वस्त्या बसल्या आहेत, कित्येक रिर्झवेशन झाले. आपण आज पर्यंत कुठल्या रिर्झवेशनची खरेदी केली आहे का? जरी पण आपल्या नगरविकास विभागाची काही लोक असतील तर मला सांगावे की, आपण १९७४ पासून आज पर्यंत किती रिर्झवेशन टाकलेले आहेत, त्याची जागा आपण एक्युपायर केलेली आहे. जर आपण एक्युपायर करू शकत नाही. आपल्याकडे पैसे नाहीत, मग ती जागा आपली झाली कशी? मला सांगा आजघोटाळा झाला तुम्ही त्याच्यावर चौकशी कराल....

सदस्य, श्री. अरूण आशानः— प्रदिपजी आपण विषय बदली करत आहेत. आपण विषय निट ऐकला नाही पण आपण पहीले सभागृहाला सांगितले आहे की, मी झोपलो होतो. आपण पहिला विषय चालू असतांना सांगितला पण आपण झोपेत असतात. हा पण विषय आहे का? आणि महानगरपालिकेकडे असा विषय आलाच नाही. पण महानगरपालिका पार्टी कशी बनली.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः— तुम्ही बिल्डरांचे वकिल आहात का?

सदस्य, श्री. अरूण आशानः— या विषयामध्ये महानगरपालिकेला पार्टी बनवले आहे, महापौर मॅडम.

सदस्य, श्री. भगवान भालेरावः— प्रदिपजी याच्यामध्ये राजकारण काय आहे, ते सांगा.

सदस्य, श्री. अरूण आशानः— महापौर मॅडम हे राजकारण बोलत आहेत, याच्यामध्ये राजकारण काय आहे. त्यांनी खुलासा करावा. महानगरपालिका पार्टी आहे. मा. उच्च न्यायालयाचे मी याच्यामध्ये आदेश दाखविले आहेत. प्रदिप रामचंदानी साहेब आपण अर्थाचा अन्नर्थ आणि वाक्याचा विपयार्श करीत आहेत. यामध्ये महानगरपालिका पार्टी आहे आणि महानगरपालिका पार्टी त्या केस मध्ये हारली आहे. तर त्यांनी परत रिट याचिका दाखल करायला पाहीजे किंवा त्यांनी सुप्रिम कोर्टात जायला पाहीजे असे माझे म्हणणे आहे. ही जागा, एक्युझेशन झालेली जागा एक नोटीस देऊन महानगरपालिकेच्या नावा नंतर ती फेरबदल करून मा. उच्च न्यायालयाकडून त्याच्यामध्ये रिर्झवेशनमध्ये बदलाव केलेला आहे. ही गोष्ट मी आपल्याला इथे सांगू इच्छितो. प्रदिप रामचंदानी साहेब आपण माझ्यापेक्षा वरिष्ठ आहेत, परंतु याचिका कर्ते मारवल डेव्हलपमेंटनी उल्हासनगर महानगरपालिकेला पार्टी बनवले आहे. जर का त्यांना ती जागा दयायचीच नव्हती, तर त्यांनी चेंज ऑफ नेम चेंज करून तसा प्रस्ताव त्यांनी ३१ तारखेला पाठवायला पाहीजे होता. परंतु त्यांनी उल्हासनगर महानगरपालिकेला पर्चेस नोटीस दिली. हा जो बनाव केलेला आहे, त्या विरूध्दात मा. आयुक्त साहेब, आपण कोर्टात जायला पाहीजे अशी माझी भुमिका आहे. आता बोला आपण.

महापौर तथा पिठासिन अधिकारीः— अरूणजी कृपया करून माझी एक गोष्ट, ऐका जर एकजण बोलत असेल तर, दुस—यांने मध्येच बोलू नका?

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः— ते जर चुकीचे बोलत असतील तर ऐकणार नाही.

काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, समजून येत नव्हते.

सदस्य, श्री. अरूण आशानः— महापौर यांनी राजकारणाचा विषय काढला, याच्यामध्ये राजकारण नव्हतेच. त्यांना त्याच विषयावर बोलायला सांगा.

महापौर तथा पिठासिन अधिकारीः— अरूणजी आपल्याला बोलण्याचा अधिकार आहे. प्रत्येकाला बोलण्याचे हक्क आहे, परंतु एकाचे बोलणे पुर्ण होऊ दया, मग ऐकाने बोला.

सदस्य, श्री. अरूण आशानः— महापौर मॅडम हा विषय महानगरपालिकेचा आहे, कोणाचा पर्सनल नाही. त्यामध्ये यांनी राजकारण सांगितले आहे.

महापौर तथा पिठासिन अधिकारीः— मला तुमचे पण बोलणे समजत नाही आणि त्यांचे पण समजत नाही.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानीः— अरूण अशान यांनी ४५ मिनिटे जे काही विशेष बोलेले आहेत, तुम्ही लोकांनी मुद्दा आणला आहे, तर मी सांगितले की, आपण खुप चांगला मुद्दा आणला आहे. आपण एखादया वकिलापेक्षा कमी नाहीत, मी काही त्यांना टोचून बोललो नाही. ते माझे मित्र आहेत. आपण एकदम विनम्रपणे बोललो, शब्दाला धरून बोललो. माझा सांगण्याचा अर्थ असा आहे की, अशी एकच मालमत्ता नाही की, हायकोर्टाने तीचे रिर्झवेशन बदलेले आहे. माझ्या जवळ लिस्ट आहे, अशा सहा मालमत्ता आहेत. रिट पिटीशन नं. ६४८५, ऑफ २०१० गुरू दयालसिंग, प्रितमसिंग आयलानी, उल्हासनगर महानगरपालिका ही मालमत्ता हाय कोर्टाने बदलली आहे. इंद्रदास, द्वारकादास मटलानी, यांची मालमत्ता पिटीशन नं. ६४९६, सन २०१० याच्यासाठी पण महानगरपालिकेला आदेश दिला आहे की याचे रिर्झवेशन बदलून टाका, कारण की महानगरपालिका, रिट पिटीशन नं. ६४९७, सन २०१०, अजितसिंग चिमनसिंग आयलानी, यांची पण

मालमत्ता बदली झाली आहे. गुरूबचनसिंग चिमनसिंग आयलानी, सन २०१०, ६४९८ पिटीशन नं. यांची सुध्दा चेंज झाली आहे.

यावेळी सदस्य श्री. रविंद्र बागुल, श्री. सोनु छाप्रु, सदस्या श्रीमती जया माखिजा, श्रीमती जयश्री पाटील यांनी सभागृहात प्रवेश केला.

सदस्य, श्री.सुनिल सुर्वे:— प्रदिपजी विषय हा नाही.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:— अशा प्रकारे सहा मालमत्ता बदली झाल्या आहेत. माझे विद्रवान मित्र यांना फक्त एकच मालमत्ता दिसली आहे. एक सामुहीक मुद्दा का आणला नाही? माझा सांगण्याचा अर्थ असा आहे की, आपण सामुहीक दृष्टीकोणातून शहराचे विकास करायचा आहे. तर केवळ एकच विषय घेऊन येतात. एवढया लोकांनी कोर्टाचा आधारे आरक्षण बदली केले आहेत. त्या शिवाय आपण महासभेमध्ये ६५६ आरक्षण बदली केले आहे. तर सांगायचे झाले तर ही एक प्रक्रिया आहे. सर्वात जास्त आपल्याला हे समजायचे आहे की, जी जमीन आरक्षित असते, ती त्या मालकाची असते. जो पर्यंत महानगरपालिका त्या जमीनीचा मोबदला देत नाही, तो पर्यंत. जर मोबदला वर्षा नी वर्ष देत नाहीत आणि ती जमीन त्याच्याकडे पडून आहे, त्या जमीनी आपण विषयी आपण चौकशी सुध्दा करीत नाहीत आणि मोबदला सुध्दा देत नाहीत.

सदस्य, श्री.अरूण आशान:— प्रदिपजी माझे पण हेच सांगणे आहे.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:— त्यांना मोबदला पण देत नाहीत, आणि त्यांना त्यांच्या अधिकारापासून वंचित करीत अहात. जर कोर्टमध्ये महानगरपालिकेचे अधिकारी ॲफीडेव्हीट देतात.

सदस्य, श्री.अरूण आशान:— मला सुध्दा हेच सांगायचे आहे की, पत्रच दिले नव्हते, रजिस्टरमध्ये एंटीच नाही. जर आपण कोणाचा खुलासा देत असतील तर महापौर मॅडम जर महानगरपालिका हारली आहे, तर महानगरपालिकेने अपिल करायला नाही पाहीजे. असे तुम्हांला म्हणायचे आहे का? जर अधिकारी चुकीचे करत असतील तर चुकीचे आहे, ते मान्य करायला पाहीजे का? प्रदिपजी आपण ज्या विषयावर बोलत आहात, या आणि त्या विषयामध्ये फरक आहे.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— अरूणजी यांचे बोलणे पुर्ण झाल्यावर आपण बोलू शकतात.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:— अरूणजी माझे बंधू माझी आपल्याला हात जोडून विनंती आहे की, मी फक्त दोन मिनिटात माझे बोलणे संपवतो, त्या नंतर आपण बोला. मी फक्त हेच सांगतो की, जर महानगरपालिकेने असे शपथ पत्र दाखल केले आहे, असे आम्ही पत्र दिले नव्हते. त्याच्या नंतरही कोर्ट महानगरपालिकेच्या बाजूने निर्णय घेत नाही. जर महानगरपालिका स्वत: सांगते की, असे पत्र आमच्याकडे नव्हते, होते असे माझ्या मित्राने सांगितले आहे. तर मला एवढेच सांगायचे आहे की, एकच नाही तर, संपुर्ण शहराचे रिर्झवेशन रिकामे करण्यासाठी बालेन. तर माझा पक्ष या बरोबर आहे. केवळ एका व्यक्तीला टार्गेट करणे हे ठिक नाही. कोणती पण गोष्टी सामुहीक करायला पाहीजे. माझ्या मित्राचा विषय चांगला आहे, परंतु एका व्यक्तीवर अधारीत आहे. त्यामुळे मी सहकार्य करणार नाही. हा विषय सामुहीक घेऊन या, जेवढे पण रिर्झवेशन चेंज केले आहेत, ते बदलून टाका आणि त्यांना खाली करा, मी आपल्या बरोबर आहे, धन्यवाद.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— मा. महापौरजी, हे पक्षाची भुमिका विषयी बोलत आहेत, ते खरे आहे.

सदस्य, श्री.अरूण आशान:— मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, हा शीट नं. ७६ चा नकाशा माझ्या समोर आहे. संपुर्ण सभागृह बघू शकतात. या मध्ये जे रिर्झवेशन आहे, त्यामध्ये नमुद केले आहे. हे महानगरपालिकेचे कागदपत्र आहेत. खेळाचे मैदान आणि हाऊसिंग रिर्झव ज्वेलर्स या करीता राखीव भुखंड आहे. प्रदिप रामचंदानी साहेबांनी जे सांगितले, खुप सुंदर सांगितले आहे. ही जागा महानगरपालिकेला हस्तांतर करणेसाठी २००८ ला त्यांनी जे पत्र दिले आहे. त्यांचा उद्देशच तो होता की जो पर्यंत कायदयामध्ये १२६, १२७ एम.आर.टी.पी. ॲक्टमध्ये जो पर्यंत हा लागूच होत नाही. तो हा बनाव रचण्यात आला. बाकी याच्यामध्ये फेरबदल करता येऊ शकेल. आयुक्त साहेब ही जागा, जो पर्यंत एका गाव वाल्याची भोईर, पाटील आणि वाघे नावाच्या माणसाची होती. तो पर्यंत रिर्झवेशन होते आणि आज ही आहे. म्हणजे ३१ खाली रिव्हीजनमध्ये फेरबदल करण्यासाठी टाकलेला आहे.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— अरूणजी याचे स्पष्टीकरण देऊ.

सदस्य, श्री.अरूण आशान:— जर आपण बालतात की, यामध्ये घोटाळा नाही. तर आजचे वृत्तपत्र आपण वाचले असतील, दैनिक पुण्यनगरी, दैनिक प्रहार, आणि उल्हासनगरचा उल्हास विकास यांच्यामध्ये आलेले आहे की, नगररचना विभागामध्ये घोटाळे झाले आहेत आणि त्या व्यक्तिवर चौकशी लावली आहे. मॅडम माझ्या जवळ पुरावा आहे. मी असे बोलत नाही की, ही जागा आपणाला मिळाली पाहीजे. जर कोण व्यक्ति खोटा बनाव करून पर्चेस नोटीस जर देत असेल, परंतु ती नोटीसच नाही. त्यामध्ये महानगरपालिका पिटीशन जर हारत असेल, तर माझे म्हणणे आहे की पिटीशनमध्ये रिव्यु दाखल केला पाहीजे. जर ती जमीन आपल्याला मिळण्याची शक्यता आहे, आशा आहे. तर त्यासाठी सुप्रिम कोर्टामध्ये जायला पाहीजे, हेच मी सभागृहाला सांगण्याचा प्रयत्न करत आहे.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— आता आयुक्त या बाबतीत स्पष्टीकरण देतील, मध्येच कोणी बोलू नका.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u> हा जो रिट पिटीशन ७४, ७६ सन २०१२ चा मुद्दा माझ्या समोर आला आहे आणि सभागृहामध्ये याची चर्चा झाली आहे. त्याचे पेपर माझ्या समोर आहेत, त्याच्या वरून असे वाटते की, या केसमध्ये प्रमुख दोन मुद्दे आहेत. एक सेक्शन १२६, १२७ ऑफ एम.आर. टी.पी. आणि दुसरा सेक्शन २८, ३१ हे दोन वेगळे मुद्दे आहेत, त्यामध्ये कोर्टाने शेवटी आपला जजमेंट दिला आहे. तो एक लॅप्स ऑफ पर्चेस, लॅप्स ऑफ ॲक्युझेशन डू टू दि पर्चेस नोटीस, आपण बोलत आहात की, नोटीस दिली नव्हती. कोणताही कागद उपलब्ध नव्हता. परंतु मा. उच्च न्यायालयाने जजमेंट दिली आहे. परंतु दुसरा पण जो मुद्दा आहे की, ज्याची इथे चर्चा झाली आहे. अन्य काही डी.पी. आपले रिझर्वेशन आहेत, त्यांना पण चेंज करण्याचा प्रस्ताव याच महासभेने पारीत केला आहे. त्याच्यावर शासनाच्या स्तरावर आता सेक्शन ३१ च्या अंतर्गत कारवाई प्रलंबित आहे. तर मा. उच्च न्यायालयाने तो पण मुद्दा घेतला आहे. शासन पण याच्यावर विचार करीत आहे की, रिझर्वेशन चेंज करून रेसीडेन्सी झोन बनविण्यात यावे. दुसरी गोष्ट जी माझ्या समजण्यात आली आहे की, जो त्याने पेपर दिला किंवा त्यावेळेस दिला नव्हता. समजून चला की, तो आम्हांला पर्चेस नोटीस आज देत आहेत, तरी सुध्दा आपण ती जागा आज पर्चेस करणार का? तरी सुध्दा आज पण सहा महीन्या नंतर ते लॅप्स होईल. तर मुद्दा हा नाही की, त्यांनी कागदामध्ये फेरबदल केले आहे, तर मुद्दा हा आहे की, त्याची कॅपॅसिटी ती जागा जर लॅप्स होऊन आम्हांला कोणी नोटीस देत असेल तर ती आम्ही पर्चेस करू शकतो किंवा नाही. दुसरी गोष्ट म्हणजे मा. उच्च न्यायालयाने जो जजमेंट दिली आहे, तो संपुर्ण फॅक्चर पोझिशन घेऊन जेजमेंट दिला आहे. आपण तो चुकीचा मुद्दा घेऊन बोलत आहेत की, हाय कोर्टाने फॅक्ट चुकीचा घेऊन जजमेंट दिला आहे. मा. उच्च न्यायालयाने जजमेंटला अपिल करण्यासाठी जे मुद्दे असतात, जसे लोअर कोर्टचे जे मुद्दे असतात ते फॅक्टवर सुध्दा आपण अपिल करू शकतो. मा. उच्च न्यायालयामध्ये तसे होत नाही, मा. उच्च न्यायालयामध्ये प्रिन्सिपल ऑफ लॉ वरतीच अपिल सुप्रिम कोर्टामध्ये होऊ शकतो. सुप्रिम कोर्टामध्ये आपण हे सांगू शकत नाही की, आमच्या कार्यालयामध्ये कागद नव्हते, फॅक्ट वर मा. उच्च न्यायालयाने चुकीचा निर्णय दिला आहे. वुई हॅव दि चॅलेंज ऑफ प्रिन्सिपल ऑफ लॉ, लॅप्स जो झाला आहे, तो पुर्णपणे चुकीचा झाला आहे. दि ओरीजनल ऑफ लॉ प्रॉपर्ली इंटरप्रिटेड मला कोणाची बाजू घ्यायची नाही. मी सुध्दा याच विषयाच्या बाजूने आहे की, डि.पी. संपुर्ण आपल्या ताब्यामध्ये यायला पाहीजे. ज्या पर्चेसवर आपण रिझर्वेशन टाकला आहे, १०० टक्के त्याच उद्देशाने ती जागा आपल्याला उपयोगात आली पाहीजे. परंतु जी सत्यता आहे ती मी सांगत आहे, कायदा जो आहे, तो मी सांगत आहे. तर प्रिन्सिपल लॉ च्या विरोधात आपण अपिल मध्ये जाऊ शकतो. आपण सुप्रिम कोर्टामध्ये हा मुद्दा घेऊन जाऊ शकत नाही. कारण की, आमच्या ऑफिसमध्ये फेरबदल करण्यात आले आहेत आणि त्यासाठी अपिल ॲडमिट करायला पाहीजे. मी सकारात्मक बोलत आहे, खरे तर मी आताच पेपर वाचले आहेत. पहीले मला या बाबतीत मला काहीच माहीती नव्हती. मी फक्त तुम्हांला कायदयाचे सांगतो. त्यामुळे आपण हायकोर्टाचे अपिल सुप्रिम कोर्टामध्ये करायची का नाही तो वेगळा मुद्दा आहे. दुसरे म्हणजे इथे शासनाच्या स्तरावर महासभेने अन्य जे रिझर्वेशन आहेत, त्यांच्यावर जे निर्णय घेतले आहेत, त्याच्यावर शासन निर्णय घेत आहे. आपण जसे बोलत अहात की, त्यानुसार आपण शासनाकडे सुध्दा पाठविणार आहे की, कागदपत्र बरोबर नाहीत. हा मुद्दा घेऊन आपण यातून वगळू नका? बाकीचे अन्य जे मुद्दे जर कव्हर करायचे असतील तर दॅट इज डिफरंट शासनाचे बरोबर आहे.

<u>सदस्य, श्री.अरूण आशान:–</u> आयुक्त साहेब, जास्त नाही पण थोडा फार कायदा मला सुध्दा माहीत आहे. गेल्या २५ वर्षापासून कायदयाचा अभ्यास करूनच मी इथ पर्यंत आलो आहे, मी काही एल.एल.बी. झालो नाही. परंतु जर का महानगरपालिके मध्ये आपण रिझर्वेशन घेऊ शकत नाही, तर रिझर्वेशन टाकतात कशाला. जर का महानगरपालिका सक्षम नाही, खेळाचे मैदान...

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u> मी तुमच्या विरोधात बोलत नाही, प्लीज समजून घ्या. मी जर असे म्हणटले याची चौकशी करतो आणि हायकोर्टाच्या विरोधात करतो तर तुम्ही समाधानी होणार तर मी चुकीची तुम्हांला माहीती देवून तात्पुरते तुमचे समाधान करणार हे मला आवडत नाही.

<u>सदस्य, श्री.अरूण आशान:–</u> नाही मला समाधान नको आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u> या गोष्टीची मी नक्कीच चौकशी करेल. या कार्यालयामध्ये अशी पर्चेस नोटीस दिली नसतांना अशा प्रकारचा ॲफीडेव्हीट केल्याची जी प्रवृत्ती आहे. ती मला नक्कीच उघडकीस आणावी लागेल. त्याच्या बदल चौकशी लावली जाईल.

<u>सदस्य, श्री.अरूण आशान:–</u> धन्यवाद, धन्यवाद.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u> दॅट इज डिफरंट.

<u>सदस्य, श्री.अरूण आशान:–</u> साहेब मी एकच सांगू इच्छितो माझे मित्र श्री. प्रदिप रामचंदानी यांनी तीन चार, पाच सहा जे नंबर सांगितले आहेत, आता माझ्या पण लक्षात राहीले नाहीत. जर का शहराचा विकास आराखडा बनतो, साहेब मी जास्त वेळ ठाणे शहरामध्ये राहतो. हे संपुर्ण सभागृहाला माहीत आहे. महापौर मॅडम, जर का शहराचा विकास आराखडा बनतो, तर त्या विकास आराखडयाच्या बरोबरीने आरक्षण टाकले

जाते. सर हा कायदा आहे, एम.आर.टी.पी. ॲक्ट प्रमाणे आपण १३ चौ.कि.मी. क्षेत्रामध्ये आजही आपण मगाशी मुद्दा चर्चेला आणला की, कर्ब्रस्तानचा मुद्दा म्हणजे रिझर्व्हेशन टाकलेले आहे. मग समजा कब्रस्तानचा तो प्लॉट जर का त्या माणसाने बदली करण्याचे ठरविले किंवा पर्चेस नोटीस त्याने अशी खोटी दाखवून ती मा.आयकोर्टामध्ये लॅप्स करून घेतली असती, तर आपण काय केले असते. साहेब असे किती मुद्दे आहेत. महानगरपालिका कुठली जागा घेण्यासाठी सक्षम नाही तर तुम्ही या एवढया प्लॅनची वाट कशाला बघता, सगळया ठिकाणी रेसीडेन्सी झोन ज्याला पाहीजे तसे त्यांनी आरक्षण टाकून घ्या. महानगरपालिकेच्या काही हरकती नाही.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u> सर्वे नंबर ५८ ची आपण गोष्ट करतात ती जागा खाजगी मालकीची राहीली नाही, ती आता आपल्या ताब्यात आलेली आहे. त्यात फक्त रिर्झव्हेशनचा बदल झालेला आहे.

<u>सदस्य, श्री.अरूण आशानः—</u> मला हेच म्हणायचे आहे की, ही पण जमीन ताब्यात येण्या करीता काही तरी प्रक्रिया झाली असेल. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, मा. उच्च न्यायालयामध्ये जी फॅक्ट दाखवली ती खोटी आहे. आम्हांला पार्टी करायची गरज काय आहे. उल्हासनगर महानगरपालिकेला, तुम्ही पर्चेस करण्यासाठी आता नोटीस दया. आम्ही घेऊ शकत नाही, असे आयुक्तांचे म्हणणे आहे. तुम्ही रितसर करा आणि ती करा. परंतु या मधल्या काळामध्ये या जमीनीचे जे घोटाळे झाले, सिडीचे जे घोटाळे झाले या मध्ये हा प्लॉट पर्चेस करून मार्वल डेव्हलेपरनी हा सगळा बनाव रचला. जर का सन्माननिय सभागृहाला माहीत आहे की, महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही. मग अशा वेळेस हे जे पेपरर्स मला मिळाले नाही, कपाटात शोधले सापडले नाहीत. २००८ नंतर २०१२ ला ॲफीडेव्हीट दिले गेले. नंतर तीन वर्ष महानगरपालिका गप्प बसून सन २०१५ ला उप आयुक्त याच्यामध्ये ॲफीडेव्हीट दाखल करतात, या मागे महानगरपालिकेचा जो खर्च झाला आहे, तो का केला? वकिलाला का एवढे पैसे घातले? तेवढे पैसे वाचले असते. या पैशामध्ये लाईट बिल दिले गेले असते, कुठल्या तरी दोन तीन कॅबिनचे, जर महानगरपालिकेला इंटरेसच नाही. मग त्या वेळेस तुम्ही पत्र का दिले? साहेब याच्यामध्ये तुम्हांला मी वाचून दाखवतो. महानगरपालिकेला वकील सादर करा, म्हणून आदेश देण्यात आले. जर का हा विषय त्यावेळच्या महापालिकेच्या आयुक्तांना माहीती आहे की, आपण ही जमीन घेऊच शकत नाही, मग तुम्ही हा शहराचा पैसा खर्च केला, हा कशा करीता केला. तुम्हांला माहीती आहे की, आपण कुठलीही जमीन आम्ही घेऊच शकत नाही. मग तुम्ही उद्या एक अध्यादेश काढा की कोणीही पर्चेस नोटीस दया, रिर्झव्हेशन चेंज करून घ्या. महानगरपालिका कोणाला पैसे देऊच शकत नाही. त्यामुळे आम्हांला या सगळयांचे रिर्झव्हेशन चेंज करून तुमच्या मनाला वाटेल, त्या प्रमाणे आर झोन, आय झोन, सी झोन या सगळया जमीनीचा बदल करा आणि महानगरपालिकेमध्ये तुम्ही जो इपी येत आहे, त्या इपीमध्ये इपी ठेवूच नका. प्लॅन थेट मंजूर करा आणि तुम्हांला कसे पाहीजे तसे क्षेत्र तिकडे वळवून घ्या. रस्त्याची जागा असेल, तो रस्ता डायवर्ट करा. कारण ती त्याची जागा असेल, माझ्या जागेतून रस्ता नको. कारण की मी पर्चेस नोटीस दिली, आयुक्त साहेबांनी घेतली नाही आणि आम्हांला पैसे दिले नाही. तो रस्ता २ नंबरचा ३ नंबर वरून, ३ नंबरचा ४ नंबर वरून असा फिरवा मग कशाला पाहीजे. नगररचनाकार, नगररचना विभाग, नकाशा कशा करीता पाहीजे हे, आज नगररचना विभाग नाही, नगरचनाकार नाहीत, तरी उल्हासनगर शहर चालू आहे. उल्हासनगर शहरामध्ये सगळयात जास्त घोटाळे हे नगररचना विभागाचे आहेत. साहेब हे आपण बघत आलेले अहात. या उल्हासनगर शहराचे दुर्भाग्य आहे की याला नगररचनाकार मिळत नाही. आयुक्त साहेब एक आय.एस. अधिका—याच्या नात्याने आपल्याकडे खुप अपेक्षेने बघत होतो. पण माझा आज अपेक्षाभंग झालेला आहे की एका आय.ए.एस. अधिका—यांनी मी ही जागा घेऊच शकत नाही. कारण मी दिवाळखोरीमध्ये आहे आणि आता याच्या पुढे कोणतीही जागा पर्चेस करू शकत नाही, असे या सभागृहाला सांगितले आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u> मी या मुद्दयावर उत्तर देत आहे.

<u>सदस्य, श्री.अरूण आशानः—</u> आज या सभागृहामध्ये साहेब, मी आलो मला पक्षाने आणले, आज मला स्विकृत सदस्य केले, ते या शहराचे मुद्दे मांडण्याकरीता. हा माझा प्रभाग नाही, माझा वार्ड नाही, मी माझ्या करीता भांडत नाही. मी सुध्दा एक व्यावसायाने बिल्डर आहे. परंतु आज माझ्या शहराची परिस्थिती एवढी बकाल आहे की, १३ चौ.कि.मी. च्या शहरामध्ये मुलांना खेळण्यासाठी जागा नाही. आज जर कुठला रस्ता बाधित होत असेल तर, रस्ता रूंदीकरणामध्ये बाधित होणा—या लोकांना राहण्यासाठी घरे नाहीत. असे रिर्झव्हेशन असतांना सुध्दा महानगरपालिकेला पार्टी बनवले असतांना सुध्दा, महानगरपालिका हारलेली असतांना हताशपणे बिल्डरच्या हातामध्ये जागा देते, हे खुप शर्मनाक आहे. साहेब मी ४५ मिनिट सतत बोलत आहे की, महानगरपालिकेने अपिल दाखल करावे आणि आपण याच्यामध्ये सतत हार मानत आहेत. साहेब याच्यामध्ये मी अशाकीय प्रस्ताव आणून प्रदिप रामचंदानी साहेब यांनी माझे अभिनंदन केले, ते अभिनंदन फुकट गेले असे मला वाटते.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u> जर मा. उच्च न्यायालयाचा जजमेंट केवळ पर्चेस नोटीसवर आणि सेक्शन १२६ व १२७ वरच असते तर १०० टक्के मी याच्यामध्ये आपले फॅक्च्युअल फॅक्ट नीट न गेल्यामुळे रिव्हयु

आपण अपिल सुप्रिम कोर्टामध्ये वेगळा विषय आहे, पण रिव्हयुसाठी आपण केले असते, परंतु आपण जर जजमेंट वाचले तर त्याच्यामध्ये फक्त पर्चेस नोटीसवर ....

<u>सदस्य, श्री.अरूण आशानः—</u> साहेब जजमेंट आपण वाचले नाही, मी जजमेंट वाचतो, प्लीज. शेवटचा पॅरा मी हेच तर सांगत आहे की, आपल्या अधिका—यांनी.. ....

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u> मला वाटते याचे मी समर्थन करत आहे, असे गैरसमज होत असेल, तेव्हा मी काही आता बोलत नाही. नेक्स्ट सभागृह डिसाईड करेल, मला कोणाची बाजू घ्यायची नाही.

<u>सदस्य, श्री.अरूण आशानः—</u> साहेब आपण बोललात की मी हे पर्चेस करू शकत नाही, म्हणजे समर्थनच आहे. साहेब, आपल्या उप आयुक्तांनी करारनामा दाखल केला आहे. आपले उप आयुक्त म्हणतात...

<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरीः—</u> मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब, माझा पण एक मुद्दा याच्यामध्ये होता. ज्यांनी बोगस सिडी सनद काढलेले आहेत. त्यावर जर आपण उत्तर दिले तर...

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u> मी एकच पॅराग्राफ वाचतो, माझ्या बद्दल विनाकरण साशंकता नको की मी याला सहकार्य करतो,

<u>सदस्य, श्री.धनंजय बोडारेः—</u> साहेब, एक मिनिट श्रीम. ज्योत्सना जाधव यांनी आणलेला मुद्दा चुकीचा आहे का? महापालिका वाचवण्यासाठी असमर्थ आहे की, घ्यायचे की नाही...

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u> मी ते पहीलेच सांगितले आहे,

<u>सदस्य, श्री.धनंजय बोडारेः—</u> प्रदिप रामचंदानी यांनी याची बाजू मांडली, महापालिकेच्या हितासाठी मांडली का? गरजच नव्हती. तुम्ही अरूण आशान, श्रीम. ज्योत्सना जाधव यांनी महापालिकेच्या हितासाठी हा प्लॉट मिळावा आणि यांनी बाजू मांडली ती तो बिल्डरला जावा, असे जर असेल तर त्यांनी जे मुद्दे मांडले ते बरोबरच आहेत. तो कोणाचा आहे, तो दुय्यम विषय झाला. परंतु प्रत्येक सदस्यांची भुमिका असली पाहीजे की, प्रत्येक प्लॉट हा सार्वजनिक हितासाठीच वापरला पाहीजे.

<u>सदस्य, श्री.अरूण आशानः—</u> महानगरपालिकेच्या वतीने मा. उप आयुक्त, नितीन कापडणीस साहेबांनी कोर्टाला सांगितले की, पॅरा क्रमांक ४ आय से दॅट दि प्लॅनिंग ॲथोरीटी इन दि प्रोसेस ऑफ प्रिपरेशन ऑफ दि रिझंर्व्हेशन डेव्हलेपमेंट प्लॉन हॅज रिव्यु दि रिझंर्व्हेशन फार्म दि सेड लॅन्ड ॲन्ड दि रिझान दि सेम अंडर दि रिझंर्व्हेशन झोन जर का महानगरपालिकाच कळविते की, आम्ही याचे रिझंर्व्हेशन चेंज केलेले आहे. तर हायकोर्ट आदेश का देणार नाही?

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u> ती फॅक्ट आहे, त्यात वेगळे काय आहे?

<u>सदस्य, श्री.अरूण आशानः—</u> म्हणून मी सांगतो हे सगळ बनाव करून केलेला आहे, धिस इज दि फॅक्ट.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u> आपल्या महानगरपालिकेनेच ठराव केला आहे, रिझंर्व्हेशन बदलण्याचा त्या वेळेस आपण दोघेही...

<u>सदस्य, श्री.अरूण आशानः—</u> मग महानगरपालिकेला कोर्टामध्ये जाण्याचा काय उपयोग होता? महानगरपालिका नसती गेली तर ते झाले असते.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u> मी माझा वैयाक्तीक खुलासा करतो की, मला याच्यामध्ये पर्सनली जर कागदाची हेराफेरी करून जर सेक्शन १२६ व १२७ वरच आधारीत जर जजमेंट असते, तर १०० टक्के मी रिव्युसाठी अर्ज केला असता. आज त्या जजमेंटमध्ये जो शेवटचा पॅरीग्राफ आहे, तो फार महत्वाचा आहे. ज्यामध्ये कोर्टानी त्यांचे जजमेंट त्याच्यावर आधारीत केलेले आहे की, महानगरपालिकेनेच ठराव करून शासनाकडे हे रिझंर्व्हेशन बदलण्याचे आणि ते वगळण्याचे ठराव केलेला आहे आणि त्या रितसर नियमा प्रमाणे शासन स्त्रावर कारवाई सुरू आहे. जर असे जजमेंट त्या ठिकाणी आहे तर आपण ते केवळ कागदाची फेरफार त्याची चौकशी करणे आणि हायकोर्टाची हे मला सिध्द करून दयावे लागेल की याच्या मध्ये एफ.आर. आय. झालेले आहे आणि त्याच्यामध्ये केवळ त्याच मुद्दयावर हे प्रकरण परत ओपन करावे आणि ते जजमेंट परत त्याच्यावर रिव्हयु करावे.

<u>सदस्य, श्री.अरूण आशानः—</u> साहेब आपण चौकशी तर लावू शकतात.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u> चौकशी मी करेल, जे तुम्ही मुद्दे मांडले आहेत, प्रशासनाच्या दृष्टीने ही बाब लाजिरवाणी आहे. जर हे प्रकरण समजा योगायोगाने आपल्या एवढे फेवरमध्ये नाही. दुसरी अशी प्रकरणे शेकडो असतील, त्याच्यामध्ये फेरफार करून आपल्या महानगरपालिकेचे नुकसान करण्याची जी प्रवृत्ती आहे, मी खरोखर त्याच्यावर ॲक्शन घेणार आहे.

<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरीः—</u> बोगस सिडी सनद कंपनीचा हा मुद्दा मी उपस्थित केला होता. त्या वर आपण काय कारवाई करणार आहेत.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u> ते सुध्दा मी तपासणार आहे, ती लिस्ट दिली आहे, मी मघाशी डायरीमध्ये लिहीले आहे.

<u>सदस्य, श्री.अरूण अशानः—</u> मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, हा मुद्दा सभागृहाला का चांगला वाटत नाही मला माहीत नाही. सभागृहाच्या लोकांनी आज एवढया वर्षामध्ये कुठे तरी एक मुद्दा

बिल्डरच्या विरोधामध्ये केवळ बोलण्याची हिम्मत केलेली आहे. त्या ज्योत्सना जाधवाचा आपण थोडया वेळा पुर्वीच मा. प्रदिप साहेबांनी स्वागत केले आणि बाकीचे सभागृह शांतपणे ऐकत आहे. मा. महापौर मॅडम आपण याच्यावर काही निर्णय दया, चौकशी लावा मी आपल्याकडून अशी अपेक्षा करतो.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** तुमचा जो प्रस्ताव आहे....

यावेळी सदस्य श्री. सतरामदास जेसवानी सभागृहातुन बाहेर गेले.

**सदस्य, श्री.धनंजय बोडारेः—** महापौर महोदया, ही महासभा आहे की काय आहे. प्रोटोकॉल नाही किंवा काहीच नाही.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरीः—** महापौरांची गरीमा कमी होत आहे, आणि आपण त्यांची काळजी घेत नाही.

**सदस्या, श्रीम.मिना सोनेजीः—** कंठे मॅड ,व्हाटस अपवर बिझी होत्या.

**सदस्य, श्री.सुरेंद्र सावंतः—** चांगले दिवस कधी येणार रामचंदानीजी.

**सदस्य, श्री.किशोर वनवारीः—** महापौर मॅडम, मी सांगतो की प्रत्येक वेळी एक एक मुद्दा येत आहे, या १० वर्षामध्ये जेवढया पण चुका झाल्या आहेत, एका वेळी ३८ प्लॉन जे पण आणायचे असतील त्यासाठी एक महासभा खास त्यासाठीच ठेवू.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरीः—** महापौर मॅडम बरोबर रूलिंग देतील, आपण बघा की महापौर मॅडमने वरतून ज्या काही बोलल्या आहेत, आता पर्यंत बरोबर बोलल्या आहेत आणि महापौरांना माहीत आहे की, हा प्लॉट मिळाला पाहीजे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारीः—** आपण आपला ठराव दया.

**सदस्य, श्री.राजेंद्र चौधरीः—** ही महासभा असा ठराव करते की, महापालिकेच्या हितासाठी असणारे जे भुखंड या शहरामध्ये महानगरपालिकेने रिर्झव ठेवले आहेत, ते भुखंड महापालिकेच्या ताब्यात राहीले पाहीजेत. या बाजूने जे कोणी आहेत...

**सदस्य, श्री.अरूण आशानः—** थांबा महानगरपालिकेच्या या अशासकिय प्रस्तावामध्ये असा ठराव करतो की, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये बिल्डरधार्जीण्या आणि अधिकारी आणि बिल्डरधार्जीण्याचे अजून काही लोक असतील, समर्थक त्यांनी कायदयाचा गैरवापर करून, कागदपत्राची अफरातफर करून महापालिकेच्या क्षेत्रातील ही मोकळी जागा, जी मुलांच्या खेळा करीता प्ले ग्राऊंड आणि रस्त्यामध्ये बाधित होणारे क्षेत्र, हौसिंग स्पॉट डिझाहौसिंग ज्वेलर्स या करीता जो राखीव भुखंड होता, त्या भुखंडाच्या बाबतीमध्ये मा. उच्च न्यायालयात जी याचिका प्रलंबित आहे, त्या प्रलंबित याचिकेवर, निकाल दिला आहे त्या याचिकेवर पुर्न विचार करून पुन्हा फेर याचिका दाखल करण्यात यावी. तसेच याचिका दाखल होत नसेल तर सुप्रिम कोर्टात महानगरपालिकेच्या वतीने ही याचिका सादर करून तिकडे नविन वकिल नेमण्यात यावा. ज्या ज्या अधिकारी/कर्मचा—यांनी याच्यामध्ये फेरबदल केलेले आहेत, अशा अधिका—यांची ॲन्टीकरप्शन मार्फत, मी तर म्हणतो ज्या ज्या लोकांनी याच्यामध्ये मदत केलेली आहे, त्यांची नार्को टेस्ट पण करा आणि उच्च न्यायालयामध्ये आपली बाजू जी पडकी होती, ती पडकी बाजू सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखवून हा प्लॉट आपल्याला मिळवून दयावा. त्या करीता उल्हासनगरच्या हितासाठी, उल्हासनगरच्या विकासासाठी, लहान मुलांच्या खेळासाठी, निर्वासितांच्या बाधित झालेल्या घरांसाठी हा प्लॉट मिळवून देण्यात यावा या करीता हा ठराव पारीत करण्यात येत आहे.

**सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानीः—** हा जो ठराव झाला आहे, तो चुकीचा आहे, आमचा त्याला विरोध आहे. त्या संदर्भात मतदान घ्यावे.

**महापालिका सचिवः—** मा. सदस्य, श्री. अरूण अशान साहेबांनी ठराव वाचून दाखविला आहे. जे या ठरावाच्या बाजूने आहेत, त्यांनी कृपया हात वर करावे.

**प्रस्तावाच्या बाजूने ३१ मते**

१. श्री. रमेश चव्हाण
२. श्री. धनंजय बोडारे
३. श्री. सुनिल सुर्वे
४. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
५. श्रीम. वसुधा बोडारे
६. श्रीम. राजश्री चौधरी
७. श्रीम. लिलाबाई आशान
८. श्रीम.चरजितकौर भुल्लर
९. श्रीम. पुष्पा बागुल
१०. श्रीम. ज्योती गायकवाड

११. श्रीम. ज्योती माने
१२. श्री. अकाश पाटी
१३. श्री. स्वप्नील बागुल
१४. श्री. सुमित सोनकांबळे
१५. श्री. विकास पाटील
१६. श्री. कलवंतसिह सोहता
१७. श्रीम. अंजना म्हस्के
१८. श्रीम. ज्योत्सना जाधव
१९. श्रीम. सुरेखा अव्हाड
२०. श्रीम.मिताली चान्पूर
२१. श्रीम. शीतल कदम
२२. श्रीम. संगीता सपकाळे
२३. श्री. चंद्रशेखर यादव
२४. श्री. राजेंद्र चौधरी
२५. श्री. भगवान भालेराव
२६. श्रीम. अपेक्षा भालेराव
२७. श्री. भारत राजवानी
२८. श्रीम. पुजाकौर लबाना
२९. श्रीम.सुनिता बगाडे
३०. श्री. प्रमोद टाले
३१. श्रीम. अंजली साळवे

ही जी प्रस्तावाची सुचना होती, अरूण अशान साहेबांनी त्यांचा ठराव वाचून दाखवला आहे. जे हे ठरावाच्या विरोधात आहेत, त्यांनी कृपया हात वर करावे.

**प्रस्तावाच्या विरोधात ४० मते**

१. श्रीम.मिना कुमार आयलानी
२. श्री. जीवन इदनानी
३. श्रीम. कंचन लुंड
४. श्रीम. ज्योती भठिजा
५. श्रीम. कविता पंजाबी
६. श्रीम. इंदिरा उदासी
७. श्री.दिपक सिरवानी
८. श्री. शंकर लुंड
९. श्रीम. जयश्री पाटी
१०. श्रीम. दिप्ती दुधानी
११. श्री. अजित गुप्ता
१२. श्री. गजानन शेळके
१३. श्रीम. ज्योती चैनानी
१४. श्रीम.मिना सोनेजी
१५. श्रीम. रेखा ठाकुर
१६. श्री. राजेश वदारिया
१७. श्रीम.चंद्रावती सिंग
१८. श्रीम. दिपा पंजाबी
१९. श्रीम. गीता साधवानी
२०. श्रीम. कविता गायकवाड
२१. श्रीम. आशा बिराडे
२२. श्रीम. डिंप्पल ठाकूर
२३. श्रीम. पंचम कालानी
२४. श्रीम. जया माखिजा
२५. श्रीम मिनाकौर लबाना

२६. श्रीम. अर्चना करनकाळे
२७. श्री. महेश सुखरामनी
२८. श्री. जमनादास पुरस्वानी
२९. डॉ. प्रकाश नाथानी
३०. श्री. किशोर वनवारी
३१. श्री. रवि जग्यासी
३२. श्रीम. लक्ष्मी सिंग
३३. श्रीम. सुभागीनी निकम
३४. श्रीम. ज्योती प्रशांत पाटील
३५. श्रीम. पुजा भोईर
३६. श्रीम. छाया चक्रवती
३७. श्री. रविंद्र बागुल
३८. श्रीम. सविता तोरणे
३९. श्री. छाप्रु सोनू
४०. श्री. हरेश जगयासी

<u>महापालिका सचिव:–</u>या प्रस्तावाच्या विरोधात ४० मते आणि प्रस्तावाच्या बाजूने ३१ मते हा बहुमताने अमान्य झाला.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u> सदरचा प्रस्ताव बहुमताने पुढीलप्रमाणे अमान्य करण्यात येत आहे

---

विषय क्र. ८:– <u>प्रस्तावाची सूचना</u>

मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्याकडील पारीत झालेल्या आदेशाचे विरोधात पुनश्च याचीका दाखल करणेबाबत किंवा मा. सर्वोच्च न्यायालय यांचेकडे अपिल दाखल करणेबाबत पालिका सदस्या श्रीमती ज्योत्स्ना जाधव यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

.<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये बिडर धार्जिण्या अधिका–यांनी कायदयाचा गैरवापर करुन व कागदपत्रांची अफरातफर करुन महापालिका आरक्षित मोकळी जागा (Recreation open space), तसेच बाधित क्षेत्रातील रहिवाशांन राहावयाची घरे (Rchoussing of dishoused hutment dweller), खेळाचे मैदान (Play Ground), या आरक्षणाचे बाबतीत महानगरपालिकेने आपल्याकडुन कुठल्याही प्रकारचे बचाव कार्य न करता, कागदपत्राचीच अफरातफर करुन ही जागा बिल्डरांना मिळवून दिली आहे. या कामी ज्या अधिकारी व कर्मचारी यांनी मदत केली आहे. अशा अधिकारी व कर्मचारी यांच्या विरुध्द कठोर कारवाई होणेबाबत, तसेच या आदेशाकरीता ज्या ज्या कर्मचा–यांनी खोटी माहिती सादर केली त्यांचे विरुध्द सखोल चौकशी होवून कारवाई होणेबाबत तसेच या आदेशा विरुध्द मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्याकडे पुनश्च फेर चौकशी करीता (Review appeal), दाखल करणेबाबत अथवा मा. सर्वोच्च न्यायालय यांचेकडे मा. उच्च न्यायालय यांच्या आदेशाविरुध्द अपिल दाखल करणेकामी या महासभेत सखोल चर्चा करणेकरीता अशासकिय प्रस्ताव मांडत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> २५ <u>दिनांक:–१९/७/२०१७</u>

सुचकाचे नाव :– श्री. गजानन शेळके
अनुमोदकाचे नाव :– श्री. अजित गुप्ता

ही महासभा उपरोक्त प्रस्ताव संदर्भात सभागृहात करण्यात आलेल्या सखोल चर्चेच्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये कायदाचा गैरवापर करून व कागदाची अफरातफर करून महानगरपालिके क्षेत्रातील मुलांचा खेळाकरिता (प्ले ग्राऊंड) तसेच रस्त्यामध्ये बाधित क्षेत्रातील रहिवाशांना राहायची जागा हडप करण्यासाठी बिल्डराला मदत करणा–या अधिकारी व कर्मचा–यांची ॲन्टीकरप्शन मार्फत चौकशी करणेस तसेच मा. उच्च न्यायालयात पुनश्च: याचिका फेरसादर करणे व त्यासाठी ज्येष्ठ काऊसिलर नेमणेस किंवा मा. सर्वोच्च न्यायालयात अपिल दाखल करणेचा तसेच पुनश्च या प्रकरणाची फेरचौकशी करणेकामीचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/—

<u>बहुमताने</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>सदस्य, श्री.सुनिल सुर्वे:—</u> शेम, शेम.
<u>सदस्य, श्री.सुरेंद्र सावंत:—</u> हा सत्तेचा गैर वापर आहे, म्हणून मी त्यांचा निषेध करीत आहे.
<u>महापालिका सचिव:—</u> विषय क्र.९ वाचून दाखवितात.

---

विषय क्र. ९:— <u>प्रस्तावाची सूचना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेत कार्यरत श्री. युवराज भदाणे जनसंपर्क अधिकारी तथा कर निर्धारक व संकलक यांचे अभिनंदन करणेबाबत श्रीमती मिनाताई सोनेजी यांची प्रस्तावाची सूचना विचारात घेणे.

---

<u>सदस्य, श्री.भगवान भालेराव:—</u> ज्यांचा सत्कार करणार आहेत, ते अधिकारी आहेत का?
<u>महापालिका सचिव:—</u> या ठरावाचे काय करायचे?
<u>सदस्या, श्रीम.मिना सोनेजी:—</u> माझा प्रस्ताव मागे घेत आहे.
<u>सदस्य, श्री.प्रदिप रामचंदानी:—</u> जे अधिकारी आहेत, ज्यांचे अभिनंदन करायचे आहे, ते रशियाला थंड हवा खात आहेत आणि दोन ठेकेदार पण गेले आहेत.
<u>महापालिका सचिव:—</u> मॅडमनी हा ठराव मागे घेतला आहे, सर्वांची संमती या ठरावाला लागेल. सर्व संमतीने मागे.
<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>मॅडमने ठराव मागे घेतला म्हणजे तो संपृष्टात आला.
<u>महापालिका सचिव:—</u>साहेब एकदा ठराव पटलावर आला की सभेची संमती लागते.

काल एक पत्र दिले होते, महापालिकेमध्ये व जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये उत्कृष्ट काम करणा—या महापालिका स्थानिका स्वराज्य संस्था यांनी प्रत्येकी एक उत्कृष्ट सदस्याची, त्यांनी केलेल्या काम, अनुभव, पुरस्कार इत्यादी विचार करून, एक सदस्य दयायचा आहे. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्याकडून एक पत्र आले होते. काल सर्वांना वाटले आहे. ज्या सदस्यांनी चांगले काम केले आहे, असा एक सदस्य सर्वसंमतीने दयायचा आहे. उत्कृष्ठ काम, ज्यांना अनुभव असेल, पुरस्कार इत्यादी सर्व बाबी विचारात घेऊन त्यांच्या नावाची शिफारस करायची आहे.
<u>सदस्य, श्री.भगवान भालेराव:—</u> या ठिकाणी मला वाटते की, उत्कृष्ट काम कलेले एकमेव आणि जूने जागते श्री. धनंजय बोडारे, यांचे नाव सभागृहाने सर्वसंमतीने दयावे असे मला वाटते.
<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:—</u> मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, हे पत्र आम्हांला अजून मिळाले नाही.
<u>महापालिका सचिव:—</u> कालच वाटप केले आहेत.
<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:—</u> काल वाटले आहेत, परंतु काल महासभा संपायला ७.०० वाजले होते. याच्यावर चर्चा झाली नाही. आम्ही चर्चा करून, मा. आयुक्त, साहेब यांचेकडे सर्व गटनेत्यांची बैठक घेऊन चर्चा करून नाव देण्यात येईल.
<u>महापालिका सचिव:—</u> ही सभा संपली आहे.

सायंकाळी ६.५० वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)

महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—२०/४/२०१७

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/४/२०१७ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

५

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा गुरूवार दिनांक २०/४/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती मीना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मीना कुमार आयलानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. अर्चना गोकुळ करणकाळे | ३२ | श्री. राजेश नानिकराम वदारिया |
| ४ | श्रीम. पुजा सचिन भोईर | ३३ | श्रीम. डिंम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) |
| ५ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३४ | श्रीम. दिपा नारायण पंजाबी |
| ६ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ३५ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता |
| ७ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३६ | श्रीम. पुष्पा नाना बागुल |
| ८ | श्रीम. मीना कौर अजितसिंग लबाना | ३७ | श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी |
| ९ | श्रीम. पंचम उमेश कालानी | ३८ | श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल |
| १० | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३९ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी |
| ११ | श्रीम. आशा नाना बिराडे | ४० | श्री. रवी किशनचंद जग्यासी |
| १२ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४१ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी |
| १३ | श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४२ | श्रीम. कविता लाल पंजाबी |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४३ | श्री. जीवन चंद्रभान इदनानी |
| १५ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४४ | श्रीम. सविता प्रविण तोरणे (रगडे) |
| १६ | श्रीम. सुरेखा हनुमंत आव्हाड | ४५ | श्री. गजानन प्रल्हाद शेळगे |
| १७ | श्रीम. अंजना अंकुश म्हस्के | ४६ | श्रीम. ज्योती प्रकाश बठिजा |
| १८ | श्री. कलवंतसिंग गुरूदेव सोहटा | ४७ | श्रीम. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| १९ | श्रीम. मिना कुमार आयलानी | ४८ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| २० | श्रीम. गीता लालचंद साधवानी | ४९ | श्रीम. ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| २१ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ५० | श्रीम. ज्योती शामराव माने |
| २२ | श्रीम. रेखा अशोक ठाकुर | ५१ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| २३ | श्रीम. सरोजिनी टेकचंदानी | ५२ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| २४ | श्री. जया प्रकाश माखिजा | ५३ | श्रीम. मिताली राजेश चान्पूर |
| २५ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५४ | श्रीम. लिलाबाई लक्ष्मण आशान |
| २६ | श्रीम. अपेक्षा भगवान भालेराव | ५५ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| २७ | श्रीम. शुभांगीनी निकम | ५६ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| २८ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५७ | श्रीम. वसुधा धनंजय बोडारे |
| २९ | श्रीम. छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ५८ | श्रीम. दिप्ती नविन दुधानी |
| ३० | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ५९ | श्रीम.ज्योती रमेश चैनानी |
| ३१ | श्रीम. चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ६० | श्रीम. कांचन अमर लुंड |
| | | ६१ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| ६२ | श्रीम. सुनिता बाबुराव बगाडे | | |
| ६३ | श्रीम. पुजाकौर श्यामसिंग लबाना | | |
| ६४ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) | | |
| ६५ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी | | |
| ६६ | श्रीम. अंजली चंद्रकांत साळवे | | |
| ६७ | श्री. प्रमोद नामदेव टाले | | |
| ६८ | श्रीम. कविता सुधिर बागुल | | |
| ६९ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे | | |
| ७० | श्री. किशोर नारायणदास वनवारी | | |
| ७१ | श्रीम. मिना चंद्रगुप्त सोनेजी | | |
| ७२ | श्रीम. मिनाक्षी रवी पाटील | | |
| ७३ | श्री. विजय चाहू पाटील | | |
| ७४ | श्रीम. कविता सुरेश गायकवाड | | |
| ७५ | श्री. आकाश परशुराम पाटील | | |
| ७६ | श्री. विकास परशुराम पाटील | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. अशोक बच्चुमल छापु, २. श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग, ३. श्रीम. शीतल चंद्रकांत कदम,

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. डॉ. सुधाकर शिंदे, आयुक्त
२. डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
३. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
४. श्री. जमीर लेंगरेकर, उप आयुक्त (मुख्यालय)
५. श्री. दादा पाटल, मुख्य लेखाधिकारी
६. श्री. राम जैसवार, शहर अभियंता
७. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
८. श्रीम. मंगला माळवे, सहाय्यक आयुक्त, मालमत्ता विभाग
९. श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
१०. श्री. श्री. विनायक फासे, उप मुख्य लेखा परिक्षक

११. श्री. अशोक जाधव, लेखा परिक्षक
१२. श्री. बालाजी लोंढे, सहाय्यक आयुक्त
१३. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय अधिकारी
१४. श्रीमती विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
१५. श्री. नंदलाल समतांनी, प्र. सहाय्यक आयुक्त
१६. श्री. एकनाथ पवार, प्र. स्वच्छता निरीक्षक
१७. श्री. अजीत गोवारी, प्र. सहाय्यक आयुक्त
१८. श्री. संतोष लोणे, कनिष्ठ अभियंता
१९. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
२०. श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी
२१. श्री. दिपक ढोले, कनिष्ठ अभियंता
२२. श्रीमती अलका पवार, प्र. सहाय्यक आयुक्त
२३. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता
२४. श्री. भास्कर मिरपगार, प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी
२५. श्री. दत्तात्र्य जाधव, प्र. सहाय्यक आयुक्त
२६. श्री. भुषण पाटील, कनिष्ठ अभियंता

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा पाटील
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळू भांगरे

दुपारी ०३.१८ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u> दिनांक २०/४/२०१७ रोजीची ३.०० वाजेची सभा आहे. ३.१८ मिनीटे झाली आहेत. विषय क्र. १ प्रश्नोत्तर आहेत प्रश्न क्र. १ हा श्री. भारत राजवानी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. १ :–</u> १. उल्हासनगर महानगर पालिका क्षेत्र में बोधकाम नियमाधिन करणे हेतू राज्य सरकार व्दारा सन २००६ में एक अध्यादेश जारी किया है। उस अध्यादेश व्दारा पालिका प्रशासन की तरफसे पालिका क्षेत्र मे आने वाले कितनी प्रॉपर्टी ऑनर्स को नोटीस जारी की है इस की विस्तृत जाणकारी दि जाये ।

अ. सन २००६ के अध्यादेश व्दारा प्रॉपर्टी ऑनर्स जारी करने हेतू किस प्रकार के कानूनी निकष लगाये गये ।

ब. पालिका क्षेत्र में आरक्षित जमिनों पर किया हूआ अवैध निर्माण सन २००६ के अध्यादेश व्दारा नियमाधिन करणे की कानून तजविज इस अध्यादेश मे कि गई है या नही अगर है तो सरकारी और पालिका के आरक्षित जमिनो पर कितने अवैध निर्माण इस अध्यादेश के तहत नियमाधिन किये गये है। इस बारे में विस्तृत जानकारी दि जाये।

क. सन २००६ को जारी किये गये अध्यादेश व्दारा अवैध निर्माण नियमाधिन करणे हेतू पालिका प्रशासन के पास कितने प्रस्ताव प्राप्त हूये ? उस प्रस्ताव के उपर पालिका प्रशासन व्दारा क्या कारवाई की गई? प्राप्त प्रस्ताव के आधार पर पालिका उत्पंन्न बढाने हेतू पालिका प्रशासन की भूमिका क्या है? इस बारे में विस्तृत जानकारी दि जाये।

ड. सन २००६ के अध्यादेश व्दारा प्राप्त प्रस्तावो का प्रॉपर्टी टॅक्स चोरी के उपर रोक लगाने हेतू उपयोग करने के लिये पालिका प्रशासन की तरफसे आज तक क्या प्रशस किये गये है? इस अध्यादेश व्दारा पालिका प्रशासन के पास प्रॉपर्टी ऑनर्स ने जो प्रस्ताव सादर किये उस प्रस्ताव मे

टोटल जमिन का ताबा और उस जमिन का क्षेत्र नमूद किया है। उस क्षेत्र की और प्रॉपर्टी टॅक्स कर निर्धान क्षेत्र में बहूत सारी तफावत है। इस बारे में पालिका प्रशासन की भूमिका स्पष्ट करे ।

उत्तर :— मुद्दा क्र. अ,ब,क हा मालमत्ता कर विभागाशी संबंधित नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार शहरात अस्तित्वात असलेल्या मागील कर निर्धारण केल्याप्रमाणे जवळ जवळ अंदाजित १,७१,००० मालमत्तांवर नियमितपणे कर आकारणी सुरू आहे. तथापि, ज्या मालमत्तांच्या क्षेत्रात/बांधकाम प्रकार/वापर इ. बाबतीत बदल झाला आहे अथवा ज्या मालमत्तांची पुर्नबांधणी किंवा नवीन बांधकाम करण्यात आली आहे, अशा मालमत्ताधारकांनी अधिनियमातील तरतुदीनुसार कर आकारणी संदर्भात मनपास कळविणे आवश्यक आहे. अन्यथा अशाप्रकारे बदल झालेल मिळकती मनपा कर्मचा—यांच्या अधिनस्त कार्यक्षेत्रात निदर्शनास आल्यास त्यावर सुधारीत कर आकारणी करण्यात येते. सदरची प्रक्रिया सतत सुरू आहे.

अनधिकृत विकासकामे नियमाधीन करण्याकरिता आणि तदसंबंधित किंवा तदनुषंगिक बाबीसाठी तरतुद करण्याकरिता अद्यादेश २००६ अंतर्गत कार्यवाही तज्ञ समिती, नगररचना विभागामार्फत करण्ययात येत आहे. संबंधित विभागामार्फत अनधिकृत विकासकामे नियमाधीन झाल्याबाबतचे आदेश कर विभागास प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार संदर्भित मिळकतींवरही सुधारीत कर आकारणी करण्याची कार्यवाही करण्यात येत असते.

सदस्य, श्री.राजेश वानखेडे :— मा. महापौर मॅडम आमच्या वार्डमध्ये पाणी नाही. त्याचे काय?

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— प्रश्नोत्तरे आहेत.

सदस्य, श्री.राजेश वानखेडे :— नाही नाही प्रश्नोत्तरे नंतर घ्या पहिले आमचा पाण्याचा महत्वाचा प्रश्न आहे.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— पाण्यासाठी सुध्दा आपण चर्चा करू.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी : चर्चा कधी करणार,

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— जसे अनुक्रमकांनुसार आहेत त्या प्रमाणेच आपण बोलू.

सदस्य, श्री.राजेश वानखेडे :— याच्या पेक्षा महत्वाचा पाण्याचा विषय आहे.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— आता जो विषय आहे आपण त्याच्यावर प्रथम चर्चा करू बाकीचे विषय नंतर घेऊ

सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी : शहरात पाण्याची समस्या आहे, पहिले पाणी दयायला पाहिजे बाकीचे विषय नंतर घ्या. लोकांची समस्या समस्या सोडवली पाहिजे.

सदस्य, श्री.प्रमोद टाले:—: महापौर मॅडम आम्ही उपोषणाला बसलो होतो, आपण आमचे उपोषण थांबवले गेले सांगितले की, पाणी मिळेल परंतु आता पर्यंत पाण्यासाठी काहीच फरक पडला नाही. आयुक्त साहेब आले होते. आपण अश्वासन दिले. चार चार नगरसेवब सहा सहा नगरसेवक उपोषणाला बसले होते. परंतु फक्त अश्वासन दिले जाते.

सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी: महापौर मॅडम फक्त आश्वासन देययाचे आणि लोकांना पाणी देययाचे नाही असे काही आहे का?

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— जे आश्वासन दिले ते पुर्ण करणार.

सदस्य, श्री.राजेश वानखेडे : महापौर मॅडम मॅडम इथे दुसरा विषय काही नाही महत्वाचे पाणी आहे. आमच्या इथे पाण्यासाठी लोक रस्त्यावर उतरले आहेत.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— पहिले जे विषय आहेत ते अनुक्रमानुसार घेण्यात येतील. नंतर पाण्याचा घेऊ.

<u>सदस्य, श्री.राजेश वानखेडे :</u> महापौर मॅडम प्रथम पाण्याचा विषय घ्या, पाण्याची समस्या जास्त महत्वाची आहे.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> आता लक्षवेधी आली आहे, पाण्याच्या विषयांवर नंतर चर्चा करू.

<u>सदस्य, श्री.सुनिल सुर्वे:—</u> : नगरसेवक उपोषणाला बसले होते आपण आश्वासन दिले होते की, पाण्याचा प्रश्न सोडवाल पण तसे केले नाही.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> आपण पाण्यावरती चर्चा करू.

<u>सदस्य, श्री.राजेश वानखेडे:—:</u> आमची विनंती आहे की, प्रथम पाण्याचा विषय घ्या.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> मी त्याच्यावर आजच चर्चा करू.

<u>सदस्य, श्री.प्रमोद टाले:—</u> पाण्यासाठी लोक इतरत्र भटकत आहेत, मॅडप आपण पाण्याचा विषय घ्या.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> आपण पाण्यावरती चर्चा करू परंतु पहिले प्रश्नोत्तरे घेऊ.

<u>सदस्य, श्री.राजेश वानखेडे:—</u> प्रथम पाण्याचा विषय घ्या महापौर मॅडम.

<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—</u> अजंडा कोणता महत्वाचा आहे, जे मागच्या मिटींगचे विषय पास करणे आणि प्रश्नोत्तरे ते आहेत.

<u>सदस्य, श्री.प्रमोद टाले:—</u> पाणी महत्वाचे आहे.

<u>सदस्य, श्री.राजेश वानखेडे :</u> महापौर मॅडम लोकांना पिण्यासाठी पाणी खुपच महत्वाचे आहे.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> आपण ऐकत्रांनी बोलले तर बरे होईल. महासभेचे नियम पाळा प्लीज.

<u>सदस्य, श्री.राजेश वानखेडे :</u> मॅडम नियमानुसारच बोलत आहोत.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> तिकडून दोन दोन, तीन तीन बोलत आहेत, एक एकाने बोलले तर खुप चांगले होईल. पहिले प्रश्नोत्तरे वर चर्चा करू.

<u>सदस्य, श्री.प्रमोद टाले :</u> पहिला पाण्याचा पिषय घ्या. खुप महत्वाचा आहे.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> पाण्यासाठी लक्षवेधी आलेली आहे, पाण्याची लक्षवेधीवर चर्चा करू.

<u>सदस्य, श्री.प्रमोद टाले :</u> महापौर मॅडम घरातून लोकांना पंधरा दिवसापासून पाणी मिळत नाही. आता कारण काय आहे पाणी मिळत नाही.

<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी :</u> महापौर मॅडम आपल्या पार्टीचे सदस्य बोलत आहेत की पहिले पाण्यासाठी चर्चा करा परंतु याच्या पेक्षा जास्त आपल्यांना काय पाहिजे.

<u>महापालिका सचिव:—</u> पहिला प्रश्न श्री. भारत राजवानी यांचा आहे.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> प्रथम अंजठावर चर्चा करू नंतर

<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी :</u> अजंडा कोणता एवढा महत्वाचा आहे या अजंडामुळे काय होणार आहे.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:– लक्षवेधी आलेली आहे पाण्याविषयी नंतर आपण बोलू त्याच्यावर.

सदस्य, श्री.प्रमोद टाले : दुसरे विषय नंतर पण घेऊ शकतात.

सदस्य, श्री.राजेश वानखेडे : ज्यांचा प्रश्न आहे ते स्वत: सांगत आहेत की पहिले पाण्याचा विषय घ्या.

सदस्य, श्री.भारत राजवानी : मी स्वत: सांगत आहे की, पहिले पाण्याचा विषय घ्या.

सदस्या, श्रीम.सुनिता बगाडे : मॅडम महत्वाचा प्रश्न पाण्याचा आहे. पाण्या बद्दल बोला पहिले.

सदस्य, श्री.भारत राजवानी : आपण माझा प्रश्न नंतर घ्या, पाण्याचा प्रश्न हा सर्वात महत्वाचा आहे.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:– सचिव मॅडम दुसरा प्रश्न चालू करा

सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी : ज्यांचा प्रश्न आहे ते स्वत: सांगत आहेत की, पहिले पाण्या विषयी चर्चा करा.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:– ते स्वत: चर्चा करण्यास तयार नाहीत.

सदस्य, श्री. राजेश वानखेडे : महत्वाचे पाणी आहे, आमच्या वार्डामध्ये पाणी का देत नाहीत. किती तरी समस्या आहेत पाण्याविषयी.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:– पाण्याच्या समस्येवर चर्चा करण्यासाठी मी तयार आहे.

सदस्य, श्री. राजेश वानखेडे : महापौर मॅडम माझ्या वार्डामध्ये पाणी नाही.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे : मा. महापौर मॅडम आपण कायदयाची गोष्ट करीत अहात मी कायदयाची गोष्ट सांगू का? महापौर मॅडम तुम्ही जर कायदयाची गोष्ट करत आहेत तर कायदयाची गोष्ट सांगू का? जी प्रस्तावाची सुचना आम्ही पाठवली होती, आपण ते पटलावर का घेतली नाही आणि कोणत्या नियमानुसार घेतले नाही.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:– आपण ती नंतर घेऊ.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे : नाही नाही आपण कायदयाची गोष्ट करीत अहात ना सचिव मॅडम मी ज्या प्रस्तावाच्या सुचना पाठवल्या होत्या त्या आपण का घेतल्या नाहीत. नुसत्या कायदयाच्या गोष्टी करतात का घेतल्या नाहीत त्या. प्रस्तावाच्या सुचना दिल्या होत्या ना?

सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:– : नियम काय सांगतो.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे : नियम काय सांगतो ते सांगा. तुम्ही जर कायदयाच्याच गोष्टी करीत आहेत ना मग हा कायदा का तोडला गेला तुम्ही? महापौर म्हणून मनमानी का केली आपण?

महापौर तथा पिठासिन अधिकारी:– मनमानी नाही केली आपण किती जण उभे आहेत आपण एक एक उभे राहून बोलले तर बरे होईल.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे : माझा जो विषय आहे तो एकदम कायदेशिर आहे. जो तुम्ही म्हणता ना?

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :– मा. महापौर मॅडम, सुर्वेजी मा. महापौरांनी आपला विषय मांडण्यासाठी आपण एक एक उभे राहून बोलायला सांगितले आहे.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे : मी एकटाच बोलत आहे.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :– आता चार उभे होते. पाण्याची समस्या सोडवायच्या आहेत की ओरडतच राहणार.

सगळे सदस्य एकत्रपणे बोलत होते त्यामुळे कोण काय बोलत होते ते समजून आले नाही.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– पहिले माझ्या प्रश्नाचे उत्तर दया, प्रश्नोत्तर महत्वाचे नाही सचिव मॅडम माझी प्रस्तावाची सुचना आपण का घेतली नाही कृपया याच्यावर बोला.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:– सन्माननिय सदस्य आपण नियमांचे पालन करावे.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– मा. महापौर मॅडम, आपण कायदयाचे उल्लंघन करीत आहेत.

सदस्य, श्री. धनंजय बोडारे :– मा. महापौर मॅडम आपण कायदयाचे.....

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– आपण बोलत अहात की, प्रश्नोत्तर चालू करू जी प्रस्तावाची सुचना मी दिली होती ती आपण का घेतली नाही? कोणत्या कायदयानुसार घेतली नाही? त्याचे मला खुलासा करा, सचिव मॅडम प्रथम खुलासा करा आणि माझा माझा सभेचा विषय पण तोच आहे. प्रस्तावाची सुचना आहे.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :– मा. महापौर, आपण आता सांगितले आहे की, एक एक सदस्य परवानगी घेऊ बोलेल आणि आपण चार सदस्य एकत्र बोलत आहेत.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– मॅडम आपण यांना स्विय सहाय्यक बनवले आहे का?

काही सदस्य एकत्रपणे बोलत होते त्यामुळे कोण काय बोलत होते ते समजून आले नाही.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:– सन्माननिय सदस्यांनी एक एकांनी उभे राहून बोलावे प्लीज.

सदस्य, श्री. जमनादास:पुरस्वानी– महापौर आपणाला विनंती करीत अहात की आपण एक एक सदस्यांनी बोलावे.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– मा. सचिव मॅडम मला कायदा सांगा तुम्ही माझी प्रस्तावाची सुचना का घेतली नाही.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:– आपली जी काही समस्या असेल ती सोडवली जाईल

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– माझी प्रस्तावाची सुचना का घेण्यात आली नाही आणि कोणत्या कायदयानुसार.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:– सचिव मॅडम प्रश्न क्र. २ चालू करा.

महापालिका सचिव:– मा. पिठासिन अधिकारी यांनी मला प्रश्न क्र. २ हा सुरू करायला सांगितला आहे.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :– प्रस्तावाची सुचना का घेतली नाही.

**काही सदस्य एकत्र बोलत असल्यामुळे कोण काय म्हणत आहे हे समजून आले नाही.**

महापालिका सचिव:– मा. सभागृह, मा. सदस्य श्री. सुनिल सुर्वे यांची प्रस्तावाची सुचना आमच्या कार्यांल्यात दिली होती. मी ती मा. महापौरांकडे सादर केली होती परंतु मा. महापौरांनी ती विषय पटलावर घेतली नाही.

सदस्य, श्री. धनंजय बोडारे :– कारण काय

महापालिका सचिव:– ते त्यांनी कारण सांगावे.

सदस्य, श्री. धनंजय बोडारे :– कारण काय ते सांगावे. कुठल्या कारणाने घेतली नाही.

<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी</u> : नियम काय सांगतो ते सांगा.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :– नियम काय सांगतो ते सांगा.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:–</u> आपण एक एक बोला कृपया बसून घ्या.

<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी</u> : मॅडम एक एकच बोलत आहेत.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:–</u> नाही आपण तीन लोक उभे अहात.

<u>सदस्य, श्री.धनंजय बोडारे</u> : सचिव मॅडम कुठल्या नियमाने घेता येत नाही ते मला सांगा .

<u>महापालिका सचिव:–</u> नियम असा आहे की सभेच्या प्रत्येक नोटीसमध्ये अशी सभा ज्या वेळी व ज्या ठिकाणी भरावयाची असेल ती वेळ आणि ते ठिकाण नियम कलम ४४ खाली प्रश्ना अखेरीस अशा सभेत चालवायचे कामकाज निर्दिष्ट केले पाहिजे व अशी नोटीस नगरपालिका सचिवाने भरपूर खप असलेल्या निदान एका स्थानिक वृत्तपत्रात ती जाहिरातीद्वारे दिली पाहिजे आणि व्यवहार असेल तेथे नोटीसची एक एक प्रत प्रत्येक पालिकेच्या सदस्यांच्या शेवटच्या माहित असलेल्या पत्यावर पोष्टाने पाठविली पाहिजे. नियम असा म्हणतो नगरपालिकेचा सचिव खंड निर्देश दिलेल्या नोटीसित महापौरांची मान्यता घेतल्या शिवाय कोणतेही कामकाज दर्शवणार नाहीत.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :– कायदा काय सांगतो.

<u>महापालिका सचिव:–</u> त्यानंतर कायदा असा आहे परंतु महापौर दोन पेक्षा अधिक वेळा अशी मान्यता देण्यास नकार देईल त्याबाबतीत नगरपालिका सचिव एकुण पालिका सदस्या पैकी एक चतुर्थअंश सदस्यांनी असे कामकाज समाविष्ट करण्या बद्दल दिलेली नोटीस मिळाल्यावर असे कामकाज अशा नोटीसीत अंतर्भुत करील.

<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी</u> :– मॅडम तुम्ही म्हणताहेत ना कुठल्या पत्रकात नोटीस दिलेली आहे. कुठल्या पत्रकात नोटीस दिलेली आहे. आता तुम्ही वाचून दाखवले आहे ना.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे</u> :– नाही नाही दुसरी महासभा घेऊ मला हे सांगा माझी प्रस्तावाची सुचना अतिमहत्वाची आहे.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:–</u> पाण्याचा विषय पण आपण घेऊ त्याबाबतीतही समस्या सोडवू.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे</u> :– मॅडम कोणताही विषय एवढा महत्वाचा नाही, जेवढा पाण्याचा आहे. माझ्या वार्डामध्ये पाणी नाही.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:–</u> दुसरा विषय घेतल्यानंतर आपण पाण्याचा विषय घेऊ.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:–</u> नाही मॅडम दुसरा कोणताही विषय महत्वाचा नाही.
तुमच्या वार्डामध्ये बरोबर पाणी येते फक्त आमच्याच वार्डामध्ये पाणी नाही.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:–</u> सचिव मॅडम प्रश्न क्र. २ घ्या.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> मॅडम तुम्ही प्रस्तावाची सुचना का घेतली नाही. नाहीतर महापौरांनी जाहिर माफी मागावी. तुम्ही कामकाज चालवू शकत नाही. महापौरांनी घेतले नाही तर अती केले आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:–</u> तुम्ही जर दुसरा विषय घेतला तर आम्ही खाली उपोषणाला बसतो.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> आम्ही सगळे या ठिकाणी खाली बसतो तुम्ही जर कायदयाची भाषा बोलताहेत तर महापौरांनी माफी मागावी नाहीतर कायदा सांगावा. प्रस्तावाची सुचना घेतली नाही कारण काय मनमानी आहे.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे :—</u> आयुक्त साहेब, सचिव मॅडम प्रस्तावाची सुचना ही कशासाठी तरतुद आहे.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र. २ हा भारत राजवानी यांचा असून त्याचे उत्तर प्राप्त झाले नाही. मा. पिठासिन अधिकारी यांनी मला वाचायला सांगितले आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> मा. महापौर आपण पहिल्याच दिवशी महासभा चालवत आहेत आणि पहिल्याच दिवशी आपण दाखवून दिले की, पारदर्शकत, पारदर्शकता कोणती पारदर्शकता हि पारदर्शकता आहे का? तुमची? मुख्यमंत्रीजी आपण परत परत बोलत अहात पारदर्शकता पारदर्शकता हि पारदर्शकता आहे का? माझी प्रस्तावाची सुचना आपण का घेतली नाही, आपण मनमानी केली आहे. जी सुचना आपण घेतली नाही ती नियमानुसार घ्यायला पाहिजे होती. घेतली नाहीतर कोणत्या कायदयानुसार घेतली नाही मला सांगा.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:—</u> मा. महापौर आम्ही सगळे सदस्य फक्त पाण्याच्या विषयासाठी बोलत अहोत.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> महापौरांनी प्रस्ताच्या सुचनेबाबत कायदेशिर कारवाई करावी नाही तर माफी मागावी. आपण या शहराच्या प्रथम नागरीक अहात.

<u>सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—</u> मॅडम दोन दिवसापासून टॅकर पण नाहीत, टॅकर पॉईट बंद पडले आहेत. पाण्याची समस्या खुप मोठी आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> प्रस्तावाची सुचना का घेतली नाही. आपण मनमानी केल्यामुळे आपण माफी मागावी, सर्व प्रथम आपण माफी मागावी. या सभागृहाची पहिल्याच दिवशी म्हणजे तुम्हांला मार्गदर्शन पाहिजे नाही.

<u>सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—</u> सगळया महिला तेच बोलत आहेत की नळाला पाणी येईल तेव्हा येईल परंतु टॅकर पॉईट बंद आहे त्यामुळे टॅकर बंद पडले आहेत.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> पारदर्शकता पारदर्शकता तुमची पारदर्शकता कुठे गेली मग?

<u>सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—</u> टॅकर पॉईट पंधरा पंधरा दिवस दुरूस्त केले जात नाही.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> हा मुख्यमंत्र्याचा अपमान आहे. पारदर्शकता पारदर्शकता म्हणजे काय?

<u>सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—</u> मा. पिठासिन अधिकारी यांनी...

**काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते समजुन आले नाही.**

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> पारदर्शकता कुठे गेली सचिव मॅडम प्रस्तावाच्या सुचनेचे काय झाले. आमच्या प्रस्तावाच्या सुचनेचे तुम्ही पत्र दिले आहे का?

<u>सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—</u> हे अस होऊ शकत नाही फक्त पाण्याचा विषय घ्या.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> आयुक्तत साहेब हे सगळ तुमच्या समोर चालले आहे. तुम्ही परवानगी न देता सभागृहनेत्याची जे दालन होते ते पुर्ण तोडले गेले आहे. पारदर्शकता राहीली नाही, ही मनमानी चालली आहे. पारदर्शकता कुठे गेली. प्रस्तावाच्या सुचने विषयी उत्तर दया.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> मा. महापौर मॅडम, सचिव मॅडम...

**काही सदस्य एकत्रीत बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते समजून आले नाही.**

<u>सदस्या, श्रीम. ज्याती माने:—</u> मा. आयुक्त साहेब तुम्ही संपुर्ण शहराची पाहणी केली असेल काही भागात पाणी नाही तुम्हांला चांगले माहित आहे, त्या लाईनला आम्ही राहतो. आम्हांला पाणी कसे देणार तेवढ फक्त सांगा.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> प्रस्तावाची सुचना कायदेशिर का घेतली नाही. मा. महापौरांनी सभगृहाची क्षमा मागावी.

<u>सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—</u> आपण उपोषण सोडवले आता पर्यत पाणी का येत नाही आणि टॅंकर पॉईट का बंद आहे हे आपल्याकडून ऐकायचे आहे. आपण उपोषण सोडवायला आले होते तेव्हा आश्वासन दिले आहे आम्हांला जे आश्वासन दिले गेले ते आम्हांला ऐकायचे आहे. त्याच्या नंतर सभा चालवा. आमचे काही नाही. उपोषण सोडवायच्या वेळी जे आश्वासन दिले गेले आहे त्याबद्दल अम्हांला ऐकायचे आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> मा. महापौर, सचिव मॅडम प्रस्तावाची सुचना घेतली नाही त्याबद्दल आपण मला कळवले का? महापौर नियमानुसार मला पत्र दिले का? तुम्ही मला पत्र दयायला पाहिजे होते. प्रस्तावाची सुचना फेटाळली म्हणून आपण मला पत्र दयायला पाहिजे होते.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> आपण शांत रहा मी आपल्या प्रश्नाचे उत्तर देत आहे. शांत राहिले तर मी आपल्या प्रश्नाचे उत्तर देऊ शकते. जे मी सुर्वेजीचा उपोषण सोडवले आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> मॅडम पहिले प्रस्तावाच्या सुचने बाबत.

<u>महापालिका सचिव:—</u> पाण्याची लक्षवेधी आहे ती घ्यायला सांगितली आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> प्रस्तावाच्या सुचनेचे काय झाले त्याबद्दल माफी मागावी. ही तर महापौरांची मनमानी आहे.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> सन्माननिय सदस्य आपण नियम पाळाल तर खुप चांगले होईल.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> मा. महापौर प्रस्तावाच्या सुचने बद्दल मला सांगा. प्रस्तावाच्या सुचनेचे काय झाले ते सांगा पहिले.

**काही सदस्य एकत्रीत बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते ते समजून आले नाही.**

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> एक एक करून बोलाल तर मला समजेल. आपण एक एक बोला म्हणजे मला समजेल.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी—:</u> सचिव मॅडम प्रस्तावाची सुचना का घेतली नाही त्याचे उत्तर दयाना त्यांना.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> आपण बसा, मी बोलत आहे आपण एक एक करून बोला.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी—:</u> हे बघा चुकिचे काही असेल तर आम्ही एक एक उभे राहून बोलू, आम्ही एक एकच बोलत आहे आम्ही चुकीचे काहीच बोलत नाही.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> महासभेचे नियम कायम ठेवा. त्यामुळे मला पण समजेल व आपल्यांना सुध्दा समजेल. लक्षवेधी सुचना घेतली आहे ती दुस—या महासभेमध्ये येईल. आता मला बोडारेजी ने प्रश्न केला होता सुर्वेचा उपोषण सोडवले त्याचे काय झाले.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> हे जे आहे रूलींग पार्टी आणि विरोधी पक्ष यांचा कोणाचाही प्रस्ताव तेथे घेतला पाहिजे त्यासाठी प्रस्तावाची सुचना असते ती नाकारत येत नाही. त्यासाठी तरतुद काय असते ती सचिवानी सांगितले आहे. ती तरतुद पुर्ण केली का? घेतला नाही तर का घेतला नाही. पहिल्याच मिटींगमध्ये

तुमची सुरूवातच अशी आहे. कायदेशिर घेता येत नाही का? तुम्ही जूने अहात तुम्हाला माहित आहे. प्रस्तावाची सुचना का घेतल्या नाहीत. अस जर वागले तर कसे चालेल आमचे, ओरडून काय उपयोग आहे इथे, जे लेखी दिले ते तुम्ही स्विकार करत नाहीत. बोलून काय फायदा आहे. पाण्याच्या विषयावर चर्चा करा म्हणून सांगतात आपण बोलतात प्रश्नोत्तर, काय प्रश्नोत्तर?

सदस्य, श्री. राजेश वानखेडे:— महापौर नौटंकी म्हणून का बोलत आहेत आमच्या वार्डामध्ये पाणी नाही आणि आम्ही काय इथे नौटंकी करण्यासाठी आलेलो नाही. आम्ही निवडून आलो आहे म्हणजे नौटंकी करायला आलो नाही इथे. मा. महापौर रेकॉर्डींग ऐकावा.

सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:— असे महापौर बोलल्याच नाहीत.

सदस्य, श्री. राजेश वानखेडे:— रेकॉर्डींग ऐकवतो आपल्याला.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे: मा. महापौर प्रस्तावाची सुचना का घेतली नाही. सभागृहाची माफी मांगा. आपण आपल्या अधिकाराचा गैरवापर केला म्हणून आपण माफी मागावी.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— माफी कशासाठी?

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— प्रस्तावाची सुचना का घेतली नाही?

सदस्य, श्री. जमनादास:— प्रस्तावाची सुचना घेणे शक्य नाही.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:— महापालिकेची महासभा हि पहिलीच वेळ चालली नाही. याच्या पहिले बॉडी होती. पहिल्या बॉडीमध्ये कायदा वेगळा होता आणि आताच्या बॉडीमध्ये वेगळा आहे का? त्यावेळेस तर घेत होते.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— बसून घ्या कृपया एक एक बोला. नियम कायम ठेवा.

सदस्य, श्री. राजेश वानखेडे:— मॅडम परंतु पाण्याचाच विषय घ्यायचा आहे.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— पाण्याचा विषय घेऊ.

सदस्य, श्री. राजेश वानखेडे:— मा. महापौर मॅडम, सभागृह नेताचे हे काम आहे का पुस्तक आणून दाखवाचे सभागृहात पुस्तक दाखवत इकडे तिकडे फिरत आहेत. मग सचिव कशासाठी आहेत. सभागृहात सचिव आहेत ना आणि हे असे पुस्तक दाखवत फिरत आहेत. त्याच्यासाठीच त्यांना ठेवले आहे का?

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— ते सभागृह नेता आहेत. ते पुस्तक दाखवत आहेत त्यात विशेष काय आहे.

सदस्य, श्री. राजेश वानखेडे:— मग वाचून दाखवा आम्हांला पण ऐकायचे आहे. वाचून दाखवा.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— वाचून दाखवले आहे त्यांनी. आपण ऐकले नाही.

सदस्य, श्री. राजेश वानखेडे:— परत वाचून दाखवा. आमच्या जवळ पण घेऊन यावे, आम्हा बघायचे आहे काय आहे.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— जमनुजी, सभागृह नेताजी ...

यावेळी सदस्य श्री. रमेश चव्हाण यांनी सभागृहात प्रवेश केला.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— महापौर मॅडम ही जी दोन प्रस्तावाची सुचना जी होती ही कर्मचा—यांसाठी होती आणि आपण लोक कर्मचा—यांच्या विरोधात आहेत हे पहिल्याच पहिल्याच दिवशी आणि पहिल्याच महासभेत

सिध्द करून दिले आहे की आपण कर्मचा—यांच्या विरोधात आहेत. आम्ही पहिले प्रस्तवाची सुचना बरोबर घ्यायचो, प्रस्तावाची सुचना आम्ही कधीच टाळली नाही. आमच्या महापौरानी कधीच टाळली नाही.

महापालिका सचिवः— मा. महापौरांनी पुढचे विषय घ्यायला सांगितले आहेत, आयत्या वेळेचाच विषय आहे.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः— मा. सचिव मॅडम, माझ्या प्रश्नांचे उत्तर मिळाले नाही. प्रस्तावाची सुचना कायदेशिर बघितले आहे. बोडारे साहेबांनी सांगितले आहे. आता त्यांनी बघितली आहे. पण

महापौर तथा पिठासिन अधिकारीः— सुर्वेजी आपण कृपया बसून घ्या.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः— नाही नाही महापौर मॅडम हे एकदम चुकीचे आहे. कर्मचा—यांचा विषय का घेतला नाही.

महापौर तथा पिठासिन अधिकारीः— दुस—या महासभेमध्ये घेऊ.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः— या महासभेमध्ये का घेतली नाही, आपण सांगा ना काय कारण आहे. विरोधी पक्ष आहे म्हणून घेतली नाही का? आपण एकत्र काम करत अहोत. दोन प्रस्तावाच्या सुचना होत्या एक अनुकंपाची आहे आणि एक वालमेन बाबत. या दोन्ही महत्वाच्या सुचना होत्या. याचं मनमानी कारभाराच उदाहरण मी सांगितले आहे. सभागृह नेत्याची कॅबिन तोडून टाकली, कायदयाच्या बाहेर चालले आहे. बसून तुम्हांला पंधरा दिवस सुध्दा झाले नाही. पंधरा दिवसामध्ये तुम्ही सगळया कॅबिन तोडायला सुरूवात केली आहे. मा. आयुक्त साहेब याच्या करीता आपले आदेश घेतले होते का गंभीर घटना आहे, त्या किरकोळ घटना नाहीत. आणि आम्हांला प्रत्येक गोष्टीसाठी टेंडर झाल्याशिवाय काही देणार नाही, ५ (२) (२) मध्ये काहीच देणार नाही. पाण्यासाठी उपोषणाला बसलो होतो तेव्हा आपण सांगितले की सगळया गोष्टी नियमानुसार होत आहेत. किरकोळ गोष्ट आहे २९ तारखेच्या स्थायी समितीच्या सभेमध्ये जे आदेश पारित झालेत त्याचे स्विकृती पत्र ठेकेदारांना अजून दिले गेले नाही. मग रस्त्याची कामे कधी होणार. त्याच्या करीता स्विकृती पत्रासाठी ठेकेदाराची चुकी आहे का? ठेकेदाराला काही सांगितले गेले आहे का? तो ठेकेदार नियमात बसला नाही असे काही आहे का? स्विकृतीपत्र, वर्क ऑर्डर देण्यामागे कारण काय? या सगळया साध्या गोष्टी आहेत. शहर अभियंता यांना विचारले ते सांगतात की साहेबानी अजून सही केली नाही. सगळया गोष्टीला सुई फिरते, नेमक काय होते. रस्त्याची कामे पावसाळयात चालू करायची का, आम्ही काय पास केले आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या बाबतीत तुम्ही असे करतात सगळ कायदेच्या बाहेर चालले आहे मी तुम्हांला तीन उदाहरण सांगितली.

यावेळी सदस्य श्री. भुल्लर महाराज यांनी सभागृहात प्रवेश केला.

महापौर तथा पिठासिन अधिकारीः— सचिव मॅडम तुम्ही वाचा पुढे.

महापालिका सचिवः— आयत्या वेळेचा विषय आहे, विषय सामावून घ्यावयाचा आहे का? उल्हासनगर महानगरपालिका वाल्मीकी वसाहत उल्हासनगर—५ येथील महापालिकेच्या मालकिच्या ...

सदस्य, श्री. राजेश वानखेडेः— पाण्याचा विषय पहीला घ्यायचा.

काही सदस्य एकत्रितपणे बोलत असल्यामुळे कोण काय बोलत आहे, हे समजून आले नाही.

सदस्या, श्रीम. कविता बागूलः— मॅडम तुम्हांला एवढी घाई का आहे?

महापालिका सचिवः— मला पिठासिन अधिका—यांनी वाचायला सांगितले आहे.

सदस्य, श्री. राजेश वानखेडेः— कायदेशिर आदेश दयावेत.

महापालिका सचिवः— मी पिठासिन अधिकारी यांच्या आदेशाचे पालन करत आहे. एक आयत्या वेळेचा विषय प्रशासनाने दिला आहे वाल्मीकी वसाहत, उल्हासनगर —५ येथिल महापालिका मालकिचा निवास्थानाचा ताबा घेणेबाबत धोरण निश्चित करणे तुम्ही जर म्हणाल तर हा विषय सर्व संमतीने सामावून घेण्यात येईल.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> सर्व संमतीने करण्यासाठी पहीले सर्व संमतीने करण्यापेक्षा सगळया गोष्टी सर्व संमतीनेच करायच्या असतात.

काही सदस्य एकत्रितपणे बोलत असल्यामुळे कोण काय बोलत आहे, हे समजून आले नाही.

<u>सदस्या, श्रीम. राजश्री चौधरी:–</u> मॅडम पहीले पाण्याचा विषय घ्या.

<u>महापालिका सचिव:– </u>तसेच तीन लक्षवेधी आलेल्या आहेत एक आहे

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> प्रस्तावाच्या सुचनेबाबत बोलावे, प्रस्तावाच्या सुचना का घेतल्या नाहीत याबाबत खुलासा करावा. मा. महापौरानी पहीले खुलासा करावा. हा विषय महत्वाचा आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखडे:–</u> पाण्या पेक्षा इतर विषय तुम्हांला महत्वाचे वाटतात का?

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> तसे बघितले तर आपण संख्या बळावर भरपूर काही करू शकतात. परंतु त्याला पारदर्शकता म्हणटले जाऊ शकत नाही.

<u>सदस्या, श्रीम. वसूधा बोडारे:–</u> पाणी पुरवठावाल्यांनी येऊन याचे उत्तर दयावे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> मा. मुख्यमंत्र्याचे आदेश आहेत, पारदर्शकता पाहिजे याच्यासाठी पारदर्शकता पाहीजे का तुम्हांला.

<u>सदस्या, श्रीम. वसूधा बोडारे:–</u> दोन दिवस आम्हांला पाणी नाही, प्रत्यक्ष घरी येऊन बघा.

<u>महापालिका सचिव:– </u>लक्षवेधी आलेली आहे, लक्षवेधी आहे सदस्य श्री. सतरामदास जेसवानी यांची.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:–</u> मॅडम तुम्ही कायदा तोडत आहेत सचिव मॅडम आधी पाण्याचा विषय घ्या.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> सचिव मॅडम पहीले प्रस्तावाच्या सुचनेचे काय झाले ते सांगा. का घेतली नाही ते सांगा

<u>महापालिका सचिव:–</u> उत्तर दिले आहे साहेब.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> काय उत्तर दिले आहे. कर्मचारी महत्वाचे नव्हते का?

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:–</u> मॅडम आपण सांगा आमच्या वार्डामध्ये पाण्याचा एक थेंब सुध्दा नाही आणि आपण इथे लोखा रूपयांचे कॅबिन बनवत आहेत.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> मॅडम आपण आमचे उपोषण सोडवायला आल्या होत्या, आयुक्त साहेब आले होते तेव्हा आम्ही तुमचे ऐकले पाण्याची समस्या आहे. आम्हांला ५ (२) (२) मध्ये जी पाण्याची समस्या आहे. पाईप टाकून मिळाले तर पाणी मिळेल. ते अजून पर्यंत केले नाही. दुसरी गोष्ट म्हणजे कॅबिन तोडत आहेत, ते कायदयाच्या बाहेर आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:–</u> महापौर मॅडम आपण सभागृह नेत्याचे ऐकुण काम करणार का?

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:– </u>कॅबिन तोडणे चालू केले हे कायदयाच्या बाहेर आहे. मग ही पारदर्शकता आहे का?

<u>सदस्या, श्रीम. वसूधा बोडारे:–</u> बॅरेक मध्ये पाण्याचे काम बंद पडले आहेत. पाईप आणून ठेवले आहेत. कोणी कामच करत नाही.

सदस्य, श्री. राजेश वानखेडेः— ज्यांनी कॅबिन तोडल्या आहेत, त्यांच्यावर एफ.आय. आर. दाखल करा.

उप महापौर, श्री. जीवन इदनानीः— माझे म्हणणे ऐकुन घ्या पाण्याविषयी लक्षवेधी आलेली आहे, ती स्विकारण्यात आली आहे. सदस्या, श्रीम. दिपा पंजाबी, डिंम्पल ठाकुर यांच्याकडून पाण्या विषयी लक्षवेधी आलेली आहे.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः— इदनानी साहेब, मी तुम्हांला विचारतोय माझ्या प्रस्तावाच्या सुचनेच काय झाले. का घेतली नाही?

महापौर तथा पिठासिन अधिकारीः— आपण एक एक बोलले तर खुप चांगले होईल.

सदस्य, श्री. राजेश वानखेडेः— पाण्यासाठी पैसे नाहीत आणि कॅबिन तोडल्या आहेत त्याच्यासाठी पैसे आहेत. आयुक्त साहेब एफ.आय. आर. दाखल करा. ज्यांनी कॅबिन तोडलेल्या आहेत.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः— आयुक्त साहेब कृपया तुम्ही नियोजन करा, सगळया गोष्टी हया कायदयाच्या बाहेर चालल्या आहेत. रस्त्याची कामे महत्वाची नाहीत.

महापौर तथा पिठासिन अधिकारीः— सुर्वेजी मी पाण्याच्या विषयावर चर्चा करू.

सदस्या, श्रीम. वसूधा बोडारेः— आयुक्त साहेब तुम्ही एक वेळ वार्डामध्ये फिरा तुम्हांला पाण्याच्या समस्या समजतील.

काही सदस्य एकत्रितपणे बोलत असल्यामुळे कोण काय बोलत आहे, हे समजून आले नाही.

सदस्य, श्री. राजेश वानखेडेः— पाण्याच्या विषयावर बोलतच नाहीत.

उप महापौर, श्री. जीवन इदनानीः— पाण्याच्या विषयावर चर्चा करायची आहे ना?

सदस्य, श्री. राजेश वानखेडेः— कधी चर्चा करणार.

महापौर तथा पिठासिन अधिकारीः— आपण बसून घ्या, वानखेडेजी आपण कृपया बसून घ्या.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः— कर्मचा—यांच्या विषयावर का बोलत नाहीत.

महापौर तथा पिठासिन अधिकारीः— आपणाला पाण्याच्या विषयावर चर्चा करायची आहे ना.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः— आपण आपल्या अधिकाराचा दुरूपयोग केला आहे, कॅबिन तोडल्या आहेत. सगळ कायदयाच्या बाहेर चालले आहे.

महापौर तथा पिठासिन अधिकारीः— आपण कृपया करून बसून घ्या. आपण कृपया करून एक एक बोला. सावकाश बोला.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः— आपण पारदर्शकता याला म्हणाल का? महापौर मॅडम आपण महिला अहात मी नम्रपणेच बोलत आहे, फक्त माझा आवाज जास्त आहे. आपण कर्मचा—यांचा विषय का घेतला नाही.

महापौर तथा पिठासिन अधिकारीः— हा विषय आपण दुस—या मिटींगमध्ये घेऊ.

सदस्य, श्री. राजेश वानखेडेः— मॅडम त्यांना एकदा अटॅक येऊन गेला आहे.

काही सदस्य एकत्रितपणे बोलत असल्यामुळे कोण काय बोलत आहे, हे समजून आले नाही.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> मॅडम आपण दिलगिरी व्यक्त करू शकत नाही.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:–</u> सुर्वेजी आपण कुपया बसून घ्या.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> सुर्वेजी महापौर मॅडम आपणाला विनंती करत आहेत. तर बसून घ्या.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:–</u> कामकाजाचे स्वरूप कसे आहे?

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:–</u> सुर्वेजी आपणाला पाण्याच्या विषयावर बोलायचे आहे ना एक एक करून बोला.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> मॅडम आपण कायदा तोडला आहे, त्यासाठी दिलगिरी व्यक्त करू शकत नाही का? माफी मागू नका दिलगिरी व्यक्त करा. आपण मोठया अहात, शहराच्या प्रथम नागरीक अहात. आपण माफी मागू नका, दिलगिरी व्यक्त करू शकत नाहीत.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:–</u> आपण पहीले बोला मी नंतर बोलेल, मी महापौर या नात्याने सांगते आपण कृपया शांत बसा.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:–</u> महापौर मॅडम, हे लोक काय बोलत आहेत की, तुम्हांला फाशी देणार आहेत का? असे कसे बोलत आहेत. सभागृह नेता असून असे बोलत आहेत. फाशी देणे म्हणजे तुमचा विचार काय आहे?

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:–</u> सुर्वेजी तुम्हाला पाण्याची समस्या सोडवायची आहे ना जेव्हा आपण बसून घ्याल तेव्हा आपण सगळे चर्चा करू तरच समस्या सुटेल. तिकडून एक बोलत आहे इकडन एक बोलत आहे तर चर्चा कशी करणार.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:–</u> ते कसे बोलत आहेत, लोक फाशी देणार आहेत का?

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> मा. महापौर, मी फक्त हेच बोलत आहे, प्रस्तावाची सुचना ही कर्मचा–यासाठी होती ती आपण घेतली नाही. आपण दिलगिरी व्यक्त करू शकत नाही.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> मा. महापौर मॅडम एक माणूस असतो तो झोपलेला असतो, तेव्हा त्याला झोपेतून उठवणे सोपे असते आणि एक माणूस नाटक करून झोपलेला असतो त्याला उठवणे खुप मुस्किल आहे.

काही सदस्य एकत्रितपणे बोलत असल्यामुळे कोण काय बोलत आहे, हे समजून आले नाही.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–</u> महापौर मॅडम इथे लोकांना पाणी नाही.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> पाण्यासाठी चर्चा चालू आहे.

काही सदस्य एकत्रितपणे बोलत असल्यामुळे कोण काय बोलत आहे, हे समजून आले नाही.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> पाण्याच्या प्रश्नासाठी आपण आश्वासन दिले आहे. आज मी या क्षणापासून इथेच उपोषणाला बसणार आहे. जो पर्यंत तुम्ही दिलगिरी व्यक्त करत नाहीत, तो पर्यंत मी उपोषणाला बसणार आहे. मनमानी काराभाराचा निषेध म्हणून मी आज पासूनच उपोषण चालू करतो. या सभागृहाचा अपमान करत अहात, या सभागृहाचा मान राखण्यासाठी मी आजपासून इथेच उपोषण चालू करत आहे.

<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण:–</u> मी पण तुमच्या सोबत आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–</u> कोण झोपला आहे, नगरसेवक झोपला आहे का?

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— महापौरांनी लक्षवेधी घेतली आहे.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:— पाण्यासाठी लक्षवेधी घेतली आहे हे मान्य करतो परंतु यांचा जो विषय आहे, तो का घेतला नाही?

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— महापौरांनी बोलले आहे. आपला जो विषय आहे तो नंतरच्या महासभेमध्ये घेऊ असे दहा वेळा सांगितले आहे आणि पाण्यासाठी लक्षवेधी आलेली आहेच आणि त्याच्यावर चर्चा चालू होणार आहे.

सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:— महापौर मॅडम अनुकंपावरील कर्मचा—यांचा विषय आहे. हे तसे होणार नाही.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— आपल्याला आश्वासन दिले आहे, नंतर घेऊ

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:— चुकी झाली आहे ना.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— प्रस्तावाची सुचना घेणे महापौरांचे अधिकार आहेत.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:— अधिकार आहे, याच्या पहीले जी बॉडी होती तेव्हा घ्यायचे.

सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:— महापौर मॅडम हा कर्मचा—यांचा विषय आहे, आमचा नाही. ते अनुकंपावरील कर्मचारी आहेत. ही आमची दिलगिरी नाही ते कर्मचारी आहेत.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:— सचिव मॅडम मागच्या बॉडीमध्ये ज्या प्रस्तावाच्या सुचना येत होत्या, तेव्हा तुम्ही आम्हांला सांगितले होते. प्रस्तावाच्या सुचना घ्यायलाच लागतील. मग आज कायदा बदलला का?

महापालिका सचिव:— मी त्यांना त्यावेळी सुचना दिल्या होत्या, प्रस्तावाच्या सुचनेचा विरोधी पक्षाचा हा अधिकार आहे. मी त्यांना सांगितले होते परंतु घ्यायचा का नाही, विषय घेयाचा अधिकार मा. महापौरांचा आहे. मला वेगळी सुचना काढता येत नाही.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— महापौर मॅडम चुकीचा संदेश जात आहे. आपण पाण्याचे पण आश्वासन दिले होते.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— सुर्वेजी मी तुमच्याकडे आले, तुम्ही उपोषण सोडण्यासाठी तयार झाले. त्यासाठी २० एम.एल.डी. पाणी वाढविण्यात आले आहे. एम.आय.डी.सी. ला पत्र लिहून पाठविले आहे. त्याची प्रोसेस चालू आहे. एक दोन दिवसात रिझल्ट येईल. मी २० एम.एल.डी. पाणी देण्यासाठी पत्र पाठवले आहे.

सदस्य, श्री. राजेश वानखेडे:— मॅडम आमच्या वार्डासाठी २० एम.एल.डी. पाणी नाही आहे. कोणत्या बाजूने पाणी येणार. आमच्या वार्डाचे काय? कोणत्या वार्डासाठी पास केले आहे.

सदस्य, श्री. धनंजय बोडारे:— २० एम.एल.डी. पाणी आपण म्हणत अहात परंतु कोणाला पत्र दिले आहे.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— एम.आय.डी.सी. ला पत्र दिले आहे.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:— एम.आय.डी.सी. ला पत्र दिले आहे ठिक आहे. परंतु इथे चार चार दिवस लोकांना पाणी येत नाही.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— पाण्यासाठी लक्षवेधीवर चर्चा केली तर खुप चांगले होईल.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u> महापौर मॅडम आपण माझ्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. माझी प्रस्तावाची सुचना आपण घेतली नाही. यासाठी आपण सभागृहाची दिलगिरी व्यक्त करत नाहीत, हे चुकीचे आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u> मॅडम पाण्याचे काय?

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारीः—</u> सुर्वेजी कृपया करून आता सभेचे कामकाज चालू दया, सभेची वेळ खुप किमती असते. तुम्हांला सुध्दा शहराचे विकास करायचे आहे व आम्हांला सगळयांना शहराचे विकास करायचे आहे. मी अश्वासन देते अमुल्य वेळ वाया न घालवता तुमचा जो विषय आहे तो नंतरच्या सभेमध्ये घेऊ. आता पाण्याची जी मोठी समस्या आहे, त्या मुद्दयावर चर्चा करू.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u> मा. महापौर, मी फक्त एवढच सांगतो की फिरून फिरून बोलू नका आपण सरल सांगा, दिलगिरी व्यक्त करा दिलगिरी.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारीः—</u> कोणालाही त्रास देयाचा नाही. तुम्हांलाही शहराचे काम करायचे आहे आणि आम्हांला पण शहराचे काम करायचे आहे, आपणाला सगळयांना शहराचे काम करायचे आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u> हे जे दोन काम होते शहराचेच काम होते.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारीः—</u> हे विषय आपण पुढच्या महासभेमध्ये घेऊ, मी अशी विनंती करते.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडेः—</u> मॅडम पाण्याचा विषय पहिले घ्या, पुढच्या महासभेमध्ये नाही.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारीः—</u> महासभेची वेळ महत्वाची आहे, ती वाया घालवु नका.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u> प्रस्तावाच्या सुचनेचा मला परत पत्र देयाला लागेल का? सचिव मॅडम ते आताच स्पष्ट सांगा.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानीः—</u> मा. महापौर, सन्माननिय सुर्वे साहेबांनी ज्या प्रस्तवाची सुचना दिलेल्या आहेत, त्याबद्दल त्यांना आजच्या महासभेत सांगा की याच्यानंतर जी सभा येईल, तेव्हा दोन्ही प्रस्तावाच्या सुचना घेतल्या जातील आता पाण्याच्या समस्यावर चर्चा करू.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारीः—</u> पाण्याच्या विषयावर चर्चा करू.

<u>महापालिका सचिवः—</u> जे विषय मा. महापौर घेत नाहीत ते प्रलंबित प्रश्न म्हणून असतात, त्यांची सुचना परत देण्याची आवश्यकता नाही, आहेत तेच विषय घ्यावे लागेल. दुसरा आयत्या वेळेचा विषय घ्यायचा का नाही हे सभागृहाने सर्वसमंतीने ठरवायचे आहे.

<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानीः—</u> महापौर साहेबा, दुसरी लक्षवेदी कशासाठी आहे. कृपया याची माहिती दया.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानीः—</u> मा. महापौर, आयत्या वेळेचा विषय सर्वसमंतीने पुर्ण करून कृपया पाण्याच्या विषयावर चर्चा करा.

<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानीः—</u> दुसरी लक्षवेधी आपण कोणती घेतली आहे, दुस—या लक्षवेधीसाठी कोणाची मान्यता मिळाली. आपण वाचून दाखवा. पाण्याची सुनवाई आहे, त्यामुळे मी विनंती केली आहे.

<u>महापालिका सचिवः—</u> आयत्या वेळेचा विषय सर्वाना मान्य आहे का?

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडेः—</u> अजिबात नाही, अगोदर पाण्याचा विषय घ्या.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> पाण्याचा विषय महत्वाचा आहे, दोन महीने राहीलेले आहेत. म्हणून तुम्हांला सांगतो की, पाण्याचा विषय पहीले घ्या. पाण्याचा विषय महत्वाचा आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:—</u> यांना उद्घाटनं पाहिजेत,

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> कसली उद्घाटन.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:—</u> ते ५ नंबरचा वाल्मिकी वसाहतची घरं आहेत.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> काय संबंध आहे, वाल्मिकी वसाहतचा इथे लोकांना पिण्यासाठी पाणी नाही आणि उद्घाटन करत बसतात.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> याचा अर्थ असा आहे महत्वाचे विषय बाजूला ठेवून फक्त उद्घाटनाच काय करायच त्याच्यासाठी चालले आहे का सगळ? पारदर्शकत यालाच म्हणतात का? दुसरी लक्षवेधी कुठली घेतली आहे.

<u>महापालिका सचिव:—</u> पहीले हे निश्चित करा आयत्या वेळेचा विषय घ्यायचा का नाही.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> पहीला पाण्याचा विषय घ्यायचा आहे.

<u>महापालिका सचिव:—</u> पाण्याची लक्षवेधी नंतर वाचली जाईल पहीले नियमानुसार आयत्या वेळेचा विषय घ्यायचा का नाही हे सभागृहाने सांगावे.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:—</u> हो घ्या.

<u>महापालिका सचिव:—</u> आता लक्षवेधी सुचना तीन झाल्यात त्यापैकी सुचना आहे एक मा. सतरामदास जेसवानी यांची एक श्रीम. डिंपल नरेंद्र ठाकुर आणि एक श्रीम. दिपा नारायण पंजाबी यांची आहे व एक श्रीम. अंजली साळवे यांची आहे आणि कविता सुधिर बागुल यांची आहे. त्यापैकी दोन मा. महापौरांनी स्विकारल्या आहेत.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:—</u> लक्षवेधी  काय आहेत ते पण वाचून दाखवा.

<u>महापालिका सचिव:—</u> हो वाचत आहे आता.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:—</u> कुठल्या स्विकारल्या आहेत ते पण सांगा.

<u>महापालिका सचिव:—</u> सुचकाचे नाव आहे श्री. सतरामदास जेसवानी वर्ष २०१७ च्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या निवडणूकीमध्ये निवडून आलेल्या महासभेमध्ये उपस्थित लोकप्रतिनिधींची माहिती देणेबाबत. उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे लोकप्रतिनिधी यांना कोणत्या सुविधा दिल्या जातात. ही लक्षवेधी मा. महापौरांनी स्किारली आहे. दुसरी लक्षवेधी आहे, श्रीम. अंजली साळवे यांची उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत असलेल्या वालधूनी नदीत सोडण्यात येणा—या विषारी रसायने पासून शहरातील नागरीकांचे आरोग्य व शहराला प्रदुषणापासून वाचवण्यासाठी लक्षवेधी ही अमान्य केली आहे. तीसरी लक्षवेधी आहे श्रीम. डिंपल नरेंद्र ठाकुर, अनुमोदक आहे. श्रीम. दिपा पंजाबी विषय पाण्याच्या गंभिर प्रश्नाबाबत  लक्ष वेधण्यासाठी लक्षवेधी सुचना  मा. महापौरांनी सर्वप्रथम या लक्षवेधीवर चर्चा करायला सांगितली आहे. श्रीम. डिंपल नरेंद्र ठाकुर असतील त्यांनी चर्चा करावी.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> मॅडम ही यांची लक्षवेधी का घेतली नाही याचा खुलासा करण्यात यावा.,

<u>महापालिका सचिव:—</u> तो मा. महापौरांचा अधिकार आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> सन्माननिय महापौरांचा अधिकार आहे, याचा अर्थ असा आहे की, आपण भेदभाव करत अहात, यांची लक्षवेधी घेणारच नाहीत का?

काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत आहेत हे समजून आले नाही.

सदस्य, श्री. भगवान भालेराव:— आपण सत्ताधारी होतो तेव्हा विरोधी पक्षांच्या सर्व लक्षवेधी घेतलेल्या आहेत.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— मा. मुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस यांना पण वाईट वाटेल की, काय चालले आहे.

सदस्य, श्री. धनंजय बोडारे:— मा. महापौर, कुठल्या लक्षवेधीला प्राधान्य दयाला पाहिजे या लक्षवेधला प्रभाग क्र. ९ ला मर्यादित पाणी पुरवठासाठी लक्षवेधी आहे. साळवे मॅडची लक्षवेधी संपुर्ण उल्हासनगरच्या वालधूनी नदीच्या प्रदुषणाबाबत दिलेली आहे. आज तिन्ही स्टेशनवर लोक सफाई करत आहेत. लक्षवेधीचा अर्थ काय आहे हे अजून समजले नाही. फक्त प्रभाग क्र.९ साठीच लक्षवेधी आणलेली आहे का? याचा पारिणाम शहराच्या नागरीकांवर होणार आहे. ही लक्षवेधी प्रभाग क्र.९ च्या नगरसेवकांसाठीच आहे. लक्षवेधीचा अर्थ काय होतो. सुरूवातीपासून चुकीचे चालले आहे. एक तर प्रस्तावाची सुचना घेतली नाही हे चुकीचे आहे. प्रश्न क्र. २ चे कारण सांगितले नाही आपण काय चालवत अहात. लक्षवेधी कोणती असायला पाहिजे ज्याचा परिणाम लोकांवर होणार नाही. साळवे मॅडमने जी महत्वाची सुचना दिली होती. तिच्यावर लक्ष दिले नाही तर त्याचा प्रभाव लोकांवर होणार आहे. आयुक्त साहेब या विषयावर परवा चर्चा पण झालेली आहे. प्रदुषण मंडाळाचे आयुक्त, डि.सी.पी. यांनी मिटींग लावली होती तेथे एक पण नगरसेवक आले नाहीत. तेथे चर्चा झाली होती वालधुनी नदीचा संबंध महापालिकेशी सबंधीत आहे असे आयुक्त साहेब आणि डि.सी.पी.ने सांगितले होते. तर मग आपण कोणती सुचना घेतली आहे. फक्त एका वार्डसाठी, इथे फक्त वार्डसाठी चर्चा करायला बसलो आहोत का? आपण आम्हांला काय सांगितले की, पाण्याच्या लक्षवेधीसाठी चर्चा करू. तुम्ही कबुल केले होते आणि आता फक्त पाण्यासाठी लक्षवेधी जी आहे ती फक्त वार्ड क्र. ९ ब साठीच घेतलेली आहे. महापौरांनी सांगितले की, महासभेचा वेळ अमुल्य आहे तो वाया जायला नको.

उप महापौर, श्री. जीवन इदनानी:— ही जी लक्षवेधी आहे, ती संपुर्ण उल्हासनगर शहरासाठी आहे.

सदस्य, श्री. धनंजय बोडारे:— प्रभाग क्र. ९ ब च्या वार्डासाठीच चर्चा करायची आहे काय, सचिव मॅडम लक्षवेधी वाचून दाखवा.

सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:— मा. महापौर मॅडम, ९ ब लिहीले आहे.

उप महापौर, श्री. जीवन इदनानी:— मा. महापौरांच्या आदेशान्वये ही लक्षवेधी घेतली आहे.

काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत आहेत हे समजून आले नाही.

सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:— लक्षवेधी फक्त एका वार्डासाठी यायला नको पाहिजे तर ती संपुर्ण उल्हासनगर शहरासाठी लक्षवेधी यायला पाहिजे होती. फक्त एका वार्डासाठी चर्चा करायला आम्ही इथे बसलो नाही.

सदस्य, श्री. भारत राजवानी:— सतरामदास जेसवानीची लक्षवेधी आलेली नाही.

सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:— वालधूनी नदी संपुर्ण उल्हासनगर शहराची आहे. आपण चुकीचे करत अहात. मिटींगच्या पहिले सगळयाना बोलवत का नाही?

सदस्य, श्री. राजेश वानखेडे:— पहीले पाण्याचा विषय घ्यायला पाहीजे.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :— या सगळया बातम्या वाचून मुख्यमंत्र्याना वाटेल कशाला सत्ता बनवली. उल्हासनगरच भलं करण्यासाठी.

सदस्य, श्री. धनंजय बोडारे:— पत्रकारांनी याची नोंद घ्यावी. या उल्हासनगर महानगरपालिकेच्या महासभेमध्ये कसा प्रकार चालला आहे. सचिव मॅडम तुम्ही सुध्दा सल्ला दयायला पाहीजे होता की ही लक्षवेधी होऊ शकत नाही. प्रभाग क्र.९ ब ही लक्षवेधीचा विषय होऊच शकत नाही आणि ती तुम्ही स्विकारता, जी महत्वाची सुचना आहे ती तुम्ही फेटाळत आहेत.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:—</u> पाण्याचा विषय तुम्ही लोकं घेत नाही, या वालधुनी नदीमुळे.

<u>सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—</u> या वालधूनी नदी प्रदुषणामुळे शहरात गाडी चालवणे सुध्दा अशक्य झाले आहे. तुम्ही त्याबाबत मिटींग का लावत नाही.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> याच्या नंतर फक्त ७८ नगरसेवक आपआपल्या वार्डाचे २६ नंबर अ, २६ नंबर ब, लक्षवेधी देणार आहे आपल्याला मंजुर आहे का? बोला.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:—</u> मॅडम आपण सांगितले होते की, नंतरची लक्षवेधी आपण पाण्यासाठी घेणार होते त्याचे काय झाले.

<u>उप महापौर, श्री. जीवन इदनानी:— </u>तुम्हांला पाण्याच्या लक्षवेधीवर चर्चा करायची आहे ना.

काही सदस्य एकत्रित बोलत असल्यामुळे कोण काय बोलत आहेत हे समजून आले नाही.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :—</u> मा. महापौर, तुम्हांला जे मार्गदर्शन करत अहात, ते चुकीचे मार्गदर्शन करत आहेत. मार्गदर्शन देणारा फक्त स्वत:च्या स्वार्थासाठी करत आहेत.

<u>सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—</u> कुठलाही प्रश्न घेतला जात नाही, एकाही कर्मचा—यांचा प्रश्न घेतला जात नाही.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव :—</u> मग ही मॅडमची लक्षवेधी रद्द करून टाका.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे :— </u>जमनादासजी, यात उप महापौरांची चुकी आहे. आम्हांला माहिती नाही का?

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:—</u> मा. महापौर मॅडम यांच्या वार्डामध्ये भरपूर पाणी, कधी तरी आमच्या वार्डामध्ये फिरून बघा मग समजेल काय चालले आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> मा. महापौर, ही जी लक्षवेधी आपण स्विकारली आहे. जेव्हा सभागृहातल्या सदस्यांनी पाण्याच्या लक्षवेधीसाठी मागणी केली. तेव्हा लक्षवेधीवर कोणताही ठराव होत नाही.

या वेळी सदस्य एकत्रित आवाजात बोलत होते, त्यामुळे कोण काय बोलत आहे हे समजुन आले नाही.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:—</u> माझ्या वार्डमध्ये पाणी नाही, पहीले ती चर्चा करा.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> मा. महापौर, जेव्हा सभागृहामध्ये लक्षवेधी चर्चेसाठी येते, एक विषय सदस्य घेऊन येतो तेव्हा बाकीचे सदस्य सुध्दा या विषयावर चर्चा करतात आणि सन्माननिय मा. महापौर, आयुक्त निर्देश देतात की हे काम व्हायला पाहीजे. त्यामध्ये कोणत्याही एका वार्डचा समावेश होत नाही.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:—</u> एका वार्डचा समावेश करण्यात आला आहे, त्यामुळेच आम्ही लोक बोलत आहेत.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> प्रभाग क्र.९ ब ची पाण्यासाठी हि लक्षवेधी होऊ शकते का?

<u>महापालिका सचिव:—</u> लक्षवेधीचा नियम असा आहे की मा. महापालिका सदस्य, सभेच्या किमान दोन तास अगोदर महापौर, आयुक्त, सचिव यांस लेखी नोटीस ठेवून आणि पिठासिन अधिका—यांच्या पुर्व परवानगीने निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या कोणत्याही बाबीकडे आयुक्तांचे लक्ष वेधता येईल आणि आयुक्तास संक्षिप्त निवेदन करता येईल आणि नंतरच्या तारखेस निवेदन करण्यासाठी वेळ मागता येईल. अशा निवेदनावर कोणतीही चर्चा होणार नाही. त्याच बैठकीस दोन पेक्षा अधिक अशा कोणत्याही बाबी उपस्थित करण्यात येणार नाहीत.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> बरोबर आहे, प्रभाग क्र. ९ ब हा लक्षवेधीचा विषय आहे का?

<u>महापालिका सचिव:—</u> नाही.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> नाही मग कशाला घेतली.

<u>सदस्या, श्रीम. वसुधा बोडारे:—</u> मॅडम दुसरी लक्षवेधी महत्वाची आहे ती घ्या.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:—</u> पहीला पाण्याचा विषय घ्यायला पाहीजे होता, आम्ही कधी पासून सांगतोय पाण्याचा विषय घ्या,

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> सन्माननिय महापौर मॅडम, आज जर पाण्याचा विषय तुम्ही शहराच्या संदर्भात घेत असाल तरच चर्चा करायला आमची तयारी आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> पाण्याच्या विषयावर संपुर्ण शहरासाठी चर्चा करू.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:—</u> आमच्या वार्डमध्ये पाणी नाही आणि आमच्याच वार्डमध्ये तुमचे पंप खराब होतात का?

या वेळी सदस्य एकत्रित आवाजात बोलत होते, त्यामुळे कोण काय बोलत आहे हे समजुन आले नाही.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> बोडारेजी आपण कृपया करून एक एक जण बोला. मी तुम्हांला सांगते की आधी अंजली मॅडमच्या विषयावर चर्चा करू नंतर पाण्याच्या समस्यावर चर्चा करू. नियमाचे पालन करा आणि एक एक बोंला. अंजली मॅडमच्या विषयावर आणि शहराच्या पाण्याच्या समस्येवर चर्चा करू.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:—</u> माझ्या वार्डमध्ये पाणी नाही.

<u>महापालिका सचिव:—</u> मा. महापौरांनी श्री.सतरामदास जेसवानी यांची आणि श्रीम. अंजली साळवे मॅडमची लक्षवेधी स्विकारली आहे. दोनच लक्षवेधी स्विकारता येत असल्याने दोन लक्षवेधीवर चर्चा होईल. श्रीम. डिंपल ठाकुर यांची लक्षवेधी त्यामुळे घेता येणार नाही आणि महापौरांनी सांगितले आहे पाण्यावर चर्चा करा पहीली लक्षवेधी आहे, श्रीम. अंजली साळवे.

---

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक १</u> उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत असलेल्या वालधूनी नदीत सोडण्यात येणा—या विषारी रसायन पासून शहरातील नागरीकांचे आरोग्य व शहराला प्रदुषणापासून वाचविणेबाबत.

खालील लक्षवेधी सुचना दिनांक २०/४/२०१७ रोजीच्या महासभेच्या कामकाजात समाविष्ट करून लक्षवेधीत उपस्थित केलेल्या मुद्दयाचे समाधानकारक उत्तर मिळावे, हि विनंती.

वरील विषयांन्वये मी आपले लक्षवेधू इच्छिते की, उल्हासनगर शहरात वालधूनी नदी ही उल्हासनगर शहरातील मुख्य भागातून जात असल्यामुळे सदरच्या नदीमुळे शहराचा विकास झालेला आहे. परंतु आजमिती सदरच्या नदीची अवस्था हि अत्यंत वाईट व दैननीय असून सदरच्या नदीत विषारी रसायने सोडण्यात येत असल्यामुळे नदीचे पाणी हे शहरातील नागरीकांच्या उपयोगाचे नाही. त्यामुळे उल्हासनगर शहरातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आलेले असून संपुर्ण शहरात प्रदुषण होत आहे. सदरच्या गंभिर विषयांवर केअर फाऊंडेशन व हिराली फाऊंडेशन संस्था मागील काही वर्षापासून लढा देत आहे. त्यांच्या मागण्या खालील प्रमाणे आहेत.

१. उल्हासनगर शहरातील सांडपाणी वालधूनी नदीत सोडण्यापूर्वी त्यांचे शुध्दीकरण करण्यात यावे.
२. पावसाळ्यापूर्वी शहरातील नाले सफाई करण्या करीता खाजगी ठेकेदारांना नाले सफाई करण्या करीता ठेका देण्यात येतो. त्याअनुषंगाने वालधूनी नदीचे देखील सफाई करण्याकरीता जेसीबी, पोखरण लाऊन (डिस्लेटिंग) सफाई करण्यात यावे व त्याची योग्यरीत्या नोंदणी करण्यात यावी.

३. वारंवार शहरातील नागरीक अथवा कारखाने विषारी रसायन वालधूनी नदीत टाकतात. तरी अशा नागरीकाविरूध्द व कारखाने विरूध्द महानगरपालिका कडून कठोर कारवाई संदर्भात ठोस निर्णय घेण्यात यावा.

तरी उपरोक्त दिलेला विषय हा उल्हासनगर शहरातील नागरीकांच्या आराग्यास व शहरातील प्रदुषणाशी निगडीत असल्यामुळे त्यांवर योग्य ती चर्चा व कार्यवाही करण्यात येणे कामी ही लक्षवेधी सुचना.

---

<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u> यामध्ये दादा सतरामदास जेसवानी यांची लक्षवेधी कुठे आहे. दिलीच नाही.

<u>महापालिका सचिव:—</u> दिली आहे तुम्हांला इतिवृत्ता बरोबर लक्षवेधी दिली आहे.

<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u> कधी दिली आहे.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> सन्माननिय सदस्य, आपण बसून घ्या, आपण वेळेचा खुपच अपव्यय झाला आहे. आता जी लक्षवेधी घेतली आहे त्याच्यावर चर्चा करा.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:—</u> भारत राजवानीजी, आपण आपले पेपर सांभाळून आणत जा, सगळयांना पेपर मिळाले आहेत.

<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u> त्याच्यावर तर चर्चा करूच.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> पहीले अंजली मॅडमची लक्षवेधी घेऊ व नंतर सतरामदास जेसवानी यांची लक्षवेधी घेऊ.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—</u> मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, उप महापौर, सचिव मॅडम आणि सर्व सभागृह राईट टू लिव्ह इज दी फंडामेंटल राईट अंडर आर टूवेंटी वन ऑफ दी कॉन्सटीटयुशन ॲन्ड इनक्लुड्स दि राईट ऑफ इन्जॉयमेंट ऑफ पोलूशन फ्री वॉटर ऐअर फॉर फुल इन्जायमेंट ऑफ लाईफ या संदर्भातून आजची लक्षवेधी केअर फाऊडेशन व हिराली फाऊडेशन यांनी या संदर्भात आपण अनेक वेळा आपण ही लक्षवेधी घेतलेली आहे. उल्हासनगर महानगरपालिका हद्‌दीत असणा—या वालधूनी नदीत सोडण्यात येणा—या रसायने पासून नागरीकांचे आरोग्य आणि शहराला प्रदुषणापासून वाचविणे बाबत. या विषयान्वये मी आपले लक्षवेधीत इच्छिते की ही वालधूनी नदी शहरातून जात असल्याने सदरच्या नदीमुळे शहराचा विकास झालेला आहे. पण या नदीमध्ये अत्यंत विषारी रसायने आणि त्या अनुषंगाने एअर पोल्युशन हे खुप होत असल्याने त्यामुळे नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे. या विषयावर केअर फाऊडेशन व हिराली फाऊंडेशन अनेक वर्षापासून लढा देत आहेत आणि हा विषय आपल्याकडे पण मागे अनेक वेळा आलेला आहे. पण याच्यावर आपण काही गंभिरपणे चर्चा केली नाही किंवा त्यावर ॲक्शन घेतलेली नाही. तेथील नागरीकांना श्वसनाचे त्रास आणि आरोग्याचा प्रश्न अतिशय गंभीर झालेला आहे. तर या विषयावर आपण काय ॲक्शन घेऊ शकतो. हा विषय अतिशय गंभीर आहे आणि यावर अतिशय गंभीरपणे चर्चा व्हावी आणि निर्णय घेण्यात यावा. याच्यामध्ये त्यांच्या मागण्या प्रमाणे उल्हासनगर शहरातील सांडपाणी वालधूनी नदीत सोडण्यापुर्वी त्याचे शुध्दीकरण करण्यात यावे. तसेच पावसाळयातील नालेसफाईचा करण्याकरीता खाजगी ठेकेदारांना जो नालेसफाइचा जो ठेका देण्यात येतो त्या अनुषंगाने वालधूनी नदीची सफाई करण्यासाठी जेसीपी पोखरण लावून सफाई करण्यात यावी आणि त्याची योग्यरित्या नोंदणी करण्यात यावी आणि वारंवार शहरातील नागरीक अथवा कारखाने विषारी रसायने वालधूनी नदीत टाकले जातात. तरी अशा नागरीकां विरूध्द व कारखान्या विरूध्द महानगरपालिके कडून कठोर कारवाई करण्यात यावी किंवा ठोस निर्णय घेण्यात यावा. तिथे सी.सी.टी.व्ही. आपण लावू शकतो किंवा आणखी काही प्रयोजन करता येत असेल आणि हा विषय आरोग्याशी निगडीत असल्यामुळे मा.आयुक्त साहेबांना माझी विनंती आहे, आणि सभागृहाला पण माझी विनंती आहे की, या संदर्भात आपल्याला काय निर्णय घेता येईल. याची चर्चा व्हावी आणि याचा निर्णय व्हावा.

**सदस्य, श्री. विजय पाटील:—** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब या लक्षवेधीमध्ये जसे टाकले की सांडपाणी शुध्द करून फक्त उल्हासनगरचेच पाणी या नदीत येत नाही. तर अंबरनाथ एम.आय.डी.सी. चे पाणी आणि अंबरनाथ पुर्वेचे पाणी याच नदीमध्ये येते. तर आपण त्यासाठी काही करू शकतो का?

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** साळवे मॅडमचे अभिनंदन किंवा त्यांना धन्यवाद देतो. मा. महापौर महोदया वास्तवीक ही लक्षवेधी सामावून घेणेसाठी आम्हांला बोलण्याची आवश्यकता नव्हती. कारण हा शहराचा विषय आहे, परंतु त्यासाठी खुप बोलावे लागले. कारण की, आपली लोकांची तशी मानसिकता होती. शहराचा विकास करण्यासाठी लक्ष केंद्रीत करण्या पेक्षा फक्त एखादया वार्डबाबत काम करण्याची क्षमता ठेवली जाते. त्याची एक वेळ असायला पाहीजे. मा. महापौर, उप महापौर आपणाला दोघानाही विनंती आहे. तुम्ही सभागृह चालवत आहेत. आपण परत परत बोलत होता की सभागृहाची वेळ महत्वाची आहे. वाया घालवू नका सभागृहाचे काम नियमानुसार चालायला पाहीजे. महासभा चालवायच्या वेळी पिठासिन अधिकारी, सचिव आणि बाकी बसलेले अधिकारी आहेत यांचे पण काम आहे की बरोबर नियमानुसार चालायला पाहिजे, आणि नियमानुसार चालले नाही तर असे होणारच. याच्या नंतर लक्षवेधी घ्यायच्या वेळी याच्या पहीले आम्ही सत्ता पक्ष, विपक्ष राहीलेलो आहे. आज जे सत्तमध्ये आहेत आणि सत्ताधारी विपक्षमध्ये परंतु दोघेही बरोबर बसून ठरवत होते की, लक्षवेधी कोणती घ्यायची आहे. ही घ्यायचे आहे, ती घ्यायचे आहे त्याच्यावर चर्चा व्हयाची आणि नंतर ती सामावून घेतली जात होती. हा माझा तुम्हांला सल्ला आहे. मान्य करा किंवा नका करू हे तुमच्यावर आहे. लक्षवेधी महत्वाची आहे. चार दिवस पहीले टाऊन हॉलमध्ये आयुक्त साहेब आणि डी.सी.पी. मिटींग लावणार होते. ध्वनीप्रदुषणामुळे लोकांना काय काय त्रास होतो. त्याचा परिणाम लोकांच्या जीवनावर व प्राणीमात्रावर काय होतो. पोलिस विभागाने महापालिकेबरोबर ठेवला होता. तेव्हा अशोक ठाकुर यांनी मुद्दा उपस्थित केला होता की, वालधूनी नदीमध्ये जे विषारी रसायने सोडली जातात त्यामुळे त्याचा परिणाम लोकांवर होत आहे, नदी किना—या जवळ राहणा—या लोकांवर परिणाम होत आहे. हवा थांबत नाही, हवेबरोबर जे किटाणू येतात त्यांचा परिणाम नागरीकांवर होत आहे. संपुर्ण शहराला त्याचा परिणाम भोगायला लागत आहे. तेव्हा आयुक्त साहेब आणि डी.सी.पी. साहेब यांनी सांगितले की प्रदुषण महानगरपालिकेशी संबधित आहे. तेव्हा आश्वासन दिले होते की, महानगरपालिकेमध्ये आपण बोलू. आज साळवे मॅडमनी लक्षवेधी दिलेली आहे. आपणाला माहीत पण असेल आपणाला केअर फाऊंडेशनने पत्र दिले होते आणि तुम्हांला सुध्दा पत्र दिले होते. संपुर्ण शहराला माहीत आहे की, वालधूनी नदीचा काय त्रास होत आहे. आम्ही उल्हास नदीचे नाव घेतो कधी सिंधू नदीचे नाव देतो. परंतु ती वालधुनी नदी आहे. त्याचा परिणाम शहरावर चांगला होत नसुन तो वाईट होत आहे. १० वर्षे पहीले वालधूनी प्राधिकरणाची स्थापना केली होती. उलहासनगर महानगरपालिकेने प्रस्ताव मंजुर केला होता. त्यानंतर काही पैसे पण भरलेले होते किंवा पैसे भरण्यासाठी बोलले होते. परंतु ते झालेच नाही. दहा वर्षे किंवा पंधरा वर्षे पहीले, त्यानंतर काय झाले माहित नाही. वालधूनी नदीची परिस्थिती जशी आहे तशीच राहीली. आपल्यांना माहीत असेल डॉ. साहेब बाजुच्या विभागामध्ये आले होते. जो टोनी सिरवानीचा वार्ड आहे. सम्राट अशोक नगर, ओटी सेक्शन नं.३ चा परिसर, संजयगांधी नगर, चौदा नंबर पटरीचा सर्व भाग आणि वसिटा कॉलनी, इतर भाग एकदम वालधूनी नदीच्या किना—यावर वसलेले आहेत. त्यांना दिवस रात्र त्रास आहे. दोन वर्षापुर्वी टॅकरवाले आले होते, अंबरनाथ एम. आय.डी.सी. ने टॅकर खाली केले होते. त्यावेळेस २५ लोकांना श्वास घेण्यास त्रास झाला होता. तेव्हा ज्या ज्या ठिकाणी टॅकर खाली केले जातात तेथे सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्यात यावेत. वालधूनी नदी साफ होईल असे प्रशासनाने आश्वासन महासभेमध्ये दिले होते. याच सभागृहामध्ये चर्चा झाली होती, हंगामा झाला होता. उल्हासनगर महानगरपालिका कशासाठी आहे, नागरीकांचे चांगले करण्यासाठी किंवा लोकांना त्रास देण्यासाठी आहे का? हे आपण करू शकत नाही का आपण वालधूनी नदी म्हणत होतो. काही लोकांनी प्लान मंजुर करण्यासाठी ही नदी नाही नाला आहे आणि खरोखर आज नालाच झाला आहे. त्या नाल्याचा परिणाम आज पुर्ण शहरावर होत आहे. आज प्रत्येक शुक्रवारी चार नंबर ओटी पर्यंत आयुक्त साहेब एवढा खराब वास येतो की, लोकांना श्वास घेणे मुश्किल होते. त्याचा परिणाम लोकांमध्ये टी.बी.चे परिणाम वाढले आहेत. जर तुम्ही सेंटर हॉस्पिटल व खाजगी हॉस्पिटलचे रिपोर्ट घेतले तर समजेल की, उल्हासनगरमध्ये सर्वात जास्त टी.बी. आणि दम्याचे रूग्न जास्त आहेत. मी कालच सेंटर हॉस्पिटलमध्ये गेलो होतो. अस्थमाचे रूग्न तेथे जास्त आहेत कारण तेथे या उल्हासनगरमध्ये वायु प्रदुषणाबाबत कोणी उच्च न्यायालयात गेले आहेत. पोलिस विभागामुळे आत सर्व डी.जे.वैगेरे बंद झाले आहेत. त्यापेक्षाही खतरनाक परिणाम या वायु प्रदुषणाचा आहे. वॉटर पोल्युशन बाबत आपण नंतर बोलू सध्या लक्षवेधी ही एअर पोल्युशन व वालधूनी नदीबाबत आहे. वालधूनी नदिमध्ये लोकांना माहीत आहे, प्रशासनाला माहीत आहे परंतु कारवाई होत नाही. कारवाई का होत नाही. मागे वीस पंचवीस लोक हॉस्पिटलमध्ये ॲडमिट झाले होते. तेव्हा महापालिका प्रशासन, पोलिस प्रशासन सतर्क झाले. तेव्हा संबंधित कारखाने त्यांना नोटीसा देण्यात आल्या. जे वाहन चालक होते, त्यांच्यावर कारवाई केली आणि पुन्हा जसे होते तसेच झाले. आता पण शुक्रवारच्या संध्याकाळच्या वेळी लोकांना श्वास घेणेसाठी

मुश्किल होते. हा मुद्दा अशोक ठाकुर सन्माननिय नगरसेवक आहेत, ते माझे मित्र होते. त्यांनी तुम्हांला हा प्रश्न टाऊन हॉलमध्ये उपस्थित केला होता. कारण ते तेथे बाजुला राहतात. रोजचा अनुभव आहे आणि मला जे होते तेच शहरवासियांना होते. त्यामुळे त्यानी टाऊन हॉलमध्ये मुद्दा उपस्थित केला होता. याबाबत प्रशासन काय करणार आहे. वालधूनी प्राधिकरण झाले नाही तर उल्हासनगरचे प्राधिकरण न करता तिथे उपाययोजना काय करणार आहेत. जे तिथे घाण सोडतात त्यांच्यावर कारवाई होणार का? त्यांना प्रतिबंध होणार का नाही झाला तर का नाही झाला. होऊच शकत नाही. होऊच शकत नसेल तर तेथील लोकांना त्वरीत स्थलांतर करा किंवा पर्यायी व्यवस्था करा. तेथील परिसर खाली करा, तेथे साफसफाई करू शकत नाही, प्रतिबंध करू शकत नाही. लोकांचे जीवीत त्यांची काळजी करणे महापालिकेचे प्रथम कर्तव्य आहे. महापालिकेचे ते कर्तव्य आहे, त्याचे पालन केलेच पाहीजे. लोकांना साफ पाणाी, साफ हवा आमच्याकडे प्रदुषण नियंत्रण कक्ष नाही. मागे फक्त इथे चर्चा झाली प्रदुषण नियंत्रण कक्ष ज्याच्यामध्ये उप आयुक्त असेल आणि बाकीचा स्टाफ मग वायु प्रदुषण असेल किंवा ध्वनिप्रदुषण असेल, आम्ही या ठिकाणी नियंत्रण कक्ष उभे केले होते. परंतु आता कुठे आहे ते, प्रत्येक ठिकाणी वायुप्रदषण कमी व्हावे यासाठी चांदीबाई कॉलेजने पुढाकार घेतला होता. प्रत्येक ठिकाणी केंद्र उभी केली होती. गोल मैदान उल्हासनगरमध्ये दहा ते पंधरा ठिकांनी उभे केले होते. आज त्यांची आवस्था काय आहे, काहीच नाही. मग लोकांमध्ये नुसते आरडा ओरड करून काय उपयोग आहे. मी परवा मुद्दा उपस्थित केला होता, लोक नसल्यामुळे गुंडाळून घेतले की, वायुप्रदुषण कमी करण्यासाठी पवई येथे जकात नाका आहे तेथे केंद्र उभारलेले होते, मशिन ठेवले होते. आज ते नादुरूस्त आहे. दहा ते पंधरा मशिन भगवंती नावानी स्टेजवर होते, चांदीबाई कॉलेज येथे होते. आमचे नागरीक सुविधा विभागाचे प्रमुख अभिजीत महामुलकर हे चांगल्या प्रकारे व्यवस्थित हाताळत होते. त्याच्या नंतर चांदीबाईचे प्राचार्य दिनेश पंजवानी त्यांनी पण पुढाकार घेतला होता. असे टिम वर्क आणि उन्हाळे साहेब होते. त्यांनी पुढाकार घेऊ उल्हासनगरमधील संपुर्ण प्रदुषण कमी होण्यासाठी प्रयत्न केले होते. असे सगळे व्यवस्थित चालले होते. आज ते नादुरूस्त आहेत. एक विनंती आहे, आज जी लक्षवेधी आलेली आहे. त्या लक्षवेधीच्या आधारे तो विषय गांर्भियाने घ्याव. आम्ही पाठपुरावा करतो आहे आणि करूच पण प्रशासनाने कारवाई केली पाहीजे. जे लोक ऐकत नाहीत, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई, प्रतिदंडात्मक कारवाई, काय काय करणार आहेत. तेथील विकास कसा करणार आहेत. जो नाला आहे, त्याचे सौंदर्यकरण केले तर उल्हासनगरला चांगले दिवस येतील. तर याबाबत आपले काय म्हणण आहे, प्रशासनाचे मत काय आहे, हे आपण नमुद कराव ही विनंती.

<u>सदस्या, श्रीम. जोत्सना जाधवः—</u> मा. महापौर, मा. आयुक्त, मा. उप महापौर मला या महासभेमध्ये सर्व मान्यवरांच्या नजरेमध्ये आणून दयायचे आहे की, आपल्या निर्देशनास आणून देते की, महानगरपालिकेचा कारभार हा मराठीतच व्हायला हवा, असा नियम आहे. कारण की मराठी ही राज्य भाषा आहे, शासकिय भाषा आहे. तरी पण उल्हासनगर पालिकेतून आम्हांला जो रिपोर्ट दिलेला आहे. तो पुर्णपणे इंग्रजीतून प्रकाशित केलेला आहे. तर हे काय चालले आहे, कुणाच्या नजरेत आले नाही का? आयुक्त साहेब तुम्ही याच उत्तर दया आम्हांला. जर मराठीत सगळा कारभार चालत आहे तर हे इंग्रजीतून का छापण्यात आले आहे.

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—</u> मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, आमच्या अंजली मॅडमने जी लक्षवेधी आणली आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u> डॉक्टर साहेब, प्रथम या प्रश्नाचे उत्तर आयुक्त साहेबांना देवू दया. डॉक्टर साहेब हा जो पर्यावरणाचा विषय आहे, तो पुर्णपणे इंग्रजीत आहे. आम्ही तो वाचलाच नाही. तर त्याच्यावर काय चर्चा करणार.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारीः—</u> डॉक्टर साहेब आपण कृपया करून जागेवर बसून घ्या.

<u>महापालिका सचिवः—</u> हा विषय पर्यावरणाचाच आहे.

<u>आयुक्त, डॉ. सुधाकर शिंदेः—</u> काही सदस्यांनी पर्यावरणाचा हा जो रिपोर्ट आहे, तो आपल्याकडे इंग्रजी भाषेमध्ये वितरीत झालेला आहे असे निदर्शनास आणला आहे. तो रिपोर्ट ज्या संस्थेने बनवला आहे किंवा आकारणी केला आहे. त्याची मुळ प्रत आपल्याकडे इंग्रजी भाषेमध्येच आलेली आहे. जर सन्माननिय सदस्यांना ते मराठीमधून पाहिजे असेल तर आम्ही प्रशासन लवकरात लवकर त्याचे मराठीतून अनुवाद करून आपल्याकडे सादर करेल.

[

या वेळी सदस्य श्री. शंकर लुंड व श्री. दिपक सिरवानी हे सभागृहातून बाहेर गेले.

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u> मा. आयुक्त साहेब, महापौर मॅडम अंजली मॅडमनी जी लक्षवेधी आणली आहे, त्यासाठी आम्ही दोन वर्षा पुर्वी वालधूनी नदीसाठी प्रांतकार्यालया समोर उपोषणाला बसलो होतो. स्वच्छ वालधूनी नदी परंतु काही टेक्नीकल प्रॉब्लेममुळे तीला नाला म्हणटले जात आहे. माझे दोन विनंती आहेत, वालधूनी नदीजवळ एक बोर्ड लावायला पाहीजे (धीस इज वालधूनी नदी, नॉट नाला साईन बोर्ड बोथ साइट इट इज दी वालधूनी नदी) दुसरा महाराष्ट्र प्रदुषण कंट्रोल बोर्डाकडून या वालधूनी नदीला एक करोडचा दंड झाला आहे. बाइ फ्रेकेशन तीस लाख रूपये अंबारनाथ भरत आहे, तीस लाख रूपये उल्हासनगर आणि चाळीस लाख रूपये कल्याण भरण्यासाठी ऑर्डर दिली होती. हे आपणाला माहीत आहे किंवा नाही, मी हे पण सांगतो की, एवढे प्रदुषण झाले आहे की, हा दंड तीन्ही महापलिकांना झाला आहे. परंतु त्याच्या नंतरही अंमलबजावणी झालीच नाही. मी मॅडमला धन्यवाद देतो की, त्यांनी हा विषय परत आणला आहे. बोडारे साहेबांनी सुध्दा सांगितले आहे की, दोन वर्षा पुर्वी समता नगरमध्ये जी घटना झाली होती. तेव्हा पंचवीस लोकांना त्रास झाला होता. त्याचे हेच कारण आहे. काही दिवस या टॅकर माफीयांचे काम चालत आहे, पोलिसांचे लक्ष आहे. आठ दहा दिवसानंतर परत चालू होऊन जाते आणि परत प्रदुषण चालू होते. अॅझ दी डॉक्टर आय एम चॅलेंज दि पेशंट थिंकिग दी उल्हासनगर इन धिस एरिया एज अस्थमा इज डयु टू केमिकल प्लीज थ्रु अवर विजीलन्स बाय सी.सी.कॅमेरा अदर वाईस, डिपार्टमेंट वाईज आर परसन एन्ड कार्पोरेशन डिपार्टमेंट धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> मा. महापौर मॅडम, उप महापौर, मा. आयुक्त साहेब, आजची जी लक्षवेधी सभागृहामध्ये आणली आहे. त्याबद्दल मी साळवे मॅडमला धन्यवाद देतो. या शहरामध्ये प्रदुषणाच्या बाबतीत बोलायचे झाले तर वालधूनी नदी ही पुर्वी चांगली नदी होती. या नदीमध्ये लोक अंघोळ करत होते, कपडे धुवत होते. अशा नदीचा नाला बनवून टाकला आहे. या विषयावर खर तर अगोदरच महानगरपालिकेने लक्ष दयायला पाहीजे होते. महापालिकेने त्यावर अगोदरच उपाय योजना करायला पाहीजे होत्या. परंतु त्या केलेल्या नाहीत. आता ही लक्षवेधी सभागृहामध्ये आलेली आहे. आपण सगळयांनी त्याबाबतीत चांगला विचार करून चांगला निर्णय आयुक्त महोदयांनी घ्यावा. अशी मी आयुक्तांना विनंती करतो. या नदीच्या बाबतीत बोलायचे झोले तर आताच बोडारे साहेबांनी सांगितल्या प्रमाणे ओटी सेक्शन नं.३ वैगेरे आणि इकडे पुढे जर आपण आलो तर शांतीनगर, हिरा घाट, पंचशिलनगर, खन्ना कंपाऊड, मिनाताई ठाकरेनगर या भागातल्या लोकांना खरोखर जर आपण सर्वेक्षण केले, तर डॉक्टरांच्या माध्यमातून महापालिकेच्या सर्वेक्षण केले तर ७० टक्के लोकांना आजार झालेला असेल व त्या नदीच्या प्रदुषणामुळे झालेला आजार असेल आणि त्यामध्ये ते लोक आजारी असतील आणि त्याला सगळयाला जबाबदार आपली महानगरपालिका असेल. या गोष्टीकडे अगोदरपासून लक्ष दिले गेले नाही. माझी विनंती आहे की, आता तरी आपण लक्ष देवून त्या भागातील लोकांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी प्रयत्न केले पाहीजेत. त्या नदीमध्ये आपण दर वर्षी साफसफाई करतो. ती फक्त नावापुरती असते. या नदीमध्ये मेलेली जनावरे टाकाली जातात. त्या नदीमध्ये केमिकल सोडले जाते. त्या नदीमध्ये सगळयांचे सांडपाणी सोडले जाते, पुर्ण शहराचे सांडपाणी सोडले जाते. आताच विजय पाटील यांनी सांगितल्या प्रमाणे अंबरनाथ एम.आय.डी.सी.चे केमीकलचे पाणी सोडले जाते. सर्व ही कारणे असून आपण अंबरनाथ महापालिकेची मदत घ्यावी. आपल्या महापालिकेने त्यासाठी प्रयत्न करावेत आणि तिथल्या लोकांचे आरोग्य कसे चांगले राहील. त्याच्या पुढे जाऊन सांगतो की, वडवली गांवामध्ये जी शाळा आहे, इंग्रजी माध्यमाची त्या शाळेमध्ये हजारो मुले शिकत आहेत आणि त्यांच्याही आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. यासाठी आपण प्रयत्न करावेत. कारण लहान मुलांच्या आरोग्यास धोका लवकर पोहचू शकतो. त्यासाठी महापालिकेने लवकरात लवकर प्रयत्न करावेत आणि या प्रदुषण महामंडळाच्या माध्यमातून आपल्या या सभागृहाच्या सदस्या मिना सोंडे यांना एक पारीतोषिक मिळालेले आहे. म्हणून मी त्यांचा आपल्या सभागृहाच्या वतीने शिवसेनेच्या वतीने अभिनंदन करतो. प्रदुषण प्रेमी म्हणून मिना सोंडे यांना पारितोषिक मिळालेले आहे. त्यांचे या सभागृहाच्या वतीने आणि शिवसेनेच्या वतीने अभिनंदन करतो आणि या प्रश्नाकडे आपण गांर्भियाने लक्ष दयावे अशी अपेक्षा करतो, धन्यवाद.

<u>सदस्या, श्रीम. मिना सोंडे:—</u> धन्यवाद सर.

<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—</u> महापौर मॅडम, मी फक्त दोन मिनीट घेतो, उप महापौर आणि सगळे लोकप्रतिनीधी जे महासभेमध्ये बसलेले आहेत, निवडून आलेले आहेत. त्यांच्याकडून लोकांच्या खुप अपेक्षा आहेत. जे नगरसेवक निवडून दिलेले आहेत, ते शहरासाठी भरपूर काही करतील, साळवे ताईनी जी लक्षवेधी आणली आहे. त्या बद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. शहरातील चार आणि पाच नंबरची जी जनावरे मरतात ती सगळी वालधूनी नदीत टाकली जातात. आपण सफाई कामगारांना विचारा किंवा मुकादम यांना विचारा की, चार आणि पाच नंबरचे जेवढी जनावरे मरतात ती सर्व नदीमध्ये टाकली जातात. तर मग महानगरपालिका एवढी

मोठी चुक जाणूनबजून कशी करत आहे. हा एक चिंतेचा विषय आहे. मी जर चुकीचा असेल तर महासभेमध्ये माफी मागेल. तरी कृपया या विषयावर जास्तीत जास्त लक्ष दया. सगळयानी या विषयावर लक्ष देण्यासाठी सांगितले आहे. लवकरात लवकर नदीची साफसफाई कशी करू शकतो यावर लक्ष दया. उल्हासनगर पाच मध्ये लोकांना जगणे मुश्किल झाले आहे. रोज संध्याकाळी आपला जो कचरा टाकला जातो, त्याला आग लागून धुरापासून लोकांना खुप त्रास होत आहे. आज शहरात खुप आजार वाढले आहेत, कॅन्सर सारखे रोग वाढले आहेत. जर हा धूर असाच चालू राहीला तर पाच नंबरध्ये जास्त अजार पसरू शकतात. तर ते आजार थांबवणे मुश्किल हाईल. आज पाच नंबरमध्ये धुराचे प्रमाण खुप वाढले आहे. तरी कृपया करून या धुराकडे आणि वालधूनी नदीकडे गांर्भियाने लक्ष देण्यात यावे. हा जो धूर निघत आहे. त्याला लवकरात लवकर बंद करण्यात यावे. नाहीतर आजाराचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे, धन्यवाद.

<u>सदस्या, श्रीम. रेखा ठाकूर:—</u> मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, प्रथम अंजली मॅडमला मी धन्यवाद देते की त्यांनी वालधूनी नदीसाठी लक्षवेधी आणली आहे आणि मी बोडारे साहेबांना पण धन्यवाद देते. ते माझ्या प्रभागाचे नगरसेवक आहेत. मी एक माहिती देते की, माझ्या वार्डामध्ये प्रत्येक मंगळवारी आणि प्रत्येक शुक्रवारी रात्री आम्हांला झोप लागत नाही. कारण की खन्ना कंपाऊड जवळील केमिकलचा नाला लिकेज होत आहे. त्याच्यामुळे आमच्या प्रभागात खुप मोठी समस्या आहे. माझ्या प्रभागामध्ये भरपूर लोकांना क्षयरोग व अस्थमा सारखे आजार निर्माण झाले आहेत. ही खुप मोठी समस्या आहे. मी विनंती करते की, या वालधूनी नदीच्या समस्येवर लवकरात लवकर गार्भियाने लक्ष देवून ठोस उपाययोजना करण्यात यावी, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:—</u> मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब सर्वात प्रथम मी मिना दीदींचे अभिनंदन करतो की, त्यांनी पर्यावरणाचा जो पुरस्कार मिळवला आहे. आमच्या प्रभागामध्ये गेल्या १० वर्षापासून त्यांचा पर्यावरणच्या संदर्भात चांगले काम चालू आहे. हे सर्व करत असतांना आज ही लक्षवेधी सुचना संपुर्ण शहरामध्ये वालधूनी नदी म्हणता येणार नाही पण नाला निश्चित म्हणता येईल. कारण की, मला जेव्हापासून माहीत आहे. तेव्हापासून आम्हांला हा नालाच दिसला आहे. नदी कधीच दिसली नाही. या नाल्यामध्ये प्रदुषणाच्या संदर्भात या उल्हासनगर पालिकेच्या हद्दीमध्ये जेथून वालधूनी नदी प्रवेश करते आणि वालधूनी नदीचा कल्याणकडे जाणारा भाग या मधल्या परिसरामध्ये येणारा पाणी हे अंबरनाथ मधून येते. तेही खर तर प्रदुषित असते, तही रसायनेयुक्त झालेले असते. अशा या वेळेस उल्हासनगर मधून जे सांडपाणी सोडले जाते. त्याचे प्रमुख कारण म्हणजे या वालधुनी नदीला लागून असलेली अनधिकृत बांधकामे हा एक पहीला मुद्दा आहे. या बांधकामामुळे जो प्रदुषित असेलेले सांडपाणी या नदीच्या नाल्यामध्ये सोडले जाते. तो एक पहीला भाग येतो. दुसरा उल्हासनगरमध्ये जेवढया जीन्स कंपन्या आहेत. त्यांचे संपुर्ण रसायनयुक्त सांडपाणी हे त्या नाल्यामध्ये सोडले जाते. याची कुठलीही विल्हेवाट करण्याची योजना किंवा त्या कंपन्याना कुठल्याही प्रकारचे प्रयोजन करून दिले नाही. त्यांच्याकडून दंड आकारला जात नाही, हा दुसरा भाग आहे. तिसरा भाग जो आहे, इथे असलेल्या उल्हासनगर शहरातल्या लुमचा, लूमचे जे पाणी आहे, रसायनयुक्त ते या नदीमध्ये सोडले जाते. आपण उल्हासनगर शहरातल्या स्टेशनच्या विभागामध्ये जर बघितले तर संपुर्ण कल्पना तुम्हांला येईल. तुम्ही जर अंबरनाथ साईटला गेलेत तर अनधिकृत बांधकामाचा जो प्रश्न आहे, अनधिकृत बांधकामामुळे जे सांडपाणी त्याच्यामध्ये चालले जाते ते तुम्हांला दिसून येऊ शकतो. त्याच्यावर तुम्ही उपाययोजना करू शकता. अशा वेगवेगळया पध्दतीचे जे टॅकर आपल्या शहरामध्ये आहेत. रसायनयुक्त असलेले टॅकर किंवा रसायने नेणारे टॅकर असतात. मुंबइमधून उल्हासनगरमध्ये येणारे जे टॅकर आहेत. टॅकरमध्ये असलेले रसायनांची विल्हेवाट ते या नदीमध्ये करतात. आपण मागच्या एक दोन वर्षा पुर्वी तो परिणाम आपण बघितलेला आहे.हजारो लोक या रसायनाने बाधित झाले होते. हा एक परिणाम त्यावेळेस बघितला त्याच्यावर कुठलीही कारवाई झाली नाही. आज पण टॅकरद्वारे रसायने या नदीमध्ये सोडले जातात. रसायने सोडल्यामुळे फक्त नदीच्या कडेला राहणा—याना त्रास होत नाही तर अजूबाजूच्या परिसरात राहणा—या सर्व लोकांना त्याचा परिणाम दिसून येत आहे. बोडारे साहेबांनी सांगितले आहे की, टी.बी.चे रूग्ण वाढले आहेत, अस्थमाचे रूग्ण वाढले आहेत. आता हा रोग सर्व शहरात पसरण्यापुर्वी आपल्याला एक पध्दत राबवायला लागेल. जेणेकरून हे पाणी आपल्याला स्वच्छ करता येईल, ही लक्षवेधी आणल्या बद्दल धन्यवाद.

या वेळी सदस्य श्री. दिपक सिरवानी व श्री. शंकर लुंड यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—</u> मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, आता सगळया नगरसेवकांनी या विषयावर अतिशय चांगली चर्चा केली आहे आणि सगळयांनी सकारात्मक मत या बाबत दिले आहे. मी आपल्याना सांगू इच्छिते खर म्हणजे स्वच्छ पाणी आणि स्वच्छ हवा या दोन गोष्टी माणसाला जर मिळत

नसल्यास तर त्याचे आरोग्य किती धोक्यात येणार आहे. आम्हांला स्वत:लाच लाजिरवाणे वाटत आहे की, उल्हासनगर महानगरपालिका आपण लोकांना सुविधा देण्यासाठी अयशस्वी ठरलो आहे, ज्या बेसिक गरजा आहेत. म्हणून आपण या सर्व प्रकरणात ठोस कारवाई काय करणार आहेत हे मला आताच सांगावे आणि दुसरे म्हणजे केअर फाऊंडेशन आणि हिराली फाऊंडेशन यांनी या विषयावर खुप अभ्यास केलेला आहे. त्यांच्याशी चर्चा करून आपण पुढचे निर्णय घ्यावेत अशी माझी आपल्याला विनंती आहे.

<u>सदस्या, श्रीम. मिना सोंडे:—</u> मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब, सर्व प्रथम अंजली साळवे मॅडमला धन्यवाद देते. हिराली फाऊंडेशनचे स्वाक्षरी मोहिम चालू आहे. कारण या शहरामध्ये प्रदुषणवर लोकांचे लक्ष खुप कमी होत आहे. मागच्या दोन महिन्यापुर्वी अमृत पाल म्हणून एक व्यक्ती मला भेटले, त्यांनी आम्हांला बरोबर दाखवले की, केमिकल्स काजल पेट्रोल पंपाच्या मागे मोकळया जागेमध्ये बाहेरचे जे टॅंकर आहेत ते केमिकल्स घेऊन तिकडे जमा करतात आणि ते थेट वालधूनी नदीमध्ये जाते. असे भरपूर लोक आहेत की ज्यांना माहिती आहे. ती आपण घेऊन काही तरी करायला पाहीजे, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. विजय पाटील:—</u> मा. महापौर, आयुक्त साहेब, माझ्या मित्रांनी जिन्स कारखान्याचा जो विषय काढला तिथे जिन्स डाईंग नाही फक्त धुलाई होते. हे मी त्यांच्या लक्षात आणून देतो. जिन्स कारखान्यामध्ये फक्त धुलाईचे काम होते, तिथे कुठलाही केमिकल्स वापरत नाहीत. फक्त तिथे धुलाई होते, केमिकलयुक्त काहीही तिथे चालत नाही. हे मी आपल्या निदर्शनास आणून देतो.

<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u> मा. महापौर मॅडम मी धन्यवाद देतो की, आपण ही लक्षवेधी घेतली आहे आणि त्याच बरोबर मी साळवे मॅडमला धन्यवाद देतो. हा जो मुद्दा आहे, आम्ही दोन वर्षापासून बघत अहोत. या परिसरातील नगरसेवक ते भोगत आहेत. प्रत्येक बुधवारी रात्री आणि प्रत्येक शनिवारी रात्री बोडारे साहेब शुक्रवार रात्री नाही हे फक्त बुधवार रात्री आणि शनिवारी रात्री होते. मला वाटते की, यासाठी एक कमिटी बनवली पाहीजे त्यामध्ये व्हिजीलन्स पाहीजेत. आयुक्त साहेब स्वत: लिड करतील, दोन नगरसेवक, पोलिस, सामाजिक संघटना, लक्ष ठेवतील. माझी स्वत:ची तीस, पसतीस लोकांची टीम आहे, ती लक्ष ठेवत आहे. कधी कुठे तर कधी कुठे टॅंकर सोडला सोडला जात होता. प्रथम अंबरनाथमध्ये होते, हिराघाट पासून ते पिंटू पार्क रोड पर्यंत हे सगळ मधल्या भागातच होते. आयुक्त साहेब मला वाटते की, या टीमचे आपण नेतृत्व करावे. हा मुद्दा खुप गंभिर आहे. कधी पण हानी होऊ शकते. मागच्या वेळेस आम्ही ३५० रूग्ण बघितले आहेत. त्यांना श्वास घेण्यासाठी त्रास होत होता. त्यासाठी सगळयांनी मिळून ही समस्या सोडविण्यात यावी.

या वेळी उप महापौर, श्री. जीवन इदनानी सभागृहातून बाहेर गेले.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, सर्वात प्रथम आमच्या सभागृहाच्या सदस्या सन्मााननिय अंजली मॅडमने हा जो विषय लक्षवेधीच्या माध्यमातून आणलेला आहे, तो अतिशय गंभिर विषय आहे. त्यांना मि धन्यवाद देतो आणि मिना सोंडे यांना पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी आणि पर्यावरणाची देखभाल करण्यासाठी जे पारितोषिक मिळालेले आहे, त्यासाठी त्यांचे सुध्दा सभागृहाच्या वतीने अभिनंदन करतो. या विषयावर सभागृहातील सर्व सदस्य आणि मा. आयुक्त साहेब ही जी वालधूनी नदी आहे तिचे रूपांतर आता नाल्यामध्ये झाले आहे. मी संपुर्ण सभागृहाच्या वतीने निवेदन देतो की, या नदीला स्वच्छ करण्यासाठी आणि शहराच्या पर्यावरणाच्या संरक्षणासाठी, शहरात जेवढे दवाखाने आहेत, तेथे डॉक्टरांकडून ऑपरेशन केल्यानंतर किंवा इतर वेळेस जो कचरा उत्पन्न होतो, तो सुध्दा वालधूनी नदीमध्ये टाकला जातो. त्याची दुसरीकडे कुठेही विल्हेवाट लावली जात नाही. किती तरी वर्षापासून हया नदीवर लक्ष दिले गेले नाही. महासभेमध्ये पर्यावरणाचा अहवाल आला आहे. मी या सभागृहाला विनंती करतो की सभागृहातील सर्व सदस्य यांनी पर्यावरणाच्या संरक्षणासाठी महासभेमध्ये एक ठराव मंजूर करून पर्यावरणाच्या अहवाला सोबत जोडण्यात यावा. आमच्या जवळ प्रदुषण नियंत्रण कक्ष नाही. मला वाटते की या महानगरपालिकेमध्ये एक स्वतंत्र उप आयुक्त प्रदुषण नियंत्रण करणेसाठी किंवा ध्वनिप्रदुषण समस्या असेल, कारण की आज सन २०१५ — २०१६ चा पर्यावरणाचा अहवाल महासभेमध्ये पास करण्यासाठी आला आहे आणि २०१६—२०१७ चा पर्यावरणाचा अहवाल जुलै पर्यत यायला पाहीजे. आपल्या जवळ अशी व्यवस्था नाही की, प्रदुषण नियंत्रण मंडळाची स्थापना झाली पाहीजे आणि त्यासाठी एक स्वतंत्र उप आयुक्त असले पाहीजे आणि केअर फाऊंडेशन आणि हिराली फाऊंडेशन या संस्था जे कार्य करत आहेत. तसेच अशा ज्या संस्था आहेत त्या पर्यावरणावर कार्य करत आहेत. त्यांनाही बरोबर घेऊन आणि जर आमच्या जवळ उप आयुक्त असेल, पर्यावरण कक्ष असेल तर अपण संपुर्ण शहराच्या पर्यावरणावर नियंत्रण ठेवू शकतो. आपण एक प्रस्ताव बनवायला पाहीजे की, अंबरनाथ

येथून आपल्या शहरातून ही जी वालधूनी नदी जात आहे. त्या नदीला कशा प्रकारे स्वच्छ करता येईल. त्यासाठी आपण उप आयुक्तांकडून शासनाकडे एक प्रस्ताव पाठवला पाहीजे आणि हे खुप मोठे काम असून उल्हासनगर महानगरपालिका एकटी करण्यासाठी असमर्थ राहील. आपले उप आयुक्त असतील ते एक प्रस्ताव तयार करतील आणि शासनाकडून फंड मागवून या नदी पुर्ण स्वच्छ करण्यासाठी प्रयत्न करू. माझा सभागृहाच्या सदस्यांच्या वतीने या पर्यावरणा विषयी जी सुचना आलेली आहे. त्याचे उत्तर या महासभेत देण्यात यावे आणि पर्यावरणाच्या संदर्भात महासभा एक ठराव करून पर्यावरण कक्ष तयार करावे आणि एक उप आयुक्त पर्यावरण कक्षासाठी देण्यात यावा, धन्यवाद.

<u>सदस्या, श्रीम. सुनिता बगाडे:—</u> मा. महापौर, मा. आयुक्त साहेब सर्वात प्रथम मी अंजली तोईचे अभिनंदन करते की. त्यांनी हा विषय घेतला आहे. उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीत असणा—या वालधूनी नदीमध्ये सोडण्यात येणा—या विषारी रसायने पासून शहरातील नागरीकांचे आरोग्य आणि शहराला प्रदुषणापासून वाचविण्यासाठी हा विषय घेतला आहे. आम्ही पहील्यांदा ऐकत आहे की ही वालधूनी नदी आहे, आता पर्यंत वालधूनी नाला हेच शब्द ऐकण्यात आले होते. म्हणून कृपया पाऊस सुरू होण्याच्या आधी या नदीचे प्रश्न सोडविणत यावेत, हीच विनंती धन्यवाद.

<u>आयुक्त, डॉ. सुधाकर शिंदे:—</u> सन्माननिय सदस्यांनी अत्यंत महत्वाच्या विषयावर चर्चा घडवून आणलेली आहे. मा. महापोरांनी त्याला मान्यता दिल्यामुळे मी मा. महापौरांचे आणि सन्माननिय सदस्यांचे अभिनंदन करतो. वालधूनी नदीची एकुण लांबी ९ किलो मिटर आहे, उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात ५ किलो मिटर आहे, अंबरनाथ नगरपरिषद क्षेत्रामध्ये ३ किलो मिटर आहे, कल्याण डोबिंवली महानगरपालिकेच्या परिक्षेत्रात १ किलो मिटर आहे, नदीची एकुण ९ किला मिटरची लांबी आहे. या नदीच्या प्रदुषण होण्यासाठी महत्वाचे जे स्तोत्र आहेत, ज्याच्यमुळे नदचे प्रदुषण होत आहे. याच्यामध्ये वर पासून म्हणजेच अंबरनाथ असेल, काही एम. आय.डी.सी. मधून येणारे काही केमिकल असेल, नंतर खाली बदलापूर नगरपरिषद किंवा कल्याण डोबिंवली महानगरपालिका असेल या प्रत्येक महानगरपालिका क्षेत्रामधून या नदीमध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या प्रदुषण होत आहे. हे फक्त केमिकलचे प्रदुषण नाही, फक्त पाण्याचे प्रदुषण नाही तर ब—याच मोठया प्रमाणात नदीमध्ये सिल्टींग झालेला आहे. अनधिकृत बांधकामे असतील किंवा कुठला राळा रोळा असेल तो राळा रोळा आणून टाकून नदीच्या पात्रामध्ये मोठया प्रमाणात कचरा, किंवा डेब्रिज जमा झालेला आहे. जेणेकरून पात्राची रूंदी कमी झाली आहे. त्या बरोबरच ब—याच केमिकल प्रोडेक्शन होऊन तेथे खुप काही केमिकल बाय प्रोडेक्शन तयार होतात. त्याचा पर्यावरणा वरती विपरीत परिणाम होत आहे. या संदर्भात कारवाई करण्यासाठी फक्त आपल्या महानगरपालिकेच्या परिक्षेत्रात, उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रात कारवाई करून हा प्रश्न सुटणार नाही त्यासाठी त्याच्या उगमापासून तर स्तोत्र पर्यत, त्यांच्या सोर्शपासून ते एंड पर्यंत वेगवेगळया स्तरावर उपाययोजना होणे आवश्यक आहेत. त्या दृष्टीने मा. जिल्हाधिकारी यांच्याकडून शासनाकडे खुप मोठा प्रस्ताव गेलेला आहे. शासनाने त्यासाठी जसे मुंबईमध्ये जसे मिठी रिव्हर डेव्हलेपमेंट प्राधिकरण आहे, पंढरपूरमध्ये चंद्रभागा रिव्हर डेव्हलेपमेंट प्राधिकरण आहे. तसेच वालधूनी रिव्हर प्राधिकरण करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव प्रलंबित आहे. मागच्या झालेल्या सेशनमध्ये शासनाने उत्तर दिले आहे की, साधारणत: ३५० ते ३६० कोटी निधी या मोठया प्रकल्पाला लागणार आहे, आणि केंद्रशासनाकडून रिव्हर डेव्हलपमेंट फंडच्या खात्यामधून काही फंड घेऊन हा प्रस्ताव प्राधिकरण कशा प्रकारे कार्यान्वित करण्यात येईल यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा चालू आहे, आणि महानगरपालिकतर्फे शासनाकडे याचा पाठपुरावा करत अहोत. अजूनही प्रकाशाने मी स्वत:असेल मा. महापौर, उप महापौर यांच्या माध्यमातून शासनाकडे याचा पाठपुरावा करण्यात येईल. आता हा प्रश्न आपल्या खालच्या स्तरावर प्रदुषण होत आणि वरच्या स्तरावर छोटीशी माहिती सांगितली. उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये जे प्रदुषण होत आहे. याचे मुख्य कारण आहे, एकतर सिल्ट असेल, डेब्रिज असेल, अनाधिकृत बांधकामा मधून ज्या गोष्टी आणून टाकल्या जातात. ते एक कारण आहे जेणेकरून त्या नदीचा जो पात्र आहे तो अरूंद होत चालला आहे. दुसरी महत्वाची गोष्ट आहे की, वेगवेगळया स्तोत्रामधून होणारे केमिकल मधून होणारे प्रदुषण काही ठिकाणी डाईंगचे कारखाने असतील, काही ठिकाणी केमिकलचे असतील, काही ठिकाणी कपडा जो धुतला जातो त्या कपडयामध्येच स्वत:मध्येच काही केमिकल असते आणि ते धुतल्या नंतर अजून प्रदुषण होते आणि आणखी काही स्तोत्र असतील. हे जे प्रदुषण होते, त्याच्यावर कारवाई करणे आणि नियंत्रण ठेवणे हा संपुर्ण विषय महाराष्ट्र प्रदुषण कन्ट्रोल बोर्ड, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण केंद्र जे आहे हे ते राज्य शासनाच्या अखत्यारीतील केंद्र आहे. हा त्यांचा अधिकार क्षेत्र आहे. त्याच्या मध्ये महानगरपालिके कडून त्यांच्या अधिकार क्षेत्राचा एक्जर साईज त्यांचा अधिकार आहे. त्यांना राविण्यासाठी काही मदत झाली तर महानगरपालिका संपुर्ण मदत करील. महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील महत्वाचा विषय आहे. जो काही सदस्यांनी आताच सांगितले आहे की, बरीच मेलेली जनावरे तेथे आणून टाकली जातात. महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील मेलेल्या जनावरांची विल्हेवाट लावणे ही महानगरपालिकेची

जबाबदारी आहे. अशा प्रकारचा प्रकार होत आहे ते माझ्या निदर्शनास आले आहे. त्याची लवकरात लवकर आपण विल्हेवाट कशी लावू शकतो त्यासाठी अभयास गट करू. त्याच्यातून विल्हेवाट लावण्यासाठी आपण उपाययोजना करू. या बरोबरच कालच नॅशनल इनव्हायरमेंट इंजिनियरींग रिसर्च इन्सीटयुट नागपुरला जे आहे. ती देशातील पर्यावरणाविषयी अभ्यास करणारी आहे. त्यांना आपल्याकडे जे पाणी येते, त्या पाण्यावरच प्रक्रिया करून जेणेकरून प्रदुषण कसे कमी करण्यात येईल. त्यांच्याकडून परवानगी घेण्यासाठी पत्र पाठविले आहे. लवकरच त्यांच्याकडून सकारात्मक उत्तर प्राप्त होईल. नंतर पुढची कारवाई सुरू करू. या बरोबर उल्हासनगर शहराचे जे सिव्हरेज आहे, आपल्याकडे रोबर्ट सिव्हरेज सिस्टीम नाही. आपल्याकडे सिव्हरेज सिस्टीम नसल्यामुळे ब—याच अंशी आपले सिव्हरेज नाल्यामध्ये आणि तेथून नदीमध्ये, काही थेट वालधूनी नदीमध्ये टाकण्यात येते. त्यासाठी २२३ कोटी रूपयाचा पुर्ण शहरासाठी डीपीआर बनवून शासनाकडे पाठविण्यात आला आहे. जेणेकरून शहरातील सर्व सिव्हरेज फिटनेस कुठेतरी होईल आणि मग ते फिट झालेले नदीमध्ये सोडण्यायोग्य असेल तरच नदीमध्ये सोडले जाईल. त्यासाठी शासनाकडून आपल्याला आता ७५ कोटीच्या आसपास रक्कम मंजुर झालेली आहे. त्या अनुषंगाने आता पहील्या टप्प्यात कारवाई चालू होईल. वडोल शाळेच्या विद्यार्थ्यावरती या प्रदुषणाचा काय परिणाम होते. त्याचा अभ्यास करू आणि काही कारवाई करण्याची गरज असल्यास त्या अनुषंगाने आपण कारवाई करू. त्या बरोबरच परवाच आम्ही आपल्या महानगरपालिकेच्या स्तरावर एक उप आयुक्तांकडे प्रदुषण नियंत्रण कक्ष स्थापन करायचे ठरवले आहे. त्या अनुषंगाने कारवाई होईल. प्रदुषण नियंत्रण कक्ष असणे हे आता शासन स्तरावर निर्णय झालेले आहे, सगळयाना प्रदुषण नियंत्रण कक्ष स्थापन करायचा आहे, त्याबरोबरच शुक्रवारी आणि मंगळवारी जे केमिकल्स टाकले जातात, सन्माननिय सदस्यांनी आताच सांगितले आहे की, तिकडे खुप दुर्गंधी त्या दरम्यान येते. त्या अनुषंगाने आपण पोलिस कंन्ट्रोल रूमशी संपर्क साधून मी स्वत: पोलिस अधिका—यांशी बोलून संबंधित दिवशी कठोरात कठोर कारवाई कशी करता येईल. त्यासाठी मी त्यांना सुचित करतो. आपण पण सर्व सदस्यांनी असा प्रकार जर कुठे घडला तर कृपया तो प्रशासनाच्या निदर्शनास आणा, पोलिस प्रशासनाच्या निदर्शनास आणा, जेणेकरून त्यांच्यावर लवकरात लवकर तात्काळ कारवाई होईल. सध्या आपल्याकडे ज्या कंपन्या आहेत ज्या कंपन्या आज चालू झाल्या नाहीत वर्ष ना वर्ष तशाच राहील्यात. त्यांची इच्छा, त्याची तयारी आहे, प्रशासनाला आणि महानगरपालिकेला सहकार्य करण्याची प्रदुषण कमी करण्यासाठी, त्यांच्याशी आम्ही मिटींग घेऊ. त्या केमिकल डाईजला कशा प्रकारे प्रक्रिया करून प्रदुषण कमी करण्यात येईल. त्यासाठी त्यांच्याशी आपण चर्चा करून काही तरी मार्ग याच्यातून लवकरात लवकर काढू. सन्माननिय सदस्यांनी हया विषयाला अनुसरूना नाही पण डंपिंग ग्राऊंड विषयी जी चिंता व्यक्त केली आहे त्याच्यासाठी महानगरपालिका त्याच्या विषयी गंभीर आहे. प्रशासनाने, मी स्वत:च डंपिग ग्राऊंडला भेट दिली आहे. त्या अनुषंगाने राष्ट्रीय स्तरावरचे तज्ञ लोकांशी आम्ही चर्चा करत आहे. आणि सर्व सन्माननिय सदस्यांनी आम्ही तीन दिवसापुर्वीच सर्व गटनेत्यांची एक अर्जंट मिटींग बोलावली होती. त्या मिटींगमध्ये खुप चांगल्या प्रकारे रिसपॉन्स मिळालेला आहे. सर्व सदस्यांनी त्याच्या प्रभागामध्ये हा विषय नागरीकां पर्यत हा विषय पोहचवला आहे. त्यासाठी आपण विशेषत: सर्व मिडीयाचे अभिनंदन केले पाहीजे त्यांनी हा विषय सर्व नागरीकां पर्यंत या माध्यमातून पोहचविण्याचा प्रयत्न केला आहे आणि बराच फरक पडला आहे. आपण केलेल्या छोटया प्रयत्नांमुळे ज्या चिंधीमुळे जास्तीत जास्त डंपिंग ग्राऊंडला आग लागत होती, त्यामध्ये एक लक्षणीय कमी झाली आहे आणि चार पाच दिवसाच्या आत काही तर काही अंशी तिथला धूर आणि आग कमी झाली आहे. पुर्ण आत्मविश्वास आहे जर आपण अशाच उपाययोजना करत राहीलो तर शहरातील ओला कचरा व शुका कचरा वेगळा करून त्याची आपण वेगळी विल्हेवाट लावू शकतो. तर लवकरात लवकर आपल्या डंपिंग ग्राऊंडचा प्रश्न सुटेल. मी पुन्हा एकदा सांगतो की वालधूनी नदी हा गंभीर विषय आहे. उल्हासनगर महानगरपालिका बरोबर इतर अनेक सरकारी विभाग आहेत. शासन स्तरावर पाठपुरावा करता येईल. त्याच बरोबर आपल्या महानगरपालिका स्तरावर ज्या ज्या उपाययोजना आहेत. त्या सर्व प्रकारच्या उपाययोजना प्रशासन करेल. त्यासाठी सर्व सदस्यांच्या ज्या काही सुचना असतील, काही मार्गदर्शन असेल त्या घेतल्या जातील. त्या बरोबरच इतर काही सेवाभावी संस्था या क्षेत्रामध्ये काम करीत आहेत, केअर फाऊंडेशन असेल किंवा हिराली फाऊंडेशन असेल त्यांच्याशी चर्चा करून त्यांचा काही सल्ला असेल त्यांच्याकडेन काही मार्गदर्शन असेल ते घेऊन प्रशासन त्या दृष्टीने स्वयंपुर्ण करण्याचा प्रयत्न करेल, धन्यवाद.

या वेळी सदस्य, श्री. रविंद्र बागुल हे सभागृहातून बाहेर गेले.

या वेळी उप महापौर, श्री. जीवन इदनानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—</u> आयुक्त साहेबानी जे सांगितले आहे, त्याबद्दल मी प्रथम महापौर, आयुक्त साहेबांना धन्यवाद देतो. आपल्यांना चिंता लागली होती, आपण गंभीर झाले आणि तिथ पर्यंत आले

हे पण आपण सांगितले आहे की, त्याच्यात काही सुधारणा झाली आहे. परंतु त्यामध्ये काहीच सुधारणा झाली नाही. काल रात्री सुध्दा धूर चालू होता. आपण चौकशी करू शकता, विचारू शकता, आमची पाच नंबरवाल्याची आपल्याला हात जोडून विनंती आहे की, हे डंपिंग ग्राऊंड नियमानुसार नाही तो अनधिकृतरित्या डंपिंग ग्राऊंड चालू केले आहे, तो बंद करा. नाही तर तेथील लोकांचे जीव निघून जाईल, मुलांचे जीव जाईल कृपया या विषयावर लक्ष दया.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—</u> मा. आयुक्त साहेब आपण आपल्या स्तरावर डिसिल्टींगसाठी, सी.सी.टी.व्ही. कॅमेरा बसवून हे तर करू शकतात.

<u>आयुक्त, डॉ. सुधाकर शिंदे:—</u> आपल्या स्तरावर डिसिल्टींगसाठी, जो राज्य शासनाकडे प्रस्ताव प्रलंबित आहे. त्याचे मी सारांश मागितलेला आहे. याचा एक मोठा भाग म्हणजे नदी पात्राची रूंदीकरण करणे, री ग्रेडींग करणे हा खुप मेजर भाग आहे. याच्यासाठी साधारणत: सन्माननिय सदस्यांना सांगू इच्छितो की, काही दहा कोटीमध्ये खर्च आहे. मला असे वाटते की, शासन स्तरावरून अशी रक्कम प्राप्त झाल्यावर आपल्याला तो खर्च करणे आपल्यासाठी जास्त समर्पक राहील. परंतु असे कुठे तातडीच्या स्वरूपात काही ब्लॉकेज झाले असेल किंवा जे काही काम महापालिकेच्या स्तरावरती आर्थिक बोजा आपल्याला सहन होईल, ते काही काम असेल ते महापालिका आपल्या स्वत:च्या खर्चातून ते करेल.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—</u> बाकीचे जे मोठे नाले आहेत, त्यांच्यावर आपल्या स्तरावर आपण काही करू शकतो का?

<u>आयुक्त, डॉ. सुधाकर शिंदे:—</u> मी आताच सांगितले आहे की, आपल्या संपुर्ण महानगरपालिका क्षेत्रातील डी. सेल्टींगचे काम साधारणत: तीन ते चार कोटी रूपये आहे. आपल्या पुर्णपणे मोठया नदीचे डिसिल्टींगचे काम करायचे असेल तर मला वाटते की, चाळीस, पन्नास कोटींचा ,खर्च लागेल. तो खर्च करण्यासाठी आपल्याला शासनाकडून फंडची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने आपण कारवाई करू. अजून एकदा सांगतो की, जर कुठे काही तातडीच्या स्वरूपात उपाययोजना करायची असेल, तर महानगरपालिका स्वत: त्याच्यावर उपाययोजना करेल आणि सी.सी.टी.व्ही. कॅमेरेच्या संदर्भात संपुर्ण शहरात वाहतुकीच्या दृष्टीने गृह विभागाच्या मदतीने नगरविकास विभाग सर्व महानगरपालिका क्षेत्रामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेर लावणेसाठी नविन प्रोजेक्ट तयार करत आहे. त्यासाठी कन्सल्टनची नियुक्ती झाली. मला वाटते त्या प्रोजेक्टमध्ये सर्व महानगरपालिका आणि आपल्यानाही सहभागी करून घेण्यात येईल, जेणेकरून केंद्रीय आणि राज्य निधीतून आपल्याला हे काम करता येईल.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> या बाबत मी काही सुचना करतो, तुम्ही माहीती दिल्या प्रमाणे ९ किलो मिटरची लांबी असलेली वालधूनी नदी ५ किलो मिटर उल्हासनगर मध्ये, ३ किलो मिटर अंबरनाथ मध्ये आणि १ किलो मिटर कल्याण डोबिंवली मध्ये आपण जर पाहीले तर जास्तीत जास्त परिणाम उल्हासनगरच्या रहिवाशाना होतो. जी अंबरनाथ क्षेत्रामध्ये आहे ती एम.आय.डी.सी. मध्ये इंडस्ट्रीज एरियामध्ये आहे. आणि कल्याण इंडस्ट्रीज आहेत ते सुरूवातीलाच एकदम कोप—याला आहे. कल्याण येथील फार कमी रहीवाशांना त्रास होत आहे. ५ किलो मिटरचा जो परिसर आहे तो संपुर्ण उल्हासनगरचा संपुर्ण रहिवाशांचा आहे. त्यामुळे उल्हासनगरच्याच नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे बाकी जरी वालधुनी नदी प्राधिकरण स्थापन झाले आहे, अंबरनाथ किंवा कल्याण यापेक्षा उल्हासनगर वरतीच त्याचा जास्त प्रभाव होणार होता. एवढे लक्ष दिले गेले नाही. म्हणून पुढच्या महासभेमध्ये शासनाला प्रशासनाने एक प्रस्ताव पाठविण्यासाठी त्याचे गांर्भिय, त्याचा दुष्परिणाम शहरावर, निर्वासिताचे हे शहर, आणि या निर्वासितांच्या शहरामध्ये असे निर्वासितांचे आरोग्या पण आपण राखू शकत नाहीत. अशा प्रकारचा गार्भियाचा प्रस्ताव सभेमध्ये पाठविण्यात यावा. जेणेकरून उल्हासनग इतर शहरामध्ये नाही पण शहरामध्ये पण आम्ही गांर्भियाने एखादी गोष्ट मांडली ती कशी मांडतो ते सुध्दा महत्वाचे आहे. मांडणार जर चुकीचा असेल तर कळणार कसे त्याचे उत्तर आम्हांला मिळणार नाही. मग प्रश्न कसे टाकायचे जेनेकरून त्याचे दुषपरिणाम आमच्या शहरावर होत आहेत. त्याची काळजी शासनाने सुध्दा घेणे गरजेचे आहे. शासनाची सुध्दा ती जबाबदारी आहे आणि शासनाने सुध्दा ती लवकरात लवकर घ्यावी. अशा प्रकारचा प्रस्ताव या महासभेमध्ये पारीत करून शासनाकडे पाठवू. महापालिकेचे दुसरे काम आहे जे डीसेबल तुम्ही सांगितले आहे, जे होते आम्ही काय करू शकतो नालासफाईचे काम ते तीन कोटीचे असेल किंवा पाच कोटीचे नेमका पावसाळा सुरू झाला की मंजूर होतो आणि याच्यामध्ये माती सुध्दा तिथल्या तिथे रहाते ठेकेदाराला सुध्दा काही बोलू शकत नाही. आता वेळ आहे, आता वेळीच जर तो प्रस्ताव आला आणि लवकरात लवकर तो प्रस्ताव आला आणि ती माती कमीत कमी निघेल. तेथे जर सी.सी.टी.व्ही.आणि

बाकीच्या ज्या समस्या सांगितलेल्या आहेत. रेखा ठाकूर यांनी,` टोनी सिरवानी यांनी सांगितले आहे. तिथे दर शुक्रवारी आणि शनिवारी म्हणजे दर मंगळवारी आणि बुधवारी जो टॅंकर पकडला तो कुठून पाताळातण आणला का टॅंकर इथे खाली करायला येतात. म्हणजे असे काही आहे की, ती सुपीक जमिन आहे, तेथे कोणीही यायचे आणि टाकायचे सुयोग्य प्रशासन टीम आहे पुर्वीचा अनुभव घेतलेला आहे. जेव्हा दुर्घटना झाली तेव्हा बरेच लोक प्रभावित झाले होते. तेव्हा प्रशासनाने सांगितले होते की ज्या ज्या ठिकाणी या घटना घडतात त्या ठिकाणी म्हणजेच खन्ना कंपाऊंडचा परिसर आहे तेथे सी.सी. टी.व्ही. बसवले जाईल आणि त्यामध्ये जे जे दिसतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल. हे जे माफिया आहेत जे टॅंकर खाली करतात त्यांच्यावर नियंत्रण आणि हा विकासित करण्याचा प्रस्ताव जो लोकांच्या आरोग्याशी निगडीत आहे. मग तो लवकरात लवकर तातडीने तो शासनाला पाठविण्यासाठी तयार करावा.

<u>आयुक्त, डॉ. सुधाकर शिंदे:—</u> शासनाला प्रस्ताव पाठविण्याचा पाठपुरावा करण्यासाठी सन्माननिय सदस्यांचे जे मार्गदर्शन आहे. डिसिल्टींगच्या संदर्भात यापुर्वी एकाच वेळी डिसिल्टींग तीन वर्षातून एकदा फक्त डिसिल्टींग होत होते. या वर्षापासून शासनाने वर्षातून तीन वेळा डिसिल्टींग करण्याचा निर्णय घेतलेला आहे. लवकरात लवकर त्याच्यावर कारवाई चालू होईल. जेणेकरून काम एकाच वेळी केल्याने पुर्ण होत नाही. ते काम पुर्ण वारंवार केल्याने ते पुढच्या वेळेस करणे सोपे जाईल आणि पाण्यावरती सोल्युशन चांगले निघेल. टॅंकर माफियांचा जो त्रास आहे त्याबाबतीत मी पोलिस प्रशासनाशी आजच बोलणी करेल. आणि आपण सांगतात की विशिष्ट दिवशी त्यांच्यावर जास्त लक्ष ठेवून त्यांच्यावरती काही कारवाई करता येईल का? मी पुन्हा एकदा सन्माननिय सदस्यांना विनंती करतो. सन्माननिय पत्रकार बंधूना मी विनंती करतो. अशा प्रकारचा काही प्रकार निदर्शनास आल्यास तर कृपया प्रशासनाच्या निदर्शनास आणून दया, पोलिस प्रशासनाच्या निदर्शनास आणून दया, मी स्वत: त्याच्यावर कारवाई करण्यासाठी जातीने लक्ष घालील, धन्यवाद.

<u>महापालिका सचिव:—</u> दुसरी लक्षवेधी सदस्य श्री. सतरामदास जेसवानी यांची आहे.

---

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक २.</u> वर्ष २०१७ महानगरपालिका चुनाव में सफल होकर महासभा में उपस्थित जन प्रतिनिधियों को जानकारी दिलाये, उल्हासनगर महानगरपालिका की और से दी जा रही जन सुविधाओ किस प्रकार दी जानी है, महासभा में इस लक्षवेधी द्वारा चर्चा हो व जानकारी दिलाये.

वर्ष २०१७ में हूये उल्हासनगर महानगरपालिका के चुनाव में सफल होकर महासभा में उपस्थित जन प्रतिनिधीयो को उल्हासनगर महानगरपालिका शहर में रह रही जनता को जल (पाणी) सफाई, अंडर—ग्राऊंड गटर लाईन, शहर—विकास के काम, नगर रचना विभाग, घर पट्टी विभाग, रस्तो, गलियो पर अवैद्य रूकावट दुर करना विभाग, यह सब सुविधाओ कौन संबंधित अधिकारी कैसे देता है। कौन सी जरूरी मिलनी चाहिये सुविधाओ उल्हासनगर महानगरपालिका शहर की जनता को नही दे पा रही है। इस महासभा में जानकारी व ग्यान इस लक्षवेधी द्वारा दिलाये सहयोग दिलाये, विनंती.

---

<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—</u> मा. महापौर, मी आपणाला धन्यवाद देतो की, आपण माझी लक्षवेधी घेतली आहे. मी जी लक्षवेधी दिलेली आहे. ती मी लाचार होऊन दिलेली आहे. या लक्षवेधीद्वारा नविन आयुक्त साहेब आहेत, त्याचे लक्ष जावे. शहरामध्ये महानगरपालिकाद्वारा जी सेवा दिली जात आहे, ती अर्धवट सेवा दिली जात आहे. माझी अशी विनंती आहे की, आताच महासभेमध्ये जी भरपूर चर्चा झाली आहे. प्रथम आरोग्य आणि सफाईच्या बाबतीत मी माझ्या वार्डमध्ये उपायुक्तांना भेट देतांना कधीच बघितले

नाही. किती वर्षापासून ओरडत होतो, आताचे उप आयुक्त आहेत ते माझ्या वार्डमध्ये, पॅनलमध्ये कधीच आले नाहीत. माझा जो पॅनल आहे तो १७ नंबरचा आहे, त्यामध्ये चार वार्ड आहेत. त्यामध्ये आता पर्यंत सफाईवाल्यांना काहीच माहीत नाही. कोणता वार्ड कुठपर्यंत आहे. अ कुठे आहे, ब वार्ड कुठे आहे, क वार्ड कुठे आहे व ड वार्ड कुठे आहे. हे कुणालाच माहीत नाही सफाई कर्मचा—यांचे हजरी शेडच नाही तर त्यांची हजरी कुठे भरली जाते.

या वेळी आयुक्त महोदय, हे सभागृहातून बाहेर गेले व श्रीम. विजया कंठे हया आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ झाल्या.

या वेळी सदस्या, श्रीम. कविता पंजाबी, श्रीम. इंदिरा उदासी हया सभागृहातून बाहेर गेल्या.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मा. सतरामदास जेसवानी आता अ,ब,क, ड सोडा प्रभाग १७ बोला.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** अ मध्ये सफाई ऑफिस कुठे कोणालाच माहीत नाही, ब मध्ये सफाई ऑफिस कुठे आहे कोणालाच माहीत नाही, क मध्ये सुध्दा कोणालाच माहीत नाही. फक्त ड मध्ये दसरा मैदान येथे आहे. जो सतरा नंबरचा पॅनल आहे, मी १७ नंबर पॅनलमध्ये बघितले की, मी चुकीचे बोलत असेल तर माफी मांगतो.

या वेळी आयुक्त, डॉ. सुधाकर शिंदे यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.

या वेळी सदस्या, श्रीम. पंचम कालानी व रेखा ठाकुर यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:—** सतरामदासजी मी त्या कच—याचे फोटो घेऊन आलो आहे, पाच वर्षापसून तेथे सफाई झालेलीच नाही.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** साहेब मी याच विषयावर बोलणार आहे. सर्व नगरसेवकांना बोलायचे आहे जर सगळया नगरसेवकांनी सहयोग दिले तरच या मध्ये सुधारणा होऊ शकते सफाई करण्यासाठी जे सफाई कामगार दिले आहेत ते किती तरी वर्षापासून सफाई कामगार कामावर येतच नाहीत. जे सफाई कामगार सेवानिवृत्त झाले आहेत, जे मृत पावले आहेत त्यांच्या जागेवर दुसरे कोणी सफाई कामगारच दिले नाहीत तर सफाई कोण करणार नगरसेवक करणार का? सफाई कामगार नाही तर सफाई कशी होणार. लोकांचे आरोग्य चांगले कसे राहील. दुसरा विषय आहे साहीत्य, जे साहीत्य खरेदी केले जाते. साफसफाई करण्यासाठी महानगरपालिकेकडून जे साहीत्य दिले जाते, त्यासाठी आम्हांला सारखे सारखे सांगावे लागते. माझ्या वार्डमध्ये कधी डी.टी. पावडर नाही, कधी फिनेल नाही, कधी हात गाडया तुटलेल्या आहेत. एक नगरसेवकाला या वस्तू मागण्यासाठी परत परत भिका—या सारखे मागायला लागते, हया ज्या वस्तू बाजारातून प्रत्यक वार्डसाठी विकत घेतल्या जातात. त्या वस्तू प्रत्येक वार्डसाठी का दिल्या जात नाहीत. त्याच्यासाठी जिथे वस्तू ठेवल्या जातात तिथे जागा नाही, सफाई कामगार कमी आहेत. सफाई कामगार कमी असल्यामुळे तेथे काम होतच नाही. त्याच्या नंतर कच—याच्या संदर्भात बोलायचे ठेकेदाराने प्रत्येक ठिकाणचा कचरा उचलायला पाहजे. घंटा गाडी प्रत्येक वार्डमध्ये जायला पाहीजे, प्रत्येक घरी जायला पाहीजे. मला खुप दु:ख होते की, माझ्या वार्डमध्ये फक्त पाच टक्के घंटा गाडी जात असते, पंच्यानव टक्के घंटा गाडी जातच नाही. आता जो पॅनल नंबर १७ मिळालेला आहे तेथे सुध्दा घंटा गाडी जात नाही. घंटा गाडीचे महत्वच काय आहे. घंटागडीची जबाबदारी काय आहे. घंटा गाडी जातच नाही तर कचरा कोण घेणार, महापालिका सांगते ओला कचरा, सुका कचरा वेगळा करून दयायला पाहीजे परंतु फ्लॅटमध्ये लोकांजवळ कचरा घ्यायला कोणी जातच नाहीत. लोक नगरसेवकाजवळ जातात, माझ्या वार्डमध्ये मी कचरा घेण्यासाठी घंटागाडी आलेली आहे असे कधीच बघितले नाही. तर मग उप आयुक्तांची जबाबदारी काय आहे. त्याचे पाणी, १७ नंबरचा जो पॅनल, अ प्रभाग आहे, तेथे कोणार्क कंपनीने ज्या लाईन टाकल्या गेल्या आहेत, त्या अर्धवट टाकल्या आहेत. जो माल बाकी आहे, त्यामुळे त्या भागामध्ये पाणी जातच नाही. तरी आम्हांला पाणी मिळावे ही विनंती. या ज्या गोष्टी आहेत त्याच्यावर अधिका—यानी लक्ष दयावे. कारण की, मला लाचार होऊन लक्षवेधी आणायला लागते. ज्या बोरवेल आहेत, त्या मागच्या

वर्षापासून बंदच आहेत, ज्या ठेकेदाराला ठेका देण्यात आला आहे ते म्हणतात की मी हे काम करू शकत नाही, दुसरा ठेकेदार म्हणतो की, मला ऑर्डर बरोबर दिलीच नाही. तर मग ज्या बोरवेल बंद आहेत त्यांना कोण बनवणार, आधीच पाण्याचा तुटवडा आहे, जर बंद पडलेल्या बोरवेल आहेत त्या बनवल्या नाहीत तर काम कसे चालणार. त्याच्या नंतर अंडर ग्राऊंड गटाराच्या ज्या लाईन आहेत, तेथे श्री. सुंदरम साहेब आहेत, जेई आहेत त्यांना विचारा की, आपण कधी इकडे फिरून पाहणी केली आहे का? किती तरी तक्रारी दिलेल्या आहेत. जो ठेकेदा ठेवला आहे, ते कधी घाण काढण्यासाठी आले आहेत का? अंडर ग्राऊंड गटाराच्या लाईन भरलेल्या असून त्या काढण्यासाठी परत परत बोलवायला लागते. त्याचे पाणी रस्त्यावर येते किंवा गल्लीमध्ये जाते. त्याच्या नंतर शहर विकासाच्या बाबतीत आहे. शहर विकासाठी मी सांगतो की, आमच्या इथे रोड तुटलेले आहेत, गटारे तुटलेल्या आहेत, तसेच मोठे नाले तुटलेले आहेत. सांगितले जाते की आमच्या जवळ नितिमत्तेचा अभाव आहे, जर आपण लोकांना सुविधा देऊ शकत नाहीत, तर मग आपण त्यांच्या दरवाजाला कुलुप लावण्यासाठी कसे जातो. आमच्या जवळ घर पट्टी राहीली आहे, ती मागण्यासाठी आपण कसे जातो. आम्हा लोकांनाच लाज वाटते की, जर आपण लोकांना सुविधाच देऊ शकत नाही तर आपण त्यांच्या दरवाजाला कुलुप कसे लावू शकतो. मी माफी मागतो, असे बोलायला नव्हते पाहीजे. इथे जे गार्डन आहे, त्या गार्डनमध्ये जुगार चालू असतो, आम्ही लोकांनी एक दोन वर्षापासून काही कामगार ठेवले आहेत. त्या वस्तु मागण्यासाठी मला परत परत बोलावे लागते, अधिकारी ऐकत असतात, परंतु त्याचा काहीच फायदा होत नाही. जर आयुक्त साहेबांच्या ही गोष्ट लक्षात येत असेल तर मी आशा बाळगतो की आज नाही तर उदया काम होईल. याच प्रकारे जो कर विभाग आहे, मिना ताईनी सांगितले आहे की, आपल्याला जर उत्पन्न वाढवायचे असेल, शहराचा विकास करायचा आहे. खरे तर त्यांना नविन बिल मिळायला पाहीजे, नविन बिल काढून दयायला पाहीजे. किती तरी नगरसेवकांनी सांगितले आहे. आमचे बोडारे साहेब, भुल्लर महाराज, जमनादास पुरस्वानी साहेब, यांनी सगळयानी सांगितले आहे. परंतु एवढे झाल्या नंतरही प्रशासन याच्यावर लक्ष देत नाही. हे कसे चालेल लोक आम्हांला परत परत धक्का मारून ओरडत आहेत, की जा आणि ओरडून सांगा. आम्ही आपल्या समोर येऊन ओरडत असतो आणि नंतर घरी जाऊन गप्प बसतो. त्या प्रमाणे आपण तसेच करत आहेत. मी एक नगरसेवक या नात्याने आणि मला मानसन्मानाची चिंता आहे या नात्याने जे मला आज महासभमध्ये बोलायचे नव्हते ते आज बोलायला लागत आहे. या गोष्टींवरती काय सुधारणा करणार आहेत आणि जो कर विभाग आहे, जर एखादया गरीबाला त्यांच्याकडे नाव बदली करण्यासाठी येतात. त्यांना जर नाव बदली करून देत नाही, तर घर पट्टी कसे भरणार आणि जर कोणी व्यक्ती मृत होतात तर त्यांना सांगितले जाते की, कोर्टाकडून ऑर्डर घेऊन या. कोर्टामध्ये जेव्हा साठ, सत्तर हजार रूपये खर्च होतील तेव्हाच त्यांचे नाव बदली मिळेल. ही जी लोकांची समस्या आहे, यामध्ये कशा प्रकारे सुधारणा करण्यात येईल. ती सुधारणा करण्यात यावी. आमच्या येथे जो रोड आहेत, ते खुप छोटे आहेत. आपण बघा मठ मंदिर किंवा गांधी रोड या रोडवर अतिक्रमण झालेले आहेत. आपण जेव्हा कार मध्ये जात असाल तेव्हा ती कार परत परत थांबवावी लागते. तर का थांबावे लागते, तो विभाग कुठे आहे, तो विभाग लक्ष का देत नाही. तरी कृपया या विभागाला जागृत केले जावे. त्याच्या नंतर नगरविभाग येतो, एका गरीबाने स्वत:च्या मालकीचे घर आहे. दोन खोल्यामध्ये घर बनवण्यासाठी एक वर्षे पहीले प्लॉन पास करण्यासाठी अर्ज केला आहे. आमच्याकडे त्याची मदत करण्यासाठी कोणीच नाही. मी स्वत: दोन वेळा पत्र दिलेले आहे, कृपया या गरीबाला मदत करा. तो आपल्या परिवारासाठी घर बनवत आहे. जर सगळे कागदपत्र जोडून दिलेले आहेत. जर आपण कामच करत नसेल तर आपल्याकडे उत्पन्न कसे येणार. जर उत्पन्न येणार नाही तर शहराची सुधारणा कशी होईल. माझी आपल्याला हात जोडून विनंती आहे की, सर्व लोक प्रतिनिधी यांनी आपण निवडून आलेलो आहे. लोकांनी आपल्यावर विश्वास ठेवले आहे आणि जे या वेळेस निवडून आलेले आहेत. परंतु कॉंग्रेसची एकच नगरसेविका आहे त्यांनी पहील्यास मिटींगमध्ये लक्षवेधी आणलेली आहे. असे बरेसचे नगरसेवक आहेत सर्व मोठया पार्टीचे नगरसेवक आहेत आणि जेवढया पण पार्टीचे नगरसेवक आहेत सगळे पहीलवान पहीलवान नगरसेवक निवडून आलेले आहेत. लोकांच्या अपेक्षा खुप आहेत, मा. महापौर, उप महापौर यांनी कृपया लक्ष दयावे, धन्यवाद.

या वेळी सदस्या, श्रीम. अर्चना गोकुळ करनकाळे व श्रीम. जयश्री पाटील हया सभागृहातून बाहेर गेल्या.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> मा. महापौर मॅडम, सतरामदास जेसवानीनी जी लक्षवेधी घेतली आहे. खरोखरच महापौर मॅडम मी प्रथम तुम्हांला धन्यवाद देतो की, आपण चांगली लक्षवेधी घेतली आहे. कारण लक्षवेधीची सुरूवातच कच—यावरून आणि घाणीवरून आहे. आजच्या प्राप्त परिस्थितीमध्ये जे त्यांनी निवेदन केले आहे. मला तर वाटते की अधिका—यांनी त्या गोष्टीकडे गार्भियाने लक्ष दयावे. अधिका—यांनी याकडे लक्ष दयावे. कच—याची जी गाडी फिरते ती फक्त पाच टक्केच प्रभागामध्ये जाते असे त्यांचे म्हणणे आहे. जी घंटा गाडी

जाते, हा विषय तेवढाच गंभिर आहे, आणि हा विषय नुसता तिथला नाही. आमच्या प्रभागामध्ये पण आहे. प्रभाग क्रमांक १४ मध्ये पण आहे. पण मी अ ब क ड बोलणार नाही, ठिकाणाचे नाव सांगेल. मराठा सेक्शन येथे जात नाही, ही गाडी गजानन नगर या ठिकाणी जात नाही. महत्वाचे म्हणजे मी या जे मी शहरात पाहीले आहे की, रात्रीच्या वेळेस घंटा गाडी सर्व हॉटेल्सचा जो कचरा आहे तो गोळा करतात. आपल्याकडे तो हॉटेलचा कचरा गोळा न केल्यामुळे, हॉटेलचा घाणेरडा कचरा आणि सडलेला कचरा आहे तो आपल्या ज्या कचराकुंडया आहेत, त्याच्यामध्ये जास्तीत जास्त दुकानदारांचा कचरा पडत असतो. त्या घंटा गाडयांचा उपयोग काय आहे, तर मला वाटते घंटा हलवल्या सारखेच आहे. अत्यंत चुकिच्या पध्दतीने घंटा गाडया चाललेल्या आहेत. फक्त घंटा वाजल्याची आवाज येते, त्या थांबत नाहीत. प्रत्येक दुकानात जाऊन कचरा घेत नाहीत. ठेकेदाराचे काम होते, त्याला काही घेणादेणाच नाही आणि शहराच्या नागरीकांचे काय आहे. शहराच्या नागरीकांच्या हिताच्या दृष्टीने कहीच नाही. कचरा गोळा करणारी जी मुले आहेत, त्या मुलांनी प्रत्येक घरोघरी जाऊन कचरा गोळा करावा. परंतु ते प्रत्येक घरोघरी जात नाही खाली जी घरे आहेत. ते फक्त चाळीमध्ये, झोपडपट्टीमध्येच जातात. इमारतीमधून कचरा गोळा केला जात नाही. मा. महापौर, मा. आयुक्त साहेब हा गंभिर विषय आहे. कचरा गोळा करणा—या व्यक्तिला घरोघरी जाऊन कचरा गोळा करायचा असतो, त्यासाठी आपण त्यांना पगार देतो. इमारतीमध्ये हे लोक जात नाही ही गोष्ट नमुद करावी. तीसरी गोष्ट म्हणजे रोजच्या रोज कचरा जमा करण्याचे ठिकाण तेथील कचरा रोजच्या रोज गोळा केला जात नाही. या तीन गोष्टी प्रामुख्याने जो कचरा गोळा केला जातो, तेव्हा तेथे पावडर मारली जात नाही. हा झाला कच—याचा विषय, दुसरा घर पट्टीबाबत, सतरामदास यांनी दहा वेळा सांगितले आहे. मा. आयुक्त साहेब, मा. महापौर मॅडम, लोकांचे अर्ज येतात की, माझ्या घराची मोजणी करून दयावी. हया ज्या किरकोळ गोष्टी आहेत घर पट्टी बाबतच्या, लोकांचे अर्ज महापालिकेत येतात की, आमचे घरांची मोजणी करून मिळावी. जास्त आहे, कमी आहे ते आम्ही भरायला तयार अहोत. त्या अर्जावर देखील सदरचे अधिकारी, कर निरीक्षक म्हणा ते गेले पाहीजेत मोजणी केली पाहीजेत. जेनेकरून शहराचे उत्पन्न वाढेल, मला असे वाटते की, अशा अधिका—यांवर, कर्मचा—यांवर गुन्हाच दाखल केला पाहीजे. नियमानुसार अर्ज आल्यानंतर किती दिवसात केले पाहीजे, सात दिवस,  दिवस, पंधरा दिवस या गोष्टीकडे गांर्भियाने लक्ष दया. कारण की लोक अर्ज करत आहेत आणि ते आमच्याकडे येतात आणि आम्ही तेथे जातो मग तेव्हा मोजणी होते. तेव्हा दोन तिन दिवसात होते. हे प्रत्येक सदस्यांच्या बरोबर होत.  तर मग सर्वसामान्या नागरीकांची काय अवस्था असेल. हा प्रश्न घर पट्टी बाबत महत्वाचा आहे. या सर्व गोष्टीचा परिणाम आपल्या इतर गोष्टींवर होतो. कर्मचा—यांचे पगार उशिरा होतात. आपले कर्मचारी निवृत आहेत, त्यांना पेंशन मिळायला दोन दोन, तीन तीन महीने जातात. ही वाईट अवस्था आहे. जर आपल्याकडे एवढे सगळे सक्षम अधिकारी असतांना मला वाटते हे असे का होते. तिसरा मुद्दा, आपण पाटोस बाबत आपण कधी निर्णय घेणार आहेत. मला वाटते पावसाळया पुर्वी पाटोस घेतले पाहीजेत आणि आम्ही जे आट ते नऊ रस्ते पास केले आहेत, ते चोविस कोटींचे आहेत. त्याची वर्क ऑर्डर कधी देणार आहेत. आता एक्सपेंशनचा विषय नाही. तुम्ही आज शब्द देयचा आहे, किती दिवसांनी त्यांना वर्क ऑर्डर मिळेल. मला असे वाटते की, शहर अभियंता यांना यामध्ये रस नाही. कशात रस आहे मला माहीत नाही, शहराचा विकास व्होवा. आज एप्रिल महीन्याचा मध्यावधी निघून गेला आहे, आज एकोणावीस तारीख आहे. जुनच्या पहील्या आठवडयामध्ये सर्वसाधारण सात तारखेला पाऊस पडतो. आपल्याकडे फक्त दिड महीना आहे, या दिड महीन्यात तुम्ही लवकरात लवकर वर्क ऑर्डर देवून कामे चालू केली असती, डांबरीकरणाची, कारण सर्व कामे डांबरीकरणाची आहेत. तर या शहराला गिफ्ट मिळेल. काही रोड कटींग आहेत. आपण नमुद केलेल्या रस्त्याचे रूंदीकरण आहे, ते रूंदीकरण लवकरात लवकर झाले तर लोकांना बांधता पण येईल आणि फूटपाथचे जर काम झाले तर, कल्याण अंबरनाथ रोडचा मागचा जानेवारी महीना आणि आजचा एप्रिल चार जानेवारीला रस्ता तोडलेला आहे. आज पर्यंत कोणी काहीही काम केलेले नाही. तर याबात आपण बोलाल तर बरे होईल. नगररचना विभाग, नेमके काय बोलावे ते समजत नाही. मला उपेक्षित बोलायचे नाही. नगररचना विभागामध्ये मुख्यत: टाऊन प्लॅनर महत्वाचे आहे. तुम्ही आम्ही म्हणतो अनाधिकृत बांधकाम होऊ नये आणि दुसरीकडे काही लोक बांधकाम करण्यासाठी परवानगी मागतात ते देण्यासाठी आपल्याकडे अधिकारी नाहीत. त्यावर आपण उपाययोजना करत नाही. ही दुरदैवाची गोष्ट आहे. यासारखे दुरदैय काहीच नाही. मा. सभागृह नेता आपल्याना पण सांगितले आहे. नगररचना विभागात आपण गांर्भियाने लक्ष दयावे. सतरामदा दादानी सांगितले आहे. मागे एक एक वर्षापासून प्रस्ताव प्रलंबित आहे.  ब—याच लोकांचे दोन दोन वर्षापुर्वीचे नंतरचे आलेले त्यांना परवानगी दोन दिवसात दिली गेली आहे. तुम्ही जर ते तीन वर्षाचे पडताळून पहाल तर तुमच्या लक्षात येईल. एक तारखेला यांचा प्रस्ताव आलेला आहे. दोनदा आट तारखेला, किंवा दहा तारखेला प्रस्ताव आलेला आहे. दोन महीने झाले धनंजय बोडारेंचा प्रस्ताव तसाच पडलेला आहे, का? ती व्यक्ती कायदेशिर जर तुम्ही प्रस्ताव घेतात, स्विकार करतात, मान्य करतात आणि त्याला तुम्ही पावती देतात. त्या पावतीमध्ये तुम्ही साठ दिवसाचा कालावधी मध्ये त्याला दयाल. मग त्याची प्रिंट होत नाही, तुम्ही मनमानी करता. मग त्याला अनाधिकृत म्हणायचे, म्हणजे सुरूवात आपल्याकडूनच होते

आणि सर्वात महत्वाचे म्हणजे उंची म्हणजे उल्हासनगरमध्ये आता ज्या इमारतीची कामे चालू आहेत. ज्याला तुम्ही परवानगी दिल्या आहेत. तुम्ही त्या पररवानग्यांमध्ये सर्वात महत्वाचा विषय जो रेन वाटर हार्वेस्टींग मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, रेन वॉटर हार्वेस्टींग हा आपण ठेवलेला विषय आहे. त्यामुळे पाण्याची बचत व्हावी. आणि त्यांनी जमा करावे आणि मग तो उपयोगात यावे. हा विषय आपला आहे. मग आता एवढया इमारती चालू आहेत. पावसाळा जवळ आला आहे. किती इमारतीनी जो रेन हार्वेस्टिंगचा जो कार्यक्रम आपण अटीमध्ये त्यांना दिलेला आहे. त्या बद्दल पण सांगा. सौर उर्जेचा ज्या आपण अटी टाकतो, त्या बाबतीत पण आम्हांला सांगितले तर बरे होईल. आज या प्राप्त परिस्थितीमध्ये नगरविकास विभाग आहे की नाही हा पहीला प्रश्न आहे. अधिकृत काम आपण करणार आहे. आमचा मागच्या वर्षाचा महापालिका सदस्यांचा निधी तो मागच्या वर्षी पण दिला गेला नाही. प्रभागातील कामे कशी होणार प्रशासनाने त्या दृष्टीकोणातून बजेट बनवावे. मागच्या वर्षीचा निधी जर तो नगरसेवक निवडून आला नसेल तर जर त्या प्रभागामध्ये दुसरे कोणी असेल तर त्यांना दया. नगरसेवक निवडून आलेला नसेल तर त्या वार्डचामध्ये, त्या प्रभागामध्ये त्या नगरसेवकांनी पत्र दिलेच असेल. त्यांना दया, त्या अनुषंगाने कारवाई करा. सतरामदास यांनी आणलेली लक्षवेधी इतर सदस्यांनी बोलायचे आहे, सभागृहामध्ये चुळबुळ चालू आहे. काय आहे, माणसाची एक सवय असते, माझे मित्र जे गंभीरतेने घेत नाहीत. त्याला काहीच कळत नाही, तो गंभीर झालाच नाही, तो गंभीर झाला असता तर आणखी दोन चार जवळ दिसले असते. हा प्रश्न आहे.गंभीरता हा विषय नाही, त्याच्यासाठी माणसाला उंची लागते, उंची नाही त्यांची त्याला काय करायचे, धन्यवाद.

या वेळी सदस्या, श्रीम. इंदिरा उदासी व श्रीम. कविता पंजाबी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u> मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, जमुनाजी मी बोलत आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मा. महापौरजी तुमच्या परवानगीने मला बोलायचे आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> कशाला परवानगी पाहीजे, आपण नंतर बोला ना.

या वेळी सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी व श्री. हरेश जग्यासी हे सभागृहातून बाहेर गेले.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> आपण सभागृनेता आहेत तर आपण शेवटी बोलू शकतात. महापौर मॅडमला माहीती नाही का?

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:—</u> खुप दादागिरी चालली आहे, महापौर मॅडम, ही कशा प्रकारे दादागिरी चाललेली आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> पाण्याच्या विषयाचा काय झाले, पाण्याचा विषय आला नाही.

या वेळी सदस्या, श्रीम. अर्चना करनकाळे व श्रीम. जयश्री पाटील यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>उप महापौर, श्री. जीवन इदनानी—</u> मा. महापौरांच्या आदेशानुसार मी सगळयाना विनंती करतो की, ज्यांना कोणाला पण बोलायचे असेल तर कृपया करून एक एकानी महापौरांची परवानगी घेऊन बोलावे. पाच वर्षा पर्यंत आम्हांला या शहराचे नेतृत्व करायचे आहे, शहर चालवायचे आहे, चर्चा करायची आहे. सगळे प्रनिनिधी निवडून आलेले आहेत. शहराच्या प्रती सर्वांचे दायित्व आहे, प्रत्येकाला बोलण्याचा अधिकार आहे.

<u>सदस्य, श्री.भगवान भालेराव:—</u> उप महापौरजी, सभागृहनेता सभेमध्ये अधून मधून उठून उभे राहत आहेत, त्यांना समजावून सांगा.

या वेळी सदस्य, डॉ. नाथानी व श्री. हरेश जग्यासी यांनी सभागृहात प्रवेश केला.

**उप महापौर, श्री. जीवन इदनानी—** महापौरांकडून परवानगी घ्यायची आहे, सगळयांना परवानगी मिळेल, सर्वाना बोलण्याचा अधिकार आहे.

**सदस्य, श्री. भारत राजवानी—** मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब जेसवानी साहेबांनी कच—याच्या बाबतीत जी लक्षवेधी घेतलेली आहे. १७ नंबरच्या प्रभागासाठी, त्यामध्ये ३९ सेक्शन जो आहे तेथे पाच वर्षापासून साफसफाई होत नाही. तेथील सफाइ कर्मचारी कामवर येतात आणि ते काम न करता कामावरून निघून जातात. आम्ही हे सगळे सांगितल्यानंतर त्यांच्यावर कोणतीही कारवाई झाली नाही. काल मी आरोग्य निरीक्षक यांच्या सोबत जाऊन वार्डमध्ये भेट दिली तेव्हा तेथे खुप कचरा आढळून आला आहे. त्या कच—याचे माझ्याकडे चित्र आहेत. ते जर आपण बघितले तर आपण हैराण होऊन जाल. मी आपल्याना सांगतो की, संपुर्ण भारतभर जो स्वच्छ अभियान चालू आहे, परंतु उल्हासनगर शहरात तो स्वच्छ अभियान दिसून येत नाही. मी आपल्याना विनंती करतो की, तेथील कर्मचा—यांनी जर इमानदारीने काम केले तर तेथील ठिकाण स्वच्छ होईल. आपण या विषयावर लक्ष दया, धन्यवाद.

या वेळी सदस्य, श्री. राजेश वदारिया यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी—** मा. महापौरजी, मी नंतरच बोलेल परंतु हा विषय भटकत आहे, या विषयावर बोलायचे आहे. महापौरजी आपल्या परवानगीने बोलायचे आहे. मा. महापौर, मा. उप महापौर मा. आयुक्त साहेब, सतरामदास जेसवानीनी जी लक्षवेधी इथे उपस्थित केली आहे. ती त्या उद्देशा पासून भटकत आहे. त्याची सभागृहामध्ये चर्चा चालू आहे.

**सदस्य, श्री. राजेश वानखेडे—** आपण असे कसे बोलत अहात की, लक्षवेधी महासभागृहामध्ये भटकत आहे. आपण असे कसे बोलत अहात. तुम्हांला समजत नाही का?

या वेळी उप महापौर, श्री. जीवन इदनानी हे सभागृहातून बाहेर गेले.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** मी आदेश दिले होते की, कृपया करून एक एक बोला, मध्येच कोणी बोलू नका.

या वेळी सदस्य, श्री. राजेश वानखेडे हे सभागृहातून बाहेर गेले

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:—** सतरामदास जेसवानीची लक्षवेधी मी वाचून दाखवतो, या लक्षवेधीचा उद्देश काय आहे? तीच्यावर सभागृहामध्ये चर्चा होत नाही. जेसवानीने या लखवेधीमध्ये सन २०१७ मध्ये महानगरपालिका निवडणूकी मध्ये आपण सगळे नविन नगरसेवक निवडून आलेले आहेत आणि ते नविन नगरसेवक गटारीच्या लाईनचे काम, शहर विकासाचे काम, नगरविकास विभागाचे काम, घर पट्टीचे काम, रस्त्याचे काम, गल्लीचे काम, अनधिकृत बांधकामे दुर करण्यासाठी.....

या वेळी उप महापौर, श्री. जीवन इदनानी यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—** अनधिकृत बांधकामनाही, पहीले सफाईच्या विभाग आहे.

**महापौर तथा पिठासिन अधिकारी:—** आपण प्रथम हा विषय पुर्ण करून घ्या, नंतर बोला.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी:—** आपण पहीले नविन नगरसेवकांना कामे करण्यासाठी, लोकांना सुविधा देण्यासाठी कशा प्रकारे काम करतील, कशा प्रकारे महापालिका पदाधिकारी, महापालिका अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून काम कसे करून घेणार या विषयी माहीती नगरसेवकांना उपलब्ध करून दिली जावी. कारण की, नविन नगरसेवकांना प्रशिक्षण कशा प्रकारे दिले जावे. या लक्षवेधीच्या विषयामध्ये जे नविन नगरसेवक पहील्यांदा निवडून आलेले आहेत. त्यांनी मागणी केली आहे की, विविध विभागांमध्ये काम कशा प्रकारे करायला पाहीजे आणि अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून कशा प्रकारे कामे करून घेतली पाहीजेत, प्रशासनाला बरोबर घेऊन कशा प्रकारे काम केले पाहीजे. मी या लक्षवेधीच्या माध्यमातून आपणाला सांगतो की, मा.

महापौर मॅडम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती संपुर्ण वर्षभर साजरी केली आहे. त्यावेळी मी किती तरी वेळा सांगितले होते की, भारताचे जे संविधान लिहीले आहे ते हिंदीमध्ये नगरसेवकांना उपलब्ध करून दिले जावे. त्या नंतर मुंबई महानगरपालिका अधिनियमाचे जे पुस्तक आहे, ते पुस्तक सुध्दा सर्व नगरसेवकांना उपलब्ध करून देण्यात यावे. उल्हासनगर महानगरपालिकेचे जे नियम बनविलेले आहेत, जेव्हा महानगरपालिका स्थापन झाली होती, ते पुस्तक सर्व नगरसेवकांना उपलब्ध करून देण्यात यावेत. दुसरी गोष्ट म्हणजे ऑल इंडिया लोकल सेल्फ गर्व्हरमेंट तर्फे प्रत्येक दोन तीन महीन्यानी प्रशिक्षण वर्ग आयोजित केले जाते, त्यामध्ये आमचे नविन निवडून आलेले नगरसेवक तेथे जाऊन वेगवेगळया विषयांवर अभ्यास करतात आणि माझ्या माहीतीनुसार याच महीन्यामध्ये गोवा येथे पण एक विषय आहे, त्याच्या पहीले पण तिरूपती बालाजी येथे सुध्दा एक विषय होता. सतरामदाजी आपण जी लक्षवेधी उपस्थित केली आहे, मी आपणाला निवेदन करतो की, उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त आणि मा. महापौर नविन निवडून आलेले सदस्य आणि जूने सदस्य यांच्यासाठी एक प्रशिक्षण वर्ग या महानगरपालिका हॉलमध्ये किंवा इतर ठिकाणी दोन दिवसासाठी आयोजित करण्यात यावा आणि आमची जी नियमावली आहे, आमची काम करण्याची जी कार्य पध्दती आहे, आमचे जे अधिकारी आहेत ते वेगवेगळया विभागांमध्ये कोणकोणती कामे करतात, ही सर्व माहीती उपलब्ध करून देण्यात यावी आणि ऑल इंडिया लोकल सेल्फ गर्व्हरमेंट तर्फे जे कार्यक्रम लागतात त्या बाबतीत आम्हांला जे पत्र देण्यात येते ते खुप उशिरा मिळतात. जर पंचवीस तारखेला कार्यक्रम आहे, तर आम्हांला वीस तारखेला हातात पत्र मिळते. त्यामुळे महापालिका सदस्यांना तेथे जाणे, त्याची व्यवस्था करणे, रिर्झव्हेरेशन करणे इत्यादी गोष्टी करू शकत नाहीत. त्यामुळे आम्हांला कमीत कमी पंधरा दिवस पहीले याची माहती देण्यात यावी आणि मी निवेदन करतो की एक प्रशिक्षण वर्ग आपल्या तर्फे शहरामध्ये लावण्यात यावे, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री.सतरामदास जेसवानी:—</u> जमुनादासजी, आपण सभागृह नेता आहेत, मी आपले लक्षवेधण्यासाठी ही लक्षवेधी घेतली आहे. शहरातील लोकांना आवश्यक सुविधा आहेत त्या मिळाल्या पाहीजेत, माझी हीच इच्छा होती की, महापौराद्वारे सर्व शहरवासियांना सुविधा मिळाव्यात. महापौर प्रशिक्षणासाठी जातील का, आम्ही गोव्याला प्रशिक्षसाठी जावे का? महानगरपालिकेची परिस्थिती पहीलेच खराब आहे आणि आम्ही गोव्याला प्रशिक्षणासाठी जावे. तर मग एवढया लांब जाणार कोण? तर मग इथेच शिकवा.

<u>सदस्य, श्री.भगवान भालेराव:—</u> सन्माननिय महापौर, आयुक्त साहेब, सभागृह नेत्यानी आता इथे सतरामदास यांच्या लक्षवेधी बाबत जी माहीती सांगितली आहे. मी सभागृहाला एक गोष्ट सांगू इच्छितो की सतरामदास जेसवानी यांनी या लक्षवेधीचा कुठलाही उल्लेख न करता त्यांनी सविस्तर सर्व गोष्टींवर चर्चा केली आहे. मग आम्ही ही लक्षवेधी समजायची की, त्यांनी मांडणी केली ती लक्षवेधी समजायची, जी मांडणी केली ती लक्षवेधी समजायची असेल तर ती त्यांनी सर्वच विषयांवर सखोल चर्चा केलेली आहे. मी लक्षात आणून देतो तुम्हांला हे लक्षात ठेवा, तुम्ही वेगवेगळया मार्गाने नेऊ नका विशेष म्हणजे त्यांनी कच—याचा मुद्दा आयुकत साहेब त्यांनी उपस्थित केला आहे. आपण कच—यासाठी पुर्वी जे अंथनीला प्रत्येक दिवसाला १,६५०००/— रूपये देत होतो. जो कचरा उचलण्याचा ठेका होता. आता आपल्याला मला वाटते की, तो ४ लाखाच्या आसपास आपण देतो. अंथनीला आपण १,६५०००/ मध्येच काम करून घेत होतो. तरी पण आपण त्याच्यावर ताशेरे ओढत होतो. कचरा उचलत नसेल तर आपण त्यांना ब्लॅक लिस्ट मध्ये टाकले होते. परंतु आज आपण प्रत्येक दिवसाला ४६००००/— एवढा खर्च होत आहे. आज माझ्या ऑफिसच्या शेजारी कच—याचा एक खता आहे, कच—याच्या डेपोला खता बोलता, त्या खत्यावर सांगून जातो साहेब दिवसातून दोन वेळा कचरा उचलला जातो. मी माझ्या ऑफिसच्या बाजूला कॅमेरे लावले आहेत, मी त्या कॅमेरेचे एक महीन्याचे फुटेज तुम्हांला देतो. एक दिवसात जर दोन वेळा कचरा उचलला असेल तर तुम्ही जे बोलाल ते मला मान्य आहे. म्हणजे चुकीची माहीत, आपले स्वच्छता निरीक्षक आणि अधिकारी आपल्या देतात आणि फक्त ठेकेदाराला पोसण्याचे काम महानगरपालिके कडून चालला आहे. दुसरी गोष्ट तुम्ही सांगितले की कच—याचा पेट कशामुळे होतो, सतरामदास जेसवानी यांनी सांगितले आहे ओला कचरा आणि सुका कचरा साहेब तुम्हीच सांगा, ओला कचरा, सुका कचरा नागरीक काढून ठेवतील. जर ठेकेदाराचा कर्मचारीच तेथे पोहचत नसेल तर ओला कचरा आणि सुका कचरा जमा करणार कोण? आम्ही वाट बघत बसणार का? जर एक दिवसाचा कचरा उचलला गेला नाही तर त्याचा वास उठेल आणि मग तो नाइलाजाने दोन्ही मिक्स करून टाकून देतो. तुमचे कर्मचारीच तिथे नाहीत, झाडू मारणारे कर्मचारी असतील, घंटा गाडीचे कर्मचारी असतील किंवा डब्बेवाले कर्मचारी असतील. आज गेली एक वर्ष ते दिड वर्षे आपण कच—याचा टेंडर दिलेला आहे. एक कर्मचारी सुध्दा माझ्या वार्डामध्ये फिरत नाही. महीन्यातून येतो आणि म्हणतो साहेब तुम्ही सही दया, आम्ही त्या वार्डा मधून फिरून आलो आहे. तो फिरतच नाही, मी सही कशी देणार. ही जी पध्दत आहे, कोणी तरी अधिकारी त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आहेत, ते अकार्यक्षम आहेत. कच—याच्या बाबती मध्ये

जसा तुम्ही वालधूनी नदीचा प्रदुषणाचा उल्लख केला आहे, लोकाना सांगतात कचरा टाकू नका, का टाकणार नाही. कारण कचरा उचलणारी यंत्रणा आपली अपुरी पडायला लागली आहे. आपण ४६००००/— देवून सुध्दा जो अपेक्षित कचरा उचलायला पाहीजे, तो उचलला जात नाही, अशी परिस्थिती शहरामध्ये आहे. दुसरी गोष्ट म्हणजे साहेब तुम्हांला सांगतो, शहराचा मुळ भाग जर सोडला तर मला वाटते झोपडपट्टीतल्या कुठल्याही भागाचा कचरा उचलणारी यंत्रणा नाही. कारण कच—याची मोठी गाडी जात नाही, छोटी जाते, छोटी गाडी दोन दोन दिवस येत नाही. विशेष म्हणजे याच्याही पलिकडे ठेकेदाराची आणि अधिका—यांची गोष्ट सांगतो. ज्या ज्या वेळेस डंपिंग ग्राऊंडचा प्रश्न उपस्थित झाला आहे, त्या त्या वेळी दोन दोन, तीन तीन दिवस डंपिंग ग्राऊंड बंद असते. तुमचे महाभाग अधिकारी बंद असलेल्या ठिकाणनी त्यांना पैसे देतात. म्हणजे असे करतात, विचारा करा. जर डंपिंग ग्राऊंड बंद असेल, यंत्रणा पुर्ण ठप्प असेल, तर मग तुम्ही पैसे कशाला देतात. मागच्याच महासभेमध्ये प्रश्न उपस्थित केला होता, जर आठ आठ, दहा दहा दिवसाचा संप केला होता आणि पैसे काढलेले आहेत. कुठलीह कारवाई झाली नाही. म्हणून मला वाटते साहेब कच—याच्या समस्याच्या बाबतीत गांर्भियाने विचार करण्याची गरज आहे. मला असे वाटते तुम्ही जो निर्णय घेतात तेव्हा कच—याचा भाग आहे की, प्रदुषणाचा भाग मोठया प्रमाणात येतो. कच—याच्या संदर्भात आपण स्पेशन महासभा बोलवावी आणि त्या कच—याच्या संदर्भात ज्या ज्या अडीअडचणी असतील त्या संदर्भात सखोल चर्चा करण्याची अत्यंत गरज आहे. कचरा आणि पाणी सन्माननिय महापौर मॅडम, आपण आता महापौर आहेत तुम्ही महापौर झाल्यानंतर सांगितले होते की, मी झिरो गार्बेज पुर्ण शहर करणार. माझ्या प्रभागामध्ये दोन दोन दिवस कचरा उचलला जात नाही. अशी परिस्थिती आहे. माझ्या इथे इंडस्ट्री झोन आहे, तेथे लोक कचरा आणून टाकतात. तेथे दोन दोन वर्षे कचरा उचलला जात नाही. मागच्या वेळेस मी विनंती केली आणि दोन जेसीपी घेऊन तेव्हा दोन झोनमध्ये पडलेला कचरा, त्याची दुर्गंधी वाढली होती, त्यामुळे डास वाढलेले होते, तरीही साहेब मी तो कचरा उचलला. गेली वर्षे भर त्या जागेवर कचरा पडत आहे. कोणी तरी कचरा आणून टाकत आहेत. आपली ही जी यंत्रणा आहे आपण ४६००००/— रूपये खर्च करून उभी केली आहे, ती चांगल्या प्रकारे काम करत नाही, कुचकामी आहे. मला वाटते आपण चांगल्या मार्गाने या गोष्टीचा विचार करण्याची गरज आहे. दुसरा विषय टॅक्सच्या संदर्भात आहे, मला वाटते महापौर मॅडम ३१ लाख रूपये महापालिकेचा टॅक्स एका माणसाकडे थकीत आहे. तो स्वत: महापालिकेला सांगतो की, माझी मालमत्ता सिल करा. माझ्या दुकानाची जप्ती घ्या. महापालिका बोलते दुकानाची जप्ती करायची नाही. अशी काय गंमत आहे आणि ज्याचे सत्तर हजार, ऐंशी हजार आहेत मालमत्ता सिल करतात, जप्ती करतात. आता तो स्वत: होऊन सांगतो माझ्या मालमत्तेची जप्ती करा आणि लिलाव करा. आपण ते करत नाही, ३१ लाख रूपये बाकी आहे. म्हणजे एकीकडे आपण कुठल्या मार्गाने जातो, एकीकडे गरीबावर अन्याय करतात आणि श्रीमंताना आपण चांगली वागणूक देतो, त्याला सहकार्य करतो. मला वाटते महापौर मॅडम, आयुक्त साहेब याच्यावर जातीने लक्ष देण्याची गरज आहे, त्या अनेक विषयावर आपण गांर्भियाने लक्ष देण्याची गरज आहे, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—</u> मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब, दादा सतरामदास जेसवानीनी जी लक्षवेधी मांडलेली आहे. ही लक्षवेधी खरोखर हया उल्हासनगर महानगरपालिका हद्दी राहणा—या नागरीकांना कोणकोणत्या सुविधा मिळाल्या पाहीजेत. सगळया विषयावर त्यांनी लक्ष केंद्रीत केलेले आहे. सभागृहाचे लक्ष केंद्रीत केलेले आहे, मा. महापौरांचे लक्ष केंद्रीत केलेले आहे, आयुक्तांचे लक्ष केंद्रीत केलेले आहे. मी आपल्याना एक विषय सांगतो, तो या संदर्भातील आहे, लोकांना आपल्याला ज्या सुविधा दयायच्या आहेत, आपल्याला माहीत आहे, या शहरामध्ये अंडर ग्राऊंड ड्रेनेजची परिस्थिती खराब आहे. आपले जे अधिकारी आहेत ते खरोखर त्याच्यावर कुठले काम करतात का? आणि ठेकेदारांना जे काम दिले आहे, ते काम ठेकेदार करतात का? त्या कामा बद्दल ते फुकटचे बिल घेतात का? काम न करता खोटे बिले घेतात का? या सगळया गोष्टींकडे लक्ष दयायला पाहीजे. परंतु लक्ष दिले जात नाही. मी तुम्हांला एक उदाहरण सांगतो, माझ्या प्रभागामध्ये कमला अपार्टमेंटच्या येथे अंडरग्राऊंडचे एक चेंबर आहे, त्याचे पाणी स्वरस्वतीनगर आहे, तेथे लोक राहतात रस्त्याच्या बाजूला त्या रस्त्यावरून समोरून पाणी वाहते. पाच वर्षामध्ये दोन महीन्यातून एकदा गाडी तो चेंबर साफ केला जातो आणि परत दोन दिवसांनी तो चेंबर भरला तर लोकांच्या दरवाजातून मेन रोडला पाणी जाते. या रस्त्याच्या जो मेन रोड आहे आणि त्या रोडवरून जर पाणी वाहत असेल तर महापालिकेसाठी ती शर्मेची बाब आहे. जर आपण त्याच्यावर काही सोलेशन काढणार नसेल, पाच पाच वर्षे जर आपण त्याच्यावर उपाययोजना करत नसेल तर आपल्यासाठी ती शर्मेची बाब आहे. तर आपल्याला महापौर म्हणून विनंती करतो की, आपण त्वरीत या महापालिकेच्या रस्त्यावर उघडे असे काही अंडर ग्राऊं ड्रेनेजचे पाणी रस्त्यावरून वाहत असेल तर त्याच्यावर ज्या काही उपाययोजना करायला पाहीजेत तर कुठलीही आर्थिक कारण न सांगता, त्या आपण केल्या पाहीजेत. आपल्या विषयावर लोकांना ज्या देण्यात येणा—या सुविधा आहेत, त्या महापालिकेन दिल्या पाहीजेत. त्या आर्थिक व्यवस्थेच्या बाबतीत आपण नेहमी नेहमी ती कारणे पुढे केली नाही पाहीजेत. सोयीसुधांच्या बाबतीत दिली पाहीजेत. कारण आपण त्यांच्याकडून टॅक्स घेतो.

टॅक्स भरला नाही तर आपण त्यांची दुकाने, घरे सिल करतो, त्यांना नोटीस देतो. त्याच्यावर कारवाई करतो, लिलाव करायला पाठवतो. असे जर असेल, लोक जर टॅक्स भरत असतील तर त्यांना सुविधा मिळाल्याच पाहीजेत. ज्या दयायच्या आहेत त्या दयायला पाहीजेत. दुसरा विषय असा आहे, महापालिकेची आर्थिक स्थिती खराब असतांना आपल्या महापालिकेमध्ये आपण महापौर, उप महापौर निवडून आलेले आहेत. आपण चांगले काम करणार असाल तर शिवसेना आपल्याला नेहमीच सहकार्य करेल. परंतु लोकांच्या पैशाचा जर दुरूपयोग करीत असतील तर त्याला नक्कीच विरोध करू. मी मुदामहून सांगतो, आपली निवड झाल्या नंतर आपण जी विकासाची कामे हाती घ्यायला पाहीजे होती, ती घेतली नाही आणि आपल्याला बसण्यासाठी चांगले प्रशस्त दालन मिळायला पाहीजे. या विषयावर आपण जास्त भर दिलेला आहे. कुठल्याही प्रकारची परवानगी न घेता, आयुक्तांची परवानगी न घेता, स्वत:ची खाजगी मालमत्ता समजून आपण ते दालन तोडून टाकलेले आहेत आणि स्वत:चा कार्यभार साधण्याचा प्रयत्न केला आहे. ही चुकीच प्रथा आहे. या प्रथेला आम्ही नक्कीच विरोध करणार, जर अशी प्रथा करणार असाल, तर लक्षात ठेवा याच्या पुढे असे सहन करणार नाही. ते दालन कोणी तोडले आहे, आयुक्त साहेब त्याच्यावर गुन्हा दाखल केला पाहीजे. जर अशी परवानगी न घेता कोणी कुठले काम करणार असेल आम्हांला आमच्या वार्डमध्ये काम करण्यासाठी मागच्या वेळीचा फंड मिळाला नाही. ड्रेनेज गटार वैगेरे करायाला तर तुम्ही सांगितले की, आर्थिक स्थिती खराब आहे. याच्या नंतर जर ते दालन बनत असतील, लोकांच्या पैशाचा दुरूउपयोग होत असेल तर ते चुकीचे आहे. आपण त्याच्यावर कारवाई करायला पाहीजे, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u>** सगळयात पहीले मी सतरामदास जेसवानी यांचे अभिनंदन करतो की, लक्षवेधी त्यांनी आणली आणि आपण तिचा स्विकार केला. कागद बोलतात, जमुनादासजी सतरामदास जेसवानीनी लक्षवेधी आणली तिचे स्पष्टीकरण आपण देत अहात. जो लक्षवेधी आणतो, ते त्यांनी त्यांच्या भाषेमध्ये सांगितले आहे. तो त्यांचा आपला अधिकार आहे, लक्षवेधीमध्ये काय घेतले आहे. फक्त पेपर बोलतात, आज काल बॅकेमध्ये पेंशन मागायला जातात तर प्रमाणपत्र मांगतात की, आपण हयात आहेत की नाही. व्यक्ती बोलत नाही तर पेपर बोलतात. इथे पेपरच बोलत आहे. स्वत:च्या हाताने लिहीले आहे आणि वाचून दाखवत आहेत, त्याच्या नंतर आपण आपल्या मतानुसार मांडत अहात. याच्यात क्लिीअर कट म्हणटले आहे, सन २०१७ मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीत लोकप्रतिनिधी निवडून आलेले आहेत. त्यांना उल्हासनगर महानगरपालिका शहरामध्ये तेथे रहात असलेल्या नागरीकांची प्राथमिक गरज, सफाई विभाग, अंडर ग्राऊंड गटर, शहर विकासाचे काम, नगररचना विभाग, टॅक्स विभाग, अनधिकृत बांधकामे दुर करणारे विभाग या सर्व सुविधा संबधित अधिकारी कसे देतात. कोणत्या ज्या आवश्यक सुविधा उल्हानगर महानगरपालिका नागरीकांना देत नाही. या महासभेमध्ये ही सगळी माहीती लक्षवेधीद्वारे दिली आहे. महत्वाचे म्हणजे जे नविन नगरसेवक आले आहेत, त्यांना पण माहीती पाहीजे. त्यासाठी मी त्यांचे अभिनंदन करतो की, सर्व विभाग प्रमुख एक एक येऊन सांगावे. जबाबदारी कशी असते, नगररचनाकार विभागाचे काम कसे चालते. आयुक्त साहेब तुम्ही सांगा. महासभेने, महापौरांनी या महत्वाच्या लक्षवेधीला मंजुरी दिलेली आहे. वालधूनी नदीचा नाला बाजुला ठेवला होता आणि सतरामदास जेसवानी यांची लक्षवेधी प्राधान्याने स्विकारली. लक्षवेधी होती का नाही ती गोष्ट वेगळी होती. परंतु ती आपण स्विकारली मग चर्चा झालीच पाहीजे. तर याचे दोन भाग आहेत, एक तर नगरसेवकांना प्रशासनाने माहीती दयायची, महानगरपालिकेचे कामकाज कोण बघते. टॅक्स कसा वसुल केला जातो. नगररचनाकार विभागाचे काम कोण पाहतो, नगररचना विभागाची कार्य प्रणाली कशी आहे, अंडर ग्राऊंड ड्रेनेज कोण बघतो, तर या सगळया अधिका—यांनी इथे माहीती दिली पाहीजे. आजच्या लक्षवेधीच्या माध्यमातून मी विनंती करतो की, अधिका—यांनी येऊन इथे सांगावे, त्यांना अपेक्षा नाही का प्रशिक्षणासाठी महाबळेश्वरला जात नाही, गोव्याला जात नाही. प्रत्येक विभागांची माहीती इथे दया. महत्वाचे सांगायचे म्हणजे काहीही मंजूर नसतांना कामे कशी होतात. जसे आता सर्व नगरसेवकांनी सांगितल आहे. मंजुरी नाही, मंजुरी असेल तर तसे सांगा, नसेल तर ते कसे होते तेही नगरसेवकांना सांगा. म्हणजे आमच्या वार्डमध्ये कामे करू. मंजूर नसतांना, टेंडर नाही, वर्क ऑर्डर नाही, स्विकृती पत्र नाही. काहीही नसतांना चेंबर कसे तोडली जातात. ते महत्वाचे आहे. ही माहीती मला इथेच पाहीजे. मंजुर नसतांना ते काम कसे होते आणि ते करायचे असेल तर प्रत्येक नगरसेवकांना ती माहीती दया, ते शिकून घेतील. आज या लक्षवेधीचा उद्देश आहे, अधिकारी माहीती देतील की, त्यांच्या विभागाचे कामकाज कसे होते. जसे भगवान भालेराव साहेबांनी सांगितले की, अधिकारी माहीती देतील की, त्यांच्या विभागातील कामकाज कसे होते. जसे की, आमच्या भगवान भालेरावांनी सांगितले आहे, कच—याचा मुद्दा, २६५, ४६५ झाले त्यावेळचे मिनिट्स काढले तर झीरो बजेट निघेल. पण ठेकेदार आणि आमचे अधिकारी खत्ते आहेत तेच ठेवतील. लोकसंख्या बदलली, शहारची भौगोलिक रचना किंवा परिस्थिती जशी आहे तशीच आहे. प्रशासनाने त्यामध्ये बदल केला पाहीजे. ठेकेदाराला सांगायला पाहीजे. २००१ मध्ये जी परिस्थिती होती, ती २०५० साली नसणार आहे. त्यानुसार प्रशासनाने बद्दल केला पाहीजे, ठेकेदाराला निर्देश दिले पाहीजे. झिरो गाब्रेज कसे झाले पाहीजे. म्हणजे प्रशासन म्हणते

तेथे खत्ता नव्हता. म्हणजे ठेकेदाराला केंद्रबिंदू माणून त्याच्या सोयीसुविधानुसार सगळ चालले आहे. झिरो गार्बेज जसे भगवान भालेराव साहेबांनी सांगितले आहे की, वालधूनी नदीमध्ये किंवा एखादया ठिकाणी जे सार्वजनिक शौचालय जे आहे ते तुटलेले आहे तेथे कचरा का जमा होतो कारण तो उचलला जात नाही. लोकांना जर सुविधा मिळाली तर मग कशाला कचरा करतील. या सगळयाची भुमिका काय आहे, ते एक एक विभागाने सांगावी आणि नगररचनाकार विभाग म्हणून मी सुरूवातीलाच सांगितले आहे, ही लक्षवेधी होते की नाही हे गार्भियाने पहा आणि पुन्हा सांगतो की, सत्ता पक्ष आणि विरोधी पक्ष दोघांना एकत्रित बसवतो. तुम्ही सांगितले आहे, शहराचा विकास करायला पाच वर्षे पडली आहेत. आता जर तुम्हांला असे सोडले तर शहराचा विकास होणारच नाही. कोणाला सांगणार आहे, आम्हांला मनात येईल ते करणार. सुरूवातच तशी केलेली आहे. तर आपणास विनंती आहे की, साहेब एकच मुद्दा उपस्थित केला आहे, कोणी टॅक्सच्या बाबतीत शंका असतील तर ते विचारतील, नगररचनाकार विभागाशी शंका असतील तर विचारतील, तिथला मुद्दा उपस्थित करतील. ते विचारतील अधिका—यांची ओळख होईल आणि महत्वाचा म्हणजे मंजूर नसतांना कामे करतात ती कशी याबात माहीती पाहीजे. शहर अभियंता त्याच्यावर काय, कार्यप्रणाली काय आणि कारवाई काय, कामे जर व्यवस्थितीत नसतील तर कारवाई काय करणार.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> नविन सदस्यांना कळेल सर.

<u>आयुक्त, डॉ. सुधाकर शिंदे:—</u> सन्माननिय सदस्यांनी पुन्हा एकदा महत्वाच्या विषयावर लक्षवेधी विचारलेली आहे, त्याबद्दल मी सर्वांचे अभिनंदन करतो आणि सर्व नवनिर्वाचित सदस्यांना महानगरपालिकेच्या वेगवेगळया विभागांची कार्यप्रणाली कळण्यासाठी जी आवश्यकता आहे, ती आवश्यकता सर्वांनी वारंवार अधोरेखीत केलेली आहे. त्या अनुषंगाने मला असे वाटते की सगळया सन्माननिय सदस्यांचे एकत्रितपणे प्रशिक्षण वर्ग घेणे हे जास्त संयुक्त होईल. आज असे येऊन बिट्स ॲन्ड पिसेसमध्ये

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> एवढेच सांगण्यासाठी लक्षवेधी आहे का?

<u>आयुक्त, डॉ. सुधाकर शिंदे:—</u> बिटस ॲन्ड पिसेसमध्ये येऊन करणे, यामुळे आपण सभागृहाचे अमुल्य वेळ घेता, आपण एक वेगळया स्ट्रकसेसवर कार्यक्रम करू, प्रशिक्षणासाठी म्हणा, चर्चासत्र म्हणा, या सदराखाली एक प्रशिक्षण वर्गासाठी काही तरी आयोजन करणे हे जास्त संयुक्त राहील. परंतु सन्माननिय संदस्यांनी सांगितल्या प्रमाणे सर्व विभागातील वरिष्ठ अधिका—यांची ओळख होणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने आपण सर्वांची ओळख करून देऊ. तर मी माझ्या सर्व अधिका—यांना विनंती करतो की, त्यांनी स्वत:चे नाव आणि विभाग सांगून सर्व सदस्यांना आपली ओळख करून दयावी.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> मा. महापौर मॅडम, ओळख करून देत असतांना सदरच्या अधिका—यांनी समजा एखादे काम जर दिले असतील तर ते किती दिवसात होईल, हे सांगितले तर बरे होईल. आमच्या ज्ञानात थोडीची भर पडेल.

<u>अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:—</u> सन्माननिय सभागृह, सन्माननिय महापौर मॅडम, सन्माननिय उप महापौर, मा. आयुक्त, मी विजया कंठे, उप आयुक्त शहर म्हणून माझ्याकडे कार्यभार आहे आणि अतिरिक्त आयुक्त, मला तत्कालिन आयुक्त, हिरे साहेबांनी त्यांच्या आदेशान्वये माझ्याकडे दिलेला आहे.

<u>सदस्य, श्री राजेंद्र चौधरी:—</u> तुमच्याकडे जो अतिरिक्त आयुक्तांचा कारभार आहे, तो काढून घेतलेला आहे का?

<u>अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:—</u> अतिरिक्त आयुक्त पद माझ्याकडेच आहे.

<u>सदस्य, श्री राजेंद्र चौधरी:—</u> मागच्या वेळेस अतिरिक्त आयुक्त, कार्यभार काढेला आहे अश्या बातम्या होत्या.

<u>अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:—</u> अतिरिक्त आयुक्तांचा पदभार त्यांनी काढलेला नाही, उप आयुक्त मुख्यालयाचा कार्यभार लेंगरेकर यांच्याकडे दिला आहे आणि माझ्याकडे उप आयुक्त शहर ठेवलेला आहे.

<u>सदस्य, श्री भगवान भालेराव:—</u> तुमच्याकडे कोण कोणते विभाग आहेत ते सांगितले तर बरे होईल.

<u>अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:–</u> माझ्याकडे एकुण १४ विभाग आहेत. एकुण २८ विभागा पैकी लेंगरेकराकडे १४ विभाग आहेत आणि माझ्याकडे १४ विभाग आहेत. त्यातले नागरीक सुविधा केंद्र, महिला व बालकल्याण विभाग, मा. आयुक्तांनी सांगितले होते की प्रत्येक विभागा बद्दल सांगण्यासाठी बोलले होते. मी आपणाला १४ विभागांची सर्व माहीती देते. मी पाच मिनिटांमध्ये सगळे लिहून सांगते सर्व विभागामध्ये काम कसे चालते. कारण आपण मला विभाग विचारले आहे.

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:–</u> महापौर मॅडम, आयुक्त साहेब, हे जे १४ विभाग दिले गेले आहेत, ते कोणते आहेत, त्यांनाच माहीत नाहीत, नंतर त्या लिहून आणतील.

<u>अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:–</u> नाही नाही जे १४ विभाग आहेत, जसे नागरीक सुविधा केंद्र, नागरीक सुविधाकेंद्रामध्ये कोणती कामे होतात,

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:–</u> आपण सांगितले होते की, आपण लिहूण देणार आहेत.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> मा. महापौर मॅडम, आयुक्त साहेब, शिंपल गोष्ट आहे, आम्हांला फक्त तुमच्याकडे कुठले कुठले विभाग आहेत ते सांगा आणि तिथे आल्यावर संबंधित विषयाची फाईल किती दिवसात जाते, एक दिवस, दोन दिवस, तीन दिवस, एक महीना, दोन महीना जाईल, समजा नगररचना विभाग मॅडमकडे आहे, नगररचना विभागामध्ये आलेली फाईल किती दिवसात झाली पाहीजे किंवा एखादा कागद आला तो कागद किती वेळेत जातो चोविस तासात, आठेचाळीस तासात, १४ विभाग कुठले आहेत.

<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:–</u> आयुक्त साहेब, मॅडमला जी जबाबदारी दिलेली आहे, त्यांना स्वत:लाच माहीत नाही की, आपल्यावर कोणकोणती जबाबदारी आहे. तर मग लोकांना न्याय काय देणार.

<u>उप आयुक्त, श्री. जमीर लेंगरेकर:–</u> सन्माननिय महापौर, मा. आयुक्त साहेब आणि सर्व सन्माननिय सदस्य, मी जमीर लेंगरेकर, उप आयुक्त (मुख्यालय) म्हणून माझ्याकडे दिनांक ८ मार्च, २०१७ पासून माझ्याकडे पदभार मिळालेला आहे. पुर्वी मी मागील दोन वर्षा पासून उप आयुक्त, शहर म्हणून कार्यरत होतो. तर ब–याच सन्माननिय सदस्यांना, नविन सदस्य सोडले तर बाकी सर्व सदस्यांना मी परिचित आहे आणि माझा भ्रमणध्वनी क्रमांक नविन सदस्याकडे नसेल तो तुम्ही जर लिहून घेतलास तर मी तुमच्या सर्व समस्या तात्काळ सोडवेल. माझ्याकडे जरी कुठला विभाग जरी नसला तरी त्या संबंधित विभागा बद्दल लोक मला फोन करीत असतात. मी माझ्या परिने सोडविण्याचा प्रयत्न करीत असतो. महानगरपालिका ही वेगळी, माझ्या पुरती किंवा माझे विभाग जरी नसले तरी मी अन्य विभागाचे सुध्दा संबंधित जे लोकप्रतिनिधी असतात, त्यांना मी मदत करण्याचे नक्की प्रयत्न करीत असतो. इथे सन्माननिय महीला सदस्या ज्या आहेत, त्यांचा मला रात्री बारा वाजता फोन येतो. डंपिंग ग्राऊंडच्या संदर्भात असतील, पाण्याच्या संदर्भात असतील, आमचे सन्माननिय अधिकारी फोन उचलत नाहीत, म्हणून मला फोन करतात की, तुम्ही त्यांना सांगा. तुमच्या जर काही समस्या असतील तर माझा नंबर आहे, ८४११००११०५ हॉटस ॲप वर बरेच ग्रुपमध्ये आहे. आणि मला केव्हीही आपण फोन करू शकतात, मी आपल्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न करेल. शक्यतो माझ्याकडे ज्या फाईल येतात, मी शक्यतो त्या पुढे पाठविण्याचा प्रयत्न करतो, माझ्या स्तरावर असतील तर मी उशिरा पर्यत थांबून त्या पुर्ण करतो. आता सुध्दा महासभेमधून मी खाली गेला होतो. ब–यासच्या फाईल मी मार्गी लावून आलो आणि माझ्याकडे जे विभाग आहेत, त्यामध्ये सामान्य प्रशासन विभाग आहे, अनधिकृत बांधकाम विभाग, तज्ञ समिती, जे अनधिकृत बांधकामे आहेत ते नियमित करायचे आहेत तो विभाग, आरोग्य विभाग आहे, स्थानिक संस्था कर विभाग आहे, शिक्षण मंडळ विभाग आहे, त्याच बरोबर छोटे जे विभाग आहेत, त्यामध्ये शिक्षण समिती आणि बरेसचे छोटे मोठे विषय आहेत. ते मी आपल्याशी संपर्क झाल्या नंतर आणि विशेष म्हणजे आयुक्त महोदयांनी सांगितल्या प्रमाणे एक प्रशिक्षण ठेवणे उचित वाटते. बरेसचे सदस्य जरी जूने असले, मी आता महासभेमध्ये सुरूवातीलाच हा विषय झाला, तो प्रस्ताव घ्यावयाचा की नाही घ्यायचा त्यामध्ये आपला अनाश्यक वेळ खर्च झाला आहे. एक सभाशास्त्र विषय महत्वाचा आहे. सभाशास्त्रामध्ये कोणी कसे बोलावे आणि कशा पध्दतीने बोलावे, संसदीय भाषेमध्ये बोलावे किंवा नाही बोलावे, या बाबतीत लवकरच आपण सभाशास्त्र विषय लवकरच लेक्चर घ्यावे. असे मा. महापौरांची जर परवानगी असेल तर आपण या पंधरा दिवसात किंवा लवकरात लवकर एक दिवसाचे प्रशिक्षण आपण याच सभागृहामध्ये घेण्याचा माझे मनोदय आहे. आपली जर परवानगी असेल तर मी नक्कीच वेळ प्रस्तावीत करेल, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> हे महासभेच्या अगोदर घ्या.

<u>अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:–</u> सन्माननिय सभागृहाने जे विचारले होते, ते मी संक्षिप्तपणे व्यवस्थित सांगत होते. माझे आक्षेप आहे, मला माझ्या प्रश्नांचे उत्तर जे जे विभाग आहेत, नागरीक सुविधा केंद्र हे सर्वात पहीले, अग्निशमन विभाग आहे, सुरक्षा विभाग आहे, जे.एन.यु.एल.एम. विभाग आहे, ते पुर्वी सुवर्ण जयंती विभाग होते, तेच आता जे.एन.यु.एल.एम. विभाग आहे, महीला व बालकल्याण समितीचे काम माझ्याकडेच आहे, भांडार विभाग माझ्याकडे आहे, लेखा आणि लेखापरिक्षण विभाग माझ्याकडे आहे, आपातकालीन विभाग आहे, हे माझ्याकडे विभाग आहेत आणि या बद्दलची माझी पहील्या पासूनची जी कामाची पध्दत आहे, ती आजही काही सन्माननिय सदस्यांनी विचारलेला प्रश्न आहे की, माझ्याकडे कुठल्याही विभागाचा आलेला विषय तो तात्काळ निपटारा होतो. यासाठी अतिरिक्त आयुक्त म्हणून माझ्याकडे ज्या संचिका येतात त्या तात्काळ पाठविल्या जातात. माझ्याकडे आता पर्यंत कुठलेही काम प्रलंबित नाही. इथे मी सभागृहास आवर्जून सांगू इच्छिते. माझा मोबाईल नंबर जो आहे तो सर्वांना माहीत आहे, परंतु सभागृहामध्ये नविन सदस्यांना जर नमुद करायचा असेल त्यांनी तो नोंद करून घ्यावा, तो मराठीत सांगावे किंवा इंग्रजीमध्ये कारण मराठीत सांगितले तरी आक्षेप आहेत आणि इंग्रजीमध्ये सांगितले तरी आक्षेप असतो. मी दोन्ही भाषेमध्ये सांगते, मो. नं.९९६९०१३७६० हा पहील्यापासून माझा नंबर आहे आणि महापालिकेकडून जो मिळालेला क्रमांक आहे तो ८४११०६५९९९ असा आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–</u> मॅडम आपल्याकडे मुख्यालयाचा पदभार आहे, ना.

<u>अतिरिक्त आयुक्त, डॉ. विजया कंठे:–</u> माझ्याकडे मुख्यालय नाही, पुर्वी होते आता नाही.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–</u> मुख्यालयाच्या बाबतीमध्ये आयुक्त साहेब एक प्रश्न आहे. आपले जे महापालिकेचे कर्मचारी आहेत, ते कधी मुंत्यु पावले, मुंत्य झालेले आहेत. त्यांच्या वारसाना त्यांचा हक्क मिळत नाही. त्यांना सहा सहा, आठ आठ महीने इकडे चकरा मारायला लागतात. त्यानंतरही त्यांना त्यांचे हक्क मिळत नाही. नौकरीचा विषय तर लांबच राहीला, परंतु त्यांना महापालिकेकडून जो बेनिफिट मिळायला पाहीजे तो निफिट मिळत नाही. या बाबतीमध्ये आपण त्या विषयाची जरा दखल घ्यावी.

<u>आयुक्त, डॉ. सुधाकर शिंदे:–</u> ओळख करून देण्याची ही जी संकल्पना आहे की, नवनिर्वाचित सदस्यांना ओळख करून दया. बाकीच्याची खुप जास्त ओळख आहे. त्याच्यावरती जास्त वेळ वाया नको जायला पाहीजे, नविन सन्माननिय सदस्यांनी केली तर ठिक आहे, बाकीच्याची जुनी ओळख, पाळख काढण्याची वेळ नाही. आपल्याला नंतर ती काढता येईल.

<u>शहर अभियंता, श्री. राम जैसवार:–</u> मा. महापौर मॅडम, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, सन्माननिय उपस्थित सदस्य, उपस्थित सर्व पत्रकार बंधू, माझे सर्व सहकारी, मी राम जेसवार, माझ्याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे चार्ज आहे. आमच्याकडे चार प्रभाग आहेत, त्यामध्ये चार इंजिनियर आहेत. माझ्याकडे उल्हासनगर मधील सर्व रस्त्यांचे, उल्हासनगर महानगरपालिकेतील इमारतींचे, तसेच पुलाचे तसेच इतर सर्व जे छोटे मोठे कामे आहेत, सी.सी.ड्रेनेज, नाले, रिटेनिंग वाल, सिडी वर्क इत्यादी विविध प्रकारचे काम आमच्या विभागामार्फत होतात. सध्या रस्त्याच्या बाबतीत ब–याच सन्माननिय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला होता. रस्त्यांच्या पाटोलचे काय? सरासरी बघितले तर जे रस्ते आम्ही मागच्या पावसाळयात केलेले आहेत. त्या रस्त्यांवर अजून पर्यंत कुठलेही खड्डे पडलेले नाहीत.

<u>सदस्य, श्री. विजय पाटील:–</u> जेसवार साहेब, जेवढे सांगितले आहे, तेवढेच बोला, मी पत्र दिलेले आहे. तीन तीन पत्र दिले आहे, किती खड्डे आहेत. खड्डयाचे नका बोलू आपल्याला जेवढे सांगितले आहे, तेवढे बोला.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव</u>:– त्यांनी फक्त सार्वजनिक बांधकाम विभागा बद्दलच सांगितले आहे, शहर अभियंता म्हणून पाणी पुरवठा विभागाचे काहीच काम नाही का?

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> पाणी पुरवठयाच्या बाबत ते नाही बोलतात, त्यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाच आहत, तर इतर एस्टीमेट आहेत, पाणी पुरवठयाच्या बाबतीत त्यावरती त्यांच्या सहया कशा असतात. थोडीशी जबाबदारी टाळण्यासारखे वाटते.

<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:—</u> शहर अभियंत्याची व्याख्या कळली पाहीजे, शहर अभियंता म्हणजे फक्त सार्वजनिक बांधकाम विभागाशीच संबंधित आहे का? शहर अभियंत्यांची व्याख्या कळू दया आम्हांला.

<u>शहर अभियंता, श्री. राम जेसवार:—</u> माझा मोबाईल क्रमांक लिहून घ्या.

<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:—</u> आयुक्त साहेब आम्हांला शहर अभियंत्याची व्याख्या तर कळू दया. फक्त सार्वजनिक बांधकाम विभागाशीच संबंधित आहे का? पाण्याशी संबंधित नाही का?

<u>आयुक्त, डॉ. सुधाकर शिंदे:—</u> कृपया करून आपण त्यांचे नंबर घ्या. बाकीचे त्यांच्या ऑफिसमध्ये जाऊन विचारा.

<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:—</u> त्यांच्याशी बोलतांना फक्त सार्वजनिक बांधकाम विभागा बद्दलच बोलायचे का, बाकीच्या विभागां बद्दल बोलायचे नाही का?

<u>सदस्य, श्री. विजय पाटील:—</u> साहेब, तुम्ही फक्त टाईमपास चालवला आहे, टाईमपास चाललेला आहे तुमचा.

<u>आयुक्त, डॉ. सुधाकर शिंदे:—</u> मुख्य अभियंत्याची व्याख्या महानगरपालिका अधिनियमात खुप विस्तृतपणे दिलेली आहे. मुख्य अभियंत्याकडे सर्व साधारणपणे शहरातील सर्व अभियांत्रिकी विभागांच्या विकास कामाच्या अभियांत्रिकी विभागाच्या ज्या फाईल जातात ते सर्वात सिनियर इंजिनियर असतात. प्रत्येक विभागाचे डे टूडे ॲडमिनिस्ट्रेशन त्या त्या विभागातून होते. परंतु सर्वात सिनियर इंजिनियर असल्यामुळे महत्वाचे कागदाचे एस्टीमेट असतील, काही प्रप्रोजल असतील, डी.पी.आर. असतील त्याच्यामध्ये ते सिनियर व्यक्ती म्हणून त्यांची सही असते. मला वाटते एवढे डिटेलमध्ये जाण्याचे काही कारण नाही. मला वाटते कारण आपण त्यांची ओळख पटवून घेत आहे. नंतर जे विषय असतील स्पैसिफीक त्याच्यावर चर्चा करू.

<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:—</u> जेसवार साहेबांनी त्यांची ओळख फक्त सार्वजनिक बांधकाम विभागा पुरतीच करून दिलेली आहे.

<u>आयुक्त, डॉ. सुधाकर शिंदे:—</u> सन्माननिय सदस्यांना पुन्हा एकदा विनंती आहे की, नवनिर्वाचित सदस्यांना अधिका—याची ओळख पटवून देण्यासाठी लक्ष केंद्रीत करावे. आपली जुनी ओळख जास्त घनिष्ठ करण्या पेक्षा नविन लोकांची ओळख होऊ दया.

<u>सदस्य, श्री. रविंद्र बागुल:—</u> आयुक्त साहेब आम्ही नविन लोक आहेत तर आम्हांला नंबर पाहीजेत. साहेब आम्ही नविन आहोत तर उप आयुक्त कोण आहेत, तर आम्हांला नंबर पाहीजेत.

<u>आयुक्त, डॉ. सुधाकर शिंदे:—</u> त्यामुळेच मी पुन्हा एकदा सांगतो की, आपल्या सारखे नवनिर्वाचित सदस्यांना त्यांची ओळख होणे जास्त गरज आहे. त्याच्यामुळे मी त्यांना परत एकदा नंबर सांगायला लावतो. नाहीतर आपण कृपया आपल्या हाताने नंबर नोंद करून घ्या.

<u>सदस्य, श्री. रविंद्र बागुल:—</u> आम्ही ऐकले तरी आम्ही लिहून घेऊ साहेब.

<u>शहर अभियंता, श्री. राम जेसवार:—</u> माझा नंबर लिहून घ्या ९९८७१७७३४५

<u>सदस्य, श्री. रविंद्र बागुल:—</u> जेसवार साहेब मी एक विनंती करतो की, आमचा फोन जर कधी आला तर उचलत जा.

<u>कार्यकारी अभियतंता, श्री. एस. के. सेलवन:—</u> मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य माझे नाव एस. के. सेलवन, माझ्याकडे पाणी पुरवठा विभागाचे प्र. कार्यकारी अभियंता पदभार आहे

आणि माझ्याकडे मलनि:सारण विभागाचे पण चार्ज आहे. पाणी पुरवठा विभागाचे दोन उप विभाग आहेत, कॅम्प नंबर १,२,३, उप विभाग आहे. कॅम्प नंकर ४ करिता एक उप विभाग आहे. तिकडे प्रत्येक ठिकाणी एक उप अभियंता काम करत आहेत आणि त्या प्रत्येक उप विभागामध्ये १,२,३ करीता दोन शाखा अभियंता आहेत. म्हणजे चार पाच करीता तीन सेक्शन इंजिनियर आहेत आणि बाकी पाणी पुरवठा विभागा बद्दल ज्या तक्रारी येतात, त्यांचे निवारण करणे व उप विभागा नियंत्रण ठेऊन कामे केली जातात. पाणी पुरवठा विभाग आणि मलनि:सारण विभागाचे काम, दैनंदिन काम आणि प्रकल्पाचे काम आम्ही करतो. माझा नंबर लिहून घ्या, ९०९६४८५४००.

<u>आयुक्त, डॉ. सुधाकर शिंदे:—</u> आदरणीय महापौर महोदयांच्या परवानगीने मी दोन शब्द बोलू इच्छितो, सन्माननिय सदस्यांना माझी नम्र विनंती आहे. आपण या सर्वाच्च सभागृहाचे सन्माननिय सदस्य अहात. महानगरपालिकेचे कामकाज चालवतांना सन्माननिय सदस्यां बरोबरच प्रशासनाचे सर्व अधिकारी आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उप आयुक्त, सर्व विभागांचे विभाग प्रमुख आपापल्या परीने जीव काढून काम करत असतात. मला वाटते की, सभागृहाचे गार्भिय सभागृहाच्या सन्मानाला विचारात ठेवून अधिकारी ज्या वेळेस त्यांची ओळख करून देत आहेत. तेव्हा कुठे कोणाच्या सन्मानाला ठेच पोहचणार नाही. सभागृहाचे डेकोरेन मेन्टेन राहील. याची काळजी घेऊन कृपया सर्व सन्माननिय सदस्यांनी अधिका—यांची ओळख करून घ्यावी. जर ते आवश्यक वाटत नसेल तर सन्माननिय सदस्यांनी ते महापौरांच्या निदर्शनास आणून दयावे. आपण जी ओळख करून देण्याचा कार्यक्रम स्थगित करू. परंतु सर्व सभागृहाच्या सन्माननिय सदस्यांना माझी विनंती आहे, सर्व अधिकारी आपापल्या परीने रात्र आणि दिवस शहराच्या सेवेसाठी/विकासासाठी काम करीत आहेत. आणि ते आपल्या पुढे पाच वर्षातून एकदाच ओळख करून देण्यासाठी येत आहेत. तर त्यांची ओळख आपण तशी आवश्यकता नसेल तर सन्माननिय सदस्यांनी पिठासिन अधिका—यांना सांगावे, आपण हा कार्यक्रम रद्द करून दुसरा विषय घेऊ. परंतु कृपया करून आपण सर्व अधिका—यांना सन्माननिय सदस्य चांगली वागणूक देत अहोत. त्यांचा मानसन्मान ठेवून आपण सभागृहाचे कामकाज चालवतो. तेही सभागृहाचे एक अविभाग्य भाग आहेत. तर तेही मानसन्मान ठेवून काही कोणाचा वैयक्तिक आक्षेप असेल तर तो त्यांनी नोंदवावा. माझ्या दालनात येऊन त्याच्या विषयी जर काही बोलणे असेल तर ते करावे. परंतु सभागृहाचे डेकोरन मेन्टेन करून ओळख पटविणे चालू ठेवावे.

<u>मुख्य लेखाधिकारी, श्री. दादा पाटील:—</u> सन्माननिय महापौर महोदया, सन्माननिय उप महापौर साहेब, सन्माननिय आयुक्त साहेब, सन्माननिय सर्व सदस्य, मी दादासाहेब पाटील, मुख्य लेखावित्त अधिकारी, उल्हसनगर महानगरपालिका माझ्याकडे पुर्ण लेखा विभागाचा पदभार आहे. त्याच्यामध्ये प्राधान्य क्रमाने आमच्या लेखा विभागाकडून पुर्ण वर्षाचे अंदाज पत्रक तयार करणे, त्या नंतर सर्व प्रकारेचे, सर्व विभागाचे जे इन्स्ट्रमेंट असतील सार्वजनिक बांधकाम असेल, पाणी पुरवठा असेल, विद्युत विभाग असेल आणि महीला व बालकल्याण विभागाचे प्रस्ताव असतील, या सर्व विभागांचे जे प्रस्ताव असतील त्या प्रस्तावाची छानणी करणे, त्याच्यामध्ये जे अंदाज पत्रकाची तरतुद पाहूण नंतर ते मा. आयुक्ताकडे सादर केले जाते. दुसरी गोष्ट मी गेली साडे तीन वर्षे या महापालिकेत काम करत आहे. पुर्ण जी रस्त्याची बिले आहेत, इलेक्ट्रीक बिले आहेत ती आपण महीन्याला भरतो. या साडे तीन वर्षाच्या कालावधीमध्ये एकाही बिलाला दंड आज पर्यंत आकारला गेलेला नाही आणि ती विहीत वेळेमध्ये भरलेली आहेत. त्याच बरोबर माझ्याकडे दुसरा पदभार कर विभागाचा आहे. तर कर विभागामध्ये आम्ही या वर्षी ९० कोटी ५४ लाख रूपये कर वसुली केलेली आहे. लेखा विभागा विषयी व कर विभागा विषयी जर काही अडचणी असतील तर आपण माझ्याशी संपर्क करू शकतात. माझा दुरध्वनी क्रमांक आहे, ९०९६६८८८८४.

<u>प्र.वैद्यकिय आरोग्य अधिकारी, डॉ. राजा रिझवानी:—</u> मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, महापालिका सचिव, माझे नाव डॉ. राजा रिझवानी, वैद्यकिय आरोग्य अधिकारी, माझ्याकडे जन्म—मुंत्यु विभाग, बायो मेडिकल्स रेस्ट, सोनोग्राफी सेंटरचे रिचस्टेशन, डॉग स्ट्रलायजेशन जे आम्ही प्रोसेस करतात त्याचे माझ्याकडे चार्ज आहे. माझा मोबाईल नंबर आहे, ८४११००११२३, धन्यवाद.

<u>मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंत:—</u> मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब आणि सन्माननिय सदस्य माझे नाव सौ. विशाखा सावंत, माझ्याकडे मालमत्ता विभागाचे चार्ज आहे आणि मालमत्ता व्यवस्थापक म्हणून काम पाहत आहे. मालमत्तेमध्ये सर्वसाधारण सार्वजनिक मालमत्ता, उदा. उद्याने, मोकळया जागा, समाज मंदीर, शौचालय इत्यादीचे व्यवस्थापन करणे आणि त्याचे विनियोग करणे हे काम आमच्या विभागाकडे आहे. माझा दुरध्वनी क्रमांक ८४११००११४४.

<u>सहा, आयुक्त, प्र.सं.क्र. १, श्रीम. अलका पवार:—</u> मा. महापौर, मा. आयुक्त, इतर सर्व सन्माननिय सदस्य, मी अलका पवार, प्रभाग समिती क्र.१ चे प्र. सहा. आयुक्तचे चार्ज माझ्याकडे देण्यात आलेले आहे. मी २९ मार्चला चार्ज स्विकारलेला आहे, मला वाटते वीस दिवस होतात. माझ्याकडे अनधिकृत बांधकाम संबधिच्या ज्या तक्रारी येतात, त्यांच्यावर कारवाई करणे, इतर शासकिय कामांची माहीती असते ती देणे. अनधिकृत फलक, होर्डिग जे लावले जातात ते काढले जातात. माझा मोबाईल नंबर आहे, ९६६५११८८५१.

<u>उप लेखा परिक्षक, श्री. विनायक फासे:—</u> सन्माननिय महोदया महापौर मॅडम, उप महापौर साहेब, आयुक्त साहेब, आणि सर्व सन्माननिय सदस्य आणि पत्रकार बंधू, मी विनायक फासे, मी इथे उप लेखा परिक्षक म्हणून ऑडिट विभागात, ४ ऑगस्ट, २०१६ ला हजर झालेलो आहे. लेखा परिक्षण विभागामध्ये लेखा परिक्षण विभागाच्या ज्या काही नस्त्या आणि फाईल्स असतात, त्या पुर्नर्निरीक्षणासाठी आमच्याकडे येतात, आमचे विभाग प्रमुख मुख्य लेखा परिक्षक आहेत आणि त्यांना सहाय्यक म्हणून मी उप लेखा परिक्षक आहे. याच बरोबर पद—पथाचे सहा. आयुक्त, समन्वयक अशी जबाबदारी माझ्याकडे दिलेली आहे. त्याच बरोबर सहा. आयुक्त, आधार आणि जनगणना या विभागाशी जर काही संबंधित असेल तर मी नंबर देतो, त्याच्यावर तुम्ही संपर्क करू शकतात, ७७७००२५४४६, धन्यवाद.

<u>प्र. अग्निशमन अधिकारी, श्री. भास्कर मिरपगार:—</u> मा. महापौर महोदया, मा. उप महापौर महोदय, मा. आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, मी भास्कर तानाजी मिरपगार, प्र. अग्निशमन दल प्रमुख मानव निर्मित, निसर्ग निर्मित, आपात्तींना सामोरे जाणे हे माझ्या विभागाचे काम आहे. आगी सारख्या दुर्घटना झाल्यास त्या ठिकाणी तात्काळ पोहचणे व ते विझवणे विमोचन कार्य करणे माझ्या विभागाचे काम आहे. माझा फोन नंबर आहे, ८४११००६९९४.

<u>प्र, मुख्य सुरक्षा अधिकारी, श्री. बाळू नेटके:—</u> माझे नाव बाळू बन्सी नेटके, मी उप मुख्य अग्निशमन अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका माझ्याकडे गेल्या वीस वर्षे फायर फायटींग फस्डऐड कंन्ट्रोल कम्युनिकेशन, डिझार्टमेट मॅनेजमेंट अर्थकनीक न्युकलिअर बायोलॉजिक्स केमिकल, वॉटर रेस्क्युस फायर ऑफिसर स्टेशन ऑफिसर, डिव्हीजनल ऑफिसर, डिप्लोमा फायर इंजिनियरींग ॲडव्हॉन्स डिप्लोमा फायर इंजिनियरींग एवढ सर्व केले असता मला फायर ब्रिगेडमध्ये काडीचे सुध्दा काम नाही. मला आज सतरामदास जेसवानी साहेबांनी जी सुचना आणली आणि बोडारे साहेबांनी सांगितले की ओळख करून दया, त्यामुळे मला खरोखरच अभिमान वाटतो. मी आयुक्त साहेबांना सांगणार परंतु हे सगळ शासनाला व प्रशासनाला माहीत झालेले आहे की फायर ब्रिगेडमध्ये बाळू नेटकेसाठी एवढे प्रशिक्षण मी माझ्या आयुष्यामध्ये प्रशिक्षणासाठी बरासचा पैसा खर्च केले आहे. संपुर्ण भारतात मी प्रशिक्षण केलेले आहे. मला कुठलही फायर ब्रिगेडध्ये काडीचे काम नाही. मी मिरपगाार साहेबांना मी तुमच्या सगळयाच्या समोर दाखवून देतो. त्यामुळे मी क्रिडा विभागात आणि सुरक्षा विभागात मजबुरीने काम करत आहे. तरी सुध्दा नगरसेवकांचे फोन मलाच येतात आणि मी धडक कारवाई करत असतो. माझा फोन नंबर घ्या क्रिडा विभागाचे काम असो, फायर ब्रिगेडचे काम असो, याच्या व्यतिरिक्त काहीही काम असो मला अर्ध्या रात्री फोन करा मी लगेच पोहचेल. ८४११००६९९५, धन्यवाद.

<u>सहा.मुख्य लेखा परिक्षक, श्री. अशोक जाधव:—</u> सन्माननिय महापौर, उप महापौर, मा. आयुक्त साहेब आणि सन्माननिय सर्व सदस्य माझे नाव अशोक जाधव आहे. माझ्याकडे सध्याला सहा. मुख्य लेखा परिक्षक विभागात, सहा. मुख्य लेखा परिक्षक म्हणून, तसेच सहा. आयुक्त वाहन विभाग आणि सहा. आयुक्त प्रकल्प विभाग, सध्या प्रकल्प विभागात मा. पंतप्रधान आवास योजनेचे माझ्याकडे जबाबदारीचे काम आहे. सध्या ती मी राबवतत आहे. माझ्या विभागाशी काहीही तक्रार असल्यास तरी कृपया माझ्या या मोबाईलवर संपर्क करावा. माझा नंबर आहे, ९८६९३३४२४५, धन्यवाद.

<u>आयुक्त, डॉ. सुधाकर शिंदे:—</u> माझे सर्व अधिका—यांना आदेश आहेत, आपण फक्त ओळखच करून दयावी, बाकीचे काही म्हणणे असतील तर आयुक्तांच्या दालनात येऊन करावे. ही महासभा हे काय व्यासपीठ नाही, अशा गोष्टी सांगण्याचे. शॉर्टमध्ये संक्षिप्तमध्ये आपली ओळख करून दयावी.

<u>प्र, मुख्य स्वच्छता निरीक्षक, श्री. एकनाथ पवार:—</u> मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त, दालनातील सर्व सदस्य मी एकनाथ पवार, आरोग्या विभागात गेल्या सात वर्षापासून प्र. स्वच्छता निरीक्षक म्हणून मी कार्यरत आहेत. माझा मोबाईल नंबर आहे, ८४११००६९५७, धन्यवाद.

**<u>प्र, वाहन व्यवस्थापक, श्री. यशवंत सगळे:—</u>** मी यशवंत सगळे, माझ्याकडे प्र. वाहन व्यवस्थापक पदाचा कार्यभार आहे. वाहन विभागामध्ये एकुण ५२ गाडया आहेत, त्यांच्या मेन्टेनसचे काम मी बघत असतो. माझा मोबाईल नंतर आहे, ८६५२२२४८२५, धन्यवाद.

**<u>प्र, सहा. आयुक्त, श्री.दत्तात्र्य जाधव:—</u>** मा. महापौर, मा. उप महापौर, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य मी दत्तात्र्य जाधव प्रभाग समिती क्र. ३ मध्ये सहा. आयुक्त म्हणून पंधरा दिवसा पासून चार्ज घेतला आहे. माझा मोबाईल नंबर आहे, ९९२२७८३५३९, धन्यवाद.

**<u>प्र, सहा,आयुक्त, श्री. अजित गोवारी:—</u>** सन्माननिय महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, सर्व सन्माननिय सदस्य, माझे नाव अजित रत्ना गवारी, माझ्याकडे प्रभाग समिती क्र.३ चे प्र. सहा. आयुक्तचे चार्ज आहे. ८४११००११३६, धन्यवाद.

**<u>सहा.आयुक्त, श्री. बालाजी लोंढे:—</u>** सन्माननिय महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब आणि उपस्थित सर्व सन्माननिय सदस्य, माझे नाव बालाजी लोंढे, शिक्षण मंडळाचे सहा. आयुक्त, आपत्ती व्यवस्थापन, विधी विभाग या विभागाचे माझ्याकडे चार्ज आहे. माझा मोबाईल नंबर आहे, ९९२३०९१३७४.

**<u>सहा.आयुक्त, श्री. नंदू समतानी:—</u>** मा. महापौर, उप महापौर, मा. आयुक्त, सन्माननिय सदस्य, माझे नाव एन. एस.समतांनी मला सहा. आयुक्त म्हणून एल. बी.टी. मध्ये चार्ज दिलेला आहे. स्वच्छ भारत अभियान आणि पाणिपुरवठा विभागाचे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. माझा मोबाईल नंबर आहे, ८४११००११४१.

**<u>कनिष्ठ अभियंता, श्री. संतोष लोणे:—</u>** मा. महापौर, मा. उप महापौर. मा. आयुक्त, सर्व सन्माननिय सदस्य, मी संतोष लोणे, नागरीक सुविधा केंद्र या विभागामध्ये कनिष्ठ अभियंता या पदावर कार्यरत आहे. नागरीकांना ज्या सेवा ई—गर्व्हनरच्या माध्यमातून सेवा पुरवल्या जातात. त्याच्या जास्तीत जास्त संगणक प्रणाली आणि हार्डवेरचे मेन्टेंन्स आणि जास्तीत जास्त प्रणाली राबविण्यासाठी त्याचा या माध्यमातून कार्यरत आहे. ८४११००७०००.
नागरीक सुविधा केंद्र या विभागामध्ये कार्यरत आहे.

**<u>कनिष्ठ अभियंता, श्री. महेंद्र धिंडे:—</u>** मा. महापौर मॅडम, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, मी महेंद्र धिंडे कनिष्ठ अभियंता म्हणून विद्युत विभागामध्ये कार्यरत आहे, विद्युत विभागाचे कार्य आहे, शहरात नविन दिवा बत्तीची लावणे आणि त्याची निगा राखणे ८४११००६९८०.

**<u>सदस्य, श्री. रमेश चव्हाण:—</u>** मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, आयुक्त साहेब माझे म्हणणे आहे की, संबधित डिपार्टमेंटचे सर्व अधिकारी आहेत का? आमचा मागचा अनुभव तुम्हांला सांगतो. सभागृहामध्ये उत्तर दयायला अधिकरीच नसायचे, आता पण नगररचनाकार विभागाचे अधिकारी नाहीत.

**<u>आयुक्त, डॉ. सुधाकर शिंदे:—</u>** सन्माननिय सदस्यांना मला सांगावसे वाटते की, बरेच अधिकारी निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये पनवेल महानगरपालिकेत काम करीत आहेत. काही अधिकारी त्यांच्या वार्षिक ब—याच दिवसा पुर्वी त्यांच्या सुट्टया मंजूर झालेल्या आहेत, तर ते सुट्टीवर गेलेले आहेत. मला वाटते की, महापालिकेत उपस्थित असलेले सर्व जबाबदार अधिकारी इथे उपस्थित आहेत आणि या पुढे आपण दक्षता घेऊ की पुढच्या वेळी जास्तीत जास्त अधिकारी जीबीच्या दिवशी उपस्थित असतील आणि सभागृहामध्ये सर्व संबंधित प्रश्नाचे उत्तरे देतील.

**<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>** सर्वच अधिका—यांनी आपल्याला ओळख करून दिलेली आहे. त्यामध्ये बाळू नेटके यांनी जी खंत व्यक्त केली, खरोखरच असे अधिकारी असतील त्यांच्यावर काय अन्याय होतो, यासाठी आयुक्त साहेबांनी स्वत: लक्ष घालून, जर अन्याय होत असे, तो अन्याय दुर केला पाहीजे. त्यांची खंत त्यांनी स्टेजवर बोलून दाखवली ही प्रशासना साठी दुर्देवी बाब आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> मी त्यांचे जवळून काम पाहीले आहे आणि चांगला अधिकारी बाजुला रहाणे म्हणजे प्रशासनाची जास्तीत जास्त नामुष्की त्यामुळे ओढवते. कृपया प्रशासनाने या गोष्टीकडे जास्त गांर्भियाने लक्ष दयावे.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> आता ओळख झाली, काही विभागाच्या कामकाजाच्या पध्दती, त्यातील एक विभागाचे मी विचारले होते, त्याबाबतीत काय? कारवाई काय झाली? जर मंजूर नसतांना ती कामे चालू आहेत. या महापालिका इमारती मध्येच, नसतील तर ती चांगली गोष्ट आहे. असतील तर तुमच्या माहीतीसाठी मंजूर आहेत का? आणि मंजूर नसतील तर कामे कशी चालू आहेत. कोणाच्या आदेशाने चालू आहेत ती, जर मंजूर नसतील बेकायदेशिर असतील तर कारवाई काय?

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> मा. महापौरजी रस्याच्या विषयी मी सांगितले होते की, किती दिवसात ऑर्डर मिळेल, काम कधी चालू होईल.

<u>आयुक्त, डॉ. सुधाकर शिंदे:—</u> सन्माननिय सदस्यांनी विस्तृत विषयां विषयी, जवळ जवळ सगळयानीच ही लक्षवेधी विचारली आहे. तर त्या पैकी जो महत्वाचा मुद्दा आहे, त्या पत्रानुसार सुरूवातीला आपण चर्चा करू. आपल्या महानगरपालिकेच्या परिक्षेत्रामध्ये जेवढा कचरा जेनरेट होतो. तो सर्व कचरा आता नव्याने सुरू करण्यात आलेल्या डंपिंग ग्रांऊंड वरती तो डव केला जातो. शहरामध्ये हा कचरा उचलण्यासाठी काही महीन्या पुर्वी महानगरपालिकेने ठेकेदाराची नेमणूक केली आहे. ही बाब मला निदर्शनास आणून दयावीशी वाटते. त्या ठेकेदाराशी झालेल्या करार नाम्यानुसार महानगरपालिकेच्या क्षेत्रामधले सर्व सुका कचरा आणि त्या कच—याचे सोर्श वरती करणे त्या सोर्श वरती केल्या नंतर डोअर टू डोअर कलेक्शन करणे, घंटा गाडीद्वारे गोळा करणे ही ठेकेदाराची जबाबदारी आहे. त्या अनुषंगाने मी मागच्या आठ दहा दिवसा पुर्वी याचा आढावा घेतला अशा प्रकारे करारंनाम्याच्या अटी शर्तीनुसार पुर्णपणे कामकाज होत नाही. अशी प्रशासनाला माहीती कळाली, त्या अनुषंगाने ही प्रक्रिया काय आहे आणि हे असे का होत आहे. यामध्ये जसे एम. एच. डब्ल्यु. २०१६ उल्हासनगर महानगरपालिका, जे केंद्र शासनाचे अधिनियम आहेत. त्या अधिनियमाच्या अनुषंगानेच आपल्याला घनकच—याचे व्यवस्थापन करणे, बंधनकारक आहे. त्यामध्ये कच—याचे वर्गीकरण सोर्शला करणे, ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे. त्या अनुषंगाने आपण ठेकेदार नेमलेला आहे. परंतु काही नागरीकांच्या पातळी वरती ब—याच ठिकाणी मोबीलायझेशन होत नाही. काही ठिकाणी प्रशासनाच्या पातळीवर एक मत होत नाही. काही ठिकाणी ठेकेदाराच्या पातळीवर या करारंनाम्याचे पालन होत नाही. ही वस्तुस्थिती आहे, त्या अनुषंगाने मी मागच्या आठवडयात सर्व गटनेत्यांची तातडीची बैठक घेतली होती. आपल्या महानगरपालिकेमध्ये डंपिंग ग्राऊंडचा जो प्रश्न आहे. तो प्रश्न सोडवण्यासाठी कच—याचे वर्गीकरण करून त्या वर्गीकरण केलेल्या कच—याचे डीसेंटरलाईज पध्दतीने प्रोसेसिंग करणे, हा एकमेव उपाय आहे. या शहराच्या डंपिंग ग्राऊंडच्या समस्या सोडविण्यासाठी त्याच बरोबर शहरामध्ये उत्पन्न होणार. ओला कचरा व सुका कचरा त्याचे सुव्यवस्थापन करणेसाठी त्या अनुषंगाने आपल्याला नागरीकांची खुप मोठया प्रमाणात मानसिकता बदलावी लागेल. त्यासाठी आपल्यला एक राष्ट्रीय स्तरावरती एक कन्सल्टंट नेमावे लागेल, तो कन्सल्टंट आपल्याला, नागरीकांना मोटीवेशन करणे, त्याची ॲडोटाईझमेंट करणे, जर गरज पडली तर शहराला एखादा ॲबेसिडर हायर करून नागरीकांमध्ये त्याची जनजागृती करणे, त्या नंतर तो कचरा कुठे कसा व्यवस्थापन करायचा विकेंद्रीकरण करून, म्हणजे प्रभाग समितीच्या स्तरावरती किंवा काही पॅनलच्या स्तरावरती, काही वार्डच्या स्तरावरती त्या कच—याचे कसे व्यवस्थापन करण्यात येईल. यासाठी एक डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट एक प्रस्ताव तयार करण्यासाठी आपल्याला राष्ट्रीय स्तरावरचा एक कन्सल्टंट नेमावा लागणार आहे. मी शासनामध्ये काम करत असतांना ब—याच महानगरपालिकेने ते नेमून त्याची अंमलबजावणी केलेली आहे. आपल्याला सुध्दा अशा प्रकारचा कन्सल्टंट नेमून त्या कन्सल्टंटद्वारे एक टेक्नीकल रिपोर्ट घेऊन त्या अनुषंगाने कारवाई करावी लागेल. हा प्रश्न तात्काळ सोडवण्यासाठी आपल्याला डंपिंग ग्रांऊंडवर ज्या चिंध्या जातात, आपल्या महानगरपालिके मधील क्रिटीकल प्रश्न आहे की, ओल्या कच—यामुळे प्रत्येक डंपिंग ग्राऊंडला देशात सगळीकडे कुठेतरी मिथेल वायुमुळे काही ज्वालाग्रही वायु तयार झाल्यामुळे त्याच्या मध्ये जे कच—याचे विघटन होते, त्या विघटनातून ज्वालाग्रही वायु तयार होतात आणि त्यामुळे डंपिंग ग्राऊंडला आग लागणे, देशामध्ये सगळीकडे ही परिस्थिती काही प्रमाणात निर्माण होते. आपण मागेच मुंबई महानगरपालिकेचा डंपिंग ग्राऊंडचा आगीचा प्रश्न आपण वर्तमान पत्रामधून, न्युज वाहीन्यांवरून आपण अनुभवले आहे. त्या अनुषंगाने आपल्या शहरामध्ये चिंध्या असल्यामुळे ती आग मोठया प्रमाणात पेटते, आणि त्या कोरडया चिंध्या येतात. त्यामुळे ती आग धूमसून धुमसून कुठेतरी जास्त होते, त्याच्यामध्ये तो ओला कचरा आल्यामुळे त्याच्यातून धूर मोठया प्रमाणात निर्माण होतो. कुठे तरी आपल्याला हया चिंध्या डंपिंग ग्राऊंड पर्यंत न पोहचता कुठेतरी वेगळया प्रकारे त्याची शहरामध्ये विल्हेवाट लावली गेली पाहीजे किंवा डंपिंग ग्राऊंडला आल्या नंतर त्यासाठी

सेप्रेट डंपिंग ग्राऊंड, वेगळी व्यवस्था केली पाहीजे. त्या अनुषंगाने आम्ही मागच्या आठवडयातच एका राष्ट्रीय स्तरावरच्या कन्सल्टशी चर्चा केली आहे. त्या कन्सल्टंटच्या सांगण्यानुसार आणि एम.एच.डब्ल्युमध्येच जर आपली महानगरपालिका असेल त्याच्या पन्नास किलो मिटरच्या क्षेत्रामध्य कुठेही इंडष्स्ट्रीमध्ये बॉयलर जर असतील. तर त्या बॉयलरला लागणारे जे इंधन आहे, ते इंधन महापालिकेच्या नियमुनसार ५ टक्के वेस्ट इंधन वापरणे त्यांच्यावर बंधनकारक आहे. सुदैवाने आपल्याकडेच मोठी इंडस्ट्रीज आहे, एम. आय.डी.सी. इंडस्ट्रिज आहे. खुप कंपन्याचे बॉयलर आहेत. त्यामुळे पुढच्या आठवडयामध्ये त्यांच्याशीही बोलणार अहोत. आपल्याकडे ज्या चिंध्या येतात, त्या डंपिंग ग्राऊंडवर न येता, त्या परस्पर गोळा करून दोन रूपये त्या लोकांना पण मिळतील, महानगरपालिकेची आपले जे डंपिंग ग्राऊंड आहे, त्याच्यावर दहा वर्षे चिंधी टाकून टिकणार आहे. तर ते कमीत कमी पंचवीस, तीस वर्षा पर्यंत चालेल. आपल्या कचरा पेटीत खुप मोठा भाग हा चिंध्याचा आहे आणि या चिंध्या असणे म्हणजे त्या कुजणे, त्याच्यातून वास येणे, इनफेक्शन होणे या प्रकारचे प्रकार घडतात. ही आपल्यासाठी आवश्यक आहे तर आपल्या प्रत्येक नगरसेवकांच्या स्तरावर जिथे जिथे आपल्या वार्डामध्ये असे बिझणेस चालू असतील, टी शर्ट असेल जिथे चिंध्या निर्माण होतत. तरी कृपया सर्व व्यापा—यांना विश्वासात घेऊन त्यांना या आपल्या कार्यक्रमामध्ये सहभागी करून घ्या. त्यासाठी काही टेकनिकल असिस्टं लागेल त्या संदर्भात महानगरपालिका सहकार्य करेल. विशेषत: पाच नंबर मध्ये जेथे मोठया प्रमाणावर जिन्स कारखाने आहेत. तिथे मी परवाच, आमच्या प्रशासनाने व्यापा—यांची बैठक घेऊन व्यापा—यांचा हा दृष्टीकोन प्रचंड सकारात्मक आहे. त्यांना फक्त आपण काही तरी सांगण्याची गरज आहे आणि त्यांची पण सकारात्मक भुमिका आहे. यात कम्युनिकेशन गॅप होतो, आपल्याला प्रॉब्लेम काय आहे तो लक्षात आला. आपण तो प्रॉब्लेम हाय लाईट केला. मी पुन्हा एकदा आपल्याला महासभेत सर्व पत्रकार बंधूचे, भगिनींचे मी आभार मानतो, की ज्यांनी ही चिंधीची समस्या सोडवण्यासाठी सर्व वर्तमान पत्रातून नागरीका पर्यंत पोहचविली आहे. आता कुठे तरी सभागृहाची आणि प्रशासनाची जबाबदारी आहे, त्यांनी या कच—याचे सोर्शमध्ये आपल्याकडे पुढचा प्रश्न आहे की, ओला कचरा कुठे न्यायचा, सुका कचारा कुठे न्यायचा हा प्रश्न वैगेरे वैगेरे लांब आहे. एक गोष्ट महापौर महोदयांना मला सांगावे वाटते की, आपल्या ठेकेदाराला आजच्या घडीला डोअर टू डोअर कचरा गोळा करणे आवश्यक आहे. तो त्याने घराच्या, दुकानदाराने तो वेगळा करणे बंधनकारक आहे. त्यांनी जर तातडीने तो कचरा डोअर टू डोअर गोळा केला तर कुठे तरी ती सिस्टीम बसायला सुध्दा काही वेळ लागणार आहे. ती लवकरात लवकर बसेल मला वाटते की काही तरी मी म्हणत नाही की उदयापासून लगेच होईल.मी त्यांच्याशी चर्चा करतो त्यांना मॅन पॉवर एम्पालाईड करायला लागेल. त्यांच्याकडून आपण कालबद्ध कार्यक्रम घेवू. तो कार्यक्रम घेवून तो कचरा घरोघरी घेयाची सिस्टीम करायला लागेल.त्याचबरोबर तो कचरा विघटन करायला प्रत्येक करात दोन डस्टबीन पाहीजेत.आज ते एक वापरत असतील त्यांना अजुन एक डस्टबीन दयायाच कशा प्रकारे दयायाच्या त्यासाठी काही एलजीओकडून मदत घ्यायाची का कुठल्या कंपन्याकडून सीएचआर कडून मदत घ्यायाची का महापालिकेच्या फंडातून मदत घ्यायाची त्याचा आपण विचार करू हा पुढचा भाग आहे. आज आपण ज्या कामासाठी पैसे देत आहोत कत्रांटदाराला त्या ठेकेदारकडून तातडीने डोअर टू डोअर कलेक्शन करून जेणेकरून महानगरपालिकेचे कचऱ्याचे व्यवस्थापन होणे हा पुढचा प्रश्न आहे. पण आज महानगरपालिकेच्या गल्यांगल्यामध्ये नाक्या नाक्यामध्ये ज्या कचऱ्याकुंडया आहेत त्या कचराकुंडयापासून आपण महानगरपालिका तात्काळ मुक्त करू शकतो. जे काही नंतर होईल ते नंतर होईल ते महानगरपालिकेच्या प्रोयेस एकतर आपले रस्ते अरूंद आहेत त्या रस्त्यामध्ये त्या कचराकुंडया ठेवलेल्या असतात. त्या ठेवल्यामुळे तेथील दहा पंधरा परिघामध्ये ना कोणी चालू शकते ना कोणी फुटपाथचा वापर करू शकतो. आपल्यापुढे आता महत्वाचा टास्क आहे लवकरात लवकर डोअर टू डोअर गोळा करून घ्यायाचा तो ओला कचरा नंतर होईल तो भाग वेगळा आजच्या घडीला तो करून घ्यायाचा आजच्या घडीला तो ताबडतोब चिंधीचे व्यवस्थापन हे डिसेंट्लाइझ पध्दतीतुन करून घ्यायाचे महानगरपालिकेच्या परिसरात चिंधी पाठवायची हा प्रश्न आपण हे जर सर्वांनी इ पी आर ऑल द सेम पेज आपण हया सगळया आपल्या व्हिजनला जर सगळे एकत्रपणे केले तर मला वाटते हा प्रश्न एका आठवडयाच्या आत सुटेल. परंतु याला प्रशासनाची सन्मा. सदस्यांची त्याबरोबर सर्व पत्रकार बंधु भंगीनीची गरज भासणार आहे. तर आपण या आठवडयात हा प्रश्न लवकरात लवकर सोडवायचा प्रयत्न करू आणि मला पुर्ण आशा आहे की हा प्रश्न सुटेल. यामध्ये या सभागृहाच्या सन्मानीय सदस्यांनी खूप ॲक्टीवली आम्हाला प्रशासनाला सहकार्य केले आहे, मार्गदर्शन केले आहे. रात्री आपरात्री त्या डंम्पीग ग्राउंडला व्हिजीट करतात आम्हाला आपडेट देत राहतात आणि त्या सन्मानिय सदस्यांनी आम्हाला सांगितले की बऱ्याच प्रमाणामध्ये धूर कमी झालेला आहे. तर हे यश फक्त सभागृहातील सर्व सदस्यांचे आणि आमच्या प्रशासनाचे काही अधिकारी यांचे आहे. ज्यांनी शनिवार, रविवार रात्री अपरात्री आठ दिवसा पासून मी ज्या सुचना केल्या होत्या, त्या सुचनांचे काटेकोरपणे पालन केले आहे आणि अजून जर सहकार्य लाभले तर आट दिवसाच्या आत हा प्रश्न निकाली निघेल. त्यानंतर डीसेंट्रलाईज प्रोसेसिंग करायचे तर प्रत्येक वार्डामध्ये ओला कच—याचे कपोस्ट खत तयार करणे किंवा तिकडून बायो गॅस तयार करणे, त्या बरोबरच आपल्या शहरामध्ये खुप हॉटेल्स व्यावसायीक आहेत. त्या हॉटेल मधील

व्यावसायीकांचा, हॉटेल मधून मोठया प्रमाणा मध्ये ओला कचरा निर्माण होतो. तर मी पनवेल महानगरपालिकेत आयुक्त असतांना आम्ही तिथे हॉटेल मध्ये जो ओला कचरा निर्माण होत होता. पनवेल शहराच्या आजूबाजूला खुप मोठया टिग्रीज होत्या, टिग्रीज म्हणजे डूक्कर फार्म हाऊस होते. तर आम्ही त्यांना कायम करून दिले, मग ते टिग्रीज फार्म मधील लोक स्वत: गाडी घेऊन यायचे आणि त्या हॉटेल मधून कचरा घेऊन जायचे. आता आपल्याला आजू बाजूला किती ट्रान्सपोर्ट आहेत ते बघायला लागेल. तर मुंबई महानगरपालिकेने अशा प्रकारचे कंपोस्ट खत तयार केलेले आहे. ते सगळे हॉटेलवाले टॅकरमध्ये त्यांचा कचरा टाकतात आणि तो काही तासाच्या आत कंपोस्ट खत तयार होते. आपण इथल्या हॉटेल व्यावसायीकांशी बोलणी करू. काही सन्माननिय सदस्य सुध्दा हॉटेल व्यावसायीक आहेत. त्यांच्या तर्फे आपण थेट युनियन पर्यंत पोहचू, त्यांच्याशी संपर्क करून त्यांच्याकडी ओला कचरा कशा प्रकारे व्यवस्थापन करता येईल ते बघू. हे करत असतांना प्रत्येक घरातील जी व्यक्ती कचरा गोळा करण्यासाठी आपल्याला मदत करेल. त्यांना इनफेटीव्ह म्हणून त्यांच्या पॉपर्टी टॅक्समध्ये आपण दोन, तीन, काही तरी पाच टक्के आपण त्यांना सवलत देऊ. जेनेकरून त्यांनी हे जे काम केले आहे, त्यासाठी आपल्याला नागरीकांचा चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळेल. हे जे आपण करू शकलो तर आज आपला मोठया प्रमाणात महानगरपालिकेचा जो खर्च होतो, महापालिकेचा कचरा उचलण्याचा तो खर्च काही अंशी कमी करू शकतो आणि तो फंड आपण डेली फंडसाठी खर्च करू शकतो. तर कचरा व्यवस्थापनासाठी मला वाटते की महापालिका प्रशासन गंभिर आहे आणि सन्माननिय सदस्यांना बरोबर घेऊन त्यांचे मार्गदर्शन घेऊन, त्यांची मदत घेऊन आपण काही तरी निश्चितपणे व्यवस्थापन करू शकतो.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> साहेब, रस्त्यांच्या वर्क ऑर्डर विषयी थोडे सांगा.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:—</u> पाण्याचे आणि रस्त्याच्या विषय पुढच्या महासभेमध्ये घेऊ.

<u>सदस्या, श्रीम. पंचम कालानी:—</u> एक विनंती आहे, सात वाजले आहेत, तर आजची मिटींग स्थगित करण्यात यावी. उद्या आपण एक तासासाठी सलग करू शकतो.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> असा नियम आहे सात वाजता मिटींग स्थगित करू शकतो, तर आता ही सभा स्थगित करण्यात येत आहे. दुस—या मिटींगच्या विषयी नंतर कळविले जाईल.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> मा. महापौर, उद्या आम्ही इथे नाहीत, तर ही सभा चार दिवसाच्या नंतर ठेवण्यात यावी.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> आपला जो हा पाण्याचा विषय आहे, तो लवकरच पुर्ण करू. पुढची मिटींग सोमवारी दुपारी २.०० वाजता.

<u>महापालिका सचिव:—</u> मा. महापौरानी, सोमवारी २.०० वाजे पर्यंत ही सभा स्थगित केली आहे. कृपया राष्ट्रगीतासाठी उभे रहावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ७.०० वाजता महापौर तथा पिठासिन अधिकारी श्रीमती मीना कुमार आयलानी यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२८/४/२०१७

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २८/४/२०१७ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

५

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक २८/४/२०१७ रोजी दुपारी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती मीना कुमार आयलानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. मीना कुमार आयलानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीम. अर्चना गोकुळ करणकाळे | ४८ | श्रीम. लिलाबाई आशान |
| ४ | श्रीम. पुजा सचिन भोईर | ४९ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| ५ | श्रीम. जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ५० | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| ६ | श्रीम. ज्योती दिलीप गायकवाड | ५१ | श्रीम. दिप्ती नविन दुधानी |
| ७ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५२ | श्रीम.ज्योती रमेश चैनानी |
| ८ | श्रीम. मीना कौर अजितसिंग लबाना | ५३ | श्रीम. कांचन अमर लुंड |
| ९ | श्रीम. पंचम उमेश कालानी | ५४ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १० | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ५५ | श्रीम. सुनिता बाबुराव बगाडे |
| ११ | श्रीम. आशा नाना बिराडे | ५६ | श्रीम.पुजाकौर श्यामसिंग लबाना |
| १२ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ५७ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| १३ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ५८ | श्रीम.अंजली चंद्रकांत साळवे |
| १४ | श्रीम. सुरेखा हनुमंत आव्हाड | ५९ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| १५ | श्री. कलवंतसिंग गुरूदेव सोहटा | ६० | श्रीम. कविता सुधिर बागुल |
| १६ | श्री. अशोक बच्चुमल छाप्रु | ६१ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| १७ | | ६२ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| १८ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ६३ | श्रीम.मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| १९ | श्रीम. रेखा अशोक ठाकुर | ६४ | श्री. विजय चाहु पाटील |
| २० | श्रीम. सरोजिनी टेकचंदानी | ६५ | श्रीम. कविता सुरेश गायकवाड |
| २१ | श्री. जया प्रकाश माखिजा | ६६ | श्री. विकास परशुराम पाटील |
| २२ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ६७ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| २३ | श्रीम. शुभांगीनी निकम | ६८ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| २४ | श्रीम. लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ६९ | श्रीम. आशा जीवन इदनानी |
| २५ | श्री. भगवान भालेराव | | |
| २६ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती | | |
| २७ | श्रीम. ज्योती प्रशांत पाटील | | |
| २८ | श्रीम. चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | | |
| २९ | श्री. राजेश नानिकराम वदरिया | | |
| ३० | श्रीम. डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | | |
| ३१ | श्रीम. दिपा नारायण पंजाबी | | |
| ३२ | श्री. अजीत प्रभुनाथ गुप्ता | | |
| ३३ | श्रीम. पुष्पा नाना बागुल | | |
| ३४ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | | |
| ३५ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | | |
| ३६ | श्रीम. इंदिरा जमनादास उदासी | | |
| ३७ | श्रीम. कविता लाल पंजाबी | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३८ | | | |
| ३९ | श्रीम. सविता प्रविण तोरणे (रगडे) | | |
| ४० | श्री. गजानन प्रल्हाद शेळगे | | |
| ४१ | श्रीम. ज्योती प्रकाश बठिजा | | |
| ४२ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) | | |
| ४३ | श्री. सुमित सागर सोनकांबळे | | |
| ४४ | श्रीम. ज्योती श्यामराव माने | | |
| ४५ | श्री. रमेश महादेव चव्हाण | | |
| ४६ | श्री. चंद्रशेखर केशव यादव | | |
| ४७ | श्रीम. मिताली राजेश चान्पूर | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीम. चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर, २. श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर, ३. श्रीम. अंजना अंकुश म्हस्के, ४. श्रीम. गीता लालचंद साधनानी, ५. श्रीम. अपेक्षा भगवान भालेराव, ६. श्रीम. राजश्री राजेंद्र चौधरी, ७. श्रीम. शुभांगी मनोहर बेहनवाल, ८. श्रीम. ज्योत्स्ना सुरेश जाधव, ९. श्रीम. संगिता नितीन सपकाळे, १०. श्रीम. शितल चंद्रकांत कदम, ११. श्रीम. वसुधा धनंजय बोडारे, १२. श्री. सतराम पुतनदास जेसवानी, १३. श्रीम. मिनाक्षी रवी पाटील, १४. श्री. अकाश परशुराम पाटील, १५. श्री. मनोज दिलीपकुमार सयानी, १६. श्री. प्रदिप अर्जूनदास रामचंदानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. डॉ. सुधाकर शिंदे, आयुक्त
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
४. श्री. जमीर लेंगरेकर, उप आयुक्त (मुख्यालय)
५. श्रीम. मंगला माळवे, सहा. आयुक्त
६. श्री. महेश शितलानी, उप अभियंता
७. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
८. श्री. शैलेश दोंदे, प्र. कर निर्धारक व संकलक
९. श्रीम. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
१०.श्री. एकनाथ पवार, प्र. स्वच्छता निरीक्षक
११.श्री. भगवान कुमावत, प्र. सहा. आयुक्त
१२.श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा पाटील
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळू भांगरे

दुपारी ०४.०३ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिवः—</u> विषय क्र. १५ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————
—

⇨ **विषय क्र.१५ः—** विशेष समित्यांची रचना करणे.

———————————————————————————————————
—

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मा. महापौर, विषय क्रमांक १५ हा प्रभाग समित्यांची रचना करणेसाठी आलेला आहे. त्यासाठी माझे जे विचार आहेत, जो प्रस्ताव आहे, तो मी आपल्या समोर देत आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> मा. महापौर, आयुक्त साहेब, विषय क्रमांक १५ हा विषय प्रशासनाकडून आलेला आहे आणि प्रशासनाने जो विषय दिला आहे, तो बरोबर आहे आणि त्यांनी अनुक्रमानुसार दिलेले आहे आणि अनुक्रमांनुसार दिल्या नंतर तो तसाच अनुक्रमाकांनुसार राहीला पाहीजे अशी आमची विरोधी पक्षांची मागणी आहे. आपण प्रशासनाने दिलेल्या प्रस्तावाचा आपण जर विचार केला आणि सभागृहाने त्याला मंजूरी दिली तर बरे होईल.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> मा. महापौर, मा. आयुक्त साहेब उल्हासनगर महानगरपालिकेची नवीन पुर्नरचना चार वार्डचा एक पॅनल किंवा प्रभाग हे करत असतांना निवडणूक आयोगाने ज्या प्रभाग रचनेला मंजूरी दिलेली आहे. त्यानुसारच प्रशासनाने १ ते ५ प्रभाग समिती क्र. १, ६ ते १० प्रभाग समिती क्र. २ आणि ११ ते १५ प्रभाग समिती क्र. ३, १६ ते २० प्रभाग समिती क्र. ४ असे व्यवस्थित दिलेले आहे. लागून असलेले प्रभाग एकत्रित करून प्रभाग समितीची रचना प्रशासनाने केली आहे आणि ती योग्य आहे. तेव्हा प्रशासनाचा प्रस्ताव व्यवस्थित आहे. प्रभाग समितीच्या माध्यमातून शहरातील लोकांना जी सेवा देयाची आहे. प्रभाग समितीचे ते कामकाजच असे आहे की, महानगरपालिकेत ती छोटी महानगरपालिका तेव्हा प्रशासनाचा हा प्रस्ताव व्यवस्थित आहे आणि योग्य आहे. मी आयुक्त साहेब, आपण या बरोबर जो प्रस्ताव दिलेला आहे तो बरोबर आहे. कृपया त्याच्यामध्ये बदल करू नये जेनेकरून शहरातील नागरीकांना एका आपल्या राजकिय अक्झेटमेंटसाठी इकडे तिकडे भटकावे लागेल. प्रशासनाने सुरूवातीपासून जेव्हा महानगरपालिका जाहीर झाली, तेव्हा प्रभाग रचना करतांना १ ते ५, ६ ते १०, ११ ते १५ आणि १६ ते २० अशा प्रकारे नंबर प्रमाणेच प्रभाग रचना केलेली आहे. आयुक्त साहेब, आपण हे लक्षात ठेवा जर चुकीचे होत असेल तर त्यासाठी पुढे कुठे पाठवायचे आहे, हे तुम्हांला माहीत आहे. या महापालिकेत जर चुकीचे प्रस्ताव होत असले तर.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, भौगोलिक दृष्टीकोणातून जर प्रभाग समितीची रचना जर बघितले तर चार चार वार्डाचे जे प्रभाग बनवले आहेत, त्यामध्ये प्रभाग क्रमांक १, २, ३, ४, व ५ ही प्रभाग समितींची रचना होत आहे, प्रभाग समिती क्र.१गोल मैदान, ७,८,९,१० हे प्रभाग समिती क्रमांक २ खेमानी, आणि तिसरा जो प्रभाग समिती क्रमांक आहे, भौगोलिक दृष्टीकोणातून बघितले तर ११ ,१२, १४ व १६ हे वार्ड लागून आहेत, प्रभाग समिती क्रमांक ४ मध्ये जो प्रभाग समिती कार्यालय आहे. तोच १३ नंबर प्रभाग बनलेला आहे, जो १३ नंबरचा प्रभाग आहे त्यामध्ये १३, १७, १८, १९ व २० असे आमचा सगळयांचे मत आहे आणि त्याचा प्रस्ताव पण मी दिलेला आहे, मा. महापौरजी, जो माझा प्रस्ताव आहे, तो प्रस्ताव आपण पारित करा.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> मा. महापौर, सभागृह नेत्यानी सांगितले आहे की, माझा जो प्रस्ताव आहे तो बरोबर आहे. मी आपल्यांना विचारता, आणि प्रशासनालाही विचारतो की, प्रशासनाने जो प्रस्ताव पाठवलेला आहे, तो चुकीचा आहे का? त्यांना समजत नाही का? त्यांनी चुकीचा बनवला आहे का? जर चुकीचा असेल तर प्रशासनाने चुकीचा का बनवला? प्रशासनाला हा माझा प्रश्न आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, ही प्रभाग समितीची रचना आपल्याकडून, प्रशासनाकडून जो प्रस्ताव आलेला आहे, तो आम्हांला भौगोलिक परिस्थीनुसार योग्य वाटतो. मी महापौरांना सांगतो की, या प्रस्तावावर मतदान घ्या.

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:—</u> मा. महापौर, मला थोडेसे बोलायचे आहे, जी प्रभाग समित्यांची रचना महाराष्ट्र शासनाकडून होते, त्याच्यामध्ये सतत बदल होत असतो. २००२ मध्ये तीनचे पॅनल बनले होते तो मा. मुख्यमंत्री साहेब यांनी बनवला होता. २००७ मध्ये एक एक वार्ड बनवले होते. २०१२ मध्ये दोन दोन चे पॅनल बनवले होते, २०१७ मध्ये चारचा पॅनल बनवले आहेत. तर महाराष्ट्र शासनाचे मुंख्यमंत्री साहेब होते. जसे ते प्रभाग बनवतात तेव्हा आम्हांला त्यांच्या आदेशाचे पालन करावे लागते. जसे २००२ मध्ये तीनचे होते, २००७ मध्ये एक होते, २०१२ मध्ये दोन होते आणि २०१७ चारचे आहेत. हे प्रभाग प्रत्येक वेळेस मा. मुख्यमंत्री साहेब यांच्याकडून व प्रशासनाकडून बदलत असतात. त्याच प्रमाणे इथे सुध्दा दोनचे चार झाले आहेत तर त्यामध्ये बदल करायचा असेल तर तो महासभेला अधिकार आहे, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> सन्माननिय महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब, प्रशासनाने जो प्रस्ताव तयार केलेला आहे, याचा अर्थ तो चुकीचा प्रस्ताव तयार केलेला आहे. प्रशासनाने जर प्रस्ताव बरोबर केला असेल तर हा प्रस्ताव येण्याचा प्रश्नच नाही. प्रशासनाने सर्व गोष्टी प्रभाग मधिल कार्याल्य किंवा त्या अजूबाजूला कार्यालय असतील अशा पध्दतीने त्यांनी तो केला असेल मग तो प्रस्ताव चुकीचा आहे का? मग चुकीचा असेल तर ते पण दाखवा प्रशासनाने तो समोर का आणला. त्याच वेळेस प्रशासनाने बदल करायला पाहीजे होते. आता नविन अशी कोणती गोष्ट झाली. जर कोणाच्या राजकीय सोयीसाठी जर प्रभागाचा बद्‌दल होत असेल तर हा प्रशासनाचा प्रश्न आहे, तो प्रशासनाने मिटवून टाकावा, परंतु प्रशासनाने कुठल्याही प्रकारचा बद्‌दल करू नये. प्रशासनाने दिलेला जो प्रस्ताव आहे, त्याला आमची मान्यता आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:—</u> निवडणूक घ्या, निवडणूक.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> मा. महापौर मा. सचिव मॅडम, प्रशासनाने कमित कमी नियोजन तर करावे, काय चुकले आहे, मला वाटते की, हा इंजिनियरने बनवला असेल, हा प्रस्ताव इंजिनियरने बनवला असेल तरी कृपया प्रशासनाने वरिष्ठ म्हणून प्रशासनाचे कोण बोलणार आहेत. आयुक्त साहेबांनी सांगावे की, आमचे इंजिनियर कामाचे नाहीत आणि त्यांनी बनवलेला हा प्रस्ताव चुकीचा आहे. कसा बरोबर आहे आणि कसा नाही त्याबाबतीत खुलासा केला तर बरे होईल.

<u>सदस्य, श्री. राजेश वधरिया:—</u> मा. महापौरजी पाच वर्षा पुर्वी हाच प्रभाग समितीचा विषय जेव्हा आला होता. मी आपणा सगळयांना लक्षात आणून देतो की, त्यावेळी १८ नंबर पॅनल प्रभाग समिती २ मध्ये यायला पाहीजे होता. जसे आपण बोलता की हा पॅनल बाजुला होता. हा जवळ आहे लोकांच्या सुविधा पाहता आपण तो १८ नंबरचा पॅनल १नंबर मध्ये टाकला त्यानंतर त्या प्रभागामध्ये १८ नंबर पॅनल मध्ये प्रभाग समितीचे ऑफिस येत आहे तरी तो प्रभाग १८ नंबर मध्ये टाकले गेला तेव्हा प्रत्येक वेळेस जे प्रभाग बनतात ते असेच बनत आले आहेत. आता जे पण सत्तेमध्ये आहेत, साई पार्टी, भारतीय जनता पार्टी यांना वाटते की प्रशासन चांगल्या प्रकारे काम करत आहे. चांगल्या प्रकारे जर लोकांना सुविधा देवू शकतात. तेव्हा या गोष्टी बघूनच हा प्रस्ताव घेतला आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> प्रस्ताव कोणच्याही मर्जीनुसार तयार होत नाही, तो प्रशानातर्फे आलेला आहे आणि त्यावेळेस पाच वर्षा पुर्वी तुम्ही विरोधीमध्ये होते. तेव्हा तुम्ही विरोध केला नाही. त्यामुळे तो पास झालेला असेल. आता आम्ही विरोध करीत अहोत प्रशासनाच्या बाजूने बोलत अहोत.

<u>सदस्य, श्री. राजेश वानखेडे:</u> ठिक आहे विरोध करीत असतील तर मग निवडणूक घ्या.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> प्रशासनाने खुलासा तर करावा.

<u>सदस्य, श्री. राजेश वधरिया:—</u> आता प्रस्ताव तर दिलेला आहे, आता हामहापालिकेच्या महासभेचा विषय आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वधरिया:—</u> आपण प्रशानाला गुंगा समजतात का?

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> माझे सन्माननिय मित्र राजेश वधरिया यांनी सांगितले आहे की, साई पक्षाने प्रभागाच्या निर्माण केले भारतीय जनता पार्टीसाठी की जनतेसाठी महापौर मॅडम कोणासाठी आहे. आपण ही प्रभाग रचना जनतेसाठी करतो की कुठल्या पक्षसाठी करतो.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> सन्माननिय वधरियाजी आपण खाली बसून घ्या.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> मला वाटती ही प्रभाग रचना जनतेसाठी आहे, जनतेच्या हिशोबाने प्रशासनाने तयार केलेल्या प्रस्तावाला मान्यता दिली पाहीजे.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारी:—</u> आपण बसून घ्या, नंतर खुलासा करू.

<u>आयुक्त, डॉ. सुधाकर शिंदे:—</u> आदरणीय महापौर, सन्माननिय सदस्य प्रशासनाला जो प्रस्ताव योग्य वाटला तो प्रस्ताव प्रशासनाने सभागृहा समोर सादर केलेला आहे. या प्रस्तावरती सभागृह जो निर्णय घेईल तो सभागृहाचा

निर्णय सभागृहाने घ्यावा. या विषयी पुढची जी काही प्रक्रिया असेल तो बघून त्याचा अभ्यास करून प्रशासन पुढचा निर्णय घेईल.

<u>महापालिका सचिव:—</u> सर्वात प्रथम नियमानुसार या प्रस्तावात सुधारणा आली आहे. तरी प्रस्तावना स्विकारायची का नाही. हे सर्व संमतीने ठरवायचे आहे आणि नंतर यावर निवडणूक होईल.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> ठिक आहे, निवडणूक घ्या.

<u>महापालिका सचिव:—</u> ठिक आहे, सभागृह नेता, श्री. जमनादास पुरस्वानी यांनी आणि अनुमोदक श्री. हरेश जग्याशी यांनी एक प्रस्ताव दिला आहे. महासभा विषय क्रमांक १५ त्यात त्यांनी बदल केला आहे. उल्हासनगर—१ गोल मैदान प्रभाग समिती क्र. १ मध्ये प्रभाग क्र. १, २, ३, ४ व ५ आहे, प्रभाग समिती क्र. २ मध्ये प्रभाग क्र.६, ७, ८, ९ व १० आहे, उल्हासनगर व्हि.टी.सी.मैदान प्रभाग समिती क्र.३ मध्ये ११, १२, १४, १५, व १६ आहेत, उल्हासनगर—४, पाणी पुरवठा कार्यालय प्रभाग समिती क्र.४.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> एक मिनीट प्रभाग समिती क्र.३ मध्ये काय आहे.

<u>महापालिका सचिव:—</u> प्रभाग समिती क्र.३ मध्ये ११, १२, १४, १५ व १६ आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> १३ मध्ये प्रभाग समिती क्र.३ आहे तो काढलेली आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> माहितीची कमतरता असल्यामुळे जो १३ नंबरचा प्रभाग आहे, तो प्रभाग समिती क्र. ४ मध्ये आलेला आहे.

<u>महापालिका सचिव:—</u> प्रभाग समिती क्र. ४ मध्ये प्रभाग क्र. १३, १७, १८, १९ व २० असे यांनी समाविष्ट करायला सांगितले आहे. सर्व प्रथम ही प्रस्तावाची सुचना स्विकारायची की नाही हे सर्वांनी सांगायचे आहे, त्या नंतर प्रस्ताव पुढे होईल.

<u>महापालिका सचिव:—</u> कृपया या प्रस्तावाच्या बाजूने जे आहेत त्यांनी हात वर करावे.

<u>प्रस्तावाच्या बाजूने ४१ मते</u>

१. श्रीम. मिना आयलानी
२. श्री. जीवन इदनानी
३. श्री. दिपक सिरवानी,
४. श्रीम. इंदिरा उदासी
५. श्रीम. कविता पंजाबी
६. श्रीम. दिप्ती दुधानी
७. श्रीम. चंद्रावतीदेवी सिंग
८. श्री. अजित गुप्ता
९. श्री. गजानन शेळके
१०.श्रीम. मिना सोनेजी
११.श्री. विजय पाटील
१२.श्री. शंकर लुंड
१३. श्री. राजेश वानखेडे
१४. श्रीम. रेखा ठाकूर
१५. श्री. महेश सुखरामानी
१६. श्रीम. लक्ष्मी सिंग
१७. श्रीम. जया माखिजा
१८. श्रीम. अर्चना करणकाळे
१९. श्रीम. मिनाकौर लबाना

२०. श्रीम. जयश्री पाटील
२१. श्रीम. सरोजीनी टेकचंदानी
२२. श्रीम. कविता गायकवाड
२३. श्रीम. आशा बिराडे
२४. श्रीम. डिम्पल ठाकुर
२५. श्रीम. दिपा पंजाबी
२६. श्रीम. छाया चक्रवर्ती
२७. श्रीम. सविता तोरणे
२८. श्री. हरेश जग्यासी
२९. श्री. जमनादास पुरस्वानी
३०. श्रीं. राजेश वधरिया
३१. श्रीम. पंचम कालानी
३२. श्री. प्रकाश नाथानी
३३. श्री. किशोर वनवारी
३४. श्रीम. पुजा भोईर
३५. श्रीम. शुभांगी निकम
३६. श्री. सोनू छाप्रू
३७. श्री. रवी जग्यासी
३८. श्रीम. ज्योती पाटील
३९. श्रीम. कांचन लुंड
४०. श्रीम. ज्योती बढीजा
४१.श्रीम. ज्योती चैनानी

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> सचिव मॅडम मला वाटते की, प्रशासनाच्या बाजूने कोणता प्रस्ताव आहे, तो अगोदर घेतला पाहीजे होता.

<u>महापालिका सचिव:—</u> नाही उलट प्रमाणेच प्रस्ताव जातो, नियमातच तसे आहे की, उलट प्रमाणे प्रस्ताव जाणार. उलट यांचा विरोध आहे, त्यामुळे विरोधाने जाणार. आता या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी स्विकारण्याच्या विरोधात आहेत, त्यांनी हात वर करावे.


<u>प्रस्तावाच्या विरोधात १९ मते:—</u>

१. श्री. रमेश चव्हाण
२. श्री. धनंजय बोडारे
३. श्री. सुनिल सुर्वे
४. श्रीम. ज्योती गायकवाड
५. श्री. भगवान भालेराव
६. श्री. भारत राजवानी
७. श्री. राजेंद्र चौधरी
८. श्री. चंद्रशेखर यादव
९. श्री. स्वप्निल बागुल
१०. श्रीम. अंजली साळवे
११. श्रीम. कविता बागुल
१२. श्रीम. पुजाकौर लबाना
१३. श्रीम. सुनिता बगाडे
१४. श्रीम. ज्योती माने
१५. श्री. कुलवंतसिंह सोहटा
१६. श्री. विकास पाटील
१७. श्री. प्रमोद टाले
१८. श्री. पुष्पा बागुल
१९. श्री. सुमित सोनकांबळे

**. महापालिक सचिवः—** तुम्ही पहीले हा प्रस्ताव स्विकारायचा का नाही यावर मतदान होणार आहे आणि मग नंतर दोन्हीवर नियमानुसार मतदान होईल. ही सुचना बहुमताने स्विकारली गेलेली आहे. सर्व प्रथम जी सुचना येते, त्याच्यावर मतदान होते, नंतर मग प्रशासनाच्या प्रस्तावावर मतदान होते. आता या प्रस्तावाच्या बाजूने जे आहेत, त्यांनी कृपया हात वरती करावे. जे प्रशासनाच्या बाजूने आणि तुम्ही दिलेल्या सुचनेच्या विरोधात आहेत त्यांनी हात वरती करावे.

**प्रशासनाच्या प्रस्तावाच्या बाजूने १९ मते**

१. श्री. रमेश चव्हाण
२. श्री. धनंजय बोडारे
३. श्री. सुनिल सुर्वे
४. श्रीम. ज्योती गायकवाड
५. श्री. भगवान भालेराव
६. श्री. भारत राजवानी
७. श्री. राजेंद्र चौधरी
८. श्री. चंद्रशेखर यादव
९. श्री. स्वप्निल बागुल
१०. श्रीम. अंजली साळवे
११. श्रीम. कविता बागुल
१२. श्रीम. पुजाकौर लबाना
१३. श्रीम. सुनिता बगाडे
१४. श्रीम. ज्योती माने
१५. श्री. कुलवंतसिंह सोहटा
१६. श्री. विकास पाटील
१७. श्री. प्रमोद टाले
१८. श्री. पुष्पा बागुल
१९. श्री. सुमित सोनकांबळे

**महापालिका सचिवः—** प्रशासनाच्या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी हात वरती करावे.

**प्रशासनाच्या प्रस्तवाच्या विरोधात ४१ मते**

१. श्रीम. मिना आयलानी
२. श्री. जीवन इदनानी
३. श्री. दिपक सिरवानी,
४. श्रीम. इंदिरा उदासी
५. श्रीम. कविता पंजाबी
६. श्रीम. दिप्ती दुधानी
७. श्रीम. चंद्रावतीदेवी सिंग
८. श्री. अजित गुप्ता
९. श्री. गजानन शेळके
१०.श्रीम. मिना सोनेजी
११.श्री. विजय पाटील
१२.श्री. शंकर लुंड
१३. श्री. राजेश वानखेडे
१४. श्रीम. रेखा ठाकूर
१५. श्री. महेश सुखरामानी
१६. श्रीम. लक्ष्मी सिंग
१७. श्रीम. जया माखिजा
१८. श्रीम. अर्चना करणकाळे
१९. श्रीम. मिनाकौर लबाना

२०. श्रीम. जयश्री पाटील
२१. श्रीम. सरोजीनी टेकचंदानी
२२. श्रीम. कविता गायकवाड
२३. श्रीम.आशा बिराडे
२४. श्रीम. डिम्पल ठाकुर
२५. श्रीम. दिपा पंजाबी
२६. श्रीम. छाया चक्रवर्ती
२७. श्रीम. सविता तोरणे
२८. श्री. हरेश जग्यासी
२९. श्री. जमनादास पुरस्वानी
३०. श्रीं. राजेश वधरिया
३१. श्रीम. पंचम कालानी
३२. श्री. प्रकाश नाथानी
३३. श्री. किशोर वनवारी
३४. श्रीम. पुजा भोईर
३५. श्रीम. शुभांगी निकम
३६. श्री. सोनू छाप्रू
३७. श्री. रवी जग्यासी
३८. श्रीम. ज्योती पाटील
३९. श्रीम. कांचन लुंड
४०. श्रीम. ज्योती बढीजा
४१.श्रीम. ज्योती चैनानी

<u>महापालिका सचिवः—</u> आता प्रशासनाच्या प्रस्तावाच्या बाजूने जे आहेत त्यानी आपले हात वर करावे.

<u>महापालिका सचिवः—</u> आता प्रशासनाच्या प्रस्तावाच्या विरोधात ४१ मते व प्रशासनाच्या प्रस्तावाच्या बाजूने १९ मते हा प्रस्ताव बहुमताने पास झाला.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u> मा. महापौर, हा प्रस्ताव इतिवृत्ताची वाट न पहाता पास, सचिव मॅडम इतिवृताची वाट न पहाता पास.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापालिका सचिवः—</u> हा प्रस्ताव ही महासभा प्रशासनाचा प्रस्ताव विचारात न घेता नविन प्रस्तावनुसार ठराव करण्यासाठी मान्यता देत आहे. इतिवृत्ताची वाट न पहाता.

<u>महापालिका सचिवः—</u> ⇨ <u>आयत्या वेळचा विषय :—</u>

विषय क्र. १६ आयत्या वेळीचा विषय वाचून दाखवितात. वाल्मिकी वसाहत उल्हासनगर—५ येथील महापालिका मालकीच्या निवास्थानांचा ताबा देणेबाबत धोरण निश्चित करणे.

<u>प्र.मालमत्ता व्यवस्थापक, श्रीम. विशाखा सावंतः—</u> मा. महापौर, मा.उप महापौर, मा.आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य, वाल्मिकी वसाहत, उल्हासनगर—५ येथील महापालिका मालकीच्या निवासस्थानांचा ताबा देणेबाबत धोरण निश्चित करणेबाबत.

वाल्मिकी वसाहत, उल्हासनगर–५ येथील महापालिकेच्या निवासस्थानाच्या इमारती धोकादायक झाल्याने केंद्र शासनाच्या निधीतून नव्याने बांधकाम करण्यासाठी पाडण्यात आल्या. सदर इमारती रिकाम्या करीत असताना सदर इमारतीत राहत असणा–या सफाई कामगारांना अन्य ठिकाणी त्यांची सोय करणेसाठी बांधकाम ठेकेदारामार्फत रू. २५०००/– चा धनादेश अनामत रक्कम म्हणून दिलेला आहे. सदर धनादेश देताना नव्याने बांधण्यात येणा–या इमारतींमध्ये आपणांस महानगरपालिकेची सदनिका निवासस्थानासाठी देण्यात येईल असे कळविण्यात आलेले आहे.

सदर निवासस्थानांच्या इमारतींचे बांधकाम हे शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेतंर्गत प्राप्त निधीतून करावयाचे होते व सदर योजनेतंर्गत बांधण्यात येणा–या सदनिका या ज्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्षे किंवा त्याहून अधिक झाली आहे अशा सफाई कामगारांना सेवानिवृत्तीनंतर किंवा सफाई कामगारांचा सेवेत मृत्यु झाल्यास अशा सफाई कामगारांच्या निधनानंतर त्याच्या पात्र वारसास मालकी तत्वावर मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता.

परंतु शासनाकडून सदर निधी प्राप्त झालेला नाही व निवासस्थानांच्या इमारती या महापालिका निधीतून पुर्ण करण्यात आल्या आहेत. महापालिकेने बांधलेल्या निवासस्थानाच्या तीन इमारतींमध्ये १२८ सदनिका आहेत. महापालिकेत सुमारे १२०० सफाई कर्मचारी आहेत. सदर सदनिकेच्या उपलब्धतेनुसार या सर्व सफाई कर्मचारी यांना देता येणे शक्य नाही. त्याकरीता सदर सदनिकांचे वाटप करण्यासाठी महापालिकेकडून सफाई कामगारांची निवड करणेसाठी पात्रतेच्या विविध अटी दर्शविणारे धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

महापालिकेद्वारे नव्याने बांधण्यात आलेल्या निवासस्थानांच्या सदनिकांचे वाटप करणेकरीता लाभार्थ्यांसाठी अटी व शर्ती पुढीलप्रमाणे निश्चित करता येतील व जे सफाई कर्मचारी यापुर्वी सदर निवासस्थानांमध्ये राहत होते त्यांनादेखील निश्चित केलेल्या धोरणांच्या अटी व शर्ती लागू राहतील.

१. निवासस्थानाचे वाटप कायमस्वरूपी सेवेत कार्यरत सफाई कामगारांना देण्यात येईल.
२. सफाई कामगार यांचे महापालिका क्षेत्रात स्वत:च्या मालकीचे निवासस्थान नसावे.
३. निवासस्थान म्हणून महापालिका सेवेत असेपर्यंत ज्याच्या नावे दिले गेले आहे त्यांची सेवा असेपर्यंतच त्यांच्या ताब्यात राहिल. सेवानिवृत्त झाल्यास/मृत्यु झाल्यास किंवा अन्य कारणाने सेवा समाप्त झाल्याच्या दिनांकापासुन पुढील तीन महिन्यांच्या आंत सदर सदनिकेचा ताबा सोडावा लागेल व त्यांना किंवा त्यांच्या कुटूंबियांना निवासस्थानात राहण्याचा हक्क असणार नाही. विहीत मुदतीत निवासस्थानाचा ताबा न सोडल्यास सेवा समाप्त झाल्याच्या तारखेपासुन पुढील महिन्याचे भाडे हे चालू बाजारभावाप्रमाणे वसुल करण्यात येईल.
४. निवासस्थान मिळणेकरीता रू. ५०००/– इतकी अनामत रक्कम महापालिकेकडे जमा करावी लागेल. निवासस्थानाचा ताबा सोडल्यानंतर अनामत रक्कम परत करण्यात येईल.
५. सदर निवासस्थानापोटी सफाई कामगार यांचे वेतन देयकातुन दरमहा घरभाडे भत्ता कपात केला जाईल.
६. सदर निवासस्थानाचे विज देयक वास्तव्यास असणा–या सफाई कामगारांना अदा करावे लागेल. निवासस्थानाचा ताबा सोडताना ज्या दिनांकास ताबा सोडत आहे त्या कालावधीतील शेवटचे देयक अदा केल्यानंतरच निवासस्थानाचा ताबा सोडता येईल.
७. शासन निर्णयानुसार महापालिकेने दिलेल्या निवासस्थानासाठी सफाई कर्मचा–यांना त्यांच्या वित्तलब्धीच्या १० टक्के किंवा निवासस्थानाचे प्रमाणित भाडे हयापैकी जे कमी असेल तेवढे अनुज्ञप्ती शुल्क अदा करावे लागेल.
८. वेळोवेळी अटी व शर्ती शिथील वा बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना प्रदान करण्यात येतील.

यापुर्वी महापालिका निवासस्थानात राहत असलेल्या ज्यांच्याकडून सदनिका रिकाम्या करून घेतल्या आहेत अशा ५० सफाई कर्मचारी यांचेकडूनदेखील वरीलप्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रू. १००/–चे स्टॅम्प पेपरवर ।ffपिकंअपज लिहुन घेतल्यानंतरच सदनिका वाटप करणे उचीत वाटते.

<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:–</u> यामध्ये या सदनिकांमध्ये पहील जे जूने कर्मचारी राहत होते, पहीले त्यांनाच मिळायला पाहीजे. बाकीचे जे आहेत त्यामध्ये बोगस यायला नाही पाहीजेत. मला माहीत झाले होते की, यामध्ये बोगस नावे दिलेली आहेत. ज्यांची २५ वर्षे सेवा झालेली आहे, त्यांनाच मिळायला पाहीजे. यामध्ये संपुर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील. यामध्ये अट क्र. एक आहे की, कायम स्वरूपी सेवेत असलेल्या सफाई कर्मचा–यांनाच निवासस्थानाचे वाटप देण्यात येईल. तर हे कायमस्वरूपी जो पर्यत सेवेमध्ये आहे, तो पर्यंतच त्यांनाच दिले जातील. तिस–यामध्ये स्पष्ट दिले आहे परंतु हे दोन्ही विरोधात वाटते.

यावेळी सदस्या, श्रीम. लीलाबाई आशान, मीताली चान्पुर, सुरेखा आव्हाड, सदस्य, श्री.रविंद्र बागुल, यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

आयुक्त, डॉ. सुधाकर शिंदेः— सन्माननिय सदस्यांना मला निदर्शनास आणून दयावयासे वाटते की, कायम स्वरूपी म्हणजे तो महापालिकेचा परमानंट सेवक आहे. त्याची सेवा कायम स्वरूपी आहे, याचा अर्थ असा आहे. त्याला घर कायम स्वरूपी आपण देत नाही. म्हणजे तो परमानंट कर्मचारी आहे. काही कर्मचारी परमानंट असतात काही टेंपरवारी असतात, काही ठेकेदारी वरती असतात. तर जे महानगरपालिकेचे परमानंट कर्मचारी आहेत, त्यांनाच हे घर मिळणार आणि ते कॉटर आहेत. म्हणजे जसे शासकिय निवासस्थान असते, तसे निवासस्थान आहेत. आताच आमच्या संबंधित अधिका—यानी सांगितल्या प्रमाणे आपल्याला आलेला निधी त्या योजने खाली येऊ शकला नाही. त्याच्यामुळे आपल्याला त्यांच्या मालकिचे घेर देता येत नाही. तरी माझी कालच सफाई कर्मचा—यांच्या संघटनेच्या पदाधिका—यांशी बोलन झाले आहे. आपल्याला सर्वसाधारण योजने मधून किंवा दुसरी एखादी केंद्रशासनाची, राज्य शासनी आणखी एखादी योजना आहे का? जेनेकरून या वंचित घटकांना स्वतःच्या मालकिचे घर आपल्याला देता येईल का? या बाबत मी चर्चा केली आहे. तसे या बाबतच्या ज्या योजना असतील, त्या राबवून आपण त्यांना स्वतःचे घर देण्याचा प्रयत्न करू. परंतु सध्या ही घर महानगरपाकेचे कॉटर्स आहेत. जे कायम स्वरूपी सेवेत आहेत, ते सेवेत असे पर्यंत त्यांना मिळतील.

सदस्य, श्री. धनंजय बोडारेः— त्यांना जो घरे भाडे, भत्ता मिळतो, तो कट होणार म्हणजे. जे कॉटर्स पडताहेत तसेच याची परिस्थिती होणार आहे.

सदस्य, श्री. राजेश वधरियाः— हा जो महानगरपालिकेचाय प्लॉट आहे, यामध्ये फक्त १२८ घरे बनवली आहेत. माझ्या माहीतीनुसार येथे अजून घरे बनू शकतात. तर आपण याची माहिती घेऊन जी प्रधानमंत्री आवास योजना आहे, त्यामधून आपण अजून घरे बाधू शकतो. त्यासाठी आमच्या जवळ भरपूर जागा पडलेली आहे आणि जी घरे बनवली आहेत, ती तळमजला इथ पर्यंतच बनवलेली आहेत. ती बिल्डींग सात माळयाची होती ती कमी केली आहे. तीच्यावरती पहीलेच आपला खर्च झालेला आहे. या बिल्डींगवरती अजून माळे बनवू शकतो का? आणि दुसरा शिल्लक असलेल्या जागेवर आपण अजून किती घेरे बनवू शकतो. प्रधानमंत्री आवास योजनेमधून फंड घेऊन बनवू शकतो का? हे आपण बघा आणि जर होत असेल तर करा.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः— मा. महापौर, सदर सदनिकांचे उद्‌घाटन कधी करणार आहेत, अशी तारीख ठरवली आहे का? आणि कोणा कोणाला आपण आमंत्रित करणार आहेत. या बद्‌दल पण मला वाटते आताच विचारणा केली तर बरे होईल, नंतर वाद होण्या पेक्षा. कारण की, एखादयाचा अधिकार डावलून दुसरा कुणाला तरी आणून जबरदस्ती करणार हे उल्हासनगर महानगरपालिकेच्या सदस्यांना शोभणार नाही. मग आपण ते पण धोरण ठरवावे, आणि त्याप्रमाणे त्यांच्या तारखा घेऊन.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः— मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, हा जो विषय आहे, तो सर्व संमतीने पास करणार आहे. परंतु माझे असे म्हणणे आहे की, किती तरी दिवसापासून ही घरे बनवून पडून आहेत. आपल्या कडून वाटप न केल्यामुळे त्यांचे दरवाजे, खिडक्या तुटत आहेत. मी सर्वांना निवेदन करतो की, जे जुने लोक प्रथम इथे राहत होते, त्यांना तात्काळ घरे दिली जावीत. त्याच्या नंतर आपण कोणा कोणाला देणार आहेत, नियमानुसार छाननी करून कोणाला घर नाही, कोण घर घेणार आहे, कोण घेणार नाहीत लॉटरी पध्दतीने करावे आणि ही जी प्रक्रिया आहे, ती दोन महीन्याच्या आत मध्ये पुर्ण झाली पाहीजे. आता पंधरा दिवसाच्या आत जे लोक प्रथम राहत होते. त्यांना घेरे देण्यात यावीत आणि दोन महिन्याच्या आतमध्ये ही सर्व प्रक्रिया पुर्ण करा. अनधिकृतरित्या कोणाचा त्याच्यावर ताबा होणार नाही, धन्यवाद.

महापालिका सचिवः— पास, यामध्ये ज्या अटी आहेत, १००/— रूपयाच्या स्टॅम्प पेपरवर याचा ठरावात समावेश करण्यात येईल.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः— सन्माननिय आयुक्त साहेबांच्या मार्गदर्शनाखाली ही सर्व प्रक्रिया पुर्ण व्होयाला पाहीजे. यासाठी आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

महापालिका सचिवः— हे पण ठरावात टाकत आहे की, आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे, सर्व संमतीने पास.

सदस्य, श्री. भगवान भालेराव:— सन्माननिय महापौर मॅडम, आयुक्त साहेब, महापौर मॅडम आपल्या निदर्शनास आणून देतो की, गेली आपण आठ दहा दिवस, आयुक्त साहेब, आपण आणि आपली टीम शहाड स्टेशनच्या अजूबाजूच्या टप—या असतील, उल्हास स्टेशनच्या अजूबाजूच्या टप—या असतील, मार्केट मधल्या असतील, मला वाटते गली पंचवीस, तीस वर्षे बरेच आपले सिंधी बांधव असतील, महाराष्ट्रायीन असतील, हे उल्हासनगर मधील रहीवासी गेली मोठया प्रमपणामध्ये पंचवीस ते तीस वर्षे आपला उदरनिर्वाह करीत आहेत. आपण या आठ दिवसाच्या अंतरमध्ये आपण ब—याच टप—या खाली केल्या. त्यांची सोय आपण काय केली? कारण त्यांची सोय होणे अत्यंत गरज आहे. कारणत ते गेली तीस वर्षे एक एक पिढी तेथे त्या लोकांनी घालवली आहे आणि अशा वेळी सोय करणे आवश्यक आहे. आपण महानगरपालिकेच्या वतीने त्यांना कुठला हॉकर्स झोन बाजूला दिला आहे का? त्यांचे निर्वासन आपण कुठे करणार आहेत? कुठे ते धंदे लावणार आहेत. आज हजार ते दिड हजार कुटूंबावर उपासमारीची वेळ आली आहे. आपण ही कारवाई केलेली आहे, ही कारवाई केल्या नंतर त्यांना कुठे बसवणार अहोत आणि महानगरपालिकेची कारवाई ही अति असते आणि नविन बांधकाम आपण हटवत नाहीत. जे दोनशे चारशे प्लॉन आपण दिलेले आहेत, त्याच्यावर अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. वाढीव काम केले आहे, त्यांना आपण तोडत नाही. कोणी रीपेरींग करत असेल त्याला आपण पहीले तोडतो. झोपडपट्टीमधील छोटया मोठया टप—या असतील त्यांना आपण पहीले हटवतो. त्यांच्यासाठी आपण काय व्यवस्था केली आहे, ती जरा सभागृहाला सांगितले तर बरे होईल.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— मा. महापौर मॅडम मागच्या २४ तारखेला साहेबांनी जे सांगितले होते, पाण्याच्या संदर्भात काय काय उपाययोजना केल्या, या चार दिवसात आपण त्याचा आराखडा तरी बनवला असेल. कार्य तर काहीच नाही पण अराखडा बनवला असेल. त्याबाबत पण सांगितले तर या मिटींगला तर बरे होईल. म्हणजे सगळया सदस्यांना कळेल की आता पर्यत पाण्याबाबत काय काय केले.

सदस्य, श्री. शंकर लुंड:— मा. महापौर, आयुक्त साहेब, काही दिवसापासून हॉटस ॲपवर उल्हासनगर शहराच्या डिपी प्लॉन बाबत आला आहे. सगळे शहरवासी.....

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— सन्माननिय शेरीजी, स्थगित केलेल्या मिटींगमध्ये हा विषय आपण घेऊ शकत नाही.

सदस्य, श्री. शंकर लुंड:— मॅडम माझी विनंती आहे की या विषयाला पुर्ण करा. डीपी प्लॉन संपुर्ण शहराशी संबंधित आहे.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— याय विषयावर आपण बोलू शकत नाही.

सदस्य, श्री. महेश सुखरामानी:— मा. महापौर, आयुक्त साहेब, उप महापौर, एका स्विकृत नगरसेवक बरोबर मारामारी झाली आहे.

महापालिका सचिव:— मा. महापौरांनी राष्ट्रगित सुरू करायला सांगितले आहे, कृपया सर्वांनी राष्ट्र गितासाठी उभे रहावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ५.३० वाजता महापौर श्रीमती मिना कुमार आयलानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.